
# [illegible] [illegible] ताराबाई

१५८५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
क्र. नं. ६८३



REFBK-0006738

लेखिका:—वै. सौ. रंगूबाईसाहेब जाधव, ( केसर-ई-हिंद. )

मूल्य ७ रुपये.

॥ श्रीअंबाबाई प्रसन्न ॥



करवीर राज्य—संस्थापिका

# मोंगल मर्दिनी ताराबाई.

लेखिका:—वै. सौ. रंगुबाईसाहेब जाधव [ कैसर-ई-हिंद ]

REFBK-0006738

मूल्य ७ रुपये.

मुद्रक व प्रकाशक

श्री. चंद्रकांत गणेश हेरेकर,

मॅनेजिंग डायरेक्टर, दी बेळगांव प्रिंटिंग ॲन्ड पब्लिशिंग हौस,

घर नंबर २२३४ कचेरीगल्ली—शहापूर येथें छापून प्रसिद्ध केलें.

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ऐतिहासिक ग्रंथप्रकाशन समितीचें चिटणीस श्री. पां. गो. रानडे यांनीं आपलेकडे राखून ठेविले आहेत.

श्रीमंत मातोश्री महाराणी ताराबाई साहेब छत्रपति



हें छायाचित्र सन १९४० च्या मार्चमधील आहे.

॥ श्रीअंबाबाई प्रसन्न ॥

# अर्पण-पत्रिका.

श्रीजगदंबा अंबाबाई करवीरवासिनी माता ॥
मंदगती शुद्धमती भक्तांवर जी करी स्वयें ममता ॥१॥
तनमनधन राष्ट्राचें धर्माच्या रक्षणाकडे लागे ॥
माता भवानि तेव्हां घाली जन्मा शिवाजिला वेगें ॥२॥
तो नर नरसिंहाचा किंवा शंकर महेश रुद्राचा ॥
श्रीच्या कृपाप्रसादें अवतारा घेऊनी रिघे साचा ॥३॥
महिवरि अविंध झाले मस्तपरी हिंदुना नसे त्राता ॥
हा जन ताप हराया शिवराजा धांवला यथा नेता ॥४॥
राज्य स्थापन करण्या धर्माची रक्षण-ध्वजा हातीं ॥
ज्ञीप्सा घेउनि झाली दैवाची पाहण्या कसोटी ती ॥५॥
ताबा निजराष्ट्राचा जिंकुनि घेई अनेक गड प्रांत ॥
राज्याभिषेक होतां डंका गाजे समस्त जगतांत ॥६॥

बावरले शौर्यानें याच्या अरिते समग्र युद्धांत ॥
ईर्षा हिंदूना ये विजयी होती अनेक कार्यांत ॥७॥
सार्थक जन्माचें तें करुनी गेले चरित्र गायास ॥
हेतु स्वराज्य वृद्धी व्हावी ऐसा सदा मनीं ध्यास ॥८॥
बसती नंतर त्यांच्या गादीवर ते प्रसिद्ध संभाजी ॥
छत्रपती जरि बनले त्यांतरि नव्हती प्रजा तशी राजी ॥९॥
त्रय जें भवतापाचें मागें लागे स्वराज्य कार्याच्या ॥
परचक्र सर्व नाशा करितें झालें स्वराज्य घाताच्या १०॥
तिमिरहि घनघोर पडे राष्ट्रावरि तें असह्य सर्वांना ॥
करण्या दूरचि उगवे रवि राजाराम तो खरा राणा ॥११॥
रवि जैसा तिमिराचा करितो निःपात त्यापरी त्यानें ॥
वीर अरींचे आले त्यांना गति देतसे हुषारीनें ॥१२॥
रण संग्रामीं लढतां गतवैभवप्राप्तिच्या मिषें सतत ॥
यांच्या अतिश्रमानें झाले ते अल्पआयुषी त्वरित ॥१३॥
चेतवलें रणकुंडहि शत्रूनें घ्यावया बळी ताजे ॥
सेवक धर्माचे जे होते तैसेच दोन ते राजे ॥१४॥
वेळा दारुण आली ऐशा समयीं पराक्रमी आर्या ॥

शिवकार्यदक्ष ताराबाई प्रकटे स्वराज्य ताराया ॥१५॥
मोंगलमय देश दिसे कैवारी हिंदुनां कुणी नसतां ॥
गमली ती महिषासुरमर्दिनि साक्षात् प्रजाजनां आतां ॥१६॥
लक्षुनि कार्य महोत्तम पति-निधनाच्या अलोट दुःख-गिरी ॥
मनिंच्या दूरहि करुनि झुंझाया शत्रुशीं निघे नारी ॥१७॥
रणरागिणी विराजे बिजली जैशी घनोदरीं चमके ॥
दिनदिन तैशी तारा अश्वारूढा गडीं गडीं भटके ॥१८॥
नीतिज्ञा जी अढळा राणीही सानथोर लोकांशीं ॥
तादात्म्य राज्यकार्यी म्हणुनी भजते प्रजा तिची देशी ॥१९॥
राणी ताराबाई अबला असतां प्रमत्त शत्रूचे ॥
बारा वाजविले कीं बुद्धीवैभव अजिंक्य तारेचें ॥२०॥
ईश्वरकृपाप्रसादें संस्थापुनि राज्य करविरीं अलग ॥
हा जय सम्राज्ञीचा वृत्तांतचि तो दिला यथा सांग ॥२१॥
ग्रंथीं ‘ मोंगल मर्दिनि ताराबाई ’ प्रसिद्ध नांवाच्या ॥
थक्क तरी वाचक हे होती गोष्टी अशा दिल्या साच्या ॥२२॥
वैभव शील पराक्रम बुद्धी कीं न्यायधर्म एकी हे ॥
सौभाग्य राष्ट्र-गुण जे कथिले ग्रंथीं यथामती पाहे ॥२३॥

रंगविली लेखनकृति महिलांना मार्गदर्शिका व्हावी ॥
गुण हंसक्षीराच्या न्यायें नरनारिनींहि निरखावी ॥२४॥
बाणेदार अशा त्या ताराऊच्या चरित्र सुमनांची ॥
इतिहास–गंधयुक्तहि माला रचिली सुरम्य नवलाची ॥२५॥
जागीं ताराऊच्या प्रतिकृतिनें शोभल्या महाराणी ॥
धर्मस्वरूप माता छत्रपती सुगुण राशिच्या खाणी ॥२६॥
वन्दुनि ' ताराबाई ' यांच्या कंठीं चरित्र माला ते ॥
अर्पण करिते भावें रंगूबाई ' स्वराज्यमातेतें ॥२७॥



अरुण प्रिंटिंग प्रेस, रविवारपेठ–बेळगांव.

# प्रकाशकाचे चार शब्द.

सर्वप्रकारच्या वाङ्मयास प्रसिद्धि देणें हा 'दी बेळगांव प्रिंटिंग अँन्ड पब्लिशिंग हौस, शहापूर' या नवीन स्थापन झालेल्या संस्थेचा एक प्रधान उद्देश आहे. बेळगांवच्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीचे उत्साही व इतिहासतज्ञ चिटणीस इतिहासभास्कर पां. गो. रानडे यांनीं समितीचा आठवा ऐतिहासिक ग्रंथ 'मोंगल मर्दिनी ताराबाई' आमचेकडे प्रकाशनाकरितां दिला त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. या ग्रंथाच्या लेखिका श्रीमंत वै. सौ. रंगुबाईसाहेब जाधव (केसर-इ-हिंद) यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक हा ग्रंथ लिहिला असून महाराष्ट्राचे इतिहासावर नवीन प्रकाश पाडला आहे. ह्या मौलिक ग्रंथाच्या प्रकाशनाचा सुयोग आमचे संस्थेस प्रथमतःच लाभला याबद्दल आह्मांला संतोष वाटत आहे. हिंदुपदबादशाहीच्या कारकीर्दींत ताराबाईनीं जी अपूर्व राष्ट्रसेवा व धर्मसेवा केली त्याचा खरा इतिहास येणें अत्यंत आवश्यक होतें. त्याची उणीव बेळगांवच्या समितीनें भरून काढली हें त्या समितीस भूषणावह आहे. आमचें प्रकाशन कार्य बृहन्महाराष्ट्रीय जनतेकरतां आहे. आमचा छापखाना नुकताच स्थापन झाला असल्यामुळें युद्धकालीन अडचणी लक्षांत घेऊन या ग्रंथांत जे मुद्रण किंवा सजावटीचे दोष झाले असतील त्याची वाचकांनीं आह्मांस क्षमा करून आमच्या संस्थेकडे सक्रिय सहानुभूतीनें पहावें अशी आमची त्यांना नम्र विनंति आहे. वै. सौ. रंगुबाईसाहेब जाधव यांनीं ग्रंथ लिहिल्याबद्दल व ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीनें आमचे संस्थेला मुद्रणाचा व प्रकाशनाचा सुयोग प्राप्त करून दिल्याबद्दल आह्मीं त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

शहापूर,
ता. ११-१२-१९४६,
मार्गशीर्ष वद्य ३ शके १८६८.

**चंद्रकांत गणेश हेरेकर,**
मॅनेजिंग डायरेक्टर, 'दी बेळगांव प्रिंटिंग ॲन्ड पब्लिशिंग हौस.' शहापूर.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | प्रकरणाचें शीर्षक | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ लें | पार्श्वभूमिका | १ ते १६ |
| २ रें | कुऱ्हाडीचा दांडा गोताळा काळ | १७ ते ३० |
| ३ रें | आत्मनाश व सर्वनाश | ३१ ते ४८ |
| ४ थें | स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा | ४९ ते ६८ |
| ५ वें | मुळावरील पोळी | ६९ ते ९० |
| ६ वें | मोंगल मर्दिनी ताराबाईंचा भगवा झेंडा | ९१ ते ११६ |
| ७ वें | सोन्याच्या पिंजऱ्यांतील शाहूराजे | ११७ ते १३४ |
| ८ वें | शाहूराजांचें आगमन आणि वारसाहक्काचें स्पष्टीकरण | १३५ ते १५४ |
| ९ वें | ताराबाई व शाहूराजे यांचा रणसंग्राम | १५५ ते १८५ |
| १० वें | ताराबाईंचा अपूर्व त्याग | १८६ ते २१८ |
| ११ वें | संभाजीराजे व शाहूराजे यांचा पुनः कलह व समेट | २१९ ते २६१ |
| १२ वें | शाहूराजे यांची अखेर | २६२ ते २९९ |
| १३ वें | रामराजे यांचा राज्याभिषेक व राजीनामा | ३०० ते ३२६ |
| १४ वें | ताराबाईपुढें पेशव्यांची शरणांगति | ३२७ ते ३८१ |
| १५ वें | ताराबाईंची अखेर | ३८२ ते ४१४ |
| | उपसंहार | ४१६ ते ४३२ |
| | परिशिष्ट | ४३३ ते ४४२ |
| | सूची | ४४३ ते ४५८ |


---

# चित्रें.

१ मोंगल मर्दिनी ताराबाई मुखपृष्ठ.
२ कोल्हापूरच्या जुन्या राजवाड्यांतील अंबाबाई परिशिष्ट १.
३ शिवाजीराजे छत्रपति यांचें तख्त परिशिष्ट २.
४ पन्हाळा किल्ल्यांतील ताराबाईचें निवासस्थान परिशिष्ट ३.
५ पन्हाळा किल्ल्यांतील कलावंतिणीचा सज्जा, परिशिष्ट ४.
६ सातारचा किल्ला, परिशिष्ट ५.
७ सातारच्या किल्ल्यावरील ताराबाईचें निवासस्थान, परिशिष्ट ६.

# आधार ग्रंथ.

१ गो. स. सरदेसाईकृत मराठी रियासती.
२ वि. का. राजवाडे कृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड.
३ सर यदुनाथ सरकारकृत शिवाजी व शिवकाल,
अनुवादक वि. स. वाकसकर.
४ बा. प्र. मोडककृत कोल्हापूर राज्याचा इतिहास.
५ कॅप्टन ग्रँट डफकृत मराठ्यांची बखर आवृत्ति सहावी.
६ मराठी साम्राज्याची छोटी बखर.
७ थोरले शाहूमहाराज ह्यांचें चरित्र, रा. ब. का. ना. साने प्रकाशित,
आवृति तिसरी.
८ मल्हार रामरावकृत थोरले राजाराम यांचें चरित्र.
९ का. रा. गुतेकृत नागपूरकर भोसल्यांची बखर.
१० पेशवे दप्तर.
११ मराठी दप्तर रुमाल पहिला.
१२ बावडा दप्तर १.
१३ बडोदे राज्य दप्तरांतील ऐतिहासिक वेचे.
१४ नागपूरकर भोंसले यांचे कागदपत्र.
१५ गो. दा. दळवीकृत मराठा कुळांचा इतिहास.
१६ जाधव घराण्याची कैफियत.
१७ काव्येतिहास संग्रह, पत्रें यादी.
१८ गो. स. सरदेसाईकृत नानासाहेब पेशव्यांचें चरित्र.
१९ वा. वा. खरेकृत इचलकरंजी संस्थानचा इतिहास.
२० तह व करारमदार.
२१ नानासाहेब पेशवे रोजनिशी.
२२ शाहुमहाराज रोजनिशी.

२३ पुरंदरे रोजनिशी.
२४ धाकटे रामराजे यांचें चरित्र.
२५ पेशव्यांची बखर, रा. ब. का. ना. साने प्रकाशित.
२६ इतिहास संग्रह.
२७ चिं. गं. गोगटेकृत महाराष्ट्रांतील किल्ले.
२८ पां. गो. रानडेकृत खून कीं आत्महत्या.
२९ प्राचीन मराठे सरदार.
३० जुन्या ऐतिहासिक गोष्टी.
३१ गोगटेकृत महाराष्ट्रांतील किल्ले.
३२ वार्षिक इतिवृत्त.
33 Annals and Antiquities Rajasthan by James Tod.
वगैरे वगैरे.

# ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति—बेळगांव.

ही समिति स्थापन होऊन सुमारें तीन वर्षें होत आलीं. या अल्पा-अवधींत समितीनें—१ ' नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या'. २ ' तोतयाचें बंड '. ३ ' राघोभरारी '. ४ ' सदाशिवरावभाऊ ' पेशवे यांचें चरित्र. ५ ' सखाराम हरी ' गुप्ते यांचें चरित्र. ६ ' त्रिंबक सूर्याजी ' यांचें चरित्र. ७ ' जुळे तोतये ' [ ह्मणजे सदाशिवरावभाऊ पेशवे व जनकोजी शिंदे यांना पेशवे दरबारनें ते खरे असतां पानिपतोत्तर तोतते कसें ठरविलें हा इतिहास ] अशीं निरनिराळ्या खंद्या लेखकांनीं लिहिलेलीं सात पुस्तकें प्रसिद्ध केलीं. आठवें पुस्तक ' मोंगल मर्दिनी ताराबाई ' हें आज वाचकांच्या हातीं नव्यानें पडत आहे.

सध्याच्या परिस्थितींत असे ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध करणें अत्यंत अवघड आहे. परंतु या समितीला बेळगांवच्या दानशूर श्रीमंत सौ. रंगुबाई-साहेब जाधव [ केसर-ई-हिंद ] यांनीं पांच हजार रुपयांची उदार देणगी दिल्यामुळें या समितीस इतकीं पुस्तकें सुलभपणें प्रकाशित करतां आलीं. त्याबद्दल व ' मोंगल मर्दिनी ताराबाई ' हा नूतन विचारप्रवर्तक ग्रंथ लिहून तो समितीस प्रसिद्ध करण्याकरितां दिल्याबद्दल ही समिति त्यांची अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें ' दी बेळगांव प्रिंटिंग ॲन्ड पब्लिशिंग हौस—शहापूर ' यांच्या चालकांनीं आत्मीय भावनेनें सदर ग्रंथाचें मुद्रण व प्रकाशन केलें त्याबद्दलही ही समिति त्यांचें आभारी आहे. तसेंच या ग्रंथांतील ब्लॉकचें काम ' कर्नाटक फोटो झिंको प्रेसचे ' मालक रा. परशराम राजबा पवार यांनीं मोठया आस्थेनें व वक्तशीर केल्याबद्दलहि ही समिति त्यांची आभारी आहे.

आतां मराठी वाचकांस समितीची नम्र विनंति अशी आहे कीं, महाराष्ट्राचे इतिहासावर नवीन प्रकाश पाडणारे जे वरील ग्रंथ समितीनें आजपर्यंत प्रसिद्ध केले आहेत त्याचे ग्राहक होऊन सहानुभूतीपूर्वक सक्रिय समितीस सहाय्य करावें ह्मणजे अशीच ऐतिहासिक वाङ्मय सेवा उत्तरोत्तर करण्याची समितीला उमेद येत जाईल.

चिटणीसः—**ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति,**

**१२२७, कोनवाळगल्ली, बेळगांव.**

श्री. वै. सौ. रंगुबाई साहेब जाधव ( केसर-ई-हिंद )



आत्मा... ६५३८

# आत्मनिवेदन आणि आभार प्रदर्शन.

आमचा पेशा ग्रंथ लिहिण्याचा नाहीं किंवा तसा अधिकार आजपर्यंत आह्मी मिळविलेला नाहीं. वैद्यकी करावी, औषधी कारखाना चालवावा, यांतच आयुष्याचा मुख्य भाग निघून गेला. हा वैद्यकीय व्यवसाय चालू असतांना जे अनेक अनुभव मानवी अंतःकरणासंबंधीं आह्मांला मिळाले त्यांत प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं अंतःकरणाच्या गुप्त रहस्याचा एक स्वतंत्र कप्पा असतो असें आह्मांला दिसून आलें. प्रत्यक्ष सहधर्मचारिणीलाहि कित्येक वर्षांच्या सहवासानें आपल्या पतीच्या अंतःकरणाला एक गुप्तरहस्याचा कप्पा असेल याचा बिलकुल शोध लागलेला नसतो; व तो शेवटपर्यंत लागतहि नाहीं. प्रत्येक व्यक्ति हा कप्पा अखेरपर्यंत गुप्त ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असते. याचा गुप्तपणा प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावधर्मावर व त्याच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून राहतो. सामान्यतः हा गुप्तरहस्याचा कप्पा दुराचरणांच्या आणि कपट कारस्थानांच्या कृत्यानें भरलेला असतो. प्रत्येक व्यक्तीच्या लहान मोठेपणावर व बुद्धिमत्तेच्या बळावर या गुप्त कप्प्याची लांबी, रुंदी व खोली अवलंबून असते. कित्येक व्यक्तींच्या आयुष्यक्रमांत असे कांहीं प्रसंग ओढवतात कीं त्या प्रसंगांतून शीरसलामत पार पडून जावयाचें झाल्यास त्या गुप्त रहस्यमय कप्प्याचें तोंड उघडावें लागतें व तें कांहीं विशिष्ट स्थलींच उघडलें जातें. जागृत देवस्थानें, सत्पुरुष, मांत्रिक, वैद्य वगैरे स्थळें हीं त्यांत मुख्य आहेत.

हा गुप्त रहस्यमय कप्पा उघडला गेल्यानंतर समाजाला बाह्यस्वरूपांत दिसणारी व्यक्ति अंतर्यामीं तशीच असेल असें सांगतां येत नाहीं. कांहा बाबतींत अगदीं विरुद्ध स्वरुपेंहि दिसूं शकतात; म्हणून बाहेरून दिसणारी व्यक्ति

अंतर्यामीं तशीच असली पाहिजे असा सिद्धांत घालतां येत नाहीं. इतिहास हा व्यक्तींनी बनलेला असतो. तो केवळ जुन्या कागदपत्रांनीं बनत नाहीं. जुने कागदपत्र हा इतिसाचा बाह्यविभाग आहे. स्थूल देह आहे. त्यांत प्राण नाहीं. इतिहासकारांना त्या स्थूल देहांत प्राण निर्माण करावयाचा असतो. म्हणून त्यांना बाह्य आणि अंतरस्वरुपाचा विचार करून इतिहास-लेखन करावें लागतें. मानवी प्राण्यापर्यंतची सृष्टीची उत्पत्ति त्रिकालाबाधित आहे. मासा या सृष्टीच्या पहिल्या प्राणिवाचकापासून तों थेट सिंहापर्यंत जे जलचर, भूचर किंवा खेचर प्राणि निर्माण झाले त्यांचा इतिहास आजतागायत पर्यंत एकच आहे व सृष्टीच्या अस्थित्वापर्यंत तो एकच रहाणार आहे. या प्राण्यांचा रंग, रूप, ध्वनी, आहार, विहार, स्वभाव वगैरे जातिविशिष्ट स्वरूपानें जो व जसा सृष्टीच्या उत्पत्तीपासून निर्माण झाला तसाच तो आजपर्यंत आहे व सृष्टीच्या लयापर्यंत तसाच तो चालणार आहे. तेंव्हां त्यांच्या इतिहासांत नव्यानें कांहीं जास्त भर पडणारी नाहीं. परंतु मानवी प्राण्यांचें तसें नाहीं. इतर प्राण्या प्रमाणें निसर्गसिद्ध धर्म मानवी जातींतहि असून मर्यादित स्थितीपासून अमर्यादित स्थितीपर्यंत ज्ञानसंग्रह करण्याचें जें साधन बुद्धि ती मनुष्यमात्राला स्वतंत्र असल्यामुळें उत्क्रांति किंवा अपक्रांति या अवस्थांचें त्यांच्यांत आंदोलन होऊं लागल्यामुळें मानवी जातीच्या इतिहासाला नवीन स्वरूप प्राप्त झालें. सामान्य प्राणिवाचकांमध्यें निसर्गसिद्ध स्वभावधर्म जे जातिविशिष्ट सृष्टिरचनेनें निर्माण झाले ते मानवी जातीच्या उत्क्रांति व अपक्रांति यांच्या आंदोलनानें प्रत्येक मानवी व्यक्तींत भिन्न भिन्न स्वरूपानें वावरूं लागल्यामुळें मानवी जातीच्या प्रत्येक व्यक्तीचा इतिहास नवीन निर्माण होऊं लागला. सामान्य प्राणीवाचकांतील जातिविशिष्ट शौर्य, क्रौर्य, औदार्य, कापट्य, हीनत्व दातृत्व, परोपकारित्व, त्याग, भलेपणा, प्रामाणिकपणा, दांभिकपणा, भ्याडपणा, दुष्टपणा, परोत्कर्षासहिष्णुत्व वगैरे वगैरे जे निसर्गसिद्ध गुणधर्म त्यांची वाढ कमी अधिक प्रमाणांत मानवी व्यक्तींत पृथक् पृथक्पणें व त्यांच्या संकरानें होऊं लागल्यामुळें प्रत्येक व्यक्तीचा इतिहास निरनिराळा बनूं लागला.

९८९६ ... २७।२०।५५

या मानवी इतिहासाला खरी सुरवात वामन अवतारापासून होऊन बौद्ध अवतारापर्यंत ती पुरी झाली. मानवी बुद्धिमत्तेनें वरील सर्व मनोधर्मांच्या वाढीचा उच्चांक त्या वेळीं गांठला. त्यानंतर आजतागाईत पर्यंत त्याच मनोधर्मांची पुनरावृत्ति होऊन इतिहास बनत चाललेला आहे.

मागें दर्शविल्याप्रमाणें मानवी जातींत जे निसर्गसिद्ध मनोधर्म निर्माण झाले त्याचें महत्वमापन त्यांचेकडून घडलेल्या कार्यावरून होऊं लागलें. समष्टीच्या कार्याला कमीपणा आला. परंतु या परस्पर विरुद्ध मनोधर्मामुळें घडून आलेल्या कार्यांचें व कार्य घडवून आणलेल्या व्यक्तींचें इतिहासकारांना सहज महत्वमापन करतां आलें. परंतु मागें दर्शविल्याप्रमाणें ज्या व्यक्तींच्या अंतःकरणाला गुप्त रहस्याचा कप्पा आहे व ज्या व्यक्ती प्रत्यक्ष व्यष्टीचें कार्य असून तें समष्टीचें आहे असें बाह्यात्कारी दाखवितात त्यांचा इतिहास लिहिणें फार बिकट होतें. अशा वेळीं त्या त्या व्यक्तींच्या संपूर्ण चारित्र्याची बारीक सारीक गोष्टीवरूनहि छाननी करून आणि त्यांच्या स्वभावधर्माला नांव देऊनच त्यांच्या इतिहासाचें संशोधन करणें भाग पडतें. प्रस्तुत ग्रंथांत हेंच तत्व अंगिकारलेलें आहे. कागदोपत्रीं उपलब्ध असलेला ऐतिहासिक पुरावा जमेला धरून त्याची सांगड त्या त्या व्यक्तींच्या स्वभावधर्माशीं घालून त्यांचा इतिहास देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकदां व्यक्तीचा स्वभावधर्म निश्चित झाला म्हणजे त्या अनुरोधानें त्याच्या चारित्र्याची संगत लावतां येते. कागदपत्रांच्या साधनानें इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाल्यास तो इतिहास इतिहासशास्त्र म्हणून गणण्यास अपात्र ठरेल. ऐतिहासिक व्यक्तींच्या स्वभावधर्माचा जिवंतपणा त्यांत दिसल्याशिवाय तो ‘ इतिहास ’ म्हणून हातीं धरण्यास योग्य ठरणार नाहीं.

रामायण—महाभारत हे फार प्राचीनकाळचे इतिहास आजहि आपणाला जे जिवंत स्वरूपांत दिसतात व वाटतात याचें कारण हेंच आहे. ऐतिहासिक माहिती देतांना प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावधर्माचें चालतें बोलतें

चित्र खेळविलेलें आहे. आजचा अर्वाचीन इतिहास कालांतरानें तो प्राचीन इतिहासच बनणार असल्यानें त्या इतिहासांत स्वभावधर्मांच्या जिवंतपणाचें लक्षण आढळून न आल्यास आजच्याप्रमाणें तो पुढेंहि मृतवत् स्वरूपांतच राहील. प्रभुरामचंद्र, सीतादेवी, हनुमान, लक्ष्मण, भरत, विश्वामित्र, वशिष्ठ, कैकयी, दशरथ, रावण बिभीषण वगैरे वगैरे रामायणकालांतील थोर व्यक्ती आणि श्रीकृष्ण, धर्म, भीम, अर्जुन, दुर्योधन, दुःशासन, शकुनी, द्रोणाचार्य कर्ण, द्रौपदी, गांधारी, धृतराष्ट्र, कुंती, भीष्म वगैरे वगैरे भारतकालीन थोर थोर व्यक्ती; त्याचप्रमाणें बुध्द, अशोक; आद्यशंकराचार्य, मध्वाचार्य, ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, गुरुनानक, तुळसीदास, राणाप्रतापसिंह, श्रीछत्रपति शिवाजीमहाराज वगैरे वगैरेचा इतिहास, त्यांच्या स्वभावधर्मांतून व त्यांच्या तत्वनिष्ठप्रियतेंतून जसा सहज वाहूं दिलेला आहे तसा पुढील महाराष्ट्रांतील राजकारणी व्यक्तींच्या इतिहासाची संगत न लावल्यामुळें तो इतिहास निर्जीव, तुटक, विसंगत, स्वभावधर्मशून्य, तत्वशून्य आणि आचारशून्य असा वाटतो. याचें कारण उपलब्ध ऐतिहासिक साधनें ऐतिहासिक व्यक्तींच्या स्वभावधर्मांवर व त्यांच्या अंगिकृत तत्वांवर तावून सुलाखून न घेतां त्या साधनांचा एकांगी उपयोग करून इतिहास लिहिण्याचा आजपर्यंतच्या बऱ्याच इतिहासकारांनीं प्रयत्न केला आहे. त्यामुळें सांप्रतच कांहीं इतिहास इतिहासशास्त्र म्हणून जिवंत राहण्यास पात्र ठरणार नाहींत. श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांच्यानंतरचा महाराष्ट्राचा इतिहास असाच एकांगी आहे म्हणून तो इतिहासशास्त्रांत दाखल होईल असे प्रयत्न करणें अत्यंत आवश्यक आहे.

'मोंगल मर्दिनी ताराबाई' यांच्या स्वभावधर्म साम्यतेच्या स्त्रिया आजहि राजघराण्यांत किंवा राजकारणांत वावरत असलेल्या आढळतात. स्वभावधर्म जन्माबरोबर जो उत्पन्न होतो तो मरणाबरोबर अस्तंगत होतो. स्वभावधर्म बदलण्याला औषध नाहीं किंवा दुसरा इलाजहि नाहीं. तो निसर्ग-सिद्ध आहे. असें असतां महाराष्ट्राचा इतिहास लिहितांना कांहीं इतिहास-

कारांनीं ऐतिहासिक मोठमोठ्या व्यक्तींच्या स्वभावधर्माचे त्यांच्या आयुष्य-क्रमांत परस्पर विरुद्धस्वरुपाचे जे खंड पाडले आहेत ते इतिहासशास्त्राला सोडून असेच आहेत. म्हणून स्वभावधर्माचा अभ्यास करून त्याच ओघांतून ऐतिहासिक साधनांना नेणें इतिहासकारांचें कर्तव्य आहे. **ऐतिहासिक साधनांतून** ऐतिहासिक व्यक्तींच्या **स्वभावधर्माला** न्यावयाचें नाहीं. हा सिद्धांत भावी इतिहासकारांनीं डोळ्यापुढें ठेविला ह्मणजे खात्रीनें इतिहासशास्त्र बनूं शकेल व तें भावीपिढीला चांगलेंच मार्गदर्शन करील.

सांप्रतचे कांहीं इतिहासकार बखरी, दंतकथा वगैरेंना महत्व देत नाहींत. त्यांना अस्सल पत्रें पाहिजेत. अस्सल पत्रांखेरीज त्यांचा दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणांवर विश्वास नाहीं. अस्सल पत्र मिळालें ह्मणजे त्यांचें तें विश्वसनीय साधन झालें. पण हें पत्र स्वभावधर्म असलेल्या एका व्यक्तीचेंच असतें. तें पत्र ह्मणजे सत्यकथन करणारेंच असलें पाहिजे असा सिध्दांत होऊं शकत नाहीं. स्वभावधर्म मात्र त्रिकालाबाधित असतो. तेव्हां स्वभावधर्माचा पूर्ण कस लावून त्याच्या अनुसंधानानें कागदपत्रांचा संदर्भ लावणें अवश्य पडतें. बखरी व दंतकथा यांचा उपयोग ऐतिहासिक व्यक्तींचा स्वभावधर्म कसाला लावण्यांत होत असतो म्हणून त्यांचा इतिहासकारांनीं अवश्य फायदा घेतला पाहिजे. ' मोंगल मर्दिनी ताराबाई ' हा ग्रंथ उपलब्ध ऐतिहासिक साधनांचा शक्य तेवढा उपयोग करून लिहिण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. आह्मां स्त्रियांना शिवणकामाची शिकवणुक लहानपणापासूनच देण्यांत येत असते. ज्या घाटाचे कपडे शिवावयाचे असतील त्याला अनुलक्षून आह्मीं निरनिराळ्या कापडाचे निरनिराळे तुकडे करतों. ते तुकडे ज्या घाटाचा कपडा करावयाचा असेल त्याच्या ठेवणीप्रमाणें ते तुकडे टीप घालून आह्मी शिवतों. त्या कपड्यांत जशी आमची बुद्धिमत्ता कपड्याच्या घाटाची ठेवण व टीप यापुरतीच असते तेवढीच सदर ग्रंथाबद्दलची आहे. ऐतिहासिक साधनें हें कापड समजून चरित्र ग्रंथाच्या घाटाला तें ज्या प्रमाणांत पाहिजे तेवढें

घेऊन त्या कारणांवर आह्मीं आमच्या विचारसरणीप्रमाणें टीप तेवढी घातली आहे. तेवढीच टीप आमची आहे. बाकीची सर्व मालमत्ता आजपर्यंतच्या इतिहासकारांची आहे.

या ग्रंथांत आधार ग्रंथांचा जो उल्लेख केला आहे त्यांत प्रामुख्यानें गुरुवर्य रावबहादूर गो. स. सरदेसाई—रियासतकार यांच्या रियासतींचा भरपूर उपयोग केला आहे. त्यांनीं लिहिलेल्या रियासती, प्रसिद्ध पेशवे दप्तर व चरित्रें हे ग्रंथ जर अस्तित्वांत नसते तर ' मोंगल मर्दिनी ताराबाई ' हा ग्रंथच आमचेकडून लिहिला गेला नसता. आमचा ग्रंथ रियासतकारांच्या आजपर्यंतच्या तपश्चर्येच्या पायावर प्रामुख्यानें उभारलेला आहे. रियासतकार हे केवळ इतिहासकार नसून ते इतिहासकार निर्माण करणारे कारखानदार आहेत असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. म्हणून त्यांना आमचें पहिलें वंदन आहे. त्याचप्रमाणें गुरुवर्य इतिहासाचार्य राजवाडे यांचीहि ' इतिहासाचीं साधनें ' निर्माण करण्यांत जी दिव्य तपश्चर्या झाली व आज आह्मीं त्याचा पुरेपुर फायदा घेत आहोंत म्हणून त्यांचेहि मुक्तकंठानें आह्मीं आभार मानतों. अनुमानें काढण्यांत अगर सिध्दांत बसविण्यांत जरी या थोर व्यक्तींचा व आमचा मतभेद असला तरी त्यांच्या ऐतिहासिक थोर तपश्चर्येपुढें आह्मीं सदाच नम्र राहूं. त्याचप्रमाणें इतर आधार ग्रंथ आह्मीं जे उपयोगांत आणले आहेत त्या त्या ग्रंथकारांचे व प्रकाशकांचे आह्मीं सदैव ऋणीच राहूं! त्यांनीं आह्मांस स्थळसंकोचामुळें नामनिर्देश करता आला नाहीं म्हणून त्याबद्दल त्यांची आह्मी क्षमा मागतो.

या ग्रंथ लेखनाचेबाबतींत आह्मांस गुरुवर्य इतिहासभास्कर डॉ. पा. गो. रानडे यांची सर्वप्रकारें मदत झाली आहे. त्यांच्याच प्रोत्साहनानें व शिक्षणानें भोंसलें राजघराण्याच्या इतिहासाची आवड आह्मांला उत्पन्न झाली. प्रस्तुत प्रबंधांतील नायिका महाराणी " ताराबाई " यांच्यासंबंधीं कांहीं इतिहासकारांनीं जी विपर्यस्त विधानें केलेलीं आहेत. त्याबद्दलची साधक बाधक

चर्चा, शंकांचें निरसन, व्यक्तींच्या कामगिरीला कस लाऊन पहाण्याची कसाटी, ठाम अनुमानें काढण्याची पध्दत, तत्वें निवडण्याची व सिध्दांत बसवण्याची कला वगैरे वगैरे इतिहास लेखनाला लागणारा मसाला आह्मांला डॉक्टरमहाशयांकडूनच पुरेपूर लाभलेला आहे. त्यांच्याच शिक्षणाच्या जोरावर आज आह्मांला ऐतिहासिक क्षेत्रांत पदार्पण करतां आलें. तसेंच आमचे परात्पर गुरु श्री. श्रीधर बळवंत नगरकर वकील यांचेंहि आह्मांला या विषयांत अमोल सहाय्य झालें आहे. त्याचप्रमाणें आमची ही ऐतिहासिक कृति लोकदृष्टीच्या कसाला कशी काय उतरते हें पहाण्याकरतां ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीला ' हा ग्रंथ प्रकाशांत आणण्याची विनंति केली असतां तिनें तें कार्य मोठ्या उत्साहानें हातीं घेतलें. या ग्रंथाला कोल्हापूरचे इतिहासज्ञ श्री. बाळासाहेब देशपांडे यांनीं परिश्रमपूर्वक आणि आत्मीय भावनेनें प्रस्तावना लिहिलेली आहे. ते कै. वा. शाहूमहाराज छत्रपति यांचें माजी हुजूर खास व तसलमात चिटणीस असल्यामुळें व त्यांना कोल्हापूरचें जुनें दप्तर सायंत चाळण्याची संधी मिळाल्यामुळें करवीर संस्थानच्या आद्य संस्थापिका ' ताराबाई ' यांचें चरित्र त्यांनीं उत्तमप्रकारें अभ्यासिलेलें आहे. या त्यांच्या ज्ञानाचा आह्मांस वेळोवेळीं फायदा झाला आहे. त्याचप्रमाणें दे. भ. अ. बा. लठ्ठे, एम. ए. एल. एल. बी. बेळगांव, श्री. वि. स. वाकसकर बडोदें, श्री. प्राध्यापक वि. म. कुलकर्णी एम. ए. बेळगांव, श्री. शंकरराव बळवंतराव चव्हाण बी. ए. एल. एल. बी. वकील पुणें, श्री. गोविंद सखाराम सरदेसाई कपिलतीर्थ कोल्हापूर, श्री. के. सी. ठाकरे–प्रबोधनकार–मुंबई, श्री. स. रं. सुंठणकर, बी. ए. एल. एल. बी. बेळगांव, श्री. केशव आपाजी पाध्ये, बी. ए. एल. एल. बी., ॲडव्होकेट–मुंबई. या सर्वांनीं ' मोंगल मर्दिनी ताराबाई ' या ग्रंथाचें काळजीपूर्वक परिशीलन करून आपले अभिप्राय पाठविले. त्याचप्रमाणें कोल्हापूरचे सुविद्य, उत्साही आणि लोकप्रिय खासगी कारभारी रावसाहेब बगदाळे यांनीं मोठ्या आत्मीय भावनेनें सदर ग्रंथांत घालण्याकरितां ' श्रीअंबाबाई ' व ' शिवाजीराजे यांचें तख्त ' यांचीं छाया-

चित्रें घेण्यास परवानगी देऊन त्यासंबंधी सर्व व्यवस्था करून दिली. तसेंच कोल्हापूरच्या श्री. बाबूराव पेंटर यांचे शिष्य श्री. जी. आर. मेस्त्री, चित्र-कला शिक्षक कोल्हापूर यांनीं ताराबाईचें अश्वारूढ चित्र व पन्हाळ्यावरील दोन चित्रें मोठ्या मेहनतीनें आणि कलापूर्ण अशीं काढून आम्हांस दिलीं आहेत. या वरील सर्व माननीय महाशयांच्या पृथक् पृथक् कामगिरीबद्दल आम्ही नम्रतापूर्वक सर्वांचें आभार मानतों.

बेळगांव ता. १–३–४७. सौ. रंगूबाई जाधव.

# प्रस्तावना.

'ब्राह्मणी राज्यामध्यें न्यायच नाहीं.' [ आनंदीबाई ] इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनीं आपल्या मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड पहिला याला जी १२५ पानांची प्रस्तावना लिहिली आहे त्यांत शिरोभागीं सिद्धांतरूपानें 'राघो भरारी' यांचे 'आपल्यांत दुही पडते तेव्हां शत्रूस बळ फावतें.' हें वचन उद्धृत केलें आहे. 'महाजनो येन गतः स पंथाः' या न्यायानें त्यांचेंच अनुकरण करण्याचा मोह न आवरल्यामुळें या प्रस्तावनेच्या शिरोभागीं पेशवे-कुलामध्यें ज्या तेजस्वी स्त्रिया होऊन गेल्या त्यापैकीं अत्यंत हुषार, चाणाक्ष, राजकारणकुशल व बहुश्रुत असें शिफारसपत्र इतिहास महर्षी श्री. सरदेसाई यांचेकडून मिळविणाऱ्या आनंदीबाईचें एक प्रसिद्ध वचन दिलें आहे.

आनंदीबाई व राघोबादादा यांची पुरी ससेहोलपट करून त्यांना सर्व बाजूंनीं जसें नानाफडणविसानीं घेरलें; तसेंच हुबेहुब बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यानीं चरित्रनायिका ताराबाईची पाठ पुरविली. व ताराबाईच्या असाधारण कर्तृत्वाला व राष्ट्रहितैक दृष्टीला आपल्या स्वार्थिक महत्वाकांक्षेनें पूर्णपणें झांकून टाकिलें; व चोराच्या उलट्या × × या न्यायानें पेशव्यानीं व पेशवाकंपूनीं ताराबाईलाच उलट हट्टी, दुराग्रही, उपद्व्यापी, महत्त्वाकांक्षी असें ठरविण्याचा अट्टाहास केला. अशा रीतीनें व्यक्तिनिष्ठ स्वार्थाची जी परंपरा बाळाजीपंत पेशव्यांनीं सुरू केली व पुढें बाळाजीपंत भानूनीं त्याची सुधारून वाढविलेली आवृत्ति काढली व त्यांतच हिंदुपदपादशाहीची राखरांगोळी केली अशीच इतिहासाची साक्ष आहे.

पण आपल्या पूर्वजांचे दोष उघडकीस आणणें अराष्ट्रीय होय अशी कांहीं महाराष्ट्रीय इतिहासकारांनीं खोटी व राष्ट्रघातकी समजूत करून घेऊन

पूर्वजांचे दोष झाकण्याचीच नव्हे तर त्यांच्या अंगीं ज्या गुणांची त्या पूर्वजांना स्वतःलासुद्धां कल्पना नसेल ते गुण होते असें मोठ्या हिरीरीनें प्रतिपादण्याची शिकस्त केली व त्याचाच परिणाम ह्मणजे मराठयांच्या इतिहासांतील ठळक ठळक व्यक्तींचें विकृतरूपदर्शन होय !

या विकृतरूपदर्शनाचा परिणाम प्रत्यक्ष श्रीशिवछत्रपतींनासुद्धां भोगावा लागला आहे. मग इतरांची काय कथा ? परवां परवां पर्यंत शिवाजी हा लुटारू, दरवडे घालणारा असा एक स्वार्थी मनुष्य होता असेंच मानलें जात होतें. पण ज्या वेळीं त्यांच्या प्रत्येक कृत्याची छाननी योग्यरीतीनें झाली तेव्हां त्यांच्या नांवावर आलेलें हें भ्रामक अभ्रपटल दूर होऊन त्यांना पुण्यश्लोकत्व प्राप्त झालें व ते आपल्या अभिजात तेजानें तळपूं लागले.

कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तर आपणास स्पष्ट दिसून येतें कीं, त्या देशाला भाग्य प्राप्त करून देणाऱ्या ज्या व्यक्ति असतात त्यांच्या अंगीं परिस्थितीचें पूर्णपणें आकलन करून तिला आपल्या लगामीं लावण्याचें अप्रतिम कौशल्य असतें. हा सिद्धांत ध्यानांत ठेवून महाराष्ट्राच्या इतिहासाकडे पाहिलें असतां असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, शिवपूर्वकालीन महाराष्ट्रांत संतमंडळींनीं महाराष्ट्रसमाजभूमीची मशागत करून तिला संस्कृतीच्या उच्च पातळीवर आणून ठेविलें. व जातिबंधनाचा कडकपणा शिथिल करून महाराष्ट्रांत माणुसकीची वाढ केली. त्याबरोबर मराठासमाज परस्पर सहिष्णु बनून मुसलमानांशींसुध्दां खेळीमेळीनें वागूं लागला. अशा वेळीं शिवाजीराजे जन्मास आले. त्यांच्या भेदक व सर्वगामी दृष्टीला जो देखावा दिसला तो हा कीं, महाराष्ट्रभर किंबहुना सर्व हिंदुस्थानभर मूठभर परकीयांची सत्ता प्राधान्येंकरून त्यांच्या बुद्धीच्या तरतरीवर व तरवारीच्या जोरावरच अधिष्ठित आहे. पराक्रम, शहाणपण, संख्याबल वगैरे झाडून सर्व हिंदूंच्या पाठीशीं असतांना केवळ मनोदौर्बल्यामुळें परकी सत्ता हिंदूंच्या मानगुटीवर शेकडों वर्षें बसलेली आहे. व ती झुगारून देण्याचा एकमेव मार्ग ह्मणजे स्वकीयांची बलवत्तर

संघटना घडवून आणणें हाच होय. हें जाणून त्यांनीं हिंदूपदपातशाहीची रूपरेखा आंखली. शिवभूपतीच्या 'हिंदवी स्वराज्य' अथवा 'हिंदूपदपातशाही' यांतील 'हिंदू' शद्बामध्यें हिंदीजनता हा अर्थच अभिप्रेत आहे. शिवाजीनें ' हिंदूपदपातशाही ' ह्मणजे हिंदुस्थानांतील सर्व जनतेला सुखकारी असा एक-तंत्री अम्मल स्थापन करणारी संस्था हें जाणलें व ती प्रस्थापित करण्याचा संकल्प केला नि त्याचा पाया महाराष्ट्रांत घातला. शिवाजीला जर भरपूर आयुष्य मिळालें असतें अगर त्यांच्या मागून आलेल्या पेशव्यांना त्यांच्या धोरणाचें आकलन होऊन तदनुसार जर ते वागले असते तर एकतंत्री अकुं-ठित राज्ययंत्र हिंदुस्थानांत निर्माण होऊन व्यापार उद्योगधंद्यांना कमालीचा उठाव मिळाला असता आणि हिंदी कारखानदारी व भांडवलशाहीचा उदय होऊन ब्रिटिश भांडवलशाहीला या देशांत आपले पाय रोवण्यास अवसर मिळाला नसता. पण देशाच्या दुर्दैवामुळें विपरीत घटना घडून आली. संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दीत मोंगलांचा फार निकराचा हल्ला नवो-दित स्वराज्यावर झाला व त्याला तोंड देण्याकरितां राजारामाला जहागीर संस्थेची कास निरुपायानें धरावी लागली. व जाहागीर संस्थेचा आश्रय करून मोंगलासारख्या प्रबल शत्रूलासुद्धां नामोहरम करतां येतें हा वस्तुपाठ नजरे-समोर असल्यामुळे पुढें शाहूनें तेंच धोरण आपल्या उद्दिष्ट सिद्धीसाठीं अवलंबिलें.

पेशव्यांनीं जे नवीन जहागीरदार निर्माण केले त्यांचा उपयोग मात्र भस्मासुराप्रमाणें झाला. जोपर्यंत जहागीरदार मोंगलीसत्ता नाहींशी करून आपली सत्ता प्रस्थापित करीत होते; तोपर्यंत सर्व निदान बाह्यात्कारी तरी ठाकठीक दिसत होतें. पण जेव्हां त्यांचा मोर्चा मूळची ' हिंदूपदपादशाही ' जिच्यापासून त्यांचा जन्म होता तिकडेच वळला, तेव्हां सर्व नाश झाला यांत आश्चर्य कसलें ? हिंदुपदपातशाहीचें अधिष्ठान हिंदी जनतेचें सर्वांगीण सुख हें होतें, तर जहागिरीचें अधिष्ठान ह्मणजे व्यक्तीचा नागडा स्वार्थ यापरतें दुसरें कांहीं एक नव्हतें. या दोहोंचा स्वाभाविकच झगडा झाला व त्यांतून

हिंदूपदपातशाहीचें ध्येय उराशीं बाळगून राज्याच्या व्यक्तींच्याविरुद्ध स्वार्थी लोकांचा एक गटच तयार झाला यांत नवल नाहीं. या गटांत अर्थात् ज्यांचे मनगट बळकट अगर ज्यांचा मेंदू अतिशय तल्लख अशांचाच भरणा होता हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. पण कर्तबगारी व देशहितबुद्धि ही एकत्रच असतात असें नाहीं. मात्र त्यांचा एकत्रवास हा देशाच्या अभ्युदयास कारणी-भूत होतो. आणि त्यांची फारकत झाली ह्मणजे देश अवनतीस जातो. जोंपर्यंत कर्तबगारी व देशहितबुद्धि एकत्रित होती तोंपर्यंत महाराष्ट्राचा भाग्योदय झाला. राष्ट्रासमोर हिंदूपदपातशाहीचें ध्येय शिवरायानें ठेविलें व त्याच्या पूर्ततेकरितां अष्टप्रधानादि राजमंडळाची स्थापना करून आपली छत्रपतीची सत्ताही मर्यादित करून ठेविली. छत्रपति व राजमंडळ यांचा अन्योन्य संबंध दोघानांहि उपकारक होईल अशी योजना करून हिंदूपदपातशाहीची भरभराट खात्रीपूर्वक होईल असा विश्वास राष्ट्रांत उत्पन्न केला. हा शिवाजीला वाटणारा भरंवसा त्यानें जो राज्याभिषेकासाठीं अट्टाहास केला त्यावरून स्पष्ट दिसतो. येरव्हीं प्रभुरामचंद्राप्रमाणें शास्त्रोक्त व पूर्ण वैदिक पद्धतीप्रमाणें अभिषेक समा-रंभ घडवून आणण्याकरितां त्यानें जो पाण्यासारखा पैसा खर्च केला त्याची संगति लागत नाहीं.

छत्रपति व त्यांचें राजमंडळ यांमध्यें तत्कालीन समजुतीप्रमाणें एक-प्रकारचें धार्मिक बंधन उत्पन्न व्हावें व त्यांच्यामध्यें सेव्यसेवकभाव कायमपणें टिकावा एतदर्थ शिवाजीनें एवढा खटाटोप केला.

याचा परिणाम संभाजीच्या कारकीर्दीत स्पष्टपणें दिसून येतो. संभाजीनें क्रूरपणाची कमाल मर्यादा गांठून हत्याकांडाला सुरवात केली, तरी राज-मंडळापैकीं कोणीही त्याच्याविरुद्ध हात उचलला नाहीं. येवढेंच नव्हे तर त्याला औरंगजेबानें पकडल्यानंतर त्याच्या सुटकेकरितां प्रत्यक्ष औरंगजेबाच्या छावणींत ह्मणजे काळाच्या जबड्यांत शिरण्यासही हिंदूपदपातशाहीच्या कट्या सेवकांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.

राजारामाच्यावेळीं तर बोलावयासच नको. येसूबाई व बालशिवाजी यांना रायगडाहून फकडून नेल्यानंतर राजमंडळानें राजारामाभोंवतीं आपल्या छातीचा कोट उभारला व सर्व महाराष्ट्र मोंगलांनीं व्यापलासें पाहून दक्षिणची वाट धरली व औरंगजेबकृत पाठलागाला मोठ्या हिमतीनें व धैर्यानें तोंड देऊन जिंजीस जाऊन राजारामास—हिंदूपद्पातशाहिच्या * आत्म्यास—प्रथमतः सुरक्षित केलें. व नंतर रामचंद्रपंत, संताजी घोरपडे, धनाजी जाधव इत्यादि राजमंडळाच्या घटकांनीं आपल्या तुफानी हल्ल्यांनें मोंगलांस पुरे पुरे करून सोडलें. राजारामाचे कबीलेही विशाळगडाहून संधीसाधून कर्नाटकांत येऊन पोहोंचले. पण शेवटीं औरंगजेबानें इरेला पेटून जेव्हां जिंजी सर करण्याचा विडाच उचलला तेव्हां मोठ्या कौशल्यानें वेढा देणाऱ्या मोंगल सैन्याच्या हातावर तुरी देऊन जिंजी सोडली व साताऱ्यास येऊन नवीन राजधानी केली. तेथें आल्यावर मराठी सत्तेवर एक दारुण वज्राघात झाला. मोहिमेच्या दगदगीनें राजाराम महाराजांना ज्वर येऊन सिंहगडावर त्यांचें देहावसान झालें. त्या वेळीं हिंदूपद्पातशाहीची ध्वजा राजारामाचीं दोन्ही मुलें शिवाजी व संभाजी हीं लहान असल्यामुळें ताराऊराणीनें उचलली व शिवाजीची मुंज करून त्याला राज्याभिषेक केला आणि औरंगजेबाचें आव्हान तिनें स्वीकारलें.

औरंगजेबानें स्वतः कंबर कसून मराठ्यांचा कांटा कायमचा काढून टाकावा अशा ईर्षेनें मोंगल सैन्याची हालचाल स्वतःच्या नेतृत्वाखालीं सुरू केली. मराठ्यांचे किल्ले ह्मणजे त्यांचें मर्मस्थान आहे हें ओळखून ते किल्लेच एकामागून एक घेण्याचा सपाटा त्यानें सुरू केला. अशा आणिबाणीच्या वेळीं राज्यावर आपल्या पोटच्या गोळ्याची स्थापना करणें ह्मणजे मोठ्या धैर्याचें व देशप्रेमाचेंच प्रतीक होतें यांत संदेह नाहीं. राजा होणें ह्मणजे पोळी खाणें असें जरी मानलें तरी या परिस्थितींत ती ग्रंथांत वर्णिल्याप्रमाणें ‘ सुळावरची पोळी’च होती हें कबूल करावें लागेल.

यापुढील ताराबाईची कामगिरी ह्मणजे औरंगजेबाच्या हल्ल्यांना तोंड देत देत मराठा सैनिकांची हिंमत व शक्ति ताराबाईनीं येवढी वाढविली कीं,

मोंगल सैन्यें मराठ्यांच्या मारामुळें हैराण होऊन जीव घेऊन पळूं लागलीं. मोंगल आपल्या घोड्याला तो पाणी पिईनासा झाला म्हणजे 'क्यंव धनाजी नजर आता हैं'? असें विचारूं लागले. हेंच त्या वेळच्या राजमंडळाच्या व त्यांच्या छत्रपतींच्या पराक्रमाचें यथार्थ वर्णन होय.

कोणत्याही इतिहासकाराला मराठेशाहीचा हा काल म्हणजे मोठा स्फूर्तिप्रद व अभिमानाचा वाटेलच वाटेल. पण नेमकें याच कालाचें यथातथ्य मूल्यमापन न करतां त्याचा ओझरता उल्लेख करून किंबहुना तो काल अनुल्लेखानें मारून टाकण्याचा जो आजपर्यंतचा प्रघात आहे त्याबद्दल उद्वेग वाटतो. या काळांत केलेल्या असामान्य कामगारीमुळें ताराबाईला या ग्रंथांत जें 'मोंगल मर्दिनी ताराबाई' हें नांव दिलें आहे त्याबद्दल सहृदय वाचकांना सानंद कौतुकच वाटेल असा भरंवसा वाटतो.

ताराबाईच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांकडोन मिळालेल्या ×× मारामुळें मोंगल सम्राट हताश होऊन शेवटीं हाय खाऊन मरण पावला. मराठ्यांचा कांटा आतां तो ससेमिरा होऊन बसला होता. तो पराक्रमानें काढणें शक्य होत नाहींसें पाहून मोंगलांच्या नूतन बादशहानें आपल्या सल्लागारांच्या सल्यानें मोंगली कावा अवलंबिण्याचें ठरविलें; व आपल्या ताब्यांत असलेल्या संभाजीपुत्र शाहूचा उपयोग करून घेतला. संभाजीचा मुलगा हाच गादीचा वारस होणें योग्य व यथाशास्त्र झालें असतें. पण 'सोन्याच्या पिंजऱ्यातील शाहू राजे' या ७ व्या प्रकरणांत वर्णिलेलें शाहूचें चरित्र पहातां त्याला जे सस्कार झाले होते. त्यावरून तो हिंदूपदपातशाहीचें ध्येय पुढें चालू ठेवण्यास लायक होता असें म्हणतांच येणार नाहीं. 'जन्मना जायते शूद्रः संस्काराल्तु भवेत् द्विजः' या स्मृतिवचनांत ग्रथित केलेल्या तत्वावरून संस्काराचें महत्त्व किती आहे याची कल्पना येईल. शककर्ते शिवाजी महाराज आग्र्यास औरंगजेबाच्या अटकेंत सांपडले होते, तेथून ते सुटून आले. त्या वेळीं त्यांनीं औरंगजेबाची दिशाभूल करण्याकरितां जें वर्तन केलें त्याचें साम्यचित्र डोळ्यापुढें ठेऊन त्याप्रमाणें शाहूनेंही सुटका होण्याकरितां कांहींही सांगितलें असलें

अगर कबूल केलें असलें–मग तें तोंडी असो अगर लेखी असो–तरी तें राजकारण म्हणून क्षम्य नव्हे उलट भूषणभूत आहे असें ह्मणणारा एक पक्ष आहे. पण शिवाजी महाराज सुटून आल्यानंतरची त्यांची भूमिका व शाहू दक्षिणेंत आल्यानंतरची त्याची भूमिका ही लक्षांत घेतली ह्मणजे त्या दोन्ही भूमिकेंतील अंतर ध्यानीं येतें. शिवाजी महाराज दक्षिणेंत सुटून आले पण त्यांनीं त्या बाबतींत मोंगलांचें सहाय्य घेतलें नाहीं. उलटपक्षीं शाहूराजे सुटून आले ते मात्र मोंगलांचें सहाय्य घेऊन व मोंगलांशीं करार करून त्यांच्याकडून निघण्यापूर्वी मेजवान्या [ केळवण ] वगैरे झोडून आले. शिवाजी महाराजांप्रमाणें स्वराज्याचे वारसदार म्हणून जर ते आले असते तर अख्या महाराष्ट्राचें माथें त्यांचे समोर लवल्यावांचून राहिलें नसतें. पण झेबुनिस्सेचा पुत्र ह्मणविण्यांत भूषण मानणारा, औरंगजेबाच्या समाधींचें [ कबरेचें ] दर्शन घेण्यांत कृतार्थता मानणारा, सय्यद महामियाचा पंजा पूजणारा, हा शाहू स्वतंत्र महाराष्ट्राला व शिवशाहीचें ध्येय उराशीं बाळगून असणाऱ्यांना कसा रुचेल ?

शाहू मराठ्यांच्या राज्याचा वारसदार म्हणून आपला हक्क राज्यावर सांगूं लागला, त्या वेळेस ताराबाईनीं त्यास जें उत्तर दिलें तें व त्याची यथार्थता हें ‘ शाहूराजांचें आगमन व वारसाहक्काचें स्पष्टीकरण ’ (प्रकरण ८ वें) यांत चर्चिलें आहे तें वाचून ‘ शाहू कां आला ’ असें वाटल्यावांचून राहत नाहीं. ‘ शाहू दक्षिणेंत आला नसता तर ! ’ असा विचार करूं जातां पुष्कळच गोष्टी सुचतात व रम्य चित्रें डोळ्यापुढें नाचूं लागतात. पण त्याचा उपयोग काय ? उपयोग असेल तर येवढाच कीं, पुढील घटना ज्या घडल्या त्यावर जो कळत वा न कळत शाहूच्या चांगुलपणाचा मुलामा चढलेला किंवा चढविलेला आहे तो मुलामा नाहींसा होतो हा लाभ कांहीं सामान्य नव्हे.

शाहू दक्षिणेंत आल्याबरोबर तो तोतया आहे असें ताराबाईनीं प्रथमतः ह्मटलें. त्यावर कित्येक आक्षेपकांनीं मजल्यावर मजले रचून ताराबाईला राज्याचा लोभ होता ह्मणून तिनें राज्य सोडण्याला नाराजी दाखविली वगैरे

विधानें केलीं आहेत. ' शाहूराजे आले ! ' ' शाहूराजे आले ! ' अशा कंड्या एकदां दोनदां पिकल्या होत्या. त्यामुळें त्याची शहानिशा करणें ताराबाईंना प्राप्त झालें होतें. पण शहानिशा झाल्यावर मात्र शाहूला त्या खरा मानूं लागल्या, हें विसरून भागणार नाहीं.

शाहूला तोंड देण्याचें बाबतींत राजमंडळाचे केवळ संमतीनेंच नव्हे तर राजमंडळानें केवळ दूध भातावर हात मारून शपथ प्रमाण दिल्यानंतरच धनाजी व परशराम त्रिंबक यांची रवानगी शाहूवर झाली. असंख्य मोंगली फौजेला दे माय धरणीठाय करून सोडणाऱ्या प्रतापी धनाजी सारख्या सेना-सागरासमोर शाहूची डाळ मुळींच शिजली नसती पण आयत्या वेळीं धनाजीनें पक्षपालट केल्यानें शाहूला जय मिळाला. केवळ धनाजीच्याच या धरसोडीनें ताराबाई व रामचंद्रपंत यांना पुढील उद्योगास एकमतानें सुरवात करावी लागली. साताऱ्च्या गादीवर शाहू आल्यानंतर त्यानें दिल्लीच्या बादशहाकडे रिपोर्टवजा जो पत्रव्यवहार केला आहे [ पान १६९ वर पहा ] तो लक्षांत घेतां त्यांनीं दिल्लीपतीचें पूर्ण दास्यत्व—कायिक, वाचिक आणि मानसिक—पतकरलेलें होतें हेंच सिद्ध होतें.

खेडकडूसच्या संग्रामानंतर ताराबाईनीं पन्हाळा आपली छावणी ( *Comping Ground* ) करून तेथून आपल्या स्वराज्याचा जम बस-विण्याला सुरवात केली. या प्रयत्नांत त्यांना रामचंद्रपंत अमात्यांचें पूर्ण सहाय्य होतें. ( पान १८०–१८१ ) रामचंद्रपंत तत्वनिष्ट स्वराज्याभिमानी होते याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं. ज्या रामचंद्रपंतांनीं शाहू मोंगलांच्या कैदेंत असेपर्यंत मराठी राज्यावर शाहू व्यतिरिक्त दुसरा धनी न येऊं देण्याची खट-पट ताराबाईच्या इतराजीची पर्वा न करतां केली, तेच रामचंद्रपंत ' ताराबाई व शाहू ' या लढ्यांत ताराबाईच्या बाजुला झाले यांत पुष्कळच अर्थ आहे. शाहू हा वारस म्हणून आला तर तो रामचंद्रपंतांना इष्ट होता. पण परकीय सत्तेचा तो सेवक म्हणून आल्यानें ते त्याच्याशीं झगडण्यास तयार झाले. असाच स्पष्ट निष्कर्ष यांतून निघतो. ' ताराबाईशीं झगडण्यांत शाहूचा

मुख्य आधार बादशहाकडचा होता. ' ( म. रि. मध्यविभाग १ पान २३ ) हें रियासतकारांचें मत यास पुष्टीच देतें.

ताराबाई व शाहू यांच्या झगड्याचें निमित्त इतर सरदारांना आपापलीं घोडीं पुढें दामटण्यास सांपडलें हें निश्चित आहे. शाहू काय किंवा ताराबाई काय ! दोघेंही भोसले ( छत्रपती ) घराण्यांतलेच असल्यानें कोणताही पक्ष स्वीकारला तरी राजद्रोह होऊं शकत नव्हता, मग आपणास सोईचा वाटेल तो पक्ष स्वीकारण्यास काय हरकत, अशी या सरदारांची विचारसरणी होती. असे दोलाचल चित्तवृत्तींचे बहुतेक सरदार ताराबाईच्याच पक्षांत सामील होऊन राहिले यावरूनच ताराबाईचा सत्पक्ष होता हेंच खरें ठरतें.

" १७०७ पासून १७१० पर्यंत लढून शाहूची सत्ता ५–२५ मैलापलीकडे फारशी पसरली नव्हती, परंतु ताराबाईचा व शिवाजीचा पक्ष दिवसेंदिवस बळावतच चालला होता. ' असें राजवाड्यांचें ह्मणणें आहे. [ खंड २ पान ९ ] हेंहि वरील विधानास पुष्टीच देतें.

मग प्रश्न असा उद्भवतो कीं, ताराबाई व शिवाजी यांना कोल्हापूरचें राज्य कां सोडावें लागलें ? व त्यांच्या ठिकाणीं संभाजी राजाची स्थापना कां झाली ? या राज्य-क्रांतीच्या वेळीं कोल्हापूरला रक्ताचा एक बिंदूही सांडला नाहीं. ताराबाईची व ताराबाईच्या पक्षाची जर राज्यक्रांति व्हावी अशी इच्छा असती तर त्यांनीं अकांड-तांडव केलें असतें. हें कोणालाही कबूल होण्याजोगेंच आहे. मग ही राज्यक्रांति विनारक्त व बिनबोभाट कशी घडून आली ? शाहूही स्वस्थ बसला व ताराबाईही गप्प बसली यांतील गुढार्थाचा खुलासा " ताराबाईचा अपूर्व त्याग " या प्रकरणांत मोठ्या मार्मिकतेनें केला आहे. तो मूळांतूनच अवश्य वाचण्याची शिफारस केल्यावांचून रहावत नाहीं. ही राज्यक्रांति रामचंद्रपंतांनीं घडवून आणली अशी कांहीं इतिहासतज्ञांची विचारसरणी आहे. तें एक अर्धसत्य ( half truth ) आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. राज्यक्रांति झाल्याबरोबर नुसत्या ताराबाईनेंच

राज्यकारभारांतून अंग काढलें येवढेंच नव्हे, तर रामचंद्रपंतांनींहि संन्यासवृत्ति धारण करूनच नव्हे तर प्रत्यक्ष संन्यासदीक्षा घेऊन आपला मुलगा भगवंत राव याची अमात्य पदावर स्थापना केली.

दुसरा एक विचारार्ह मुद्दा असा आहे कीं, जर रामचंद्रपंतांनीं ताराबाईला बाजूस सारून संभाजी व राजसबाई यांचा पक्ष धरला असता तर शिवाजीचा मुलगा [ रामराजा ] याला अमात्याच्या बावडा नगरींत सुरक्षित जागा म्हणून ताराबाईनें ठेविलें असतें कां ? अमात्याचें सर्वच घराणें छत्रपतींशीं पूर्ण राजनिष्ठेनें वागत होतें. व ती प्रथा आजतागायत चालत आलेली आहे. रामचंद्रपंतांनीं ताराबाईचा पक्ष शेवटपर्यंत धरला यावरून ताराबाईचा सत्पक्षच होता असें खुशाल मानावें असें जें वर उल्लेखिलेल्या प्रकरणांत मांडलें आहे तें पटण्याजोगेंच आहे.

याचबाबतींत आणखीं एक मुद्दा लक्षांत घेण्याजोगा आहे. ताराबाईचें स्वतःचें एक पत्र प्रसिद्ध आहे. तें असें ' कालपरत्वें आमचा प्रसंग विरुकळित होऊन संभाजीराजे व राजसबाई यांनीं गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल व गडकरी व तुळोजी शितोळे यांसीं पुढें करून किल्ले पन्हाळा येथें संभाजी राजे यासी राज्यपदास बैसविलें. आह्मांस संकटीं घातलें. बहुत निकड केली ' यांत रामचंद्रपंतांचा उल्लेख नाहीं. ताराबाई ही रामचंद्रपंतांस डरत नव्हती. हें सत्य आहे. थोडासा संशय येतांच रामचंद्रपंतासारख्या मोठ्या माणसासुद्धां तिनें तुरुंगांत ठेविल्याचा दाखला आहेच. मग रामचंद्रपंतांनी राज्यक्रांति घडवून आणली व ताराबाईस त्रास दिला अशी जर वस्तुस्थिति असती तर तसा निदान उल्लेख तरी या पत्रांत करण्यास तिला कोणती हरकत होती ? वरील सर्व विवेचनावरून ताराबाई व रामचंद्रपंत यांच्या पूर्ण संमतीनेंच करवीरची राज्यक्रांति घडून आली असली पाहिजे. असें जें उपरिनिर्दिष्ट प्रकरणांत मांडलें आहे तेंच खरें असावेसें दिसतें. तसेंच गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल व गडकरी व तुळोजी शितोळे इत्यादि लुंग्यासुंग्या माणसांचा

उल्लेख करण्याची जी दक्षता ताराबाईनीं दाखविली आहे ती हेतुपूर्णच असली पाहिजे. एरव्हीं असल्या लहान माणसांकडून एवढी मोठी राज्यक्रांति घडून येणें अशक्य होतें. शिवाय एवढी राज्यक्रांति घडवून आणणारीं माणसें पुढें संभाजीच्या कारकीर्दींत ज्याअर्थी अंतर्धान पावलीं त्या अर्थी ताराबाईची ही केवळ बाह्यात्कारी बतावणी होती हेंच निश्चित ठरतें.

वर उल्लेखिलेली तडजोड ह्मणजे शिवाजीचा राजसंन्यास, ताराबाई व रामचंद्रपंत यांची सेवानिवृत्ति व संभाजीची करवीरच्या गादीवर स्थापना ही होय. या घटना घडून आल्यानंतर साहजिकच सरदार मंडळींना सातारा व कोल्हापूर यांतील झगड्याचा फायदा घेऊन आपलें घोडें पुढें दामटण्याची सोय राहिली नाहीं. चंद्रसेनराव जाधव दिल्लीकडे निघून गेला. दाभाडे, आंग्रे वगैरे ताराबाईच्या पक्षांतील इतर बड्या सरदारांशीं शाहूचा सलोखा झाला व सर्व ठीकठाक झाल्याचा देखावा उत्पन्न झाला. शाहूराजे व संभाजी यांचा समेट गुप्तरीतीनें कां होईना पण झाल्यामुळें गृहकलह शांत होईल अशी अपेक्षा होती. पण शाहूच्या दिल्लीकडील ओढ्यानें व तळमळीनें पुनः दगा दिला. बाळाजी विश्वनाथानें सरदेशमुखीच्या सनदा दिल्लीहून आणल्या, व शाहूनें वास्तविक त्याचा अमल सातारा व कोल्हापूर यांच्या दरम्यान ठरलेल्या कराराप्रमाणें करणें जरूर होतें. तसें न झाल्यामुळें करवीरकरांना त्याकरितां लढा देणें भाग पडलें. त्या लढ्यांत निजामाला करवीरकरानीं अनुकूल करून घेतलें. बाजीराव बल्लाळानें निजामाचा मोड केला, व त्याला शरण येण्यास भाग पाडलें. संभाजीस शाहूच्या स्वाधीन करणेची अट निजामानें कांहीं केल्या मान्य केली नाहीं. यानंतर श्रीपतराव प्रतिनिधीनें संभाजीवर चाल करून शिरोळ येथें उदाजी चव्हाणाचा मोड केला, व संभाजीच्या बायका, ताराबाई, राजसबाई आणि भगवंतराव अमात्य, व्यंकटराव घोरपडे, या सर्वांना पकडलें. ताराबाईनीं शाहूजवळच राहाण्याची इच्छा दर्शविल्यावरून साताऱ्याच्या किल्ल्यावरील राजवाडा दुरुस्त करून तेथें त्यास मोठ्या सन्मानानें ठेविलें, व यादो गोपाळ यास त्यांचा कारभारी नेमिलें.

या लढाईनंतर कृष्णा—वारणेचा तह उघडरीतीनें ठरून सातारा व कोल्हापूर यांच्या हद्दी व मुलूख ठरविला गेला. या तहाचे एक विशिष्ट स्वरूप नजरेस आल्यावांचून राहत नाहीं. संभाजीचा उघड उघड पराभव झाला होता त्यामुळें संभाजीनें करार करून देणें व शाहूनें त्यास मान्यता देणें क्रमप्राप्त दिसतें. पण तसें न होतां उलट शाहूनेंच करार करून दिलेला आहे. यावरून [ पान २५७ ] वर जें अनुमान काढलें तें विचारणीय खास आहे. या अनुमानाळाच पोषक म्हणून या तहाची अम्मलबजावणी झाली नाहीं व त्याबद्दल संभाजीनें विशेष विचार केला नाहीं. याचें विवेचन पान २५९ वर केलेलें आहे तेंही या संदर्भात पहाण्याजोगें आहे. ता. ३० डिसेंबर सन १७२५ रोजीं शाहूराजानी संभाजीला एक सात कलमी करार लिहून दिला होतो. पण त्याच्याविरुद्ध वागून करवीरच्या मुलखावर पेशव्यांचें अतिक्रमण चालू झालें. पण पेशव्यांच्या बलिष्ठ लष्करी सामर्थ्यापुढें करवीरकरांची कांहीं मात्रा चालली नाहीं. त्यामुळें संभाजीचा पराभव झाला हें वर सांगितलेंच आहे. पण पराभव झाल्यानंतरही शाहूनें संभाजीला आपण होऊन करार करून दिला व संभाजीचे अतिशय थाटानें व राजकीय पध्दतीनें स्वागत केलें. हा संभाजीचा नैतिक विजयच होय.

शाहू व संभाजी यांचा जो सन १७३१ मध्यें संमेट झाला तो अंतःकरण पूर्वक झालेला होता असें दिसतें. उभयतां बंधूंच्या भेटी वारंवार होत असत; व अडीअडचणीच्या वेळीं एकमेक एकमेकांचा सल्ला घेत असत असें दिसतें. बाजीराव इ. सन १७४० मध्यें मृत्यु पावल्या वेळीं संभाजीचा मुक्काम ९–१० महिने साताऱ्यास होता. यावरून त्याच्या सल्याला शाहू किती मानीत असेल याची कल्पना येते. शिवाय सातारा व कोल्हापूर अशीं मराठी राज्यांचीं वेगळीं राज्यें झाल्यावर संभाजीनें आपले अष्टप्रधान वेगळे नेमिले. पण पेशवा मात्र सातारा व कोल्हापूर यांना साधारण राहिला. नानासाहेबांनीं संभाजीस जो १२ कलमी लेखी करार करून दिला आहे त्यांतील “ शाहू महाराजांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे सेवक अंतर्यामीं

स्वामीचे " हें कलम पाहिलें व पुढें सदाशिवरावभाऊ यांची कोल्हापूरच्या पेशवेपदावर स्थापना झालेली पाहिली ह्मणजे बऱ्याच गूढांचा खुलासा होण्यास मदत होते.

सातारा व कोल्हापूर या दोहोंच्या पेशवापदाचें अधिष्ठान एके ठिकाणींच झाल्यामुळें व शाहूच्या 'फौज धरनें' या हुकुमाची अम्मलबजावणी नानासाहेबानें अक्षरः केल्यामुळें अष्टप्रधानापैकीं पेशव्यांचें सामर्थ्य अतोनात वाढूं लागलें. नानासाहेब पेशव्यांनीं आपल्या लष्करी सामर्थ्याच्या बळावर पूर्वी आपल्या पेशवेपदप्राप्तीच्या आड आलेले रघूजी भोसले व बापूजी नाईक बारामतीकर यांचा यथेच्छ सूड उगवून घेतला.

पुढें वाढत वाढत पेशव्यांचें सामर्थ्य येवढें वाढलें कीं प्रत्यक्ष छत्रपति शाहूवर 'मी तीघांच्या पायावर डोकी ठेवितों' असे लाचारीचे उद्गार काढण्याची पाळी आली. शाहूनें आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस आपलें सर्व वजन पणास लावून नानासाहेबाला त्यानें आगळीक केली म्हणून कामावरून दूर केलें होतें. त्यावेळीं नानासाहेबानें पुष्कळ खटपट करून पुनश्च आपली जागा मिळविली. पण त्यावेळीं त्यांनीं आपला पूर्ण पक्षपाती गोविंदराव चिटणीस यास पत्र लिहिलें होतें. त्यांत खालील मजकूर आढळतो. 'इतके प्रकारें निखालसतेनें विनंति केली असतां महाराज ध्यानांत न आणीत तर ईश्वरें या दौलतीवर इतराजी केली अशी जागावी. मग बाहेरीलही इज्जतीचा दरकार सोडून बसूं.' ही सरळ सरळ धमकी आहे. लढाई सुरू करण्यापूर्वी निकराचा खलीता [ ultimatum ] पाठवीत असत त्यांत व यांत काय अंतर आहे? अशी भाषा नानासाहेब पेशव्यांकडून आल्यानंतर शाहू नमला नसता तरच आश्चर्य होतें! 'अग अग ह्मशी मला कांग नेशी.' या न्यायानें शाहूनें कशी बशी ती वेळ नानासाहेबाला पुनः पेशवेपदावर घेऊन मारून नेली. परंतु पेशव्यांच्या या शिरजोरपणाचा परिणाम शाहूच्या मनावर व शरीरावर फारच वाईट झाल्यावांचून राहिला नाहीं. त्या वेळेपासून शाहूराजे पूर्णपणें

उदासीन बनले व त्यांनीं ‘ बनवासवाडीस ’ वास्तव्य केलें. त्यांच्या बुद्धीला भ्रंश झाल्याची भावना दिसूं लागली असें जें लिहिलेलें आढळतें. तें खरेंच आहे. त्यांच्या मनाची घटनांच तशी होती. त्यांच्या मोठेपणाला जो कां एकदां नानासाहेबांकडून धक्का बसला तो त्यांना सहन होणें शक्य नव्हतें.

शाहूराजांची अखेर जसजशी जवळ येऊं लागली, तसतसे प्रत्येक पक्षांतील लोक आपापले कान टवकारूं लागले. शाहूला औरस संतती नसल्यामुळें राज्याला पुढें कोणी तरी वारस पाहिजे म्हणून दत्तकाच्या मनसुब्याला प्रत्येक पक्षाकडून निरनिराळी उठावणी मिळूं लागली. राणी सकवारबाईनें आपल्या बाजूचा म्हणून रघोजीचा पुत्र मुधोजी याला पुढें आणलें. रघोजी सारख्या फौजबंद सरदाराचें पाठबळ छत्रपतीला असणें ही गोष्ट नानासाहेबांना नावडी होती. शिवाय रघोजी व नानासाहेब यांचें कमालीचें वितुष्ट होतें. म्हणून राणी सकवारबाईनीं जरी शाहू भोंवतीं जागता पहारा ठेविला होता तरी त्यांतूनही त्यांनीं व गोविंदराव चिटणीसांनीं दोन महत्वाचे चिठोरे लिहून घेतले. त्यांतील पहिल्या चिठोऱ्याप्रमाणें चिटणीसास महत्व प्राप्त झालें होतें. त्याच्या जोरावर चिटणीसांनीं शरीफजीच्या वंशांतील मुलगा गादीवर आणण्याचें कारस्थान सुरू केलें. ताराबाईनीं शाहूची गांठ घेऊन त्याला आपला नातु रामराजा हा जिवंत आहे तो घरचाच असल्यामुळें त्याचाच हक्क आहे; व त्याप्रमाणें करारही झालेला आहे वगैरे सबबीवर रामराजाला पुढें केलें. मात्र हें सर्व गुप्त ठेविलें. दत्तकाची योजना फिसकटल्यास कोल्हापूरचे संभाजीराजे वारस म्हणून होतेच. असा हा चौरंगी सामना चालू झाला. या सामन्यांत प्रथम प्रथम सकवारबाईच्या पक्षालाच यश मिळणार असें वाटत होतें. व त्याप्रमाणें राणी सकवारबाई यांनीं मुधोजीला घेऊन येणेबद्दल रघूजीला कळविलेंसुद्धां होतें. पण रघूजीनें पेशव्यांशीं जास्त वैरभाव वाढविण्याचें टाळलें. त्याला अशी भीति वाटली असावी कीं, सर्व ठीक जमलें तर बरें नाहीं पेक्षां पेशव्यांशीं गांठ आहे. ‘ इदंचनास्ति परंच न लभ्यते ’ अशी आपली स्थिति

होईल. या विचारानें तो आलाच नाहीं. त्यामुळें राणी सकवारबाईची फार निराशा झाली. अशा परिस्थितींत शाहूचें निधन झालें. त्या वेळीं ताराबाई व नानासाहेब यांचे गुह्य जमलें होतेंच. त्यांनीं दत्तकाच्या प्रश्नाला ' मूले कुठारः ' करणेची योजना काढली. त्यांनीं राणी सकवारबाईना मोठ्या युक्तीनें सती जाणें भाग पाडलें. शाहू व सकवारबाई या दोघांच्या अभावीं दत्तक घेण्यास कोणींच नसल्यानें दत्तकाचा प्रश्न आपोआप मागें पडला. रामराजाला तावडतोब आणिलें व त्याची साताऱ्च्या गादीवर योजना केली.

अशारीतींनें ताराबाई व नानासाहेब या दोघांचा डाव साधला. पण दोघांचे हेतू मात्र निरनिराळे होते. रामराजांना आपण छत्रपति केलें असल्या-मुळें ते आपल्या बाजूनेंच जातील असें नानासाहेबांना वाटत होतें. तर तारा-बाईना ज्या हिंदूपदपादशाहीच्या ध्येयासाठीं आपण इतकें जिवाचें रान केलें तें ध्येय सिद्धीस गेल्याबद्दल अभिमान वाटत होता. नानासाहेबांनीं हिंदूपद-पादशाही निराळ्या चाकोरींतून नेऊन आपला स्वार्थ साधण्याचा जो घाट घातला होता तो आपला नातूच आतां छत्रपती झाल्यानें खात्रीनें हाणून पाडूं असा विश्वास ताराबाईना वाटूं लागला होता. अर्थात् ज्याचे हातीं ससा तो पारधी या न्यायानें ज्याचे हातीं रामराजा त्याचे हातीं राज्याची मुख्य सत्ता हें समीकरण बरोबरच बिनचूक होतें. ताराबाईची स्वराज्य सेवेची तपस्या, त्यांचें वडीलपण व रामराजाच्या वैयक्तिक कल्याणार्थ त्यांनीं केलेले अविश्रांत श्रम यांसमोर नानासाहेबाचें वजन रामराजावर मुळींच पडेनासें झालें. म्हणून नानासाहेबानें एक बिनतोड डाव योजला तो असा:—

शाहूचें निधन झाल्याबरोबर जिकडे तिकडे नाकेबंदी करून दादोबा प्रतिनिधीला व त्यांचा मुतालिक यमाजी शिवदेव याला पेशव्यांनीं कैद करून ठेविलें होतें. हे दादोबा प्रतिनिधी राणी सकवारबाईच्या पक्षाचे होते. शाहू राजे यांच्या यादींतील ' वंश करणें ' या मताचे ते होते. यामुळें सकवार-बाईनीं दत्तक घेऊन राजमंडळ रक्षून राज्य चालवावें अशी त्याची राजनिष्ठ

वृत्ति होती. पण यांत कोणताच राजद्रोह नव्हता. व त्यामुळें पेशव्यांनीं दादोबाला केलेली शिक्षा राजाचे शिक्कामोर्तब नसलेमुळें बिलकूलच कायदेशीर नव्हती. म्हणून त्यांना बंधमुक्त करून पुरंदराहून पुण्यास आणिलें. पण प्रतिनिधीच्या ताब्यांतील बराचसा प्रदेश साताऱ्या अगदींच नजीक असल्यामुळें छत्रपतीवर त्यांचें बरेंचसें वजन रहाणें साहाजिक होतें. आणि दादोबांचा पूर्ण नाश करावयाचा होता म्हणून पेशव्यांनीं त्या प्रदेशाची आपल्याकरितां मागणी केली व प्रतिनिधींनीं नाइलाज म्हणून वरवर होय ह्मटलें व यमाजी शिवदेव तो प्रदेश पेशव्यांचे ताब्यांत देण्याकरितां म्हणून पुण्याहून निसटला व त्यानें सांगोलें गांठलें.

पेशव्यांनीं इकडे आपला जम बसविण्यास सुरवात केली होती. ताराबाईंना सिंहगडावरून मोठ्या आदरानें बोलावून 'तुह्मांलां राज्यकारभारांतील बहुत कामें मिळतील.' असें आश्वासन देऊन त्यांचें समाधान केलें. "तुमच्या आज्ञेप्रमाणें आपण वागूं असें पेशव्यांनीं ताराबाई जवळ कबूल केलें तेव्हांच शाहूमहाराजांनीं पेशव्यांस दिलेली राज्याच्या वडीलकीची सनद ताराबाईंनीं मान्य केली." असें खरेशास्त्री ह्मणतात. ताराबाईंची अशी समजूत करून देऊन आपण स्वतः न जातां त्यांनीं सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा यांना बरोबर देऊन रामराजाची रवानगी यमाजीचें बंड मोडण्यास केली. तेथें रामराजास खिंडींत गांठून त्याजकडून "सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा आणि आपणास साताऱ्या भोंवती थोडकासा मुलूख खासगीकडे असावा" असें पत्र लिहून घेतलें. 'हें पत्र ह्मणजे रामराजे यांच्याकडोन पेशव्यांनीं घेतलेला मराठी राज्याचा राजीनामाच होय.' असें जें पान ३२५ वर ह्मटलें आहे तें यथार्थ दिसतें.

रामराजाकडून अशाप्रकारचें बेदावापत्र लिहून घेतल्याचें ताराबाईंना समजल्याबरोबर त्यांच्या अंगाची लाही झाली,व पुण्याला आपल्याला बोलावून पेशव्यांनीं साखर पेरून शेवटीं आपल्याला फसविलें हें त्यांनीं जाणून

९८९५ ३२६३ २५१७०१

रामराजाला साताऱ्यास आपल्या संरक्षणाखालीं ठेविलें; व दमाजी गायकवाडास महाराष्ट्रास बोलाविलें. याला थोडासा पूर्वेतिहास आहे. दाभाडे सेनापतींच्या ताब्यांत गुजराथ होती, व गायकवाड हे त्यांचे दुय्यम म्हणून काम करीत होते. त्रिंबकराव दाभाडे यांना डभईच्या लढाईत बाजीराव बल्लाळ यांनीं शाहूमहाराजांच्या आज्ञेविरुद्ध ठार केलें होतें. ही गोष्ट शाहूला अत्यंत अनुचित वाटली व त्यांनीं आपल्या राजपदाचा अभिमान सोडून खंडेराव दाभाडे यांच्या पत्नी उमाबाई यांची क्षमा मागितली; व बाजीरावाला आणून त्यांच्या पायावर घातलें. या वेळीं शाहूने सेनापतिपद यशवंतराव यास व सेनाखासखेल हें पद बाबूराव यास दिलें होतें. सांगोल्यास जी अनुकूल घटना घडवून आणण्याकरितां पेशव्यांनीं येवढा खटाटोप केला होता त्यांत गुजराथही सुटली नव्हती. दाभाड्यांचा कांटा कायमचा नाहींसा करण्याकारितां म्हणजे सेनापतींना नाहींसा करण्याकरितां पेशव्यांनीं गुजराथचा अर्धा भाग गायकवाडांना देण्याचा व अर्धा भाग आपल्याकडे घेण्याचा बेत केला. या व्यवस्थेला गायकवाडांची अनुमती मिळेल अशी पेशव्यांची अटकळ होती. परंतु उमाबाई व दमाजी गायकवाड यांचे संबंध अतिशय चांगले होते. त्यामुळें पेशव्यांनीं केलेल्या या व्यवस्थेविरुद्ध त्यांनीं ताराबाईकडे दाद मागितली त्यावेळीं ताराबाईनीं दमाजीस साताऱ्यास येऊन छत्रपतींची सुटका करण्याची आज्ञा केली. ' छत्रपतीस आपल्या ताब्यांत राखणाऱ्या शिरजोर पेशव्यास तोंड देऊन राजास मोकळे करण्याचा हेतु योजिला. ' पेशवेपक्षाची व दमाजीची बरीच हालचाई होऊन नानासाहेबांच्या पक्षाची सरशी झाली. मग पुढें सलूयाचें बोलणें सुरू झालें. त्यावेळीं नानासाहेबानें समक्ष भेटींत निम्मी गुजराथ व पंचवीस लक्ष रुपये मागितले. दमाजीनें शिक्ककट्यार उमाबाईपुढें ठेवून दाभाडे धनी आहेत त्याशीं काय ते बोला असें उत्तर केलें. पेशव्यांनीं गायकवाड बेसावध असतां त्यांचे गोटावर हल्ला करून तो सफा लुटला आणि गायकवाड व दाभाडे यांना कैद केलें. अशाप्रकारें प्रत्यक्ष कृतीनें पेशव्यांनीं दमाजीस प्रत्युत्तर दिलें.

नानासाहेबाचें त्यांच्या धन्याशीं ह्मणजे रामराजाशीं व ताराबाईशीं वर्तन आणि गायकवाडांचें त्यांच्या धन्याशीं ह्मणजे दाभाडे सेनापतींशीं ( उमाबाईशीं ) वर्तन हें लक्षांत घेतल ह्मणजे त्यांतील महदंतर दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहत नाहीं. दमाजी गायकवाड व उमाबाई दाभाडे यांच्याशीं केलेल्या आगळिकीसंबंधीं नानासाहेबांनीं जी संपादणी केली ती खालीलप्रमाणें आहे. ' आह्मीं गायकवाडांचें पारिपत्य केलें त्यांत कांहीं बेइमानी दगाबाजी केली असें नानाप्रकारें लोकांनीं दर्शविलें. परंतु ईश्वरसाक्ष आहे. मोठमोठे मराठे, मोठे कारभारी यांनीं त्यांचे घर बुडविलें. आह्माशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरे, त्यामुळें बंदोबस्त गड सर्वही त्यांचे कर्मानुरूप झाले. एतद्विषयीं विस्तार कशास ? परंतु आईसाहेबांशीं विरुद्ध वाढलें. त्यांचेमतें सर्वप्रकारें आह्मांस मोडावें. रामदासपंताचे पुतण्यास पेशवाई द्यावी; त्यांनीं आह्मांस बुडवावें. दाभाडे, प्रतिनिधी, रघूजीबाबा सर्वांनीं त्यांस मिळावें ऐसा पूर्ण भाव. ' ही जरी नानासाहेबांनीं आपली संपादणी म्हणून केली आहे तरी त्यांत खोल शिरतांच—' सत्य हें नहमीं ओठावर बसलेलें असतें व बोलण्याची इच्छा नसतांही नेमकें बाहेर पडतें. ' याचा प्रत्यय आल्यावांचून रहात नाहीं. गायकवाड, दाभाडे यांच्याशीं नानासाहेबानीं बेइमानी दगाबाजी केली असा सर्वसमान्य समज तत्कालीन होता हें नानासाहेबानींच वर दर्शविल्याप्रमाणें कबूल केलें आहे. पेशव्यांच्या इच्छेप्रमाणें वागण्याला गायकवाड व दाभाडे कबूल झाले नाहींत व त्यांनीं छत्रपतींचा पक्ष धरण्याचें पातक केलें ह्मणून पेशव्यांनीं त्यांना मोडून काढलें. आईसाहेब दाभाडे, प्रतिनिधि, रघूजीबाबा वगैरे सर्व हिंदूपदपादशाहीचे घटक असलेलें राजमंडळ एकीकडे व नानासाहेब मात्र भलतीकडे. ' सर्वप्रकारें आह्मास मोडावें. ' असें ह्मणण्यांतच स्वार्थाचा पूर्ण अभिनिवेश दिसून येतो. आह्मीं वाटेल तें करूं पण मोडले जाणार नाहीं असाच अर्थ त्यांत अभिप्रेत नाहीं काय ? " मराठ्यांचे—पेशव्यांचे अंमलास ' राज्य ' न म्हणतां ' लुटारू संस्था ' असें सामान्यतः हिंदुस्थानभर पुढें समजण्यांत येऊं लागलें. शिवा·

जीच्या राज्यस्थापनेतील उच्चतर हेतू कालांतरानें बदलत गेले आणि बाहेरील दिखाऊ ऐश्वर्यांत अंतर्यामीं राज्यास भयंकर कीड लागून राहिली. नानासाहेब सदाशिवराव, रामचंद्रबाबा, महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस. इत्यादि त्या वेळच्या मुख्य मुख्य पुरुषांच्या मनांत वैमनस्य उत्पन्न झालें. त्यांत दोन पक्ष कोणते याचा उलगडा पाहूं गेलें तर फक्त पेशवा ( नानासाहेब ) एका बाजूस व इतर सर्व मंडळी दुसऱ्या बाजूस अशी होती. " असें रियासतकार स्पष्टपणें मांडितात. यावरून नानासाहेब निर्मित चाकोरी व शिवाजी निर्मित चाकोरी या सर्वांशानें कशा भिन्न भिन्न होत्या हें स्पष्ट दृग्गोचर होतें.

अशारीतीनें दमाजी गायकवाडाचे ताराबाई व छत्रपती यांना पेशव्यांच्या तावडींतून सोडविण्याचे प्रयत्न फसल्यानंतर अगर पेशव्यांनीं फसविल्यानंतर ताराबाईनीं बाबूजी नाईक बारामतीकर यांना हाताशीं धरिलें व संभाजीमहाराजांना सहाय्यार्थ बोलाविले. ' संभाजीराजे यांजकडे आईसाहेबांनीं राजकारण केलें. त्यांनीं तयार होऊन यावें. प्रधान यांचें पारिपत्य करावें असें ठरलें.ते निघाले तों जिजाबाईनीं या कामांत पडूं नये म्हणून माघोर नेलें" अर्थात् या वेळीं जिजाबाईकडे पेशव्यांनीं संधान बांधून त्यांना खूष केलें असलें पाहिजे, हें निर्विवाद होय. पग पुढें ज्या वेळेस ' गरज सरो नि वैद्य मरो ' या न्यायाचा अवलंब करून संभाजीमहाराज मरण पावतांच नानासाहेबांनीं करवीरचें राज्य घशांत टाकण्याकरितां सैन्याची रवानगी केली त्या वेळीं जिजाबाईना ब्रह्मांड आठवलें व स्त्रीस्वभावानुरूप त्यांनीं ' बेइमान ' असें नानासाहेबांना संबोधल्याचें प्रसिद्धच आहे. ' इमान ' देऊन बेइमानी केल्याबद्दल जिजाबाईना संताप येणें स्वाभाविक होतें.

येवढे सर्व खटाटोप नानासाहेबांनीं केले. व ताराबाईना कोणाचीही मदत मिळूं नये अशी तजवीज ठेविली. पण रामराजे यांचा प्रत्यक्ष कबजा मिळविण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला यश मिळण्याचें मुळींच चिन्ह दिसेना. व " दिल्ली, इरान, तुरानापासून रामेश्वरापर्यंत दुर्लौकिक झाला आहे तो दूर

करावा. " याकरितां नानासाहेबांनीं आपल्या पक्षाचा सातारचा कारभारी दिनकर महादेव यास साम दाम दंड याचा इलाज चालेना तेव्हां भेदाचा उपाय सुचविला. ' यास्तव रंग भरून त्यांची ( राजांची ) निशा करून खालीं येत, आम्हीं श्रम केलियाचें सार्थक होय तें करणें" या वाक्याची विशेष छाननी करण्याची जरूरी नाहीं. कोळसा उगाळावा तितका काळाच निघणार !

सर्व उपाय थकले ताराबाई आपल्याला मुळींच बधत नाहींत असें पाहून नानासाहेबांनीं ताराबाईशीं आपण किल्ल्याखालीं यावें असें बोलणें लाविलें. पण औरंगजेबासारख्या कपटपटु मुत्सद्यांना दाद न देणारी ताराबाई अशा पारदर्शक मायावीपणाला थोडीच भीक घालणार ! ताराबाईनीं पेशव्याला रोकडा जबाब दिला होता तो हा—" तुम्हीं फौजेसुद्धां येऊन परीघ घातला आहे. तो उठवून तुम्हीं स्वस्थळास जावें. तदनंतर जे बोलणें तें सांगोन हरकोणी आपले तर्फेनें पाठवून द्यावा. त्यासी जाबसाल करावा तो केला जाईल. ' या उत्तरांत पागीदारपणा, धनीपणाचा आत्मविश्वास व खोंच किती ओतप्रोत भरलेली आहे हें स्पष्ट दिसतें.

सर्व उपाय थकल्यावर मग नानासाहेबांना ताराबाईच्या म्हणण्याप्रमाणें-आज्ञेप्रमाणें वागणें भाग पडलें व त्यांनीं ताराबाईशीं तह केला. हा तह नानासाहेबांनीं रामराजे यांच्या नांवानें लिहून न देतां ताराबाईच्या नांवें लिहून दिला आहे हें त्याचें वैशिष्ट्य लक्षांत घेण्याजोगें आहे.

' बायकाच्या कारभार ठीक दिसणार नाहीं. व्यवस्था रहाणार नाहीं. ' वगैरे नानासाहेबांनीं मागें केलेलीं आपमतलबी विधानें त्यांना यावेळीं नाक मुठींत घेऊन मुकाट्यानें गिळावीं लागलीं. ' एकनिष्ठेनें करावी ' हें कबूल करतांना पेशव्यांना जड गेलें असेल. " आतां जे मर्जी असेल तें प्रमाण, दुराग्रह नाहीं. साहेबांचे प्रमाणवचन रामबाण आहे. " वगैरे त्या यादींतील विधानें किंबहुना सर्व यादीच उल्लेखनीय आहे. ती पान ३७३–७५

वर दिली आहे ती जिज्ञासूंनीं साकल्यानेंच पहावी; ह्मणजे नानासाहेबांची मनोभूमिका व ताराबाईची मनोभूमिका यावर लख्ख प्रकाश पडल्यावांचून रहाणार नाहीं. ताराबाईनीं पेशव्यांची सोय होते हें जाणून त्यांची मागणी न येतां सिंहगड त्यांचे ताब्यांत दिला यावरून ताराबाईची स्वराज्यासंबंधीं किती पारमार्थिक कल्पना होती व त्यांनीं स्वत्व व हिंदुपदपातशाहीचे स्वरूप यथार्थ करण्याकरितां किती यत्न केले याची १४ व्या प्रकरणाच्या शेवटीं कलमबंदी दिली आहे ती मननीय आहे.

बाजू पूर्णपणें अंगाशीं आल्यानें नाइलाज होऊन नानासाहेबांनीं ताराबाई पुढें 'पेशव्यांची शरणागति या प्रकरणांत उद्धृत केलेला करार करून दिल्यानंतर दोहोंपक्षाची दिलजमाई व्हावयास पाहिजे होती पण तसें दिसून येत नाहीं. सन १७५१ च्या अखेरीस निजामानें पुण्यावर चाल करून येऊन पेशव्यांची तारांबळ उडविली. त्यावेळीं दादोबा प्रतिनिधी यांना ताराबाईनीं पेशव्यांच्या मदतीस पाठविलें व 'अविंधाचा पराभव करून तुह्मी हुजूर येणें' अशी नानासाहेबांना आज्ञा केली. पण 'खाई त्याला खवखवे.' या न्यायानें पेशव्यांनीं त्याचा अर्थ भलताच केला व तसें ताराबाईंना लिहिलें. त्याचें उत्तर पान ३८३ वर दिलें आहे तें वाचतां, ताराबाईचें अंतःकरण कसें शुद्ध होतें व नानासाहेब मात्र साप साप म्हणून दोरीला कसे बडवीत होते हें दिसून येईल. सर्व सरदारांना प्रतिनिधींच्या नेतृत्वाखालीं ताराबाईनीं पेशव्यांच्या मदतीस जाणेस आज्ञा केली असतां प्रतिनिधीबरोबर फौज नाहीं व साहेबासंन्निधही या समयांत मातबर मनुष्य असले पाहिजेत याजकरितां प्रतिनिधीस हुजूर नेऊन तेथील बंदोबस्त करावा. सरदार सर्वांस सामील सेवकास व्हावें ह्मणोन पत्रें पाठविलीं तीं उत्तम आहे. सरदार जलदीनें फौजेनसी सेवकास सामील होत ते करणार साहेब धनी आहेत. साहेबांचा पुण्यप्रताप सेवकाचे मस्तकीं असतां कोणे विसी मोंगलांचा डर धरीत नाहीं.' असें नानासाहेब लिहितात. याचा अर्थ स्पष्टच असा कीं, प्रतिनिधींची अडगळ नको. प्रतिनिधी असले कीं, त्यांचा सल्ला पाठोपाठ आलाच. आणि तो तर

नानासाहेबांना ऐनजिनसी नको होता. आतां प्रतिनिधी कदाचित् निजामास सामील होतील अशी भीति नानासाहेबांना वाटली असावी असें रियासतकार ह्मणतात. तसें जर असतें तर स्वतः नानासाहेबच निजामाकडून पांच लक्षांची जहागीर उकळण्याच्या प्रयत्नांत होते. हें वासुदेव दिक्षित यांना त्यांनीं लिहि-लेल्या पत्रावरून स्पष्ट दिसतें. मात्र ताराबाईनां यावेळीं लिहिलेल्या पत्रांत नानासाहेबांनीं भरपूर कांगावखोरपणा केलेला आहे. ‘ हा समय सेवकाचे अब्रूवर आहे. सेवकाची अब्रू गेलीया मग राज्याची अब्रू राहणार नाहीं. ’ हें प्रत्यक्ष नानासाहेबाचेंच लिखाण आहे. यावर विवेचन करतांना पान ३८९ वर “ स्वराज्य ह्मगजे ‘ आपलें राज्य ’; आणि ‘ आपलें राज्य ’ ह्मगजे नानासाहेब पेशव्यांचें राज्य—केवळ नाना-शाहीचें राज्य. ” असें राज्य नानासाहेब पेशव्यांना पाहिजे होतें. हें त्यांच्या पुढीलही कृतीवरून दिसून येईल. “ हिंदुपदपातशाहीच्या किंवा मराठी राज्याच्या अभिमानाचा थोडा तरी ओलावा त्यांच्या अंतःकरणांत होता; असें त्यांच्या कोणत्याच कृतिवरून दाखवितां येण्यासारखें नाहीं. ” असें जे उद्वि-ग्नतेनें ग्रंथकर्तीनें उद्गार काढिले आहेत ते यथार्थच वाटतात.

संभाजी महाराज मरण पावल्यावर नानासाहेबांनीं कोल्हापूरचें राज्य आपल्या घशांत घालण्याचा विचार करून हरीराम व विसाजी नारायण या सरदारांना ५००० फौज देऊन जप्ती करण्याकरितां कोल्हापूरास पाठविलें. जिजाबाईच्या तेजस्वीपणामुळें त्यांची घूळदाण उडाली ही गोष्ट निराळी. शेवटींसुद्धां भर दरबारांत पुण्यास जाऊन जिजाबाईनीं रोखठोक विचारल्यावर सर्वांची बोबडी वळली. व ‘ श्रीमंत राजेश्री नानासाहेबानीं राजा करावयाचा नेमला होता. ’ तो उमाजी भोसले मुंगीकर—[ नानासाहेबांनीं तयार केलेलें प्यादें ]—कुठल्याकुठें उडून गेला व “ तो राहिलासा जाला आहे. श्रीमंत राजेश्री दादांचे व गोपिकाबाईचे मतें ताराबाईचे विचारें जो राजा बसवा-वयाचा अगर न बसवावयाचा विचार जो करतील त्याप्रमाणें ताराबाईचे विचारें करावें. ” असें ठरलें.

येथपर्यंत ताराबाईच्या कर्तबगारीचें व त्यांच्या हिंदूपदपातशाहीनिष्ठ धोरणाचें यथामति दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी आपल्या प्रसिद्ध प्रस्तावनेंत स्वराज्यस्थापनेचे हिंदुपदपादशाही व ब्राह्मणपदपादशाही, असे मराठ्यांच्या इतिहासाचे खंड पाडून, बाळाजी बाजीरावाला जें अत्युच्चपदीं बसविलें आहे तें चुकीचें असून ही नानाशाही हिंदुपदपादशाहीवर उपवृक्षाप्रमाणें वाढलेली होती. " सातारच्या हिंदुपदपात-शाहीच्या वृक्षावर ही नानाशाही उपवृक्षाप्रमाणें वाढल्यामुळें त्या मूळ वृक्षाचा सर्व रस उपवृक्षानें ओढून घेऊन तो प्रबल झाला. पुढें त्या उपवृक्षावर ह्मणजे नानाशाहीवर नानाफडणविसांचा दुसरा उपवृक्ष निर्माण झाला. एका शाहीची वाढ दुसऱ्या शाहीचें भक्ष झाल्यामुळें मूळवृक्ष बलहीन होतांच त्याजवरील उपवृक्ष आपोआप वठून गेले. " असें जें ग्रंथाच्या शेवटीं उप-संहारांत ग्रंथकर्तीनीं प्रतिपादिलें आहे तें विचाराला नवीन चालना देणारें आहे खास! प्रत्येकानें तें वाचून आपलें मत स्वतंत्रपणें बनवावें व आपले विचार प्रांजलपणें व छातीठोकपणें मांडावे हेंच योग्य होईल.

लेखिका सौ. रंगूबाई जाधव व ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीचे उत्साही सेक्रेटरी इतिहासभास्कर रानडे यांच्या अतिशय आग्रहामुळें व या विषयासंबंधीं माझीही आपुलकीची भावना असल्यामुळें चार वेडेवांकडे शब्द लिहिण्याचें मी धाडस केलें आहे. मराठी स्वातंत्र्याच्या कर्तबगारीस शिवकालीं ज्या उज्वलतेनें प्रारंभ झाला; राजारामाच्या कारकीर्दीत मोंगलांच्या असह्य मारालाही न जुमानतां ती फोफावतच गेली इतकेंच नव्हें, तर ज्या हिंदूपद-पादशाहींत ताराबाईच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांनीं मोंगलास पळतां भुई थोडी करून सोडिली व शेवटीं मोंगल बादशहावर मराठ्यांच्या सहाय्याची याचना करण्याचा प्रसंग आणला; तीच मराठ्यांची कर्तबगारी पुढें अर्धशतक लोटलें न लोटलें तोंच हिंदुपदपादशाहीची संपूर्ण गठडी वळेपर्यंत कां प्रसंग ओढवला याबद्दल विचार करीत असतां मला लहानपणापासून शिकविलेला इतिहासच

एकांगी व पूर्वग्रहदूषित आहे असेंच वाटूं लागलें. दैवयोगानें कोल्हापूरच्या रेकार्डांतील कांहीं कागदपत्रें मला पहाण्याची संधी मिळाल्यामुळें माझ्या विचाराला जास्त चालना मिळाली. आणि तदनुरोधानें मी जसजसा विचार करूं लागलों तसतसें जनताजनार्दनासमोर माझे विचार एकदां मांडावेत असें मला वाटूं लागलें. पण कै. शाहू छत्रपति यांचें निधन आकस्मिक झाल्यानें ' उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणांमनोरथाः ' या उक्तीप्रमाणें माझे विचार माझ्या जवळच राहिले. पण त्या विचारांना चालना देणारा हा ग्रंथ पुढें आल्यानें त्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याची ही संधी माझ्यानें दवडवेना. इ. स. १७०० पासून १७०७ पर्यंत विजेप्रमाणें तळपून मोंगलांपासून महाराष्ट्राला निर्भय केल्यावर पुढें १७१४ पासून १७४८ पर्यंत ताराबाईनीं राजसंन्यास केला होता. त्यानंतर पुनः त्यांनीं कारण पडतांच आपलें तेज प्रकट केलें. जवळ जवळ तसेंच त्यांच्या इतिहासासंबंधीं झालें आहे. अगर होणार आहे, असें वाटल्यावाचून रहात नाहीं. एका विवक्षित चाकोरींतून जाणाऱ्या इतिहास लेखकांच्या महत्वाकांक्षेनें, हट्टानें, स्वार्थानें व उपद्व्यापानें जी ताराबाई महत्वाकांक्षी, हट्टी, स्वार्थी व उपद्व्यापी दिसत होती अगर दिसावयास लाविलेली होती तीच तारा आतां पुनश्च आपल्या पूर्ण तेजानें प्रकाशमान होण्याचा काल एका विदुषीकडून आला आहे असें दिसतें.

लेखिकेनें आपल्या आत्मनिवेदनांत " स्वभाव धर्माचा अभ्यास करून त्याच ओघांतून ऐतिहासिक साधनांना नेणें इतिहासकाराचें कर्तव्य आहे. ऐतिहासिक साधनांतून ऐतिहासिक व्यक्तींच्या स्वभाव धर्माला न्यावयाचें नाहीं. " असा जो भावी इतिहासकारांना मार्गदर्शक होण्यास पात्र असा सिद्धांत मांडलेला आहे, व जो सिद्धांत डोळ्यासमोर ठेवून त्यांनीं हें पुस्तक लिहिलेलें आहे; तें पाहिलें म्हणजे वरील माझ्या विधानाची सत्यता सर्वांना पटेल असें मला वाटतें. आणि या सिद्धांताकडे लक्ष पुरवून भावी इतिहासकार आपलें काम उरकतील तर मागाहून दुरुस्त्या करण्याचे प्रसंगही टळतील अशी माझी खात्री आहे.

तारीख १४–१–१९४७ इ.
२३०७, गुरुवारपेठ कोल्हापूर. **श्रीनिवास गुरुराव देशपांडे.**

# अभिप्राय १

## देशभक्त अ. बा. लठ्ठे, एम्. ए. एल् एल्. बी., बेळगांव.

" मोंगल मर्दिनी ताराबाई " हें पुस्तक मी मोठ्या उत्सुकतेनें वाचलें. रा. पां. गो. रानडे यांच्या अविरत प्रयत्नानें मराठा इतिहासावर जो नवीन प्रकाश अलीकडे पडूं लागला आहे त्यांतच कोल्हापूर राज्याच्या संस्थापिका ताराबाई यांच्या चरित्रांतील अनेक घडामोडींचें दुसरें, आजपर्यंत फारसें पुढें न आलेलें, अंग या पुस्तकांत दाखविलें आहे. रा. रानडे यांनीं यापूर्वी प्रकाशित केलेल्या पुस्तकांवर ज्याप्रकारची प्रखर टीका करण्यांत आली आहे ती याहि पुस्तकावर होण्याचा संभव आहे. कारण त्यांचा ऐतिहासिक दृष्टीकोणच हल्लीच्या बहुसंख्य लेखकांना अत्यंत नापसंत आहे. ही नापसंती सर्वस्वी योग्य आहे असें मानिलें तरी रा. रानडे यांच्या प्रयत्नावर इतके तुटून पडण्यासारखें काय आहे, हें मला समजत नाहीं. कोणत्याही घडामोडीला एकाहून अधिक बाजू असूं शकतात, हें कोणासहि नाकारितां येणार नाहीं. त्यापैकीं एकीवर एखाद्यानें भर दिला तरी टीकाकारांना चिडून जाण्याचें कारण नाहीं. शाहूच्या सुटकेनंतर मराठी देशांत जे तंटे सुरू झाले त्यांचें सविस्तर वर्णन या पुस्तकांत आलेलें असून त्या तंट्यांत शाहू आणि पेशवे एका बाजूला व ताराबाई दुसऱ्या बाजूला होते. त्यापैकीं शाहूचीच बाजू योग्य होती कीं ताराबाईची, या प्रश्नावर मतभेद होण्यास पुष्कळच जागा आहे. प्रस्तुत पुस्तकांत दोन्ही बाजू बरोबर मांडल्या गेल्या असून ताराबाईचेच प्रयत्न मराठी साम्राज्याच्या हिताचे होते व तिनेंच निःस्वार्थ बुद्धीनें शाहू–पेशवे पक्षाला पायबंद घालण्याचा प्रयत्न करून आपलें अलौकिक बुद्धि सामर्थ्य मराठी राज्य बळकट करण्याकरितां अर्ध शतकभर खर्चिलें, असें प्रतिपादन केलेलें आहे. पेशव्यांच्या

बाजूचे कागदपत्र जसे व ज्या प्रमाणांत उपलब्ध आहेत तसे ताराबाईच्या पक्षाचे नाहींत. यामुळें ताराबाईच्या कार्याचें स्वरूप नक्की काय होतें, हें पुष्कळ वेळां ठरविणें कठीण होतें. प्रस्तुत पुस्तकांत उपलब्ध कागदपत्रांचा भरपूर उपयोग केला असूनहि कित्येक प्रसंगीं अनुमानावरच जास्त भिस्त ठेवावी लागली आहे. ह्मणजे विशेषतः कोल्हापूर प्रांतांतील इतिहासाच्या अभ्यासकांना ताराबाईच्या चरित्राचा अभ्यास करण्यास अजून पुष्कळच जागा आहे असें हें पुस्तक वाचतानाच वाटूं लागतें. या पुस्तकांत उल्लेखिलेल्या घडामोडीकडे अभिमानांध दृष्टीनें पाहणाऱ्यांना या पुस्तकाबद्दल राग येईल. परंतु खऱ्या इतिहासाचा शोध अविकृत मनानें ज्याला करावयाचा असेल त्याला पुस्तकांतील विचारसरणी निदान विचारार्ह वाटेल असें मला वाटतें. शाहूराजे, बाळाजी बाजीराव किंवा ताराबाई, या सर्वच व्यक्ति आज इतिहासजमा झालेल्या आहेत. त्यांच्या चरित्राला कस लावावयाचा तो त्या कालांतील परिस्थितीला अनुसरूनच लावला पाहिजे. आणि त्या कसाला एखाद्या व्यक्तीचें वर्तन लागलें नाहीं तरी त्याबद्दल कोणीहि दुसऱ्याला हिणविण्याचें किंवा भिवविण्याचें कारण नाहीं. हें लक्षांत ठेऊन प्रस्तुत पुस्तक वाचलें असतां त्यांत एका महत्वाच्या विचारसरणीचें दिग्दर्शन केल्याचें दिसून येईल.

बेळगांव तारीख ३। ।४७. **अ. वा. लठ्ठे.**

---

# अभिप्राय ?.

सुप्रसिद्ध इतिहास संशोधक **श्री. वि. स. वाकसकर,** बडोदे.

'मोगल मर्दिनी ताराबाई' हें पुस्तक साधारणतः चाळून महत्वाचीं वाटणारी कांहीं प्रकरणें वाचून पाहिलीं. गायकवाड राजघराणें आणि कोल्हा-

पूरकर छत्रपति राजघराणें यांचा शरीरसंबंध अनेक वेळां झाला असून प्रस्तुतच्या गंगाभागिरथी ताराबाई महाराणी बडोद्याच्या महाराजांच्या भगिनी आहेत; म्हणून आम्हां गायकवाडी प्रजाजनांना छत्रपति घराण्यासंबंधानें इतरांपेक्षां अधिक आपलेपणा वाटणें योग्य आहे तथापि कोल्हापूर राज्यसंस्थापक ताराबाई महाराणिसंबंधानें अपूर्व आदर वाटण्याला तिचें कर्तृत्वच मुख्य होय. महाभारतांतील द्रौपदीप्रमाणें ती राजकारणकुशल होती, राजपूत वीरांगनाप्रमाणें शूर होती व देवी अहल्याबाईप्रमाणें निश्चयी होती. हे तिचे सद्‌गुण मनांत आले ह्मणजे तिच्यासंबंधानें पूज्यभावच उत्पन्न होतो.

२ संभाजी छत्रपतीच्या वधानंतर मोगलांनीं बहुतेक मराठी सत्ता नामशेष केली परंतु राजाराम छत्रपतीनें ( ह्मणजे ताराबाईच्या पतीनें ) ती किंचित् प्रचलित ठेविली त्यामुळे त्या राजसत्तेवर अथवा राज्यावर संभाजीपुत्र शाहू याचा कांहींहि वारसाहक्क राहत नाहीं, हें ताराबाईचें समर्थन यथार्थ वाटतें. शाहून शिवाजीमहाराजांचें सिंहासन मिळविलें आणि ताराबाईनें महाराजांच्या स्वतंत्र राज्यस्थापनेचा वारसा प्राप्त केला, परंतु दैवच प्रतिकूल असल्यानें ताराबाई माउलीला पदोपदीं अपयशच आलें. हा सर्व इतिहास ‘ मोगल मर्दिनी ताराबाई ’ पुस्तकांत साद्यन्त व साधार वर्णिला आहे. ( प्रकरण ८ वें पाहणें. येथून पुढील प्रकरणें महत्वाचीं व वाचनीय वाटतात.) ‘ मोगल मर्दिनी ताराबाई ’ हें ४३२ पृष्ठांचें पुस्तक झटपट वाचून तत्काळ अभिप्राय लिहिणें मला शक्य वाटत नाहीं. प्रस्तुत पुस्तक अभ्यासपूर्ण आधारांसह ग्रथित झालें असून त्या पुस्तकावर अभिप्रायहि विचारपूर्वक आणि ग्रथित आधार पाहून दिला पाहिजे. सध्या अनेक कारणानीं माझी मनःस्थिति व शरीरप्रकृति अस्वस्थ असल्यानें पूर्वदर्शित दीर्घ परिश्रम न करितां स्थूलपणें पुढील विचार अथवा अभिप्राय प्रदर्शित करीत आहे. कारण ‘ शाहूराजे यांची अखेर ’ या बाराव्या प्रकरणांत शाहूच्या आज्ञेचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष उल्लंघन पेशव्यांनीं केलें हें या पुस्तकात मार्मिकपणें दाखवून राजवाड्यांच्या मतावर

जी टीका केली आहे ती वाचून त्यांचा शिष्यसमुदाय स्तब्ध राहणार नाहीं. असो.

३ पहिल्या बाजीराव पेशव्यानें शाहूच्या कारकीर्दीतहि छत्रपति शिवाजीमहाराजांप्रमाणें पराक्रम गाजवून अविंधांना नरम केलें; त्याच्या पश्चात्‌हि सुमोर दहा वर्षेंपर्यंत शिवछत्रपतीची पुण्यायी जेम तेम पुरली. कारण याच दहा वर्षांत स्वतः शाहू छत्रपति किती दीन झाला व नानासाहेब पेशवा त्याला कसा धमकाऊं लागला हें 'शाहूराजे यांची अखेर' या बाराव्या प्रकरणांत मार्मिकपणें लिहिलें आहे. याच दहा वर्षांत नानासाहेब पेशवे व इतर मराठे सरदार यांचें वैमनस्य वाढत जाऊन नंतर पेशव्यांचा स्वार्थच सर्वत्र धिंगाणा घालूं लागल्यानें इ. स. १७६१ मध्यें पानपतावर सर्व नाश झाला, व लागलीच नानासाहेबाचाहि अन्त झाला. महाराणी ताराबाई तावत्कालपर्यंत जिवंत होती. 'ताराबाईची अखेर' हें या ग्रंथांतील पंधरावें प्रकरण मोठें वाचनीय झालें आहे. मतभेद सर्वच असणारच आणि पत्र संशोधनानें ते वाढून पूर्वजांबद्दल अभिमान वाटण्याऐवजीं तिरस्काराचीच वृद्धि करतील किंवा प्रत्येक वाचक व्यष्टीचाच अभिमानी होईल. परंतु राष्ट्रकार्य समष्टी दृष्टीनेंच यशस्वी होतें.

४ वैद्यालंकृति श्रीमंत सौभाग्यवती रंगुबाईसाहेब जाधव (केसर-इ-हिंद) यांच्यासंबंधानें आम्हीं येवढेंच ऐकत होतों कीं, त्या देवभक्त, देशभक्त, विद्याप्रिय, अत्यंत नम्र, यात्राप्रवीण ( काशीपासून रामेश्वरपर्यंत व हिमालयावरहि यात्रा केलेल्या ) समाजहितकर्त्या, अनेक कलाभिज्ञ व निष्कपटी आहेत. प्रस्तुत 'मोगल मर्दिनी ताराबाई' या ग्रंथानें त्या इतिहास संशोधक, लेखक व वादकुशलहि आहेत असें प्रत्ययास आलें त्यामुळें त्यांच्यासंबंधानें आदराची वृद्धि झाली.

बडोदें तारीख १–१–१९४७. वि. स. वाकसकर.

# अभिप्राय ३.

## प्रा. वि. म. कुलकर्णी, एम. ए. बेळगांव.

बेळगांवच्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीतर्फे महाराष्ट्राच्या इतिहासाविषयीं जे नवविचार प्रवर्तक ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत त्यामध्यें वै. सौ. रंगूबाईसाहेब जाधव यांच्या " मोंगल मर्दिनी ताराबाई " या ग्रंथानें एक बहुमोल भर पडली आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासाचें लेखन सर्व बाजूंनीं संपूर्ण असें होण्यास अजूनहि वाव आहे. कारण, संशोधनांस साह्यभूत असलेलीं साधनें दिवसें दिवस अधिकाधिक उपलब्ध होत आहेत; व त्यांच्या बैठकीवरून जुन्या इतिहासाकडे नव्या दृष्टीनें पाहणें शक्य होत चाललें आहे. ऐतिहासिक घटनेकडे आपण कोणत्या दृष्टिकोणांतून पाहतों यालाहि फार महत्व आहे हें तत्व मान्यता पावूं लागलेलें आहे. व यामुळेंच ऐतिहासिक घटनांचे नवीन अन्वयार्थ बसवण्याचे प्रयत्न होत असलेले दृष्टीस पडतात. विशिष्ट पूर्वग्रहाचें दडपण न स्वीकारतां इतिहासाचें पुनर्मापन करण्याचा व साकल्यानें विचार करून ऐतिहासिक व्यक्तींच्या गुणांचा आलेख काढण्याचा यत्न हा केव्हांहि प्रशंसनीय होय. व या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथांतील स्वतंत्र व निर्भिडपणें चितारलेला ताराबाईचा जीवनपट अभ्यासण्याजोगा आहे यांत शंका नाहीं.

महाराष्ट्राच्या इतिहासांत चमकणाऱ्या मोजक्या पराक्रमी स्त्रीरत्नांत ताराबाईची गणना होते; पण सध्याच्या ऐतिहासिक लेखनावरून ताराबाई ही एक उपद्व्यापी आणि स्वार्थलोलुप स्त्री होती असाच समज निर्माण होतो. परंतु याहि प्रश्नास दुसरी एक बाजू आहे हें या ग्रंथांत अनेक साधनांचा पुरावा देऊन विशद केलेलें आहे हें विशेष होय. ताराबाईसंबंधीं प्रचलित असलेलीं माहिती व मतें देऊन स्वतःच्या दृष्टिकोणाप्रमाणें त्यांचें खंडन वा

मंडन केलेलें येथें आढळतें. ग्रंथास " मोंगल मर्दिनी ताराबाई " हें नांव देण्यांत लेखिकेचा जो हेतु आहे तो ताराबाईचे उज्वल पराक्रम वर्णितांना स्पष्ट झालेला आहे. औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूस सात वर्षेपर्यंत सतत तोंड देऊन मराठेशाही जिवंत राखण्यांत ताराबाईनीं जी मुत्सद्दीगिरी व जें शौर्य दाखविलें त्याचें प्रस्तुत ग्रंथांतील वर्णन समरसतेनें व वीरश्रीप्रेरकरीतीनें लिहिलेलें आढळतें.

वादस्थळें होऊन बसलेल्या प्रश्नांची चिकित्सा करण्याची पध्दतिही मार्मिक व अभिनव वाटते. उदाहरणार्थ शाहूशीं लढतांना, शिवाजीराजे यांनीं स्थापिलेल्या गादीविषयीं ताराबाईनीं कोणती भूमिका ठेवलेली होती याचें " शाहूराचाचें आगमन व वारसाहक्काचें स्पष्टीकरण " या प्रकरणांतील विवेचन पहावें. " शाहूराजे यांच्या दोन यात्रांची छाननी " आणि उपसंहारांत आढळणारें राजवाडे यांच्या मतांचें खंडन हीं प्रकरणेंही उल्लेखनीय वाटतात.

प्रस्तुत सारख्या ग्रंथांत मांडलेल्या मतांचा विचार नवीन पिढीच्या वाचकांकडून अवधानपूर्वक झाला पाहिजे असें वाटतें. ऐतिहासिक वाङ्मय लिहिणाऱ्या साहित्तिकांनींही या ग्रंथाकडे दृष्टि पोंचविली पाहिजे. कारण ऐतिहासिक वाङ्मयाचे द्वारां इतिहासांतील गोष्टी जनमनाच्या तळापर्यंत रुजून बसत असतात. इतिहासकारांनीं संशोधनें करून जें कांहीं सुवर्ण पुढें मांडलें असेल तें तसेंच उचलून त्याचे नानाविध अलंकार वाङ्मयसेवक बनवितात व त्याचा परिणाम समाजाचे मनावर फार खोलवर होतो. तेव्हां तें जें सुवर्ण उचलावयाचें तें शंभर नंबरी आहे कीं कसें याविषयीं साहित्तिकांनीं दक्षता घेणें जरूरीचें वाटतें. आणि म्हणूनच प्रस्तुत सारख ग्रंथ त्यांस अभ्यसनीय ठरतात.

ताराबाईच्या चरित्राच्या अनुरोधानें महाराष्ट्राचा अर्ध शतकाचा इतिहासच, कित्येक वेळां प्रचलित मतांना धक्के देत येथें उभा आहे. ऐतिहासिक विवेचनाचा प्रांत असूनही लेखन अतिशय सुगम वाटतें व लेखनामध्यें हवा तेवढा जोम व आवेश असूनही तें क्लिष्ट वा संस्कृतजड नाहीं हें मुद्दाम नमूद केलें पाहिजे.

बेळगांव ता. ७–१–४७. **वि. म. कुलकर्णी.**

# अभिप्राय ४.

**श्री. शंकरराव बळवंतराव चव्हाण,** बी. ए., एल. एल. बी., वकील
४८९ शनिवार, 'कृष्णाप्रसाद' पुणें २.

सदहू पुस्तक वै. सौ. रंगूबाई जाधव केसर–इ–हिंद ह्या स्त्री लेखिकेनें लिहिलेलें आहे ही प्रथम दर्शनीच मोठ्या कौतुकाची गोष्ट वाटते. एका स्त्री–चरित्रनायिकेचें चित्र दुसऱ्या एका स्त्रीनेंच रंगविणें ह्यांत बरेंच औचित्य आहे. आतांपर्यंत ताराबाईविषयीं पुष्कळ वेडगळ अनैतिहासिक कल्पना कांहीं धूर्त व आपमतलबी इतिहासकारांनीं प्रसृत करून ठेविल्या होत्या. महाराष्ट्रांत 'दुही' माजविणारी; व मराठी राज्याच्या चालत्या गाड्याला 'खीळ' घालणारी; पेशव्यांचा सतत उत्साहभंग करणारी आणि शाहूच्या वाटेंत कांटे पेरणारी अशी स्वार्थी व फाजील महत्वाकांक्षीबाई म्हणून तिच्याकडे पुष्कळ समंजस लोकही बघत आले आहेत; पण 'मोंगल मर्दिनी ताराबाई' हें पुस्तक वाचून हा समज कसा चुकीचा व खोडसाळपणाचा आहे ह्याची पूर्ण खात्री पटते. ह्या दृष्टीनें आद्यश्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या धाकट्या सुनेवर जो हा कालपर्यंत अस्थानीं अन्याय झाला होता तो दूर करण्याचें श्रेय सौ. रंगूबाई जाधव यांसच दिलें पाहिजे. ह्या दृष्टीनें त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

'मोंगल मर्दिनी ताराबाई' ह्या पुस्तकाची भाषा रसाळ, ओघवती व ओजस्वी अशी आहे. समग्र पुस्तक वांचल्यावाचून तें बाजूला ठेववत नाहीं इतकी चटकदार व चित्ताकर्षक अशी त्याची रचना व मांडणी साधलेली आहे. एवढें असूनसुद्धां ऐतिहासिक चर्चा व चिकित्साहीसुध्दां शास्त्रोक्त व साधार अशी केली आहे. त्यामुळें इतिहासक्षेत्रांत या पुस्तकास बरेंच वरचें स्थान मिळाल्यावाचून रहाणार नाहीं. 'History is a biography

of Great men. ' ' इतिहास ह्मणजे मोठ्या लोकांचीं चरित्रें ' अशी कार्लाइलनें इतिहासाची केलेली व्याख्या हें पुस्तक वाचून पटूं लागते. ताराबाईनें खडतर वैधव्यांत, घोर तुरुंगवासांत व आपत्तीच्या भोंवऱ्यांत आपल्या आयुष्याचीं पन्नासांवर वर्षें काढलीं पण कसल्याही संकटास तोंड देत असतां तिनें माघार अशी घेतली नाहीं; त्यामुळें तिचें हें आयुष्य ह्मणजे एकप्रकारचा ' विजयी लढाच ' समजण्यास हरकत नाहीं. हा लढा किंवा छत्रपतीच्या गादीचा तंटा लढवीत असतां तिला प्रथम काबेबाज अशा अवरंगजेबासारख्या प्रबळ सत्ताधिशाशीं सतत सात वर्षें तोंड द्यावें लागलें व हें करीत असतां मराठा सरदारांची एकी घडवून आणून तिनें मोठ्या कुशलतनें छत्रपतींचें तक्त राखलें आणि महाराष्ट्राचें स्वातंत्र्यही रक्षिलें. श्रीशिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर प्रथम संभाजीमहाराज नंतर राजाराममहाराज किंवा सोयराबाई ह्यांना जें साधलें नाहीं अगर करितां आलें नाहीं तें ताराबाईनें ह्यावबतींत करून दाखविलें. ह्यांतच तिच्या पराक्रमाचें, पुरुषार्थाचें व मुत्सद्देगिरीचें मर्म सांठविलेलें आहे. संभाजीमहाराज संगमेश्वरीं शत्रूच्या हातीं सांपडून तुळापुरीं अवरंगजेबाच्या छावणींत त्यांची काय दुर्दशा झाली हें कोणास सांगावयास नको. येसूबाई व बालशाहू रायगडावर शत्रूनें पकडून नेल्यावर अवरंगजेबाच्या कैदेंत त्यांना किती तरी दिवस काढावे लागले ! बिचाऱ्या छत्रपति राजारामास जिंजीस पळून जातां जातां भुई थोडी झाली ! वाटेंत त्याचें काय हाल ! जिंजीच्या वेढ्यांत त्यांचा जीव किती धोक्यांत ! पुढें मोठ्या मुष्कीलीनें तो पुनः महाराष्ट्रांत आला पण ह्या सर्व दगदगीचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर होऊन तो आपल्या ऐन तारुण्यांत अकालीं सिंहगडावर स्वर्गवासी झाला. त्यावेळीं ताराबाई अवघी २५ वर्षांची होती; तरी तिनें मराठी सत्तेचें तारूं बुडूं दिलें नाहीं. सतत सात वर्षें झगडा ( war of attrition ) किंवा गनीमी युद्ध चालवून अवरंगजेबास त्राही भगवान करून सोडलें व त्याला शेवटीं खडे चारून मराठी सत्तेचें संरक्षण केलें. ही तिची कामगिरी थोडीथिडकी नाहीं. यदाकदाचित् रायगडाप्रमाणें पन्हाळा पडला असता तर

येसूबाई व बाल शाहूप्रमाणेंच छत्रपति शिवाजी महाराजांची दुसरी सून ताराबाई हीही बालशिवाजी व संभाजी ह्या दोन राजपुत्रांबरोबर अवरंगजेबाच्या कैदेंत जाऊन पडली असती ! व मग महाराष्ट्रावर काय घनघोर प्रसंग आला असता ह्याची कल्पनाही आजच्या काळांतसुद्धां आपल्या अंगावर शहारें आणते. अशाप्रकारचें मोठें दुर्घट काम ताराबाईनें केलें म्हणूनच महाराष्ट्र स्वतंत्र राहिला व पुढें शाहू आणि त्यांचे पेशवे ह्यांना मराठी सत्ता वाढवितां आली. श्रीशिवाजी महाराजांनीं स्वराज्याचा जो वृक्ष लावला होता त्यावर त्यांच्या मृत्यूनंतर अवरंगजेबाच्या मोहिमेचा जो मोठा सोसाट्याचा झंझावात आला त्यांत तो वृक्ष मोडला गेला पण तो मुळासकट उपटला गेला नाहीं. त्याला कारण ताराबाईचा यशस्वी प्रतिकार व म्हणूनच ' मोंगल मर्दिनी ' हें जें विशेषण ताराबाईला लावण्यांत आलेलें आहे तें अतिशय यथार्थ व योग्य असेंच आहे. अशाप्रकारचा हा बहुमोल ग्रंथ प्रकाशन केल्याबद्दल बेळगांवच्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन संस्थचेंही ग्रंथकर्तीबरोबर अभिनदन केलें पाहिजे. हें या अभिप्रायाचेद्वारें करण्यास मला फार आनंद व अभिमान वाटत आहे.

ऐतिहासिक उपलब्ध वाङ्मयांत ह्या ग्रंथानें चांगलीच भर घातली आहे; तरी कांहीं दिवाभीत पुण्या-मुंबईच्या धंदेवाईक वर्णाश्रमवादी इतिहास संशोधकांस हा ग्रंथ वाचून कसेंसेंच वाटण्याचा पुष्कळ संभव आहे. कारण निःपक्षपातीपणाचें व त्यांचें जन्मत: वांकडें आहे. व त्यामुळें ऐतिहासिक सत्यशोधनाच्या सूर्यापुढें उघड्या डोळ्यानीं पहाणें त्यांना परवडत नाहीं. ह्या ग्रंथाच्या प्रखर तेजानें डोळे दिपून जाऊन त्यांच्या बुद्धीला चक्करही येण्याचा संभव आहे. पण असल्या दिवाभीत इतिहास संशोधकांना खूष करण्याकरितां बेळगांवच्या समितीचा उदय झाला नाहीं. उलट इतिहास संशोधन, लेखन व प्रकाशन ही एका गटाच्या व विशिष्ट

मताच्या मूठभर लोकांची मक्तेदारी म्हणून जी आजपर्यंत समजली गेली होती तिला शह देण्याकरितांच बेळगांवची ऐतिहासिक ग्रंथप्रकाशन समिति अस्तित्वांत आली; व ह्या आपमतलबी मक्तेदारीवर आणि मिरासी हक्कावर पहिली ' गदा ' ' खून कीं आत्महत्या ' हा महायुग प्रवर्तक ( Epoch making ) बंडखोर व क्रांतिकारक ग्रंथ प्रकाशन करून आणली. तरीही ह्या मक्तेदारीचीं पाळेंमुळें महाराष्ट्रांतील पांढरपेशा सुशिक्षित सदाशिवपेठी चिपळूणकरी समाजांत फार खोलवर गेलीं असल्यानें एक दोन तडाक्यानें हा मिराशीचा वृक्ष कोलमडून पडणार नाहीं याची मला पूर्ण जाणीव आहे. तरी बेळगांवच्या समितीच्या अस्तित्वानें व तद्द्वारा होणाऱ्या प्रकाशनानें दुसरी बाजू उजेडांत येत आहे ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. आमजनतेला खरा इतिहास कळावा व महाराष्ट्राच्या ऐतिहासिक घटनांचें व घडामोडींचें यथातथ्य चित्रण ( faithful picture ) रेखाटण्यांत यावें हा बेळगांवच्या समितीचा उद्देश वरील पुस्तकांचे प्रकाशनानें साध्य झाला आहे; ही गोष्ट विरोधी पक्षालाही कबूल करावी लागेल.

महाराष्ट्रात जरी एकंदर ऐतिहासिक संशोधनाचा बकवा बराच झाला असला तरीं इतिहास लेखन त्यांतल्यात्यांत चरित्रात्म लिखाण फारच कमी आहे. त्यांतूनही स्त्रीचरित्र लेखन अत्यंत अल्प आहे. या सर्व कारणांमुळें छत्रपतींची दुसरी गादी कोल्हापूरला किंवा जास्त सत्य बोलावयाचें म्हणजे पन्हाळयाला स्वतंत्रपणें स्थापन करणाऱ्या व मराठी सत्तेचें तारूं मोंगल सेनासागराच्या अवाढव्य लाटा सतत सात वर्षे उसळत असतांना बुडूं किंवा मोडूं न देतां तें तारून सुखरूपपणें स्वातंत्र्य व स्वराज्याचे प्रशांत बंदरांत आणून महाराष्ट्रधर्म व मराठी राज्य कर्दनकाळ अवरंगजेबाच्या दाढेंतून बाहेर काढून वांचविणें व त्याची सुप्रतिष्ठा करणें ही कामगिरी जिनें करून दाखविली, त्या आद्य छत्रपतींच्या सुनेचें

चरित्र अजून कोणीही हाताळलेलें नव्हतें ही गोष्ट महाराष्ट्रियांस खरोखर लांछनास्पद अशीच समजण्यांत येईल. तरी ही कृतघ्नतेचा, व लांछनतेचा डाग समितीच्या या प्रकाशनानें अंशतः तरी धुऊन निघाला ही गोष्ट मोठ्या अभिमानाची अशी आहे. एका शिवाजी महाराजांची गोष्ट सोडली तर इतर ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचीं चरित्रें सांगोपांग रीतीनें अभ्यासून अजून कोणीही लिहिलीं नाहींत. ही वाण (Desideratum) निदान ताराबाईंच्या बाबतींत समितीनें थोड्या फार प्रमाणांत भरून काढली ह्याबद्दल अखिल महाराष्ट्र धन्यवाद दिल्यावांचून रहाणार नाहीं. ह्याबद्दल दलितोद्धारक शिंदे यांचा अभिप्राय खालीं देत आहे.

गुरुवर्य कर्मवीर वि. रा. शिंदे ऊर्फ अण्णासाहेब शिंदे हे नेहमीं असें म्हणत असत कीं, **पेशवाईचा इतिहास जर नीट समजून घ्याव-याचा असेल तर रघूजी भोंसले व ताराबाई ह्यांच्या चरित्राचें नीट संशोधन व लिखाण झालें पाहिजे.** ह्या दोन महाव्यक्तींच्या **चरित्रांतच** पेशवाईचा इतिहास सामावलेला आहे. मात्र ही दोन चरित्रें जातिवंत व **जिवंत** अशा निस्पृह व निःपक्षपाती इतिहासकारानेंच लिहिलीं पाहिजेत. व त्यांच्यावर पुण्यातील गायकवाडवाडी संस्कृतीची असंस्कृत छाया पडतां कामा नये. तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें. '**सत्या असत्याशीं मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमता ॥**' अशी मनाची ठेवण व बैठक त्या इतिहास लेखकानें ठेविली पाहिजे. म्हणजेच '**भक्का नारायण नुपेक्षी सर्वथा**' अशी स्थिती होऊन खरे ऐतिहासिक खडेबोल त्यांच्या मुखावाटे बाहेर पडतील. व त्यांतच महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पंढरीचें पावित्र व पांडुरंगाचा पुण्यप्रताप वाढणार आहे. वरील त्यांच्या इच्छे-प्रमाणें ते स्वतः ह्या दोन महाव्यक्तींचीं चरित्रें लिहिणार होते व त्याप्रमाणें श्री. शाहूमहाराज छत्रपती कोल्हापूर यांच्याशीं त्यांचा विचार विनिमयही

झाला होता. पण गु. कर्मवीर अण्णासाहेब शिंदे ह्यांना अस्पृश्योद्धारासारखीं दुसरीं निकडीचीं कामें असल्यामुळें त्यांचे हातून हें काम पार पडलें नाहीं. ह्याबद्दल त्यांना मनापासून वाईट वाटल्याचें त्यांनीं अनेकवार प्रस्तुत लेखकाजवळ बोलूनही दाखविलें होतें. श्री. ताराबाईचें साधिकार व साधार चरित्र लिहिण्यास आमच्या मतें उभ्या महाराष्ट्रांत दोनच अधिकारी माणसें होतीं. तीं म्हणजे एक गुरुवर्य **अण्णासाहेब शिंदे** व दुसरे **दे. भ. अण्णासाहेब लठ्ठे!** ह्यापैकीं अण्णासाहेब शिंदे तर आतां दिवंगत झाले व अण्णासाहेब लठ्ठे हे राजकारणाच्या धाऊगर्दीत त्रिनीचे स्वार झाल्यामुळें त्यांनाही हें काम करण्यास स्वास्थ्य व सवड होईल असें वाटत नाहीं. अशा परिस्थितींत जेथें दोन महावीरांना व साहित्तिकांना ताराबाईचें चरित्र लिहितां आलें नाहीं तेथें वै. सौ. रंगुबाई जाधव या 'अबलेनें' पुढें येऊन आपला वांटा उचलला व एका उत्तम पहिल्या प्रतींच्या स्त्रीचरित्र ग्रंथाची मराठा इतिहासांत भर टाकली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. ह्या ताराबाईच्या चरित्राप्रमाणेंच पुढेंमागें रघोजीं भोंसलें नागपूरकर ह्याचेंही चरित्र समितीतर्फे प्रकाशित व्हावें अशी नम्र सूचना आहे. तिचा समितीनें योग्य तो विचार करावा.

महाराष्ट्राच्या इतिहासांत (१) श्री शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई. (२) श्री संभाजी महाराजाचें कुटुंब येसूबाई. (३) राजारामाचें कुटुंब ताराबाई. (४) उमाबाई दाभाडे. (५) कोल्हापूरच्या संभाजी महाराजाचें कुटुंब जिजाबाई. (६) शाहूमहाराजांचें कुटुंब सकवारबाई. (७) अनुबाई घोरपडे. (८) बाकाबाई भोंसले नागपूरकर. (९) आनंदीबाई पेशवे. (१०) अहिल्याबाई होळकर. (११) बायजाबाई शिंदे. (१२) लक्ष्मीबाई झांशीवाली ह्या आपापल्यापरीनें थोर स्त्रिया होऊन गेल्या

पण त्यांचीं चरित्रें एक दोन अपवाद सोडले तर अजून कोणीही लिहिण्याचा प्रयत्न केला नाहीं. ही वाण अंशतः ताराबाईच्या चरित्र लेखनानें भरून काढली गेली असली तरी बाकीच्या स्त्रियांची चरित्रेंही अवश्य प्रकाशित व्हावयास पाहिजेत अशीच सच्चा इतिहास भक्ताची इच्छा असणार ! ' सत्यसंकल्पाचा दाता पांडुरंग ' म्हणून आपण तूर्त स्वस्थ बसूं !

मोंगल मर्दिनी ताराबाई ह्या पुस्तकाचें बाह्यांगही सुंदर साधलें आहे. मुखपृष्ठावर घोड्यावर स्वार झालेली ' ताराऊ ' पाहून प्रथम दर्शनींच मन मोहित व आकर्षित होतें. पुष्कळांना ही गोष्ट माहित नसेल कीं, ताराबाई ही पहिल्या प्रतीची घोडेस्वार होती. ती एका टप्प्यानें पन्हाळा ते सातारा किंवा सातारा ते पन्हाळा अशी घोडदौड करीत असे. ह्या दृष्टीनें मुखपृष्ठावरील अश्वारूढ चित्र योग्य व उचित असेंच आहे. व ते तिच्या चरित्राला साजून दिसतें. श्री शाहूमहाराज मोंगलांच्या कैदेंतून सुटल्यावर महाराष्ट्रांत दोन विचारांचे प्रवाह सुरू होऊन कोल्हापूर कीं सातारा अशी यादवी सुरू झाली ही गोष्ट नाकारण्यांत कांहीं हंशील नाहीं. (१) श्री शिवाजी महाराजांच्या वडील मुलाचा मुलगा शाहू ह्याचा गादीवर हक्क मानणारा एक पक्ष (२) व ज्याअर्थी संभाजी महाराजांनीं मराठ्यांची गादी आपल्या दुर्वर्तनानें किंवा कमनशीबानें घालविली व ती गादी रायगड पडल्यावर बुडाली असतां पुनः नवी गादी पन्हाळ्यावर राजाराम महाराजांनीं समग्र मराठे मंडळींच्या जोरावर प्रस्थापित केली त्याअर्थीं राजाराम व ताराबाई ह्याच्याच वंशाकडे तिचा वाटा व वारसा येतो असें प्रतिपादन करणारा दुसरा पक्ष. पहिल्या पक्षाला धनाजी जाधव सेनापती व बाळाजी विश्वनाथ पेशवे होते तर दुसऱ्या पक्षास दमाजी थोरात, कान्होजी आंग्रे, उदाजी चव्हाण,

अमात्य व प्रतिनिधी आणि इतर अनेक ब्राम्हण व मराठे सरदार होते. ह्या दुहीमुळेंच सातारा व कोल्हापूर अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. वरील दोनीही पक्षाच्या म्हणण्यांत सत्याचा अंश बराच होता. शाहू हा मोंगलांचा उघड मांडलिक म्हणूनच स्वत:ला समजून घेत असे तर त्याचे उलट ताराबाई ही स्वतंत्र स्वराज्याची अधिकारीण म्हणून श्री-शिवाजी महाराजांची प्रथा व परंपरा चालवीत असे. याद्दष्टीनें तिच्या पक्षास नैतिक व मराठी राजनीतीच्या आणि परंपरेच्या दृष्टींनें जास्त आधार होता. अशी खरी परिस्थिती असल्यानें ताराबाईनें शाहूला विरोध केला ह्या एवढ्याच कारणावरूनही तिला कोणीही विचारी व समंजस इतिहासकार दोष देणार नाहीं. हीच विचारसरणी ह्या पुस्तकांत साधार व सोपपत्तिक रीतीनें मांडली आहे. हें या पुस्तकाचे वैशिष्ठ्य व विशेष आहे. ताराबाई फारच कर्तृत्ववान, करारी, कडवी व कारभार करण्यास लायक अशी होती म्हणूनच तिनें अवरंगजेबाला खडे चारले. शाहूला प्रभावी व परिणामकारक विरोध करून कोल्हापूरची गादी स्वतंत्र ठेविली. पेशव्यांना अनेक वेळां गोत्यांत आणून शेवटीं कोल्हापूर व सातारा एक होऊं न देतां स्वतः पेशव्यांचा कोल्हापूर छत्रपती संभाजी ह्याचेकडे ओढा असतांनासुद्धां साताऱ्याच्या गादीवर शाहूनंतर आपला नातू रामराजा आणण्यास त्यास भाग पाडलें. तिला आद्य छत्रपतीची परंपरा चांगली माहीत होती, व यदाकदाचित् पेशव्यांचा तिला विरोध नसता तर मराठी साम्राज्य निराळ्या घाटाचें तिनें बनविलें असतें. सन १७६१ मध्यें पेशव्यांचा पानिपतावर झालेला मोड पाहून आणि नाना-साहेबाला पुत्रशोकाचे व सत्तानाशाचे चटके बसलेले पाहून ताराबाई सुखानें वारली अशी तिच्याविषयीं एक आख्यायिका आहे. तिच्यांत पुष्कळच अर्थ भरलेला आहे. व तो अर्थ कळावयाला चांगलीच मदत होते म्हणून मुळांत समग्र पुस्तक वाचावें अशी विनंती आहे.

माझ्या अल्पमतीनें ताराबाईंचे चरित्राचें सार म्हणजे तिनें पेशव्यापासून मराठी सत्तेचें संरक्षण केलें. ताराबाईसारखी कर्तबगार स्त्री झाली नसती तर मराठी साम्राज्याऐवजीं किंवा हिंदुपदपादशाहीऐवजीं ब्राम्हणपदशाही किंवा भट्ट पेशवेशाही महाराष्ट्रांत स्थापन झाली असती. प्रसिद्ध इतिहास संशोधक राजवाडे ह्यांचीही विचारसरणी अशीच होती. पण ब्राम्हणशाही स्थापन न होण्यास पानिपतचा पराभव हें कारण त्यांच्या मतें. फरक इतकाच.

पुणें ता. १५–१–४७. शं. ब. चव्हाण.

---

# अभिप्राय

## श्री. गोविंद सखाराम सरदेसाई मोबळेगकर,

### कपिलतीर्थ–कोल्हापूर.

बेळगांवीं थोड्या दिवसांपूर्वीं स्थापन झालेल्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशक समितीनें अल्पावकाशांत जीं लहानमोठीं आठ पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत तीं पाहतां मराठ्यांच्या इतिहासाशीं साक्षात् संबंध आलेल्या कित्येक महाराष्ट्रीयव्यक्तींची आजवरच्या कांहीं लेखकांनीं जी अवास्तव बदनामी केली आहे तींतून त्यांची सोडवणूक करण्याचें कार्य या समितीनें प्रामुख्यानें अंगिकारल्याचें दिसतें. पण या कामाला लागण्यांत ज्यांच्या कारवायांमुळें वरील व्यक्तींवर तसला अन्याय करण्यास त्या लेखकांस फावलें त्यांचीं आडपडदा पडलेलीं कारस्थानें थोड्या बहुत उठावदार रीतीनें बाहेर आणण्याचेंहि काम समितीच्या सहाय्यक लेखकांवर प्रसंगान पडल्यानें त्यांना लोकप्रवादास बळी पडण्याची पाळी आली आहे.

" मोंगल मर्दिनी ताराबाई " या प्रस्तुतच्या प्रबंधांतहि तोच प्रकार पुनरावृत्त झाला आहे. ताराबाईवरील आक्षेप दूर करण्यांत नानासाहेब पेशव्यांचा खरपूस समाचार घेणें लेखिकेस भाग पडलें आहे. समितीच्या पहिल्या ग्रंथांत " नाना फडणवीस " यांजवर उडविलेल्या भडीमारानें त्या पुस्तकाच्या केवळ कर्त्यावरच नव्हे तर त्या पुस्तकावर " साधासुधा अभिप्राय देणाऱ्यावरहि " नानांच्या अभिमानी टीकाकारांकडून जी वावटळीची धुळवड उडविली गेली ती पाहून प्रबंधाच्या लेखिकेस पंतप्रधान नानासाहेबांवर हल्ला चढवितांना सावधगिरीचा काळजीपूर्वक अवलंब करावा लागला आहे असें स्पष्ट दिसतें. तसें नसतें तर पूर्वीच्या लेखकांनीं ताराबाईवर केलेल्या हरएक आरोपांतून त्यांची निखालास सुटका करण्यासाठीं नानासाहेबांचें यच्चयावत् कारस्थान इतकें उघडें नागडें करून दाखविण्याची पाळी प्रस्तुत प्रबंधाच्या लेखिकेवर बहुधा आली नसती.

ताराबाईचा साक्षात् संबंध नाहीं असा या प्रबंधांतील पार्श्वभूमीचा भाग निष्कारण फुगला आहे. यांतील मजकूर मराठी वाचकांच्या पूर्ण परिचयाचा असल्यानें त्याचा भरपूर संक्षेप केला असता तर कांहीं एक बिघडलें नसतें. तसेंच ५ व्या प्रकरणापासून ७ व्या प्रकरणाअखेरहि संक्षेपच हवा होता. त्यांत जवळ जवळ पुस्तकाचीं १०० पानें वांचलीं असतीं व वाचन कंटाळवाणें झालें नसतें, त्यापुढील सर्व प्रकरणें नमुनेदार झालीं आहेत. १३ व्या प्रकरणांत सर्व पुस्तकाचें सारच आलें आहे. ताराबाईवरील यच्चयावत् आक्षेपांचें निरसन समाधानकारक वठलें आहे. इतिहासाचार्य राजवाडे व रा. ब. रियासतकार यांच्या कांहीं मतांचें खंडण तर्कशुद्ध व मार्मिक आहे असें आज तरी वाटतें. इतिहासाचे नामांकित शिक्षक म्हणून कोल्हापुरास प्रसिद्ध असलेले श्रीयुत श्रीनिवास

गुरुराव देशपांडे यांनीं या पुस्तकास जोडण्याकरितां जी प्रस्तावना लिहिली आहे ती त्यांनीं मला दाखविली; ती मला बहुतांशीं पसंत आहे.

एकंदरींत हें पुस्तक सुंदर वठलें आहे. तथापि मुद्रितें तपासण्याचें काम हलगर्जीपणाचें झालें आहे. मराठा जातींतील विशेष सुशिक्षित नसलेल्या एका बाईनें असल्या अवघड व भानगडींनीं भरलेल्या कठीण विषयावर इतक्या परिश्रमानें आणि विषयाशीं तादात्म्य पावून हें पुस्तक लिहिलें याचें फार कौतुक वाटतें !

" अनुपुराण " नांवानें शिवभारत लिहिणाऱ्या परमानंद कवींद्राचे द्वितीय पुत्र पं. देवदत्त हे कोल्हापूरच्या संभाजी महाराजांजवळ त्यांचे आश्रित होते. ताराबाईचे ते समकालीन होते. त्यांनीं त्यांचे विषयीं लिहिलेल्या कांहीं काव्यपंक्ति येथें उतरणें योग्य दिसतें.

"दिल्ली झाली दीनवाणी। दिल्लीशाचें गेलें पाणी। ताराबाई रामराणी ; भद्रकाली कोपली ॥ जाणा तुम्हीं आजि साची। आज्ञा झाली शंकराची सर्व सेना दिल्लीशाची। अंतकास वोपली ॥ उमराव दस्त झाले। देवद्विजां बकसिलें। दिगंतीं कीर्ति चाले। यशें जगें मंडिलीं ॥ फिटे हिंदूंची शिराणी। सुरद्विजांची महाराणी। जयवंत रामराणी। पहा मही मंडलीं ॥ "

समकालीन कवीनें या प्रकारें वर्णिलेल्या ताराबाईस " मोंगल मर्दिनी " म्हणून वाखाणण्यांतहि लेखिकेचें चातुर्यच दिसून येतें.

कोल्हापूर ता. २१।१।१९४७<br>मिति पौष कृ. ६, १८६८

गो. स. सरदेसाई.

# अभिप्राय ६.

## समालोचकः— प्रबोधनकार ठाकरे.

मऱ्हाठी इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांत एका विदुषीचा प्रथम-प्रवेश, हा या ग्रंथाचा विशेष आहे. गेल्या पंचवीस तीस वर्षांत मऱ्हाठी स्त्रीवर्ग साहित्याच्या प्रांगणांत कौतुकास्पद हिरीरीनें चमकूं लागला आहे खरा, पण इतिहासासारख्या वादाळ नि किचकट विषयावर चिकित्सापूर्ण भाष्य करण्याचें धैर्य एका विदुषीनें दाखवावें, हा मऱ्हाठी साहित्याच्या इतिहासांतला अथवा इतिहासाच्या साहित्यांतला उत्तेजक मुकाबला होय. वैद्यालंकृति सौ. रंगुबाई जाधव या आयुर्वेद-पारंगत, दानशूर, रसिक नि निस्वार्थी समाजसेविका, एवढेंच आजवर ऐकत आलों. पण इतिहासासारख्या गहन विषयावर साडेचारशें पानांचा एक विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिण्याइतक्या त्या 'पंडिता' आहेत, हें आज नव्यानेंच सिद्ध होत आहे. स्वावलंबन नि स्वयंनिर्णयाची हिंदवी महिलावर्गांत सध्या मोठी खळबळ चालू आहे. अशा उषःकालीं आमच्या इतिहासांतल्या कर्तबगार परंतु उपेक्षित नि अवमानित महिलारत्नांविषयीं एका विदुषीनेंच सत्य शोधनासाठीं धिटाईनें पुढें व्हावें, हा स्त्रियांच्या चळवळीला शुभशकूनच म्हटला तरी चालेल. जो तो आपल्या स्वभावानुरूप नि अभिरुचीप्रमाणें विषयाची निवड करतो. संभाजीच्या वधानें बहुतेक ठार झालेलें मऱ्हाठी स्वराज्य, अनंत हालअपेष्टांची संजीवनी मात्रा देऊन राजाराम छत्रपतीनें पुनरुज्जीवित केलें. सगळीच घडी नवीन बसविली. रायगडावरला श्रीशिवाजी महाराजांचा भगवा झेंडा सातारला फडकूं लागला, तरीहि दख्खनचा घास गिळायला ठाण मांडून बसलेल्या औरंगझीबाची मऱ्हाठ्यांवरची मोहीम थंड पडली नव्हती. तशांत सन १७०० सालीं राजाराम एकाकीं कालवश

होतांच, त्याच्या अवघ्या २५ वर्षें वयाच्या तरूण विधवा महाराणीनें-ताराबाईनें लवमात्र धीर खचूं न देतां, आपल्या १० वर्षांच्या शिवाजी पुत्राला गादीवर बसविलें, राजमंडळाची ठाकठीक मांडणी केली, आणि तब्बल सातवर्षें त्या कर्दनकाळ औरंगझीबाच्या प्रत्येक शहाला काटशह देऊन अखेर त्याला ' मरणालाहि महाग ' केलें. रोमांच थरारून सोडणारा मोंगल मर्दिनी ताराबाई सम्राज्ञीच्या पराक्रमाचा हा इतिहास लेखिकेच्या चित्ताकर्षणाचा विषय व्हावा, या योगायोगांत लेखिकेच्या स्वभावधर्माचा मसाला पुरेपूर दिसून येतो, अशी मी अटकळ केल्यास ती फारशी चूक ठरणार नाहीं.

मऱ्हाठी इतिहासांतल्या अनेक वीर वीरांगनांविषयीं महाराष्ट्रांत बरेच वाईट ग्रह रूढ झालेले आहेत. हजारों जुनीं कागदपत्रें उजेडांत येऊन त्या रूढ आक्षेपांचा फोलपटपणा सिद्ध झाला तरीहि ते ग्रह लोकमतांत कायमचे घर करून बसले आहेत ते आहेतच. ते तसेच कायम रहावे अशी खटपट करणारा शहाण्यांचा एक वर्ग नि त्याचा संप्रदायच महाराष्ट्रांत आहे. नारायणराव पेशव्याच्या खुनाशीं राघोबादादाचा अथवा आनंदीबाईचा कांहींहि संबंध नाहीं, अथवा त्यांनीं खून करविलाहि नाहीं, हें अस्सल पुराव्यांनीं हुडसून खडसून सिद्ध झालें असतांहि,

" अपघात करुनि मारिला सख्या पुतण्यालाजा "

या खोडसाळ पोवाड्याची शाहिरी गातांना, इतकेंच नव्हे तर ग्रामोफोन रेकार्डवर ती चिरंजीव करून ठेवतांना, खाडीलकरासारख्या एमे बीटी इतिहास पंडिताला शरमेचा चिमटा बसत नाहीं ( पोवाड्यांच्या कार्यक्रमाबरोबरच, शाळेंत मास्तरकी करतांना, शालोपयोगी इतिहासाचीं पुस्तकें लिहून विकण्याचा श्री. खाडीलकरांचा धंदा आहे. म्हणून त्यांना इतिहासपंडित म्हणायला कांहीं हरकत नाहीं. ) आणि तें खुनाचें प्रकरण

रामशास्त्री बोलपटानें तमाम हिंदुस्थानांत डंका वाजवून जाहीर करायला प्रभात फिल्म कंपनीला लज्जा वाटत नाहीं! पेशवेकालीन रामशास्त्रीबुवाचा न्यायीपणा नि निस्पृहता सिद्ध करण्यासाठीं राघोबा नि आनंदीबाई यांची प्रभातनें विटंबना तर केलीच केली, पण 'अंकल टॉम्स केबिन्स' पुस्तकांत वर्णिलेली अमेरिकन गुलामांच्या बाजाराचीहि प्रथा पेशव्यांच्या वेळीं पुण्यांत होती, असला खोडसाळ बोलपटी प्रचार करून, या शहाण्यांनीं महाराष्ट्राची अक्षम्य बदनामी केली आहे. प्रभातचा रामशास्त्री बोलपट म्हणजे महाराष्ट्राच्या स्वाभिमानशून्यतेचें जिवंत हालतें बोलतें स्मारकच नव्हे काय? जगांतल्या कोणत्याहि स्वाभिमानी राष्ट्रानें असली बदनामी एक क्षणसुद्धां सहन केली नसती!

मऱ्हाठ्यांच्या इतिहासाची साधन-सामुग्री आतां मुबलक उपलब्ध झाली आहे. आणि नित्य नवनवी प्रकाशांत येत आहे. हातीं लागणाऱ्या हरएक चिठोऱ्याचा काळ, हेतू नि अर्थ विद्वान् चिकित्सक ठरवीत आहेत. ५० वर्षांपूर्वी कित्येक ऐतिहासिक घटनांबद्दल संशोधकांनीं रूढ केलेले अथवा पूर्वींपासूनच रूढ झालेले सिद्धांत आज सपशेल ढासळून पडले आहेत नि नित्य पडत आहेत. पेशवा दप्तराच्या भरपूर संशोधनाचें अंजन लाभल्यामुळें, रियासतकार 'इतिहास-महर्षि' रावसाहेब सरदेसाई यांनाहि आपलीं अनेक जुनीं मतें नि सिद्धांत बदलावे लागले. शिवाजी गुढगी रोगानें मरण पावला, का सोयराबाईनें विषप्रळय करून ठार मारला? असले मुद्दे संशोधकांच्या हातीं लागणाऱ्या नवनव्या कागदपत्रांनींच सिद्ध होत आहेत. शिवाय राजकारणांत जसे नेहमीं कांहीं ठरावीक मतप्रणालींचे हट्टवादी पंथ-पक्ष असतात, तसे इतिहासांतल्या व्यक्ती, त्यांचीं कार्यें नि चरित्रें, त्यांचा राजकारणावर होणारा परिणाम बरावाईट मानणारेहि पंथपक्ष नि जाती असतात. संभाजीच्या चरित्राकडे किंबहुना

सगळया छत्रपतींच्या मालिकेकडे पहाण्याचा बामणांचा नि बामणेतरांचा दृष्टीकोण परस्पर विरुद्ध आहे. भटांबामणांना नाना फडणीस देवबाप्पा वाटतो, तर त्याचें नांव काढतांच बामणेतर जोड्याला हात घालतात. दृष्टीकोण भिन्न असले, तरी इतिहासाकडे पहाण्याचा दोघांचा जिव्हाळा नि आत्मियता प्रामाणिकच असते. बामण म्हटला का तो पेशव्यांच्या हरएक कर्माबद्दल हमखास कट्टर अभिमान बाळगून त्यांच्या उघड दुष्कर्मालाहि सत्कमर्माचें रोगण चढवायला मागेंपुढें पहायचा नाहीं. तशांत तो बामण पुण्याचा असला, तर मग त्याच्या हट्टवादाला सीमाच नसते! छत्रपति नि त्यांच्या परिवारांतले बामण मुत्सद्दी नि कारभारी तेवढे अस्सल निस्वार्थी राष्ट्रसेवक! असल्या खुळचट हट्टवादाच्या भरीं पडल्यामुळेंच, विश्वनाथपंत राजवाड्यांसारख्या महान् संशोधकाची तपश्चर्या अखेर कलंकित झाली. महत्प्रयासानें इतिहासाचीं साधनें मिळवून तीं मुद्रांकित करण्यांत त्यांनीं जे अविस्मरणीय नि अजरामर श्रेय कमावलें, तें त्या सामुग्रीवरून एककल्ली नि हट्टवादी सिद्धांत ठरवतांना त्यांनीं सफाई गमावलें. राजवाड्यांचा हा संप्रदाय अजूनहि जिवंत आहे आणि त्याला ठरावीक जुने ऐतिहासीक सिद्धांत सप्रमाण पुराव्यांनिशींहि बदललेले खपत नाहींत. त्यांनीं किंवा त्यांच्या परात्पर गुरूंनीं एकदां जे अर्थ लावले, तें सनातन सत्य. त्यांत आदलाबदल करण्याचा आधिकार कोणालाहि नाहीं, अशी त्या शहाण्यांची पुणेरी समजूत. एवढेंच काय, पण मऱ्हाठी इतिहासाचें संशोधन करून त्यावर सनातन सिद्धांत काढणारे आम्हींच काय ते एकटे अधिकारी सिद्धांतशिरोमणी, इतरांना तो अधिकारच नाहीं, अशा घमेंडीनें तें इतर संशोधकांवर नि त्यांच्या सिद्धांतांवर पिसाळलेल्या कुतऱ्यासारखे तुटून पडतात. अहंतेनें माथीं भडकलेल्या या भडक्यांच्या तंगडझाडणीला प्रत्युतराची काढणी लावण्याच्या उपद्यापांत सध्या तरी कांहीं अर्थच उरलेला नाहीं. या माथेफिरू शहाण्यांना तसेच कोकलत

ठेवून, इतिहासांतल्या सत्यशोधनाचें कार्य विवेकानें पण न्यायनिष्ठुरतेनें पुढें चालूच ठेवणें प्राप्त आहे.

'हा विवेक स्पष्ट नजरेसमोर ठेवूनच, बेळगांवच्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीनें **मोंगल मर्दिनी ताराबाई** हा विस्तृत चिकित्सेचा ग्रंथ प्रकाशांत आणलेला आहे. मऱ्हाठ्यांच्या इतिहासांत ज्या अनेक राजकार्य-धुरंधर, पराक्रमी नि तेखदार स्त्रिया चमकून गेल्या, त्यांत रामराणी ताराबाईचा नंबर बराच वर लागण्यासारखा असूनहि, तिच्या कर्तबगारीचा नि कारभाराचा इतिहासांत फक्त त्रोटक संदर्भानेंच उल्लेख केलेला आढळतो. राजारामाचा मृत्यू होतांच, मऱ्हाठशाही आतां खतम् झाली, अशा भावनेनें लष्कराला बक्षिसें नि मेवामिठाई वाटून आपल्या छावणींत महोत्सव साजरा करणाऱ्या औरंगझीबाला सात वर्षांत धुळीला मिळवणारी, अष्टप्रधानांच्या नेमणुका करून, फौजेला स्वराज्यवर्धनाची स्फूर्ति देऊन त्यांच्याकडून कल्पनातीत शौर्याचीं कामें करून घेणारी, स्वता जातीनें निरनिराळ्या किल्ल्यांवर फिरती राहून तेथला बंदोबस्त करणारी, आणि शाहू स्वदेशीं परत आल्यावर खुद्द त्याला नि पेशव्यांसारख्या ऊर्ध्वबुद्धि मुत्सद्यांनाहि आपल्या दीर्घधोरणी डिप्लोमसीनें चारीमुंडे चीत करणारी ताराबाई, आणि तिचे मऱ्हाठी इतिहासांत संदर्भाचे नुसते तुटके उल्लेख ? हें शल्य अखेर एका बुद्धिवंत स्त्रीहृदयाला बोचलें आणि या पुस्तकाची निर्मिती झाली, हा सन १९४७ सालच्या ऐतिहासिक साहित्यांतला मनोरंजक मुकाबलाच म्हटलें तरी चालेल.

या पुस्तकाचें नांव जरी 'मोंगल मर्दिनी ताराबाई' असें असलें, तरी यांत स्वराज्य संस्थापक श्री शिवाजी महाराजांपासून तों थेट सहावा छत्रपति रामराजा आणि तिसर पेशवे नानासाहेब यांच्या कारकीर्दीपर्यंतचा तपशीलवार इतिहास दिलेला आहे. म्हणजे या एकाच पुस्तकाच्या वाचनानें

एवढ्या मुदतीचा इतिहास वाचकांना एकाच पुस्तकांत मुद्देसूद मिळण्याची सोय झालेली आहे. यांत उपलब्ध शेकडों कागद् पत्रांचा पुरस्कार तर आहेच, पण तत्कालिन मराठ्यांच्या राजकरणांत ज्या अनंत उलटापालटी आंदोलनें आणि आदलाबदल झाले, त्यांची मुद्देसूद नि विस्तृत चर्चा करण्यांत लेखिकेचें चिकित्साचातुर्य वाखाणण्यासारखें दिसून येतें. मऱ्हाठ्यांच्या धडाडीच्या राजकारणाला खरा रंग चढला वास्तविक संभाजीच्या अटकेनंतर. राजारामाची धावपळीची वनवासी अमदानी म्हणजे मऱ्हाठ्यांच्या उज्वल स्वदेशाभिमानाचा आणि स्वराज्याभिमानाचा सोनेरी कळसच होय. या प्रसंगींच अनेक मुत्सद्यांची नि वीरांची स्वराज्यनिष्ठा कसाला लागली. संभाजीला पकडून ठार केला तरी मऱ्हाठे नि त्यांचे स्वराज्य ठार मारतां येणें शक्य नाहीं, या जाणिवेचा पहिला जबरदस्त धक्का जिंजीच्या कारस्थानानेंच औरंगझीबाला दिला. राजारामाचा मृत्यू होतांच, प्रधान मंडळानें धनाजी जाधवाच्या सहाय्यानें राजारामाचा दासीपुत्र राजा कर्ण यास छत्रपति म्हणून गादीवर बसवलें. राजा कर्ण वयांत आलेला सुबुद्ध नि चाणाक्ष मुत्सद्दी होता. जिंजीचा वेढा फोडण्यासाठीं जीं अनेक राजकारणें नि कारस्थानें झालीं. तीं खेळविण्यांत खंडो बल्लाळाच्या बरोबरीनें राजा कर्णानें खस्ता खाल्लेल्या होत्या. पण बिचारा अवघ्या तीनच आठवड्यांत देवीच्या आजारानें मरण पावला. (छत्रपति भोंसल्यांच्या घराण्यांत देवीच्या आजाराचा उपसर्ग होतासें दिसतें.) लगेच ताराबाईनें आपला अल्पवयी पुत्र शिवाजी गादीवर बसवून, स्वराज्याचीं सर्व सूत्रें हातांत घेऊन औरंगझीबाच्या पिसाटासारख्या वाढत्या आक्रमणाला तोंड देण्याची कामगिरी जातीनें पत्करली. तिनें आद्य छत्रपति शिवरायापासूनच्या स्वराज्योपराक्रमाच्या उलाढाली स्वता पाहिलेल्या असल्यामुळें, नवऱ्याच्या अकालीं मृत्यूनें लवमात्र न डगमगतां मोंगल बादशहाला दक्खनपार पिटाळण्याचें बिकटकार्य तिनें स्वता हातीं घेतलें.

प्रत्यक्ष औरंगझीबाशीं चार वर्षं समोरासमोर मऱ्हाठी फौजांचा नि किल्ल्यांचा शिस्तबाज मुकाबला दिला. भोसले घराण्याचा पराक्रम आणि दरारा जोरदार प्रस्थापित केला, लोकसंग्रहात फितुरीचा रिघाव होऊं दिला नाहीं, हातचा जाणारा एकेक किल्ला हिकमतीनें लगेच परत जिंकून 'मऱ्हाठे म्हणजे जिवंत भुताटकी' हें बादशहाला पटवून दिलें आणि अखेर ज्या दक्खनचें पाकिस्तान बनवायला औरंगझीब हयातभर धडपडला, तेथेंच, "राजारामाची बायको नवऱ्यापेक्षां ज्यास्तच कजाख" हा अभिप्राय देत देत, त्याला आपलें कबरस्थान शोधावें लागलें. "ऐके ठायीं बैसोन राहिला, त्याचा व्याप बुडाला." या रामदासी दंडकानुसार ताराबाई घोड्यावर स्वार होऊन, ठिकठिकाणच्या किल्ल्यांवर अखंड संचार करीत आपल्या युद्धाचीं धोरणें ठरवीत असे. स्वता मालकीणच मर्दांचे श्रमसाहास करीत असलेली पाहून, तिच्या फौजांना नि सेनापतींना तिच्या विषयीं विलक्षण आदर वाटायचा. जातीनें किल्ल्यांमागून किल्ले लढवून ते परत जिंकण्यांत, प्रधान मंडळ सेनापति नी फौजा एकजूट राखण्यांत आणि आपला लोकसंग्रह फितुरीपासून निर्लेप ठेवण्यांत ताराबाईनें मिळविलेल्या यशाला मराठ्यांच्या इतिहासांत दुसरी जोड नाहीं. शिवछत्रपति मृत्यू पावतांच "शैतान जहान्नममें गया," हे उद्गार काढणारा खाफीखान ताराबाईच्या चातुर्याची भरपूर वाखाणणी करून म्हणतो कीं, तिच्या कारभारानें बादशहापुढें अडचणीचे डोंगर उभे राहिले आणि मऱ्हाठ्यांचे उपद्व्याप भरसाट भरारले. तत्कालीन ऐक कवि कवींद्र गोविंद यांचे एक स्फुटिक काव्य रियासतकारांनीं "स्थिरबुद्धी राजाराम" पुस्तकाच्या १२२ पानावर छापलें आहे. तो ताराबाईविषयीं म्हणतो:—

तुळजा प्रसन्न झाली। पातशाही हातीं आली। जयलक्ष्मी माळ घाली। शिवाजीस आदरें ॥१॥ दिल्ली झाली दीनवाणी। दिल्लीशाचें गेलें पाणी। ताराबाई रामराणी। भद्रकाली कोपली ॥२॥ जाणा तुम्ही आजि साची।

आज्ञा आली शंकराची । सर्व सेना दिल्लीशाची । अंतकास वोपली ॥३॥
मानहानी दिल्लींद्राची । सभा हांसते इंद्राची । आजि काल कवींद्राची । सर्व चिंता हारली ॥४॥ रामराणी भद्रकाली । रणरंगीं क्रुद्ध झाली । प्रलयाची वेळ आली । मुगल हो सांभाळा ॥५॥

इतिहासाच्या अध्ययनांत शेकडो मुकाबल्यांचा, प्रमुख व्यक्तींच्या हालचालींचा नि डावपेचांचा आणि राज्यकारभारावर होणाऱ्या त्यांच्या परिणामांचा विचार करूं लागलें, म्हणजे ‘ असें असतें तर बरें झालें असतें ! ’ अशी वायफळ अपेक्षा करण्याकडे मनाचा काल झुकतो. पण जें कांहीं घडलें गेलें, त्याची आतां हळहळ करण्यापेक्षां, ते तसें कां घडलें याची चिकित्सा करून, त्या त्या मुकाबल्यांचे, पात्रांचे नि परिणामांचे वाजवी अर्थ ठरविण्यांतच खरें संशोधन कार्य असतें. ‘ पुढच्याला ठेंच, मागचा शहाणा. ’ या म्हणीप्रमाणें, पूर्वींच्या जबाबदार राजांच्या, प्रधानांच्या नि मुत्सद्यांच्या कोणत्या प्रसंगीं काय काय चुका झाल्या, निस्वार्थिपणासाठीं आत्मयज्ञ कोणी केले आणि स्वार्थासाठीं कोणी कोणाचें कसें वाटोळें केलें, याचें स्पष्ट चित्र रेखाटून आपण शहाणपणा शिकायचा नि पुढच्या पिढ्यांना तो बोध मुद्रित करून ठेवायचा, एवढेंच इतिहास संशोधकांना करायचें असतें.

औरंगझीबाची कारकीर्द खतम् झाल्यानंतर, मोंगल बादशाहीचा मांडलीक नात्यानें, शाहू बंधमुक्त होऊन दक्षिणेंत येईपर्यंत, ताराबाईनें मऱ्हाठी स्वराज्याची ठाकठीक स्थिरस्थावर केलेली होती. छत्रपतीच्या गादीवर जरी बालराजाच होता, तरी सर्व कारभार ताराबाई कदरबाज मुखत्यारीनें स्वताच पहात असल्यामुळें, कारभाराचीं सर्व खातीं यंत्रासारखीं सुरळीत चाललेलीं होतीं. होतकरू सरदारांना योग्य उत्तेजन

देऊन, त्यांना नर्मदेच्या उत्तेरकडील मोंगलांच्या प्रदेशावर स्वाऱ्या करण्यास पाठविण्याचाहि तिचा उद्योग जोरांत चालू झाला होता.

अशा ऐन मोक्याच्या वेळींच शाहूच्या आगमनानें मऱ्हाठी राजकारणांत वारसदारीच्या तंट्याच्या कलीनें प्रवेश केला. मुत्सद्यांचीं मनें बायचळलीं. शाहू मालक आणि ताराबाईहि मालक ! कोणाचा पुरस्कार करावा ? मऱ्हाठी स्वराज्याचे अधिपति छत्रपति असले, तरी स्वराज्याच्या कमाईत जनतेचा कांहीं हक्क आहे का नाहीं, ही लोकशाहीतत्वाची जाणीव त्या काळच्या लोकांना नव्हती. म्हणूनच वारसदारीचें भूत चालू घटकेपर्यंत आमच्या देशीसंस्थानांत नंगानाच घालतांना दिसत आहे. वारस कितीहि नालायक, छंगीफंगी, व्यसनी असला तरी तो सुखरूप आपल्या मेल्या बापाच्या गादीवर बसतो आणि संस्थानाला खासगी मिळकत समजून, तेथें वाटेल ती घाशीरामी गाजवतो. शिवाजीनें स्थापन केलेलें स्वराज्य संभाजीनें गमावलें, आजचें स्वराज्य राजाराम छत्रपतींनें नवीन कमावलें आहे आणि गेलीं सातवर्षे मोंगल बादशहाचें सपशेल मर्दन करून शक्तियुक्तिच्या जोरावर तें मीं सांभाळलें आहे, शाहूचा येथें कांहीं हक्क नाहीं, असा वाजवी पण कडवा विरोध ताराबाईनें चालू केला. कांहीं मुत्सद्दी इकडे तर कांहीं तिकडे, विचारलें तर म्हणत आम्हीं दोहीकडे, कांहीं सांगत मनानें तिकडे पण देहानें इकडे, अर्थात शाहूपार्टी नि ताराबाई पार्टी अशा चक्क दोन विरोधी फळयाच तयार झाल्या आणि मऱ्हाठ्यांच्या एकजीव संघटनेचे या वारसदारीच्या पहिल्या झुळकींतच तीनतेरा झाले. बाहेरचें राजकारण संपून, घरांतल्या घरगुति भांडणानें राजकलहाचा प्रवाह स्वराज्यांत वाहूं लागला. शाहूनें सातारा घेतला आणि ताराबाईनें पन्हाळगडावर आपली राजधानी केली.

प्रस्तुत ग्रंथांत येथपासूनच्या राजकारणी शतमुखीं भानगडींच्या चिकित्सापूर्ण चर्चेला खरा रंग चढलेला आहे आणि विवेचन कौशल्यांत

लेखिकेची लेखणी आतिमयत्वाच्या तेखानें सणाणली आहे. सत्यशोधनासाठीं अगत्यमेव लागणारी न्यायनिष्ठुरता येथपासून नागिणीसारखी फोंफावताना दिसते. खरें पाहिलें तर राजारामानंतरचे एकजात छत्रपति नादान निपजले. राजाराम पुत्र शिवाजी शेंबडा असतानांच गादीवर बसवला गेला, तरी राज्यकारभाराची धुरा ताराबाईच्या हातीं असल्यामुळें, तिनें सात वर्षांत स्वराज्याचें संगोपन नि संवर्धन उत्तमच केलें. शाहू आला तो स्वत:ला विष्णूचा अवतार समजून, पायांत सोन्याचे तोडे घालून मिरवूं लागला. परमुलखांतल्या स्वाऱ्या बंद पडल्या, आणि शाहू-ताराबाई पार्ट्यांत चकमकी झडूं लागल्या, सेनापतीच्या आज्ञांना सरदार धाब्यावर बसवूं लागले. शिपायी सरदारांना जुमानीनातसे झाले. राजाचा प्रधानांवरहि विश्वास राहिला नाहीं. आज या बाजूला तर उद्यां त्या बाजूला, अशी सरदारांची नि सेनापतींची सुद्धां खांदेपालट चालू झाली. स्वराज्यांतला मुलूखच खराब होऊं लागला. अखेर शाहूनें ताराबाईपुढें हात टेंकले आणि तिला स्वराज्याची हद्द तोडून दिली. हीच कोल्हापूरच्या संस्थानाची स्थापना.

शाहूचे पाय साताऱ्याला लागण्यांत बाळाजी विश्वनाथाचे श्रम-साहस बरेच कारण झालेले आहेत. अर्थात शाहूच्या हयातींत पेशव्यांना महत्पद प्राप्त झालें, यांत कांहीं नवल नाहीं. बाळाजी विश्वनाथ आणि त्याचा खरा मर्द मऱ्हाठा पुत्र थोरला बाजीराव यांच्या मुत्सद्दागिरीनें आणि मुलुखगिऱ्यांच्या पराक्रमानें मऱ्हाठ्यांचा दरारा तमाम हिंदुस्थानांत धौशा गाजवूं लागला नि त्यानें दिल्लीची पातशाहीहि आपल्या टांचेखालीं आणली होती. शाहूच्या कारकीर्दीतला एवढाच भाग अभिमान बाळगण्या-सारखा घडला.

सातारा नि कोल्हापूर या स्वराज्याच्या दोन फळ्यांतला तंटा बाळाजी विश्वनाथानें मोठ्या मुत्सद्देगिरीनें मिटवला होता. ताराबाईचा

शिवाजी वेडसर निघाला. तेव्हां तिनें त्याला गादीवरून काढून आपल्या सवतीच्या मुलाला-राजसबाईच्या संभाजीला गादीवर बसविण्याचा बाळाजीनें सल्ला दिला नि तो स्वराज्याच्या इष्ट भवितव्याकडे तीक्ष्ण नजर देऊन ताराबाईनें पत्करला. संभाजीशींहि बाळाजी विश्वनाथानें एक गुप्त करार केला कीं शाहूनंतर आम्हीं सातारा नि कोल्हापूर एकत्र करू. यानंतर ताराबाई तीन तपें अज्ञातवासांतच राहिली.

मऱ्हाठ्यांच्या राजकारणाला स्वार्थी, कपटी नि कारस्थानी असें द्वाड वळण लावलें तिसऱ्या नानासाहेब पेशव्यानें. छत्रपतीला बगलेंत मारून, सारी सत्ता पुण्यास आपल्या लगामीं ठेवण्याचें कर्म याच पेशव्यानें केलें. बामण बामणेतर, किंबहुना चित्पावन चित्पावनेतर भेदाचें वीष पहिल्या प्रथम यानेंच महाराष्ट्रांत फैलावलें.. ( 'चित्तपावन' हा विसाव्या शतकांतला राजवाडी नवा शोध आहे. चित्पावनांचें चित्तपावन झाल्याचा दाखला मात्र अजून उपलब्ध नाहीं. ) सातारा नि कोल्हापूर दोनीहि राजगाद्या सफाचाट उलथून, त्यां ऐवजीं पुण्याची एकमेव चित्पावन मुखी ब्राह्मणपद्‌पातशाही भक्कम पायावर थापण्याची नानासाहेबाला मोठी महत्वाकांक्षा आणि त्या दिशेनेंच सातारा कोल्हापूरच्या छत्रपतींशीं तो राजकारणी पाचपेचांचे गुप्त डाव खेळत होता. स्वतः आपण नि राजमंडळ पेशव्यानें पाण्यापेक्षांहि पातळ करून ठेवलें आहे, हें शाहूला दिसत होतें. पण त्याचा कांहीं इलाजच चालेना. साताऱ्च्या किल्ल्यावर नजर कैदेंत असणारी वृद्ध ताराबाई हा छत्रपति नि पेशव्यांत चाललेला उंदीरमांजराचा खेळ जागरूकपणें पहात अभ्यासीत होती.

गादीला वारस कोण करावा, याची शाहूनें आपल्या हयातींत खूप धडपड केली. राणी सकवारबाईनें कोल्हापूरच्या संभाजीची शिफारस केली. पण तोहि म्हातारा नि वांझोटा. तेव्हां ताराबाईनें सांगितलें, “ दुसरें मूल

कां पहातां ? माझे पुत्र शिवाजीराजे यांचा मूल मी गुप्तरूपें ठेविला असोन राज्यास धणी करावा. " कांहींच न ठरतां, शाहू १५ डिसेंबर १७४९ रोजीं मरण पावला. पुन्हा वारसाचें त्रांगडें उभें राहिलें. येडपट खुळचट धनि असल्याशिवाय ब्राम्हणपदपातशाहीची आपली योजना तडीला जाणार नाहीं, हें नानासाहेब पुरें ओळखून होता. सकवारबाईपुढें त्याचें कांहीं चालणार नाहीं. ह्मणून धार्मिक मुद्यावर, तिच्या भावांना बनवून, नानासाहेबानें तिला बळजबरीनें शाहूच्या प्रेतावर जाळली. पेशव्यांचा संभाजीशीं साताऱ्च्या गादीविषयीं करार झालेला असल्यामुळें तो निर्धास्त बसला. रामराजाला पुढें आणून ताराबाईनें छत्रपतिपदाची शर्यत जिंकली. अज्ञातवासांतला एक आडमुठ्या गडी गादीवर येतो आहे, ह्मणून नानासाहेबानें फारसा विरोध न करतां, ताराबाईला पाठबळच दिलें. यावेळीं ताराबाईचें वय ७४ वर्षांचें होतें.

नातू गादीवर बसतांच, ताराबाईनें राज्यकारभाराला जुनें शिवशाही वळण लावून, पेशवाई वर्चस्वामुळें निस्तेज बनलेल्या मराठे नि ब्रामणेतर सरदारांची " राजा व मराठे यांचे राज्य ब्राह्मणांच्या हातचे सोडवावे " या संदेशानें एकजूट बनवण्याचा उद्योग आरंभला. म्हातारी बसेल आपल्या खुळचट नातवाला कुरवाळीत स्वस्थ, ही नानासाहेबाची अटकळ खोटी ठरली आणि पदोपदीं तिचे नि त्याचे खटके उडण्याचा प्रसंग आला. युक्ति प्रयुक्तीनें रामराजाला सांगोलें मुक्कामीं एकटाच गाठून, सदाशिवराव भाऊ नि रामचंद्रबाबा शेणवी यांच्याकडून परस्पर " सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा आणि आह्मास साताऱ्याभोवती थोडकासा मुलूख खासगीकडे असावा " अशी स्वराज्याची फारकत चिठ्ठी नानासाहेबानें लिहून घेतली. ( सन १७५० ). ही गोष्ट ताराबाईला समजतांच, पेशव्याचा नि तिचा उघड कलह चालू झाला. नानासाहेबानें

एक पेंच टाकवा, ताराबाईनें तो सफाईत उधळून नवाच डाव खेळावा, असा प्रकार चालू झाला. रामराजाला तिनें सक्त आपल्या नजरेखालीं ठेवलें. पेशवे ही जोडी फोडण्याची शिकस्त करीत होता. तीन तपें नजर-कैदेचा अज्ञातवास भोगला, वयमानहि पंचाहत्तरीला आलें, तरी राजकारणी बुद्धिबळाच्या पटावर पेशव्यांच्या प्रत्येक हालचालीवर मात करणाऱ्या ताराबाईपुढें नानासाहेब हतबुद्ध झाला. अखेर त्यानें ७ मार्च १७५१ रोजीं एकदम सातारा किल्याला वेढा दिला. सातारा शहराचा नि किल्याचा संबंध तुटला. किल्यावर रोज येणारी रसद बंद झाली. धान्य-गोंठा वस्त्रप्रावरण भाजीपाल्यापासून जनावरांच्या वैरणीपर्यंत व्यवहार बंद पाडले. किल्यावरील फौजेच्या नि नोकरांच्या तनख्याकरतां बाहेरून येणारी पैशाची मदत थांबली. गळचेपी होतांच ताराबाई शरण येऊन रामराजाला पेशव्याच्या हवालीं करतील, ही पेशव्याची अटकळहि ताराबाईनें उधळून लावली. वेढ्यांतूनहि तिनें अनेक मसलती केल्या, छत्रपतीला बंगलेस मारून ताराबाईला मृतप्राय करून ठवण्याचें नानासाहेबाचें कारस्थान तिनें चालूं दिलें नाहीं. ' किल्यावर भुकेनें मरून जाऊं, पण भोसल्याचा वंश दरवेशी-पेशव्याच्या हातातलें आस्वल होऊं देणार नाहीं, ' अशा हिरीरीपुढें नानासाहेब अखेर चीत झाला.

सारांश ४ डिसेंबर १७६१ रोजीं वयाच्या ८६ व्या वर्षी काला-धीन होईपर्यंत ताराबाईनें मऱ्हाठ्यांच्या राजकारणांत शौर्याची नि मुत्सद्दी पणाची कमाल केली. ताराबाई नसती तर शाहूच्या किंवा करवीरकर संभाजीच्या मृत्यूच्या मुहूर्तावर सातारा कोल्हापूर खालसा होऊन पुण्याला ' ब्राम्हणीराज्य केदवार ' स्थापन झालें असतें.

शिवछत्रपतीच्या उदयापासून तों रामराजापर्यंत सरासरी ११६ वर्षांचा मऱ्हाठशाहीचा बारीकसारीक इतिहास, शेकडो मुकाबले, हजारो

कारस्थानें आणि इंद्र धनुष्याप्रमाणें सारखे बदलत जाणारे कारभाराचे नि राजकारणाचे रंग या पुस्तकांत विस्तृत विवेचनानें दाखविले आहेत. आस्ति नास्ति दोनीहि पक्षांचे पुरावे चिकित्सेच्या ऐरणीवर ठेवून हिरे कोण नि गारगोट्या किती याचा स्पष्ट निष्कर्ष काढलेला आहे. ब्रामण ब्रामणेतर वाद अलिकडच्या करवीरकर शाहू महाराजांनीं काढला नसून, त्या वादाचा श्रीगणेशा नानासाहेब पेशव्यानेंच काढला, हें या पुस्तकाच्या वाचनानें अलिकडच्या पिढीला समजून येईल. शेवटच्या ‘ उपसंहार ’ प्रकरणांत राजवाडे यांनीं ताराबाईच्या कर्तबगारीच्या केलेल्या विडंबनाचा मुद्देसूद समाचार घेतला आहे. मऱ्हाठ्यांच्या इतिहासावर नवाच शोधन प्रकाशाचा झोत टाकणारा वै. सौ. रंगूबाई जाधव यांचा हा मोंगल मर्दिनी ताराबाई छत्रपतिचा इतिहास, भारताच्या लढाऊ राजकरणांत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या महिला वर्गाला तर अत्यंत चैतन्योत्पादक नि उत्साह-वर्धक वाटेल.

मुंबई नं. २८<br>
ता. १५ जानेवारी ४७.

केशव सीताराम ठाकरे.

---

# अभिप्राय ७.

**श्री. केशवराव आप्पा पाध्ये,** B. A. LL. B.<br>
ॲडव्होकेट, मुंबई.

श्रीशिवछत्रपतींच्या निधनानंतर थोड्याच वर्षांनीं अवरंगजेब बादशहानें दक्षिणेंतील तीन मुसलमानी राज्यें व नुकतेच उदयोन्मुख झालेलें मराठी राज्य हीं नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधला. हें उद्दिष्ट

साधण्यासाठीं त्यानें स्वतःच्या नेतृत्वाखालीं मोठी फौज दक्षिणेंत उतरावेली. विजापूर व गोवळकोंडें हीं मुसलमानी राज्यें हां हां म्हणतां त्यानें हस्तगत केलीं, परंतु मराठी राज्य घेणें सोपें नव्हतें. इ. स. १६८९ सालीं औरंग-जेबानें संभाजीचा अमानुषपणें वध केला व त्याची बायको व मुलगा ह्यांस कैद केलें. ह्यामुळें सर्व मराठ्यांना दहशत बसून ते शरण येतील व आपले मांडलिक बनतील अशी त्यास आशा वाटत होती. परंतु ती अखेरीस फोल ठरली. अवरंगजेबाच्या फौजेच्या मानानें मराठ्यांपाशीं लढणारे लोक फार कमी होते, परंतु ते स्वदेशाभिमानानें ओथंबलेले असून मराठेशाहीचें रक्षण करणें हें त्यांस प्राणापेक्षां प्रिय वाटत होतें. ह्या पेंच-प्रसंगांतून सुटण्यासाठीं राजाराम महाराज व त्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नि ताराबाई व श्रीशिवछत्रपतींच्या तालमींत तयार झालेले सर्व मराठे सरदार ह्यांनीं आपले प्राण पणास लावून जे आटोकाट प्रयत्न केले त्याचा इतिहास ' मोंगल मर्दिनी ताराबाई ' या ग्रंथांत नमूद केला आहे.

ह्या काळांतील मराठ्यांनीं स्वातंत्र्यासाठीं जी मर्दुमकी गाजविली त्याला कोणत्याहि देशाच्या इतिहासांत तोड मिळणें अशक्य आहे. ह्या ग्रंथाची भाषा प्रौढ असून सुबोध आहे. निरनिराळ्या ऐतिहासिक प्रसंगाची मांडणी व्यवस्थितपणें करण्यांत आली आहे. राजाराम महा-राजांनीं अकरा वर्षें फार हाल अपेष्टा सोसून व अनेक डोंगरी किल्ल्यांचा आश्रय करून मोंगलांच्या सैन्यास टक्कर दिली व त्यांस हैराण केलें. ह्या सर्व हालचालींत ताराबाई यानींहि प्रत्यक्ष भाग घेतला होता, त्यामुळें इ. स. १७०० सालीं राजाराम महाराज दिवंगत झाल्यावर पुढील सात वर्षें मराठीशाहीचें रक्षण करण्याचा सर्व बोजा एकट्या ताराबाईवर पडला. त्यावेळीं तिचें वय फार नव्हतें तथापि श्रीशिवछत्रपतींच्या स्वातंत्र्यप्रियतेचें व स्वधर्मावरील निष्ठेचें ध्येय तिच्या डोळ्यापुढें सारखें होते. तिनें आपल्या

सरदारांच्या मदतीनें मोंगल सैन्या बरोबर टक्कर दिल्यावांचून बसावयाचें नाहीं असें ठरविलें.

ह्या अल्प कालावधींत तिनें जी मुत्सद्देगिरी व साहस दाखविलें त्याचें चित्र ह्या ग्रंथांत उत्कृष्ट रीतीनें रेखाटलेलें आहे. अशा अलौकिक व पराक्रमी मराठी स्त्रीरत्नाचें चरित्र एका अर्वाचीन काळांतील सुशिक्षित स्त्रीनें लिहिण्याचें पत्करून तें उत्तम प्रकारें पार पाडलें हा एक अपूर्व योगायोग होय. एकीकडे पारतंत्र्याच्या पिंजऱ्यांत पादशाही पक्वान्नांवर पोसलेला पराभूत शाहू व दुसरीकडे संपुष्टांत येऊं घातलेल्या मराठेशाहीस नवजीवन देण्याचे कामीं अहर्निश झटणारी साहसी व शौर्यानें झगडणारी ताराबाई अशीं दृश्यें ह्या ग्रंथात पहावयास मिळतात. त्याचें ग्रंथकर्तीनें मार्मिकपणें वर्णन केलें आहे. अवरंगजेबाच्या मरणसमयीं त्याच्या प्रचंड सेनेस ताराबाईनें जेरीस आणलें होतें. अखेरचा प्रयत्न म्हणून मराठ्याना कायमचा शह देण्याच्या उद्देशानें अवरंगजेबानें स्वतःच्या नेतृत्वाखालीं सामना करण्याचें ठरविलें, परंतु त्यापूर्वीच तो मरण पावला. शिवाय त्याच्या वारस मुलांत गादीवर बसण्याचे कामीं कलह उत्पन्न झाला. ह्याचा फायदा मिळूं नये म्हणून त्यांच्यामध्यें दुही माजावी ह्या हेतूनें अवरंगजेबाच्या मुलानें शाहूची सुटका केली व त्यास दक्षिणेंत पाठविलें. दक्षिणेंत आल्या-बरोबर ह्या स्वधर्मपराङ्मुख, स्वाभिमानशून्य शाहूनें अवरंगजेबाच्या थड-ग्याचें दर्शन घेऊन त्याची पूजा केली.

शाहु दक्षिणेंत आल्यावर तो यवनावळलेला आहे असें समजून श्रीछत्रपतीच्या गादीवर बसण्यास अगदीं नालायक आहे अशी ताराबाई व तिजबरोबर सर्व मराठे सरदारांची समजूत होती. तथापि द्रव्यलोभानें कांहीं सरदारांनीं त्याचा पक्ष धरला; परंतु मराठेशाहींतील प्रमुख सरदार ताराबाईच्या पक्षास धरून होते. अटकळीप्रमाणें उभयपक्षांत रणें माजलीं. अशाप्रकारें दुही माजल्यामुळें मराठेशाही संपुष्टांत येण्यास वेळ लागणार

नाहीं असें ब-याच समंजस मराठे सरदारांस वाटलें. बाळाजी विश्वनाथ ह्यानें मध्यस्थी करून शाहु व ताराबाई यांचा समेट घडवून आणला. त्यावेळीं शाहु संबंधींचे आपले सर्व पूर्वग्रह एका बाजूस ठेऊन मराठेशाही टिकावी म्हणून अपूर्व स्वार्थत्याग केला. ह्यावरून तिच्या मनाचा थोरपणा व मुत्सद्देगिरी दिसून आली. इ. स. १७३१ सालीं शाहु व कोल्हापूरकर संभाजी ह्यांचे दरम्यान एक तह झाला. त्यावेळीं ह्या ताराबाईच्या पोक्त सल्लयांचा उभयतांस फायदा मिळाला. ताराबाईनें शाहु बरोबर साताऱ्यास रहाण्याचें ठरविलें. पुढें शाहूला दत्तक घेण्याच्या बाबतींत ताराबाईनें नानासाहेबांना सूचना केल्या होत्या. त्या बाबतींत नानासाहेबांनीं अखेरीस बेइमानी केली. ताराबाई ही आपल्या वयाच्या ८६ व्या वर्षी मरण पावली. इतक्या दीर्घ काळांत मराठेशाहींत ज्या अनेक उलाढाली झाल्या त्याचें चित्र तिच्या डोळ्यांसमोर उभें होतें. जाज्वल्य देशाभिमान, अचाट साहस, अलोट शौर्य, स्वधर्म निष्ठा, मुत्सद्देगिरी, मराठेशाही ठेवण्याचे कामीं तिची उत्सुकता व परिस्थितीप्रमाणें वागण्याची हातोटी वगैरे गुण तिच्या अंगी एकवटलेले होते; असें या ग्रंथावरून दिसून येतें. अशा सर्वगुणसंपन्न स्त्रीचें उदाहरण अर्वाचीन काळांतील भरतखंडाच्या अगर इतर कोणत्याही देशाच्या इतिहासांत विरळा. अशा आदर्शभूत महाराष्ट्रीय वीरवृत्तीच्या स्त्रीचें सांगोपांग, सुसंगत व साधार चरित्र लिहून मराठ्यांच्या इतिहासांत ग्रंथकर्तीनें उत्कृष्ट भर घातली आहे. वादग्रस्त मुद्यांचें विवरण करून, तर्कशुद्ध अनुमान काढणें व ऐतिहासिक सत्यें जगापुढें निर्भीडपणें मांडणें वगैरे खऱ्या इतिहासकारांच्या अंगीं असलेले विशिष्ट गुण ह्या ग्रंथांत जागोजाग आढळतात. हा ग्रंथ महाराष्ट्रांतील स्त्रीपुरुषांनीं वाचून संग्रहीं ठेवावा अशी आमची शिफारस आहे.

ता. २४–१–४७<br>
नवीभटवाडी, गिरगांव-मुंबई.

के. आ. पाध्ये.

# अभिप्राय ८.

## श्री. सदाशिव रंगराव सुंठणकर,

B. A. LL. B. बेळगांव.

' Will not forceis the bas is of a state ' अशी एक इंग्रजी भाषेंत ह्मण आहे. तिचा अर्थ ' जनतेची इच्छाशक्ति–लष्करी शक्ति नव्हे-हीच कोणत्याहि राजयंत्राचा पाया असते ' असा आहे. जनतेच्या इच्छा अगर सद्भावना यांच्यावर राज्यसूत्रचालकांच्या स्वार्थावर कारस्थानांचे घाव बसूं लागले कीं राजयंत्राचा पाया निखळूं लागतो व अखेर तें खिळ-खिळें बनून कोलमडून पडतें. अशा प्रसंगीं त्यागी नि तेजस्वी व्यक्तींनीं तें राजयंत्र टिकवण्यासाठीं आपल्या सर्वस्वाची होळी केली तरी ती व्यर्थ होय, हेंच श्रीमंत सौ. रंगुबाई जाधव यांनीं लिहिलेल्या ४५० पृष्ठांच्या ग्रंथाचें सार सर्वस्व ह्मणतां येईल.

शिवाजीनें उभारलेलें राज्ययंत्र अखिल हिंदुस्थानांत पसरून सर्व हिंदुस्थानच्या लोकांस निदान बृहन्महाराष्ट्रीय जनतेस सुखसमाधान प्राप्त व्हावें अशी बलवत्तर जनेच्छाशक्ति होती. या इच्छाशक्तीचें मूर्तिमंत प्रतीक ह्मणजे ताराबाईचें त्यागी नि तेजस्वी जीवन होय. छत्रपतीची सत्ता गिळं-कृत करून नानासाहेब पेशव्यानें प्रजेच्या इच्छाशक्तीस पायाखालीं तुडविलें; मग मराठेशाहीचा पाया हादरल्याशिवाय कसा राहील ? नाना फडणी-सानें तर नानासाहेब पेशव्यांच्याही पुढें जाऊन आपल्या स्वार्थापुढें जनतेच्या इच्छा-भावना इत्यादींना कवडीचीही किंमत दिली नाहीं. अर्थात् मराठेशाही जमिनदोस्त झाली यांत नवल कसचें ?

वैद्यालंकृति रंगूबाई नि इतिहासभास्कर रानडे यांच्या अनुक्रमें ' मोगल मर्दिनी ताराबाई ' व ' नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या ' या ग्रंथांचें एकूण तात्पर्य म्हणजे मराठा राज्य इंग्रजांनीं बुड-

विलें नसून नानाद्वयानें ( Subjective leadership ) बुडविलें हें होय. हें माझ्यामतें ऐतिहासिक अर्धसत्य होय. पण ज्या परिस्थितीनें ( objective conditions ) नानाद्वयाच्या कारस्थानांना कमालीचा उठाव दिला त्या परिस्थितीला राज्य बुडविल्याबद्दल तितकेंच जबाबदार धरावयास नको काय ? ती परिस्थिती ह्मणजे दोन नानांच्या कारस्थानांकडे डोळे झांक करणारे आणि त्यांचे पाठबळ होऊन राहणारे स्वार्थी सरदार व सर्वांकडून चुकली जाणारी भोळीबापडी जनता ही होय.

आपल्या आजच्या राजकारणाचीं नि अर्थकारणाचीं सुत्रेंसुद्धां ' दोन नाना ' सारख्यांच्याच हातांत असलेलीं आपल्याला दिसून येतात. सामान्य जनतेची दिशाभूल करून आपली पोळी पिकविणारे पुढारी आजही मोठ्या दिमाखानें मिरवतात. याला कारण आपली जनता अजूनहि पुष्कळच भोळी आहे. तिनें आपला भोळेपणा सोडून ताराबाई-प्रमाणें धूर्त नि चाणाक्ष बनलें पाहिजे. पुढाऱ्यांचीं कुटिल कारस्थानें ओळ-खण्याची पात्रता तिच्यामध्यें आली पाहिजे. त्या काळचें सार्वभौमत्व छत्रपतींत होतें. त्याचप्रमाणें आजचें सार्वभौमत्व ( Sovereignty ) जनतेंत आहे. ताराबाईप्रमाणेंच जनतेला राज्यचालकांच्या स्वार्थास आळा घालतां आला पाहिजे..

वर उल्लेखिलेले दोन्ही ग्रंथ ह्मणजे राजनैतिक कारस्थानें कशीं शिज-तात याचे उत्कृष्ठ पाठच आहेत. ह्मणून या दोन्ही ग्रंथांचा सामान्य जनतेनें मननपूर्वक अभ्यास करणें अत्यवश्य आहे. वर विशद केलेल्या दृष्टीनें हे दोन्ही ग्रंथ वाचल्यास त्यांचें खरेंखुरें मोल लोकांच्या नजरेंत चांगलेंच भरेल.

' मोंगल मर्दिनी ताराबाई ' या ग्रंथाची भाषा सरळ, ओघवती नि कळकळीची आहे. एकंदरींत इतका प्रगल्भ नि उद्बोधक ग्रंथ समाजास सादर केल्याबद्दल वै. सौ. रंगुबाईंना धन्यवाद द्यावे तितके थोडे आहेत.

बेळगाव ठळकवाडी ता. २५।१।४७. सदाशिव रंगराव सुंठणकर.

# शुद्धिपत्र.

सूचना:—' मोंगल मर्दिनी ताराबाई ' या पुस्तकांत बरेच मुद्रण-दोष राहिले आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्वाचे तेवढे खालीं दिलेले आहेत. हे पुस्तक वाचावयास सुरवात करण्यापूर्वी पुस्तकांत सुधारून घ्यावे अशी विनंती आहे.

| अशुद्ध शद्ब | पान | ओळ | शुद्ध शब्द. |
|---|---|---|---|
| तपश्चार्या | ६९ | १८ | तपश्चर्या |
| असा | ७२ | १२ | अशा |
| आकृत्रिम | ७३ | १२ | अकृत्रिम |
| वीरपन्हीही | ७७ | २१ | वीर पत्नीही |
| स्कराज्यांतील | ७८ | १ | स्वराज्यांतील |
| पित्रद्रोह | ८० | १० | पितृद्रोह |
| रामराजे | ८९ | ९ | राजाराम |
| साडावा | ९७ | ११ | सोडावा |
| सामुदादिक | ९७ | १४ | सामुदायिक |
| या किल्ल्यावरून | ९९ | १० | या किल्ल्यावरून त्या |
| मक्तता | १५३ | ९ | मुक्तता |
| जीध | १८३ | २४ | जीव |
| दुसारा | १८५ | ३ | दुसरा |
| भाडाणचा | १८८ | १५ | भांडणाचा |

| | | | |
|---|---|---|---|
| व्हावहाला | २११ | १७ | व्हावयाला |
| कुटार: | २११ | २० | कुठार: |
| गाजाउद्दान | २३९ | २ | गाजीउद्दीन |
| मीरत | २४६ | ११ | मीरज |
| हाता | २४७ | २६ | होतो |
| प्रनितिधींस | २५७ | २१ | प्रतिनिधींस |
| नमून | २७१ | ६ | नेमून |
| घोट | ३५५ | ४ | गोट |
| पतकें | ३६१ | ६ | पथकें |
| त्याचें | ३८० | ३ | तिचें |
| नारायणभमट्ट | ३८८ | ५ | नारायणभट्ट |
| कष्ट | ३९० | ११ | रुष्ट |
| राजकारभाराच्या | ३९७ | १९ | राज्यकारभाराच्या |
| नासासाहेबांना | ३९८ | १० | नानासाहेबांना |
| योजकस्तते | ४०९ | १३ | योजकस्तत्र |
| शेवटच्य | ४१४ | ९ | शेवटच्या |
| मूत्यूनंतरं | ४१४ | ११ | मृत्यूनंतर |
| देण्यांत | ४१५ | ३ | करण्यांत |
| खाेटे | ४३१ | ११ | खोटे |

॥ श्री ॥



ग्रंथालय ठाणे
दा. क्र. ९८३८

# मोंगल मर्दिनी ताराबाई.

## पार्श्व भूमिका.

**१ क्षात्रधर्म. २ अवतारी पुरुष. ३ लोकसंग्रह. ४ किल्ल्यांची संमृद्धि. ५ राज्याभिषेक. ६ हिंदुपदपातशाहीचें मार्गदर्शन.**

*झाला क्षीण बहू क्षुधेस्तवजरी कीं व्यापिला वार्धकें ॥*
*आली कष्टदशा घडो मरणही कीं तेज गेलें निकें ॥*
*ऐसाही मृग-राज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा ॥*
*शौर्यें भेदुनि हस्ति-मस्तक शुभ-ग्रासींच ज्याला स्पृहा ॥१॥*

—वामन पंडित.

१ **क्षात्रधर्म**—चितोडचें सूर्यवंशी **शिसोदिया** क्षत्रिय राजघराणें, वामन पंडितांनीं वरील श्लोकांत दर्शविल्याप्रमाणें सिंहाच्या मनोधर्माचें होतें. याची साक्ष राणा प्रतापसिंहांचा दिव्य इतिहास देत आहे. महाराष्ट्रांतील **भोंसले** घराणें हें चितोडच्या राजघराण्याची एक शाखा आहे; ह्मणून वंशपरंपरेचा सिंहाच्या मनोधर्माचा गुण भोंसले घराण्यांतहि स्वाभाविक आहे. क्षत्रियांना आपत्काळ व संपत्काळ या दोन्ही परिस्थितीच्या कालचक्रांतून

स्वसामर्थ्यावर कालक्रमणा करावी लागते. हिंदुधर्म, हिंदुसमाज, हिंदुसंस्कृती यांचे रक्षणकर्ते क्षत्रियच असल्यामुळें परचक्राचा प्रथम हल्ला यांच्यावरच होतो. व त्यांना तो कर्तव्य म्हणून सोसावा लागतो. परचक्राच्या सामन्यांत विजय लाभला तर ठीकच परंतु दुर्दैवानें जर अपजय झाला तर त्यांना वनवास, किंवा अज्ञातवास पतकरून आपलें रक्षण करावें लागतें. या आपत्काळांतहि आपलें सिंहाच्या मनोधर्माचें शील त्यांना सोडतां येत नाहीं. त्यांतूनच पुन्हां त्यांना आपला भाग्योदय करून घ्यावा लागतो. मृगराजाप्रमाणें क्षत्रियराजांचा मनोधर्म निसर्गसिद्ध आहे. तो निर्बीज होत नाहीं. प्रसंगीं तो आपलें तेज प्रकट करीत असतो. निसर्गधर्म आजपर्यंत असाच चालत आला आहे व पुढेंहि तो तसाच अबाधित चालणार.

२ **अवतारी पुरुष**—श्रीछत्रपती शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत हिंदुपदपातशाही स्वतंत्रपणें प्रस्थापित करीतोंपर्यंत महाराष्ट्रांतील चितोडच्या शिसोदिया शाखेच्या पुरुषांना फारच मोठा आपत्काळ सोसावा लागला. त्याच अंधारमय परिस्थितींतून शिवाजीमहाराजांनीं आपला उदय करून घेतला. हा सहजासहजीं झाला नाहीं. मोठ्या परिश्रमानें, अनंत संकटांना तोंड देऊन, जिवावरील प्रसंगांतून रक्षण करून घेऊन व सुमारें आपल्या आयुष्याचीं अडीच वर्षें सुळावरील पोळी खाऊन, करून घ्यावा लागला. इ. स. १६४६ पासून म्हणजे स्वराज्याची मुहुर्तमेढ तोरणा किल्ल्यावर रोंवल्या पासून तों इ. स. १६७४ मध्यें राज्याभिषेक होईतोंपर्यंत शिवाजीमहाराजांकडून जी स्वराज्याची तपश्चर्या झाली ती एवढी खडतर होती कीं ती मानवीसामर्थ्यापलीकडील होती असेंच लोकांना वाटलें; म्हणूनच शिवाजी महाराजांना अवतारी पुरुष म्हणून लोक संबोधूं लागले.

३ **लोकसंग्रह**—शिवाजी महाराजांच्या अवतारी कार्याचें बीज त्यांच्या हृदयांत पहिल्यापासून कसें वसत होतें हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. ‘जें वडिलांनीं मिळविलें, तें खाऊन राहणें योग्य नाहीं. आपण हिंदु, सर्व दक्षिण देश यवनांनीं ग्रासिला; देव, ब्राह्मण, गायी ह्यांस व क्षेत्रांस

पीडा केली, धर्म बुडविला. हा रक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षूं; व आपले पराक्रमें नवीन दौलत संपादूं. तें अन्न भक्षूं. नवें साधवें हें या कुळांत जन्मल्याचें सार्थक. दैवावर भार न घालूं. पुरुषयत्न बलवत्तर होय. दैव पंगु आहे, यास्तव प्रयत्न अचल करावे. त्यास दैव जसें अधिक साह्य होईल; तसतसें अधिक करीत जावें. दैव परिणामास नेणार समर्थ आहे.' दादाजीस सल्ला विचारतां त्यानें सांगितलें, 'वडिली दौलत संपादिली, ती गमावली, हें तुमच्या वांट्यास येऊं नये.' दादाजीच्या बोलण्यांतील गुण तेवढे घेऊन शिवाजीनें दोषांकडे लक्ष दिलें नाहीं. पुढें 'कारकून सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन, आणखीं चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावें. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेंच राजकारणें करावीं; मातबर चहूं जागचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रें लिहावीं; त्यांस आणून भेट घ्यावी, आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनुकूळ असावें असें बोलावें, असें करण्यांत ज्यांनीं महाराजांचें बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें, त्यांस वेध लागून वाटावें कीं, हे परम थोर आहेत. यांचेच संमतें चालावें, हे सांगतील तसें चालावें. प्राण हे गेले तरीं जावोत, परंतु सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं.' (मराठी रियासत भाग २ रा पृ. १९२–९३)

**दादाजी नरस प्रभु**—वरील प्रमाणें आपल्या मनोभावनेच्या बळावर वर्णभेदाला अगर जातिमत्सराला जागा न देतां हिंदु आणि हिंदुधर्म या उच्च ध्येयावर शिवाजी महाराजांनीं लोकसंग्रह केला. दादाजी नरस प्रभु देशपांडे या तरुण व धाडशी पुरुषास आरंभींच त्यांनीं आपल्या स्वराज्याच्या कामांत सामील करून घेतलें. त्यांचें आडनांव गुप्ते असें होतें. हे दादाजी नरस रोहिडखोरें व वेलवंडखोरें याचे देशपांडे व कुलकर्णी असून ते विजापूरकरांचे अंमलाखालीं होते. दादाजी नरस हे शिवाजी महाराजांना सामील झाले हें वर्तमान विजापूरीं ज्यावेळीं समजलें त्यावेळीं विजापूरच्या अधिकाऱ्यांनीं दादाजी नरस यास पुढील आशयाचें पत्र पाठविलें, 'शिवाजीराजे यानें

शहाशीं बेमानगी करून तुझे खोऱ्यांत रोहिरेश्वरचे डोंगराचे आसऱ्यानें पुंडाव्यानें मावळे वगैरे लोक जमाव केला; आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणें उठवून आपण रोहिडेकिल्ल्यांत शिरला. हल्लीं राजगड किल्ला नांव करून वळकावला. तोहि वेलवंड खोऱ्यालगत. त्यास लोकांचा वगैरे जमाव. तूं सामील असून फिसाद करून राजे मजकूर निल्हेस रसद देतोस. ठाणें शिरवालीच्या अमिनासीं रुजू राहत नाहींस. जमाव बिलरजुमा करीत नाहींस व दोनही पेश्यांचा वसूलही सरकारांत देत नाहींस. ठाणगे व नाईकवाड्यांस मगरुरीचे जबाब देतोस. हें जाहीर झालें. त्यास ही गोष्ट तुझे जमेदारीचे इज्जतीस नामाकूल आहे. तरी ठाणे मजकुरीं अमिनासीं रुजू राहणें. आणि तनखा मजा करून देणें. हें न जाल्यास तुजला विजापुरीं नेऊन गरदन मारितील; व जमेदारी हक्क कानू चालणार नाहीं, हें मनीं समजणें; आणि या उपरी दिवाणांत रुजू राहणें.' हें पत्र सन १६४५ च्या एप्रील महिन्यांत लिहिलेलें आहे. (खंड १५ ले. २६७)

हें पत्र दादाजी नरसु यांस आल्यानंतर त्यांतील हकीकत त्यांनीं शिवाजी-महाराजांना कळविली. त्याला त्यांचेकडून सन १६४५ च्या मे महिन्यांत पुढील आशयाचें उत्तर आलें. 'तुह्मांस मेहरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला. तो ठाणें शिरवलाहून अमिनानीं तुह्माकडे पाठविला. त्यावरून तुमचे बाप नरसीबाबा हवालदील झाले, वगैरे कित्येक मजकूर लिहिले. त्यास शहाशीं बेमानगिरी तुह्मीं व आह्मीं करीत नाहीं.' श्रीरोहिरेश्वर तुमचे खोऱ्यांतील आदिकुलदेव, डोंगरमाथा पठारावर सह्याद्रीलगत तुमचा स्वयंभू आहे. त्यांनीं आह्मांस यश दिलें; व पुढें तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास बावांस हवाल होऊं देऊं नये. धीर दिलासा सांगावा; आणि तुह्मी तो कागद घेऊन तावडतोब हुजुर येणें. राजश्री दादाजीपंतांचे विद्यमानें बावांचें व तुमचें व आमचें श्रीपाशीं इमान झालें, तें कायम वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आह्मीं व आमचे वंशज लेकरांचे लेकरीं वतन वगैरे चालविण्याविशीं कमतर करणार नाहीं. हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे.

ह्याप्रमाणें त्यांचे मनाची खात्री करून तुह्मी येणें.'. [खं. १५ ले. २६८]

या पत्रव्यवहारावरून शिवाजी महाराजांबरोबर आपल्या वतनाची अगर जिवाची पर्वा न ठेवतां दादाजी व नरस यांनीं हिंदवी स्वराज्याच्या शपथा घेतल्या हें दिसून येईल. भोंसलें घराण्याबरोबर गुप्ते घराण्यानें पहिल्यानें हिंदवी स्वराज्याची ध्वजा हातीं धरली व शिवाजी महाराजांचें प्रभुत्व मान्य करून त्यांना सामील झाले हें गुप्ते घराण्याच्या विक्रमाला शोभाच देणारें आहे. या लोकसंग्रहाच्या शिवाजीमहाराजांच्या पहिल्याच प्रयत्नाला गुप्ते घराण्यापासून यशस्वी सुरवात झाल्यानंतर कान्होजी व बाजी सर्जेराव देशमूख, बाजी पासलकर, नेताजी पालकर, एसाजी कंक, तानाजी मालुसरे वगैरे वगैरे नररत्नांचा समूह शिवाजीमहाराजांच्या स्वराज्याच्या ध्वजाखालीं गोळा झाला. साधुसंतांचें पाठबळ त्यांना मिळालें. 'हिंदू तेवढा मेळवावा' या संकल्पाप्रमाणें दिवसे दिवस त्यांच्या ध्वजाखालीं हिंदु येऊन मिळूं लागले व त्यामुळें शिवाजी महाराजांचा लोकसंग्रह सुसंघटित स्वरूपांत व हिंदवी स्वराज्याच्या तत्त्वानुसार झाला.

४ **किल्ल्यांची संमृद्धि**—इ. स. १६४६ मध्यें श्रीशिवाजी महाराजांनीं तोरणा किल्ला घेतला. हा किल्ला पुण्याच्या नैऋत्येस सुमारें वीस मैलांवर आहे. या किल्ल्यापासून हिंदवी स्वराज्याची सुरवात त्यांनीं केली. या किल्ल्याच्या आग्नेयेस तीन मैलांवर राजगड नांवाचा दुसरा किल्ला आहे. याच्या आटोक्यांत पुण्याचा रस्ता येत असल्यानें तो किल्ला शिवाजी महाराजांनीं हस्तगत केला. त्याचप्रमाणें कोंडाणा ऊर्फ सिंहगड, पुरंदर, कल्याण प्रांतांतील कांगोरी, तिकोनी, लोहगड वगैरे किल्ले; दक्षिण कोंकणांतील तळें, घोसाळा, खिरवाडीचा किल्ला, लिंगाणा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, पावनगड, विशाळगड, रांगणा, वसंतगड, चंदन, वंदन, नांदगिरी, ताटोरा वगैरे किल्ल्यांपासून सुरवात करून जवळजवळ तीनशें किल्ले शिवाजी महाराजांनीं आपल्या अंमलाखालीं आणले. त्यांपैकीं बरेच किल्ले त्यांनीं स्वतः बांधिलेले आहेत.

शिवाजी महाराजांनीं आपल्या ताब्यांतील किल्ल्यांची कशी व्यवस्था ठेविली होती हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल, "शिवाजीचे एकंदर किल्ले

जवळजवळ तीनशें होते. मुख्य हवालदार नेमतांना तो चांगला इमानी व कर्तृत्ववान् असा पाहून नेमण्यांत येत असे. तटाच्या खालीं माचीमाचीला रखवालदार नेमून दिलेले असत. या रखवालदारांनीं आसपास शत्रुवर नजर ठेवून सभोंवारचें रान राखावें असा हुकूम होता. किल्ल्याच्या पायथ्याशीं नाक्यानाक्यावर रामोशी, मांग, बेरड वगैरे लोकांच्या चौक्या असत. त्यांनीं शत्रूची बातमी ठेवून किल्ल्यावर तात्काळ पोंचवावी, अशी ताकीद होती. संध्याकाळीं किल्ल्याचा दरवाजा लावून त्यास कुलूप लावीत. हवालदारानें दररात्रीं स्वतः एक दोन वेळां येवून बंदोबस्त पहावा, असा नियम होता. दिवसापेक्षां रात्रीचा बंदोबस्त विशेष कडक होता. यत्किंचित् ढिलाई केल्यास शिवाजीकडून अत्यंत कडक शासन होत असे. किल्ल्यावर येण्याचे चढाव सोपे होते ते सर्व तासून सुरुंग लावून बेलाग करविले होते. किल्यावर ठिक-ठिकाणीं तोफा लावून ठेविल्या होत्या. लष्करांतील तोफखान्याचे नियम अत्यंत काळजीनें ठरविलेले असून तोफखान्याकडील बैल, हत्ती, सुतार, लोहार, गोलंदाज वगैरेची व्यवस्था यथा योग्य ठेविलेली होती. प्रत्येक किल्ला व तन्मर्यादापरिविष्ट प्रदेश हा शिवाजीच्या राज्य मालिकेंतील एक एक मणी होय. या बहुमोल मालिकेनें शिवाजीनें आपलें राज्य एकत्र ग्रथित केलें होतें. शिवाजीचीं बहुतेक अचाट कृत्यें ह्या किल्यांच्या योगानें तडीस गेलीं. ह्या किल्ल्यांच्या योगानें नाना ठिकाणची लूट सुरक्षितपणें त्यास घरीं आणतां आली. सुरत व खानदेश येथील लूट रायगडीं आणतानां बागलाण व नाशीक या प्रांतांतील किल्ल्यांचा त्यास अतिशय उपयोग झाला.” (म. रि. भाग २ रा आवृत्ति २ री पृ. ४७०–७१–७२)

“शिवाजीनें मिळविलेला बहुतेक पैसा या किल्ल्यांची बांधणी करून ते सुरक्षित ठेवण्यांत खर्च झाले आहे. किल्ल्यांवर तो पाण्याप्रमाणें पैसा खर्च करी. अनेक आणिबाणीचे प्रसंग शिवाजीवर आले असतां, त्यांतून निभावून जाण्यास हेच किल्ले त्यास उपयोगी पडले. कित्येक किल्ले संरक्षणाच्या दृष्टीनें सोईचे, तर कित्येक शत्रूवर छापा घालून त्याचा पाडाव करण्याच्या सोईचे,

असे नांवाजलेले असून त्यांच्याच योगानें मराठ्यांच्या तत्कालीन पराक्रमांस एक प्रकारची विलक्षण रसालता उत्पन्न झाली आहे. रायगड किल्ल्यावर शिवाजीनें आपली राजधानी केली. उगाच आपली वडेजाव लोकांत मिरविण्याकरितां मैदानांतील एकादें शहर त्यानें राज्याची मुख्य जागा केली नाहीं. शिवाजीस पोकळ मिरवणुकीचा तिटकारा असे. कर्नाटक प्रांत जिंकून जिंजी किल्ला ताब्यांत ठेवण्यांत त्यानें अतिशय श्रम व खटपट केली, यावरून भावी संकटप्रसंगीं तो जिंजी किल्ला आपल्या अनुयायांस अत्यंत उपयोगी पडेल, असें जणुं काय, त्यास स्वप्नच पडलें होतें. साताऱ्याची मजबुतीहि अशाच प्रकारची होती. म्हणूनच तेथें पुढें मराठ्यांची राजधानी झाली. याच किल्ल्यावर प्रतिनिधींच्या पूर्वजांनीं आपला पहिला पराक्रम गाजविला. तसेंच दुसऱ्या अनेक मोठमोठ्या किल्ल्यांच्या संबंधानें अत्यंत रसाळ, स्वाभिमानसंवर्धक व कविगुणपरीक्षक असे अनेक प्रसंग महाराष्ट्रेतिहासांत घडले आहेत. सिंहगडानें तानाजी मालुसऱ्याचें नांव आबाल वृद्धांच्या तोंडीं आणून दिलें आहे. जिंजीवासानें तर मराठ्यांचा खरा स्वाभिमान कसासच लाविला. प्रतापगडाचें नांव निघाल्याबरोबर अफझुलखानावर शिवाजीनें मिळविलेल्या विजयाची आठवण कोणाला होणार नाहीं ! बागलाणांतील सालेर व पट्टा ह्या किल्ल्यांनीं मराठ्यांस धनप्राप्तीस किती हातभार लाविला ! धर्मापिलीची साम्यता पावलेला खेळणा व तेथें आपले प्राण खर्ची घालून शिवाजीस वांचविणारा स्वामिभक्त बाजीप्रभु यांची आठवण बुजणें शक्य आहे काय ! दिलीरखानास 'दे माय धरणीठाय' करण्यास लावणारा 'मुरारबाजी' व 'पुरंदर' हीं नांवें महाराष्ट्रविद्यार्थ्यांच्या मुखीं घोळत असलीं पाहिजेत. पन्हाळा व खेळणा उर्फ विशाळगड हे तर प्राचीन काळापासून राष्ट्राचें रक्षण करण्यांत सदैव निमग्न आहेत. विशाळगडावर नेहमीं जनानखाना असे. अलिबाग व मालवण येथील जंजिरे शिवाजीच्या आरमाराचें केवळ आदिस्थान होत. तसेंच जेथें शिवाजीचा जन्म झाला तो शिवनेरी किल्ला त्या प्रभूच्या नांवाची आठवण लोकांस नेहमीं करून देईल यांत संशय नाहीं. सारांश अशा नामांकित

किल्ल्यांच्या योगानें महाराष्ट्रेतिहासास एक विलक्षण रमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे. प्रत्यक्ष शिवाजीस ह्या किल्ल्यांचें महत्व इतकें वाटत होतें कीं, 'किल्ले बहुत झाले. विनाकारण पैका खर्च होतो,' असा जवळच्या मंडळींनीं शिवाजीस अर्ज केला असतां तो ह्मणाला, 'जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखतो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करतात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगानें औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल. आपणांस धर्मस्थापना व राज्य-संपादन करणें. सर्वांस अन्न लावून, शत्रूप्रवेश न होय, तें किल्ल्यामुळें होतें. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवेजुने तीनशेंसाठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला, तरी तीनशेंसाठ वर्षें पाहिजेत."

या प्रमाणें शत्रूकडून किल्ले जिंकणें, नवीन किल्ले बांधणें व ते राज्य-रक्षणक्षम करणें ही अत्यंत महत्त्वाची कामगिरी शिवाजी महाराजांनीं केली. त्यावेळीं हिंदवी स्वराज्य रक्षणाचा आत्मा ह्मणजे किल्ले होते हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. अशा प्रकारें किल्ले तयार झाले पण त्याच्यावरील बंदोबस्ताची व्यवस्था कशी करण्यांत आली होती हेंहि पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. "प्रत्येक गडावर एका मराठे हवालदाराच्या किंवा गडकऱ्याच्या हाताखालीं त्याच्याच जातीचे दुसरे मदतनीस असून त्यांजकडे निरनिराळ्या बुरुजांची व्यवस्था सोंपविलेली असे. किल्ल्यावर दुसरा मोठा कामगार ब्राह्मण जातीचा सबनीस ह्मणून असे, व तिसरा प्रभु जातीचा कारखानीस असे. मुख्य हवालदाराचें काम किल्ल्याचे रखवालीचें व बंदोबस्ताचें. ब्राह्मण सुभेदाराकडे मुल्की जमाबंदीचें काम सोंपविलेलें असून किल्ल्याच्या टोपूंतील प्रदेशावर त्याची देखरेख असे. तसेंच घासदाणा, दारूगोळा, डागडुजी, इत्यादि कामें प्रभु कारखानिसाकडे सोंपविलेलीं असत. प्रत्येक किल्ल्याच्या व्यवस्थेंत हींच कामें मुख्य असत; व तीं तीन भिन्न वर्गीयांकडे पृथक्पणें सोंपविलेलीं असल्या-मुळें एकमेकांचा दाब एकमेकांवर राहून कामें सुरळीतपणें पार पडत. किल्ल्याच्या

बंदोबस्ताकरितां निवडक रखवालदार नेमलेले असून, खालील प्रदेशांत बंदोबस्तासाठीं रामोशी ठेविलेले असत. चौकीदार, नाकेदार, वगैरे रक्षक लोकांनीं रात्रीं दिवसा कसकशीं कामें करावयाचीं त्याजबद्दल नियम बांधलेले होते. शिबंदीची संख्या किल्ल्याच्या महत्वाच्या मानानें कमीजास्त असे. शिवाय किल्ल्यावर कायमची वस्ती असून सर्व लोकांचा फायदा किल्ल्याच्या संरक्षणापासूनच व्हावा, अशी व्यवस्था असल्यामुळें एक किल्ला म्हणजे एका अर्थानें एक लहानसें स्वतंत्र राज्यच, किंवा एकंदर राज्यव्यवस्थेचा एक स्वतंत्र भाग, असा मानला जाई. फौज लढण्यास बाहेर गेली असतां, ब्राह्मण सुभेदार व प्रभु कारखानीस हे किल्ल्याची डागडुजी व सामानसुमान व पैशाचा पुरवठा करण्यांत गुंतलेली असत. कारण बाहेरच्या फौजेस सामान पुरविण्याची पाळी केव्हां कोणत्या किल्ल्यावर येईल याचा नेम सांगतां येत नसे. ग्रँट डफ म्हणतो 'किल्ल्यांतून आंत बाहेर कोणी केव्हां जाणें, गस्त फिरणें, पहारे, चौक्या सांभाळणें, व त्यांजवर देखरेख ठेवणें; पाणी, धान्य-सामुग्री; युद्धसामुग्री इत्यादि तयार ठेवणें, या गोष्टीविषयीं अगदीं सक्तीचे व सूक्ष्म नियम शिवाजीनें केलेले असून व प्रत्येक शाखेवरील मुख्य अधिकाऱ्यांचीं बारीक सारीक कामेंसुद्धां ठरविलेलीं होतीं; आणि ते नियम मोडण्यास तिळभर जागा नव्हती. इतकें असूनहि त्याचा ह्या सर्व बाबींचा खर्च फारच काट-कसरीनें बांधिलेला होता.' आबाजीपंत व अनाजी दत्तो या दोघां इसमांकडून शिवाजीनें सर्व किल्ल्यांची तपासणी केली, आणि दारूगोळा, अन्नसामुग्री बरोबर आहे कीं नाहीं, हें पाहून, त्याप्रमाणें किल्ल्यांची तर्तूद केली."

वरील प्रमाणें हकीकत वाचली ह्मणजे शिवाजी महाराजांनीं आपल्या राज्यांतील प्रत्येक किल्ला हिंदवी स्वराज्याचा एक स्वतंत्र गट कसा निर्माण केला होता हें लक्षांत येईल. त्याचप्रमाणें पश्चिमेच्या दिशेनें अरबी समुद्रांतून आपल्या राज्याचें रक्षण होण्याकरतां उत्तम आरमार तयार करून व जंजिरे बांधून कडेकोट बंदोबस्त केला होता. यावरून त्यांच्या राज्यव्यवस्थेचें हें वरील सूत्र लक्षांत ठेविलें असतां राज्यसंपादन करणें व त्याचें रक्षण करणें

याचे निराळे पाठ वाचण्याची जरूरी राहणार नाहीं. स्वराज्याचा विस्तार करून तें संरक्षणक्षम करणें ही जशी एक महत्त्वाची कामगिरी शिवाजी महाराजांच्या हांतून घडून आली त्याचप्रमाणें शत्रूच्या आक्रमणापासून शौर्यानें व मुत्सद्देगिरीनें आपला कार्यभाग कसा साधतां येईल यांचेंहि शिक्षण जावळीच्या सामन्यापासून तों औरंगझेबाच्या कैदेंतून आग्र्याहून सुटका होईतोंपर्यंतच्या कालांत घडून आलेल्या प्रसंगापासून घेतां येईल. शिवाजी महाराजांना मुख्य दोन शत्रू होते. विजापूरचा आदिलशाहा व दिल्लीपती औरंगझेब. या दोन शत्रूंच्या कोंडींतून त्यांना आपला अभ्युदय करून घ्यावयाचा होता. त्यामुळें त्यांच्या उभ्या आयुष्यांत हा नाहींतर तो कायमचा शत्रू त्यांच्यामागें हात धुऊन उभा होताच. या काळांतील घडून आलेला प्रत्येक प्रसंग त्यांच्या जिवावरचाच होता. अफझलखानाचा वध, शाएस्तेखानाचा सामना, आग्र्याहून स्वतःची करून घेतलेली सुटका वगैरे हे प्रसंग त्याची साक्ष देत आहेत. या सर्व प्रसंगाला तोंड देऊन स्वराज्याची अभिवृद्धि केली व हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें राज्याचें रक्षण करण्याकरतां अभिषिक्त राजाची जरूरी असते म्हणून त्यांनीं स्वतःला राज्याभिषेक करवून घेण्याचा संकल्प केला.

५. **राज्याभिषेक**—यावेळीं शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा विस्तार पूर्वेस विजापूर-गोंवळकोंड्यापर्यंतचा सर्व प्रदेश; दक्षिणेस हुबळी व बेदनूरपर्यंतचा प्रदेश, पश्चिमेस अरबी समुद्रापर्यंतचा प्रदेश व उत्तरेस खानदेश, औरंगाबाद वऱ्हाड या पर्यंतचा प्रदेश; या सीमामर्यादेतील प्रदेश एवढा होता. या प्रदेशांतील प्रजाजनांना न्याय, शांतता, स्थैर्य कायमचें लाभावें या दृष्टीनें स्थायिक असें स्वरूप प्राप्त करून देणें शिवाजी महाराजांचें कर्तव्य होतें. स्वराज्य स्थापनेची कल्पना मूलभूत शिवाजी महाराजांची होती परंतु इतके दिवस त्याला मूर्तस्वरूप देण्याची संधी आली नव्हती. शिवाय लोकांच्या डोळ्यांत भरेल अशी कामगिरी व्हावयालाहि कालावधी लागतो. यावेळीं शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा विस्तार मोठा झाल्यामुळें त्याला स्वराज्य स्थापनेचें कायमचें स्वरूप यावें अशी प्रजाजनांनाहि इच्छा उत्पन्न होऊं लागली.

ग्रंथ ९८९५ ९८।१२।०१

# पार्श्व भूमिका

स्वराज्य स्थापनेची विधिपूर्वक-रचना झाल्यास त्याला धर्माचें व जनतेच्या सहानुभूतीचें अधिष्ठान मिळून ती टिकाऊ होईल व राज्याच्या नियंत्रणाखालीं स्वराज्याला एकसूत्रीपणा येईल असें करणें जरूर होतें. त्यावेळीं शिवाजी महाराजाप्रमाणें दुसरेहि मोठमोठे मराठे सरदार होते. ते महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं कमी जास्त प्रमाणांत आपापल्या कर्तृत्वाप्रमाणें स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा उपभोग घेत होते. परंतु त्या सर्वांवर एका स्वामीचा दंडक नसल्यामुळें त्या सर्वांचें एकमत नव्हतें. त्यांच्या कर्तृत्वाचीं क्षेत्रें व दिशा भिन्न भिन्न असल्यामुळें त्यांच्यांत एकी होऊं शकली नव्हती व त्यामुळें आदिलशाही व मोंगलशाही यांचें दडपण त्यांना झुगारून देतां आलें नव्हतें. तें झुगारून देण्याकरितां व हिंदूंची एकी निर्माण करण्याकरितां विधिपूर्वक स्वराज्याची स्थापना होणें सर्वांना इष्ट वाटत होतें.

शिवाजी महाराजांना त्यांच्या स्वराज्यांत व स्वराज्याबाहेर उघड व गुप्त शत्रू पुष्कळ होते. त्याचप्रमाणें तटस्थहि बरेच होते. आजपर्यंत त्यांनीं स्वराज्यसंपादन करण्याकरतां जे जे हक्क व कर वसूल केले, मोठमोठ्या लढाया मारून शत्रूंचे पराभव केले, लूट गोळा केली; या गोष्टी स्वार्थाकरतां केल्या नसून स्वराज्य आणि स्वातंत्र्य याकरतां या गोष्टी त्यांना कराव्या लागल्या. केवळ लोकांना स्वातंत्र्य व सुराज्य लाभावें याकरतां त्यांनीं त्यागोष्टी केल्या हें लोकांना पटावें म्हणून या विधिपूर्वक स्वराज्य स्थापनेची जरूरी होती. या स्थापनेमुळें शिवाजी महाराज व त्यांचे अनुयायी यांची अमोल स्वराज्यसेवा कारणीं लागणार होती. त्यांच्यावरील बंडखोर, लुटारू हे आरोप जाऊन ते राष्ट्रभक्त, स्वराज्यभक्त बनणार होते. या विधीपूर्वक स्वराज्य-स्थापनेमुळें परकीय शाहींवर दरारा बसणार होता व इतर तटस्थांना कोणत्या पक्षाचा आधार हितपरिणामी आहे याचा निवाडा करावयास संधि मिळणार होती. या दृष्टीनेंहि त्यांना आपल्या स्वराज्याला विधिपूर्वक स्वरूप आणणें इष्ट होतें.

विधिपूर्वक स्वराज्याची स्थापना करावयाची म्हणजे राज्याला राजा पाहिजे. राजा हा क्षत्रिय असला पाहिजे. क्षत्रियांना वेदाचा अधिकार आहे

पण तो उपनयन झाल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. शिवाजी महाराजांचें उपनयन झालें नव्हतें म्हणून त्यांना इतर क्षत्रिय क्षत्रिय मानण्यास तयार नव्हते. महाराष्ट्रांतील ब्राह्मणांचीहि तीच स्थिती झाली होती. राज्याभिषेकाचा प्रश्न पुढें येतांच स्वाभाविकपणें या वादाला तोंड लागणार होतें. इ. स. १६७२ मध्यें एका प्रसंगीं पुष्कळ मराठे सरदार मंडळी भोजनाकरतां रायगडीं जमली होती. त्या वेळीं जो दरबार झाला त्यांत शिवाजी महाराजांना उच्चासन ठेवण्यांत आलें होतें. तें कित्येक मराठे सरदारांस खपलें नाहीं असें सांगतात. या प्रकारामुळें शिवाजी महाराजांचे मनांत राज्याभिषेक करून घेण्याचे विचार अति प्रबळ होऊं लागले. राज्याभिषेक तर झालाच पाहिजे परंतु तो हिंदु-धर्मशास्त्र संमत असाच पाहिजे अशी खटपट सुरू झाली व त्याप्रमाणे कार्यालाहि प्रारंभ झाला. हा राज्याभिषेक यथासांग पार पाडावयाला तशाच एका जबरदस्त विद्वान् पंडिताची जरूरी होती व त्यावेळीं अनेक अजिंक्य पत्रें घेतलेले विद्वान् मेरुमणी गागाभट्ट काशीला होते. त्यांनाच शिवाजी महाराजांनीं बोलावणें पाठवून रायगडास आणिलें. त्यांचेबरोबर अनेक याज्ञिक पंडीत वगैरे ब्राह्मण काशी व पैठणहून आले.

**काशीचे गागाभट्ट**—गागाभट्टांचें मूळ घराणें पैठणचें होतें. इ. स. १४९० च्या सुमारास गोविंदभट्ट या नांवाचा विश्वामित्र गोत्री ऋग्वेदी ब्राह्मण पैठणास राहत होता. त्याचा मुलगा रामेश्वर भट्ट याचें विद्यापीठ पैठणास होतें. त्याचे विद्यार्थी फार होते. पुढें तो आपला मुलगा नारायणभट्ट यास घेऊन काशीस जाऊन राहिला. तेथें त्याचा मुलगा नारायणभट्ट याचा मोठा नांवलौकिक झाला. विश्वेश्वराचें मंदीर नारायणभट्टानें बांधिलें. राजा तोडरमल्लानें त्याचा मोठा सत्कार केला. नारायणभट्टाचे दोन मुलगे रामकृष्ण भट्ट व शंकरभट्ट हे मोठे विद्वान् झाले. त्यांचे ग्रंथ सर्वमान्य आहेत. रामकृष्ण भट्टाचे तिघे मुलगे मोठे मीमांसक म्हणून प्रसिद्धीला आले. पैकीं दिनकर-भट्टाचे बारा ग्रंथ 'उद्योत' संज्ञेचे आहेत. कमलाकर भट्टानें 'कमलाकर' संज्ञेचे बारा ग्रंथ लिहिले. त्यापैकीं निर्णयकमलाकर यालाच 'निर्णयसिंधु'

असें म्हणतात. हा ग्रंथ त्यानें इ. स. १६१२ मध्यें रचिला. दिनकरभट्टाचा मुलगा विश्वेश्वरभट्ट याला बापानें 'गागा' असें लाडकें नांव ठेवलें व पुढें तो त्याच नांवानें प्रसिद्धीस आला. यानें उत्कृष्ट विद्या संपादून घराण्याचा नांवलौकिक वाढविला. मीमांसा, न्याय, अलंकार व वेदांत ह्याविषयांत गागाभट्टाचें प्राविण्य विशेष होतें. 'दिनकरोद्योत' ग्रंथांत त्याच्या बापानें कित्येक विषय सोपे ह्मणून सोडून दिले होते त्याची पूर्तता गागाभट्टांनें केली. त्यामुळें हेमाद्रीच्या 'चतुर्वर्गचिंतामणी' प्रमाणेंच दिनकरोद्योताची योग्यता मोठी आहे. जैमिनी सूत्रांवर गागाभट्टाची टीका आहे. शिवाय न्यायशास्त्रावरील 'भाट्टचिंतामणी' व 'कायस्थधर्मप्रदीप' ऊर्फ 'गागाभट्टी' हे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. गागाभट्टाच्या विद्वत्तेसंबंधीं दक्षिणेंत मोठा नांवलौकिक होता व ब्राह्मणवृंदांवर त्यांची मोठी छाप होती.

गागाभट्टांस बोलावण्याचें ठरल्यानंतर त्यांस आणण्याकरतां बाळाजी आवजी यांस पाठविण्यांत आलें. त्यांचेबरोबर केशव पंडीत, भालचंद्रभट पुरोहित व सोमनाथ कात्रे हे गेले होते. गागाभट्टांनीं शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्याचे बाबतींत पैठणच्या विद्वान् पंडितांचीहि अनुमती घेतली होती. शिवाजी महाराजांनीहि त्याचप्रमाणें पुष्कळांची मतें घेतलीं होतीं. रामदासस्वामीकडे माणसें पाठवून त्यांची संमती त्यांनीं घेतली. साधुसंत, शास्त्रीपंडीत जे राज्यांत होते त्यांचाहि विचार त्यांनीं घेतला. कित्येक प्रतिष्ठीत मंडळींना पालख्या, म्यानें पाठवून रायगडावर बोलावून घेतलें व त्यांच्याशीं विचार विनिमय करून त्यांचीहि संमती घेतली. भोंसले घराण्याची उत्पत्ति चितोडच्या क्षत्रिय राजवंशापासून कशी आहे हें दाखविण्याकरतां जी वंशावळ उपलब्ध झाली आहे ती गागाभट्ट व बाळाजी आवजी यांच्या खटपटीनेंच उपलब्ध झाली. त्यावरून शिवाजीच्या वंशाची उत्पत्ति शिसोदिया घराण्यापासून आहे हें नक्की करण्यांत आलें.

गागाभट्ट रायगडावर आल्यानंतर त्यांचे तेथील शास्त्रीपंडीत यांचेबरोबर वादविवाद झाले. मनुष्याची योग्यता केवळ जन्मावरून न ठरवितां त्याच्या

चारित्र्यावरून ठरविली जावी असें गागाभट्टाचें मत होतें. सरदार, कारभारी, इष्टमित्र वगैरे शिवाजी महाराजांच्या परिवाराची गागाभट्टांनीं अनुमती घेतली. व त्यांना उदेपूर, जयपूर वगैरे ठिकाणच्या रजपूत राजांना ज्याप्रमाणें केला जाता त्याप्रमाणें राज्याभिषेक करण्याचें ठरविलें. इतके दिवसपर्यंत शिवाजी महाराजांना उपनयन संस्कार झाला नव्हता. तो पहिल्यानें आटोपून घेण्याचें ठरलें. नंतर महानद्यांचीं पुण्योदकें, सुलक्षण अश्व व गज, व्याघ्रचर्म, मृगचर्म; सिंहासन, सुवर्णकलश इत्यादि साहित्य जमविण्यांत आलें. राजेरजवाड्यांस; आप्तस्वकीयांस, लहान मोठ्या सरदारांस, विद्वान्पंडितांस, ठिकठिकाणच्या सेवकजनांस आमंत्रण पाठविण्यांत आलीं. सर्व लोकांच्या राहण्याच्या व उतरण्याच्या जागा तयार करण्यांत आल्या. सिंहासन व त्याची रचना शास्त्रोक्त पद्धतीनें करण्यांत आली. हजारों लोक जेवण्यास बसतील असे मोठमोठे मंडप तयार झाले. मंडप, तंबू, राहुट्या इत्यादिकांनीं खालच्या वरच्या माचीवरील किल्ल्याच्या सर्व जागा व्यापून गेल्या. धान्याचीं व इतर सामानाचीं कोठारें भरून ठेवण्यांत आलीं. कोणत्याही गोष्टीची न्यूनता पडूं नये, अशी सर्व तजवीज शिवाजी महाराजांनीं अत्यंत दक्षतेनें करून ठेविली.

हा राज्याभिषेक समारंभ ज्येष्ठ शु. १३ शके १५९६ तारीख ६ माहे जून सन १६७४ रोजीं रायगडीं झाला. त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. "अभिषेकाच्या दिवशीं प्रातःकाळीं सर्व लोक मंगलस्नानें करून व उंची वस्त्रभूषणें परिधान करून सभामंडपांत दाखल झाले. शिवाजीहि स्त्रीपुत्रांसह मंगलस्नान करून, अलंकार घालून, भवानी देवी, मातुश्री जिजाबाई व कुलगुरु बाळंभट इत्यादिकांस वंदन करून, मुहूर्त प्राप्त होतांच आसनावर विराजमान झाला. अष्टप्रधान, पत्रलेखक व गणकलेखक, द्वादशकोश अष्टादशशाला इत्यादिकांवरील अधिकारी, मंगलस्नानें करून, शुभ्रवस्त्रें व अलंकार धारण करून स्वारी बरोबर आले. क्षीरवृक्षाचें आसन सव्वाहात उंच करून कुशांनीं मढविलेलें होतें. त्यावर महाराज बसले. जवळ पट्टराणी सोयराबाई वस्त्रग्रंथन करून संभाजीसह बसली. सिंहासनाचे सभोंवार हातांत सुवर्ण कलश

घेतलेलें अष्टप्रधान अष्टदिक्स्थानापन्न झाले. पूर्वेस मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हातीं घृतपूर्ण सुवर्ण कलश घेऊन उभा राहिला. दक्षिणेस सेनापती हंबीरराव मोहिते दुग्धपूर्ण रौप्य कलश घेऊन उभा राहिला. पश्चिमेस रामचंद्र निळकंठ पंडित आमात्य दधिपूर्ण ताम्र कलश घेऊन उभा राहिला. उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव मधुपूर्ण सुवर्ण कलश घेऊन उभा राहिला. ह्याजपाशी मृत्तिकामय कुंभांत समुद्रजल व महानद्यांचें जल भरून ठेविलें होतें. उपदिशांच्या ठायीं क्रमें करून अग्नेयीस अण्णाजी दत्तो पंडित सचिव छत्र घेऊन उभा राहिला. नैऋत्यभागीं जनार्दन पंडित हणमंते सुमंत व्यजन घेऊन उभा राहिला. ईशान्यभागीं बाळाजी पंडित न्यायाधीश दुसरें चामर घेऊन उभा राहिला. सन्मुख सव्यभागीं पत्र लेखक बाळाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभा राहिला. वामभागीं गणक लेखक चिमणाजी लेखनपात्र घेऊन उभा राहिला. आसमंताद्भागीं सर्व कोश व शाळा यांचे अधिकारी उभे राहिले. सुहृज्जन व मांडलीक राजे सभोंवते उभे राहिले. ठिकठिकाणचीं तीर्थोदकें आणविलीं होतीं. मुहूर्त घटी प्राप्त होतांच, ब्राह्मणांच्या वेदमंत्रोच्चारांबरोबर छत्रपतीवर मंगलाक्षतांचा वर्षाव झाला; आणि आम्रपल्लवांनीं तीर्थोदक सिंचन करण्यांत आलें. अभिषेकोत्तर शिवाजीची स्वारी उत्तमप्रकारें शृंगारलेल्या सिंहासनावर विराजमान झाली. त्यावेळेस त्यांजवर सौवर्णरौप्य पुष्पांनी वृष्टी लोकांनीं केली. ब्राह्मणांनीं मंत्र म्हणून आशिर्वाद दिले. सर्व राज्यांत १०८ तोफांची सरबत्ती झाली." (मराठी रियासत २ री आवृत्ति भाग २ पान ३५९–६०) याप्रमाणें महाराष्ट्राची अखंड कीर्ति गाजविणारा विक्रमशाली व वैभवशाली आणि मांगल्यप्रद असा राज्याभिषेक समारंभ झाला. या दिवसापासून राज्याभिषेक शक चालू करण्यांत आला व परकीयांच्या राजसत्तेचें दडपण झुगारून देण्यांत येऊन स्वराज्य व स्वातंत्र्य यांचा द्योतक भगवा झेंडा रायगडावर फडकूं लागला.

६ **हिंदुपद्पादशाहीचें मार्गदर्शन**—छत्रपती शिवाजी महाराजांनीं हिंदुपद्पादशाहीची स्थापना महाराष्ट्रांत केली व त्याची वाढ आणि

परिपोष अखिल भारतवर्षात होण्याकरतां त्यांनीं मार्गदर्शनहि करून दिलें. हिंदुस्थान हें अखंड हिंदीराष्ट्र बनावें; हिंदी संस्कृतीच्या वाढीला पूर्ण वाव मिळावा, हिंदुधर्माचें रक्षण व्हावें, हिंदी राजसत्तेचें प्राधान्य नांदावें, हिंदी वीरांना आपला पुरुषार्थ दाखवावयाला मुबलक क्षेत्र मिळावें, हिंदी मुत्सद्यांना, हिंदी शास्त्री-पंडितांना, संशोधकांना, सत्पुरुषांना, साधुसंतांना, वनिकांना, व्यापाऱ्यांना, कलाभिज्ञांना आणि सेवकांना वगैरे त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांत आपापली उन्नति व अभ्युदय करून घ्यावयाला संधी मिळावी याचें बीजारोपण त्यांनीं हिंदुपदपादशाहींत केलें. महाराष्ट्र अखंड हिंदीराष्ट्राचा आत्मा आहे; तो चिरंजीव आहे; परदास्य झुगारून देण्याला समर्थ आहे; त्याला बुद्धीचें बळ आणि पराक्रमाचें सामर्थ्य आहे; त्याला पावित्र्याची आवड, सदाचरणाची संचय आणि शिस्तीची कदर आहे. महाराष्ट्र राष्ट्रपुरुषांची जननी, बुद्धीचें माहेरघर, धान्यादिकांचें कोठार, वनौषधींचें नंदनवन, आणि धर्मभावना व राजकारण यांचें क्रीडांगण आहे याची स्मृति शिवाजी महाराजांनीं हिंदुपदपादशाहीच्या स्थापनेनें चिरंजीव केली. शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्राच्या कीर्तीचा आणि वैभवाचा परमोच्चांक गांठला त्यामुळें त्या स्थानापासून स्वधर्म, स्वराज्य आणि स्वातंत्र्य या त्रिवेणी संगमाचा जो स्फूर्तिदायक प्रवाह वाहूं लागला त्यांतून महाराष्ट्राचा पुढील इतिहास न्यावयाचा आहे. इतिहास हा राष्ट्राच्या अभ्युदयाकरतां अभ्यासावयाचा असतो. केवळ व्यक्तीच्या वडेजावीकरतां नाहीं. महाराष्ट्रांतील ऐतिहासिक व्यक्ति ज्या होऊन गेल्या त्या सर्व पूज्य मानणें आपलें कर्तव्य आहे. आपलेच दांत व आपलेच ओंठ. परंतु राष्ट्रावर त्या व्यक्तींच्या कृतींचे आणि राजकारणाचे जे चांगले अगर वाईट परिणाम झाले याची तपासणी करणें इतिहास लेखकांचें कर्तव्य आहे. त्या दृष्टीनें हिंदुपदपादशाहीच्या स्थापनेनंतरचा इतिहास चाळणें बरें

# प्रकरण २ रें.

## " कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ "

**१ शिवाजी महाराजांच्या स्त्रिया व निंबाळकर घराणें. २ संभाजी राजे. ३ राज्यविस्तार व राज्यव्यवस्था. ४ कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ. ५ संभाजीचें पुनरागमन. ६ संभाजीची नजरबंदी. ७ शिवाजी महाराजांची चिंता व अखेर. ८ सोयराबाईचा मनसुबा व संभाजीचें हत्याकांड.**

**१ शिवाजी महाराजांच्या स्त्रिया व निंबाळकर घराणें**— छत्रपती शिवाजी महाराजांचीं एकंदर आठ लग्नें झालीं. (१) सईबाई ही फलटणच्या मुधोजीराव निंबाळकरांची मुलगी. हिचें शिवाजी महाराजांबरोबर लग्न इ. स. १६३९ च्या सुमारास विजापुरीं झालें. हिला तारीख १४ मे सन १६५७ रोजीं संभाजी झाला. पुढें ती तारीख ५ सप्टेंबर सन १६५९ रोजीं निवर्तली. हिला बजाजीराव या नांवाचा एक भाऊ होता. या निंबाळकर घराण्याचा इतिहास पुढें दिल्याप्रमाणें आहे. मुधोजीराव निंबाळकर यांना दोन बायका होत्या. वडील बायकोला साबाजीराव व जगदेवराव असे दोन मुलगे होते. धाकटीला बजाजीराव व सईबाई अशीं दोन अपत्यें होतीं. या सावत्रमुलांत पुढें तंटे उपस्थित होऊन ते विकोपाला गेले. त्यामुळें साबाजी व जगदेव आपल्या मातेसह फलटण सोडून विजापूरीं निघून गेले. तेथें त्यांनीं आदिलशहाच्या दरबारीं खटपट करून निंबाळकरांच्या जहागिरीपैकीं दहिगांव व माळवणी हे दोन गांव स्वतंत्र वाटून घेतले. गृहकलहानें निंबाळकराच्या जहागिरीचा नाश झाल्यामुळें मुधोजीराव आजूबाजूस पुंडावे करून राहूं लागला. त्याच्या पारिपत्याकरतां आदिलशहानें फौज पाठवून त्याचा पराभव केला व त्याला कैद करून साताऱ्याच्या किल्ल्यावर ठेविलें. पुढें शहाजीराजे

भोंसले विजापुरास आल्यानंतर त्यांनीं आपलें वजन खर्च करून मुधोजीरावांची कैदेंतून मुक्तता केली. या उपकाराबद्दल पुढें शहाजीराजे व मुधोजीराव यांचा स्नेह वाढला व तो मुधोजीरावांनीं आपली मुलगी सईबाई ही शहाजीराजांच्या मुलाला—शिवाजीला देऊन वृद्धिंगत केला. पुढें शिवाजी महाराजांनीं जो स्वराज्याचा उपक्रम सुरू केला त्याला मुधोजीरावांची मदत होती. ही गोष्ट बिजापूरच्या दरबाराला खपत नव्हती. मुधोजीरावांचें व त्यांच्या वडील दोन मुलांचें फलटणच्या जहागिरीच्या बाबतींत वैमनस्य उत्पन्न झाल्यामुळें मुलांकडूनच बापाचें पारिपत्य करण्याकरतां विजापूरच्या दरबारनें यांना मदत देऊन मुधोजीवर पाठविलें. या पितापुत्रांची लढाई इ. स. १६४४ मध्यें शिंग्वळनजीक भोळी येथें होऊन एका वडाच्या झाडाखालीं मुधोजीस त्याच्या पुत्रानें ठार मारलें. त्यास 'बाप-मारीचा वड' असें ह्मणतात. या लढाइंत बजाजीरावास कैद करून विजापुरीं नेलें. त्याला मुधोजीचे अपराधाबद्दल जिवें मारण्याची आज्ञा झाली; परंतु माने, घाटगे, घोरपडे आदिकरून मराठे सरदारांनीं विनंती केल्यामुळें आदिलशहानें जिवें मारण्याची आपली आज्ञा परत घेऊन बजाजीला तेथेंच कैदेंत ठेविलें. नंतर 'बजाजी मुसलमान होईल तर त्यास सोडून देऊन शिवाय मोठी जहागिर देतों' असें शहानें बोलणें लाविलें. महंमद आदिलशहाला रोशन बेगम नांवाची तरुण रूपवती मुलगी होती. ती आपणाला दिल्यास आपण मुसलमान होतों असें बजाजीचें ह्मणणें पडलें. ही गोष्ट शहाला पसंत पडली. तेव्हां बजाजीनें मुसलमान धर्म स्वीकारून बेगमबरोबर विवाह केला. बजाजीसारखा एक पराक्रमी आप्त सरदार मराठा मंडळांतून गेल्यामुळें शिवाजी महाराज व त्यांची मातोश्री जिजाबाई यांना फारच वाईट वाटलें. बजाजीच्या धर्मांतरामुळें शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या नवीन उपक्रमाला फार मोठा धक्का बसला. पुढें महंमद आदिलशहा निवर्तल्यावर बजाजी फलटणाला परत आला व त्याला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला. त्यानें पुनः हिंदुधर्मांत परत येण्याची आपली इच्छा जिजाबाई यांना कळविली व त्याप्रमाणें शास्त्राधार काढून बजाजीस शुद्ध करून घेण्यांत आलें. पुढें या निंबाळकर घरा-

ण्याविषयीं मराठा मंडळाचे मनांत कोणत्याहि प्रकारचा किंतु राहू नये म्हणून शिवाजी महाराजांनीं आपली, पुतळाबाईच्या पोटीं जन्म पावलेली मुलगी सखुबाई हिला बजांजीचा मुलगा महादाजी याला देऊन निंबाळकर व भोंसले यांचे आप्तसंबंध पुनः दृढ केले.

(२) सोयराबाई, ही शिर्क्यांची मुलगी. हिला तारीख २४ फेब्रुवारी सन १६७० रोजीं राजाराम झाला. (३) पुतळाबाई, ही मोहित्यांची मुलगी. हिला तीन मुली होत्या. १ सखूबाई, हिचें लग्न बजाजी निंबाळकर याचा मुलगा महादाजी याचे बरोबर झालें. २ राजकुंवरबाई, हिचें लग्न गणोजीराजे शिर्के यांजबरोबर झालें. ३ अंबिकाबाई, हिचें लग्न हरजीराजे महाडिक यांजबरोबर झालें. (४) सकवारबाई, ही गायकवाडांची मुलगी, सन १६५६ च्या जानेवारी महिन्यांत हिचें लग्न झालें. (५) काशीबाई, (६) व (७) ज्या दोन स्त्रियांबरोबर राज्याभिषेकाच्या सुमारास ता. ३० मे सन १६७४ रोजीं वैदिक मंत्रांनीं विवाह केला गेला त्या; व (८) वी तारीख ८ जून सन १६७४ रोजीं विवाह केला ती. अशा शिवाजी महाराजांच्या अष्टनायिका होत्या.

**२ संभाजी राजे**—राज्याभिषेक समारंभ हा शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील परमोच्च आनंदाचा दिवस होता. त्यानंतर क्रमाक्रमानें त्यांना दुःखाचे धक्के बसू लागले. राज्याभिषेकानंतर अवघ्या बारा दिवसांनीं म्हणजे तारीख १८ जून सन १६७४ रोजीं त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांनीं रायगडाखालीं पांचाड येथें स्वर्गवास केला. तेव्हां पासून ते उदास झाले. त्यांना मायेचा पाठिंबा राहिला नाहीं. त्यांचा स्वभावच असा होता कीं देवी अगर मातुःश्री यांची आज्ञा म्हणून कोणतीहि गोष्ट ते तेव्हांच बिनदिक्कत करून टाकीत असत. कोणत्यातरी पाठिंब्याच्या आधारावर पराक्रम करून दाखविण्याची त्यांना सवय लागल्यामुळें व मातुःश्री दिवंगत झाल्यानें त्यांची कंमर खचली व ते उदास झाले. संभाजी राजे हे अवघे दोन वर्षांचे असतांनाच त्यांची मातुःश्री सईबाई या तारीख ५ सप्टेंबर सन १६५९ रोजीं निवर्तल्या. तेव्हां पासून त्यांचें

पालन पोषण जिजाबाईनीं केलें. त्यांच्या हयातीपर्यंत संभाजीची काळजी शिवाजी महाराजांना बिलकूल पडली नाहीं. अवघ्या दोन वर्षांच्या अर्भकावस्थेंत संभाजीराजे मातृ सुखाला अंतरल्यामुळें जिजाबाईनीं त्यांना तळहातावरील फोडाप्रमाणें सांभाळिलें असेल यांत संशय नाहीं. त्यांचे सर्व हट्ट त्यांनीं पुरविले असतील. त्यांच्या मर्जी विरुद्ध त्यांनीं कांहीं केलें नसेल. माते शिवाय वाढत असलेल्या लेंकराला बोलणार तरी कोण व त्याच्या मर्जी विरुद्ध जाणार तरी कोण? अशा स्थितींत संभाजी राजे वाढले. ते हूड, एक कल्ली, छांदिष्ट, संशयी व स्वतंत्र बनले. दुसऱ्याच्या धाकांत किंवा दडपणाखालीं वागण्याची त्यांना बिलकूल संवय लागली नाहीं. जिजाबाई निवर्तल्या त्यावेळीं संभाजीराजांचें वय सत्रा वर्षांचें होतें. या पूर्वींच म्हणजे १६६७ च्या सुमारास त्यांचें लग्न मळेकर पिलाजीराजे शिर्के यांची कन्या येसूबाई हिच्या बरोबर झालें होतें. संभाजीला सावत्र माता असल्यामुळें त्या कदाचित् त्याच्या जीविताला दगाफटका करतील या समाजरूढ कल्पनेमुळें त्यांच्या देखरेखीखालीं त्यांना ठेवणें शक्य नव्हतें; अथवा नेहमींच आपल्या बरोबर त्यांना स्वारी-शिकारीला नेणेंहि शिवाजी महाराजांना शक्य नव्हतें. संभाजीला धाक असा त्यांचाच पहिल्यापासून होता. तेव्हां जिजाबाई निवर्तल्या नंतर एकदम मनमिळाऊपणानें वागून एके ठिकाणीं राहणें त्या उभतांना अवघडच होतें. संभाजी धड मोठा नाहीं व अगदीं लहानहि नाहीं अशी त्यांची मधली स्थिति असल्यानें त्याला धाकांत ठेऊन सन्मार्गाला लावणें हें एक भयंकर ओझें शिवाजी महाराजांच्या शिरावर पडलें. त्यांनीं संभाजीला योग्य वळण लागावें म्हणून श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या संगतीला नेऊन ठेविलें; [ मराठी रियासत भाग २ रा पा० ४४० ] त्यामुळें शिवाजी महाराजांच्या मनाला थोडें समाधान वाटून त्यांचें लक्ष पुढील राज्यकारभाराकडे वेधलें.

३ **राज्यविस्तार व राज्यव्यवस्थाः**— शिवाजी महाराजांचें राज्य तीन प्रांतांत विभागलेलें होतें. कल्याण भिवंडीपासून कोलवण साल्हेरीपर्यंत वरघाट व कोंकण हा प्रांत मोरोपंत पेशवे यांचे हवालीं केला होता.

चौल पासून दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदें, फोंड, कोपळ पर्यंतचा कोंकण प्रांत अनाजी दत्तोचे स्वाधीन केला आणि वरघांट वाईपासून कोपळ तुंगभद्रापावेतोंचा प्रांत दत्ताजीपंत वाकनीस यांचे हवाली केला. तुंगभद्रेच्या पलीकडे कोपळपासून वेलोर जिंजीपर्यंतचा प्रांत शिवाजी महाराजांनीं जिंकला होता परंतु त्या प्रांतांत स्थिरस्थावरता करण्यापूर्वीच त्यांचा अंत झाला. शिवाजी महाराजांच्या राज्याचें उत्पन्न एक कोट होनांचें होतें. शिवाय चौथाईचें उत्पन्न एेंशीं लक्ष होनांचें होतें. स्वराज्यांतर्गत व्यवस्थेंत शिवाजी महाराज जरी गुंतले होते तरी त्यांना परचक्राला सारखें तोंड द्यावें लागतच होतें. राज्याभिषेकानंतर सुद्धां त्यांना स्वस्थता कशी ती लाभलीच नाहीं. विजापूरच्या आदिलशहाशीं पुनः बेबनाव; हुबळीची लूट; उमराणी व जेसरीच्या लढाया; सावनूरची लढाई; गोंवळकोंड्यास दिलेला शह; हणमंत्यांचे करवीं कर्नाटकांत घडवून आणलेलें राजकारण, तंजावरचे राजे व्यंकोजी, शिवाजी महाराजांचे सावत्र बंधु यांचे बरोबर झालेले भाऊबंदी तंटे व त्यांचेबरोबर घडवून आणलेला तह; दिल्लीपति औरंगजेब याच्याबरोबर पुनः बेबनाव; संगमनेरची लढाई वगैरे वगैरे अनेक प्रसंगांना शिवाजी महाराजांना तोंड द्यावें लागलें. असले प्रसंग त्यांच्या अंगवळणी पडले असल्यामुळें त्यांना त्याचें विशेष कांहीं वाटलें नाहीं. परंतु या सर्व राज्यकारभाराच्या भानगडी चालू असतां त्यांचा मुलगा संभाजी हा एकाएकीं घर सोडून बाहेर पडला व शिवाजी महाराजांचे शत्रु मोंगल यांना फितुर होऊन त्यांचे छावणींत जाऊन दिलेरखानास मिळाला. या वार्तेमुळें शिवाजी महाराजांना " कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ " असें वाटलें असेल यांत शंका नाहीं.

**४ कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळः**– या बाबतींत रियासतकार संभाजी विषयीं पुढीलप्रमाणें आपलें मत व्यक्त करतात. [ मराठी रियासत भाग २ रा पान ४३९ ] " राज्य स्थापणारा पुरुष जसा पराक्रमी असतो, तसे त्याचे वंशज नेहमींच निपजतात असें नाहीं. शिवाजीचा पुत्र संभाजी दुर्वृत्त निपजला, ही गोष्ट मोठ्या राष्ट्रीय आपातास कारण झाली.

मोगल बादशहा प्रमाणें मुलगा बापावर उठल्याचें मराठशाहींत हें एकच उदाहरण आहे. संभाजीलाही ही रीत कोणी शिकविली असेल ती असो. औरंगजेबाचा पितृद्रोही मुलगा अकबर हा पुढें बापाविरुद्ध बंड करून संभाजीकडे आला. त्याचें व संभाजीचें अगोदरपासून सूत असेल; अथवा वाईट गोष्ट शिकण्यास शाळेची जरूर कोठें असते ? कांहीं असलें तरी मराठशाहीच्या प्राणप्रतिष्ठेच्या समयीं असला आपात झाला तेणेंकरून राष्ट्राची शक्ति कसास लागली. ”

संभाजीच्या बाबतींत सर यदुनाथ सरकार आपल्या शिवाजी व शिवकाल या ग्रंथांत पुढें दिल्या प्रमाणें लिहितात. [ वाकसकरकृत मराठी अनुवाद शिवाजी व शिवकाल पान २२७ ] “ शिवाजीचा वडीलपुत्र संभाजी हा म्हणजे शिवाजीच्या पूर्वजन्मीच्या पापांचा मूर्तिमंत पुतळाच होता. यावेळीं तो एकवीस वर्षांचा तरणाबांड असून मोठा क्रूर, व्यभिचारी, चंचल बुद्धीचा, अविचारी आणि स्वैरवर्तनी होता. त्यानें एका ब्राम्हण स्त्रीवर अत्याचार केल्यामुळें शिवाजीनें त्याला पन्हाळ्यावर कैदेंत ठेविलें होतें. परंतु तारीख १३ डिसेंबर १६७८ रोजीं तो तेथून आपली पत्नी येसूबाईसह निसटून कांहीं मित्रांना बरोबर घेऊन दिलेरखानाकडेस यावयास निघाला. ही बातमी शिवाजीस लागतांच त्यानें संभाजीच्या पाठीवर सैन्य पाठविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इकडे संभाजी आपल्याकडेस येत आहे हें वृत्त दिलेरखानास कळतांच त्यानें इखलासखान व घैरियतखान यांच्या हाताखालीं चार हजार फौज देऊन त्यांना बहादुरगडाहून संभाजीस सामोरें पाठविलें. ते सुप्याजवळ संभाजीस भेटले. करकंव्यास दिलेरखानही येऊन भेटला. मराठी राज्याचा वारस आपल्यास येऊन मिळाला हें पाहून दिलेरखानतर आनंद समुद्रांत पोहूं लागला. सर्व दक्षिण आपण सर केली कीं काय असा त्याला हर्ष झाला. आनंदातिशयानें त्यानें दुंदुभी वाजविल्या व औरंगजेबासहि ही खबर कळविली. संभाजीस ‘ राजा ’ ही पदवी देऊन सात हजारी मनसब बहाल करण्यांत आली व एक हत्तीहि बक्षीस दिला. ”

याप्रमाणें संभाजीचा दिलेरखानानें गौरव करून व हिंदुपदपादशाही बुडवि-ण्यास हें उत्तम साधन झालें असें समजून त्यानें संभाजी बरोबर फौज देऊन त्याला भूपालगड हस्तगत करण्याच्या कामगिरीवर रवाना केलें. भूपाळगड हा किल्ला शिवाजीनें मुद्दाम मजबूत असा बांधून तेथें संकटाच्या प्रसंगीं खजिना व इतर सामान ठेवण्याची व्यवस्था केली होती. मोंगलांशीं लढाई सुरू झाल्यास मराठी कुटुंबांनीं आश्रयार्थ येथेंच रहावें अशीहि योजना या किल्ल्या-वर केलेली होती. या किल्ल्याचा हवालदार फिरंगोजी नरसाळा हा होता. याच फिरंगोजीनें पूर्वी सन १६६२ मध्यें चाकणकिल्ल्यावर शाहस्तेखानाशीं सामना दिला होता. संभाजीनें किल्ल्याला मोर्चे लाविले व आपण स्वतः किल्ल्यासमोर उभा राहिला. फिरंगोजीनें समोर संभाजीस पाहिलें तेव्हां त्याच्या सैन्यावर तोफा डागण्याचें धैर्य त्याच्या हातून होईना. किल्ला स्वाधीन कर-ण्याविषयीं संभाजीनें त्याजकडे सक्तीचा निरोप पाठविला आणि तोफांचा मारा किल्ल्यावर सुरू केला. त्यामुळें किल्ल्याचा कोट व बुरुज हादरून गेले. किल्ल्यावरील बरेच लोक पळून गेले. उभयपक्षी बरीच मनुष्य हानी होऊन शेवटीं संभाजीनें किल्ला हस्तगत केला. तेथें मोंगलांना मुबलक धान्य व पुष्कळ खजीना मिळाला. आश्रयार्थ येऊन राहिलेल्या हजारों कुटुंबांनाहि मोंगलांनीं कैद केलें. लढाऊ फौजेपैकीं सातशें लोक बाकी राहिले होते त्या प्रत्येकाचा एक एक हात कापून टाकून त्यांना सोडून देण्यांत आलें. इतर लोकांना गुलाम म्हणून विकण्यांत आलें. याप्रमाणें संभाजीनें मोंगलांना फितुर होऊन व भूपाळगड काबीज करून शिवाजी महाराजांना हिंदुपदपादशाही विरुद्ध पहिली सलामी दिली.

यावेळीं आदिलशाही बुडविण्याचा दिलेरखानाचा हेतु सपशेल फसल्यामुळें तो विजापूरचा नाद सोडून मिरज पन्हाळ्याकडील मुलूख लुटण्याच्या काम-गिरीला लागला. याच सुमारास मिरजेचा नायक मोंगलांस मिळाला होता; शिवाय मराठी फौजेच्या जोरावर महाराष्ट्रांतील किल्ले आपण सहज हस्तगत करूं अशा बाता संभाजी मारीत होता. त्यामुळें मराठ्यांचा मुलूख लुटण्यास

दिलेरखानाला स्फुरण चढलें होतें. आदिलशाहीचा प्रदेश सोडून जाण्यापूर्वी तो विध्वंस करून टाकावयाचा असा बेत दिलेरखानाचा होता. ह्मणून तो परत फिरतांना बह्मनहली, मकनापूर, जालेगरी या रस्त्यानें संपन्न अशा तिकोटा गांवी जाऊन बसला. तेथें पुष्कळ हिंदु मुसलमान वसतीस येऊन राहिले होते. दिलेरखानाचा सरदार अचानकपणें तिकोटा लुटूं लागला हें पहातांच स्त्रियांनीं कडेवरील मुलांसह भराभर विहिरींत उड्या टाकून जीव दिले. मोंगलांनीं तिकोटा लुटून अगदीं उद्ध्वस्त केलें; व तीन हजार हिंदु मुसलमानांना कैद करून त्यांना गुलाम ह्मणून विकण्यास नेलें. तिकोट्याहून दिलेरखान अथणीस आला. मार्गांतील होनवाड, तेलसंग वगैरे गांवें लुटून आणि शेकडों लोक कैद करून बरोबर घेतले. दिलेरखानानें अथणी गांव लुटून जाळून पोळून काढलें. या गांवीं सर्व वसती हिंदूंचीच होती. तेथील सगळ्या लोकांना गुलाम करून विकण्याचें त्यांनें ठरविलें. संभाजीला हें खपलें नाहीं. त्यामुळें त्याला दिलेरखानाचा वीट आला. पुढें ता. २१ नोव्हेंबर सन १६७९ रोजीं दिलेरखान अथणी सोडून ऐनापुरास आण्याकरतां निघाला. परंतु मार्गांतच संभाजी त्याला सोडून विजापुरास गेल्याचें समजलें.

**५ संभाजीचें पुनरागमनः—** संभाजी मोंगलाकडे गेल्यापासून त्याच्याकडे शिवाजी महाराजांनीं अनेक माणसें पाठवून त्यानें पुनः परत यावें अशी खटपट चालविली होती. त्याला अनेक वचनें व प्रलोभनेंहि दाखविण्यांत आलेलीं होतीं. त्याचा मेहुणा व मामेभाऊ महादाजी निंबाळकर यावेळीं मोंगलांच्या सैन्यांत चाकरीस होता. त्यानेंहि संभाजीस त्याच्या या कृत्याबद्दल दोष दिला होता. संभाजीनें त्याचें हें वर्तन दिलेरखानास सांगितल्यामुळें त्यानें त्यास कांहीं दिवस कैदेंत ठेवलें होतें; परंतु त्याच सुमारास संभाजी निसटून गेला. औरंजेब बादशहानें विचार केला होता कीं संभाजीला आणून कैदेंत ठेवावें. ह्मणून त्यानें ' संभाजी राजियास घेऊनः हुजूर येणें ' असा दिलेरखानास हुकूम पाठविला होता. दिलेरखानाचा वकील पातशहाजवळ होता त्यानें हें वर्तमान खानास कळविलें. या औरंगजेबाच्या कपटाचा सुगावा संभाजीला

लागला म्हणून ता. २० नोव्हेंबर रोजीं रात्रौ पत्नी येसूबाई व दहा स्वार बरोबर घेऊन संभाजी गुप्तपणें अथणीहून निसटला व दुसरे दिवशीं सर्व दिवसभर घोडीं पिटाळून विजापुरास येऊन दाखल झाला. ही हकीकत दुसरे दिवशीं दिलेरखानाला समजली तेव्हां तो विजापुराकडे परत फिरला. विजापुरीं मसाउद्दानें संभाजीचा चांगला सत्कार केला. दिलेरखानानें आपला हस्तक ख्वाजा अब्दुलरजक याला विजापुरास मसाउद्दाकडे पाठविलें व त्याला पुष्कळशी लांच देऊन संभाजीला स्वाधीन करून घेण्याचा प्रयत्न केला. याहि कपटाची बातमी संभाजीला समजतांच तो तेथून रात्रीचा निसटला. शिवाजी महाराजांचे स्वार संभाजीच्या पाळतीवर होतेच. त्यांची व संभाजीची गांठ पडून त्यांनीं पुनः संभाजीला पन्हाळ्यावर डिसेंबर सन १६७९ च्या सुरवातीला सुखरूपपणें एका वर्षानंतर परत आणलें.

**६ संभाजीची नजरबंदीः**— शिवाजी महाराजांनीं संभाजीची पन्हाळ्यावर भेट घेतली. त्यांनीं त्याला चार बोधाच्या गोष्टी सांगून त्याची समजूत केली. परंतु त्याचें अंतःकरण चांगलें निवळेपर्यंत त्यास पन्हाळ्यावर, विठ्ठल त्रिंबक कारभारी, बाजी मुरार देशपांडे याचा नातु, हिरोजीफर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक वगैरे कांहीं मंडळीच्या देखरेखीखालीं ठेऊन दिलें; आणि जनार्दनपंत हणमंते यांसहि कोल्हापूर प्रांतीं राहून संभाजीवर नजर ठेवण्याचा हुकूम केला. याप्रमाणें शिवाजी महाराजांचे मरणापर्यंत संभाजी पन्हाळ्यावरच वरील प्रकारच्या बंदोबस्तांत राहिला.

**७ शिवाजी महाराजांची चिंता व अखेरः**— मोंगलांच्या तावडींतून संभाजीची वरीलप्रमाणें सुटका करून जरी त्याला पन्हाळ्यावर बंदोबस्तानें ठेविलें आणि शिवाजी महाराज जरी एका मोठ्या संकटांतून पार पडले तरी त्यांच्या अंतःकरणाला संभाजीच्या वर्तनानें जो मोठा धक्का बसला तो मात्र त्यांना सहन झाला नाहीं. नवीन स्थापन केलेली हिंदुपद-पादशाही आपल्या पश्चात् संभाजीमुळें कशी धोक्यांत येईल हें त्याच्या बंडाळीमुळें चांगलेंच प्रत्ययाला आलें होतें. त्यामुळें महाराष्ट्राचा भविष्यकाळ

त्यांना संकटमय भासूं लागला. ते उदास झाले. संभाजी सारखा अविचारी, स्वराज्यद्रोही, दुष्ट, स्वैर आणि दुराचारी राजा आपल्या पश्चात् हिंदुपदपादशाहीच्या गादीवर बसणार ही कल्पना त्यांच्या अंतःकरणाची तळमळ वाढवूं लागली. संभाजीला गादीवर न बसवितां राजारामाला बसवावें तर तो अवघ्या दहा वर्षांचा बालक. तो नांवाचाच राजा होणार! प्रतिनिधि मंडळ नेमून त्यांच्या ताब्यांत राज्याचीं सूत्रें दिलीं तरी त्यांच्या त्यांच्यामध्यें तंटे उत्पन्न होऊन स्वराज्य नाश होणार! प्रतिनिधि मंडळांत मोरोपंत पेशवे व अनाजी दत्तो हे दोघे येणारच. त्यांचे मधील कलह पराकोटीला गेलेला. अशा स्थितींत प्रतिनिधि मंडळ तरी कसें सुरळीत चालणार! राज्याचे दोन भाग पाडून एक संभाजीला व एक राजारामाला असे विभागून दिले तर त्यामुळें गृह कलह तेवढ्यापुरते थांबतील पण त्यामुळें हिंदुपदपादशाहीच्या मूळ उद्देशालाच काळिमा लागेल. अशा पेंचप्रसंगांत शिवाजी महाराज सांपडले. त्यामुळें त्यांची चिंता वाढूं लागली. त्यांची प्रकृती दिवसे दिवस खालावत चालली. शेवटीं तारीख २३ मार्च सन १६८० रोजीं त्यांना ज्वर आला व रक्ताचा अतिसार सुरू झाला. विकार त्यांना बारा दिवसपर्यंत चालू होता. या विकारांत अखेर पर्यंत स्मृति असते. "राजा पुण्यश्लोक, कालज्ञान जाणे. विचार पाहतां आयुष्याची मर्यादा झाली असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांस जवळ बोलाविलें. सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्रवूं लागलें. परम दुःख झालें. त्या उपरी राजे बोलले कीं, 'तुम्हीं चुकूर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. या मागें किती उत्पन्न झाले किती गेले. आतां तुम्हीं निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें आतां अवघे बाहेर बसा. आपण श्रीचें स्मरण करतों' ह्मणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्री भागीरथीचें उदक आणून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केले. आणि योगाभ्यास करून आत्मा ब्रह्मांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राण प्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शु॥ १५ [ तारीख ४ एप्रील सन १६८० रोजीं ] दोनप्रहरीं काळ रायगडीं जहाला"

[ सभासद ] संभाजीला पुनः पन्हाळ्यावर बंदोबस्तानें ठेवल्यानंतर अवघ्या चारच महिन्यांनीं शिवाजी महाराजांचा अंत झाला. एका अवतारी नरश्रेष्ठालाहि पुत्राच्या वर्तनानें दुःखाच्या खाईत लोटून देऊन अवघ्या चारच महिन्यांत मृत्यूनें कसें गांठलें ही विधिघटना लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**८ सोयराबाईंचा मनसुबा व संभाजीचें हत्याकांडः**—शिवाजी महाराजांच्या अंतकाळीं त्यांच्या संनिध रायगडावर राजकारभार पहाणारापैकीं बाळ जी आवजी चिटणीस, प्रल्हाद निराजी आणि रामचंद्र निळकंठ अमात्य हे तिघेच होते. पेशवे मोरोपंत पिंगळे, सेनापती हंबीरराव मोहिते, अनाजी दत्तो, जनार्दनपंत हणमंते वगैरे अष्ट प्रधानापैकीं दुसरी मंडळी नव्हती. अशा स्थितींत आलेला प्रसंग निभाऊन नेण्याची जबाबदारी पट्टाभिषिक्त राणी सोयराबाई यांच्यावर येऊन पडली. त्यांनीं शिवाजी महाराजांचा अंत्यविधी राजारामाला राज्याचा धनी करून त्याच्या समक्ष सावाजी भोंसले यांचेकडून करविला. पुतळाबाई सती गेल्या. दिवसकार्य आटोपल्यानंतर निश्चित राज्य व्यवस्था ठरविण्याकरतां सोयराबाईंनीं पेशवे, सेनापती, सचीव, सुमंत वगैरे प्रधान मंडळीस बोलावून कळविलें कीं “ संभाजीस त्याच्या दुष्ट व उग्र स्वभावामुळें राज्य आवरणार नाहीं. तो सर्वांचा नाश करून आपलाहि नाश करून घेईल. औरंगजेब समीप ठेपला आहे. त्याचा पराभव त्याच्यानें होणार नाहीं. यास्तव संभाजीस पन्हाळ्यावर बंदोबस्तांत ठेऊन राजाराम यास घेऊन राज्य रक्षण करावें, व मोंगलांचें निवारण करावें, आणि नंतर राज्य संभाजीचे स्वाधीन करावें. ” [मोडक कृत कोल्हापूर राज्याचा इतिहास उत्तरार्ध भाग १ पान ९] ही राणी सोयराबाई यांची योजना स्वराज्य रक्षण, शत्रू निवारण आणि आपणांतील मतभेदांचें निराकरण करणारी अशी अत्यंत महत्वाची होती. शिवाय रामराजांना हातीं धरून जर या प्रसंगीं राज्य कारभार केला नाहीं तर संभाजीकडून स्वराज्याचें, स्वधर्माचें आणि प्रजाजनांचें काय होईल याचें स्पष्ट शब्दांत त्यांनीं भविष्यहि कथन केलें. शिवाजी महाराजांनीं मरणसमयीं जवळच्या मंडळींना ‘ सर्वांनीं एक विचारें चालून राज्याचें व धर्माचें रक्षण करण्याविषयीं’

[ मराठी रियासत भाग २ पान ४४२ ] मोघम शब्दांत उपदेश केला. या त्यांच्या सर्व श्रेष्ठ उपदेशाला अनुलक्षून सोयराबाईची योजना होती हें स्पष्ट दिसतें. सोयराबाई या शिवाजी महाराजांच्या संगतींत वाढलेल्या व त्यांच्या चालू राजकारणाच्या चाकोरीची दिशा जाणणाऱ्या होत्या. म्हणून सोयराबाईची ही योजना सर्वांना पसंत पडली व ती पार पाडण्याकरतां सर्व मंडळी तयार झाली. त्याप्रमाणें रायगडीं बंदोबस्त करण्यांत आला. पन्हाळ्याचा हवालदार बहिरजी नाईक इंगळे हा होता. त्याचे हाताखालीं सोमाजी नाईक बंकी व हिरोजी फरजंद हे दोघे सरदार होते. कोल्हापूर प्रांतीं जनार्दनपंत हणमंते हे होते. त्या सर्वांना संभाजीस कैद करून बहुत सावधपणें असावें अशीं पत्रें जासुदाबरोबर पाठविलीं. तीं पत्रें सोयराबाईच्या आणि त्यांच्या मंत्रिमंडळाच्या दैवदुर्विपाकामुळें संभाजीच्या हातीं पडलीं व त्याला रायगडावरील राजकारणाचा भेद समजला. त्यानें हवालदार व सबनीस यांस बोलावून त्यांच्या देखत जासुदास दबावून विचारलें तेव्हां त्यानें सर्व खरी हकीकत संभाजीला सांगितली. अष्टप्रधान व सोयराबाई यांचा विचार राजारामाला गादीवर बसविण्याचा असून आपणाला कैद करण्याची त्यांची मसलत आहे हें संभाजीला समजतांच त्याचा पक्केपणीं बंदोबस्त करण्याचा त्यानें संकल्प केला. लगेच पन्हाळ्यावरील गडकरी लोकांना वश करून घेऊन सोमाजी नाईक बंकी व सूर्याजी कंक मावळा या दोन सरदारांना कैद करून उभयतांना ठार मारून टाकलें. या दोघांपासून संभाजीनें हत्याकांडाला प्रारंभ केला. हिरोजी फरजंद हा मात्र चिपळुणाकडे परागंदा झाल्यामुळें वांचला. संभाजीनें पन्हाळ्याचा पूर्ण बंदोबस्त केला व पुढील योजनेची आंखणी चालविली.

इकडे रायगडावर सोयराबाईच्या पक्षानें स्थिरस्थावर करून वैशाख वद्य ३ ला म्हणजे शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर एक महिना तीन दिवसांनीं राजारामाला गादीवर बसवून त्यांचे नांवानें कारभार चालविला. ही सर्व मंडळी रायगडावरील नवीन राजकारभाराच्या नादांत गुंतल्यामुळें संभाजीचा पक्का बंदोबस्त झाला किंवा नाहीं याची वार्ता त्यांना लागली नाहीं.

रायगड खालीं पांचाड येथें मावळ्यांचा सरदार मालसावंत यास बंदोबस्ता-करतां ठेवलें होतें. त्याचप्रमाणें तसाच बंदोबस्त ठेवण्याबद्दल कऱ्हाडास हंबीरराव मोहिते यांना पत्रें रवाना झालीं होतीं. आपला मंत्र फुटला जाऊन संभाजी एकदम बंड उभारील याची कल्पनाहि रायगडावर कोणास आली नाहीं.

संभाजीनें पन्हाळ्याचा बंदोबस्त केला परंतु पुढील मनसुबा पार पाड-ण्याकरतां त्याच्याजवळ फौज नव्हती; म्हणून त्यानें जनार्दनपंत हणमंते यांच्या हाताखालील कित्येक मंडळी फितूर करून घेऊन एके रात्रीं कोल्हापुरानजीक जनार्दनपंतांचे छावणींत जाऊन त्यांस त्यानें पकडून आणून पन्हाळ्यावर कैदेंत ठेविलें. संभाजीचा हाच पहिला विजय होय. संभाजीनें हंबीरराव मोहित्यांस आपल्या मदतीला बोलाविलें. जनार्दनपंताची वार्ता त्यांचे कानावर गेल्यामुळें धन्याचे आज्ञे बाहेर वागण्याची छाती झाली नाहीं. तो फौजेसह संभाजीला येऊन मिळाला. नंतर रायगडावर जाण्याची तयारी त्यानें केली. जनार्दनपंत कैद झाल्याची बातमी मोरोपंत पिंगळ्यांना लागतांच फौजेसह ते रायगडाकडे चालले होते. मार्गांत त्यांची व संभाजीची गांठ पडल्यामुळें मोरोपंतांनाहि संभाजीला मिळावें लागलें. पांचाड येथील मालसावंताचे लोक संभाजीला सामील झाले. रायगड किल्ल्यावरीलहि लोक संभाजीला सामील झाल्यामुळें दरवाज्याची दिंडीहि कोणी लावली नाहीं, त्यामुळें रायगड किल्ल्यांत संभा-जीचा विनाप्रयास प्रवेश आला. तेथें गेल्यावर पहिल्यानें मोरोपंत पिंगळे, अनाजी दत्तो व राजाराम यांस संभाजीनें कैद केलें. मालसावंत आदिकरून पंधरा इसमांना पकडून जिवें मारलें. राणी सोयराबाई यांच्यावर शिवाजी महाराजांना त्यांनीं विषप्रयोग करून ठार मारलें असा गुन्हा लादून त्यांना भिंतींत चिणून ठार केलें. याशिवाय शिवाजी महाराजांच्या विश्वासांतल्या व लोभां-तल्या सुमारें दोनशें सरदारांना जबरदस्त शिक्षा केल्या. मोरोपंताचे पायांत बेडी ठोकली. त्याचें घर लुटलें. त्याचें पद काढून घेऊन तें बहिरोपंत उधो योगदेव याला दिलें. सोयराबाईचें माहेर शिर्क्यांच्या कुळीचें असल्यानें

संभाजीविरुद्ध त्यांनीं सोयराबाईंना मदत केली म्हणून शिर्के कुळांतल्या प्रत्येक सरदाराची संभाजीनें कत्तल केली. शिर्क्यांचें शिरकाण केलें. याचा अर्थ शिर्का जेथें सांपडेल तेथें त्याचें शीर तोडलें. फक्त गणोजी शिर्के मोंगलांकडे पळून गेल्यामुळें बांचला. अनाजी दत्तो; बाळाजी आवजी चिटणीस, त्याचा भाऊ शामजी आवजी व मुलगा आवजी बल्लाळ आणि हिरोजी फर्जंद यांना संभाजीनें हत्तीच्या पायाखालीं देऊन ठार केलें. सोयराबाईंच्या पक्षांत असल्याचा ज्यांच्या ज्यांच्या बद्दल संभाजीला संशय आला त्यांची त्यांची त्यानें क्रूरपणानें कत्तल उडविली. कित्येकांना डोंगरी किल्ले दाखविले आणि कित्येकांना हद्दपार केलें. एकंदरींत शिवाजी महाराजांनीं महाप्रयासानें जीं जीं नररत्नें संपादन केलीं व ज्यांच्या बळावर हिंदुपदपादशाहीची स्थापना केली त्यांतील अनेकांचा नाश सिंहासनाला पाय लागण्यापूर्वीं व नंतरहि संभाजीनें केला. त्याच्या करवीं झालेल्या या स्वराज्याच्या मानवी संपत्तीचा नाश पाहिला म्हणजे सोयराबाईंनीं सुरवातीला म्हटल्याप्रमाणें ‘ तो ( संभाजी ) सर्वांचा नाश करून आपलाहि नाश करून घेईल ’ यांतील पूर्वार्धाचा प्रथमारंभींच दृक् प्रत्यय आला. थोर आणि साध्वी स्त्रियांच्या शब्दांत केवढें कठोर सत्य दडून बसलेलें असतें याचा प्रत्यय सोयराबाईंनीं अष्टप्रधानापुढें काढलेल्या प्रत्येक शब्दाप्रमाणें घडून आलेल्या परिणामावरून पुढें दिसून येईल. कुऱ्हाडीचा दांडा नेहमींच गोताला काळ होतो म्हणून कुऱ्हाडीचा दांडा कोणता हें विचारवंत माणसें तेव्हांच ओळखतात. शिवाजी महाराजांनीं संभाजीला तसेंच ओळखलें होतें; परंतु त्यांच्या अनपेक्षित मरणामुळें त्यांना संभाजीचा हिंदुपदपादशाहीच्या दृष्टीनें कायमचा बंदोबस्त करतां आला नाहीं. भवितव्य दुसरें काय !

---

# प्रकरण ३ रें.

## आत्मनाश व सर्वनाश.

**१ संभाजी महाराजांचा राज्याभिषेक. २ कविकुलेश. ३ संभाजी व अकबर. ४ अकबर व कविकुलेश. ५ अकबराचे आडाखे. ६ कविकुलेश म्हणजे कलिप्रवेश. ७ औरंगजेबाचें वैभव व सामर्थ्य. ८ सेनापति हंबीररावांचा मृत्यु. ९ संभाजी राजांची कैद. १० संभाजी राजे यांचा अमानुष वध. ११ राजाराम महाराजांचें जिंजीस पलायन. १२ रायगडाचें पतन व मराठी सिंहासनाचें भंजन १३. सोयराबाई यांचे सत्योद्धार.**

**१ संभाजी महाराजांचा राज्याभिषेकः—** शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सुमारें साडेतीन महिन्यांनीं नागपंचमीचे दिवशीं संभाजी महाराजांनीं सिंहासनारोहण केलें. नंतर सुमारें सहा महिन्यांनीं म्हणजे शके १६०२ माघ शुद्ध दशमीस ( फेब्रुवारी सन १६८१ ) यथाविधि राज्याभिषेक करून घेतला. प्रधान मंडळाकडे त्यांनीं पूर्ववत् कामें सोंपविलीं, परंतु तीं कामें त्या लोकांकडून प्रत्यक्ष न घेतां त्यांच्या मुतालिकांकडून घेण्याचा त्यांनीं क्रम चालविला. संभाजी महाराजांची पत्नि येसूबाई या पिलाजीराव शिर्के यांच्या कन्या. यांचें लग्न सन १६६७ च्या सुमारास संभाजी महाराज दिल्लीहून परत आल्यानंतर झालें. यांना शके १६०२ मार्गशीर्ष शु॥ १० ( डिसेंबर सन १६८० ) रोजीं मुलगा झाला. त्याचें नांव शिवाजी. हाच पुढें शाहु या नांवानें प्रसिद्धीस आला.

**२ कविकुलेशः**—संभाजी महाराजांची कारकीर्द कलुशा या नांवाच्या

कनोजी ब्राह्मणाचे पायावर अधिष्ठित असल्यामुळें त्याची थोडी माहिती येथें देणें अवश्य आहे. ‘ कविकुलेश ’ अथवा कलुशा हा कनोजा ब्राह्मण असून तो अलहाबादेजवळचा राहणारा होता. तो भोसल्यांचा काशी क्षेत्रांतील कुलोपाध्या म्हणजे पंडा होता. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून गेल्या-नंतर परत दक्षिणेंत येतांना त्यांनीं संभाजी महाराजांना या कविकुलेशाच्या स्वाधीन केलें होतें. तेथून तो त्यांना घेऊन दक्षिणेंत आला. तेव्हांपासून त्यांच्याच जवळ तो राहिला. ‘ कविकुलेश ’ याचा महाराष्ट्रांत कलुशा या सुटसुटीत शब्दांत अपभ्रंश झाला. हा मंत्रविद्येंत प्रवीण होता अशी त्याची ख्याती होती. त्या विद्येपुरतें त्याला संस्कृतहि येत होतें. तो मधुरभाषणी व दुसऱ्यावर सहज आपली छाप पाडणारा होता. उत्तर हिंदुस्थानातील क्षेत्रांच्या ठिकाणीं त्यावेळीं गांजा, भांग वगैरे व्यसनें प्रचलित होतीं. कलुशा त्यांत तरबेज होता असें दिसतें. संभाजी महाराज दोन तीन वर्षेंतरी त्याच्या संगतींत राहिले होते. दक्षिणेंत आल्यावरही कलुशा संभाजी महाराजांजवळ होता. संभाजी महाराजांच्या व्यसनाचा गुरु कलुशा हाच होता असें दिसतें. सोय-राबाईचा पक्ष नेस्तनाबूत करण्याकरतां संभाजी महाराजांनीं आपल्या क्रूरपणाची जरी कमाल केली असली तरी त्यामुळें आपल्याविरुद्ध कोण आणि केव्हां फितुर करील याची धास्ती मात्र त्यांचे मनांतून गेली नाहीं. महाराष्ट्रांतील कोणताहि पुरुष आपल्या बरोबर शेवटपर्यंत प्रामाणिक राहील असा त्यांना विश्वास वाटत नव्हता. कलुशा हा उत्तर हिंदुस्थानी इसम असल्यामुळें व त्याचे हितसंबंध महाराष्ट्रांत कोठेंही गुंतलेले नसल्यामुळें आपल्यावरोबर अप्रामाणिक होण्याचें त्याला कारण नाहीं या भरंवशावर संभाजी महाराजांनीं त्याच्यावर विश्वास ठेवला. त्यांनीं जरी राज्यकारभार पहाण्याकरता अष्टप्रधान नेमले असले तरी त्या सर्वांना एकट्या कलुशाच्या तंत्रानें काम करावें लागे. कलुशानें संभाजी महाराजांची एवढी मर्जी संपादन केली कीं एकट्या कलुशाशिवाय त्यांच्यापुढें अष्टप्रधानांपैकीं कोणीहि जाण्यास धजत नसे. एकंदरींत संभाजी महाराजांच्या राज्यकारभाराची व त्यांच्या

जीविताची नौका कलुशाच्या मर्जीच्या आणि बुद्धिमत्तेच्या वाऱ्याच्या जोरावर सभोंवारच्या खवळलेल्या तुफानी शत्रुसागरांतून जावयाची होती. संभाजी महाराजांनीं कलुशाला 'छंदोग.मात्य' (मंत्रविद्याप्रयोजक) हें पद दिलें होतें. कलुशाला महाराष्ट्राचा किंवा मराठी राज्याचा अभिमान असण्याचें कारण नव्हतें. त्याचा स्वाभाविक ओढा उत्तर हिंदुस्थानाकडे, त्याच्या स्वदेशाकडे होता.

३ **संभाजी व महंमद अकबर**— अशा स्थितींत औरंगजेबाचा मुलगा महंमद अकबर हा बंड उभारून आपल्या बापाबरोबर लढणार होता; परंतु ही वार्ता औरंगजेबाला समजल्यामुळें तो दुर्गादास राठोड यास बरोबर घेऊन पळून दक्षिणेंत आला. त्याचे मनांत संभाजी महाराजांची मदत घेऊन बापाबरोबर लढून दिल्लीचें तक्त काबीज करावयाचें होतें. तो नर्मदा उतरून ब्ऱ्हाणपूर, तालनेर बागलाणमधून संभाजी महाराजांच्या मुलखांत आला. त्यानें संभाजी महाराजांबरोबर व कलुशाबरोबर जो पत्रव्यवहार केला तो पुढें दिल्याप्रमाणें आहे. [सदर पत्रें यदुनाथ सरकारांनीं मॉडर्न रिव्ह्यूमध्यें प्रसिद्ध केलीं आहेत. मराठी रियासत भाग २ पान ५६४.] (१) 'राज्य करूं लागल्यापासून हिंदूंस बुडवावें, असा औरंगजेबाचा निश्चय आहे. रजपुतांशीं युद्ध करण्याचें कारण हेंच. सर्व लोक ईश्वराचीं लेंकरें असून राजा हा त्यांचा संरक्षक आहे; म्हणून लोकांचा नाश करणें बादशहास योग्य नाहीं. औरंगजेबाचीं कृत्यें मर्यादेबाहेर गेलीं; आणि माझी खात्री झाली कीं, लोकांचा आपण अशा रीतीनें नाश केला तर हा देश आपल्या हातचा जाईल. अशा स्थितींत तुमचें राज्य बादशहाचें मुक्कामापासून दूर आहे असें पाहून, मी तुमचेकडे येणेचा निश्चय केला. दुर्गादास राठोड मजबरोबर आहे. मजबद्दल आपलें मन निःशंक असूं द्या. परमेश्वरकृपें मला राज्य मिळालें तर मी फक्त नांवाचा धनी, राज्य सर्व तुमचें असें समजा. आपण दोघांनीं मिळून बादशहाचा पाडाव करूं. सुज्ञांस बिस्तारें काय लिहावें.' (तारीख ११ मे सन १६८१). (२) त्यापुढील पत्र संभाजी महाराजांना महंमद अकबरानें तारीख

२० फेब्रुवारी सन १६८२ चें लिहिलें तें पुढील प्रमाणें:—' कवि कुलेश हे तुमचे फार उत्कृष्ट व विश्वासू नोकर आहेत. त्यांजबद्दल तुमच्या इतर प्रधानांस वैशम्य न वाटो म्हणजे झालें. कांहीं झालें तरी, तुम्हीं त्यांचें रक्षण केलें पाहिजे. तुमच्या लिहिण्यावरून तुम्हीं हल्लीं खेळणा किल्ल्याकडे गेलां आहां, असें मी समजतों. तुमची इच्छा असेल तर मीही तुम्हांस येऊन मिळतों.' (३) महंमद अकबरानें कविकुलेशाला लिहिलेलें पत्र, ' कविकुलेश यास. १३ मार्च १६८२ रोजीं मी जैतापुरास पोहोंचलों. पत्र पावतांच तुम्ही येऊन मला भेटा. शत्रू नजीक येत आहेत. कोणेवेळेस काय होईल याचा नेम नाहीं.' (४) महंमद अकबरनें कविकुलेशाला तारीख १८ आगष्ट १६८२ ला लिहिलेलें पत्र. ' तुमचें पत्र पोंचून मजकूर कळला. पांचाड येथें तुम्हीं आल्याचें समजलें. मोंगलाशीं तह करण्यास माझी हरकत नाहीं. परंतु तह करावा असें मला वाटत नाहीं. तुमच्या भेटीची जरूर आहे. पुष्कळ राजकारणें ठरवितां येतील. हीं राजकारणें पावसाळ्यांतच केलीं पाहिजेत. तह होत आहे असें समजून स्वस्थ मात्र बसूं नका. पावसाळा संपल्यावर भीमगडचें काम हातीं घ्यावें.' नीट विचार करून काय करणें तें करा.' (५) महंमद अकबरचें कविकुलेशाला तारीख ११ सप्टेंबर सन १६८२ चें पत्र. ' तुमची प्रकृति बरी नाहीं हें कळलें. तह करणें किंवा न करणें हें केवळ संभाजीच्या व तुमच्या मर्जीवर आहे. परंतु तहाच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन स्वस्थ बसणें मात्र योग्य नाहीं. विजापूरच्या कामाचें काय झालें तें कळवावें.' (६) हें पत्र महंमद अकबरानें कविकुलेश यास लिहिलेलें आहे. " तुमचीं दोन पत्रें पोहोंचलीं. २ जानेवारी १६८३ रोजीं तुम्ही माझ्या भेटीस येणार म्हणून लिहिलें तें कळलें. आमच्या शास्त्राप्रमाणें हे दिवस ' अशूरा ' असून भेटीस योग्य नाहींत. पुढें कोणतातरी दिवस नेमून लिहून पाठवा, म्हणजे त्या दिवशीं मी साखरण्याहून निघून मलकापुरास येतों. पत्रोत्तर तातडतोब पाठवावें. " (७) महंमद अकबरचें कविकुलेश यास पत्रः-- ' तुमचें पत्र पोंचलें. १ जानेवारीस ग्रहणाचे स्नानासाठीं तुम्हीं कोल्हापूरास जाणार असून १६।१७ तारखेला मलकापुरांत

येऊन मला भेटा म्हणून लिहिलें तें समजलें. मीही साखरण्याहून निघून त्या सुमारास तेथें येतो. तुम्ही तेथें येऊन भेटण्यास चुकूं नये नंतर तेथून तुम्हांस कोल्हापूरास जाता येईल. कळावें. '

महंमद अकबरानें संभाजी महाराज व कलुशा यांच्या बरोबर केलेला हा पत्रव्यवहार सूक्ष्म दृष्टीनें पाहिला म्हणजे संभाजीनें आपल्या बापाविरुद्ध एकदम उठून निर्धास्तपणें मोंगलांच्या आश्रयाला जाणें आणि संभाजी महाराज सिंहासनारूढ होतात न होतात तोंच औरंगजेबाच्या मुलानें बापाविरुद्ध उठून एकदम संभाजी महाराजांच्या आश्रयाला निःशंक येणें या दोन्हीं घटना विचारांत घेतां यांचा सूत्रचालक एकच व्यक्ति असावी असा संशय आल्यावांचून रहात नाहीं. वरील पत्रव्यवहार पाहिला म्हणजे त्या बाबतींत बरीच संशयनिवृत्ति झाल्याशिवाय राहत नाहीं. पहिल्या पत्रांत अकबरानें आपला हेतु स्पष्ट केलेला आहे. त्याला बापाचें तख्त संभाजी महाराजांच्या मदतीनें मिळवावयाचें होतें. त्या मदतीच्या मोबदल्याचाही त्या पत्रांत स्पष्ट उल्लेख आहे. ' मला राज्य मिळालें तर मी फक्त नांवाचा धनी, राज्य सर्व तुमचें असें समजा. ' यावरून सर्व मोंगलराज्याच्या आधिपत्याचा मोबदला महंमद अकबर संभाजी महाराजांना देणार होता. या प्रचंड मोबदल्याकडे पहातां पाताळयंत्री औरंगजेबानें आपला मुलगा महंमद अकबर याला मराठी राज्यांतील अंतर्गत कारभाराचा सुगावा काढण्याकरतां हेर म्हणून पाठविलें असावें अशी कल्पना येण्यासारखी होती. संभाजी पळून दिलीरखानाकडे आला ही बातमी औरंगजेबाला समजली तेव्हां ' आपणाकडील बातमी काढून घेण्याकरतांच शिवाजीनें हेर म्हणून संभाजीस पाठविलें असेल असें त्यास [ औरंगजेबास ] वाटलें. ( मराठी रियासत भाग २ पान ४४० ) ' म्हणून त्यानें संभाजीला कैद करून दिल्लीस पाठवून देण्याचा दिलीरखानाला हुकूम पाठविला. त्यावेळीं संभाजी परत येऊन पन्हाळ्यास शिवाजी महाराजांचे बंदींत राहिल्यामुळें औरंगजेबाला आपली कल्पना कदाचित व्यर्थ होती असें वाटलें असेल. परंतु तोच उलट डाव यावेळीं आपला मुलगा अकबर याला मराठी राज्यांत पाठ-

वून औरंगजेब खळत असेल असें प्रधान मंडळांतील मुत्सद्यांना वाटणें स्वाभाविक होतें. दिलीरखानानें संभाजीला मोठ्या सन्मानानें वागविलें तसेंच संभाजी यावेळीं महंमद अकबराला वागवीत होता. ‘संभाजीनें त्याचा (अकबराचा) सत्कार उत्कृष्ट केला. रायगडापासून सहा मैलावर एका वाड्यांत त्यास ठेविलें. संभाजीनें अकबरास मोठ्या सन्मानानें व औदार्यानें वागविलें.’ (मराठी रियासत भाग २ पान ५६४.) या संभाजी महाराजांच्या स्वराज्याचे शत्रू म्हणून मानल्या जाणाऱ्या पादशहाच्या पुत्राबरोबर होणाऱ्या वागणुकीमुळें धोक्यानें स्वराज्याचा नाश होईल म्हणून त्यापासून संभाजीमहाराजांना परावृत्त करण्याचा कोणताही स्वराज्यभक्त प्रयत्न करीलच करील. त्या दृष्टीनें अनाजी दत्तो, शिर्के सरदार, प्रभु बाळाजी आवजी वगैरे स्वराज्यभक्त प्रयत्न करीत असण्याचा संभव होता. परंतु भलत्याच संशयानें संभाजी महाराजांनीं त्यांचा म्हणजे पर्यायानें स्वराज्याचा नाश केला, आणि परकीय कलुशाचा दर्जा वाढविला. स्वकीयांचा अविश्वास धरणें व परकीयांना विश्वासांत घेणें हें निःसंशय आत्मनाशाचें आहे.

**४ अकबर व कविकुलेशः**— दुसरें पत्र पहिल्या पत्रानंतर सुमारें नऊ महिन्याचें आहे. त्या पत्रांत ‘कविकुलेश हे तुमचे फार उत्कृष्ट व विश्वासू नोकर आहेत. त्यांजबद्दल तुमच्या इतर प्रधानांस वैषम्य न वाटो म्हणजे झालें. कांहीं झालें तरी तुम्हीं त्यांचें रक्षण केलें पाहिजे’ असा मजकूर आहे. हें पत्र कलुशाचे संबंध मोंगलांबरोबर कसे होते हें ठरविण्याचे बाबतींत अत्यंत महत्वाचें आहे. महंमद अकबराशीं कलुशाचा बरेच दिवसांचा परिचय, पत्रव्यवहार आणि राजकारणी संबंध असल्याशिवाय त्यानें संभाजी महाराजांना आपल्या पत्रांत ‘कविकुलेश हे तुमचे फार उत्कृष्ट व विश्वासू नोकर आहेत,’ असें लिहिलें नसतें. महंमद अकबरानें केवळ कलुशाबद्दल प्रशंसोद्गार काढून आपलें म्हणणें थांबविलें नाहीं, तर तो मराठी राज्याच्या कारभारांत घुसून संभाजीला पुढें लिहितो ‘त्यांजबद्दल तुमच्या इतर प्रधानांस वैषम्य न वाटो म्हणजे झालें.’ यावरून कलुशा हा संभाजी महाराजांच्या इतर प्रधानांना

वैषम्य वाटण्यासारखा, बुद्धिवान, कर्तृत्ववान, मुत्सद्दी, आणि परकीय राज्यांत वजन असलेला असा श्रेष्ठ पुरुष आहे अशी स्वानुभवाची ग्वाही महंमद अकबर संभाजी महाराजांना देतो. महंमद अकबरानें कलुशाचा पक्ष येवढ्यावर-च सोडला नाहीं. तर तो पुढें लिहितो ' कांहीं झालें तरी तुम्हीं त्याचें रक्षण केलें पाहिजे. ' महंमद अकबरानें या वाक्यानें आपल्या दिल्लीपति बादशहाच्या पुत्राच्या वशिल्याचें वचन ह्मणून संभाजी महाराजांवर टाकलें आहे. कलुशा विषयीं महंमद अकबराचे मनांत एवढ्या आपुलकीच्या भावनेचा पान्हा कां उत्पन्न झाला ? इतर प्रधानाबद्दल कां झाला नाहीं ? याचें कारण एकच आहे. इतर प्रधान महंमद अकबराविरुध्द होते व कलुशा तेवढा त्याच्या विश्वासाला व त्याच्या उद्दिष्टाच्या सहाय्याला पात्र ठरलेला होता. कलुशाबद्दल थोडक्यांत पण पुष्कळ लिहावयाचें ह्मणजे त्यानें संभाजी महाराजांपेक्षां स्वराज्याचे जे शत्रू मोंगल त्यांचा विश्वास जास्त संपादन केलेला होता असें स्पष्ट दिसतें.

मागील पांच पत्रें महंमद अकबरानें कलुशालाच लिहिलेलीं आहेत. त्या पत्रांवरून संभाजी महाराजांचा मुक्काम केव्हां व कोणत्या ठिकाणीं होणार याची बातमी कलुशाकडून महंमद अकबराला मिळत होती. औरंगजेब हा दक्षिणेंतील राज्यें बुडविण्याच्या तयारीनें तारीख ८ सप्टेंबर सन १६८१ रोजीं अजमीर सोडून दक्षिणेकडे निघाला. आपले अधिकारी मराठ्यांशीं मनापासून लढत नाहींत; लांच वगैरे घेऊन स्वस्थ बसतात असा, त्याला संशय आल्यामुळें तो स्वतः मोहिमेवर निघाला होता. तारीख २२ मार्च सन १६८२ रोजीं तो औरंगाबादेस येऊन दाखल झाला. तेथून त्यानें आपले दोन मुलगे मुअजम व अजीम यांस संभाजीवर पाठविलें. बागलाणांत सालेरचा किल्ला हा सुरत व खानदेश या दोन्हीं जिल्ह्याचें नाकें असून तो ताब्यांत ठेवण्याकरतां शिवाजी महाराजांनीं अति परिश्रम केले होते. तो किल्ला अजीम येण्यापूर्वींच फितुरीमुळें मोंगलांनीं हस्तगत केला होता. सन १६८२ च्या फेब्रुवारी महिन्यांत अजीम हा बहादूरखानाला बरोबर घेऊन नाशिक त्रिंबकाच्या बाजूला आला. त्यानें मराठ्यांचे कित्येक किल्ले हस्तगत केले. पुढें मोंगलसेना रामसेज किल्ला घेण्या

करतां निघाली. अजीमच्या स्वारीची ही वार्ता सेनापति हंबीरराव मोहिते याला कळतांच तो बागलाणांत गेला. रामसेज किल्ल्यानजीक त्याची व अझीमची लढाई झाली. त्यांत हंबीरराव पराभव पावून परत दक्षिणेकडे फिरला. मोंगल त्याचा पाठलाग करीत सातारा मिरजेपर्यंत आले. अशा वेळीं औरंगजेबाचा तिसरा मुलगा महंमद अकबर संभाजीच्या हालचाली निरखून पाहत होता. आणि संभाजीच्या भेटीची अपेक्षा करीत होता. ‘ शत्रू नजीक येत आहेत. कोणे वेळेस काय होईल याचा नेम नाहीं. ’ अशी भीति दाखवून आपल्याबद्दल आस्था व आदर उत्पन्न व्हावा अशी रीत तिसऱ्या पत्रांत आहे. चवथ्या पत्रांत मोंगलांबरोबर तह करूं नये असा सल्ला महंमद अकबर देतो. यावरून कलुशाची औरंगजेबाबरोबर तह घडवून आणण्याची खटपट चालू होती असें स्पष्ट दिसतें. पावसाळ्यानंतर संभाजी महाराजांनीं कोणतें राजकारण हातीं धरावें याचाही सल्ला महंमद अकबर देतो. एकंदरींत मराठ्यांच्या भावी हालचालींचाही सुगावा महंमद अकबर घेत होता हें चवथ्या पत्रावरून स्पष्ट होतें. पांचव्या पत्रांत महंमद अकबर कलुशाचा दर्जा मराठी राज्यांत संभाजी महाराजांच्या खालोखाल आणून ठेवतो. ‘ तह करणें किंवा न करणें हें केवळ संभाजीच्या व तुमच्या मर्जीवर आहे. ’ शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेलें स्वराज्य या वाक्यप्रयोगानें आतां केवळ दोनच इसमांच्या हातांत खेळत आहे, अशी ठाम समजूत प्रदर्शित केली आहे. शिवाय ‘ तहाच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन स्वस्थ बसणें मात्र योग्य नाहीं ’ असा मजकूर लिहून जर तह झाला नाहीं तर मोंगलांशीं सामना देण्याची कोणती व कशी योजना ते आंखणार होते याची माहिती काढण्याची व मिळविण्याची खटपट केली आहे. तह घडून न आल्यास मराठे विजापूरकरांबरोबर तह करून उभयतां एक होऊन मोंगलांना सामना देण्याचा मनसुबा ठरवितात कीं काय याची बातमी काढण्याकरतां ‘ विजापूरच्या कामाचें काय झालें तें कळवावें ’ असें लिहून बातमी काढण्याचा प्रयत्न केला आहे. सहाव्या व सातव्या पत्रांत संभाजी महाराजांची भेट कलुशा ठराविक ठिकाणीं करून देऊं शकतो कीं नाहीं हें

अजमावण्याकरतां आहे. त्याप्रमाणें सुमारें वीस पंचेवीस दिवस अगोदर मलकापुरीं संभाजी महाराजांची व महंमद अकबरची भेट घडवून आणण्याची योजना कलुशानें केली व त्याप्रमाणें ती त्यानें सिद्धीस नेली. ही हकीकत घडल्यानंतर थोड्याच दिवसांनीं महंमद अकबर पश्चिम किनाऱ्यावर गलबतांत बसून इराणांत निघून गेला.

५ **महंमद अकबराचे आडाखे**—महंमद अकबराच्या या मराठी राज्यांतील दाऱ्यांत त्याला पुष्कळशा राजकारणाचे आडाखे बांधतां आले. १. संभाजीबद्दल त्याच्या प्रजाजनांत असंतोष उत्पन्न झालेला आहे. २. त्याचा मुख्य मंत्री कलुशा आहे. ३. कलुशाबद्दल प्रधान मंडळांत वैषम्य उत्पन्न झालें आहे. ४. कलुशा आपला सहायकर्ता असून त्याच्यावर संभाजीचा पूर्ण विश्वास आहे. ५. राजकारणांत तो कलुशाच्या पूर्ण आधीन आहे. ६. कलुशाच्या ठिकाणीं अस्मानी सुलतानी घडवून आणण्याची पात्रता आहे. वगैरे वगैरे अंतर्गत भेद महंमद अकबरला समजले. आपल्या बापाबरोबर लढण्यास संभाजी महाराजांची मदत आपणाला किती व कोणत्या मार्गानें होईल याचा अंदाज काढण्याकरतां जरी तो वरील प्रमाणें माहिती मिळवीत होता तरी त्याच ठाम बातमीला अनुसरून पुढें मोगलांचें राजकारण ज्याअर्थी सुरू झालें त्याअर्थी महंमद अकबर हा औरंजेबाचा हेर होता, तो आपल्या दोन भावाप्रमाणें बातमी काढण्याच्या कामगिरीवर आला होता, असें अनाजी दत्तो, शिर्के वगैरेंना वाटत असल्यामुळें केवळ राज्यरक्षाकरतां ते संभाजीविरुद्ध राजाराम यांचा पक्ष घेऊन प्रयत्न करीत होते असें दिसतें. यांत त्यांचा जरी प्रामाणिकपणा होता तरी त्याचें आकलन संभाजी महाराजांना झालें नाहीं आणि केवळ संशयाला बळी पडून त्यांनीं अनाजी दत्तोचा वध केला. कलुशाला दक्षिण प्रांताचा अभिमान असण्याचें कारण नव्हतें हें मागें दिलेंच आहे. हिंदुस्थानांत एखादी जहागीर मिळाल्यास वाटेल तें करण्यास कलुशा तयार होईल असें पाताळयंत्री औरंगजेबाला कळल्यानंतर त्यानें त्या दृष्टीनें त्याचा उपयोग करून घेतला. मराठेशाही

बुडविण्याचा कलुशा हें एकच साधन आहे अशी ठाम समजूत औरंगजेबाची झाली. ' संभाजीस वश करून आपल्या ताब्यांत आणून देण्याकरतां कलुशास औरंगजेबानें नाना तऱ्हेनें भारून आपले हेर म्हणून बुध्या संभाजीकडे पाठविलें. ' असें जें बखरीकार म्हणतात त्याच्या मुळाशीं महंमद अकबराचें आगमन व कलुशा आणि संभाजी महाराज यांची त्याच्याशीं वागणुक हींच मुख्य कारणीभूत आहेत. औरंगजेबानें कलुशाला आपल्या हातीं घेण्याचा महंमद अकबराच्या दक्षिणेंतील दौऱ्यानंतर प्रयत्न केला असा दिसतें. एकंदरींत संभाजीचें बापाविरुद्ध उठून मोंगलांकडे जाणें व महंमद अकबरानें दक्षिणेंत संभाजीकडे येऊन मोठ्या सन्मानानें दौरा करून जाणें याच्या मुळाशीं कलुशा हाच सूत्रधार होता असें ठरतें. या सूत्रावरच संभाजी महाराजांची सर्व कारकीर्द अवलंबून होती हें पुढील इतिहासावरून दिसून येईल.

६ **कविकुलेश म्हणजे कलि-प्रवेशः—** कलुशाचा राज्यकारभारांत प्रवेश झाल्यानंतर स्वराज्याचा कसा नाश होऊं लागला याचें विवेचन रियासतकारांनीं पुढें दिल्याप्रमाणें केलें आहे. ' कलुशावर संभाजीचा पूर्ण भरंवसा व बहाल मर्जी असे. त्याचेशिवाय राज्यांत पानही हालेनासें झालें. कलुशा हा बोलून चालून परकी; तेव्हां राज्याचें अगर लोकांचें कल्याण करण्याची बुद्धि त्यास नव्हती. हातीं आलेला अधिकार स्वार्थाकडे वापरण्यापलीकडे त्यास कांहीं दिसत नव्हतें. याप्रमाणें सर्व कारभारावर दक्षता ठेवणारे प्रधानमंडळ नाहींसें होतांच राज्यांत अव्यवस्था पसरली. शिवाजीचे नियम व शिस्त मोडून गेली. लष्कराचा बंदोबस्त अगदीं बिघडला. मिळवून आणलेली लूट लोक छपवूं लागले. जो तो लष्कराबरोबर आपल्या बायका घेऊन जाऊं लागला. एखाद्या ठिकाणीं लूट करतांना संभाजीचे लोक बायकांही पकडून आणूं लागले. शिवाजीचा भरलेला खजिना लवकरच खलास झाला. नवीन भर येण्याची बंद होऊन खर्चाचीं द्वारें मात्र अतोनात वाढलीं. लष्करास पगार वेळेवर पोंचेना; तेव्हां मुलख लुटून ज्यानें त्यानें आपला पगार भागवून घ्यावा, अशी परवानगी लष्करास राजरोस देणें भाग पडलें.

त्याशिवाय गत्यंतर नव्हतें. शिवाजीनें अतोनात पैसा मिळवून ठेवला आहे, तो कधीही संपावयाचा नाहीं, अशी संभाजीची समज होती. कलुशास पैशांची अडचण पडूं लागली, तरी यजमानास राग येईल म्हणून त्यानें खरा प्रकार त्यास कळूं दिला नाहीं. रघुनाथपंत मरण पावल्यावर कर्नाटकांतून वसूल येण्याचा बंद झाला. पैसा मिळावा म्हणून कलुशानें जमिनीचा सारा वाढविला. परंतु शिवाजीच्या इतकाही सारा वसूल होण्याची मारामार पडूं लागली. तेव्हां प्रांतांतील कामगार पैसेखाऊ आहेत, असें कलुशास वाटून त्यानें त्यास कामावरून दूर केलें, व तो प्रांताचे प्रांत इजाऱ्यानें म्हणजे मक्त्यानें लोकांस वहिवाटीस देऊं लागला. जे कोणी जास्त वसूल देतील, त्यालाच इजारा मिळावयाचा. त्यामुळें रयत त्रासून मुलुख सोडून जाऊं लागली. सारांश, लष्कराची बाजू संभाजीनें उगी पडूं दिली नाहीं, तरी राज्यपद्धति नीट चालली नाहीं, म्हणून नुकसान फार झालें.' (मराठी रियासत भाग २ पान ५८०–८१) एकंदरींत कवि कुलेश याचा मराठी राज्यकरभारांत प्रवेश होणें म्हणजे तो साक्षात् कलिप्रवेशच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**७ औरंगजेबाचें वैभव व सामर्थ्यः**— संभाजी महाराजांच्या स्वराज्य-कारभाराची अशी व्यवस्था चालू असतांना औरंगजेब दक्षिणेंतील राज्यें बुडविण्याकरतां जो आला त्यावेळीं त्याची तयारी कशी होती तीही पहाणें इष्ट आहे. त्याचें वर्णन डफसाहेब खालीलप्रमाणें करतोः औरंगजेबानें 'आपल्या राज्यांतल्या सर्व प्रांतांतील सैन्य बहुत जमा केलें होतें. त्यांत उत्तरेकडचे लोक यांचीं शरीरें मोठीं आणि अंगांतून चिलखतें चढविलेलीं, तीं जड लोखंडाचीं, व त्यांचे घोडेही मोठे उंच आणि पुष्ट होते. दक्षिणी लोक केवळ सुकुमार दिसत. तसेंच पायदळामध्यें कितीएक चापांचे बंदुकवाले, व कितीएक तोड्यांचे बंदुकवाले व कितीएक तीरकमानवाले असत. त्याचा सरंजाम बहुत उत्तम होता, आणि लहान व मोठ्या अशा तोफा पुष्कळ होत्या. गोलंदाजांमध्यें फिरंगी होते; याखेरीज कितीएक ओझीं वहावयाचे व

कितीएक लढाऊ असे हत्तीही बहुत होते. त्या औरंगजेबाचा दिल्लीमध्यें बेत चालत होता त्यांत किमपि अंतर न पडतां प्रवासांतही तसाच चालत होता. त्याचा शिकारखानाही बरोबर होता. त्याच्या डेऱ्याच्या सभोंवतीं लावावयाची कनाथ चोविसशें हात लांब होती. त्याच्या कचेरीच्या डेऱ्यांत व एकांतीं मसलत करावयाच्या डेऱ्यांत त्याचें बसावयाचें रत्नजडित सुवर्णाचें अत्यंत सुंदर सिंहासन मांडलेलेंच असे. याखेरीज विषयोपभोगार्थ जनानखान्याचे कितीएक डेरे असत, आणि स्नानसंध्येसारिखें त्या लोकांचें कांहीं निमाज वगैरे नित्यकर्म आहे, त्या कामाचेही कितीएक डेरे वेगळे होते. तितक्या ठिकाणींही विलायती सखलादांच्या व मखमालेच्या चादरा व गर्दपोस वगैरे असत, व नाना प्रकारचीं जरीचीं मोठीं मोठीं उंच वस्त्रें पुष्कळ होतीं. त्यांत जावयाचे वाटेवर दोहीं बाजूंनीं तोफा ओळीनेंच उभ्या केलेल्या असून, त्यांमधून आंत जातांना पहिला डेरा नगारखान्याचा लागवा; त्याहून पुढें गेलें ह्मणजे खासगीच्या चौकीच्या लोकांची पहारा करावयाची जागा. त्या कामावर नित्य नवा उमराव जात असे. त्याचे भोजन संबंधी डेरे वेगळे असत, व मेवामिठाई खावयाचा व पाणी गार करून ठेवावयाचा व विडे खावयाचा या सर्व प्रकरणीं निरनिराळेंच असत. याप्रमाणें त्याचा वाटेनें सरंजाम होता. हें ऐकून आश्चर्य वाटेल, परंतु असें समजावें कीं, असेच त्याचे लहान मोठे सर्व सरंजाम दुहेरी होते. तेणेंकरून त्याची स्वारी कधीं मुक्काम सोडून दुसरे मुक्कामीं गेली असतां कोणत्याही गोष्टीची त्यास न्यूनता नसे. स्वारी मुक्कामीं येऊन पोंचली ह्मणजे पन्नास तोफा सोडाव्या असा त्याचा नेम होता. याखेरीज तो आपल्या राजधानींत असतां त्याच्या ज्या ज्या रीती चालत होत्या त्या त्या मार्गानेंही सर्व तशाच चालत असत. त्यास अशी संपत्ती असून तो स्वयें सर्व विषयांचा उपभोग लौकिकार्थ गरीबाप्रमाणें करी, तेणेंकरून त्याची प्रजा त्यास फार मानीत असे.' (मराठ्यांची बखर पान ९४, ९५).

**८ सेनापति हंबीररावाचा मृत्यु:**— अशा थाटांत तो अहमदनगरला येऊन बसला. त्यानें आपले मोठमोठे सरदार दक्षिणेच्या बाजूला

सर्वत्र पाठविले. त्यानें पहिल्यानें विजापूर व गोंवळकोंडा हीं राज्यें सन १६८६ व १६८७ मध्यें अनुक्रमें हस्तगत केलीं व नंतर तो मराठ्यांचें राज्य बुडविण्याच्या उद्योगाला लागला. त्यानें आपला तळ विजापुराहून हालविला व अकलूजला येऊन बसला. त्यानें सर्जेखान या आपल्या सरदाराला मराठ्यांचा मुलुख सर करण्याकरतां पाठविलें. तो वाईपर्यंत गेला. तेथें संभाजी महाराजांचा सेनापती हंबीरराव मोहिते तळ देऊन बसला होता. त्या ठिकाणीं मोंगल व मराठे यांचें निकराचें युद्ध झालें. त्यांत मोंगलांचा पराभव झाला. मराठ्यांना मोंगलांचे घोडे वगैरे बरीच लूट मिळाली परंतु लढाईचे गर्दींत हंबीररावाला गोळा लागून तो ठार झाला. हंबीरराव हा शिवाजी महाराजांच्या वेळेपासून अनुभवलेला सेनापती होता. लढाईमध्यें त्याला कधीं पराभव असा माहीत नव्हता. या प्रसंगीं तो ठार झाल्यामुळें मराठ्यांना जय मिळूनही कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याच्याच हिंमतीवर इतके दिवस संभाजी महाराज निर्धास्त होते पण आतां तो गेल्यामुळें ते बरेच हताश झाले.

**९ संभाजी राजांची कैद:**— औरंगजेबानें यातिकादखान याजबरोबर फौज देऊन त्यास कोंकणप्रांत काबीज करावयास पाठविलें. त्याचप्रमाणें कोल्हापूर प्रांत जिंकण्याकरतां तकरीबखान यास पाठविलें. या प्रांतांतील सोपा मुलूख मोंगलांनीं काबीज केला होता; परंतु पन्हाळा आदिकरून अवघड ठिकाणीं मराठे दबा धरून बसले होते ते मोंगलांच्या हस्तगत होईनात. तेव्हां त्यानें पन्हाळ्यास वेढा घातला आणि संभाजीची खबर आणण्याकरतां जिकडे तिकडे हेर रवाना केले. संभाजी महाराज त्यावेळीं 'संगमेश्वरीं' रहात होते. हें गांव कोल्हापुरापासून सुमारें साठ मैल विशाळगडापासून सुमारें पंचेवीस मैल आहे. हें गांव त्यावेळीं कोणाला विशेष परिचित नव्हतें. जीर्णावस्थेस आलेलें होतें. मोंगलांचा चोहोंकडे सुळसुळाट सुरू झाल्यामुळें त्यांच्या हालचालीपासून थोडें दूर, अवघड आणि अज्ञात अशा ठिकाणीं राहणें बरें अशा हेतूनें त्यानीं संगमेश्वर हें ठिकाण पसंत केलें असावें. संगमेश्वरीं संभाजी विलासांत गर्क आहे अशी बातमी तकरीबखानाला लागतांच त्यानें आपला

मुलगा इखलासखान यास बरोबर फौज व कोंकणांतील अवघड वाटा दाखविणारे वाटाडे देऊन कोल्हापुराहून पुढें रवाना केलें व आपण मागून निघाला. त्याचेबरोबर दोन हजार स्वार आणि एक हजार पायदळ होतें. त्यानें संभाजीला कोठें, कसें आणि कशा स्थितींत पकडलें याबद्दल बरेच मतभेद आहेत. परंतु इतिहासाची संगत कळण्याकरतां डंफसाहेबाची पुढील माहिती पुरे आहे. "तो (तकरीबखान) संभाजीच्या लोकांना बातमी कळूं न देतां संगमेश्वराजवळ पोंचला. तेव्हां संभाजीच्या जासुदांनीं त्यास वर्तमान कळविलें कीं, 'मोंगल जवळ आला.' ते समयीं तो मद्यपानें करून उन्मत्त झाला होता. यास्तव तो त्यांस ओरडून बोलिला कीं, 'मूर्ख हो, अशी वेडेपणानें कां बडबड करिता? मुसलमान काय येणार आहेत? असें फिरून बोलला तर मी तुमचीं नाकें कापीन.' इतकें झाल्यावर थोडक्याच वेळांत तकरीबखानाचा पुत्र स्वारांसहित मोठ्या त्वरेनें बापाच्या पुढें घोडा पिटाळीत संभाजीच्या वाड्यांत जाऊन पोंचला; ते वेळेस लोक तेथें सांपडले ते मारून टाकले. इतक्यांत मागून तकरीबखानही आला. तेव्हां उरलेले लोक बहुतेक पळाले. परंतु कलुशाजवळ कांहीं होते, ते संभाजीच्या रक्षणार्थ लढूं लागले; मग कलुशास तिराची जखम लागतांच तेही पळाले. ते समयीं संभाजी सावध होऊन आपला वेष बदलून तेथून निघावयास सिद्ध झाला, परंतु त्याच्या अंगावर मोठे उंच उंच अलंकार होते ते त्याला टाकवेनात, त्यामुळें हाच संभाजी असें समजून त्यास धरलें. त्याबरोबर कलुशा आणि दुसरे चोवीस असामी धरले गेले. मग तकरीबखानानें त्यांस कोल्हापुरीं नेऊन औरंगजेबास कळविलें. नंतर तेथून आज्ञा झाली कीं, 'त्यांस बहुत बंदोबस्तानें हुजूर आणावें.' तेव्हां बादशाह अकलुजेहून निघून इंद्रायणी व भीमा यांच्या संगमाजवळ तुळापुरीं जाऊन उतरला होता. तिकडे तकरीबखानानें त्यांस नेलें. ते लष्कराजवळ पोंचल्यावर सारे बंदिवानांस मुसक्या बांधून उंटावर बसवून बरोबर वाद्यें वाजवीत लष्करांतून बादशाहाचे हुजूर नेलें. त्यांना पाहून औरंगजेबानें आज्ञा केली कीं, 'आतां कैदेंतच असूं द्यावें, मग विचार करून त्यांच्या अन्यायानुरूप पारिपत्य केलें जाईल.' नंतर ते तेथेंच कैदेंत ठेविले."

**१० संभाजी राजे यांचा अमानुष वध:—** "त्यापुढें मोंगलांत जे श्रेष्ठ मनुष्य होते त्यांनीं बादशहास असें समजाविलें कीं, 'संभाजीचा जीव रक्षावा, तेणेंकरून त्याच्या राज्यांतले अवघड किल्ले सर्व आपल्या हातीं येतील.' ही मसलत औरंगजेबाच्याही मनास येऊन त्यानें संभाजीला निरोप पाठविला कीं, 'तूं मुसलमान हो म्हणजे तुझा जीव वाचेल.' त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, 'बादशहाला सांगा, जर तूं आपली कन्या देशील तर बाटेन. असे दुष्ट जे तुम्ही मुसलमान लोक त्या तुमच्या पैगंबरास धिक्कार असो.' मग तो आपलीं अन्यायकर्में स्मरून पश्चाताप पावून जे जवळ बंदोबस्तास मोंगल होते त्यांस नानाप्रकारें शिव्या देऊं लागला. त्या अशा कीं, ज्यायोगें त्यांतिलों एखादा क्रोधें करून मारीलच. तें उत्तर औरंगजेबाला समजतांच त्याला बहुत राग येऊन त्यानें अशी आज्ञा केली कीं, 'त्याला लष्कराच्या बाजारांत नेऊन प्रथम त्याचे डोळे लोखंडाचे डागणीनें भाजावे, नंतर जीभ कापावी, मग डोकें मारावें.' अशी आज्ञा होण्याचें कारण केवळ बादशहाचा रागच नव्हे. असें केलें असतां हिंदु लोकांत दहशत पडेल, असेंही त्याचे मनांत होतें. त्यावरून त्याला तुळापुरींच लष्कराच्या बाजारांत नेऊन आज्ञेप्रमाणें मारून टाकलें, त्याचा वजीर कलुशा तोही त्याबरोबरच मारिला. हें वर्तमान सन १६८९ त घडलं." ( मराठ्यांची बखर पान १०४-५ ).

संभाजी महाराजांच्या वधाच्या बाबतींत इतिहासकार ऑर्म् पुढील-प्रमाणें हकीकत देतो. "युद्धानें संभाजी ताब्यांत येत नाहीं, असें पाहून बादशहानें आपल्या नेहमींच्या कपटविद्येचें अवलंबन केलें. संभाजी स्त्रीलंपट होता, आणि त्याची ही विषयवासना तृप्त करण्यास कलुशानें साह्य केल्यामुळें त्याजवर संभाजीची अतिशय मर्जी बसली होती. बादशहास या गोष्टी कळल्या व कलुशासारख्या हलकट मनुष्यास वश करण्यास त्यास प्रयास पडले नाहींत. संभाजीला विषप्रयोग किंवा शस्त्रप्रयोग करून मारण्यापेक्षां कोणत्यातरी युक्तीनें पकडून आपल्या स्वाधीन करावें, हा बादशहाचा बेत कलुशास पसंत पडला. एके दिवशीं रात्रीं एका सुस्वरूप बाईची मिरवणूक निघाली असतां

तिला पकडून आणण्याविषयीं कलुशानें संभाजीस सल्ला दिला. तेव्हां कलुशास पाठीमागें फौजबंद राहण्यास सांगून, स्वतः संभाजीनें त्या लोकांवर हल्ला केला. त्यावेळेस पूर्वसंकेतानुरूप मोंगल फौज संभाजीच्या पाळतीवर होतीच. संभाजी त्या स्त्रीस पकडून परत आणीत असतां मोंगलांनीं एकदम हल्ला करून त्यास पकडिलें. कलुशाही थोडी कपटाची दांडगाई करून लगेच स्वाधीन झाला. ''

'' दोघांसही बादशहापुढें आणिल्यावर कलुशानें आपल्या धन्यास वाईट मार्गास लाविलें म्हणून बादशहानें त्याची निर्भत्सना करून, स्वामि-द्रोहाच्या आरोपावर प्रथमतः त्यासच ठार मारविलें. पुढें संभाजीस मुसलमान होण्याविषयीं त्यानें आग्रह केला असतां, त्यानें पैगंबराची निंदा केली. तेव्हां बादशहानें उंटावर बसवून त्याची धिंड काढविली; आणि पुनरपि त्यास मुसलमान होण्याविषयीं आग्रह केला. तेव्हां ' आपली मुलगी मला द्याल तर मी मुसलमान होतों, ' असें संभाजीनें म्हटल्यावर, बादशहानें प्रथम पैगं-बरास निंदणाऱ्या त्याच्या जिव्हेचा छेद व त्याच्या शरीराचे तुकडे करवून ते कुत्र्यांकडून खावविले. अशा प्रकारें संभाजीचा अंत झाला. '' ( मराठी रियासत भाग २ पान ५९०-९१ ) स्वकीय माणसांविषयीं संशय आणि परकीय माणसांवर विश्वास टाकल्यामुळें संभाजी महाराजांचा अशा वाईट तऱ्हेनें अंत झाला. राणी सोयराबाईनीं म्हटल्याप्रमाणें संभाजी महाराजांनीं या प्रमाणें आत्मनाश करून घेतला.

**राजाराम महाराजांचें जिंजीस पलायनः—** संभाजी महा-राजांच्या वधानंतर औरंगजेबाची फौज रायगड काबीज करण्याकरतां रवाना झाली. हें वर्तमान समजल्यानंतर मोठें संकट प्राप्त झालें असें वाटून सर्व मुत्सद्दी व सरदार रायगडावर गोळा झाले. सर्वांच्या तेथें मसलती सुरू झाल्या. ' खजिन्यांत शिल्लक नाहीं, पागा व फौज सर्व मोडलें, किल्ले बेसरंजाम झाले, पूर्वींचीं अनुभवीं माणसें मरून गेलीं. मोंगलांच्या निरनिराळ्या फौजा मराठी राज्यांत सर्वत्र घुसून नाश करूं लागल्या. कोणासही एका ठिकाणीं राहून

स्वस्थपणा मिळेना. अशा स्थितींत राज्य राखण्यासंबंधानें मुत्सद्यांची बहुतेक निराशा होऊं लागली. ( मराठी रियासत भाग २ पान ६१५ ). यावेळीं संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई व पुत्र शिवाजी रायगडावरच होतीं. राजाराम महाराजही तथेंच प्रतिबंधांत होते. त्यांस मोकळें करून येसूबाईनीं असें सांगितलें कीं, ' तुम्हीं सर्व पराक्रमी सरदारांनीं एक विचारें चालून राजारामास त्यांचे नायकासुद्धां घेऊन बाहेर पडावें. आम्हांस मुलास घेऊन राहण्यास योग्य जागा रायगडासारखी नाहीं. तुम्ही सर्व बाहेर पडल्यावर शत्रू तुमचे आंगावर जातील. तुमचा सर्वांचा जमाव एकेठिकाणीं पोक्त झाला म्हणजे आम्हांस काढून तिकडे न्यावें. ' याप्रमाणें येसूबाईची आज्ञा होतांच राजाराम महाराज फक्त कांहीं मंडळीसहित गुप्तपणानें रायगडावरून परागंदा झाले.

**१२ रायगडाचें पतन व मराठी सिंहासनाचें भंजन—** औरंगजेबाची फौज नंतर रायगडाकडे येऊन तिनें किल्ल्याला वेढा दिला. त्या फौजेला जंजिऱ्याच्या शिद्दीचीही मदत होती. रायगड किल्ला मजबूत असल्या कारणानें मोंगलांचें कांहीं चाललें नाहीं. वेढा घालून दहा महिने झाले तरी किल्ला हस्तगत होईना. औरंगजेबानें वेढ्याचें कामीं चांगलीच मदत पुरविली परंतु सर्व प्रयत्न व्यर्थ होऊं लागले. तेव्हां मोंगलसरदारानें फितूर करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यावेळीं सूर्याजी पिसाळ नांवाचा वाईचा मराठा देशमुख किल्ल्यावर सरदार होता. वाईची देशमुखी देण्याचें वचन खानाकडून घेऊन तो मोंगलांस सामील झाला; आणि त्यानें किल्ल्याचे दरवाजे उघडून मोंगलांना आंत घेतलें. त्यांनीं रायगड ताबडतोब काबीज केला. मुसलमानांचे स्वाधीन होणें येसूबाईच्या जिवावर आलें. तथापि जिवास धक्का लावणार नाहीं, अशी खानाकडून कुराणावर हात ठेवून शपथ घेववून ती आपल्या पुत्रासह त्याच्या स्वाधीन झाली. ' नवऱ्यानें आपणास सोडल्यावर दिरानेंही आतां त्याग केला. ' अशी आपली दीन स्थिति खानास सांगून, पुढील तरणोपायाची सुरवात तिनें तथेंच केली. खानानें किल्ला

लुटला. रायगडावरील शिवाजी महाराजांचें सिंहासन फोडलें. शिवाजी महाराजांनीं मोठ्या कष्टानें जमा केलेली मराठशाहींतील संपत्ती नेऊन ती मोंगल सरदारानें बादशहाचे हवाली केली. तसेंच येसूबाई व शिवाजी यांना कैद करून औरंगजेबाकडे नेलें. सूर्याजी पिसाळाची भेट त्यानें बादशहाशीं करविली. त्याच्या कामगिरीबद्दल औरंगजेब त्याच्यावर खूष झाला पण 'तूं मुसलमान हो,' असा त्यानें पिसाळास आग्रह केला. शेवटीं मुसलमानी धर्म स्वीकारून पिसाळानें वाईची देशमुखी संपादन केली.

**१३ सोयराबाई यांचे सत्योद्गार**—एकंदरींत छत्रपति शिवाजी महाराजांच्या पट्टराणी साध्वी सोयराबाई यांनीं संभाजी महाराजांविषयीं रायगडावर जे शद्ब काढले ते खडान् खडा कसे सत्य होते हें वरील हकीकतीवरून स्पष्ट लक्षांत येईल. संभाजी महाराजांनीं याप्रमाणें आत्मनाश आणि सर्वनाश करून टाकला.

# प्रकरण ४ थें.

## स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा.

१ राजारामांनीं जिंजी गांठली. २ झिबुन्निसा बेगम. ३ ताराबाईचा पुत्र शिवाजी. ४ ताराबाईचें जिंजीस प्रयाण. ५ मराठ्यांची राजधानी जिंजी. ६ अष्ट प्रधानांच्या नेमणुका. ७ राजारामाचें भांडवल दऊत-कलम. ८ मराठ्यांत नवचैतन्याचा उगम. ९ खंदे वीरगडी. १० जिंजीचा वेढा. ११ राजारामाचें महाराष्ट्रांत पुनरागमन. १२ मराठ्यांची लढण्याची पद्धत. १३ सातारा येथें स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा.

**१ राजारामांनीं जिंजी गांठली:**— राजाराम महाराज रायगड सोडून निघाले ते या किल्ल्यावरून त्या किल्ल्यावर असे फिरत फिरत प्रतापगडाला आले. तेथें त्यांनीं भवानी देवीचें दर्शन घेतलें. नंतर साताऱ्यावरून पन्हाळगडाला ते आले. हा किल्ला रायगडाखालोखाल संरक्षणक्षम आहे अशी त्यावेळीं मराठ्यांची समजूत होती. पन्हाळ्यास आल्यानंतर मोंगलांनीं रायगड हस्तगत केल्याची व पन्हाळ्याकडे त्यांची फौज रवाना झाल्याची बातमी राजाराम महाराजांना लागली. तेव्हां ते तेथून विशाळगड रांगण्याकडे रवाना झाले. इतक्यांत मोंगल फौजेनें मिरज आणि पन्हाळा काबीज केल्याचें वर्तमान आलें. तेव्हां आतां या प्रदेशांत राहून निभाव लागणार नाहीं असें सर्वांना वाटल्यामुळें राजाराम महाराजांनीं जिंजीस निघून जावें असा विचार ठरला. त्याप्रमाणें त्यांनीं विशाळगडावर आपल्या तिघी स्त्रिया रामचंद्रपंत बावडेकर यांच्या रक्षणाखालीं ठेऊन आपल्याबरोबर प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, खंडेराव दाभाडे, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ व दुसरीं अगदीं विश्वासू अशीं

वीस माणसें घेऊन कर्नाटकांतून जिंजीकडे जंगम, लिंगायत, कापडी वगैरेंचे वेष परिधान करून ते निघाले. ही वार्ता औरंगजेबाला समजतांच त्यानें आपल्या कर्नाटकांतील सरदारांना 'राजाराम तुमचे मुलखीं गेला आहे त्यास धरून आणा' असा हुकूम पाठविला. तेव्हां ते राजाराम महाराजांचा चोहोंकडे शोध करूं लागले. राजाराम महाराज आपल्या मंडळीसह प्रवास करीत करीत बंगलोर शहराजवळ येऊन उतरले. एके दिवशीं त्यांचीं माणसें त्यांचे पाय धूत आहेत असें मोंगलांचे हेरांनीं पाहिलें. तेव्हां हा कोणी मोठा इसम असावा अशी त्यांना शंका येऊन त्यांनीं ती बातमी तेथील मोंगलांचे सरदाराला दिली. खंडो बल्लाळ यांना चौकशी करणारे मोंगलांचे हेर असावे अशी शंका आल्यामुळें त्यांनीं राजाराम महाराजांबरोबर संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांना देऊन त्यांना तेथून पळवून लाविलें आणि आपण मंडळीसह तेथें स्वयंपाक करीत बसले. इतक्यांत तेथें एक मोंगल सरदार फौजेसह येऊन दाखल झाला. त्यानें या मंडळीस पकडलें. त्यांना मारझोड केली. तो इसम कोण याची माहिती काढण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला परंतु त्यास कोणींच कांहीं थांग लागूं दिला नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन त्यांना सोडून तो निघून गेला. राजाराम महाराजांवर रायगड सोडून जिंजीला जाऊन पोंचेपर्यंत प्राणघातक अशा अनंत संकटांची परंपरा ओढवली. त्यांना कित्येक वेष धारण करावे लागले. प्रत्येक वेळां पायीं जावें लागलें. कित्येक प्रसंगीं उपवास घडले. कित्येक प्रसंगीं जंगलांत झाडाखालीं तर कित्येक वेळां धर्मशाळेंत विश्रांति घेऊन प्रसंग पार पाडावे लागले. राजवाड्यांत सुखानें कालक्रमणा करणाऱ्या छत्रपतींच्या पुत्राला अशा प्रकारें वनवासाचा प्रसंग आल्यानें चिंता आणि प्रवासाचे श्रम यामुळें आजारीपणाचेही हाल सोसावे लागले. एकंदरींत स्वराज्याचा नाश होऊन महाराष्ट्रांत दुःख, हाल आणि निराशा यांचा जो गाढ अंधकार पसरला होता त्यांतून आपल्याबरोबर असलेल्या प्रभावशाली आणि तेजःपुंज नररत्नांचें बळावर भावी स्वराज्य-सूर्याचे किरण दृष्टीला पडतील या आशेवर राजाराम महाराज आपल्यावरील सर्व संकटें समाधानानें पार पाडीत होते, सर्व

६७३८.



हाल आनंदानें सोशीत होते, आणि सर्व दुःख मनातल्या मनांत गिळून टाकीत होते. शेवटीं ते एकदाचे जिंजीस जाऊन सुखरूप पोंचले; आणि मार्गांत चुकामूक झालेले त्यांचे सहकारीही त्यांना तेथें येऊन भेटले.

**२ झिबुन्निसा बेगमः—** इकडे रायगडावर संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई व पुत्र शिवाजी यांना कैद करून औरंगजेबाच्या लष्करांत नेलें. त्या वेळीं त्याची कन्या झिबुन्निसा बेगम हिनें आपल्या बापाकडे त्यांना आपल्या ताब्यांत देण्याविषयीं विनंति केली. आपल्या कन्येचा आग्रह, झुल्फिकारखानानें दिलेलें वचन, आणि मराठीराज्य बुडविण्यास प्राप्त झालेलें साधन या कारणांकरतां औरंगजेबानें आपल्या कन्येची विनंति मान्य केली व तिच्या हवालीं या मायलेकरांना व त्यांच्या इतर परिवाराला केलें. बेगमसाहेबांनीं त्यांच्याबद्दल आपल्या बापाकडे एवढा आग्रह आणि हट्ट कां धरला याचा थोडा पूर्वेतिहास येथें देणें जरूरीचें आहे. कारण त्यावरून पुढील इतिहास समजणें सोपें जाईल. झिबुन्निसा बेगम ही औरंगजेबाची वडील मुलगी. हिचा जन्म सन १६३९ त झाला. ती चांगली शिकलेली होती. कुराण तिला मुखोद्गत होतें, इतकेंच नव्हे तर, त्या ग्रंथावर एक टीकाग्रंथ तिनें लिहिला असून फारशी भाषेत कित्येक कवनें तिनें केलीं होतीं. ती अखेरपर्यंत अविवाहित राहिली. मोंगल राजकन्यांना बरोबरीचा वर मिळणें शक्य नसल्यामुळें त्या बहुतेक अविवाहित राहत असत. इ. स. १६६६ मध्यें शिवाजी महाराज दिल्लीस गेले त्या वेळीं ती सत्तावीस वर्षांची होती. शिवाजी महाराजांच्या शौर्याच्या तिनें बऱ्याच गोष्टी ऐकिल्यामुळें त्यांच्या लोकोत्तर गुणांबद्दल तिच्या मनांत चांगली आदरबुद्धि उत्पन्न झाली होती. त्यामुळें शिवाजीच आपणाला योग्य पति आहे असें तिला वाटूं लागलें. ते दिल्लीस गेले त्या वेळीं त्यांच्यावर तिची प्रीति बसली. शिवाजी महाराज आपल्या बापाचा दोस्त व पाहुणा आहे एवढीच तिची कल्पना होती. या भेटीनें शिवाजी महाराजांची व औरंगजेबाची दोस्ती घडून येईल असा संभव होता. शिवाजी महाराजांनीं मुसलमान व्हावें व आपल्या मुलीस वरावें अशी औरंगजेबानें बरीच खटपट

केली. परंतु तो बेत जुळला नाहीं. शिवाजी महाराजांना नजर कैदेंत ठेवण्याचा तोच हेतू त्याचा असावा. शेवटीं शिवाजी महाराज त्याच्या कैदेंतून सुटून दक्षिणेंत निघून आले त्यामुळें बेगमला त्यांचें दर्शन पुनरपि घडलें नाहीं. पुढें शिवाजी महाराज कालवश झाल्यावर औरंगजेब दक्षिणेंत आला तेव्हां त्याचेबरोबर हीही आली. शिवाजी महाराजांबद्दल तिचा जीव फार हुरहुरत होता. त्यांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांबद्दलही तिच्या मनांत पूज्यभाव वसत होता. गायन, कशिदा वगैरे कामांत, आरबी, फारशी वगैरे भाषांचे व्यासंगांत आणि कवि व विद्वान लोक यांच्या सहवासांत ती आपली कालक्रमणा करीत असे. संभाजी महाराजांना वाचविण्याकरतां तिनें प्रयत्न केले परंतु ते निष्फळ झाले. बेगमनें येसूबाईचें समाधान करून तिला धीर दिला. आपल्या डेऱ्यानजीक स्वतंत्र डेरा लावून तिला मोठ्या आस्थेनें स्वतःजवळ ठेऊन घेतलें; आणि चाकरमाणसांची व सामानसुमानाची तजवीज करून दिली. यावेळीं येसूबाईचें वय सुमारें तीस वर्षांचें असावें. संभाजी महाराजांचा मुलगा शिवाजी याचें वय यावेळीं अवघें नऊ वर्षांचें होतें. त्याच्यावर तिचें इतकें प्रेम बसलें कीं, स्वतःच्या मुलाचेंसुद्धां तिनें इतके लाड केले नसते. डागडागिना, कपडालत्ता, मेवामिठाई इत्यादि गोष्टींत बेगमसाहेब त्या मुलाची सर्व प्रकारची हौस पुरवीत असे. शिवाजीच्या लडिवाळपणानें बादशहा व बेगम दोघेही मोहून गेलीं. संभाजी महाराजांच्या नाटकशाळांची व त्यांचा दासीपुत्र मदनसिंग यांचीही बेगमनें सुव्यवस्था लावून दिली. जोत्याजी केसरकर, उद्धव योगदेव वगैरे विश्वासू मंडळी येसूबाईजवळ होती. शाहूस लहानपणचें शिक्षण देऊन त्याजवर देखरेख ठेवण्याचें काम जोत्याजीचें होतें. त्याचें बादशहाकडे जाणें येणें असे. एकंदरींत औरंगजेबानें मराठी राज्य जरी पादाक्रांत केलें आणि राजाराम महाराजांना जरी वनवास प्राप्त झाला तरी औरंगजेबाच्या मुलीच्या देखरेखीखालीं येसूबाई व शिवाजी आनंदानें कालक्रमणा करीत होती. औरंगजेबानें शिवाजीचें नांव आपल्या इच्छेप्रमाणें व हौसेप्रमाणें शाहू असें ठेवलें.

**३ ताराबाईचा पुत्र शिवाजी**—राजाराम महाराजांचा जन्म इ. स. १६६१ मध्यें झाला असल्यामुळें संभाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळीं त्यांचें वय अठ्ठावीस वर्षांचें होतें. शिवाजी महाराजांनीं त्यांचें पहिलें लग्न प्रतापराव गुजर यांच्या मुलीशीं केलें. तिचें नांव जानकीबाई. तिला एक मुलगी होती. ती फलटणच्या ( दुसऱ्या ) बजाजीला दिली होती. जानकीबाई वारल्यानंतर संभाजी महाराजांनीं राजाराम महाराजांचीं दोन लग्नें केलीं. सेनापति हंबीरराव मोहिते यांची मुलगी सीताबाई ऊर्फ ताराबाई हिच्याशीं व दुसरें कागलकर घाडग्यांची मुलगी राजसबाई हिच्याशीं, अशीं दोन लग्नें केलीं. राजाराम महाराजांची चवथी बायको अंबिकाबाई. ताराबाई यांचा जन्म इ. स. १६७५ मध्यें झाला. राजाराम महाराज जिंजीकडे रवाना झाले त्यावेळीं या तीघी स्त्रियांना विशाळगडावर ठेवलें होतें हें मागें आलेंच आहे. त्या वेळीं ताराबाई गरोदर होती. पुढें ती तेथेंच ( सन्न १६९१ मध्यें ) प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें. संभाजी महाराजांच्या मुलाचें नांव औरंगजेबानें शाहू म्हणून बदलल्यानंतर आपल्या मुलाचें नांव ताराबाईनें शिवाजी म्हणून ठेविलें असें दिसतें. हें वर्तमान बादशहाचे छावणींत येसूबाईला व जिंजीस राजाराम महाराजांना समजलें. तेव्हां येसूबाईनीं राजारामास निरोप पाठविला कीं, ‘ तुम्हीं आपलीं बायकामाणसें कर्नाटकांत घेऊन जावीं. आमची सुटका कधीं होईल ती होवो, परंतु तेथपर्यंत तुम्हीं वैताग करूं नये. राजचिन्हादि बाळगून पूर्वील चालीप्रमाणें सर्व व्यवहार करून, बाया विशाळगडीं आहेत त्या घेऊन जाव्या. ’ या येसूबाईच्या निरोपावरून अशी एक गोष्ट स्पष्ट होतें कीं, औरंगजेब शिवाजींना कट्टा शत्रू लेखीत होता. शिवाजी या नांवाचासुद्धां त्याला द्वेष उत्पन्न झाला होता. त्या करतांच तें नांव कानीं पडूं नये म्हणून संभाजी महाराजांच्या मुलाचें त्यानें नांव बदलून शाहु असें ठेविलें. तोंच विशाळगडावर ताराबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला व तो शिवाजी म्हणूनच लोकिकांत आला. यामुळें औरंग-जेबाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली असेल यांत संशय नाहीं. शिवाजी

महाराजांच्या पुण्यप्रतापानें महाराष्ट्रांत 'शिवाजी' या नांवांत अशी कांहीं जादू भरून गेली होती कीं त्या नांवाच्या उच्चारानें मराठ्यांना स्फूर्ति उत्पन्न व्हावी आणि मोंगलांच्या अंगाला कंप सुटावा. विशाळगडीं नवीनच शिवाजी-आपला शत्रू-जन्माला आल्यामुळें औरंगजेबानें विशाळगड काय वाटेल त्या मोलानें हस्तगत करण्याचा मनसुबा चालविला आहे असें येसूबाईला समजतांच तिनें गुप्तपणानें राजाराम महाराजांना विशाळगडावरून बायकामाणसें जिंजीस घेऊन जाण्याबद्दल आग्रहाचा निरोप पाठविला असावा असें दिसतें.

**४ ताराबाईचें जिंजीस प्रयाणः—** येसूबाईच्या या अगत्याच्या निरोपाप्रमाणें राजाराम महाराजांनीं आपलीं बायकामाणसें तात्बडतोब जिंजीस आणण्याचें ठरविलें. परंतु ही मंडळी मोंगलांच्या तावडींतून इतक्या लांब पल्ल्यावर सुखरूप कशी येऊन पोंचणार हा मोठा प्रश्न पडला. तेव्हां राजापुराहून जलमार्गानें त्यांना आणावें असें निश्चित झालें. खंडो बल्लाळ यांचे मामा लिंगो शंकर व विसाजी शंकर राजापुरास सावकारी करून राहत होते त्यांचीं तारवेंही होतीं. त्यांचेमार्फत मंडळी आणण्याचें ठरून कारकून व हुजरे रवाना केले. ते राजापुरीं आले; तेथून विशाळगडीं रामचंद्रपंतांस ही व्यवस्था कळविल्यानंतर त्यांनीं ताराबाई, राजसबाई व अंबिकाबाई यांची घाटाखालीं रवानगी करून दिली. पुढें यशवंतगडचे बंदरांतून जहाजांत बसून सर्व मंडळी निघाली. बरोबर लिंगो शंकर प्रभु हा होता. जलमार्गानें पूर्व किनाऱ्यावर जाऊन सर्व असामी जिंजीस जाऊन पोंचले. राजाराम महाराजांनीं खंडो बल्लाळ यांच्या या मामांचा मोठा गौरव केला व त्यांस राजापुराजवळ गांव इनाम करून दिला. त्यावेळीं राजापुरापासून अरबी समुद्रांतून पूर्वेस बंगालच्या उपसागरांत जलमार्गानें जाणें म्हणजे तो केवढा कष्टमय प्रवास होता, केवढें साहस होतें, केवढी जबाबदारी होती आणि किती संकटांना सतत किती दिवस तोंड द्यावें लागत होतें याची कल्पना कल्पनेनेंच केलेली बरी! अशाही जिवावरील संकटांतून व बाळंतपणाच्या स्थितींतून ताराबाई आपल्या लहान अर्भकासह जिंजीस सुखरूप येऊन पोंचल्या.

अनुक्रम ९८०९५ ५५४ ६०२ १५१७०

## स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा

**५ मराठ्यांची राजधानी जिंजीः—** जिंजी हें ठिकाण अर्काटच्या दक्षिणेस सुमारें पन्नास मैलावर, पांडीचेरीच्या पूर्वेस सुमारें तीस मैलावर व तंजावरच्या उत्तरेस सुमारें सव्वाशें मैलावर आहे. मद्रासच्या नैर्ऋत्येस तें सुमारें ऐंशीं मैलावर आहे. शिवाजी महाराजांनीं शेवटीं शेवटीं जो दक्षिणदिग्विजय केला त्यावेळीं संपादन केलेला हा प्रदेश होता. जिंजी हें शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचें अगदीं दक्षिण टोंक होतें. हा मुलूख संपादन करण्यांत रघुनाथपंत हणमंते व त्याचा पुत्र जनार्दनपंत हणमंते यांनीं फार मदत केली. इ. स. १६७४ मध्यें राज्याभिषेकाच्या वेळीं जनार्दनपंत हणमंते हे अष्टप्रधानांत सुमंत या पदावर आले. इ. स. १६७७ मध्यें शिवाजी महाराजांनीं ज्यावेळीं वेलोर, अरणी हा प्रांत जिंकून जिंजीनजीक मक्रापुरीं आपला तळ दिला त्यावेळीं जिंजी किल्ल्यावर विजापुरकरांचा अधिकारी अंबरखान हा होता. शिवाजी महाराजांपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें त्याला वाटल्यामुळें रघुनाथपंत हणमंते यांच्या विद्यमानें त्यानें जिंजीचा किल्ला रिकामा करून शिवाजी महाराजांच्या स्वाधीन केला. त्यांनीं रामजी नलगे यास किल्ल्याची हवालदारी दिली आणि तेथील सुभा विठ्ठल शिवदेव गरुड यास सांगितला. तसेंच महाराष्ट्रांतील बंदोबस्ताप्रमाणेंच कर्नाटक प्रांतांतही जमिनीची मोजणी, प्रतबंदी व सार्‍याची आकारणी वगैरे पद्धती सुरू केल्या. नंतर कांहीं दिवसांनीं शिवाजी महाराजांनीं आपला जामात हरजीराजे महाडीक यास जिंजी प्रांताची सुभेदारी दिली. शिवाजी महाराजांची मुलगी अंबिकाबाई ही या हरजीराजांना दिली होती. हे मोठे मुत्सद्दी व पराक्रमी होते. त्यांनीं जिंजी प्रांताचा बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला होता; त्यामुळें सांप्रत राजाराम महाराजांना जिंजी हें स्वरक्षणाचें व पुढील राजकारण घडवून आणण्याचें मुख्य ठिकाण करतां आलें.

**६ अष्ट प्रधानांच्या नेमणुकाः—** राजाराम महाराजांनीं जिंजीस आल्यानंतर राज्यव्यवस्थेचें काम पहिल्यानें हातीं घेतलें. स्वतः छत्रपति हें पद धारण करून ते गादीवर बसूं लागले. त्यांनीं राजचिन्हेंही धारण केलीं. नंतर त्यांनीं अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. १ पेशवे हें पद पूर्वीपासून पिंगळे

घराण्यांत चालू होते. मोरोपंत पिंगळे हे पहिले पेशवे झाले. त्यांचा मुलगा निळोपंत हा त्यांच्या पश्चात् पेशवेपदावर आला. त्यांनीं जिंजीकडील व्यवस्था उत्तम प्रकारें ठेविली म्हणून राजाराम महाराजांनीं निळोजीपंतांना पेशवे पदावर कायम केलें. २ सेनापती हें पद पन्हाळ्यास राजाराम महाराजांनीं महादजी नाईक पानसंबळ यास दिलें होतें, परंतु याच सुमारास तो मरण पावल्यानें तें पद संताजी घोरपडे यास दिलें. ३ जनार्दनपंत हणमंते यांना अमात्यपद दिलें. ४ शंकराजी मल्हार नरगुंदकर यांना सचिव पद. ५ श्रीकैराचार्य कालगांवकर यांना पंडितराव हें पद. ६ शामजीराव पिंडे यांना मंत्रीपद. ७ महादाजी गदाधर यांना सुमंत पद. ८ निराजी रावजी यांना न्यायाधिशपद. याप्रमाणें अष्टप्रधानांच्या नेमणुका झाल्या. निराजी रावजी हा प्रल्हाद निराजीचा बाप. परंतु तो यापूर्वींच मरण पावला होता. अष्टप्रधानांत ज्याअर्थीं त्याचें नांव आहे त्याअर्थीं न्यायाधिशाचें पद त्या घराण्याकडेच चालावें एवढाच त्याचा हेतु दिसतो. कारण प्रल्हाद निराजी हा त्यावेळीं अष्टप्रधानांत एकटाच शहाणा होता. सर्व मसलतीचे ते पूर्वीपासून आधारस्तंभ आणि कर्ते पुरुष होते. अष्टप्रधानांमध्यें त्यांना देण्यासारखें योग्य स्थान नसल्यामुळें राजाराम महाराजांनीं त्यांच्याकरतां एक निराळीच जागा निर्माण केली. ती जागा म्हणजे प्रल्हाद निराजी हे केवळ आपलींच प्रतिमा आहेत असें समजून त्यांना 'प्रतीनिधी' हें नवीद पद दिलें. त्या पदाचा अधिकार सर्व अष्टप्रधानांवर चालावयाचा असून त्याची नेमणुकही सर्वांपेक्षां जास्त म्हणजे पंधरा हजार होन होती. राजपत्रावर प्रधानाचे उजवे बाजूला प्रतिनिधीची मुद्रा व्हावी असें ठरलें होतें. न्यायाधीशपद व अष्टप्रधानांतील प्रतिनिधीपद हीं दोन्हीं पदें प्रल्हाद निराजीकडे ठेवण्यांत आलीं होतीं असें दिसतें. तसेंच रामचंद्रपंत बावडेकर यांच्याकडे पूर्वी अमात्याचें पद होतें. तें सध्यां जनार्दनपंत हणमंते यांना दिलें तेव्हां रामचंद्रपंतांकरतां नवीन 'हुकुमतपन्हा' म्हणजे हुकूम चालविणारा हें पद निर्माण केलें. या सर्व व्यवस्थेनें कार्यकर्त्या मंडळीचें समाधान होऊन भावी स्वराज्याच्या पुनर्प्राणप्रतिष्ठेचें गणपतिपूजन अशा प्रकारें जिंजी येथें झालें.

**७ राजारामाचें भांडवल दऊत कलमः**— यावेळीं राजाराम महाराजांची परिस्थिती कल्पनेनेंच लक्षांत घेण्यासारखी होती. जवळ पैशाचें बळ नाहीं. सैन्याचें सामर्थ्य नाहीं. शिवाजी महाराजांच्या वेळच्यीं बहुतेक कर्तृत्ववान् माणसें संभाजी महाराजांच्या रोषाला पात्र होऊन कित्येक मारलीं गेलीं होतीं तर कित्येक हद्दपार झालीं होतीं. त्यामुळें मनुष्यबळही खच्ची झालेलें होतें. मोंगल सरदारांनीं स्वराज्यांतील बहुतेक किल्ले व मुलुख हस्तगत करून सर्वत्र महाराष्ट्रामध्यें हैदोस घालण्यास सुरवात केल्यामुळें स्वराज्यासंबंधीं कोणतीही मसलत करणें अशक्य झालें होतें. जिंजीकडेही केव्हां मोंगलांचा रेटा येईल याची चिंता रात्रंदिवस हात धुऊन मागें होतीच. अशा प्रकारें स्वराज्यप्राप्तीच्या साधनांच्या दृष्टीनें पूर्ण अंधकार असतां स्वराज्यस्थापनेची पुनर्प्राणप्रतिष्ठा करण्याचें साहस राजाराम महाराजांनीं व त्यांच्या सहकारी मंत्र्यानीं जें केलें तें कशाच्या बळावर केलें याची मीमांसा येथें करणें जरूर आहे. या वेळीं नवीन स्वराज्य स्थापनेला लागणारें व हातीं असलेलें मुख्य भांडवल ह्मणजे छत्रपति शिवाजी महाराजांचे पुत्र राजाराम महाराज हे होते. या भांडवलाला शिवाजी महाराजांच्या पुण्याईचा जबरदस्त आधार होता. औरंगजेबानें सर्व मराठ्यांना दहशत बसावी ह्मणून संभाजी महाराजांचा अत्यंत क्रूरपणानें वध केला पण त्या दहशतीला कांहीं मर्यादाही असतेच. मांजराला मनुष्याची दहशत वाटते. जोंपर्यंत पळवाट ठेऊन मांजराला शासन होत असतें तोंपर्यंतच त्याला मनुष्याची दहशत कायम राहते. पळवाट बंद करून शासन करूं लागलें ह्मणजे तेंच मांजर मनुष्याची नरडी फोडण्यास प्रवृत्त होतें. त्यावेळीं मनुष्याच्या दहशतीचा विसर मांजराला पडलेला असतो. संभाजी महाराजांच्या वधामुळें महाराष्ट्राची ही अशी स्थिति झाली. औरंगजेबाला बाबा ह्मटलें तरी तो खातो आणि वाघ्या ह्मटलें तरी तो खातो अशी स्वराज्यांतील प्रत्येक हिंदूची खात्री झाली व त्यामुळें औरंगजेबानें दहशतीकरतां केलेल्या प्रयत्नाचें पर्यवसान हिंदूंच्या मनांतून त्याची दहशत मुळांतून नष्ट करण्यांत व प्रजाजनांची विशेष सहानुभूति संपादन करण्यांत झालें. त्यामुळें भांडवलाला ही एक जोड राजाराम

महाराजांना मिळाली. औरंगजेब दिल्ली सोडून दक्षिणेंत आला व ठाण मांडून जरी तो बसला तरी त्याला कायमचें दक्षिणेंत रहाणें शक्य नव्हतें. महाराष्ट्राला तो परकीच होता. आज नाहीं उद्यां त्याला हा देश सोडून जाणें प्राप्त होतें. अशा परिस्थितींत महाराष्ट्रांतील स्वराज्याला लागलेलें ग्रहण कांहीं कालापुरतेंच आहे अशी भावना लोकांची झालेली होती. महाराष्ट्र देश उचलून दिल्लीला नेण्याचें सामर्थ्य औरंगजेबांत नव्हतें, म्हणून आज नाहीं उद्यां तो आपला आपल्यालाच राहील असा दृढ विश्वास प्रजाजनांना होता. या प्रजाजनांच्या विश्वासाचें कमीजास्त प्रमाणांत भांडवल पूर्वीच्या राजाराम महाराजांच्या भांडवलांत जमा झालें होतें. याशिवाय दऊत, कलम, कागद, मुद्रा आणि लेखक यांचा संग्रह त्यांच्याजवळ चांगला होता. या चालू भांडवलावर राजाराम महाराज व त्यांचे प्रामाणिक सहकारी यांनीं हिंदुपदपादशाहीच्या पुनर्प्राणप्रतिष्ठेचें सौदे ठरावयाला प्रारंभ केला.

**८ मराठ्यांत नवचैतन्याचा उगमः**— राजाराम महाराजांनीं संपूर्ण राज्याधिकार स्वीकारले ही गोष्ट मराठी स्वराज्यांत जाहीर करण्याकरतां महाराष्ट्रांतील सर्व मोठमोठ्या लोकांना बक्षिसें पोशाख पत्रें वगैरे पाठविण्यांत आलीं. तसेंच लोकांना उत्तेजन मिळून नवीन स्फूर्ति उत्पन्न व्हावी व त्यांनीं कार्यक्षम व्हावें यासाठीं इनामें, जहागिरी, बक्षिसें वगैरे सढळ हातानें देण्याचा त्यांनीं परिपाठ घातला. अशा इनामांतील बराच मुलुख मोंगलांच्या ताब्यांत होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारण अशा प्रकारें सनद मिळालेली जहागीर आपल्या ताब्यांत घेण्याकरतां जो तो मोंगलाचे मुलुखांत शिरूं लागला. त्या योजनेमुळें राजाराम महाराजांची कीर्ति सर्वत्र पसरली. प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषाला स्वतःचा पराक्रम दाखविण्याची संधि आली असें वाटून सर्वत्र जो तो स्वराज्याचीं नवीन कामें उठवूं लागला. मोंगलांविरुद्ध ज्याला जिकडे सोईचें बसेल तिकडे तो राजाराम महाराजांच्या सनदेच्या बळावर आपला अंमल बसविण्याचा प्रयत्न करूं लागला. नवीन सनदा संपादन कराव्या म्हणून जिंजीला लोक जमा होऊं लागले. त्यामुळें तेथें बराच मोठा जमाव झाला.

" लोकांस तैनाता पूर्वील धारेप्रमाणें सरंजाम गांव लावून दिले; सर्व प्रधान, कारकून व सरदार लोक यांस भाग्यवान् केलें; जे जे गेले त्यांस त्यांचीं पूर्वील पदें ज्यांचीं जशी योग्यता त्यांस तसे वाढवून, पहिल्या महाराजांपेक्षांही अधिक कृपा करूं लागले. मातबर सरदार व सरकारकडून प्रधान यांचे विचाराखेरीज व मसलतीखेरीज तिळमात्र कार्य करूं नये. दुर्व्यसन व नीचांचा सहवास न करितां, दुर्व्यसनी यांचा बहुत तिरस्कार; असें करून सर्वांस बहुत प्रियकर असें राज्य पूर्व मर्यादेप्रमाणें महाराजांनीं धारे घालून दिल्याप्रमाणें चालूं लागलें. " अष्टप्रधानाशिवाय आणखीं कर्ती माणसें पुष्कळ निपजलीं. त्यांचाही राजाराम महाराजांनीं योग्य सन्मान केला. " परसोजी भोंसले यास, बहुतकर्ते मर्द जाणून सेनासाहेबसुभा असें पद व सेनापतीप्रमाणें सरंजाम देऊन, गोंडवण, वऱ्हाड वगैरे प्रांतांत अंमल त्यांनीं बसविला तो प्रांत त्याजकडे सोपविला. परसोजी हा नागपूरकर भोंसल्यांचा पूर्वज होय. राजाराम परत महाराष्ट्रांत आल्यावर परसोजी राजारामास येऊन मिळाला. तेव्हां वऱ्हाडांतील चौथाई व सरदेशमुखीचें काम राजारामानें त्याजकडेसच ठेविलें. सिधोजीराव निंबाळकर यांनीं गोदावरीच्या तीरीं अंमल बसविला, तो सुभा व 'सरलष्कर' हें पद त्यांजला दिलें. " ( म. रि. भाग २ रा. पृ. ६४९-५० ) खंडेराव दाभाडे यांस सेनाधुरंधर हें पद देऊन त्याला गुजराथ, बागलण वगैरे प्रांतांत ठेविलें. खंडो बल्लाळ यांजकडे चिटणिसी कायम केली. स्वतःच्या नाटकशाळेचा पुत्र कर्णराज याजकडील कारभार निळो बल्लाळ यास दिला. याशिवाय आणखीं पुष्कळ सरदार प्रसिद्धीस आले. राजाराम महाराजांनीं दिलेले हे किताब व सनदा यांचा त्या लोकांना तत्क्षणीं जरी फायदा झाला नाहीं, तरी त्या योगानें सर्व देशभर मराठ्यांचा अंमल बसविण्याचें काम जारीनें सुरूं झालें. प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या अंगीं विलक्षण आवेश उत्पन्न होऊन तो स्वदेश संरक्षणार्थ प्राण देण्यास पुढें सरसावला.

९ **खंदेवीर गडीः**— यावेळीं राजारामाजवळ औरंगजेबाच्या प्रत्यक्ष हल्ल्याला तोंड देण्यास समर्थ असे संताजी घोरपडे व धनाजी जाधव

हे दोन वीर पुरुष होते. तेव्हां सेनापति संताजी घोरपडे यास ' हिंदुराव ममल्कत् मदार ' ही नवीन पदवी देऊन नगारा आणि जरिपटक्याचें निशाण दिलें. धनाजी जाधव यास ' जयसिंगराव ' ही नवी पदवी देऊन या उभयतांस जिंजीहून परत महाराष्ट्रांत पाठविलें. त्यांनीं नवीन फौज तयार करून मोंगलांचा मुलुख लुटावा अशी त्यांना राजाराम महाराजांनीं आज्ञा दिली. यावेळीं महाराष्ट्रांत रामचंद्रपंत किल्ल्यांचा, मुलखाचा, वसुलाचा आणि शिबंदीचा बंदोबस्त उत्तमप्रकारें करीत होते. त्यांनीं त्या प्रांतांत मोंगलांच्या कित्येक टोळ्या संचार करीत होत्या त्यांचा नाश केला. इतक्यांत जिंजीहून संताजी व धनाजी येऊन त्यांना मिळाले. नंतर मोंगलांचे मुलुखांत उपद्रव करणें व आपले गेलेले किल्ले हस्तगत करणें या कामाला सुरवात झाली. मोंगलांचा फौजदार वाईस होता त्याला धरून आणण्याची मसलत ठरली त्याप्रमाणें त्याच्यावर हल्ला करून तो व त्याचे लोक यांना पकडून आणलें. मोंगलांच्या मुलुखांत चौथाई व सरदेशमुखी यांचाही हिस्सा घण्यास रामचंद्रपंतांनीं जे सरदार पाठविले त्यांत पवार, थोरात आणि आटोळे हे मुख्य होते. त्यांनी सरकारी हक्काची चौथ व सरदेशमुखी वसूल केलीच शिवाय स्वतःकरतां घासदाण्याच्या निमित्तानेही निराळा कर वसूल केला. ही या सरदारांची कामगिरी पाहून त्यांना अनुक्रमें ' विश्वासराव, ' ' दिनकरराव, ' आणि ' समशेर बहाद्दर ' अशा पदव्या राजाराम महाराजांकडून रामचंद्रपंतांनीं देवविल्या. रामचंद्रपंतांच्या लष्करांत कित्येक धनगर आपल्या पराक्रमानें मोठ्या योग्यतेस चढले होते. त्यांचा कारकून शंकाजी नारायण या नांवाचा होता. त्यानें सन १६९२ मध्यें रायगडावर हल्ला चढवून मोंगलांपासून तो सर केला. या त्याच्या पराक्रमाबद्दल रामचंद्रपंतांनीं त्याला वाई प्रांताची मामलत दिली. परशुराम त्रिंबक यानें पन्हाळ्यावरील मोंगलांवर हल्ला करून तो काबीज केला. संताजीनें मिरज हस्तगत केली. त्या संताजीच्या पराक्रमाबद्दल रामचंद्रपंतांनीं त्याला देशमुखी दिली. त्यानंतर संताजी व धनाजी हे गोदावरी तीरीं मोंगलांचा मुलख होता तिकडे लूट करण्याकरतां

गेले. या मुलुखांत धान्याची समृद्धि होती. तेथें धान्य स्वस्त मिळे. त्या प्रांतांत संताजी व धनाजी एकदम प्रगट झाल्याची वार्ता औरंगजेबाला लागतांच त्यांचा बंदोबस्त करण्याकरतां त्यानें त्यांच्यावर आपली फौज पाठविली. त्या फौजेचा संताजी व धनाजी यांनीं तीन वेळ पराभव केला आणि त्यांचे मोठे मोठे सरदार पकडून त्यांच्याकडून मुबलक द्रव्य घेऊन त्यांना सोडून दिलें. यामुळें औरंगजेबाला वाटलें कीं मराठे आतां दुर्बल राहिले नाहींत. त्यांच्या ठिकाणीं नवजीवन उत्पन्न झालें आहे; आणि याचें मुख्य कारण जिंजीस राजाराम सिंहासनारूढ झाला आहे हें असावें. तेव्हां तो भीमातीरीं येऊन उतरला व महाराष्ट्रांतील मराठा सरदारांच्या पारिपत्यांत न गुंततां त्यानें जिंजी सर करण्याचा संकल्प केला.

१० **जिंजीचा वेढाः**— औरंगजेबानें झुल्पिकारखान नसतजंग या आपल्या सरदाराला जिंजीला राजाराम महाराजांना जिंकण्याकरतां पाठविलें. तो सन १६९२ च्या सुरवातीला जिंजीला येऊन त्यानें त्या किल्ल्याला वेढा घातला. त्याच्या मदतीला औरंगजेबानें बुंदेला सरदार दलपतराय यास पाठविलें होतें. जिंजी हा किल्ला अनेक डोंगर साधून बांधलेला आहे. यापैकीं दोन डोंगर तर फार उंच आहेत. एक एक मोंगल सरकारानें एक एक डोंगर वांटून घेतला. सुरुंग लागणें, तोफा डागणें, इत्यादि सर्व उपाय त्यांनीं करून पाहिले. किल्ल्यांतील लोक डोळ्यांत तेल घालून किल्ल्याचा बचाव करीत होते. वेढा घालणाऱ्यांस मुख्य अडचण ही होती कीं, आजूबाजूचे जमीनदार व बाहेर असलेले मराठे सरदार मोंगलांच्या सैन्याभोंवतीं घिरट्या घालून त्यांस धान्य व इतर सामग्री मिळूं देत नसत. ते अकस्मात् येऊन एकदम छापा घालीत, त्यायोगें वेढा घालणारांची हिंमत खचत असे. झुल्पिकारखानाबरोबर जेवढें सैन्य होतें तेवढ्यावर वेढ्याचें काम निभावण्यासारखें नसल्यामुळें त्याच्या मदतीस औरंगजेबानें आपला पुत्र कामबक्ष व झुल्पिकारखानाचा बाप आसदखान वजीर यांस पाठवून दिलें. सन १६९५ मध्यें ते जिंजीस आल्यानंतर पुन्हां वेढ्याचें काम जोरानें सुरू झालें. त्यामुळें मराठ्यांना बरीच दहशत बसली.

परंतु सुदैवानें तेथें कामबक्ष व झुल्पिकारखान यांच्यामध्यें कलहाला प्रारंभ झाला. त्या प्रांतांतील सर्व मुलकी आणि लष्करी अधिकार आसदखान वजिराकडे होते. तें कामबक्ष यास सहन होत नव्हतें. शिवाय कामबक्षाच्या कांहीं दुर्वर्तना-बद्दल उभयतां या बाप लेकांनीं त्याला ठपका दिला होता. त्यामुळें यांच्चमधील भांडणें विकोपाला गेलीं. वेढा आपल्या नांवानें चालावा अशी राजपुत्र कामबक्ष याची इच्छा होती. हे त्यांचेमध्यें चाललेले कलह मराठ्यांना समजले. इतक्यांत औरंगजेब मरण पावल्याची कंडी पिकली. या कंडीनें कामबक्षाचें तोंडाला राज्यपद आपणाला मिळेल म्हणून पाणी सुटलें. त्याप्रमाणें तो पुढील विचार करूं लागला. मराठ्यांनीं त्याच्याबरोबर तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या; तोंच मागून संताजी घोरपडे येत असल्याची बातमी त्यांना लागली. मग काय विचारतां ? मोंगल फौजेंत एकच गोंधळ माजला. औरंगजेबाला जिंजीची व मोंगल सरदारांना औरंगजेबाची बातमी पोंचेनाशीं झाली. मराठे कामबक्षाला लालूच दाखवीतच होते. तेव्हां मराठ्यांचें बोलणें मान्य करून आणि पुढील आशेवर नजर ठेऊन कामबक्ष मराठ्यांना जाऊन मिळण्याच्या बेतांत होता. इतक्यांत या उभयतां बापलेकांनीं औरंगजेबाकडून कांहीं हुकूम येत नाहीं असें पाहून व प्रसंगाकडे लक्ष देऊन एकदम कामबक्षाला कैद केलें; तोंच संताजी येऊन जिंजीला दाखल झाला. त्याच्या आगमनानें मोंगल सरदार पळूं लागले आणि त्यामुळें जिंजीचा वेढा बंद पडला.

राजपुत्राला कैद केल्यामुळें मोंगल फौजेंत एकच गोंधळ उडून गेला. कामबक्षाची फौज लढाईवर जाईना. मराठे पाठीवर होते त्यांनीं एकदम येऊन मोंगलांना घेरलें. दलपत बुंदेल्याचें शिकस्तीनें यावेळीं झुल्पिकारखानाला थोडें तरी धान्य मिळालें पण तें किती दिवस टिकणार ! त्यामुळें मोंगलांच्या फौजेंत दुष्काळ कायमच राहिला. तह न झाल्यास आह्मीं तुह्मांस सोडून जाऊं अशी गारदी आणि शिपाई लोकांनीं त्यांना धमकी दिली. दलपत बुंदेल्यानें त्यांची पुष्कळ विनवणी केली परंतु ते ऐकेनात. तेव्हां असदखान वजिरानें मराठ्या-बरोबर तहाचें बोलणें लाविलें. त्यावेळीं खान व संताजी यांच्यामध्यें तात्पुरता

तह होऊन मोंगलांनीं जिंजी सोडून वांदिवाश येथें निघून जाणेचें ठरलें. त्याप्रमाणें मोंगल जिंजी सोडून वांदिवाशला गेले. त्यांचीं जनावरें उपासमारीनें इतकीं अशक्त झालीं होतीं कीं त्यांच्यानें सर्व सामान नेववेना. तेव्हां मोंगलांनीं आपलें पुष्कळ सामान जाळून टाकलें. तोफा फोडून टाकल्या. इतकेंही करून बरेंच सामान जिंजीला सोडून ते निघून गेले. तें सामान मराठ्यांस मिळालें.

जिंजीच्या वेढ्यासंबंधींची विपरीत वार्ता औरंगजेबाला समजल्यानंतर तो रागानें तप्त झाला. त्यानें असदखान वजीर आणि कामबक्ष यांना परत बोलावून घेतलें आणि झुल्पिकारखान यास जिंजी कात्रीज करण्याकरतां असा हुकूम पाठविला कीं, ' हें काम तावडतोब न झाल्यास तुमची मानखंडना होईल. ' असा बादशहाचा धमकीचा, सक्तीचा आणि दरडावणीचा हुकूम आल्यानंतरही बादशहाचे दरबारांतील झुल्पिकारखानाचे दोस्तांकडून ' जिंजी तुम्हीं न घ्याल तर बादशहा तुमचें काय करील याचा नेम नाहीं. ' असेही त्याला निरोप आले. तेव्हां त्यानें जिंजी हस्तगत करण्याचा संकल्प केला आणि आपला तसा विचार त्यानें जिंजीस राजाराम महाराजांस स्पष्ट कळविला. ही वार्ता विशाळगडीं रामचंद्रपंतांना समजली तेव्हां त्यांनीं राजाराम महाराजांना परत महाराष्ट्रांत येण्याविषयीं आग्रहानें लिहिलें. यावेळीं प्रल्हाद निराजी हयात नव्हते. त्यांना कालवश होऊन वर्ष सहा महिने लोटले होते. ते हयात असेपर्यंत कोणतीही नवीन मसलत त्यांच्या विचारानें घडून येई. आतां या आणिबाणीच्या प्रसंगीं जिंजीहून निघून राजाराम महाराजांना महाराष्ट्रांत सुरक्षित कसें नेऊन पोंचवितां येईल हा पेंच सर्वांना पडला. त्या प्रसंगीं खंडो बल्लाळ चिटणीस यांनीं जी मसलत केली त्यामुळें राजाराम महाराजांची सुटका जिंजीहून होऊं शकली. राजाराम महाराजांच्या सुटकेचें सर्व श्रेय खंडो बल्लाळ यानांच होतें. ती मसलत पुढें दिल्याप्रमाणें होती.

**११ राजारामाचें महाराष्ट्रांत पुनरागमनः**—यावेळीं जिंजीस पुन्हां मोंगलाचा वेढा पडला होता. त्या वेढ्यांत गणोजी व रामोजी शिर्के हे

दोन मराठे सरदार होते. गणोजीला छत्रपती शिवाजी महाराजांची राजकुंवर कन्या दिली होती. राजाराम महाराजांचा हा मेहुणा होता परंतु संभाजी महाराजांनीं शिर्क्यांचें शिरकाण करण्याचा जो प्रयत्न कला त्यामुळें गणोजी व राणोजी हे संभाजी महाराजांचे शत्रू बनून ते मोंगलांच्या आश्रयाला आले. गणोजी व रामोजी हे सख्खे चुलत भाऊ असून मोंगलांच्या वतीनें ते जिंजीच्या वेढ्याचें काम यावेळीं चालवीत होते. जिंजी-किल्ल्याच्या नैर्ऋत्येस या दोघांचे मोर्चे होते. त्यांस आपणाकडे वळविण्याच्या हेतूनें खंडो बल्लाळ एके दिवशीं त्यांना जाऊन भेटला. शिर्के प्रथम त्यांचें ह्मणणें ऐकेनात. तेव्हां खंडो बल्लाळ ह्मणाला, ‘या समयास तुह्मीं बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें, तसेच आमचे तीन पुरुष हत्तीच्या पायाखालीं मेले, तेही गेले. परंतु हिंदूंच्या दौलतीकरितां आह्मीं झटत आहोंत. आणि तुम्हीं तो आप्त शरीख [भागीदार] आहां. या समयास आपले भाचे महाराज व कबिले काढून द्यावे. तुमची कीर्ति होईल. या चिटणीसांच्या पोक्त भाषणानें शिर्क्यांचें हृदय द्रवलें आणि आपण मराठे असून, मराठशाहीचा मुख्य पुरुष व आपला आप्त, यास यथाशक्ति मदत करण्यास त्यांच्या चित्तानें ओढ घेतली. शिर्क्यांचें दाभोळचें वंशपरंपरागत वतन यावेळीं चिटणीसांकडे चालत होतें, तें आपणांस परत मिळावें, असा उद्गार शिर्क्यांनीं काढला. त्यावर खंडो बल्लाळ म्हणाला ‘स्वामिकार्याहून वतन व जीवीत आम्हांस अधिक नाहीं. सर्व अर्थ आमचे स्वामींचे पाय आहेत. शिर्क्यांचा उपकार ठेऊं नये.’ असें म्हणून दाभोळच्या वतनाचीं पत्रें राजश्रीच्या स्वाधीन केलीं. यावर शिर्के म्हणाले, ‘मोहितेही आप्त. या राजकारणांत त्यांसही घेतलें पाहिजे. यास्तव त्यांस रत्नागिरी तालुक्यांतील कुटरेगांव इनाम करून द्यावा; आणि आम्हांस भोर तालुक्यांत तीन गांव व रत्नागिरी तालुक्यांत पांच गांव इनाम करून द्यावे.’ हें सर्व कबूल करून शिर्के व मोहिते यांस गांवच्या व दाभोळ येथील देशमुखीच्या सनदा चिटणीसानें नेऊन पोंचविल्या. नंतर मोहिते व शिर्के यांनीं आपल्या आप्तांच्या बायका असें बाह्यतः दाखवून, राजारामास कांहीं मंडळी-

सह आपल्या गोटांत आणिलें. दुसरें दिवशीं शिकारीच्या निमित्तानें ते बाहेर पडले. व कांहीं कोसावर धनाजीची फौज होती, तिच्यांत त्यांनीं राजारामास सुरक्षित पोंचविलें. याप्रमाणें राजाराम महाराजांची सुटका जिंजीहून झाली व ते सन १६९७ च्या डिसेंबर महिन्यांत महाराष्ट्रांत येऊन दाखल झाले.

सन १६९८ च्या जानेवारी महिन्यांत झुल्पिकारखानानें जिंजीचा किल्ला हस्तगत केला. राजाराम महाराजाची बायकामंडळी त्यावेळीं किल्ल्यावरच होती. याप्रसंगीं शिर्क्यांनीं खानास सांगितलें कीं, आपल्या जातभाईच्या बायकांची बेअदबी होईल तर ती आमचीच बेअदबी असें लोक समजतील. हे शिर्क्यांचें ह्मणणे खानाला पटलें व त्यानें राजाराम महाराजांची बायकामंडळी त्यांचे स्वाधीन केली. नंतर शिर्क्यांनीं या मंडळीस वेलोर, अरणीच्या रस्त्यानें लवकरच सुरक्षितपणें महाराष्ट्रात पाठवून दिलें. अशा प्रकारें ताराबाई व त्यांचा मुलगा शिवाजी, राजसबाई व त्यांचा जिंजी मुक्कामीं सन १६९३ मध्यें झालेला मुलगा संभाजी आणि अंबिकाबाई अशी खाशी मंडळी विशाळगडाला पुन्हां येऊन सुखरूप पोंचली. संभाजी महाराजांनीं ज्यांना ज्यांना आपल्या संशयी आणि क्रूर स्वभावामुळें शत्रु करून घेतलें होतें तींच मंडळी राजाराम महाराजांना ऐनप्रसंगीं उपयोगी पडली. जिंजीच्या अशा आणीबाणीच्या प्रसंगीं शिर्क्यांनीं भोंसल्याच्याबद्दल जर द्वेषबुद्धि कायम ठेविली असती तर कोणता अनिष्ट प्रसंग गुजरला असता हें कल्पनेनेंच टरविलेलें बरें. झुल्पिकारखानानें जिंजी किल्ल्यावर इतर जी मंडळी पकडली त्यांतील पुष्कळांना त्यानें कैदेंत ठेविलें आणि कित्येकांना त्यानें ठार मारलें. या ठार मारलेल्या लोकांत प्रल्हाद निराजीचा मुलगा नारो प्रल्हाद हा होता. तिमाजीपंत हणमंते हा शत्रूच्या हातीं सांपडला होता, परंतु तो सुटून विशाळगडीं परत आला.

**१२ मराठ्यांची लढण्याची पद्धत**:–जिंजीच्या वेढ्याचें काम सतत सात वर्षें म्हणजे सन १६९१ पासून १६९८ पर्यंत चाललें होतें. शेवटीं औरंगजेबानें निर्धार केल्याप्रमाणें आपलें सर्व बळ खर्च करून किल्ला हस्तगत केला पण हिंदवी स्वराज्याचा मालक राजाराम महाराज त्याच्या

तावडींतून सुटून पळून गेला. त्यामुळें त्याला आपले सर्वच बेत फसल्याप्रमाणें वाटून तो निराश झाला असेल यांत शंका नाहीं. या सात वर्षांच्या मुदतींत महाराष्ट्रांत मराठे शत्रूबरोबर कसे लढत होते याचें वर्णन चिटणिसांनीं पुढीलप्रमाणें दिलें आहे. मराठे "याप्रमाणें दौलत जमवून बादशहाचे फौजेशीं लढून, बागलाण, गुजराथ, गोंडवण, गंगातीर, स्वदेश, कर्नाटक, जिंजी वगैरे देश, दुर्ग व ठाणीं काबीज करीत चालले. बादशहास वाटलें, कीं मराठेशाही मोडत नाहीं; म्हणून तो वरचेवर कर्नाटकांत फौजा रवाना करीत गेला. इकडे मराठी फौज हिंडती फिरती राहून स्वदेशीं लढाई करून प्रांतांत खंडण्या घ्याव्या, बादशहाचीं ठाणीं उठवावीं, आपले नाके, जागा, किल्लेकोट यांस दिलभरंवसा देऊन बादशहाचा मुक्काम असेल तेथें जाऊन छापा घालावा, मुलूख मारावा, सामान सुमान लुटून हत्ती, घोडे, उंटें न्यावीं; अशी धांदल करीत चालली. मराठी फौज चहूंकडे फांकल्यामुळें ती किती आहे, ह्याचा अजमास लागत नसे. जिंजीकडे बादशाही फौज रवाना होई तीस ते आडवीत, लढाई करून लुटीत, छापा घालीत, मिळून पल्ला पोंचूं देत नसत. याप्रमाणें लढाया जागो जागीं चालल्या. मोंगली फौज मोठी, एक ठिकाणीं उभी राहून लढाई करणार; मराठे यांनीं आज एके ठिकाणीं तर दुसरे दिवशीं वीस पंचवीस कोसांवर दूर जावें; पुनः एकाएकीं येऊन छापा घालावा; लढाई देऊन लुटून पळावें. रात्रीं बेरड लोक घालून घोडीं चोरून न्यावीं. सारांश, मराठे लोकांनीं प्राण तृणप्राय करून राज्य रक्षावें, हें सर्वांचें मनोगत. सर्व हिंदु जातींनीं प्राणाची गरज न धरितां राज्याविषयीं झटावें. इकडील लोकांनीं कामें काजें केल्यानंतर महाराजाकडील सरदारांनीं त्यांची नांवाजणी करावी व सरंजामाच्या सनदा आणून द्याव्या. योग्य मनुष्यास उमेद चढून अरेतुरेनें कामें करीत असावें, अकस्मात् यावें, बक मत्स्य उचलून नेतो, तसा घाला घालावा, शिपाईगिरीची शर्थ करावी. प्रसंग पडल्यास माघारें पळून जावें, खाण्यापिण्याचा दरकार बाळगूं नये; पाऊस, ऊन, थंडी व अंधारी कांहीं न पहातां, घोड्यावरच हरभरे, भाकरी, चटणी,

कांदे खाऊन धांवावें. ' त्यांस कसें जिंकावें ? एक्या मुलखांत फौज आली म्हणून त्यांजवर एकाची रवानगी करावी, तों दुसरीकडे जाऊन ठाणीं घेतात; मुल्ख मारितात; हे आदमी नव्हत, भूतखाना आहे. ' अशी बादशहाची त्रेधा उडाली. " याप्रमाणें हिंदुमुसलमानामध्यें ' रस्सी खेंचीचा ' खेळ महाराष्ट्रामध्यें चाललेला होता. अशा स्थितींत महाराष्ट्राची मोठी हानि ह्मणजे धनाजी व संताजी या उभयतांतील स्पर्धेमुळें संताजीचा वध झाला ही होय. संताजीसारखा रणधीर पुरुष हरपल्यामुळें महाराष्ट्राच्या संरक्षणाची बहुतेक मदार धनाजी यांचेवर पडली.

**१३ सातारा येथें स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठाः**— राजाराम महाराज विशाळगडीं आल्यानंतर त्यांच्या गैरहजेरींत ज्यांनीं ज्यांनीं आपलें जीवित धोक्यांत घालून राज्याचें कल्याण केलें त्या सर्वांची सर्फराजी पुनः एकवार करण्यांत आली. त्यावेळीं रामचंद्रपंत, परशुरामपंत व शंकराजी नारायण या त्रिवर्गांनीं राजाराम महाराजांना विनंति केली कीं, ' आजपर्यंत कळलें तसें राज्यरक्षण केलें; आतां स्वामींनीं सांभाळावें. ' हें ऐकून राजाराम महाराजांना संतोष झाला आणि ते ह्मणाले, ' आजवर तुम्हींच राज्य रक्षिलें; पुढेंही तुम्हींच रक्षणार. ' यापुढें रामचंद्रपंतांच्या सल्याप्रमाणें राजाराम महाराज वागूं लागले. त्यांनीं रामचंद्रपंताच्या मदतीला अंताजी मंगाजी वाकनीस व आबाजी निळो पारसनीस यांना दिलें. नंतर विशाळगडीं साताऱ्याला मराठशाहीची संस्थापना करावी असा विचार ठरला. याचें कारण असें होतें कीं यावेळीं मोंगलांचा विशेष उपसर्ग कोंकणांत नव्हता. रायगड हा किल्ला कोंकणांत होता. शिवाजी महाराजांच्या वेळीं सर्व देशांतून मिळवून आणलेली लूट दूर डोंगरांत लपवून ठेऊन आपला अंदाज शत्रूला लागूं नये या दृष्टीनें रायगड ही राजधानी योग्य होती. परंतु आतां देशावर शत्रूबरोबर सारखा झगडण्याचा प्रसंग येऊं लागल्यामुळें मध्यवर्ती व संरक्षणाला योग्य अशी राजधानीची जागा निवडणें जरूर होतें. त्या दृष्टीनें सातारा हा किल्ला सर्व बाजूनीं सोईस्कर असा होता. विशाळगड, पन्हाळगड, सिंहगड इत्यादि

अनेक मजबूत किल्ल्यांच्या मध्यभागीं तो असून शिवाय घाटमाथ्यावर आणि कोंकणप्रांतावर सारखी नजर ठेवतां येईल अशी साताऱ्याच्या किल्ल्याची ठेवण होती. म्हणून राजाराम महाराजांनीं स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा साताऱ्यास इ. स. १६९८ मध्यें केली. तेव्हांपासून सातारा हें मराठा राज्याची राजधानी झालें. त्यावेळीं राजाराम महाराजांनीं राज्यव्यवस्थेंत बरेच फेरफार केले. सेनापतीपद धनाजी जाधव यांना संताजीनंतर दिलें होतें तेंच कायम केलें. नीलकंठ मोरेश्वर पिंगळे हा पेशवेपदावर होता त्यालाही कायम केलें. अमात्यपद जिंजी येथें जनार्दनपंत हणमंते यांजकडे दिलेलें होतें परंतु ते सन १६९७ मध्यें वारल्यामुळें तें आतां रामचंद्रपंत बावडेकर यांना देण्यांत आलें. प्रल्हाद निराजी मरण पावल्यामुळें त्यांचें प्रतिनिधिपद रिकामें पडलें होतें तें तिमाजी रघुनाथ हणमंते यांना दिलें. पंडीतराव हें पद श्रीकराचार्य कालगांवकर यांच्याकडेच कायम केलें. सचीवपद शंकराजी मल्हार यांजकडे होतें. परंतु पुढें जिंजीस वेढा पडला त्यावेळीं ते सर्वसंगपरित्याग करून काशीला जाऊन राहिले तेव्हां तें पद शंकराजी नारायण गांडेकर यास दिलें. आरमाराचा मुख्य सिधोजी गुजर मरण पावला म्हणून ती जागा कान्होजी आंग्रे यांस दिली; कुलाबा व सुवर्णदुर्ग हीं आरमाराचीं मुख्य ठाणीं झालीं. खंडो बल्लाळ चिटणीस यानें अत्यंत स्वार्थत्याग करून सहाय्य केल्याबद्दल त्याला चौलप्रांतीं वतन देऊन इनामपत्रें दिलीं. अंताजी मंगाजी वाकनीस व आवजी निळो पारसनीस यांचा बहुमान करून त्यांस रामचंद्रपंताचे निसबतीस देऊन ठेविलें. तसेंच परशुराम त्रिंबक, शंकराजी नारायण, आटोले, दाभाडे, बांडगर, पवार, पाटणकर इत्यादि सरदारांचे सन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिलें. एकंदरींत सातारा येथील स्वराज्याच्या पुनर्प्राणप्रतिष्ठेनें मृतप्राय झालेल्या महाराष्ट्रांत पुनः नवजीवन उत्पन्न झालें आणि पूर्ववत् शिवाजी महाराजांच्या वेळप्रमाणें कार्यक्षम होण्याची स्फूर्ति प्रत्येक हिंदूच्या ठिकाणीं निर्माण झाली.

---

# प्रकरण ५ वें.

## "सुळावरची पोळी"

१ सुळावरील पोळी. २ औरंगजेबाची निकराची चढाई. ३ राजारामांचे प्रतिहल्ले व मृत्यु. ४ उच्च कोटींतील राजाराम महाराज. ५ राजाराम महाराजांची प्रभावळ. ६ सती अंबिकाबाई ७ मोंगलांचा आनंदोत्सव व रामचंद्रपंत अमात्यांची कर्तव्यनिष्ठा. ८ सेनापती हंबीरराव मोहित्यांची वीरकन्या ताराबाई. ९ पवित्र स्मृति चिन्हें. १० सातार्‍याचा पाडाव. ११ परळीचा पाडाव. १२ औरंगजेबाच्या धमक्या. १३ धाकट्या शिवाजीचा राज्याभिषेक. १४ जातिवंत सिंहीण ताराबाई.

**१ सुळावरील पोळीः—** राजाराम महाराजांनीं जिंजीचा आठ वर्षांचा आपला वनवास संपवून ते पुनः महाराष्ट्रांत आले आणि त्यांनीं सातारा येथें स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा केली ही गोष्ट मराठ्यांच्या स्वाभिमानाची, त्यांच्या पराक्रमाची, त्यांच्या चिकाटीची आणि त्यांच्या कीर्तीची इतिहासांत सतत प्रभावी साक्ष देत राहील यांत संशय नाहीं. स्वराज्याची संस्थापना सहज होत नाहीं. त्याकरतां अनंत प्राणांचे मोल द्यावें लागतें, बुद्धिमत्तेची खैरात करावी लागते आणि अहर्निश परिश्रमांची उधळपट्टी करावी लागते. इतक्या सर्व मोलानें जरी स्वराज्य संपादन झालें तरी तें टिकविण्याकरतां त्याच मोलाची, किंबहुना त्यापेक्षां जास्त मोलाची, तपश्चार्या खर्ची पडत असते. ही तपश्चर्या 'सुळावरील पोळी' प्रमाणें कशी असते हें पुढील इतिहासावरून लक्षांत येईल.

**२ औरंगजेबाची निकराची चढाईः—** शिवाजी महाराजांनीं औरंगजेबाच्या कैदेंतून आग्र्याहून आपली जशी सुटका करून घेतली व महा-

राष्ट्रांत जशी स्वराज्याची संस्थापना केली तशीच राजाराम महाराजांनीं औरंगजेबाच्या सतत जिंजीच्या आठ वर्षे नक्र दाढेंतील वेढ्यांत राहून आपली सुटका करून घेतली आणि महाराष्ट्रांत पुनः येऊन साताऱ्याला स्वराज्याची संस्थापना पूर्ववत् केली या वार्तेनें अभिमानी, सत्ताधीश, हट्टी व बलिष्ठ अशा औरंगजेबाच्या अंतःकरणाची लाहीलाही झाली असेल यांत संशय नाहीं. मराठे आपल्या सरदारांना दाद देत नाहींत असें पाहून आपण स्वतः आणखी एकदां मराठ्यांशीं निकराचा सामना द्यावा असा त्यानें निर्धार केला. गेल्या चार वर्षांपासून ब्रह्मपुरीला तो जो ठाण मांडून बसला होता तो सन १६९८ मध्यें बाहेर पडला. त्यानें आपला जनानखाना ब्रह्मपुरीलाच आसदखान वजीर याचे स्वाधीन केला, आणि तेथील संरक्षणाचा उत्तम बंदोबस्त करून ठेवला. त्यानें आपल्या फौजेचे दोन भाग केले. एक भाग अजीमशहाचा मुलगा बेदरबख्त व झुल्पिकारखान यांचे हातीं देऊन त्यांस सतत मराठ्यांचे पाठीवर फिरत राहण्यासाठीं पाठविलें. दुसरा भाग आपण स्वतः घेतला. त्यानें तारीख ९ आक्टोबर सन १६९९ रोजीं ब्रह्मपुरी सोडली व कऱ्हाडच्या रस्त्यानें येऊन वसंत गडावर हल्ला चढविला. हा गड कऱ्हाडाजवळ कृष्णा आणि कोयना या दोन नद्यांमध्यें आहे. बादशहानें तो तीन दिवसांत हस्तगत केला आणि त्यानें आपला मोर्चा मुर्तुजाबाद ऊर्फ मिरज इकडे वळविला. तो मिरजेला येऊन पोंचल्यानंतर तेथें त्याचा मुलगा अजीमशहा हा त्याला येऊन मिळाला. पन्हाळा किल्ला हा मिरजेजवळ असल्यानें बादशहाचा पुढील हल्ला पन्हाळ्यावरच होणार अशी ठाम कल्पना रामचंद्रपंताची झाली व त्या हल्ल्याला उलट जबाब देतां येईल अशी त्यानें उत्तम तयारी करून ठेवली. परंतु बादशहा यावेळीं पन्हाळ्याचे वाटेल न जातां त्यानें आपली स्वारी साताऱ्यावर करण्याचें ठरवून तिकडे त्यानें प्रयाण करण्यास आरंभ केला.

यावेळीं औरंगजेबाच्या हल्ल्याला प्रतिउत्तर देण्यासारखी साताऱ्याच्या किल्ल्याची तयारी नव्हती. तेव्हां आपलें बळ विनाकारण शत्रूंशीं सामना देऊन खर्च करण्यापेक्षां हुतूतूचा खेळ खेळत शत्रूला दमविण्याचा विचार

राजाराम महाराजांनीं केला व ते सातारा सोडून उत्तरेच्या बाजूला खानदेशांत मोंगलाच्या मुलुखांत शिरले. त्यांनीं शत्रूचीं पुष्कळ गांवें लुटलीं व जाळून टाकलीं नंतर ते नंदुरबार शहरावर चाल करून आले. इतक्यांत तापी नदीच्या कांठीं असणाऱ्या शिरपुर तालुक्यांत तालनेर म्हणून गांव आहे तेथील मोंगल सरदार हुसेनअल्लीखान आपल्या फौजेनिशीं त्यांचे पाठीवर आला. तालनेरपासून दोन कोसांवर उभय फौजांची गांठ पडली, आणि लढाई मोठी निकराची झाली. मराठ्यांनीं हुसेनअल्लीखानास घेरून त्याचे तीनशे लोक मारले. हुसेनअल्लीखानास तीन जब्बर जखमा लागून तो हत्तीवरून खालीं पडला. त्याचे अंगीं मुळींच त्राण राहिलें नव्हतें. मराठ्यांनीं त्याला कैद केलें. या लढाईत मराठ्यांना त्याचें सर्व सामानसुमान मिळालें व त्याचे लोकही त्यांनीं हस्तगत केले. मराठ्यांनीं हुसेनअल्लीखानापासून दोन लक्ष रुपये दंड मागितला, परंतु तालनेर या गांवीं एवढ्या रकमेची भरती होईना म्हणून नंदुरबारच्या सावकार लोकांना रकमेची भरती करण्यास त्यानें विनंती केली. नंदुरबारचे लोकांनीं मराठ्यांना चौथाईचा वसूलही दिला नव्हता, व या प्रसंगीं त्यांनीं शहराचे दरवाजे बंद करून दांडगाई सुरू केली होती. यामुळें हुसेनअल्लीस राग आला व त्यानें त्यांची खोड मोडण्यास मराठ्यांना उत्तेजन दिलें. रयतेस त्रास देऊं नये. श्रीमान गृहस्थ, व्यापारी, सराफ वगैरेंना त्रास देऊन दंडाची भरती करून घ्यावी असा हुसेनअल्लीनें मराठ्यांबरोबर करार केला. मराठ्यांनीं नंदुरबार शहर लुटलें व पुष्कळ पैसा वसूल केला. त्यापैकी कांहीं भाग हुसेनअल्लीलाही त्यांनीं दिला.

३ **राजारामांचे प्रतिहल्ले व मृत्यु**– पुढें परसोजी भोंसले, (नागपूरकर भोंसल्यांचा पूर्वज) हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, समशेर बहाद्दर आटोळे हे सरदार राजाराम महाराजांना येऊन मिळाले. त्यामुळें तेथें एवढी फौज जमा झाली कीं, प्रत्यक्ष शिवाजी महाराजांचे वेळीं एके ठिकाणीं एवढी फौज कधींच जमा झाली नव्हती. नंतर ते गंगथडीस शिरून चौथाई व सरदेशमुखी वतन आपल्या सामर्थ्यावर वसूल करूं लागले. राजाराम

महाराजांनीं त्या वेळीं वसुलाची पद्धत शिवाजी महाराजांप्रमाणें ठेविली होती. जेथें वसूल करण्यास हरकत पडे तेथील करारनामा करून घेत. ज्या लोकांनीं त्यांना भिमुटपणें कर दिले किंवा जे मुसलमान सरदार त्यांचे आड आले नाहींत त्यांना त्यांनीं कोणत्याही प्रकारचा उपद्रव दिला नाहीं. विरुद्ध वागणारांचे मात्र यथास्थित पारिपत्य केलें. नियमितपणें आपले हक्क वसूल करण्याचा मराठ्यांचा प्रघात या वेळेपासून सुरू झाला. ज्यांना वसूल देण्याचें सामर्थ्य नसे ते आपल्या देण्याबद्दल खतें लिहून देत. याप्रमाणें गंगथडी, नांदेड, खानदेश, व वऱ्हाड या प्रांतांतून राजाराम महाराज स्वतः या वेळीं हिंडले. परत येतांना त्या दरएक प्रांतांत त्यांनीं आपले निरनिराळे सरदार वसूल गोळा करण्याकरतां ठेऊन दिले. वऱ्हाडांत परसोजी भोंसले, खानदेशांत नेमाजी शिंदे, ' बागलाणांत खंडेराव दाभाडे, आणि गंग थडीमध्यें हैबतराव निंबाळकर अशा नेमणुका राजाराम महाराजांनीं केल्या. नंतर ते परत येऊं लागले. येतेवेळीं जालना शहर लुटीत असतां त्यांच्यावर एकाएकीं मोंगल फौज चालून आली.तेव्हां ते माघार घेऊन सिंहगडीं येऊं लागले.येतांना त्यांना पुष्कळ त्रास सोसावा लागला. या मोहिमेच्या दगदगीमुळें त्यांना मार्गांतच ज्वरानें गांठलें. ते सिंहगडाळा येऊन पोंचलें तोंच छातींतील विकाराची ज्वरांत भर पडली. त्यामुळें रक्ताच्या उलट्या होऊं लागल्या. शिवाजी महाराजांच्या अखेरच्या विकाराचें असेंच स्वरूप होतें. दोघेही स्वारीच्या दगदगीनें, त्रासानें आणि स्वराज्यरक्षणाच्या अहर्निश काळजीनें मुक्कामीं येऊन आजारी पडले. उभयतांनाही रक्तवमनाचा ( मराठी रियासत भाग २ पान ६७५ ) विकार झाला. यावरून बापलेकांना हृदयाचा एकच विकार असें निदान ठरवितां येतें. या हृदयाच्याच विकारानें ते तावडतोब सन १७०० च्या मार्च महिन्यांत सिंहगडावर कैलासवासी झाले. उभयतां बापलेकाचें मरण विछान्यावरच झालें आणि तें आकस्मिक झालें. त्यामुळें महाराष्ट्राला दुःखाचा आणि नाउमेद करणारा धक्का बसला. अशा प्रकारें मराठी स्वराज्याचा हा तिसरा

छत्रपति आपल्या वयाच्या सुमारें चाळीसाव्या वर्षीं दिवंगत झाला. ( राजाराम महाराजांचा जन्म सन १६६१ मधील आहे. )

**४. उच्च कोटींतील राजाराम महाराजः**—शिवाजी महाराजांचे कृपाछत्र राजाराम महाराजांच्या मस्तकावर त्यांच्या वयाच्या एकोणीस वर्षांपर्यंत होतें. शिवाजी महाराज कालवश झाल्यानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणें राजाराम महाराजांना त्यांच्या मातोश्रीनें मराठी राज्याचे धनी केलें. परंतु संभाजी महाराजांच्या दंडेलीमुळें राजाराम महाराजांना सन १६८९ पर्यंत रायगडावर संभाजी महाराजांच्या कैदेंतच रहावें लागलें. या आठ नऊ वर्षांत त्यांनीं संभाजी महाराजांविरुद्ध कोणतेंही कारस्थान केलें नाहीं. प्रत्यक्ष मातेचा वध झाला असतां सर्व दुःख गिळून ते संभाजी महाराजांच्या आज्ञेंतच वागले. संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई व पुत्र शिवाजी यांच्या ठिकाणींही त्यांनीं अकृत्रिम लोभ ठेवला. आपल्या मातुल घराण्याचा संहार आणि स्वराज्याचा नाश होत असलेला त्यांनीं प्रत्यक्ष पाहिला. परंतु आत्मसंयमनानें आपल्या वडील बंधूविषयीं स्वाभाविक उत्पन्न होणारा क्रोध त्यांनीं मनांतल्या मनांत दाबून टाकला. त्यावेळीं ते एकोणीस वर्षांचे तरणेबांड होते. कोणत्याही सामान्य तरुणाचें अंतःकरण आपल्या मातेचा अमानुष वध पाहून भडकलें असतें, पेटलें असतें. त्याचा सूड केव्हांना केव्हां तरी त्यानें घेण्याचा प्रयत्न केला असता. परंतु त्यांनीं तो तसा केला नाहीं यावरूनच ते असामान्य कोटींतले होते. शत्रूनें मराठी राज्य बुडविलें; अत्यंत निंद्य आणि क्रूरपणानें भावाचा वध झाला; भावजय, पुतण्या आणि बरीच कुटुंबांतली मंडळी कैद करून नेली; स्वतःच्या स्त्रिया शत्रूच्या दाढेंत सोडून वेषांतरें करून स्वतःला वनवास पतकरावा लागला वगैरे अनेक दुःखाचे धक्के बसल्यामुळें कोणत्याही सामान्य मनुष्याचें वैतागानें डोकें फिरलें असतें. राजाराम महाराज वैताग करून घेऊन कोठेंतरी वैरागी होऊन परागंदा होतील अशी शंकाही येसूबाईंना आली असावी असें दिसतें. त्यांनीं राजाराम महाराजांना विशाळगडीं पुत्र झाल्याची वार्ता शत्रूच्या छावणींत असतांना ऐकली व त्यावेळीं त्यांनीं राजाराम महा-

राजांना जो निरोप पाठविला त्यांत ' तुम्हीं वैताग करूं नये ' असें समाधान मानून राहण्याची सूचना केली होती. यावरून दुःखातिरेकानें वैताग न करून घेतां पुढील कार्यावर दृष्टि ठेऊन ज्याअर्थी ते कार्य क्षम झाले त्याअर्थी ते उच्च कोटीतले होते असेंच ठरतें.

**५. राजाराम महाराजांची प्रभावळः–** शिवाजी महाराजांच्या कीर्तीचें अधिष्ठान जसें राजाराम महाराजांना होतें तितकाच किंबहुना जास्तच संभाजी महाराजांच्या दुष्कृत्यानें उत्पन्न झालेला विरोध त्यांच्यापुढें शत्रूसारखा उभा होता. अशा स्थितींत मागील प्रकरणीं दाखविल्याप्रमाणें स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा करणें हें कार्य सामान्य नव्हतें. लोकसंग्रहत्व, विनय, औदार्य, सत्यप्रियता, स्वकार्यदक्षता. स्वाभिमान आणि स्वधर्मप्रियता हे अलौकिक गुण त्यांच्या ठिकाणीं होते हे निर्विवाद ठरतें. त्यांच्या थोर वृत्तीनें आणि चांगुलपणानेंच त्यांच्या भोंवतीं उत्तम उत्तम कर्ते, व स्वामीभक्त माणसें गोळा झालीं. उग्रस्वभाव केव्हांही व कोणालाही सहज धारण करतां येतो. परंतु राजाराम महाराजांना सर्वांबरोबर नमतें घेऊनच आपला कार्यभाग करून घ्यावा लागला. त्यांच्यामागें पैशाचा जोर असता व प्रबळ शत्रू हात धुऊन मागें लागला नसतां तर त्यांच्या उग्र स्वभावाची चुणूक कोणत्या तरी प्रसंगीं दिसून आली असती. धनाजी व संताजी या त्या वेळच्या अद्वितीय योद्ध्यांमध्यें चुरस उत्पन्न होऊन संताजी सारखा मोहरा मारला गेला व त्यामुळें आपल्या कीर्तीला काळिमा लागला असें जरी होतें तरी भावी काळावर लक्ष ठेवून आपसांतील दुहीला त्यांनीं जास्त तोंड फोडूं दिलें नाहीं. संताजीचे मुलगे राणोजी व पिराजी आणि पुतण्या सिधोजी हे संताजीच्या वधामुळें राजाराम महाराजांना सोडून ज्याअर्थी मोंगलांना जाऊन मिळाले नाहींत त्याअर्थी त्यांच्या अतिउच्च लोकसंग्रहत्वाची कल्पना येते. एकंदरींत मराठ्यांना राजाराम महाराज अजातशत्रू वाटत असले पाहिजेत यांत संशय नाहीं. त्यांनीं शत्रूच्या छावणीवर हल्ला करून येसूबाई व शिवाजी यांना सोडवून आणण्याचा प्रयत्न केला पण तो निष्फळ झाला. एकंदरींत राजाराम महाराजांची

कारकीर्द पहातां त्या वेळीं असा योग्य पुरुष जर नसता तर सारी मराठशाही मंगलमय झाली असती. राजाराम महाराजांच्या कर्तबगारीनेंच स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा झाली हें आतां निराळें सांगण्याची जरूरी राहिली नाहीं.

६ **सती अंबिकाबाई**– राजाराम महाराजांचा अंतकाळ सिंहगडावर अकल्पित झाल्यानें त्यांच्या पत्नीपैकीं त्यांच्याजवळ कोणीच नव्हतें. आमच्या चरित्रनायिका ताराबाई व राजसबाई या आपल्या मुलांसमवेत पन्हाळ्यावर होत्या आणि अंबिकाबाई विशाळगडीं होत्या. अंबिकाबाईचे दुसरें नांव अहिल्याबाई असें होतें. राजाराम महाराजांच्या निधनाची वार्ता त्यांच्या कानीं जातांच त्यांनीं सती जाण्याचा संकल्प केला. त्या प्रसंगीं विशाळगडावर घडलेल्या एका चमत्काराचें वर्णन मल्हार रामराव यांनीं आपल्या बखरींत पुढीलप्रमाणें केलें आहे. हें वर्तमान "विशाळगडीं कळलें त्या समयीं चार सहा घटका दिवस होता. अंबिकाबाईसाहेबांस समजल्यानंतर त्या वाड्यांतून निघून सदरेस आल्या. हवालदार इत्यादिकांनीं मुजरा करून ते श्रमी झाले. तेव्हां बाई बोलल्या कीं, "हा मृत्यु लोक आहे. श्रमी कां होतां? आम्हीं सहगमन करणार! साहित्य करावें!!" यावरून सरनौबत बोलिला कीं, महाराज असतां वाड्याबाहेर निघतां येत नव्हतें. मनुष्य दृष्टीस पडत नव्हतें. हल्लीं या मिषें लोक पहावेत अशी इच्छा झाली." हें ऐकून "ज्यांचे दैवीं माझें सतीचें जाणें पहाणें असेल ते पहातील." अशी बाईचे मुखांतून अक्षरें निघतांच त्यांचे डोळे अंध झाले. त्या काळीं सरनौबत घाबरा होऊन पायांवर डोई ठेविली. "महाराज, मी चुकलों. मजवर कृपा करावी." असें ह्मटल्यावरून हंसून बोलल्या कीं "सती जाण्याचें पहावें." ह्मणतांच दिसूं लागलें. हा चमत्कार सर्वांनीं पाहून विनंति केली कीं, "महाराजांचा काळ सिंव्हगडीं झाला, आज तिसरा दिवस तेव्हां सहगमन कशास करावें?" तेव्हां उत्तर केलें "आपल्यास कळला तोच दिवस मुख्य. तुह्मीं कोणी संशय न धरतां साहित्य लवकर करा. अनमान कराल तरी तुह्मांस महाराजांच्या पायांची शपथ." तेव्हां हवालदार यांनीं विनंती केली, "दिवस थोडा राहिला,

मलकापुराहून साहित्य येणें, रात्र होईल. गलबलीचे दिवस, किल्ल्याचें काम, येविशीं आज्ञा व्हावी." "स्वार पाठवून जलदीनें सामान आणवावें. मी सहगमन केल्यावांचून सूर्य अस्तास जाणार नाहीं." तेव्हां एकमेकांकडे पाहूं लागले. "तुम्हीं खोटें मानूं नका." सदरेची सांवली पडली होती, त्या सांवली जवळ किंचित मातीचा ढीग करवून त्यावर पळसाचें पान रोवलें; "त्यास ओलांडून सांवली जाणार नाहीं." असें ह्मटल्यावरून हवालदारांनीं विनंति केली कीं, "आज्ञेप्रमाणें स्वार रवाना करतों. अस्तमान झाल्यास दरवाजे लावीन. साहेबीं रागें भरूं नये." "नाहीं" असें उत्तर केल्यावर स्वारामागें स्वार ठेऊन स्वारांची डांक लाविली. पळसाचे पानावरून सांवली गेली नाहीं. प्रकाश आहे तसाच होता. मलकापुराहून साहित्य येऊन महाराजांच्या पागोट्याबरोबर बाईनीं सहगमन केलें. स्नानविधि सर्वत्र करीत तोंपर्यंत प्रकाश दिसतच होता. सर्वत्र सदरेस आल्यानंतर चार तास रात्र झाली. अंधःकार दिसूं लागला. हें पाहून सर्वत्रास आश्चर्य वाटलें. "सतीचा प्रताप" असें सर्व ह्मणूं लागले. सतीचा मजकूर पन्हाळ्यास पंताकडे लिहून पाठविला. हें एकून त्यांनींही आश्चर्य मानिलें. पंतांनीं विशाळगडीं दानधर्म बहुत करविला. पुढें सती गेल्या ठिकाणीं बुवासाहेब महाराजांनीं वृंदावन बांधून खर्चाची नेमणूक केली. राजाराम महाराजांची उत्तरक्रिया जिवाजीराजे भोंसले वावीकर यांजकडून करविण्यांत आली. रामचंद्रपंतांनीं दानधर्म बहुत केला. राजाराम महाराजांची छत्री सिंहगडावर आहे. शिवाजी महाराजांचा नित्यपूजेचा बाण राजाराम महाराज आपल्याजवळ ठेऊन पुजीत असत. त्याचीहि स्थापना सिंहगडावर करून रामचंद्रपंतांनीं त्या मंदिराच्या व छत्रीच्या पूजानैवेद्याचा आणि पुण्यतिथीचा खर्च चालण्याकरतां गांव व सरंजाम नेमून दिला.

**७ मोंगलांचा आनंदोत्सव व रामचंद्रपंत अमात्यांची कर्तव्यनिष्ठा**– राजाराम महाराजांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून औरंगजेब आणि त्याचे मुसलमान सरदार यांना आनंदी आनंद झाला. त्या वेळीं त्यांनीं साता-

अनुक्रम ९५.८९५
विभाग
क्र.
नों. दि. ७७
१५/१०/५५

त्याला वेढा देऊन किल्ला काबीज करण्याचें काम चालविलें होतें. त्यांच्या फौजेंत जिकडे तिकडे जयघोष करण्यांत आला. आतां मराठी राज्य आपल्या कब्जांत आलें असें त्यांना वाटलें. राजारामांच्या बायका व दोन अल्पवयी मुलें आपल्यापुढें टिकाव धरूं शकत नाहींत अशी त्यांची समजूत झाली. इकडे रामचंद्रपंत अमात्यांनीं राजाराम महाराजांच्या मृत्यूची वार्ता सर्व सरदारांना कळविली. 'आतां राज्य रक्षण करणें तुह्मांकडेच आहे, सर्व लज्जा तुमचीच आहे' असे शब्दप्रयोग योजून सर्व सरदारांना आपलेपणा वाटेल आणि मराठी राज्याविषयीं आस्था व अभिमान जागृत होऊन मोठ्या उमेदीनें ते पुढें सरसावतील असें केलें. त्यांनीं सर्व सरदारांना सिंहगडावर बोलावून घेतलें आणि दरबार भरवून त्यांनीं पुढील कर्तव्याची ओळख सर्वांना करून दिली व सर्वांना मनापासून सहाय्य करण्याची विनंती केली. सर्व सरदारांनीं रामचंद्रपंतांस आश्वासन देऊन त्यांची खातरजमाही केली. या वेळीं शाहूकडून निरोप घेऊन भक्ताजी हुजरे व बंकी गायकवाड आले. रामचंद्रपंतांची नांवाजगी करून, 'नेटानें राज्यरक्षण करावें व आह्मांस सोडवून न्यावें.' असा शाहूचा निरोप कळविला. यामुळें दरबारांत शाहूविषयीं प्रेम व आदर उत्पन्न झाला. त्यानंतर रामचंद्रपंतांनीं धनाजी जाधव वगैरे सरदारांना शत्रूच्या बंदोबस्ताकरतां ठिकठिकाणीं पाठवून ते सिंहगड सोडून प्रतापगडीं गेले. तेथें श्रीचें दर्शन घेऊन परळी वसंतगडावरून पन्हाळ्यास राजस्त्रियांचे भेटीकरतां आले.

**८. सेनापति हंबीरराव मोहित्यांची वीरकन्या ताराबाई:—** या वेळीं ताराबाई यांचें वय पंचवीस वर्षांचें होतें. या जशा वीरकन्या होत्या तशाच त्या वीरपत्नीही होत्या. हंबीरराव मोहिते हे शिवाजी महाराजांचे सेनापति असल्यामुळें ताराबाईंना लष्करी शिक्षणाचें व लष्करी शिस्तीचें बाळकडूच मिळालें होतें. स्वाभिमान आणि स्वातंत्र्य याच्या वातावरणांतच त्यांची वाढ होत होती. शत्रूशीं सामना दिलेल्या प्रसंगांचीं वर्णनें तिला नित्य बाळबाटीप्रमाणें मिळत होती. शत्रूनें वरचेवर उत्पन्न केलेले पेंचप्रसंग व त्यावर मराठ्यांनीं केलेली तोड या युद्धाच्या खेळांचा इतिहास त्यांना मातु-

कलीच्या खेळाऐवजीं नेहमीं मिळे. स्कराठ्यांतील निरनिराळ्या किल्ल्यांचीं वर्णनें, त्यावरील सरदारांचे पराक्रम याचे पाठ त्यांना दररोज घरीं बसल्याच मिळत होते. स्वधर्म आणि स्वराज्य याची गोडी त्यांना दुग्धप्राशनाबरोबरच दरादिन चाखायला मिळत असे. लष्करांतील मोठमोठ्या, भव्य आणि ल्ढवय्या हत्तींचें दर्शन त्यांना नित्यशः होत होतें. एकापेक्षां एक एक पाणीदार आणि उमद्या घोड्यांचा परिचय त्यांना बालक्रीडेंतच होत होता. घोडदळाची कवाईत आणि पायदळाचे लुटपुटीचे रणसंग्राम त्यांना अहर्निश पहावयाला मिळत होते. मराठा सैनिकांचे इतस्ततः उभारलेले तंबु, डेरे, राहुट्या यांचा देखावा त्यांना सतत पहाण्याला मिळे. ढाल, तलवार, भाला, बर्ची, पट्टा, जंबिया, खंजीर, तीरकमान वगैरे रणसाहित्याचा सहवास त्यांना बालपणापासून घडला असून तरवारींचा खणखणाट आणि तोफांचा दणदणाट यांचाही त्यांच्या कानाला चांगलाच परिचय झालेला होता. स्वारीशिकारीचाही अनुभव त्यांना बालपणींच पहावयाला मिळाला असेल यांत संशय नाहीं. ताराबाईंचे वडील हंबीरराव मोहिते हे स्वधर्म आणि स्वराज्य याच्या जयघोषानें दुमदुमलेल्या वातावरणांत आणि अवतारी पुरुष म्हणून गाजलेल्या शिवाजी महाराजांच्या सहवासांत शिपायाचे सेनापती झाले होते. त्या पिढीला साहस, धाडस, पराक्रम, लूट, मारामार, मोहीम, हल्ला, छापा, कत्तल, हिंदुधर्म, स्वातंत्र्य अशा प्रकारच्या शब्दाशिवाय दुसरे शब्द माहीत नव्हते. शिपाई, शिलेदार, हवालदार, किल्लेदार, फौजदार, सरदार, सेनापती यांच्या लष्करी पेशाच्या हुद्याखेरीज महाराष्ट्रांतल्या मराठ्यांना दुसऱ्या हुद्यांची जाणीव नव्हती. पवित्र गोमातांचें रक्षण आणि त्याकरतां खंद्या घोड्यावर आरोहण यापेक्षां निराळ्या भाग्याची त्यांना जाणीव नव्हती. ढाल तरवारींच्या श्रीमंतीखेरीज दुसऱ्या संपत्तीची त्यांना ओळख नव्हती. स्वामीभक्ति आणि स्वामीकार्य या व्यतिरिक्त इतर कोणत्याहीं कर्तव्याची त्यांना पारख नव्हती. हिंदुधर्माच्या निंदकांचा राग, मूर्तिभंजकांचा संताप, स्वराज्यद्रोह्यांचा द्वेष, गरीबांविषयीं दया, साधुसंतांचे ठिकाणीं आदर, पवित्र मंदिरें आणि पुण्यक्षेत्रें

यांचे ठिकाणीं भक्ति आणि निष्ठा, आर्यमहिलांविषयीं पूज्यभाव वगैरे सद्भावना-प्रधान मनोविकारांव्यतिरिक्त दुसऱ्या विकारांची त्यांना कल्पना नव्हती. अशा महाराष्ट्राला नवजीवन प्राप्त करून देणाऱ्या पिढींतील एक कर्तबगार, धाडसी आणि लष्करी बाण्याचे ताराबाईचे वडील हंबीरराव मोहिते हे होते; आणि अशा प्रकारचें स्वराज्यसंरक्षक माहेरघर ताराबाईंना लाभलें होतें.

**९ पवित्र स्मृति-चिन्हें:–** त्या वेळेच्या विवाह पद्धतीप्रमाणें ताराबाईचें लग्न वयाच्या सातव्या आठव्या वर्षी राजाराम महाराजांबरोबर रायगडीं झालें. राजाराम महाराजांचा हा विवाहयोग संभाजी महाराजांनींच घडवून आणला. त्या वेळीं ते रायगडावर संभाजी महाराजांच्या प्रतिबंधांतच होते. हें लग्न सन १६८३ च्या सुमारास झालें असावें. ताराबाईंना त्यांच्या भाग्यामुळें छत्रपतीच्या घराण्याचें सासर मिळालें. स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या सुनेचा त्यांना मान मिळाला. त्या रायगडीं येऊन राहिल्या त्या वेळीं शिवाजी महाराज कालवश होऊन अवघीं तीन चार वर्षे झालीं होतीं. त्या वेळीं त्यांची स्मृति-चिन्हें अगदीं ताजीं होतीं. त्यांनीं रायगडावर बांधलेला भव्य राजवाडा त्यांच्या ऐश्वर्याची साक्ष देत होता. त्यांच्या राज्याभिषेकाच्या मंगलप्रद दिवाणखान्यांत स्थापन केलेलें सिंहासन, त्यांच्या अचाट पराक्रमाचा, अवतारी कार्याचा आणि भारतीय दिग्विजयाचा साद्यंत इतिहास मुक्तकंठानें सांगत होतें. राजवाड्यालाच लागून असलेलें गंगासागर तीर्थ शिवाजी महाराजांच्या निर्मल धर्मभावना स्पष्ट बोलून दाखवीत होतें. प्रयागची गंगा आणि रामेश्वरचा सेतु यांचा पवित्र संगम गंगासागरांत विधिपूर्वक करून तें पुण्यतीर्थ रायगडीं शिवाजी महाराजांनीं निर्माण केलें. त्या तीर्थात स्नान करून त्याची एक एक पायरी चढून वर जात असतांना हिंदुधर्मरक्षणाकरतां स्वराज्य संस्थापनेची दीक्षा घेतल्यापासून राज्याभिषेकापर्यंत कशीं कशीं संकटें सोसून व कसे परिश्रम घेऊन क्रमाक्रमानें किती पायऱ्या चढून यश संपादावें लागतें याचे विचार त्या सहज सुचवीत होत्या. या पायऱ्या चढून राजवाड्यांत प्रवेश करण्याच्या प्रवेशद्वारावर नगरखाना असून त्याचे भव्य आणि उत्तुंग मनोरे

शिवाजी महाराजांच्या धवलकीर्तीचा संदेश-डंका स्वर्गापर्यंत नेऊन पोंचवीत असल्याचें सांगत होते. राजवाड्यासमोरील विस्तीर्ण आणि भव्य कमान लक्षावधि प्रजाजनांना न्यायदानाकरतां सतत मोकळी असल्याची ग्वाही देत होती. राजमाता जिजाबाई यांचे निधनस्थान राजमाता धर्माचे पाठ पढवीत होतें. शिवाजी महाराजांचें अंत्यस्मृतिस्थान या मर्त्यलोकांतून देह जातो पण कीर्ति अजरामर रहाते याचा उपदेश करीत होतें.

हीं शिवाजी महाराजांचीं ताजीं स्मृतिचिन्हें रायगडावर ताराबाई आल्यानंतर त्यांना पंतोजीप्रमाणें शिक्षण देत होतीं. त्याचप्रमाणें संभाजी महाराजांनीं राजसिंहासन हें स्वतःच्या चैनीचें अगर ऐश्वर्याचें साधन नसून तें ‘ सुळावरील पोळी ’ सारखें आहे याची जाणीव करून न घेतां पित्रद्रोह आणि मातृद्रोह करण्याला ते कसे प्रवृत्त झाले; आपली सासूबाई साध्वी सोयरामाता यांना त्यांनीं कसें क्रूरपणानें ठार मारलें; स्वामिभक्त आणि स्वराज्यभक्त अशा अनेक राष्ट्रपुरुषांच्या रक्ताचा सडा त्यांनीं रायगडावर कसा टाकला याचीही संथा त्यांचीं त्यांचीं स्मृतिचिन्हें त्यांना देत होतीं. हें राजकारणाचें प्राथमिक शिक्षण ताराबाईचें पार पडल्यानंतर त्यांच्या दुय्यमप्रतीच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. संभाजी महाराजांच्या संशयी आणि क्रूर स्वभावामुळें खरे स्वामीभक्त त्यांच्यापासून अलग होऊन तोंडपुजे, कपटी, स्वार्थी आणि विश्वासघातकी लोकांचे जाळें त्यांच्याभोंवतीं कसें पसरलें, त्यामुळें स्वराज्याचा नाश कसा होऊं लागला, शत्रूला आपले पाय पसरावयाला कशी संधि मिळत गेली; त्यांच्यावर व्यसनांचा पगडा कसा बसत गेला; त्यामुळें स्वराज्य-व्यवस्थेकडे कसें दुर्लक्ष झालें, स्वराज्यांत त्यामुळें कशी अंदाधुंदी पसरली; अष्टप्रधानांत कशी फाटाफूट होऊं लागली; शिवाजी महाराजांचा संमृद्ध खजिना कसा कोरडा पडूं लागला; आणि शेवटीं शत्रूच्या करवीं अमानुष वधानें त्यांना कसें मरण आलें याचेंही राजकारणांतील प्रत्यक्ष शिक्षण त्यांना रायगडावर मिळालें. संभाजी महाराजांच्या वधानंतर आपल्या पतिला कंगाल स्थिति प्राप्त होऊन केवळ प्राणरक्षणाकरतां चोराप्रमाणें वेशांतरें करून कसा

देशत्याग आणि पत्नीत्याग करून जावें लागलें, शत्रूनें स्वराज्याचे मुख्य संरक्षक आधार जे रायगड, पन्हाळा आदिकरून मजबूत किल्ले ते कसे हस्तगत केले, येसूबाई व शिवाजी ही खाशी मंडळी शत्रूच्या नक्रदाढेंत कशी सांपडली; आपणाला विशाळगड सोडून कसें चोरून बाहेर पडावें लागलें; कशा संकटांच्या आणि प्राणांतिक कष्टयातनांतून एका सामान्य व्यापारी मालाच्या तारवाच्या सहाय्यानें हजारापेक्षां जास्त मैलाचा प्रवास कसा करावा लागला; आपल्या पतीला सर्वांची मनधरणी करून शत्रू सतत आठ वर्षें जिंजीला वेढा देऊन छातीवर बसला असतां कशीं राजकारणें खेळावीं लागलीं; आणि शेवटीं महाराष्ट्रांत येऊन स्वराज्याची फिरून मांडणी करीत असतां व शत्रूच्या हल्ल्यांना प्रतिजबाब देत असतां अतिश्रमानें सिंहगडावर सिंहाप्रमाणें त्यांना कसें मरण आलें याच्या प्रत्यक्ष अनुभवाचें शिक्षणही त्यांना या वेळीं मिळून चुकलें होतें. मराठ्यांच्या सिंहासनाची लाज राखण्याकरतां आणि स्वधर्म, स्वाभिमान व स्वातंत्र्य यांची कदर ठेवण्याकरतां राजाराम महाराजांनीं आपली सर्व आयुर्मर्यादा खर्च केली व शेवटीं आपले प्राणही स्वराज्याकरतां वेंचले या उच्च भावनांचा प्रकाश ताराबाईच्या अंतःकरणांत या वेळेपर्यंतच्या अनुभवाच्या शिक्षणानें पडून तेथें संग्रहित झालेला होता. अशा तावून सुलाखून निघालेल्या आणि पतिवियोगानें विव्हल झालेल्या मनःस्थितींत रामचंद्रपंत अमात्य त्यांच्या भेटीकरतां विशाळगडीं आले. भेटी झाल्यानंतर राजाराम महाराजांच्या दुःखानें सर्व मंडळी श्रमी झाली. दुःखाचा प्रवाह थोडथोडा ओसरूं लागल्यानंतर रामचंद्रपंतांनीं पुढील राज्यव्यवस्थेचा प्रश्न ताराबाईच्या पुढें ठेविला.

**१० साताऱ्याचा पाडावः**—या वेळीं औरंगजेब साताऱ्याचा किल्ला काबीज करण्याच्या प्रयत्नांत होता. किल्ल्याला वेढा पडून तो सर करण्याची कामगिरी मोठ्या उमेदीनें चालू होती. बादशहाचा मुलगा अजीमशहा हा किल्ला हस्तगत करण्याचा अटोकाट प्रयत्न करीत होता. या वेळीं औरंगजेबाच्या छावणीचा तळ उत्तरेस करंजे गांवाजवळ आणि अजीमशहाचा पश्चिमेस होता. दुसऱ्या दोन बाजूंना तर्बियतखान व सर्जाखान हे मोर्चे लावून बसले

होते. याप्रमाणें मोठ्या बंदोबस्तानें किल्ल्याची नाकेबंदी करण्यांत आली होती. प्रयागजी प्रभु नांवाचा मराठ्यांचा हवालदार किल्ल्यावर होता. हा शिवाजी महाराजांच्या वेळेपासून नांवाजलेला असून या वेळीं किल्ल्याच्या संरक्षणाचें काम त्यानें मोठ्या चतुराईनें चालविलें होतें. किल्ल्यावरून खालीं शत्रूंच्या अंगावर मोठमोठे दगड लोटून व गोळ्यांचा वर्षाव करून त्यानें त्यांस जेरीस आणलें. बादशहाचे फौजेंत धान्याचा पुरवठा होईना. किल्ल्याचे सभोंवार वीस कोसपर्यंत सर्व प्रदेश मराठ्यांनीं जाळून उद्‌ध्वस्त केला. त्यांतूनही जी सामुग्री छावणींत येई ती मराठे केव्हांच लुटून नाहींशी करीत. तसेच परशुराम त्रिंबक मोठ्या युक्तीनें परळीच्या किल्ल्यावरून सातारच्या किल्ल्यावरील लोकांना शक्य ती धान्याची मदत करूं लागला. किल्ल्याला वेढा पडून तीन चार महिने होत आले तरी तो हस्तगत होण्याचीं चिन्हें दिसेनात. पुढें बादशहाचा सरदार तर्बियतखान यानें ईशान्येच्या मंगळाईच्या बुरुजाखालीं दोन मोठे सुरुंग तयार केले. ही बातमी किल्ल्यावरील लोकांना समजली नव्हती. सुरुंग कसे उडतात हें पहाण्याकरतां खुद्द औरंगजेब मोठ्या थाटानें बाहेर आला होता. किल्ल्यावरील बरेच लोक त्यास पहाण्याकरतां बुरुजावर एके-ठिकाणीं जमले होते. सुरुंगाला बत्ती दिल्याबरोबर भयंकर स्फोट होऊन, डोंगराचा एक मोठा खडपा त्यावरील मंगळाईच्या बुरुजासह एकदम जोरानें वर आकाशांत उसळून किल्ल्यांत जाऊन पडला. त्यामुळें मराठ्यांचे शेंकडों लोक प्राणाला मुकले. हें पाहून मुसलमान फौज जोरानें पुढें घुसली. दुसरा सुरुंग पहिल्याप्रमाणेंच किल्ल्यांत उडेल असा अंदाज होता. परंतु मोंगल फौज नजीक येण्याबरोबर तो सुरुंग पहिल्याप्रमाणेंच मोठ्या वेगानें उडाला परंतु तो किल्ल्यांत न जातां मोंगल फौजेवरच खालीं येऊन पडला. त्यामुळें शत्रूचे दोन हजार शिपाई प्राणाला मुकले. या प्रकारामुळें बादशहाला फार दुःख झालें. किल्ल्याचा हवालदार प्रयागजी प्रभु हा मातीच्या व दगडांच्या ढिगाऱ्यांत सांपडला. परंतु त्यामुळें त्याला विशेष इजा न होतां तो मोठ्या नशीबानें वाचला. यामुळें मराठ्यांना पुनः उमेद चढून त्यांनीं किल्ल्याची व

बुरुजाची लगेच दुरुस्ती करून घेतली व ते मोठ्या धैर्यानें लढूं लागले. तेव्हां मोंगलांचे धैर्य खचलें. त्या वेळीं स्वतः औरंगजेब फौजेच्या पुढें होऊन सर्वांना धीर देऊं लागला. त्यानें सर्वांना धीराच्या गोष्टी सांगून पुनः लढाईला उद्युक्त केलें. आतां मात्र त्याच्यापुढें निभाव लागत नाहीं असें मराठ्यांना वाटलें. किल्ल्यांतील सामग्री संपली, कित्येक लोक मरण पावले. कित्येक जायबंदी झाले. राजाराम महाराज याच प्रसंगीं सिंहगडावर मरण पावल्याची खबर आली. सर्व बाजूंनीं मराठ्यांची कंमर खचली. त्यामुळें प्रयागजी अनंत अगदीं जेरीला आला. तेव्हां परशुराम त्रिंबक यानें आपण होऊन किल्ला स्वाधीन करून देतों असें बोलणें अजीमशहाच्या मार्फत औरंगजेबाकडे लाविलें. त्यानें तें तत्काळ मान्य केलें. तेव्हां प्रयागजी अनंतनें सर्व किल्ला खाली करून त्याच्या किल्ल्या बादशहाकडे पाठवून दिल्या. सातारचा किल्ला अजीमशहाच्या वतीनें हस्तगत झाला म्हणून त्याचें नांव त्यानें अजीमतारा असें ठेवलें. या प्रमाणें मराठ्यांच्या नवीन राजधानीचा किल्ला औरंगजेबानें तारीख २१ एप्रिल सन १७०० रोजीं काबीज केला.

**११ परळीचा पाडाव**— साताऱ्याचा किल्ला काबीज केल्याबरोबर औरंगजेबानें परळी उर्फ सज्जनगड किल्ल्याला वेढा दिला. या ठिकाणींही त्याच्या फौजेची बरीच खराबी झाली तरी शेवटीं जेरीस येऊन दोन महिन्यांनीं हाही किल्ला मराठ्यांनीं खाली करून दिला. या प्रसंगीं फत्तुल्लाखान हा बादशहाचा प्रमुख सरदार होता. बादशहानें परळीचा किल्ला हस्तगत केल्यानंतर त्याला 'नवरसतारा' असें नांव दिलें. सातारा व परळी हे किल्ले औरंगजेबानें हस्तगत केले त्याविषयीं खाफीखानानें हकीकत दिली आहे. राजाराम मरण पावला त्या वेळेस परशुराम त्रिंबक परळीच्या किल्ल्यावर राहून कारभार पहात होता. राजारामाच्या मृत्यूची वार्ता ऐकून, परळीच्या किल्लेदारास न विचारतां, परशुराम त्रिंबक बादशहास शरण गेला. त्यामुळें किल्लेदारही घाबरून जाऊन, कांहीं शर्तीवर किल्ला बादशहाचे स्वाधीन करण्यास तयार झाला. त्यावेळीं बादशहा साताऱ्यास वेढा घालून बसला होता.

सुभानजी लांबघरे ह्मणून साताऱ्याचा किल्लेदार होता. त्याचें व परळीच्या किल्लेदाराचें वांकडें होतें, ह्मणून 'परळीच्या किल्लेदाराचें बोलणें नाकबूल केल्यास मी होऊनच सातारा व परळी हे दोनही किल्ले आपल्या स्वाधीन करून देतों.' असें सुभानजीनें बादशहाकडे बोलणें लाविलें. बादशहानें ही गोष्ट मान्य करून, सातारा किल्ला ताब्यांत घेतला आणि सुभानजी यास पांच हजाराची मनसब व परळीच्या देशमुखीची सनद दिली. सातारा व परळी हे किल्ले बादशहानें काबीज केले. यासंबंधीं निरनिराळ्या इतिहासकारांच्या माहितीमध्यें जरी भिन्नता असली तरी एवढी गोष्ट सत्य आहे कीं, राजाराम महाराज मरण पावल्यानंतर लगेच सातारा व परळी हे किल्ले मराठ्यांच्या हातून औरंगजेबानें घेतले. परळीचा किल्ला तारीख ९ जून सन १७०० रोजीं त्यानें हस्तगत केला.

**१२ औरंगजेबाच्या धमक्या—** या वेळीं औरंगजेब लष्करी मदतीच्या आणि कपटनीतीच्या अशा दोन्ही अंगांनीं बलिष्ठ होता. जेथें ज्याचा उपयोग होईल तेथें तशी योजना करून आपले किल्ले काबीज करण्याचें उद्दिष्ट साध्य करून घेत होता. औरंगजेबानें स्वतः ही मोहीम हातीं घेतली त्यावेळेपासून त्याचे मराठ्यांत फूट पाडण्याचे सारखे प्रयत्न चालले होते. त्या प्रसंगीं राजाराम महाराजांचे जे आधारस्तंभ रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत प्रतिनिधि यांस त्यानें पत्रें लिहिलीं आणि एकाचें पत्र दुसऱ्याच्या हातीं अगर ताराबाईच्या हातीं पडावें अशी युक्ति योजिली. औरंगजेबानें परशुराम त्रिंबक यास तारीख ३१ आक्टोबर सन १६९९ चें पत्र पाठविलें. ( मॉडर्न रिव्ह्यु १९०८ ). "पन्हाळ्याचा किल्लेदार त्रिंबक यानें जाणावें कीं, दुष्ट रामराजाचे किल्ले काबीज करून त्यास ठार मारण्याकरतां आमची फौज चालून जात आहे. थोड्याच दिवसांत आमचा मुक्काम मुर्तुजाबाद ( मिरज ) येथें होईल; परमेश्वरकृपेनें त्या दुष्टाचे सर्व किल्ले व जागा आमच्या कबजांत येतील आणि दुर्दैवी रामराजाची दशा त्याच्या दुष्ट भावासारखीच होईल. मराठ्यांचे कांहीं किल्लेदार आमच्या पक्षास येऊं इच्छित आहेत; आणि तुह्मांही

आमच्या पूर्वीच्या पत्राप्रमाणें सुदैवास वश होऊन किल्ला आमचे हवालीं कराल तर तुमच्यावर आमची मोठी मेहेरबानी होऊन तुह्मांस मोठी मनसब मिळेल. ईश्वरानें तुह्मांस ही सुबुद्धि न दिल्यास, किल्ला हा आह्मीं काबीज करूंच, आणि मग तुह्मांस काय दिसायचें तें दिसेल. तुह्मास व तुमचे कुटुंबांतील लहान थोर बायका मुलें झाडून सान्यास पकडून ठार करण्यांत येईल. कळावे."

याच प्रकारचें दुसरें पत्र औरंगजेबानें रामचंद्रपंत अमात्य यांना त्याच तारखेचें लिहिलेलें आहे. "रामचंद्र यानें जाणावें कीं, सुदैवानें दूरवर विचार करून तुह्मीं शुभमुहूर्तावर तर्बियतखानास (हा औरंगजेबाच्या तोफखान्यावर होता,) पत्र लिहिलें; तें आह्मी वाचलें. त्यांतील सर्व प्रकार आह्मांस कबूल आहेत. त्यावरून आह्मी असें फर्मावतों कीं, भरंवशाचा व निष्ठेचा जो सन्मार्ग तुह्मीं धरिला आहे, तो कायम ठेवा, लिहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी त्वरेनें करून दाखवा, आणि त्या दुष्टाचा (राजारामाचा) आश्रय सोडून द्या. त्या दुष्टाच्या नश्वर आयुष्याचे जर अजून कांहीं क्षण बाकी असून, आमच्या फौजेस भिऊन पळून जाण्याची त्यास इच्छा होईल, तर तुह्मींच सर्व किल्ले आमचे हवालीं करावे हें योग्य आहे. परमेश्वरानें तुम्हांस बुद्धि देऊन दोनही गोष्टी केल्यात ह्मणजे तुमचा उत्कृष्ट सन्मान करून, तुह्मांस उत्तमोत्तम बक्षिसें व मनसब देऊं; परंतु दुर्दैवानें आपलें नफानुकसान काय हें जर तुम्हांस कळलें नाहीं, आणि तुमचे पत्रांतील शब्द सर्व फोल असतील, तर मग तुह्मी व तुमचा राजा यांस काय दिसायचें तें दिसेल. मुलांमाणसांसुद्धां तुमचीं सर्वांचीं डोकीं कापलीं जातील. कळावें."

वरील पत्रें लक्षपूर्वक वाचलीं ह्मणजे औरंगजेबाची ही मोहीम कशाकरतां होती हें स्पष्ट होतें. शिवाजी महाराजांनीं मुसलमानांचा अंमल झुगारून देण्याकरतां जी हिंदूंच्या स्वराज्याची स्थापना केली ती मूलतः उखडून काढावी व त्या गादीवर जो विराजमान होईल तो दुश्मन म्हणून त्याला ठार मारावें हाच त्याचा प्रधान हेतु होता; आणि तो साध्य करून घेण्याकरतां मराठा

मंडळांत जेवढी फूट पाडतां येईल आणि अष्टप्रधानांत जेवढे भेद करतां येतील तेवढे सर्व प्रयत्न त्यानें सुरू केले. वरील पत्रें हीं त्या प्रयत्नाचीं केवळ चित्रेंच आहेत. त्या पत्रांच्या द्वारें असें स्पष्ट दाखविण्यांत आलें आहे कीं सध्यां छत्रपति तेवढा आमचा दुष्मन आणि तुह्मी आमच्या पक्षाला मिळाला तर आह्मीं सर्व बाजूनीं तुमचें उर्जित करूं आणि तसें न कराल तर तुह्मांलाही दुष्मन समजून तुमच्या बायकापोरांसह तुमची कत्तल करून टाकूं. अशा प्रकारची धमकी देऊन छत्रपति व त्यांचे अष्टप्रधान यांची दोन निरनिराळीं शकलें पाडण्याचा व आपापल्या जीविताविषयीं स्वतंत्रपणें विचाराचा ओघ पलटविण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. यामुळें छत्रपतीवर त्याला सहाय्य होणाऱ्या लोकांच्या मुलाबाळासहित सर्वांची जबाबदारी टाकण्यांत आली व ती जबाबदारी घेण्याला जर छत्रपति लायक नसेल तर ती ज्यानें त्यानें स्वतंत्र विचार करून आपापले शिरावर घ्यावी असें उघड झालें. राजाराम महाराज जिवंत असेपर्यंत त्यांचा धीर आणि विश्वास सर्वांना वाटण्यासारखा होता. परंतु ते आतां दिवंगत झाले. शाहूकडून अष्टप्रधानांना धीर वाटण्यासारखा संदेश आला पण ते औरंगजेबाच्या कैदेंत होते. राजाराम महाराजांच्या स्त्रिया व अल्पवयी मुलें यांचा तर उघड अगदींच उगापक्ष दिसत होता. याकरितां औरंगजेबाच्या वरील पत्रामुळें प्रत्येक मनुष्याच्या मनांत स्वतःचें अस्तित्व कायम राखण्याकरतां भयंकर खळबळ उडाली होती यांत संशय नाहीं. ‘ शीर सलामत तो पगडे पचास ’ या म्हणीप्रमाणें आपले प्राण वाचले तर पुढें हिंदुधर्म, स्वराज्य आणि स्वातंत्र्य ! औरंगजेबाच्या या वेळेच्या आणीबाणीच्या मोहिमेंत जर सर्वच नाश होऊन गेलें तर सारेंच जागच्या जागीं राहील अशी दहशत प्रत्येकाला उत्पन्न झाली. औरंगजेबाला या वेळीं शरण जाऊन आपले प्राण रक्षण करावे कीं शाहु महाराजांच्या संदेशाकडे आशायुक्त दृष्टीनें पहात बसावें अथवा राजाराम महाराजांच्या बालकांकडे लक्ष ठेऊन जो प्रसंग येईल त्याला तोंड देत बसावें या विचारांनीं प्रत्येक दिङ्मूढ बनला असेल यांत संशय नाहीं. राजाराम महाराजांच्या दोन स्त्रिया, त्यांचा पक्ष उचलावा तर स्त्रियांची क्षणिक बुद्धि.

केव्हां कशी पालटेल याचा विश्वास नाहीं. शिवाय त्या सवती सवती ! केव्हां आणि कसा आपसांत कलह उत्पन्न करतील याचा नेम नाहीं. म्हणून राज्य-शकटाची धूरा जबाबदारीनें आपल्या शिरावर घेण्याची प्रत्येक प्रधानाला धास्ती वाटत असली पाहिजे यांत शंका नाहीं. यावेळीं शाहु महाराज वीस एकवीस वर्षांचे तरुणबांड होते. त्यांच्यावर औरंगजेब बादशहाची मर्जी होती. त्यांना औरंगजेबाच्या मुलीनें तळहातावरील फोडा प्रमाणें वाढविलें होतें. तेव्हां त्यांच्या सुटकेचा प्रयत्न जर केला तर तो या प्रसंगीं फायद्याचा होईल व ते परत आले तरच राज्याचें रक्षण यावेळीं होईल असें रामचंद्रपंतांना वाटत होते; व त्या दृष्टीनें त्यांच्या विचाराचा प्रवाह चालू आपत्तींतून सर्वांची मुक्तता होण्याविषयीं वाहत होता. एकंदरींत बृहन्महाराष्ट्रामध्यें या वेळीं राजाराम महाराजांच्या आकस्मिक मृत्यूमुळें आणि औरंगजेब बादशहाच्या निकराच्या चढाईमुळें प्रत्येक हिंदुमात्राच्या अंतःकरणांत ' पुढें आपलें कसें होईल ? ' हा एकच प्रश्न थैमान घालीत होता व अशा बिकट प्रसंगीं कोणती असामान्य व्यक्ति आणि शक्ति पुढें सरसावून स्वधर्माचें तथा स्वराज्याचें संरक्षण करणार आहे याच्याकडे सर्वांचे चातकाप्रमाणें डोळे लागले होते.

१३ **धाकट्या शिवाजीचा राज्याभिषेकः**— पन्हाळ गडावर रामचंद्रपंतांनीं ताराबाई यांच्यापुढें पुढील राजकारभारासंबंधीं ज्यावेळीं प्रश्न उपस्थित केला त्या वेळीं स्वराज्याची पुढील दिशा कशी आंखावयाची याचा साधकबाधक रीतीनें ताराबाईनीं विचार करून ठेवला होता. त्यांनीं मोजक्या शब्दांत रामचंद्रपंतांना आपला मनोदय सांगितला. ' शिवाजीची ( आपल्या मुलाची ) मुंज करून त्याला राज्याभिषेक करावा. ' या त्यांच्या मसलतीला परशुराम त्रिंबक व शंकराजी नारायण हे सम्मत झाले. रामचंद्रपंत यांचा ओढा जरी शाहुकडे होता तरी त्यांनीं प्रसंगाचें महत्व पाहून शेवटीं तेही कबूल झाले. नंतर यथाविधि शिवाजीची मुंज होऊन पन्हाळगडीं त्यांना शके १६२० ज्येष्ठमासीं राज्याभिषेक झाला. [ म. सा. छोटी बखरपान ६५ ]

( इ. स. १७०१ ) त्या वेळीं बुधकर घाटगे यांची कन्या भवानीबाई हिच्याशीं शिवाजीराजे यांचें लग्न झालें.

**१४. जातीवंत सिंहीण ताराबाई**:— या वेळीं शिवाजीचें वय अवघें दहा वर्षांचें होतें. त्यामुळें सर्व राज्यकारभाराची जबाबदारी ताराबाईवर येऊन पडली. ही जबाबदारी ताराबाईनीं कोणत्या पेंचप्रसंगाच्यावेळीं स्वतःच्या शिरावर घेतली याचा विचार न करतां कित्येक इतिहासकार त्यांना महत्वाकांक्षी, स्वार्थी, हट्टी अशीं विशेषणें देऊन त्यांचा उपहास करतात, परंतु त्या प्रसंगाचें खरें आकलन त्यांना झालें नाहीं, असें स्पष्ट म्हणावें लागतें. महाराष्ट्रावरील त्या प्रसंगाची थोडक्यांत पण बरीच कल्पना द्यावयाची म्हणजे भारतांतील बकासुराच्या प्रसंगाची द्यावी लागेल. औरंगजेबासारखा बलिष्ठ बकासूर हिंदुपदपातशाही भक्षण करण्याकरतां धांवून चढाई करीत असतां व मी मी म्हणणारे मराठे वीर त्याच्या दहशतीनें दिङ्मूढ झाले असतां आपल्या एकुलत्या एका मुलाला राज्याभिषेक करवून त्याला नवीन राज्यशकटावर बसवून व आपण स्वतः सारथी होऊन त्याचें औरंगजेबाला बलिदान करण्याकरतां ती वीरकन्या, ती अस्सल क्षत्रिय महिला, ती जातिवंत सिंहीण बाहेर पडली, हें स्मृतिचित्र महाराष्ट्राच्या इतिहासांत सोनेरी रंगानें चितारलें जाऊन अजरामर राहील. ताराबाईनीं आपल्या मुलाला राज्याभिषेक स्वार्थाकरतां करविला नसून तो ‘ सुळावरील पोळी ’ प्रमाणेंच होता हें स्पष्ट दिसून येईल. ताराबाईना स्वार्थी ह्मणण्यांत इतिहासकारांनीं रामचंद्रपंतांच्या त्या वेळेच्या विचारांचा पुरस्कार केलेला आहे. ‘ ताराबाईनें आपले मुलास गादीवर बसविण्याचा उपक्रम चालविला, हें रामचंद्रपंतास बिलकुल आवडलें नाहीं. शाहूची सुटका झाल्यावर दोघांच्या मुंजी एकदम कराव्या, असा रामचंद्रपंताचा सल्ला होता. पण परशुरामपंत व शंकराजी नारायण यांचा ओढा ताराबाईकडे असल्यामुळें, ताराबाईचें म्हणणें कबूल करावें, असा त्यांनीं रामचंद्रपंतांस आग्रह केला. रामचंद्रपंतानेंही प्रसंग पाहून कलह मिटविण्याकरितां माघार घेतली, आणि कल्याणप्रद असेल तें करण्यास सांगितलें. ’

(म.रि.भा.२पृ.६८७)अशी रियासतकारांची ताराबाईना दृष्टी,स्वार्थी,महत्वाकांक्षी वगैरे ह्मणण्याची इतिहासाची संगती आहे. त्यांच्या संगतीप्रमाणें रामचंद्रपंताच्या हेतूंतील मुख्य दोन मुद्दे होते.(१) शाहूराजे औरंगजेबाच्या कैदेंत होते त्यांना सोडवून आणून त्यांना गादीवर बसवावें.(२) तसें न झाल्यास राज्याला जें कल्याणप्रद असल तें करावें. रामचंद्रपंतांचा पहिला हेतू लक्षांत घेतां शाहूराजे यांची सुटका करण्याचा प्रयत्न राजाराम महाराजांनीं दोन वेळां केला परंतु त्यांना यश आलें नाहीं. राजाराम महाराज हयात असते तर त्यांनीं शाहूराजे यांच्या मुक्ततेकरतां तिसराही प्रयत्न याहीपेक्षां जास्त जोराचा केला असता यांत संशय नाहीं. परंतु या प्रसंगीं रामराजे कालवश झाल्यामुळें अर्थातच मराठ्यांचें सामर्थ्य खचलें होतें. उलटपक्षीं आपला एक मोठा शत्रू नाहींसा झाला म्हणून औरंगजेबाला मोठा आनंद झाला होता. त्यानें आपल्या फौजेला नवीन उमेद यावी व मराठी राज्य बुडविण्याची त्यांची स्फूर्ति वाढावी म्हणून त्यानें आपल्या फौजेंत आनंदोत्सवही करून सर्वांना प्रोत्साहन दिलें होतें. अशा वेळीं पहिल्यानें आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून शाहूराजे यांच्या मुक्ततेचा प्रयत्न करणें मोठ्या धोक्याचें होतें. जर या प्रयत्नांत यश येण्याची खात्री असती तर तो मार्ग सर्वांनी स्वीकारलाच असता. परंतु सर्व बाजूंनीं औरंगजेबाची चढती कमान असल्यामुळें आपण चढाईचें धोरण स्वीकारून त्याचा पराभव करण्याचा प्रयत्न करणे ह्मणजे बुडत्याचे पाय जास्त खोलांत नेण्यासारखें होतें. म्हणून रामचंद्रपंतांचा सल्ला उभय पक्षांच्या बलाबलाच्या दृष्टीनें अव्यवहार्य होता. ह्मणूनच त्यांना परशुरामपंत व शंकराजी यांच्या सल्लयापुढें नमतें घ्यावें लागलें. ताराबाईचा व या उभयतांचा मनसुबा राज्याच्या कल्याणाचा होता अशी खात्री झाल्यामुळें रामचंद्रपंत त्यांना शेवटीं सहमत झाले. राज्याचें अकल्याण होतें असें जर त्यांचें प्रामाणिक मत शेवटपर्यंत राहिलें असतें तर ते कोणाच्याच वशिल्याला अगर मोहाला बळी पडले नसते. त्यांनीं ज्याअर्थीं यावेळीं आपली बाजू पडती घेतली त्या अर्थी या पुढील औरंगजेबाशीं होणारें युद्ध बचावाचेंच करणें इष्ट होतें व त्या करतां शिवाजीराजे यांना राज्याभिषेक करूनच त्यांच्या

छत्राखालीं मराठ्यांची संघटणा होणार होती व राज्याचें रक्षण होणें शक्य होतें अशी त्यांची खात्री झाली. म्हणूनच त्यांनीं ताराबाईचा अंतःकरणपूर्वक सल्ला मान्य केला व ते शिवाजीराजे यांच्या राज्याभिषेकाला तत्पर झाले. यावरून शिवाजी राजे यांना राज्याभिषेक करण्याचा ताराबाईंच्या मनसुबा स्वार्थाचा नसून तो राज्याच्या कल्याणाचा होता हेंच निश्चित ठरतें. ताराबाई-नीं हें वीरकन्येला व वीरपत्नीला शोभणारें साहस जर केलें नसतें तर या प्रसंगीं मराठ्यांचीं ' दिव्यावर येऊन पडणाऱ्या पतंगांप्रमाणें ' स्थिति होऊन निःसंशय पराक्रमी मराठे वीरांचा व त्याबरोबर मराठी राज्याचा संपूर्णपणें नाश झाला असता; म्हणून या प्रसंगीं ताराबाईंनीं मोजक्या शब्दांत आपला सल्ला जो व्यक्त केला तो किती व्यवहार्य आणि बिनतोड होता हें लक्षांत येईल. शांतपणें विचार केला म्हणजे पुनः पुनः शिवाजी राजे यांना राज्याभिषेक करविण्यांत ताराबाईचा स्वार्थ नव्हता तर ती केवळ ' सुळावरील पोळी ' होती असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

---

# प्रकरण ६ वें

## मोंगलमर्दिनी ताराबाईचा भगवा झेंडा

**१. स्वराज्याची राजधानी पन्हाळा. २. युद्धाची नवीन पद्धत. ३. मोंगल फौजेची नवीन सिद्धता. ४. पन्हाळ्याचा पाडाव. ५. खेळणा किल्ल्याचा पाडाव. ६. सिंहगडचा पाडाव. ७. संकटांचे पंचप्रसंग. ८. धन्य ती ताराबाई. ९. मोंगलांच्या मागें मराठ्यांचा शशेमिरा. १०. पुनापा नाईक. ११. पाडाव झालेले किल्ले पुनः मराठे जिंकतात. १२. औरंगजेबाची वाताहत. १३. कपटवृत्ति आणि वीरवृत्ती यांचीं दोन चित्रें. १४. औरंगजेबाच्या अखेरीची पहाणी. १५ औरंगजेबाचा अंत. १६. मोंगलमर्दिनी ताराबाई.**

**१. स्वराज्याची राजधानी पन्हाळा:—** औरंगजेबानें सातारचा किल्ला काबीज करून राजाराम महाराजांनीं बनविलेल्या राजधानीचें तेथून जरी उच्चाटन करविलें तरी मराठ्यांच्या स्वराज्याची ती राजधानी एकदम पन्हाळा किल्ल्यावर उदय पावून त्या ठिकाणीं ' मराठ्यांच्या स्वराज्याचा भगवा झेंडा ' फडकूं लागला. ताराबाईनीं अष्ट प्रधानांची जी नेमणूक केली त्यांत फक्त प्रतिनिधिपद तिमाजी रघुनाथ हणमंते याजकडे होतें तें काढून परशुराम त्रिंबक याला दिलें; आणि बाकीचे पूर्वीचेच प्रधान कायम केले. शिवाय संभाजी महाराजांच्या वेळेप्रमाणें गृहकलह उत्पन्न व्हावयाला स्वार्थी लोकांना संधि मिळूं नये म्हणून त्यांनीं राजसबाई व त्यांचा मुलगा संभाजी यांना नीट [illegible] ानें आपल्या नजरकैदेंत ठेविलें. याप्रमाणें राज्यव्यवस्था पन्हाळगडीं [illegible] आणल्यानंतर त्यांनीं आपलें पतिनिधनाचें दुःख खुंटीला टांगून ठेवि[illegible] अंधारमय गर्तेतून स्वभक्ष्य संपादनाकरतां ज्याप्रमाणें

सिंहीण बाहेर पडते त्या प्रमाणें ताराबाई शत्रूचा सुगावा घेण्याकरतां व ठिकठिकाणच्या किल्ल्यांचा बंदोबस्त करण्याकरतां जातीनें बाहेर पडली. ' ताराबाई जबरदस्त उद्योगी होती. निरनिराळ्या किल्ल्यावर फिरती राहून, तिनें ठिकठिकाणचा बंदोबस्त केला. ' (मराठी रियासत भाग २ पान ६८९)

**२. युद्धाची नवीन पद्धत:—** या वेळीं औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशीं निकराचा सामना देण्याचा प्रसंग आल्यामुळें ताराबाईंना पूर्वीची युद्धाची पद्धत बदलावी लागली. हें युद्ध एकदोन लढायामुळें संपण्यासारखें नव्हतें. शिवाजी महाराजांनीं एक एक किल्ला म्हणजे एक एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करून ठेवलें होतें. एक एक किल्ला जर सहा सहा महिने किंवा कमींतकमीं तीन तीन महिने लढला तरी सर्व किल्ले घ्यावयाला औरंगजेबाला तीन जन्म घ्यावे लागतील अशी खात्री ताराबाईंना होती. या करतां त्यांनीं अशी युक्ति योजिली कीं, विशेष त्रास पडल्याशिवाय जितका वेळ किल्ला लढवेल तितका लढवावयाचा, स्वतःचे लोकांची हानि फारशी होऊं द्यावयाची नाहीं, व अगदींच हातघाईवर काम आल्यास, आपण होऊन किल्ला खालीं करून देऊन निघून जावयाचें. ( मराठी रियासत भाग २ पान ६९५ ) युद्धाच्या या नवीन पद्धतीमुळें जमावानें युद्ध करणाऱ्या शत्रूच्या फौजेचें जास्त नुकसान होऊं लागलें. त्यांना आपलें एकवटलेलें सामर्थ्य कोठेंच खर्चे करतां येईना व त्यामुळें मराठ्यांच्या सैन्याचा नाश होईना. किल्ल्यांच्या रक्षणाकरतां किल्ल्यावर थोडीच फौज राहत असे. ती किल्ल्याचा आसरा घेऊन शत्रूच्या फौजेचें जेवढें नुकसान करतां येईल तेवढें करीत असे. किल्ल्याबाहेर जी फौज असे ती शत्रूसैन्याच्या हालचालीवर लक्ष ठेऊन त्याचें सामानसुमान लुटावें, शत्रूसैन्याला बाहेरून येणारी रसद व खजिना पळवावा, किल्ला रिकामा करून देण्याची वेळ मुद्दाम पावसाळ्यांत आणावी अशा-प्रकारच्या शत्रूला त्रासवून सोडणाऱ्या अनेक युक्त्या मराठ्यांना योजतां आल्या. जो किल्ला शत्रूच्या ताब्यांत देण्यांत येत असे त्यांत अमर त्याच्या टापूंत शत्रूसैन्याला धान्य, वैरण वगैरे कांहींएक मिळूं नये अशी व्यवस्था होत

असे. डोकीवर एकसारखा पाऊस, नदीनाले तुडुंब भरलेले अशावेळीं शत्रूच्या मिजासी फौजेला कांहीं करतां येऊं नये, डोक्यावरून अगर वहानांतून किल्ल्यावर सामान पोंहोंचविणें त्रासाचें व खर्चाचें व्हावें, तोफखाना जेथच्या-तथेंच थंड पडावा अशा एक ना दोन अनेक युक्त्यांनीं मराठ्यांना आपल्या शत्रूस बेजार करून सोडतां आलें. या युद्धाच्या नवीन पद्धतीनें शत्रू जसा जसा किल्ले काबीज करीत पुढें सरके तसतसे मराठे, शत्रूनें महाप्रयासानें काबीज केलेला एक एक किल्ला अल्पप्रयासानें पुनः शत्रूपासून हस्तगत करीत असत, शत्रूनें घेतलेल्या किल्ल्याची कायमची बंदोबस्ती त्यांना करतां येत नसे. त्यामुळें मराठ्यांना तो पुनः हस्तगत करावयाला जास्त त्रास पडत नसे. मराठे हे अंगानें सडपातळ व चपळ असून डोंगरी मुलुखांत सतत खेळलेले असल्यानें त्यांना सर्व चोरवाटा माहीत असत. ते एकदम एके-ठिकाणीं गुप्त झाल्याप्रमाणें दिसत तर भलत्याच ठिकाणीं एकदम प्रकट होऊन शत्रूवर घाला घालीत. शत्रूसैन्य अंगानें धिप्पाड आणि जडगतीचें असल्यामुळें या डोंगरी मुलुखांत त्यांची दुर्दशा होऊं लागली. सरळ रस्ते मिळेनात. मराठ्यांच्या हालचालींचा सरळ पत्ता लागेना, अशी चुकलेल्या जनावरांप्रमाणें त्यांची दशा होऊं लागली. आपण आहों कोठें व करतों काय याचेंही त्यांना भान राहत नसे. एकंदरींत युद्धाच्या या नवीन युक्तीमुळें मराठ्यांचा नाश कमी प्रमाणांत होऊन शत्रूची भयंकर नुकसानी होऊं लागली. या लढाईचें स्वरूप मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या लढाईपैकीं भुरट्या लढाईचें होतें असें दिसतें.

**३ मोंगल फौजेची नवीन सिद्धता**:—औरंगजेबानें परळीचा किल्ला सन १७०० च्या जून महिन्यांत हस्तगत केला. सातारा व परळी हे किल्ले काबीज करण्यांत त्याची बरीच फौज खराब झाली होती. तशांत घाटांतील जोराचा पावसाळा सुरू झाला. त्यामुळें त्याच्या फौजेचे विलक्षण हाल झाले. परत जाण्यास मार्ग नव्हता. ओझ्याचीं जनावरें मरून गेलीं. सामान सुमान वाहून गेलें. परत येतांना कृष्णा नदीला उतार नव्हता. कित्येकांनीं पोहून

जाण्याचा प्रयत्न केला. त्यापैकीं नऊदशांश लोक मेले. शेवटीं मोठ्या कष्टानें औरंगजेबाची स्वारी माणनदीचे कांठीं खवासपुर येथें मुक्कामाला आली. या ठिकाणीं त्यानें आपला पावसाळी मुक्काम केला. त्यानें पुढील स्वारीकरतां उत्तर हिंदुस्थानांतून पुष्कळ पैसा आणिला. ब्रह्मणपुर, विजापुर, हैदराबाद, अहमदाबाद येथील सुभ्यांस पत्रें पाठवून त्यानें नवीन फौज मागवून घेतली आणि पन्हाळा काबीज करण्याची सर्व सिद्धता केली.

**४ पन्हाळ्याचा पाडावः–** औरंगजेबानें झुल्पिकारखान, तर्बियतखान व बेदरबख्त या सरदारांबरोबर पन्नास हजार पायदळ व तीस हजार स्वार देऊन पन्हाळ्याच्या मोहिमेवर पावसाळा संपतांच त्यांना रवाना केलें. आपण स्वतः त्यांच्यावर देखरेख करण्याकरतां मिरजेला येऊन ठाण मांडून बसला. सन १७०१ च्या मार्च महिन्याच्या सुरवातीपासून मोंगल सरदारांनीं पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला. या प्रसंगीं शत्रूचा वेढा उठविण्याची धनाजीनें शिकस्त केली. त्यानें औरंगजेबाच्या छावणीच्या पंचक्रोशींतला मुलुख व छावणींत येणारें धान्य लुटलें. त्या वेळीं झुल्पिकारखान आणि दलपत बुंदेले यांनीं धनाजीला मागें हटविलें. नंतर औरंगजेब आणखी फौज घेऊन त्यांच्या मदतीला आला. तेव्हां पन्हाळा किल्ल्यांतील लोकांचा त्यांच्या पुढें निभाव लागेना म्हणून त्यांनीं तो किल्ला शत्रूच्या हवालीं केला. त्याचप्रमाणें पवनगडही मोंगलांनीं काबीज केला. हे दोन किल्ले काबीज करण्याला मोंगलांना तीन महिने लागले. इकडे कोरेगांवच्या पूर्वेस वर्धनगड व सातान्याच्या बाजूला असलेले नंदगिरी व चंदनवंदन हे किल्ले फत्तुल्लाखानानें त्याच वर्षीं काबीज केले.

**५ खेळणा किल्ल्याचा पाडावः–** औरंगजेबानें सन १७०१ चा पावसाळा खटाव नजीक येरळा नदीच्या कांठीं खतगुण येथें काढून तो नोव्हेंबर महिन्यांत खेळणा ऊर्फ विशाळगड किल्ल्याजवळ आला. त्यानें आपल्या फौजेचे तीन भाग केले आणि किल्ल्याला वेढा दिला. या ठिकाणींही मोंगल फौजेला फार त्रास सोसावा लागला. फत्तुल्लाखानानें अतोनात श्रम घेऊन वेढ्याचें काम चालविलें. या वेढ्याचें काम सतत सहा महिने चाललें. परशुरामपंत स्वतः

या किल्ल्यावर होता. अवघड जागीं मोंगल फौजांस लुटून त्यानें पुष्कळ सामग्री किल्ल्यांत नेली. शेवटीं परशुरामपंताचा इलाज थकला तेव्हां तो किल्ला सोडून तारीख ७ जून सन १७०२ रोजीं निघून गेला. हा किल्ला काबीज करण्याचें काम चालू असतां औरंगजेब व परशुरामपंत यांचा जो पत्रव्यवहार झाला त्यापैकीं औरंगजेबानें जें परशुरामपंतांस तारीख २७ मे सन १७०२ रोजीं पत्र पाठविलें तें पुढें दिल्याप्रमाणें आहे. " मुसलमानी धर्मावर निष्ठा. परशुराम यांनें जाणावें कीं, तुमचे गुन्हे माफ करावयाजोगे नाहींत. तथापि शहाजादा बेदरबख्तानें तुमच्याबद्दल मोठी शिफारस करून लिहिलें आहे कीं, तुह्मी खेळणा किल्ला आमच्या स्वाधीन करण्यास तयार आहां, मात्र (१) हा किल्ला घेतल्यावर दुसरे आणखीं किल्ले न घेतां बादशहानें परत आपल्या मुलखांत जावें, (२) आमच्यापैकीं कोणाच्याही जिवास अपाय करणार नाहीं, असें लेखी वचन द्यावें आणि (३) ही विनंती कबूल असल्याबद्दल शहाजाद्यास लिहून द्यावें, ह्मणजे तुमच्या जिवास धक्का न लावतां आमची फौज परत जाईल. या आमच्या वचनावर भरंसा ठेवून, किल्ला स्वाधीन करावा, विलंब लावूं नये. कळावें. " या पत्रावरून जितके दिवस किल्ला लढवितां येईल तितके दिवस तो लढवावयाचा व शेवटीं आपलें कोणतेंही नुकसान करून न घेतां तो शत्रूच्या हवालीं करावयाचा अशा बचावाच्या लढाईचें नवीन स्वरूप मराठ्यांनीं कसें या प्रसंगीं स्वीकारलें होतें हें उघड दिसतें. बादशहाच्या या पत्राप्रमाणें परशुरामपंतांनीं किल्ला खालीं केला व आपल्याच लोकांकडून किल्ल्यावर बादशहाचें निशाण चढवून तो किल्ला त्यांच्या हवालीं केला. ही बातमी बादशहाला समजली तेव्हां तो " सकरलाना " असें ह्मणाला. पुढें तेंच नांव बादशहानें त्या किल्ल्याला ठेवलें.

६ **सिंहगडाचा पाडाव**– खेळणा उर्फ विशाळगड काबीज केल्या-नंतरचा पावसाळा औरंगजेबानें बहादुरगडावर काढला आणि नंतर त्यानें आपला मोर्चा सिंहगडाकडे वळविला. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें किल्ल्याला त्यानें वेढा घातला. हा वेढा सुमारें साडेतीन महिने टिकला. पुढें किल्लेदाराला

पुष्कळ पैसे भरून तो किल्ला बादशहानें हस्तगत केला. नंतर त्यानें पुढील पावसाळा ( सन १७०३ ) पुण्यास काढला व नंतर तो राजगड काबीज करण्याकरतां तिकडे वळला. त्यानें राजगड, तोरणा, पुरंदर, पांडवगड हे किल्ले सन १७०४ मध्यें काबीज केले. त्या सालचा पावसाळा त्यानें खेड मुक्कामीं काढला. या प्रमाणें गेलीं तीन चार वर्षे औरंगजेब स्वतः मोहिमेवर असून तो मराठयांचे किल्ले निरनिराळ्या युक्त्यांनीं व साधनानीं हस्तगत करीत चालला होता. त्यानें त्या बाबतींत पैशाकडे पाहिलें नाहीं, मनुष्यहानीची पर्वा केली नाहीं किंवा हालअपेष्टांकडेही लक्ष दिलें नाहीं. मराठयांचे किल्ले काबीज करणें या पलीकडे त्याचें दुसरें कोणतेंच धोरण नव्हतें.

**७ संकटांचे पेंचप्रसंग**– या प्रमाणें औरंगजेबाची बकासुर कृति चालू असतांना मराठयांच्या भगव्या झेंड्याची लाज ताराबाईच्या आधिपत्याखालीं मराठयांना सांभाळावयाची होती. राजाराम महाराजांप्रमाणेंच सर्व बाजूंनीं त्यांची बिकट परिस्थिति या वेळीं होती. लढाई द्यावयाची ह्मणजे प्रथमतः जवळ भरपूर पैसा पाहिजे. शिवाजी महाराजांनीं आपला खजिना समृद्ध करून ठेवला होता.परंतु संभाजी महाराजांनीं तो जो एकदां मोकळा केला व मागील पिढीवर जी एकदां संकटांची परंपरा ओढून आणली होती त्यांतून डोकें वर काढून खजिन्यांत भर पाडतां येईना. त्यामुळें पैशाची सदा तूट भासूं लागली. त्यांतून एक एक महत्वाचा किल्ला व त्या सभोंवारचा प्रदेश शत्रूच्या भक्ष्यस्थानीं पडूं लागला. ताराबाईचा पक्ष घेऊन जे मराठे औरंगजेबाबरोबर लढत होते त्यांना निरनिराळ्या धमक्या देऊन व दुसऱ्या बाजूनें वतन, सरंजाम यांची लालूच दाखवून ताराबाईच्या पक्षांतून फोडून काढण्याचा प्रयत्न चालू होता. अशा संकटांच्या पेंच-प्रसंगांत आपल्या पक्षांतील लोकांना जबाबदारी संभाळून कार्यक्षम ठेवणें ही कामगिरी सामान्य नव्हती. ती कामगिरी केवढी गंभीर आणि नाजुकपणाच्या मुत्सद्देगिरीनें कशी पार पाडावयाची होती याची थोडीबहुत कल्पना सांप्रतच्या निवडणुकीच्या कामगिरीवरून लक्षांत येण्यासारखी आहे. ही निवडणुकीची कामगिरी म्युनिसिपालिटीच्या

निवडणुकीपासून तों थेट कौंसिलच्या निवडणुकीपर्यंत सर्व साधारणपणें एकच स्वरूपाची असते. एकदां एक उमेदवार एका पक्षाच्या तर्फे उभा राहिला ह्मणजे त्याच्याभोंवतीं त्या पक्षाच्या सहानुभूतीचे लोक पहिल्यानें गोळा होतात. त्यांत खरे प्रामाणिक आणि तत्वनिष्ठ किती असतात याची पारख पहिल्यानें होत नाहीं; पण ते सारेच प्रामाणिक आहेत अशी कल्पना करूनच त्यांना तो उमेदवार आपल्या प्रचारकार्याला लावतो. त्याप्रमाणें ते त्याच्या पक्षाच्या प्रचाराला लागले ह्मणजे दुसऱ्या पक्षाचे लोक त्यांना आपल्या पक्षांत सामर्थ्याच्या जोरावर, पैशाच्या आमिषाच्या बळावर, मोठमोठया माणसांच्या वशिल्याच्या साधनावर वगैरे वगैरे अनेक प्रकारांनीं आपल्या पक्षांत ओढण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळीं प्रचारकाला कोणत्या ना कोणत्या तरी कारणाकरतां पहिल्यानें धरलेला स्वयंसहानुभूतीचा पक्ष सोडावा लागतो पण तो उघड तऱ्हेनें सोडला तर समाजांत आपली नाचक्की होईल या भीतीनें तो दुसऱ्या पक्षाला आंतून सामील होऊन आपल्या पहिल्या पक्षाला वरोपांगीं मदत केल्याचें दाखवूं लागतो. निवडणुका या सामुदायिक स्वरूपाच्या असल्यामुळें त्या उमेदवाराला जवढे जास्त सहकारी मिळतील तेवढे कमीच असतात. अशा स्थितींत खरे प्रामाणिक कोण, फितुरी करणारे फसवे कोण, स्वार्थी कोण आणि केवळ चार दिवस मजा मारणारे उत्सवप्रिय कोण व निःस्वार्थी कोण याचा कांहींही अंदाज उमेदवाराला लागत नाहीं. त्या उमेदवाराला प्रत्येक सहकाऱ्याच्या मागण्या पुरवाव्या लागतात. त्यांना प्रचारकार्याकरतां लागणारीं साधनें सिद्ध करून द्यावीं लागतात. त्यांच्या गरजा भागवाव्या लागतात. त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागतात. मतदारांच्या तक्रारी ऐकून घ्याव्या लागतात, त्यांना आपल्या पक्षाच्या ध्येयाप्रमाणें सामोपचारानें गोष्टी सांगाव्या लागतात. सहकारी व मतदार यांचा जावयाप्रमाणें निवडणूक संपेतोंपर्यंत परामर्श घेत रहावें लागतें. प्रत्येकाच्या उपकाराचें ओझें डोक्यावर वहावें लागतें. प्रत्येकाबरोबर नम्रता स्वीकारावी लागते. शिवाय अमक्या ठिकाणीं आपले लोक फितुर झाले अशी वार्ता कानीं येतांच तिकडे पळ, अमक्या ठिकाणीं मारामारी

झाली तिकडे जा, अमक्या ठिकाणीं अमुक केल्याशिवाय मतदार मतें देत नाहींत म्हणून तिकडे धांव, अशा एक ना दोन अनेक गोष्टी उद्भवतात व त्या सर्व त्या उमेदवाराला तहान भूक झोंप याला टाळा देऊन आणि कष्ट सोसून, निवडणुकीचें हातीं घेतलेलें कार्य पार पाडण्याकरतां कराव्या लागतात. ही निवडणुक महिना दोन महिन्याची असते, परंतु तेवढ्याच अल्प अवधींत मी मी ह्मणणारे पुरुषासारखे पुरुष मेटाकुटीला येतात. कित्येक निवडणुक संपल्यानंतर आजारीही पडतात. इतकी निवडणुकीच्या उमेदवारांची दैन्यावस्था होते हें आज आपण प्रत्यक्ष डोळयांनीं पहातों.

**८. धन्य ती ताराबाईः**— इतिहासाची पुनरावृत्ति होत असते. ऐतिहासिक तपशिलांत कालमानाप्रमाणें जरी भिन्नता असूं शकली तरी तत्वांत पुनरावृत्ति होते यांत शंका नाहीं. मानवी स्वभावधर्म हे कोणत्याही काळीं सारखेच असावयाचे. सृष्टीच्या आदिपासून अंतापर्यंत मानवी स्वभावधर्मात बदल होत नाहीं. स्वार्थ हा प्रत्येक प्राणिवाचकाच्या मागें असतो. तो मनुष्याला कसा सोडून जाईल ? अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर स्वार्थ हा प्राणिवाचक धर्मच आहे असें प्रत्ययाला येतें. मनुष्याला स्वार्थाचे विभाग पाडतां येतात. त्याची व्यवहार्य मर्यादा प्रसंगानुरूप आणि कालानुरूप ठरवितां येते; म्हणून ताराबाईवर कोणत्या तऱ्हेचे कसे प्रसंग आले असतील, त्या प्रसंगांतून त्या कशा निभावून गेल्या असतील याची कल्पना करणें झाल्यास १) पेंचप्रसंगांतून निभावून जाण्याला बुद्धि आणि पराक्रम यांची कशी जोड लागत असते; २) कोणाचे किती उपकार घ्यावे लागतात; ३) कोणाचीं किती आर्जवें करावीं लागतात; ४) स्वाभिमान, शील, इभ्रत यांचें कसें रक्षण करावें लागतें; आणि ५) आपलें श्रेष्ठत्व आणि दरारा कसा कायम ठेवावा लागतो याचा प्रामुख्यानें विचार करावा लागेल.

राजाराम महाराजांच्या निधनानंतर या वेळेपर्यंत सुमारें चार वर्षें प्रत्यक्ष ताराबाईंच्या पक्षाबरोबर औरंगजेब लढत होता. त्यानें या वेळेपर्यंत रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधि, धनाजी जाधव सेनापती यांच्या

सारख्या अव्वल दर्जाच्या आधारस्तंभांवर आपल्या भेदनीतीचा निरनिराळ्या प्रयोगांनीं संस्कार केला. यावरून इतर सामान्य सरदारांवर किती आणि कसा केला असेल हें कल्पनेनेंच ठरविलेलें बरें. अशा परिस्थितींत शिवाजी महाराजांच्या भगव्या झेंड्याची लाज ताराबाइंना राखावयाची होती. त्यांना महाराष्ट्राचें ओहोटीला लागलेलें वैभव पुनः प्राप्त करावयाचें होतें, भोंसले घराण्याची कीर्ति, भोंसले घराण्याचा पराक्रम आणि भोंसले घराण्याची शत्रूला वाटणारी दहशत पुनः मिळवावयाची होती. याच त्यांच्या खानदानी तत्वाकरतां गेलीं चार वर्षें डोळ्यांत तेल घालून शत्रूशीं त्यांनीं सामना दिला, आपल्या पक्षांत एकी राखिली, फितुरीला रिघाव होऊं दिला नाहीं; स्वकीयांचे अनंत अपराध क्षमा करून त्यांना स्वपक्षांत कायम ठेवलें,या किल्ल्यावरून किल्ल्यावर सतत धांवपळ केली, अल्पवयी राजाचें संरक्षण केलें, हा सारा इतिहास डोळ्यापुढें नाचूं लागला म्हणजे ‘ धन्य ती ताराबाई ’ असे सहज उद्गार तोंडावाटे बाहेर पडल्याशिवाय रहात नाहींत. ताराबाईंना स्वार्थी किंवा गृहकलह माजवणारी अशीं विशेषणें देण्याचे अगोदर त्यांच्या तत्वाचा आणि त्यांच्या तपश्चर्येचा नीट अभ्यास टीकाकारांनीं करणें जरूरीचें आहे.

ताराबाईनीं आपल्या फौजेंत कशा प्रकारची स्फूर्ति निर्माण केली होती हें पुढील उताऱ्यावरून स्पष्ट लक्षांत येईल. “ राज्याचा धनी ( दुसरा शिवाजी ) अल्पवयस्क, राज्यकारभार बाईंच्या हातांत, अशी असल्यामुळें सर्वांनीं भगीरथ प्रयत्न करून, बादशहाची तिरपिट उडवून द्यावी, असा मराठ्यांनीं निश्चय केला. वाटेल तसें वर्तन करण्यास ताराबाईकडून सर्वांस पूर्ण मुभा मिळाल्यामुळें, जो तो त्या राष्ट्रीय कामांत मी मी ह्मणत पुढें आला. एकदां तरवार गाजवून आपलें व आपल्या घराण्याचें चिरंतन कल्याण करून घेण्याची संधि हीच आहे, असें प्रत्येकास वाटूं लागलें. तेव्हां केवळ स्वतःच्या बचावाचे प्रयत्न सोडून त्यांनीं शत्रूचा निःपात करण्यास सुरवात केली; आणि शिवाजीच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनीं मराठ्यांनीं बचावाचें युद्ध सोडून चढावाचें युद्ध हातीं घेतलें, त्याचें वर्णन ग्रँटडफनें येणें प्रमाणें केलें आहे. ‘ मराठ्यांचें

सामान ह्मटलें ह्मणजे, थोडीशी कांदा भाकरी व एक घोंगडी एवढें काय तें असे. रात्रीं कोठें उतरले, तर ते घोड्यांचे लगाम हातांत धरूनच घोंगडी पसरून त्यावर कांहीं वेळ अंग टाकून राहत. त्याचप्रमाणें दिवसा दोनप्रहरीं कांहीं खाण्याकरतां किंवा ऊन टाळण्याकरतां ते उतरले, ह्मणजे पांच पांच सहा सहा जण एखादें झाडझूड असलें तर त्याचे छायेखालीं उतरत, परंतु उघडें मैदानच असलें तर ते जमिनींत भाले रोंवून त्यांस ते आपले घोडे बांधून भाल्यांचे टोकांवरून एखादी घोंगडी आडवी पसरून देत; व तिच्या लहानशा छायेंत फक्त डोकीं ठेवून बाकी सर्व अंगास दुपारचें जबर ऊन लागत असतांही जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तरवारींना मात्र ते कधीं विसंबत नसत. त्या ते कुशीशीं ठेवीत. त्यांजवळ उंट, बैल वगैरे कांहीं नसून फक्त लहान खुरीं, चपळ व कंटक अशीं तट्टें असत. मिळालेली लूट त्यांवर लादून, ती ते फार जलदीनें लांबवीत. येणेंप्रमाणें मराठ्यांची फौज अगदीं सुटसुटीत असल्या-मुळें, मिजासी व कांहीं अंशीं बेकैद अशा बादशहाच्या फौजेस तिचा पाठलाग करणें कठीणच पडे. त्यांतूनही ती कधीं गांठली जाऊन तिचा पराभव झालाच, तर तिचें नुकसान तें काय होणार ? व तिचें सामानसुमान मोंग-लांचे हातीं तें काय लागणार ? उलटपक्षीं मोंगलांचे फौजेचा पराभव झाला, म्हणजे लुटीनें मराठ्यांची चंगळ उडून मोंगलांचे हाल होत.' ( भाग १ पृ. ३३८ ) अशा ह्या कष्ट्या मेहनतीचें फळ मराठ्यांस मिळालें." ( मराठी रियासत भाग २ पान ७०१ ).

ताराबाई या आपल्या प्रत्येक सरदाराचा परामर्ष घेऊन ज्यानें ज्यानें बहादुरी करून तरवार गाजविली त्याच्या त्याच्या कामगिरीप्रमाणें त्याला त्याला इनाम, वतन, सरंजाम वगैरे देऊन त्यांचा गौरव करीत असे. या त्यांच्या दक्षतेमुळें मराठयांना दिवसेंदिवस उत्तेजन मिळत होतें. मावळांतल्या मुरुम खोऱ्यांतले सिलीमकर देशमुख शिवाजी महाराजांच्या वेळेपासून फौजेंत नोकर होते. त्या घराण्याला ' हैबतराव ' हा किताब होता. त्या घराण्यांतील प्रतापजी हैबतराव यानें औरंगजेबाबरोबर लढण्यांत पराक्रम केला. म्हणून

ग्रंथ संग्रहालय ६५३८

त्याला सनद करून दिली ती अशीः— ' संताजी हैबतराव किल्ले राजगडीं ठेविले होते. त्यास सालमजकुरीं औरंगजेबानें परीघ घातला. गनिमानें लगट केली, ते समयीं मशारनिल्हे यांनीं तरवारेची शर्थ केली. गनिमाचा गोळा लागोन स्वामिकार्यावर ठार झाले. त्यावर तुम्हीं हुजूर येऊन विनंती केली, कीं, आपल्यास कदीम हक्क आहे, त्याखेरीज ज्यास्ती नूतन हक्क करून दिल्हा, तरी योगक्षेम चालल. आपले बाप स्वामिकार्यावरी पडले आहेत, आपणही एकनिष्ठ आहों. ऐशास तुम्हास नूतन हक्क दरगांवास मोईन करून दिली असे [ खंड १७ पान ५१७ (जानेवारी १७०४ ). ]

बादशहा किल्ले घेत चालला असतां ताराबाई आपल्या सरदारांना प्रोत्साहन देण्याकरतां व स्वराज्याच्या रक्षणाविषयीं बंदोबस्त करण्याकरतां सरदारांना कशीं पत्रें पाटवीत असे याचा नमुना पुढील पत्रावरून येईल. हें पत्र प्रतापराव मोरे यांना धाकटे शिवाजी छत्रपती यांचे नांवें लिहिलेलें आहे. “ तुम्ही व राजश्री संताजी पांढरे फौजेनिशीं मलकापुरानजीक औरंगजेबाची चौकी होती ते मारली, हें वर्तमान कळल्यावरी स्वामींनीं तुम्हांस आज्ञापत्रें पाठविलीं आहेत. तीं पावून वर्तमान कळलेंच असेल. औरंगजेब विशाळगडास बिलगला, याजकरतां त्याचे काबिलाबाद मारून हमेशा गोटावर हल्ले करावे, तरीच तो बलकुबल राहतो. याजकरितां तुम्ही व जे सरदार फौज घेऊन मुकाबला लोक आपले अवघे एकदील होऊन औरंगजेबास जडून राहणें. तुम्ही स्वामीचे एकनिष्ठ सेवक, मायेचे विश्वासू आहां, तरी या प्रसंगीं साहस करून मुख्य शत्रूच्या मुकाबल्यास आलेत, ये गोष्टीनें औरंगजेब दिक होऊन थोरच कार्य होऊं आलें. प्रस्तुत स्वामीचा मुक्काम किल्ले प्रतापगडीं झाला आहे. बलकुबलीच्या प्रसंगास स्वामीची तोलदार फौज असली पाहिजे. औरंगजेब गनीम दगेखोर आहे. कोणेसमयीं काय विचार करील, तो कांहीं कळत नाहीं. त्यास तुम्ही बळकट फौजेनिशीं या तोंडे राहिलेत, तरी त्याचे वस्तु चळवळ करवत नाहीं. आजिचे प्रसंगीं भरवंसा तुम्हां लोकांचा आहे, व स्वामीचे मायेचे आहां याकरितां ये

गोष्टींचें अगत्य धरून फौजेनिशीं या तोंडे राहून औरंगजेबाचे काबिला गड मारून हैराण करणें. तो विशाळगडचा ख्याल सोडी, तुम्हां लोकांच्या कीर्ति होऊन स्वामी समाधान पावत, ऐशी गोष्टी करणें. दूर प्रांतें स्वारीस जाल तर हें तोंड सहजच मोकळें होईल, म्हणजे औरंगजेब एकादी फौज त्या तोंडें पाठवावयास उशीर लावणार नाहीं. समयीं स्वामी समीप तुम्हास यावया गांठ पडणार नाहीं. या करितां औरंगजेबास सोडून दुसरे ( कडे ) सर्वथा न जाणे; समीपच राहोन स्वामी खुशाल या जागीं राहत, अशी गोष्टी करणें, राज्य रक्षणें " ( भारतवर्ष ), हें ताराबाईचें पत्र पाहिलें म्हणजे तें किती नम्रतेनें व आपुलकीच्या भावनेनें लिहिलें आहे हें दिसून येतें. त्याचप्रमाणें स्वामीकार्याविषयीं दक्षता ठेवण्याकरतां कवढ्या चतुराईनें आणि कळकळीनें आपल्या सरदाराला आज्ञा फर्माविली आहे याचा वानगी पहावयास मिळते.

**९ मोंगलांच्या मागें मराठ्यांचा शशिमिराः–** दक्षिणेच्या बाजूला औरंगजेब किल्ले काबीज करीत चालला होता व त्याला नाना तऱ्हेच्या उपायांनीं ताराबाई टक्कर देत होत्या. त्या करतां या किल्ल्यावरून त्या किल्ल्यावर त्यांचें भ्रमण होत होतें. ही थोरपालट करतां करतां त्या यवेळीं प्रतापगडावर येऊन बसल्या होत्या व तेथून लढाईचीं सर्व सूत्रें हालवीत होत्या. यावेळीं त्यांनीं आपली दक्षिणेंतील फौज जशी स्वराज्यरक्षणाच्या कामीं लाविली होती तशीच उत्तरेकडील फौजही त्यांनीं स्वस्थ ठेविली नव्हती. त्यांच्या मागें औरंगजेबाच्या मुलखांत स्वाऱ्या करून तिकडे हाहाःकार उडविण्याची कामगिरी दिली होती. झुल्पिकारखान व बेदरबख्त यांचे हाताखालीं औरंगजेबानें उत्तरेस जी फौज पाठविली होती व ज्या फौजेनें राजारामाला परत दक्षिणेंत रेटलें ती फौज अद्यापी मराठ्यांच्या मागें होतीच. त्या फौजेनें जाधव, भोंसले, निंबाळकर, दाभाडे वगैरे सरदारांचा कित्येक वेळीं पराभवही केला. परंतु त्यामुळें मोंगल फौजेचा अर्थाअर्थीं कांहीं एक फायदा झाला नाहीं. उलटपक्षीं मराठा सरदारांनीं जेव्हां जेव्हां मोंगल फौजेचा पराभव केला तेव्हां मात्र त्यांनीं आपला वाटेल तो फायदा करून घतला; आणि दिवसें दिवस आपली फौज

वाढवून घेऊं लागले. औरंगजेब उत्तर हिंदुस्थानांतून वरचेवर खजिना मागवून घेऊं लागला तेव्हां त्यावर पाळत ठेऊन ते त्यावर हल्ला करून तो पळवून नेत. शिवाय मोंगल फौजेच्या टोळ्यांची बातमी एकमेकांना न पोंचेल अशीही ते दक्षता घेत होते.

या सुमारास उत्तरेच्या मराठी फौजेनें सुरतेवर हल्ला चढविला. या मराठ्यांच्या चढाईच्या स्वारींत चाळीस हजार स्वार होते. सुरतेपासून भडोचपर्यंत त्यांनीं सर्व मुलुख लुटला. या मराठा फौजेशीं सामना देण्याकरतां नजरअल्लीखान व ख्वाजा हमीद हे दोन मुसलमान सरदार सहा हजार फौजेनिशीं चालून आले. त्यांच्या फौजेचा मराठ्यांनीं फन्ना उडविला आणि त्या दोन्हीं सरदारांना त्यांनीं कैद केलें. नंतर त्यांचकडून दंडादाखल आठ लक्ष रुपये घेऊन त्यांना सोडून दिलें. ही स्वारी सन १७०३–४ च्या सुमारास झाली. मराठी फौजेनें यावेळीं बऱ्हाणपुर शहरही लुटलें. खंडण्या वसूल केल्या. सन १७०५ सालीं ते प्रथमतः नर्मदा उतरून माळव्यांत शिरले.इकडे वऱ्हाड, खानदेश, गुजराथ हे प्रांत तर त्यांनीं आपलसेच करून टाकले. या उत्तरेंतील मराठ्यांच्या स्वाऱ्यांची वार्ता औरंगजेबाला समजतांच त्यानें झुल्पिकारखान, गाजीउद्दीन व अजीमशहा यांना अनुक्रमें माळवा, वऱ्हाड व गुजराथ या प्रांतांत रवाना केलें. परंतु त्यापासून औरंगजेबाला विशेष कांहीं फायदा झाला नाहीं. मुसलमानी फौजेच्या ठिकाणीं आतां लढण्याचें त्राण राहिलें नव्हतें. फार दिवस कष्ट सोसल्यामुळें त्यांना आतां लढण्याचा कंटाळा आला होता. शिवाय औरंगजेब हा आतां म्हातारा झाल्यामुळें थोड्याच दिवसांचा सोबती आहे असें सर्वांना वाटत होतें. त्यामुळें पुढें कोणकोणत्या भानगडी उत्पन्न होतात इकडे सर्वांचें लक्ष लागलें होतें. तेव्हां औरंगजेब अगदींच नाउमेद झाला. मराठयांची लुटालूट त्याला अगदींच बंद करतां येईना. ते केवळ लूट करून स्वस्थ बसत नव्हते. 'त्यांनीं जिकडे तिकडे आपला कायमचा अंमल बसविण्यास सुरवात केली. जो जो मुलूख त्यांचे हातीं लागे, त्यांत बादशाही अंमलाप्रमाणें आपला अंमल सुरू करून सुभेदार, कमाविसदार,

राहदार वगैरे अधिकारी त्यांनीं नेमिले. सुभेदार हा त्या प्रांताचा मुख्य, त्याच्या ताब्यांत सर्व फौज असावयाची, एखादें लमाण बादशहाकडे येत आहे, अशी बातमी लागतांच, तो सुभेदार सहा सात हजार लोक घेऊन तें लमाण लुटून आणीत असे. तो आपले कमाविसदार चौथाई वगैरे गोळा करण्याकरतां पाठवी; आणि जमीनदार व फौजदार लोक चौथाई देण्यास हरकत करीत, त्या ठिकाणीं सुभेदार स्वतः जाऊन शहरें व गांव जमीनदास्त करून, कमविस-दारांचा पाठपुरावा करी. राहदाराकडे दस्तुरीच्या नाक्यावर बसून, गाड्या व जनावरें यांजपासून कर घेण्याचें काम होतें. याप्रमाणें दक्षिणेंतून गुजराथेंत अहमदाबादपर्यंत, आणि माळव्यांत उज्जनीपर्यंत मराठ्यांनीं आपला दरारा बसविला.' (मराठी रियासत भाग २ पान ७०२-३) याप्रमाणें तारा-बाईच्या आधिपत्याखालीं गुजराथेंत अहमदाबादपर्यंत व माळव्यांत उज्जनी-पर्यंत मराठ्यांचा भगवा झेंडा वावरूं लागला आणि त्यामुळें औरंगजेबाच्या दक्षिणेकडील किल्ले काबीज करण्यावर सर्व बाजूनें ताण पडूं लागला.

**पुनापा नाईकः**— उत्तरेस औरंगजेबाच्या मुलखांत याप्रमाणें मराठ्यांचें प्राबल्य वाढत असतांना कर्नाटक प्रांतही खडबडून जागा होऊन आपला पराक्रम दाखविण्यास उद्युक्त झाला. रायचूरच्या वायव्येस कृष्णा व भीमा या नद्यांमध्यें सागर व वाकिन खेडें असे दोन लहानसे किल्ले आहेत. हे दोन किल्ले पेम नाईक नांवाच्या बेड जातीच्या एका शूर पाळेगाराच्या ताब्यांत होते. त्या पाळेगारानें औरंगजेबाविरुद्ध गोवळकोंड्याच्या लढाईत कुतुबशहाला मदत केली होती. म्हणून बादशहानें त्याच्यावर फौज पाठवून त्याचा सागर किल्ला हस्तगत केला होता. पेम नाईकाचा एक पुतण्या पुनापा नाईक म्हणून होता. त्यानें रायचूर काबीज करण्यांत औरंगजेबाला चांगली मदत केल्यामुळें, त्याला मनसब मिळालेली होती. त्यांत सागरचा किल्लाही पुनापाला परत बादशहा-कडून मिळाला होता. तेव्हांपासून पुनापानें आपली सत्ता व सामर्थ्य वाढवि-ण्यास सुरवात केली होती. त्यानें लांच भरून, बादशहाला नम्रतेचीं पत्रें लिहून व दुसऱ्या अनेक युक्त्या करून आपला पुंडपणा इतके दिवस बाद-

शहाच्या नजरेस आणूं दिला नव्हता. त्यानें गुप्तपणानें दारूगोळा, फौज, हत्यारें इत्यादि युद्धविषयक गोष्टींची वाढ करून ठेविली. त्यानें आपल्या वाकीन खेड्याच्या किल्ल्याची एवढी मजबुती केली कीं त्या किल्ल्याची गणना इतर मोठमोठ्या मजबूत किल्ल्यांत होऊं लागली. पुढें तो मराठ्यांना उघड रीतानें सामील झाला. पेम नाईक वारल्यानंतर त्याचा मुलगा जग नाईक याला बादशहानें वारस नेमलें व त्याला वाकिन खेड्याचा अधिकार दिला.परंतु पुनापा नाईकानें जग नाईकाला बिलकुल दाद दिली नाहीं. तेव्हां औरंगजेबानें पुनापाचा बंदोबस्त करण्याकरतां जग नाईकाच्या मदतीला अजीमशहाला पाठविलें. पुनापानें अजीमशहाला भला माठा लांच भरून वाटेला लाविलें; आणि पुनः तो पूर्ववत् पुंडाई करूं लागला. नंतर बादशहानें त्याच्यावर पुनः गजीउद्दीनखान फिरोगंज याला पाठविलें. त्यालाही लांच देऊन पुनापानें परत फिरविलें. त्यानंतर पुनः पुनापाचा त्रास दुःसह होऊं लागला म्हणून औरंगजेब बादशहा आपला पुण्याकडील मुक्काम हालवून स्वतः वाकिन खेड्यावर हल्ला चढविण्याकरतां कर्नाटकांत आला. त्यावेळीं पुनापा नाईकानें आपल्या किल्ल्याचा उत्तम बंदोबस्त केला होता. ताराबाई यांचेकडून त्याला मदत आली होती. शिवाजी धनाजी जाधवाचें व त्याचें चांगलें सख्य असल्यामुळें त्यांचीं मुलें माणसें वाकिन खेड्याच्या किल्ल्यांतच होतीं. या प्रसंगीं पुनापा नाईकानें औरंगजेबाबरोबर चांगला सामना दिला. किल्ल्यांतून मोंगल फौजेवर असा कांहीं मारा चालविला कीं बादशहाचे असंख्य लोक प्राणाला मुकले. पुढें किल्ला काबीज होण्याची वेळ आली तेव्हां त्याच्या मदतीला धनाजी जाधव, हिंदुराव घोरपडे व दुसरे मराठे सरदार येत आहेत, अशी बातमी आली. तेव्हां बादशहाचे फौजेंत एकच गोंधळ उडाला. [ त्या वेळेस मोंगल लोक आपल्यामध्यें कधीं घोडा पाणी प्याव्यास नेला असतां तो पाणी न पिई तर थट्टेनें त्यास म्हणत कीं, ' तूं पाणी कां पीत नाहींस ? तुला धनाजी पाण्यांत दिसला कीं काय ? ' ते लोक इतकें धनाजीचें भय बाळगीत होते. ( डफकृत मराठ्यांची बखर. आवृत्ति ६ वी पान ११९ टीप पहा. ) ] त्यांनीं येऊन

मोंगल फौजेला गांठलें आणि पुष्कळ लोक ठार मारले. तथापि वेढा कायमच होता. पुढें पुनापा नाईकाचा भाऊ सोमशंकर हा बादशहाला शरण गेला. त्यानें भावाबद्दल बादशहाजवळ माफी मागितली व किल्ला स्वाधीन करण्याचे कबूल केलें. त्याप्रमाणें बादशहाचे सरदार किल्ल्यावर गेले. त्यांजबरोबर पुनापानें बादशहाचे भेटीकरतां यावें असें ठरलें होतें. परंतु आजाराचें ढोंग करून पुनापा दोन दिवस कोणालाच भेटला नव्हता. तिसरे दिवशीं असें समजलें कीं, पुनापा किल्ल्यावर नाहीं. पुढें किल्ला ताब्यांत देण्याच्या निमित्तानें सोमशंकर वर आला. त्यानें किल्ल्यांत आलेल्या मुसलमान सरदारांना अटकेंत टेऊन पुनरपि युद्धाची तयारी केली. शेवटीं झुल्पिकारखान औरंगजेबाचे मदतीस आला आणि मोठी शिकस्त करून किल्ला काबीज केला. परंतु त्यापूर्वी किल्ल्यांतील लोक सर्व चीजवस्त घेऊन घरांना आग लावून चोरवाटेनें बाहेर पडून मराठ्यांना मिळाले होते. याप्रमाणें किल्ला ताब्यांत आला पण त्यापासून औरंगजेबाला कांहींच लाभ झाला नाहीं.

**११. पाडाव झालेले किल्ले पुनः मराठे जिंकतातः—** इकडे ताराबाईनीं पुनापाला मदत केल्यामुळें औरंगजेबाला पुण्याकडील स्वारीचें काम तहकूब करून कर्नाटकांत यावें लागलें. त्यामुळें पुण्याच्या भोंवतालच्या मुलखावर मराठ्यांना लढण्याचा ताण एकदम कमी पडला. ही संधि साधून मराठ्यांनीं सिंहगडावर हल्ला चढविला व तो मोंगलांपासून परत हस्तगत केला. इकडे परिश्रमानें वाकिन खेड्याचा किल्ला हस्तगत केला तर तिकडे सिंहगड हातचा गेला अशी औरंगजेबाची स्थिति झाली. सिंहगड हातचा गेल्याची बातमी त्याला वाकिन खेड्याच्या किल्ल्यापासून तीन कोसांवर कृष्णेच्या कांठीं देवापुर या गांवीं परत फिरतांना समजली. त्या वेळीं त्याच्या मनाची स्थिति काय झाली असेल याची कल्पना कल्पनेनेंच केलेली बरी. सिंहगड व राजगड हे दोन किल्ले शंकराजी नारायण यानें मोंगलांकडून जिंकून घेतले. त्याचप्रमाणें रामचंद्रपंतांनीं पन्हाळ्यावर हल्ला चढवून तो काबीज केला. पावनगडही त्याचप्रमाणें त्यांनीं हस्तगत केला. परशुराम त्रिंबक

यांनीं वसंतगड व सातान्याचा किल्ला हे हस्तगत केले. साताऱ्चा किल्ला काबीज केला त्यासंबंधीं डफसाहेब पुढीलप्रमाणें माहिती देतो. 'पहिला मावळे लोकांची कारकुनी केलेला अण्णाजीपंत नामें एक ब्राह्मण होता, तो मोंगलांनीं जिंजी घेतली तेव्हां तेथें बंदींत सांपडला असतां कांहीं युक्तीनें तेथून पळाला; त्याला वाटेनें मोंगलांचे लोक साताऱ्याचे बदलीस जात होते ते भेटले. त्यांस त्यानें कांहीं गोष्टी सांगून व कांहीं गाणें गाऊन त्यांचीं मनें वश केलीं. तेणेंकरून त्यांनीं त्याला आपल्या बरोबर नेऊन त्यास राहावयाला जागा साताऱ्यावर दिली, आणि तो तेथें राहिला. त्यानें मोठ्या युक्तीनें मावळे लोक वर घेऊन मग तेथचे सर्व मोंगल मारून टाकले.' (मराठ्यांची बखर आवृत्ति ६ पान १२०) याप्रमाणें भगव्या झेंड्याची लाज राखण्याकरतां ताराबाईच्या आधिपत्याखालीं प्रत्येक मराठा कशीं साहसें करीत होता हें लक्षांत येईल. पन्हाळा मोंगलांकडून जिंकून परत घेतल्यानंतर त्या ठिकाणीं येऊन ताराबाईनीं आपलें वास्तव्य केलें. तेव्हांपासून पन्हाळ्यावर पुन्हां स्वराज्याचा भगवा झेंडा फडकूं लागला.

**१२. औरंगजेबाची वाताहतः—** वाकिन खेड्याहून परत येतांना औरंगजेबाचा मुक्काम देवापुरास झाला हें मागें आलेंच आहे. तेथें आल्यानंतर त्यानें म्हैसुरावर स्वारी करण्याचा विचार केला. म्हैसुरावर स्वारीला जाणें झाल्यास नद्यांतून पाणी वगैरे किती आहे याचें मोजमाप त्यानें आणविलें. इतक्यांत अशी बातमी आली कीं, अफगाणिस्थानांत बंड होऊन शहालमची फौज कापली गेली; औरंगजेब मरण पावला असें समजून शहाजादा अजीमशहा गुजराथच्या सुभ्यावर होता तो निघून भावाशीं लढण्याकरतां आग्र्यावर जात आहे; आणि दुर्गादास अजीमशहावर चालून आला आहे. अशा तीन अकल्पित बातम्यांनीं औरंगजेब गोंधळून गेला; तेव्हां वजिराच्या वगैरे सल्ल्याप्रमाणें त्यानें म्हैसूरच्या स्वारीचा बेत तहकूब केला. तो देवापुराहून परत फिरला. त्यानें अजीमशहाला परत बोलाविलें. या सर्व गोंधळानें त्याच्या फौजेंत व लोकांत त्याची फजिती झाली व जो तो त्याची टर उडवूं लागला.

त्यावर औरंगजेबानें संतापून असा हुकूम काढला कीं, आपल्या कृत्याबद्दल जो कोणी चकारशब्द काढील त्यास देहांत शिक्षा मिळेल. या हुकुमानें लोकांचीं तोंडें इतकीं बंद झाली कीं,त्याची एवढी मोठी फौज पण ती अहमदनगराला मुडद्याप्रमाणें चालत आली. रणवाद्यें सुद्धां बंद होतीं. अशा वेळीं मराठे लोक औरंगजेबावर चालून आले. बादशहाच्या तंबूजवळच त्यांनीं एक हजार मोंगल फौज कापून काढली; आणि सेनापतीस पकडून त्याजपासून पांच लाख दंड घेऊन सोडून दिलें. या प्रसंगीं प्रत्यक्ष बादशहा त्यांचे हातीं सहज सांपडला असता. पण मराठे लोक म्हणाले, 'बादशहास मारल्यापासून आमचा फायदा नाहीं. तो जिवंत राहिल्यानेंच आमचा धंदा चांगला चालतो.'

## १३. कपटवृत्ति आणि वीरवृत्ति यांचीं दोन चित्रें:—

वरील हकीकत मनूचीनें लिहिली आहे. या माहितीवरून ताराबाईच्या आधिपत्याखालीं शिवाजी महाराजांनीं मराठी स्वराज्याचे निर्बंध जे घालून दिले होते ते कसे अंमलांत येत होते याची सहज कल्पना येते. मराठ्यांना इस्लामी संस्कृतीबरोबर लढावयाचें होतें. त्यांतून औरंगजेबासारख्या कपटी आणि विश्वासघातकी बलिष्ठ शत्रूबरोबर टक्कर द्यावयाची होती. शिवाय औरंगजेब आपल्या अनुयायांना आपण अगदीं सत्पुरुष-महात्मे आहोंत असें दाखवून त्यांना भुरळ पाडीत असे व त्यांच्याकडून आपल्याला जें कृत्य घडवून आणावयाचें असेल तें करवून घेत असे. औरंगजेब कसा होता याचें वर्णन मनूचीनें दिलें आहे. "सदासर्वकाळ ईशचिंतनांत निमग्न आहों असें दाखवितो. रमजानच्या उपवासांत जमिनीवर डोकें टेंकून सारखें चोवीस चोवीस तास भजन म्हणत असतो. मग राणी उदेपुरी जवळ जाऊन त्यास उठविते, तेव्हां राग आल्यासारखें दाखवून म्हणतो, 'मला माझ्या परमानंदांत तुम्ही व्यत्यय कां आणितां? मला आतां इहलोकचें सुख पुरें झालें.' अशा वर्तनानें भोळ्याभाबड्यांच्या चित्तास वाटूं लागतें कीं, बादशहा खरोखरच मोठा सत्पुरुष आहे." इकडे औरंगजेबाची आपण मोठे सत्पुरुष आहों अशी

दाखविण्याची एक तऱ्हा तर दुसरीकडे आपल्या सरदारांना कानमंत्र देण्याची दुसरी तऱ्हा. एकदां बादशहानें झुल्पिकारखानास मराठयांवर पाठवितांना कानमंत्र सांगितला. तो ह्मणाला, 'हें पहा, शत्रूशीं प्रसंग पडला असतां, कपट, खोटें बोलणें, धरसोड, खोट्या शपथा इत्यादि वाटेल तो प्रकार प्रसंगानुसार उपयोगांत आणण्यास कमी करूं नको. नाहीं नाहीं त्या युक्त्या व लबाड्या योजीत जा. पण हातांत घेतलेल्या कामांत यश मिळविल्याशिवाय राहूं नको.' (मनूची, ३–२५७) अशा कपट नीतींतील सव्यसाची औरंगजेबाबरोबर आपल्या मराठ्यांचा स्वाभिमान-पूर्ण सिंहाचा मनोधर्म कायम ठेऊन सामना द्यावयाचा होता. या सामन्याला प्रत्युत्तर 'अरेला कारे' ह्मणून सहज देतां आलें असतें. हा सामान्य धर्म आहे. हिंदुधर्म सामान्य नसून तो एकमेव श्रेष्ठ धर्म आहे याची जाणीव युद्धप्रसंगींसुद्धां मराठयांना रहावी अशी शिस्त व शिकवणुक शिवाजी महाराजांनीं घालून दिली होती. मुसलमानांनीं हिंदूंची देवालयें फोडलीं, त्यांच्या स्त्रिया पळवून त्यांना आपला जनानखाना दाखविला, हिंदुधर्म ग्रंथांची राखरांगोळी केली याला प्रत्युत्तर ह्मणून मशीदी फोडणं; मुसलमानी स्त्रियांना नाटकशाळा करणें किंवा कुराणासारख्या मुसलमानी धर्म ग्रंथाची जाळून टाकून विटंबना करणें, हें सहज करतां आलें असतें. हें प्रत्युत्तर सूडाला प्रतिसूड या तादृश मनोभावनेच्या समाधानापुरतेंच असतें. प्रतिसूडाच्या कृतीनें सूडाचें बीज नष्ट होत नाहीं. प्रतिसूडानें सूडाचा वृक्ष बनत असतो. हें हिंदुधर्म-रहस्य शिवाजी महाराजांनीं जागृत ठेऊन, मशीदींचें संरक्षण, हल्ल्यांत सांपडलेल्या यवन स्त्रियांना आई, बहीण, मुलगी समजून त्यांना मोठया सन्मानानें त्यांच्या पतिगृहीं रवाना करणें, आणि मुसलमानांचा पवित्र धर्मग्रंथ जें कुराण तें कोठें सांपडलें तर त्याला मोठया गौरवानें व आदरानें पालखींत घालून शत्रूकडे नेऊन पोंचविणें हा प्रत्युत्तराचा श्रेष्ठ मार्ग स्वीकारला. त्याच चाकोरींतून ताराबाई आपल्या मराठा अनुयायांना नेत होत्या.

मराठे सरदार युद्धांत सांपडले तर त्यांची औरंगजेब कत्तल उडवीत असे.

त्यांच्या बायकापोरांना ठार मारण्याला मोंगल सरदारांना दिक्कत वाटत नसे. प्रत्यक्ष छत्रपती संभाजी महाराजांचा औरंगजेबानें जितक्या अमानुष रीतीनें वध केला होता तितक्याच अमानुष रीतीनें किंबहुना जास्त आसुरी साधनांनीं औरंगजेबाचा वध करणें हें सामान्य प्रत्युत्तर होतें. या प्रत्युत्तराच्या मार्गांत जावयाचें नाहीं ही शिकवणूक एवढी जबरदस्त होती कीं युद्धप्रसंगीं अगदीं आवेशाच्या भरांतही तसा प्रमाद मराठ्यांकडून होत नसे. सूडाचें विष सूडाला प्रतिसूड योजिल्यानें मरत नाहीं. तें दयेनें मात्र मृतप्राय होत असतें. हा सिद्धांत प्रत्येक मराठ्याच्या हृदयांत ताराबाईनीं जिवंत ठेविला होता. या प्रसंगीं औरंगजेबाबरोबर लढतांना वाटेल तसें वर्तन करण्यास ताराबाईकडून सर्वांस पूर्ण मुभा जरी मिळाली होती तरी मराठी स्वराज्याचीं मूलभूत बंधनें मात्र त्यांच्यावर कायम होतीं हें औरंगजेबाच्या प्रत्यक्ष छावणीवर मराठ्यांनीं हल्ला चढविला त्या प्रसंगावरून व त्यांनीं दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट होतें. औरंगजेबासारखा मराठ्यांचा हाडवैरी हल्ल्यामध्यें सांपडला असतां त्याच्या वाटेला न जाणें आणि मुसलमान सरदार कैद झाले असतां केवळ त्यांच्याकडून दंड घेऊन त्यांची मुक्तता करणें या मराठ्यांच्या मनोधर्माच्या कृति सामान्य कोटींतल्या खास नाहींत. इ. स. १५३६ पासून १७०७ पर्यंत ह्मणजे सुमारें सत्तर वर्षें शिवाजी महाराज व त्यांच्या मागील छत्रपती आणि औरंगजेब या व्यक्ति भारतवर्षाच्या समरांगणावर चमकत होत्या. शिवाजी महाराजांचीं स्वराज्य तत्वें या वेळेपर्यंत ह्मणजे तीन पिढ्या मराठ्यांच्या रक्तमांसांत खेळत होतीं ह्मणून स्वराज्य संस्थापना करणें आणि त्याचें रक्षण करणें हा मराठ्यांचा तीन पिढ्यांचा धंदाच होऊन बसला होता. म्हणून या प्रसंगीं मराठ्यांनीं 'बादशहास मारल्यापासून आमचा फायदा ( स्वराज्याचा ) नाहीं. तो जिवंत राहिल्यानेंच आमचा धंदा ( स्वराज्यरक्षणाचा ) चांगला चालतो,' असें जें उत्तर दिलें तें किती यथार्थ होतें हें दिसून येईल. यावरून ताराबाई आपल्या शत्रूवर मोकाट सोडलेल्या मराठा फौजेला कशा चातुर्यानें मराठी स्वराज्य बंधनांतून खेळवीत होत्या हें दिसून येईल.

त्याच्या अगदीं उलट औरंगजेबाची कशी स्थिति होती हें दाखविणारें खास त्याच्या पुत्राचें पत्र वाचलें म्हणजे लक्षांत येईल. औरंगजेबाचा पुत्र महंमद अकबर संभाजी महाराजांचा पाहुणचार घेऊन इराणला गेला हें मागें आलेंच आहे. तो इराणच्या शहाची मदत घेऊन केव्हां हिंदुस्थानांत येईल याचा नेम नाहीं या भीतीमुळें त्याला कोणत्या ना कोणत्या तरी युक्तीनें हिंदुस्थानांत परत आणावें अशी खटपट औरंगजेब करीत होता. त्याला औरंगजेबानें अनेक पत्रें पाठविलीं. एकदां असेंच एक पत्र त्यानें अत्यंत आर्जवानें व प्रेमभावानें त्याला पाठविलें असतां त्याचा खालील जबाब महंमद अकबराकडून आला तो असा— ' बाबा, तुमचेंच उदाहरण मीं नेहमीं डोळ्यांपुढें ठेविलें आहे. इतकें चांगलें उदाहरण दुसऱ्या कोणाचें सांपडणार ? ज्या रजपुतांनीं अकबर, जहांगीर व शहाजहान यांस मनापासून साह्य केलें, त्यांचा आश्रय मी केला, त्यांत वाईट तें काय केलें ! जसवंतसिंग तुमच्या भुलथापांस भुलला नसता तर तुम्ही आज हिंदुस्थानचे बादशहा नसता, असे हे रजपूत लोक आपल्या राज्याचे खांब होते. पूर्वी फौजेंत रजपूत पाहिजे असले म्हणजे एकाचे ठिकाणीं शंभर उमेदवार येत. हल्लीं तुम्ही तीन तीन वर्षें डांगोरा पिटवून सुद्धां दहापांच माणसें जमा होत नाहींत. हा प्रभाव कशाचा ? आज इतके तुमचे अंमलदार आहेत, पण एकाची तरी तुमच्यावर खरी भक्ति आहे काय ? फौजेंतील सर्व लोक दरिद्री झाले आहेत; कोणापाशीं हत्यार नाहीं. एक कवि किंवा एक ग्रंथकार निपजत नाहीं. व्यापाऱ्यांची व धनिकांची लूट होते व खून होतात. रयत धुळीस मिळाली. दक्षिणचा प्रदेश जो पूर्वी केवळ स्वर्गतुल्य वाटत होता तो हल्लीं ओसाड, निर्जन व निर्धन झाला आहे ! विजापूर, औरंगाबाद हीं केवढीं मोठीं व सुंदर शहरें, पण हल्लीं मातीशिवाय तेथें जास्त काय आहे, तुम्हीच सांगा. ह्या सर्वांचें कारण काय तर तुमचा परधर्मद्वेष. तुम्हीं हिंदुवर जिझिया बसविला, त्यानें लोक सर्व तुमच्यावर उठले, जाळपोळ व लूट करूं लागले, त्यानेंच देश धुळीस मिळाला. तुमच्या राज्यांत एक तरी प्रकार असा आहे काय कीं ज्याची मला तारीफ करितां येईल ? थोर

थोर पुरातन घराणीं सर्व धुळीस मिळालीं. सर्वत्र लुच्च्यांचा बाजार भरला आहे. राज्यकारभार सर्व हलकट लोकांच्या हातांत आहे. हातांत जपमाळ, कांखेंत कुराण, आणि डोक्यास मोठेंसें पागोटें असलें ह्मणजे तुमचा त्यावर पूर्ण भरंवसा. अशी मंडळी तुमच्या राज्याचे आधारस्तंभ! असा सर्व राज्याचा नाश झालेला मला पहावेना; तेव्हां अत्यंत कष्टानें मी देशत्याग करून इकडे आलों. आतां मी शांत आहे. परमेश्वर तुह्मांला दीर्घायुष्य देवो. मीच परत येऊन राज्य करावें ह्मणतां, त्यास तुह्मी राज्य सोडून मक्केस चालते व्हा, म्हणजे मी येऊन दाखवितों कसें राज्य करावयाचें तें. आजपर्यंत काय करा-मत होती, ती तुह्मीं करून दाखविलीत. आतां वृद्धापकाळीं परमार्थसाधनच तुह्मांस योग्य आहे. ज्यास्त लिहून तुम्हांस त्रास होईल ह्मणून पत्र पुरें करितों. (मराठी रियासत भाग २ पान ७१८). हें पत्र मननपूर्वक वाचलें ह्मणजे शहाजादा महंमद अकबर यानें आपल्या बापाच्या कारकीर्दीचा आढावा किती उत्तम प्रकारें काढला आहे हें दिसून येईल. हा आढावा औरंगजेबाच्या प्रत्यक्ष मुलानेंच काढला असल्यामुळें व त्याचा पडताळा तपासून पहाण्यास तो प्रत्यक्ष औरंगजेबाकडेच आला असल्यानें तो बरोबर होता असेंच गृहीत धर-ण्यास हरकत नाहीं. तेव्हां अशा बकासुरी राजसत्तेबरोबर राजाराम महाराजांना सतत अकरा वर्षें व ताराबाईना सतत सात वर्षें म्हणजे उभयतां पतिपत्नी यांचें दीडतप केवळ प्रतिकार करण्याची तपश्चर्या करण्यांत गेलें. ही तपश्चर्या कशा करतां होती हें विचारवंत आणि निस्पृही महाराष्ट्र-सुपुत्रांनीं ठरवावयाचें आहे. इतरांशीं आपणाला काय कर्तव्य आहे?

**१४. औरंगजेबाची अखेरीची पहाणीः**— औरंगजेबाच्या अखेरच्या दिवसांचें वर्णन मनूचीनें पुढीलप्रमाणें दिलें आहे. "एकसारखा लढाईचा विषय बादशहाचे मनांत घोळत असतो. पालखींत बसून कूच करीत असतां, तलवार म्यानांतून काढून वरचेवर पुसतो, उगाच थोडीशी इकडे तिकडे परजतो, पुनः परत ठेवितो. धनुष्य बाणांचेंही असेंच करितो. येणेंकरून तो लोकांस दाखवितो कीं, मी अजून वाटेल तशी लढाई करण्यास

तयार आहे. वृद्धावस्थेनें त्याचें शरीर साफ दुणून गेलेलें आहे. डोकें अगदीं छातीवर पडलेलें दिसतें, आणि त्याची ती पांढरी स्वच्छ दाढी छाती फोडून बाहेर येत आहे, अशी वाटते. कोणी कांहीं अर्ज करावयास आला, कीं साव-काश वर मान करून तो ऐकण्यास त्यास कितीतरी वेळ लागतो; नंतर असा जबाब देतो कीं, पुनः ज्यास्त प्रश्न करण्याचें कारणच राहूं नये. जवळ असतांना त्याचे अंमलदार त्याचे हुकूम ऐकल्यासारखे करितात; जरा दूर गेले कीं, बयादा सांगूं लागतात, अडचणी दाखवितात, बादशहाजवळच्या मंड-ळीस लांच भारितात, आणि मन मानेल तसें वागतात. लोक आपले हुकूम मानीत नाहींत, हें बादशहास ठाऊक, म्हणून स्वतःच लढाईवर जाण्याचा त्यानें निश्चय केला. त्याच्या छावणीइतकी घाणेरडी जागा पृथ्वीवर दुसरी नसेल. दररोज असंख्य माणसें व जनावरें मरून एकच घाण सुटलेली आहे. जनावरांप्रमाणेंच मेलेल्या माणसांना दोरी बांधून ओढून नेतात, आणि अंगावर असेल नसेल तें सर्व लुबाडून जवळ कोठें खाडा दिसेल, त्यांत टाकून देतात. कोल्ह्याकुत्र्यांची मात्र चैन असते. ' किती वेळांतरी मला बादशहाच्या छाव-णीजवळ नाक धरतां धरतां पुरेवाट झाली, आणि कितीकदां मला उलट्या झाल्या.माश्या तर इतक्या असतात कीं, कांहीं खाण्याची म्हणून सोय नाहीं.' प्रवासी लोकांस पहिला मोठा धाक मराठ्यांचा. पण मराठ्यांच्या हातून सुटावें, तों बादशहाचे जकात-अधिकारी जास्तच लुबाडगारे आहेत. कोणा-जवळ कांहीं द्रव्य आहे, असा सुगावा लागला म्हणजे पुरे, खुशाल ते सर्वस्व हरण करून, प्रवाशांना मारून पुरून टाकितात. अशी ही ह्या साधु बादशा-हाची राज्यव्यवस्था आहे. '

अहमदनगरास आल्यावर बादशहास अति पस्तावा झाला. आपण कशाला ह्या मराठ्यांच्या युद्धांत पडलों, असें त्यास होऊन गेलें. दिल्लीस निघून जावें तर दक्षिणचा सर्वच प्रदेश हातचा जाणार; आणि इतक्या वर्षांचे श्रम व खर्च सर्व पदरांत. म्हणून त्यास दक्षिण देश सोडतां येईना. मुलें, नातु, पणतू मिळून निदान सतरा असामी वीस पंचवीस वर्षांच्या वरचे त्याच्या

कुटुंबांत आहेत. नातवांच्या दाढ्या पिकूं लागल्या आहेत. बादशहा मरतो केव्हां आणि आपण राज्य बळकावतों केव्हां, अशी प्रत्येकास विवंचना लागलेली आहे. पण या मराठे लोकांस जिंकून बादशहाच्या मनास समाधान देण्याचें सामर्थ्य एकांत नाहीं. मराठे तर बेसुमार दांडगाई करूं लागले आहेत. एक टोळी दिल्लीवर, तर दुसरी बंगाल्यांत, ओरिसा, डाका, राजमहालकडे, तिसरी कर्नाटकावर, तर चवथी सुरतेवर, असा सारखा धुमाकूळ चालला आहे. सन १७०६ त त्यांनीं सुरत, भडोच व गणदेवी लुटली. कोणत्या ह्मणजे मुलखांत ते नाहींत अशी जागा नाहीं. अजीम व कामबक्ष हे दोन मुलगे बादशहाच्या मरणाची वाट पहात टपून जवळ बसले आहेत. त्यांची धास्ती बादशहास अहोरात्र लागलेली आहे. आपली फौज त्यांस मिळेल, म्हणून बादशहा फौजेस नेहमीं लांब लांबच्या प्रांतांत पाठवून आपण बहुतेक सडाच रहतो. अहमदनगरास तो एकदां सडकून आजारी पडला, तेव्हां तो मेल्याची गप्प उठली; आणि मग जो काय गोंधळ सर्व राज्यांत उडाला, तो कांहीं विचारूं नये. खरोखरी मेल्यावर पुढें काय होणार हें त्यास जिवंतपणीं डोळ्यांसमोर दिसून आलें. लोकांस शांत करण्याकरतां, उठवत नव्हतें तरी, गाद्या तक्ये वगैरे लावून पुष्कळ असामींनीं सर्व बाजूनीं धरून त्यास दरबारांत आणिलें, आणि मंगल वाद्यें सुरू केलीं, तेव्हां तो जिवंत आहे, इतकी तरी लोकांची खात्री झाली. त्या प्रसंगीं डोळ्यांत आंसवें आणून, त्यानें भावी विपत्तीबद्दल अत्यंत दुःख दाखविलें, आणि परमेश्वर माझे डोळे कां मिटीत नाहीं, असें म्हणून आक्रोश करून म्हणाला, ' काल रात्रीं पैगंबरानें मला दर्शन देऊन सांगितलें, बाबा, तुझें मरण इतक्यांत नाहीं. अजून तीस वर्षे तुला जगावयाचें आहे. केवढी ही माझी दुर्दशा ! मरणास सुद्धां मी महाग झालों काय ? ' हें भाषण ऐकून लोकांची खात्री झाली कीं, बादशहा अजून पुष्कळ वर्षें वाचणार आहे. पुनः आपल्या मरणाची गडबड उडूं नये, म्हणून हा सगळा खटाटोप. ढोंगाची हुबेहुब बतावणी त्याच्या इतकी कोणास साधली नव्हती !

**१५ औरंगजेबाचा अंत**– अहमदनगरास पोंचल्यावर, आपलें इतिवृत्त संपलें, असें बादशहास वाटूं लागलें. आपला कायमचा मुक्काम येथेंच होणार, अशी त्याची खात्री झाली. अजीमशहा त्याचेजवळ होता. राज्याच्या पुढील व्यवस्थेविषयीं बादशहाचे मनांत विचार चालू होते. पाटणा येथें अजीमशहाचा मुलगा अजीम–उश्शान, हा बादशहाचे प्रीतींतला होता; तसेंच कामबक्षावरही त्याचें मन विशेष होतें. अजीमशहास छावणींतले बहुतेक सरदार अनुकूल असून, तो कामबक्षाची नालस्ती करण्यांत दंग होता. बादशहा हा प्रकार जाणून होता, व कामबक्षाचा संभाळ करण्याविषयीं त्यानें सुलतान हुसेन ऊर्फ मीरमलंग यास आज्ञा केली. कामबक्ष थोड्या काळानें बादशहाचे छावणींत आला. अजीमशहानें त्याचें कांहीं नुकसान करूं नये, म्हणून बादशहानें कामबक्षास मोठ्या इतमामासह विजापुरास पाठविलें; आणि अजीमशहासही माळव्यांत घालवून दिलें. आपण आतां थोड्या वेळानें मरणार, अशी खात्री होतांच, बादशहानें वजीर आसदखानास जवळ बोलाविलें; आणि त्याजकडून खजिना खोलवून फौजेचा चढलेला सर्व पगार आपल्या समक्ष देऊन टाकला. मरणसमयीं तो बोलला, ' मी आतां सुखानें मरणार; कारण मुसलमानी धर्माच्या शत्रूंचा नाश करण्यांत मी कसूर केली नाहीं, एवढें तरी लोक माझ्याविषयीं खात्रीनें म्हणतील. ' वडील मुलगा शहा आलम यानें आपल्या पश्चात् राज्यावर यावें, अशी व्यवस्था करण्याविषयीं जवळच्यांनीं त्यास आग्रह केला असतां तो म्हणाला, ' मी कोण त्यास नेमणार; परमेश्वराच्या हातची ही गोष्ट आहे. ' दोन प्रहरानंतर दोन तासांनीं बादशहाचें प्राणोत्क्रमण झालें. ' एवंच शुक्रवार तारीख २० फेब्रुवारी सन १९०७ रोजीं बादशहाचा व त्याजबरोबर मराठ्यांशीं चाललेल्या ह्या प्रचंड त्रिशद्वार्षिक युद्धाचा शेवट झाला. [ मराठी रियासत भाग २ पान ७१७ ].

**१६ मोंगलमर्दिनी ताराबाई**— याप्रमाणें औरंगजेबाच्या चक्रासुरी महत्वाकांक्षेला बळी न पडतां गेलीं सात वर्षें सतत त्याच्याबरोबर लढत

राहून 'मोंगलमर्दिनी ताराबाई' या यथार्थ पदवीनें मराठ्यांच्या कीर्तीला ललामभूत होऊन ताराबाईनीं व त्यांच्या स्वामिभक्त सरदारांनीं स्वराज्याच्या भगव्या झेंड्याची लाज राखिली व तो मराठ्यांच्या धवल कीर्तीचा भगवा झेंडा पन्हाळ्यावर जोरानें फडकत ठेविला.

# प्रकरण ७ वें

## सोन्याच्या पिंजऱ्यांतील शाहूराजे

**१. मनुष्याच्या चार अवस्था. २. शिक्षण-संस्काराचें महत्व. ३. शाहू राजांचें नवीन नामकरण. ४.शहाजादीचा पुत्र शाहू. ५. संस्कारानें बनलेले शाहूचे विचार. ६. औरंगजेबाचा शाहूस मुसलमानी दीक्षा देण्याचा विचार. ७. मराठ्यांच्या पराभवाचें साधन शाहू. ८. औरंगजेबाच्या कृपाछत्राखालीं शाहूचीं लग्नें. ९. बादशहाचा मांडलिक म्हणून शाहूची सुटका. १०. मोंगलांच्या छावणींतील शाहूराजे यांचा गौरव. ११. बेगमची शाहूंना पुजेकरतां पंजाची भेट.**

**१. मनुष्याच्या चार अवस्थाः**—औरंगजेबाची मुलगी झिनुत्निसा बेगम हिच्या मायेच्या छत्राखालीं वयाच्या नऊ वर्षांपासून शाहूचें बालपण आनंदांत, मजेंत आणि वैभवांत जात होतें, हें चवथ्या प्रकरणांत आलेंच आहे. मनुष्याची आयुर्मर्यादा शंभर वर्षांची धरली तर त्याच्या अवस्थेनुरूप पंचेवीस पंचेवीस वर्षांचा एक एक असे चार कालखंड पडतात. पहिल्या पंचेवीस वर्षांच्या कालखंडांत बालपण आणि विद्याभ्यास; दुसऱ्या कालखंडांत पन्नास वर्षांपर्यंत पुरुषार्थ; तिसऱ्या कालखंडांत पाऊणशें वर्षांपर्यंत पुरुषार्थानें संपादन केलेल्या कामगिरीची स्थीरस्थावरतेच्या दृष्टीनें होणारी व्यवस्था आणि चवथ्या कालखंडांत म्हणजे निर्याण कालापर्यंत आपण पुरुषार्थानें संपादन केलेल्या ऐहिक गोष्टीपासून अलिप्त राहून त्याची करून दिलेली व्यवस्था बरोबर चाललेली आहे हें दुरून पाहून त्याबद्दल संतोष आणि समाधान मानणें आणि परमेश्वराचें हें निरंतर कालचक्र कसें चाललें आहे

यांचें कौतुक पहात रहाणें. हे चार कालखंडः १ छात्राश्रम २ गृहस्थाश्रम ३ वानप्रस्थाश्रम ४ संन्यासाश्रम म्हणून प्रापंचिक दृष्टीनें ओळखिले जातात. पहिलीं पंचेवीस वर्षें, बालपणाचीं आठ वर्षे वजा जातां राहिलेलीं सत्रा वर्षें विद्यार्जनांत जातात. हें विद्यार्जन कालानुरूप आणि परिस्थित्यनुरूप प्राप्त होतें. परंतु हा काल पुरुषाच्या भावी प्रापंचिक वैभवाच्या इमारतीचा पाया असल्यामुळें तो ज्या स्वरूपाचा पक्का अगर कच्चा होईल त्या मानाप्रमाणें इमारतीची उंची व दर्जा व्यवहारांत ठरतो; म्हणून पूर्वी मुलाला आठ वर्षें झालीं म्हणजे त्याचें उपनयन करून त्याला विद्यार्जनाकरतां गुरूच्या आश्रमांत पाठविण्यांत येत असे. याच कालांत मनुष्याच्या बुद्धीची, स्मरणशक्तीची, अनुकरण करण्याची, धर्मभावनेची, स्वाभिमानाची वगैरे बुद्धीच्या कक्षेत येणाऱ्या सर्व गोष्टींची वाढ होत असते. याच काळांत शरीराला अगर मनाला संवयीनें अगर अनुकरणानें जें वळण किंवा जे संस्कार घडतील त्याच्याच अनुरोधानें त्याच्या दुसऱ्या कालखंडांत त्याचे हातून पुरुषार्थ घडून यावयाचे असतात; आणि त्यांचेंच प्रतिबिंब त्यापुढील दोन कालखंडांत दिसून यावयाचें असतें.

२ **शिक्षण–संस्काराचें महत्वः**– वरील विधानाची स्पष्ट कल्पना येण्याकरतां सांप्रतच्या कालाकडे लक्ष दिलें म्हणजे झालें. बाप अगदीं सनातनी असतो. कालमानपरत्वें तो आपल्या मुलाला शिक्षण देण्याची पराकाष्ठा करतो. सर्वसाधारणपणें प्राथमिक शिक्षण बापाच्या नजरेखालीं होतें. दुय्यम शिक्षणाला प्रारंभ होतांच बापाच्या कक्षेतून मुलें क्रमाक्रमानें बाहेर पडतात. बापाचा अधिकार केवळ मुलाच्या शिक्षणाकरतां पैसा पुरविणें एवढाच क्रमाक्रमानें राहतो. मुलांना त्या कालांत जें शिक्षण मिळतें तें प्रचलित राजसत्तेच्या अनुरोधानें मिळतें. ही राजसत्ता नेहमींच स्वधर्मीयांची असू शकत नाहीं. परकीय राजसत्ता ही नेहमींच धर्माच्या अगर राष्ट्राच्या शत्रुस्थानीं असते. धर्माची चाड किंवा राष्ट्राची वाढ ही नवीन पिढीवर अवलंबून असते. परकीय राजसत्ता आपलें अस्तित्व अखंड रहावें म्हणून भावी पिढीच्या शिक्षणाचें

कळसूत्र आपल्या हातीं ठेवते, व त्या कळसूत्रावर आपल्या राज्यव्यवस्थेला सुखकर आणि सोयीस्कर होईल अशी भावी पिढी निर्माण करते. त्यामुळें शिक्षण त्यांच्या पद्धतीचें, अनुकरण त्यांच्या स्वरूपाचें, विचारविनियम, सहवास, रीतीरिवाज, वगैरे सर्व कांहीं त्यांच्या संस्कारांचें नवीन पिढीला मिळतें. त्यामुळें एका कुटुंबांतच बापलेकाचे दोन स्वतंत्र पंथ निर्माण होतात. हा सामान्य कुटुंबाचा विचार झाला. धर्म किंवा राष्ट्र या दृष्टीनें विचार करावयाचा तर त्यांत अनेक धनिक लोक, सरदार, राजे, महाराजे नांवाचे पण मांडलिक असल्यानें त्यांच्या पुत्रांनाही असें बालपणापासून परकीय सत्तेच्या सहवासांत शिक्षण मिळत गेल्यामुळें त्यांच्याही घरांत व राज्यांत दुपंथी बोकाळते. त्यामुळें धर्माची व राष्ट्राची सर्वच शिस्त बिघडते आणि मर्यादा सुटते. शिक्षण हा धर्माचा व राष्ट्राचा पाया असल्यामुळें तो परधर्मदूषित किंवा परकीय संस्कारयुक्त नसावा ही दक्षता घेणें व चालू ठेवणें यांतच धर्माचा व राष्ट्राचा अभ्युदय असतो. राज्याच्या बाबतींत ही दक्षता विशेष घ्यावी लागते. कारण ज्याच्यावर सर्व प्रजेचें, धर्माचें आणि राष्ट्राचें सर्वस्व अवलंबून असतें. म्हणून या कारणपरंपरेंत औरंगजेबाच्या कैदेंत असलेला संभाजी महाराजांचा पुत्र शिवाजी ऊर्फ शाहू असतो कीं काय याची मीमांसा करणें योग्य आहे.

**१ शाहूराजांचें नवीन नामकरणः–** संभाजी महाराजांच्या वधाच्या वेळीं औरंगजेबानें जेव्हां त्यांना 'तूं मुसलमान होतोस कीं नाहीं' असा प्रश्न विचारला त्या वेळीं संभाजी महाराजांनीं औरंगजेबाला उत्तर दिलें कीं, 'जहांपन्हा तकसीर माफ. आपनी बेटी बेगम पातशाहजादी इनायत होय तो मय कबूल.' (मराठी साम्राज्याची छोटी बखर पान ६३-६४) असा जबाब मिळाल्यामुळें संभाजी महाराजांचा वध झाला. नंतर येसूबाई व शिवाजी यांना कैद करून जेव्हां औरंगजेबाच्या छावणींत त्यांना आणलें त्यावेळीं कदाचित् तो संभाजी महाराजांप्रमाणें त्याच्या मुलामाणसांची वाट लावील या भीतीनें शहाजादी बेगम झिबुन्निसा 'नालकींत बसोन पातशहाकडेस आली आणि चिकाचे पडद्यांतून बोलली कीं, राजानें (संभाजीनें)

माझी इच्छा केली तो माझा भ्रतार झाला. आतां दुसरा करावयाचा नाहीं. त्याचा पुत्र आहे तो माझा पुत्र. ' [ मराठी साम्राज्याची छोटी बखर पान ६३-६४ ] अशा जिव्हाळ्याच्या भावनांचा उदय बेगमच्या अंतःकरणांत शिवाजीबद्दल झाला. बेगम ही सुसंस्कृत, कवयित्री, विदुषी आणि प्रौढ असल्यामुळें तिच्या भावनांचे खेळ चंचल किंवा अविचारी असणें अशक्य होतें. ती कुमारी होती व अखेरपर्यंत ती कुमारीच राहिली. यावरून तिच्या ठिकाणीं शिवाजीच्या विषयीं उत्पन्न झालेलें पुत्रवात्सल्य अकृत्रिम स्वरूपाचें होतें यांत संशय नाहीं. तिनें या बालशिवाजीचीं भेट होतांच "राजास ( बाल शिवाजीस ) पोटाशीं धरून समाधान करून बोलली कीं, 'तूं आमचा बेटा.' याप्रमाणें बोलून मोत्यांची कंठी व तुरा व नवरत्नांची कंठी व कलगी व नालकी व शिरपेंच व पेंची व पांच वस्त्रें व पोषाख या प्रमाणें बेगमनें देऊन पातशहाकडे पाठविलें आणि शाहुराजे असें नांव ठेविलें." ( मराठी साम्राज्याची छोटी बखर पान ६३-६४ )

**४ शहाजादीचा पुत्र शाहूः**— हा प्रकार बाल शिवाजीच्या नवव्या वर्षीं ह्मणजे उपनयन संस्काराच्या संधीलाच झाला. दत्तविधानाच्या वेळीं जसें पूर्वीचें नांव बदललें जाऊन नवीन् नांव ठेवण्यांत येतें व तेंच अखेरपर्यंत जसें चालतें तसाच प्रकार या संभाजी-पुत्राचा झाला. त्याचें शाहूराजे असें या प्रसंगीं नवीन नामकरण झालें व तेंच शेवटपर्यंत चालू राहिलें. याप्रमाणें औरंगजेबाच्या दरबारीं शाहूराजे हे शहाजादी बेगम यांचे चिरंजीव व औरंगजेब बादशहाचे नातू या भावनेनें वयाच्या नवव्या वर्षापासून जे वाढूं लागले ते औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत, ह्मणजे वयाच्या सत्ताविसाव्या वर्षापर्यंत सुमारें दीडतप विद्यार्जनाच्या मुख्य कालांत वाढत होते. हा त्यांचा सर्व काल औरंगजेबाच्या छावणींत गेला. औरंगजेबाची छावणी ह्मणजे मराठ्यांच्या तीव्रतर शत्रूची छावणी होती. त्या छावणींतील वातावरण मराठे ह्मणजे 'गनीम' या स्वरूपाचें होतें. या वातावरणांत छत्रपती शिवाजी महाराजांच्या नांवाला, त्यांच्या पराक्रमांच्या गोष्टींना अर्थात मज्जाव होता. त्यामुळें आपला कुलवृत्तांत काय आहे व आपलें कर्तव्य

काय आहे याची जाणीव करून देणारें शिक्षण शत्रूच्या छावणींत शाहूराजांना मिळणें अशक्य होतें. सदासर्वदा बेगमसाहेबांचा सहवास, त्यांच्या सान्निध्यांत असलेल्या लांब लांब दाढीच्या, मोठाल्या पागोट्याच्या व हातांत जपमाळ आणि कांखेंत कुराण घेतलेल्या गवय्ये, खुशमस्करे, आरबी, फारशी भाषेचे मौलवी, हकीम वगैरे मंडळींचा अहोरात्र गराडा, अशी राहणी शाहूराजांना मिळाली. त्यामुळें त्यांच्या कानावर मराठ्यांची निर्भत्सना, हिंदुधर्माची नालस्ती या शिवाय दुसरें कांहीं पडलें नाहीं. शिक्षण मुसलमानी पद्धतीचें, राहणी, विचारसरणी, ख्यालीखुशाली, मनोरंजन, खाद्य, पेय, सहवास वगैरे शिक्षण-साधनें मुसलमान पद्धतीचीं शाहूराजांना दीड तपापर्यंत अखंड मिळालीं. जोत्याजी केसरकर याच्या देखरेखीखालीं शाहू राजाचें बाळपणचें शिक्षण झालें असें ह्मणतात. हा जोत्याजी पन्हाळा प्रांतांतील मौजे पुनाळचा होता. या जोत्याजीच्या देखरेखीखालील बालशिक्षणाचा प्रभाव औरंगजेबाच्या छावणींतील उच्च दर्जाच्या मौलवींच्या शिक्षणापुढें कितीसा टिकूं शकणार ! ( थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र पान ५ ) कोणे एके दिवशीं पादशाहा ( औरंगजेब ) तख्तावरून उठतेसमयीं पायमोजे मखमाली होते ते महाराजांनीं (शाहूराजे यांनीं) हात लावून पुढें केले. यावरून बहूत संतोषी होऊन हातीं रुमाल होता तो बक्षीस दिल्हा. त्याची पूजा नित्य करावी ऐसें करून ठेविला. ' औरंगजेबाला कुर्निसातही न करणाऱ्या शिवाजी महाराजांचे हे नातू औरंगजेबाचे पायमोजे उचलून देतात व त्यांनीं बक्षिस दिलेला रुमाल रोजच्या पूजेंत ठेऊन त्याची पूजा करतात यावरून शाहूराजांना कसें शिक्षण मिळत होतें याची कल्पना येईल. एकंदरींत शाहूराजांना मराठ्यांच्या शत्रूगृहीं मराठी-राज्यविध्वंसक, हिंदुधर्मविनाशक आणि आर्यसंस्कृतिउच्छेदक अशा तऱ्हेचेंच शिक्षण मिळत होतें यांत संशय नाहीं. याचा पडताळा औरंगजेबाच्या छावणींत असतांना शाहूराजांनीं जे जे आपले विचार प्रकट केले, जे जे संदेश पाठविले त्यावरून मिळण्यासारखा आहे. औरंगजेबाच्या छावणींतील वातावरण ' वचस्यनद् मनस्यनद् कर्मण्यनद् दुरात्मनाम् ' या स्वरूपाचें अखंड होतें हें मागील

वर्णनावरून लक्षांत आलें असेलच. त्याच सूत्रांतून शाहू महाराजांच्या संदेशांचा वगैरे विचार करावा लागेल.

**५ संस्कारानें बनलेले शाहूचे विचारः**— राजाराम महाराजांनीं शाहूराजांच्या सुटकेचा दोन वेळां प्रयत्न केला. सन १६९६ मध्यें राजाराम महाराजांनीं शाहूची सुटका करण्याकरतां औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला केला. पण तो फसला. दुसऱ्या प्रसंगीं राजाराम महाराजांनीं शाहूस आपले स्वाधीन करण्याविषयीं औरंगजेबाकडे मागणी केली. त्यावेळीं औरंगजेबानें थट्टेनें शाहूला ह्मटलें, ‘ मी तुह्मांस तुमचे काकाकडे पाठवितों, जातां काय ? ’ त्यावर शाहूनें उत्तर दिलें, आमचे काकांचा पूर्वीपासून स्वतः राज्य करण्याचा इरादा आहे. आमचे वडिलांस कैदेंत ठेऊन, स्वतः राज्य घेण्याचे प्रयत्न त्यांनीं केले; रायगडावर आपलें धरणें आलें, तेव्हां आह्मांस एकटे सोडून जिंजीकडे गेले; आणि आतां पुनरपि आम्हांस आपले ताब्यांत घेऊन कैदेंत मात्र ठेवितील; तर आपण त्यांचें पारिपत्य करून, आम्हांस राज्यावर बसवाल तेव्हांच राज्य करूं. ’ ( मराठी रियासत भाग २ पान ७०६ ) यावेळीं शाहूराजाचें वय सतरा अठरा वर्षांचें असेल. वरील त्यांच्या उत्तरांत मराठी राज्याविषयींच्या कळकळीचें, स्वाभिमानाचें किंवा स्वकीयांविषयीं आदरबुद्धीचें कोठेंतरी चिन्ह दिसतें काय ? त्यांना जो त्यांच्या घराण्याचा इतिहास शिकविण्यांत आला तो राजाराम महाराज हे शाहूच्या वडिलांचे शत्रू होते, ते त्यांचें राज्य अपहार करण्याकरतां टपून बसून प्रयत्न करीत होते, शाहूच्या ऐन संरक्षणाच्या वेळीं पळून जाऊन जिंजीस बसले, आतां त्यांची येथून सुटका करवून घेऊन कपटानें त्यांना कैदेंत ठेवण्याचा त्यांचा विचार आहे असा विपर्यस्त स्वरूपांत होता. औरंगजेबानें शाहूला सोन्याच्या पिंजऱ्यांत बाळगून कसें पोपटपंची ज्ञान दिलें होतें हें लक्षांत येईल. त्या ज्ञानांत औरंगजेबानें मराठी राज्याचा धुव्वा उडवून, कत्तलखाना निर्माण करून त्यांत प्रत्यक्ष शाहूच्या बापाचा अमानुष वध केला या वार्तेचा गंधही नव्हता किंवा त्याबद्दल शाहूच्या मनाला सूडबुद्धीचा अगर शत्रु भावनेचा लवलेशही नव्हता. उलट औरंगजेबाचें छत्र निर्भयतेचें आणि

आपल्या कल्याणाचें आहे असें शाहूला वाटत होतें. शाहूला राजाराम महाराजांकडून स्वराज्य नको होतें. राजाराम महाराजांना शासन होऊन औरंगजेबाकडून त्याच्या अभयछत्राखालचें स्वराज्य त्याला हवें होतें. एकंदरींत शत्रुपक्षाकडून विपरीत इतिहास शिकविला गेल्यानें मनुष्याच्या स्वाभिमानाचें आणि त्याबरोबर त्याच्या सर्वस्वाचें कसें खच्चीकरण होत असतें हें वरील हकीकतीवरून सहज लक्षांत येईल.

राजाराम महाराज निवर्तले ही बातमी शाहूराजे यांना समजल्यावर त्यांना दुःख झालें; व त्यामुळें त्यांना ज्वर आला असें औरंगजेबाला समजलें. तेव्हां शाहुराजांच्या समाचाराला तो आला. औरंगजेबानें शाहूराजे यांच्या अंगावरून हात फिरविला व म्हणाला " तुमारा चिच्या मरगया इसवास्ते तुमारी तबियत बिगड गई, अजार हुवा; तुम चिंता मत करो, दख्खनमे सब चोर, तुम साहू. तुमारा राज्य तुमकू देउंगा, तुम हमारे बेटीके बेटे हो. कुच फिकीर मत करो " असें समाधान करून " राजारामही बहुत अच्छा था " असें बोलून " अपने बेटेकु जलदी अच्छा करना " असें बेगमेस सांगून औरंगजेब निघून गेला. ( कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास मोडककृत पान १८ ) औरंगजेबानें या प्रसंगीं शाहूचें समाधान केलें. शाहूचें समाधान कशांत आहे हें औरंगजेबाला माहीत होतें म्हणूनच त्यानें शाहूचें समाधान होईल अशा गोष्टी सांगितल्या यांत संशय नाहीं. शाहूला वाटत होतें कीं, मराठ्यांचें राज्य राजारामाचें पारिपत्य करून व त्यांचेकडून तें जिंकून घेऊन नंतर औरंगजेबानें आपणाला बहाल करावें. या त्याच्या इच्छेला अनुसरून औरंगजेबानें ' तुमारा राज्य तुमकू देउंगा ' असें अभिवचन देऊन शाहूचें समाधान केलें. हें समाधान करण्यांत आपला अंतस्थ हेतु औरंगजेबानें अस्पष्ट रीतीनें पण त्याचा शाहूच्या मनावर परिणाम होईल असा साधून घेतला. ' तुम हमारे बेटीके बेटे हो ' कुच फिकीर मत करो ' या वाक्यानें शाहूला औरंगजेबानें धीर दिला ही गोष्ट खरी आहे. पण तो धीर कोणत्या कारणाकरतां होता, याचा स्पष्ट उल्लेख त्यानें पहिल्यानें केला. तूं माझ्या

मुलीचा मुलगा आहेस, माझा नातू आहेस तेव्हां तुला मुळींच भिण्याचें कारण नाहीं. ' दख्खनमे सब चोर, तुम साहू ' तूं माझा नातू झाल्यामुळें तूं एकटा साव झालास बाकी दाक्षिणेतील सर्व लोक चोर आहेत, काफीर आहेत, गनीम आहेत. औरंगजेबानें शाहूबद्दल आपला नातू म्हणून अगदीं जिव्हाळ्याचा आत्मीय भाव एका बाजूला दाखविला आणि दुसऱ्या बाजूला शाहूचे आप्तइष्ट, सगेसोयरे वगैरे सर्व मराठे चोर, काफीर, गनीम आहेत, आणि त्यामुळें असें ध्वनित केलें कीं, चोरांच्या मालिकेंत जसा साव टिकूं शकत नाहीं तसाच औरंगजेबाचा नातू मुसलमान हिंदूंना समजतात त्याप्रमाणें, चोर, काफीर किंवा गनीम असूं शकत नाहीं. तेव्हां आत्मीय भावनेच्या जिव्हाळ्याचा झरा औरंगजेबाच्या हृदयांत जर उत्पन्न व्हावयाला पाहिजे असेल तर शाहूनें चोर राहतां उपयोगाचें नाहीं त्यानें साव राहिलें पाहिजे, म्हणजे पर्यायानें शाहूनें मुसलमानच झालें पाहिजे. असें जर होईल तरच त्याला त्याचें अभय होतें आणि तरच तो त्याला दक्षिणचा राजा बनविणार होता हा औरंगजेबाचा अंतिम हेतू पूर्वीच्या खटपटीवरून स्पष्ट होतो.

**६. औरंगजेबाचा शाहूस मुसलमानी दीक्षा देण्याचा विचारः**— औरंगजेबाची शाहूला मुसलमान करून घेण्याची सारखी खटपट चालू होती. ' पादशहा [ औरंगजेब ] आम्हांस ( शाहूस ) मुसलमान करितो अशी गोष्ट एक दोन वेळ जहाली असतां प्रतापजी गुजर यांचे चिरंजीव खंडेराव, राजारामसाहेब यांचा मेहुणा, आमचा मामा, आम्हांबद्दल मुसलमान जहाला. आम्हांसही करणार. परंतु बेगम यांनीं वांचविलें. ' [मल्हार रामरावकृत थोरले राजाराम यांचें चरित्र पान ६६ ] यावरून शाहूला मुसलमान करण्याबद्दल औरंगजेबाची कशी खटपट चालली होती हें दिसून येईल. प्रतापराव गुजर यांची कन्या जानकीबाई ही राजाराम महाराजांची पहिली पत्नी. तिचा भाऊ खंडेराव हा येसूबाई, शाहू यांच्या समवेत कैद होऊन त्यांच्याबरोबर औरंगजेबाच्या छावणींत गेला. शाहूला मुसलमान करण्याचे औरंगजेबाचे प्रयत्न सुरू झाले तेव्हां हिंदुपदपातशाहीचा धनी जो शाहू,

त्याला मुसलमान होऊं देऊं नये म्हणून स्वामीभक्त खंडेराव गुजर हे शाहू करतां स्वतः मुसलमान झाले व त्या प्रसंगीं त्यांनीं शाहूवरील मुसलमान होण्याचें संकट टाळलें. परंतु तेवढ्यानें औरंगजेबाचें मन शांत झालें नाहीं. त्याला शाहूच मुसलमान व्हावयाला पाहिजे होता. परंतु बेगम ही आड आल्यामुळें औरंगजेबाचा तिच्यापुढें इलाज चालला नाहीं. परंतु त्यामुळें शाहूला मुसलमान करून घेण्याची औरंगजेबाची इच्छामात्र नाश पावली नव्हती. ती वरीलप्रमाणें कोणत्या ना कोणत्या तरी प्रसंगीं अस्पष्ट रीतीनें बाहेर पडत असे. औरंगजेब शाहूचें समाधान करतांना ' राजारामही बहुत अच्छा था ' असें म्हणतो आणि दुसरीकडे, ' राजारामाचे मृत्यूचें वर्तमान ऐकून बादशहा व त्याचे मुसलमान अनुयायी यांस आनंदीआनंद झाला. त्यांच्या फौजेंत जिकडे तिकडे जयघोष करण्यांत आला. ' ( मराठी रियासत भाग २ पान ६८६ ) याप्रमाणें आनंदोत्सव करतो. एकंदरींत शाहूचें औरंगजेबानें मराठ्यांचा नाश करण्याकरतां एक हातचें सुदर्शन चक्रासारखें अस्त्रच आपल्या संग्रहीं निर्माण करून ठेवलें होतें.

**७ मराठ्यांच्या पराभवाचें कारण शाहू**—इ. स. १७०५ मध्यें औरंगजेबाच्या पकडींतून शाहूच्या सुटकेचा एक प्रयत्न झाला. अर्थात तो मतलब साधून घेण्याकरतांच होता. यावेळीं औरंगजेबाचा मुलगा कामबक्ष हा विजापुरीं होता. त्याची मराठ्यांबरोबर लढण्याविषयीं नाउमेद झाली होती. दिवसेंदिवस त्याच्या अडचणी वाढूं लागल्या होत्या; आणि फौजेचा पगार तुंबल्यामुळें लोकांनीं त्याला भंडावून सोडलें होतें. सर्वांचे डोळे औरंगजेब आपल्या पश्चात् राज्याची कशी व्यवस्था लावतो याकडे लागले होते. त्याच्या मुलांमध्यें अंतस्थ कलह सुरू होते. त्याची कामबक्षावर मर्जी होती. कामबक्षाचे मनांत विजापुराकडे स्वतंत्र राज्य स्थापावें असे विचार घोळत होते. हा त्याचा हेतु तडीस जाण्यास मराठ्यांची सहानुभूति त्याला पाहिजे होती. याकरतां त्यानें व त्याच्या सरदारांनीं औरंगजेबाला सुचविलें कीं, शाहूची सुटका करून त्यास आपला मांडलिक म्हणून मराठ्यांचे

गादीवर बसविल्यास त्या लोकांची समजूत होऊन, युद्ध बंद होईल; आणि बादशहांना आराम मिळेल. मराठे पादाक्रांत तर होत नाहींत, तेव्हां ते आपली ताबेदारी पत्करतील तरी बरेंच, असें बादशहास वाटून त्यानें कामबक्षास मराठ्यांशीं बोलणें करण्यास हुकूम दिला; आणि शाहूस त्याचे हवालीं केलें. राजपुत्रानें धनाजी जाधव याजकडे वकील पाठवून शाहूच सुटकेबद्दल बोलणें सुरू केलें. बरीच बाटाघाट होऊन ठरलें कीं, दक्षिणेंतील सहा सुभ्यांवर बादशहानें मराठ्यांस सरदेशमुखीचा हक्क देऊन मराठ्यांनींच सर्व मुलुखाचा बंदोबस्त राखावा; आणि हें ठरविण्याकरतां ताराबाईच्या मुख्य सरदारांस पत्रें पाठवून बोलावून आणावें. त्यांनीं बादशहाची ताबेदारी कबूल करून शाहूस आपल्या ताब्यांत घ्यावें. याप्रमाणें पत्र लिहिल्यावर व ह्या बाटाघाटीची बातमी इतर सरदारांस लागल्या बरोबर ते धनाजीच्या लष्करांत गोळा होऊं लागले, आणि आपणासही कांहीं हक्क मिळावे अशी त्यांस इच्छा उत्पन्न होऊं लागली. नंतर सर्व सरदारांनीं मिळून बादशहास अशी आणखी एक अट सांगितली कीं, सत्तर मराठे सरदारांस बादशहाकडून सन्मानाचे पोषाख मिळावे. बादशहानें मोठ्या नाखुषीनें ही व्यवस्था कबूल केली. परंतु ती अंमलांत येणाच्या पूर्वी बादशहाचे छावणीनजीक मराठे सरदारांचा जमाव पडत चालला, आणि त्यांच्या मागण्या उत्तरोत्तर जास्त तोऱ्याच्या होऊं लागल्या. वास्तविक ठराव असा होता कीं, 'कामबक्षानें शाहूस बरोबर घेऊन आपल्या छावणीपासून चार पांच कोसांवर मराठे सरदारांस जाऊन भेटावें. तेथें शाहूचीं व सरदारांचीं बोलणीं व्हावीं. नंतर सरदारांनीं कामबक्षास प्रणाम करून त्यांच्या स्वाधीन व्हावें; आणि त्याजबरोबर बादशहाचें छावणींत येऊन त्यांनीं पोषाख घ्यावे, व नंतर शाहूस घेऊन निघून जावें.' [ मराठी रियासत भाग २ पान ७०९ ] परंतु हा ठराव अंमलांत आला नाहीं. मराठ्यांचा जमाव बलवान होऊन ते परस्पर शाहूस घेऊन जातील, आणि आपल्या हातचा डाव जाईल असें बादशहास वाटून, त्यानें हा तह मोडून टाकला. इकडे मराठेही बादशहाची शक्ति ओळखून असल्यामुळें, त्याची ताबेदारी पत्करण्यास तयार झाले नाहींत.

वरीलप्रमाणें माहिती मराठी रियासतींत दिलेली आहे. औरंगजेबाच्या मनांत कोणालाच कांहीं द्यावयाचें नव्हतें. त्याला सर्वांच्याच तोंडाला पानें पुसून आपला कार्यभाग साधून घ्यावयाचा होता. त्याला कामबक्षाचें मन दुखवावयाचें नव्हतें. शाहूस नाराज करावयाचें नव्हतें. आणि या गोष्टी साधून ताराबाई व मराठे सरदार यांच्यांत दुफळी पाडून मराठी राज्याचा नाश करावयाचा होता. हा औरंगजेबाचा हेतू वरील मूळ ठरावांत स्पष्ट आहे. कामबक्षानें आपल्या छावणीपासून चार पांच कोसावर शाहूस घेऊन मराठे सरदारांस भेटावें. तेथें शाहूची व मराठे सरदारांची बोलणीं व्हावीं आणि नंतर ' सरदारांनीं कामबक्षास प्रणाम करून त्याच्या स्वाधीन व्हावें. आणि त्याजबरोबर बादशहाचे छावणींत येऊन त्यांनीं पोषाख घ्यावे, व नंतर तेथून शाहूस घेऊन निघून जावें.' यांतच औरंगजेबाचें कपटकारस्थान होतें. शाहूचें आमिष दाखवून मराठे सरदारांना आपल्या छावणींत बोलावून घ्यावयाचें व तेथें त्यांना कैद करावयाचें हाच त्याचा डाव होता. मराठे सरदार शाहूकरतां हापापलेले होते हें औरंगजेब जाणून होता म्हणून शाहूच्या करवीं सर्व मराठे सरदारांवर कपटाचें जाळें टाकून त्यांत त्यांना पकडावें ही त्याची खटपट होती. त्याचप्रमाणें या प्रयत्नांत ताराबाई व त्यांचे सरदार यांत दुफळी पाडावी हाही हेतु होता. म्हणून त्यानें त्यांच्या मुत्सद्यांना वगळून फक्त धनाजी सारख्या केवळ लष्करी मराठे सरदारांना पत्रें पाठवून बोलावून घेतलें. त्यांनीं शाहूला ताब्यांत घ्यावें पण बादशहाची ताबेदारी पत्करावी. ताराबाई या बादशहाचें मांडलिकत्व पत्करण्यास केव्हांही तयार होणार नाहींत हें औरंगजेब जाणून होता म्हणून तो ताराबाईपासून मराठे सरदारांना शाहूच्या नांवावर अलग पाडणार होता. हा औरंगजेबाचा हेतु जर साध्य झाला असतां तर त्याच वेळीं मराठ्यांचें राज्य नाश पावलें असतें. ताराबाई व त्यांचा मुलगा हे अव्वल दर्जाचे गुन्हेगार म्हणून त्यांची संभाजी महाराजांप्रमाणें कत्तल झाली असती. परंतु त्या वेळीं ताराबाईच्या आधिपत्याखालीं मराठे सरदारांना एवढें नक्की वाटत होतें कीं, शाहूराजे पाहिजेत पण त्यामुळें औरंगजेबाच्या ताबेदारीचें

गळ्यांत पडणारें लोढणें नको. ही स्वातंत्र्याची पूर्ण जाणीव मराठे सरदारांना त्या वेळीं असल्यानें ते औरंगजेबाच्या मायावी प्रयत्नास बळी पडले नाहींत.

असाच मायावी दुसरा प्रयत्न इ. स. १७०२ मध्यें म्हणजे वरील प्रयत्नानंतर एकाच वर्षानें औरंगजेबानें केला. त्याची हकीकत मनूचीनें दिली आहे. ( मराठी रियासत भाग २ पान ७०९ ) ‘ सगळे उपाय हरल्यावर शेवटचा उपाय म्हणून औरंगजेबानें शाहूस इतके दिवस मोठ्या बंदोबस्तानें जवळ बाळगिलें होतें. विजापूर, कर्नाटक वगैरे प्रांतांचें राज्य मुलगा कामबक्षाचे हवालीं करून आपण निघून दिल्लीस जाणार, असें त्यानें जाहीर केलें. शाहूस त्यानें मोकळा केलें; त्यास पोषाख व सप्त हजारी मनसब दिली, आणि कामबक्षाचे आज्ञेंत वागून दक्षिणेचें राज्य करीत जा, असा त्यास हुकूम केला. त्यासाठीं कांहीं प्रांत त्यास तोडून दिले, आणि कांहीं प्रांतावर चौथाई वसूल करण्याचा हक्क त्यास दिला. ( याचीं फर्मानें ग्रँट डफनें दिलीं आहेत. ) शाहूचे तंबू बादशहाचे आवारांत असत. तारीख ६ फेब्रूवारी सन १७०६ रोजीं झुल्पिकारखानाच्या छावणीच्या शेजारीं शाहूस स्वतंत्र मुक्काम देऊन तेथें त्यास राहण्यास पाठविलें; आणि मराठे सरदारांनीं येऊन शाहूस मिळावें, असा पुकारा केला. पण या युक्तीनें कोणीच फसले नाहींत. शाहू मोकळा झाला होता, परंतु त्याजवर नजर ठेवण्यास झुल्पिकारखानास आंतून ताकीद होती ’ याप्रमाणें नवीन नवीन क्लृप्त्या काढून औरंगजेब शाहूचें सुदर्शनचक्र मराठ्यांच्या मागें लावून त्यांचा सर्वनाश करण्याचा प्रयत्न करीत होता. ‘ कंटकेनैव कंटकम् ’ या नीतीला अनुसरून त्यानें मराठ्यांचा कांटा कायमचा काढून टाकण्याकरतां शाहूचा कांटा आपल्या बुद्धिसामर्थ्यानें आणि कपटनीतीला अनुसरून मुद्दाम कसा तयार करून ठेवला होता हें लक्षांत येईल.

**८ औरंगजेबाच्या कृपा छत्राखालीं शाहूचीं लग्नें**:— सन १६९९ च्या सुमारास बादशहानें शाहूचीं लग्नें केलीं. त्यावेळीं त्याचें वय एकोणीस वर्षांचें होतें. हीं लग्नें झिबुन्निसा बेगम हिनें जुळवून आणलीं. जोत्याजी केसरकर व मोरोपंत सबनीस यांनीं बादशहाच्या ताब्यांतील सरदारांच्या

दोन मुली पसंत केल्या. एक रुस्तुमराव जाधव यांची कन्या अंबिकाबाई व दुसरी कण्हेरखेडचे शिंदे यांची कन्या सावित्रीबाई. बादशहानें पुष्कळ पैसा खर्च करून समारंभ मोठया थाटाचा केला. या प्रसंगीं बादशहानें वधूस पाहण्याची इच्छा दर्शविली असतां, विरूबाई म्हणून एक सुरेखशी दासी त्याजकडे पाठवून हीच शाहूची बायको असें त्यास समजाविलें, आणि आपल्या पडदपोशीचा मान येसूबाईनें राखला, अशी गोष्ट प्रचलित आहे. बादशहानें शाहूस ममतेनें वागविलें होतें, आणि शाहूही घरच्या माणसांपैकींच गणला जात होता. ( मराठी रियासत भाग २ पान ७०७ ) लग्नप्रसंगीं बादशहानें शाहूस अक्कलकोट, इंदापुर, सुपें, बारामती व नेवासें या पांच परगण्यांची जहागीर करून दिली, आणि एक सोन्याची तलवार आणि अफझुलखानाची तलवार, आणि रायगडाचा पाडाव करून आणिलेली शिवाजी महाराजांची भवानी तलवार अशा तीन तलवारी बक्षिस दिल्या. येणेंप्रमाणें शाहू व येसूबाई खूष झाल्यानें पुढें मागें त्यांनीं आपणास दगा देऊं नये असा बादशहाचा मनोदय होता. बादशहानें विरूबाईसहवर्तमान शाहूस आशीर्वाद दिल्यापासून तिलाही शाहूनें विशेष कृपा दाखवून खासगींत ठेविलें. मरेपर्यंत शाहूचा तिजवर लोभ होता. अशा प्रकारें औरंगजेबानें शाहूच्या सर्व कुटुंबाला आपल्या घरच्या माणसांपैकीं समजून आत्मसात् करून सोडलें होतें. अत्यंत प्रेमळ अशी पालनकर्ती माता झिबुन्निसा बेगम व सत्ताधीश आणि ऐश्वर्यसंपन्न आजा औरंगजेब यांच्या प्रेमळ सहवासांत शाहूराजांची वाढ होत असल्यानें ताराबाई व इतर खरी आप्त मंडळी शाहूराजांना दूरची वाटूं लागली असेल यांत संशय नाहीं. सन १७०२ मध्यें झिबुन्निसा बेगम ब्रह्मपुरी येथें कालवश झाली. हें ठिकाण सोलापूरच्या नैर्ऋत्येस व पंढरपूरच्या पूर्वेस भीमा नदीच्या कांठीं आहे. त्या ठिकाणीं औरंगजेबाची सन १६९५ पासून छावणी पडली होती. बेगमच्या अंत्यविधीच्या स्थलावर औरंगजेबानें एक सुंदर कबर बांधिली. ती अद्यापी आहे. तिच्या नांवावरून ब्रह्मपुरीस बेगमपुर असें नांव ठेवण्यांत आलें.

**९ बादशहाचा मांडलिक म्हणून शाहूची सुटकाः—** औरंग-

जेबाचे मृत्यूनंतर त्याच्या मुलांत दिल्लीच्या तख्ताबद्दल यादवी सुरू झाली. तो जिवंत असतांनाच अजीमशहा माळव्याचे सुभ्यावर निघून गेला होता. परंतु तो सुमारें वीस कोस निघून गेला असेल नसेल तोंच बादशहा मरण पावल्याची बातमी त्याला समजली. त्याबरोबर तो परत फिरला. बापाचे अंत्यविधि संपल्यानंतर अजीमशहा अहमदनगर येथें विधिपूर्वक तख्तनशीन झाला. त्यानें आपल्या नांवानें खुत्बा वाचविला आणि नाणींही पाडलीं. इतक्यांत त्याचा वडील भाऊ मुअज्जम हा उत्तरेंत राज्य आक्रमण करीत आहे अशी बातमी आल्यामुळें त्याच्याबरोबर लढण्याकरतां अजीमशहा उत्तरेकडे निघाला. त्याच्याबरोबर वजीर आसदखान व त्याचा मुलगा झुल्फिकारखान हे होते. शाहूराजे हेही त्यांच्याबरोबरच होते. पुढें अजीमशहा हांड्याजवळ नर्मदा उतरून माळव्यांत शिरला; तेव्हां त्याला अशी बातमी लागली कीं, ताराबाईनें महाराष्ट्रांतील बहुतेक किल्ले परत घेतले. त्या वेळेस पुण्याचा फौजदार लोदी-खान म्हणून होता, त्याचा पराभव करून धनाजीनें पुणें व चाकण हे परगणे घेतले. शाहू सर्व कुटुंबासह अजीमशहाच्या छावणींत होता. झुल्फिकारखान व शाहू यांचा चांगला स्नेह होता, इतकेंच नव्हे तर मुळापासूनच झुल्फिकार-खानाचें मन मराठ्यांविषयीं कडक नव्हतें. त्यानें अजीमशहाला असा सल्ला दिला कीं, शाहूस मराठ्यांचा राजा असें कबूल करून परत पाठविलें असतां, मराठे अगदींच स्वतंत्र न होतां त्यांचा थोडाबहुत बंदोबस्त होईल; आपसांत तंटे लागून त्यांची शक्ति कमी होईल; आणि मग मोंगलांच्या मुलखाला त्रास देण्यास त्यांना सवड मिळणार नाहीं. अजीमशहाला ही मसलत पसंत पडली आणि शाहूस पन्नास साठ लोकांनिशीं अजीमशहानें मोकळा करून परत दक्षिणेंत पाठविलें. त्यावेळीं खालीं दिल्याप्रमाणें अजीमशहानें शाहूशीं ठराव केला. ' तुम्हीं आपणांस दिल्लीच्या बादशहाचे अंकीत समजून राज्य करावें, तुमची आई, भाऊ मदनसिंग, संभाजीचा दासीपुत्र, व बायका यांस आम्हां-पाशीं ठेवावें; तसेंच तुम्हीं आपल्या राज्यांत जाऊन बंदोबस्त करावा, बखेडा करणारे लोकांचें पारिपत्य करावें; आणि बादशाही लक्षांत वागून इकडील

मुलखास उपद्रव देऊं नये. तुम्हीं याप्रमाणें वागतां अशी हुजूर खातरजमा झाली, म्हणजे आम्ही दिल्लीस गेल्यावर व तेथें सिंहासनारूढ झाल्यावर, तुमचीं माणसें तुम्हांकडे लावून देऊं; आणि तुम्हांस सरदेशमुखीचें उत्पन्न सहा सुभ्यांत चालतें, त्याची सनद, त्याचप्रमाणें सहा सुभ्यांच्या चोथाईची सनद देऊं; तसेंच बालेघाटावरील महाल, विजापुर व दौलताबादचे पादशाहींतील महाल, भीमा व गोदावरी यांचेमधील निम्मा मुलूख ह्यांतील बादशाही ठाणीं, किल्लेकोटसुद्धां, दरोबस्त तुम्हांस बक्षिस करून देऊं. तूर्त ' यांचें राज्य हे बंदोबस्तानें करितील, ' अशीं पत्रें आमचे सुभ्यांस देण्याकरतां तुम्हांपाशीं देतों. कर्नाटक, गोंडवण, गुजराथ, तंजावरचें राज्य ह्यांचा अंमल तुमचेकडे चालत आहे, तो तुम्हीं तसाच चालवावा; आणि नेहमीं बादशहाचे हुकुमांत वागून प्रसंग पडेल तेव्हां आपल्या फौजेनिशीं आम्हांस मदत करावी. ' याप्रमाणें करार करून वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे व दोनशे रांगडेस्वार त्याजबरोबर अजीमशहानें दिले, आणि पुढें जातांजातां फौजा जमा करीत जावें म्हणून सांगितलें.

**१० मोंगलांच्या छावणींतील शाहूराजे यांचा गौरवः—** एकंदरींत बादशहाचे प्रतिबंधांत असतां, शाहूनें प्रत्यक्ष बादशहाचीं व जवळच्या बहुतेक मंडळीची मर्जी चांगली संपादन केली होती. प्रत्येक इसम त्याला मदत करण्यास तयार होता. तो परत यावयास निघाला त्या वेळीं मोठमोठ्या मेजवान्या वगैरे करून निरोप दिला. त्यास चौतीस दिवसपर्यंत एकसारख्या मेजवान्या होत होत्या. जोधपूर, जयपूर, भरतपूर, उदेपूर येथील राजांनींही शाहूराजांना मेजवान्या दिल्या. त्या वेळीं सवाई जयसिंग वगैरे रजपूत राजे अजीमशहाच्या स्वारींत होते. शाहूचा व सवाई जयसिंगाचा घरोबा चांगला होता. दिल्लीपतीच्या मांडलिक क्षत्रिय राजांकडून शाहूराजांना अशा प्रकारच्या मेजवान्या होऊन त्यांची मोठ्या सन्मानानें दक्षिणेकडे जी पाठवणी करण्यांत आली त्यांत त्या मांडलिक राजेरजवाड्यांना एवढें आनंद मानण्यासारखें काय होतें हें एकदम लक्षांत येण्यासारखें नाहीं. या वेळीं मोंगलांच्या कैदेंतून फक्त

शाहूची मोकळीक झाली होती. त्याला दक्षिणेचें मराठ्यांचें राज्य मिळालें नव्हतें किंवा अजीमशहानें त्याला कोणतें राज्यही दिलें नव्हतें. मग एवढा शाहूराजांचा गौरव कां होत होता व शाहूराजे तो सन्मान कां घेत होते ? हे प्रश्न मुख्य आहेत. प्रत्यक्ष आईला सुद्धां मोंगलांच्या स्वाधीन ठेऊन शाहूराजे दक्षिणेंत आनंदानें रवाना होत होते; बादशहाचे अंकित व दिल्लीपतीचे मांडलिक म्हणून संतोषानें ते दक्षिणेंत यावयास निघणार होते, म्हणून दिल्लीपतीच्यां इतर मांडलिक राजांना आनंद आणि संतोष वाटला आणि त्यांनीं शाहूराजांना मोठमोठ्या मेजवान्या देऊन त्यांचा सन्मान केला; दिल्लीपतीच्या अंकित राहणें, त्यांचे मांडलिक होऊन त्यांची ताबेदारी पत्करणें हें मोठ्या सन्मानाचें द्योतक आहे असें इतर मांडलिकांना व शाहूराजांना वाटत होतें म्हणून परस्परांना आनंद झाल्यामुळें त्या मेजवान्यांचा थाट उडत होता. मेजवान्या देणारीं वरील रजपूत घराणीं दिल्लीपतीचे केवळ मांडलिकच नव्हते तर त्यांनीं अकबरपासून त्याही-पलीकडे आपली मजल नेली होती. त्यांनीं आपल्या मुलीही दिल्लीपतीला देऊन त्यांच्याबरोबर आप्तसंबंध जोडला होता. फक्त दक्षिणचे क्षत्रिय मराठे मात्र यापासून अगदीं अलिप्त होते. त्यांतून छत्रपति शिवाजी महाराज हे अगदीं सनातनी निघून त्यांनीं मुसलमानांची सत्ता झुगारून दिली होती आणि हिंदुपदपातशाहीची स्वतंत्र गादी दक्षिणेंत स्थापन केली होती. या अवतारी कार्यामुळें मोंगलांशीं समरस झालेल्या उत्तरेंतील क्षत्रियांना वैषम्य वाटलें व धार्मिक दृष्टीनें त्यांचा कस दाक्षिणेंतील मराठा क्षत्रियांपेक्षां कमी दर्जाचा ठरला. या प्रसंगीं हिंदुपदपातशाही स्थापन करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या प्रत्यक्ष नातवानें दिल्लीपतीचें मांडलिकत्व स्वीकारल्यामुळें आपण सर्व उत्तरेंतील व दक्षिणेंतील क्षत्रिय एका पातळीवर आलों म्हणून त्यांना आनंद झाला व त्याकरतां त्यांनीं शाहूराजांचा सन्मान केला. शाहूराजे बालपणापासून बाद-शहाच्या सोन्याच्या पिंजऱ्यांत वाढलेले असल्यामुळें त्यांना स्वातंत्र्याची निराळी कल्पना असणें अगर येणें शक्य नव्हतें. म्हणून दिल्लीपतीनें मांडलिक राजे म्हणून गौरव करण्यांतच मोठा सन्मान आहे अशी त्यांची कल्पना झाल्यामुळें

ते हा मेजवान्यांचा सन्मान घेत होते, असाच निष्कर्ष या मेजवान्यांच्या सन्मानापासून निघतो.

**११. बेगमची शाहूंना पुजेकरतां पंजाची भेटः—** शाहूराजे यांनीं निघतेवेळीं औरंगजेबाच्या कुटुंबांतील स्त्रियांच्या भेटी येतल्या. त्यावेळीं " बेगमेनीं जातेसमयीं बहुत खातरजमा केली. ' तुमचें राज्य तुम्हीं साधावें. पादशहाशीं वांकडें चालूं नये. सनदा वैगेरे देतील तें घ्यावें. तुम्हीं पादशहाचे नातूच आहां. आग्रह कोणताही न धरावा. ' म्हणून आपले पूजेंत पंजे होते ते दिल्हे, ' यांची भक्ती पूजा निष्ठेनें राखावी. तुमचा हिंदुधर्म, ' [ सबब ] यांचे पूजेस सैयद शाहामिया म्हणून हवालीं केलें. ' मजला यांची प्रसन्नता आहे. तुम्ही भक्ती करून सैयदापासून फात्या करावी व इमाम साहेबांच्या फात्या नैवेद्य, चिराग, दरगा मकान करून फकीर फुकरा मोहरम उत्साह चालवावें, सांगितलें. मोठे संकटीं यांस विसरूं नये. तुमची दौलत कायम चालेल. ' म्हणून सांगून निरोप दिल्हा. " ( थोरले शाहू महाराज यांचें चरित्र पान १० ) शाहूराजांना निरोप देतांना बेगम साहेबांनीं जी एक गोष्ट शिल्लक राहिली होती तिची पूर्णता केली. शिवाजी महाराजांचा स्वधर्म हा आत्मा होता. त्याच्या रक्षणाकरतांच स्वराज्याचा त्यांनीं सारा खटाटोप केला. तेवढ्याकरतांच त्यांनीं मुसलमानांचे मांडलिक म्हणवून घेणें ही मराठ्यांना शरमेची गोष्ट आहे असें ठरवून त्यांनीं तशा लोकांना प्रतिबंधांत घालण्याचा प्रयत्न केला. विरोधकांना शासनं दिलीं. असें असतां शाहूंनीं स्वतःस मोंगलांचे अंकित म्हणून कबूल केलें तें केलें आणि आतां बेगमच्या प्रसादानें देवपूजेऐवजीं पंजे पूजण्याची दीक्षा त्यांनीं घेतली. त्यामुळें देवी भवानी किंवा श्रीशंकर या दैवतांऐवजीं ' सैयद शाहामिया ' हा शाहूराजे यांच्या देवपूजेंत शिरला. एकंदरींत स्वधर्म, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य हीं तिन्हीं मराठ्यांचीं जिव्हाळ्याचीं तत्वें खची करून शाहुराजांना दक्षिणेंत पाठविण्यांत आलें. पिंजऱ्यांतील राघूचीं पिसें कापल्यानंतर तो जसा राघूपणाला नालायक ठरतो त्याचप्रमाणें औरंगजेबाच्या सोन्याच्या पिंजऱ्यांतील शाहूराजे

यांची अवस्था झाली. पूर्वीचें आपलें शिवाजी हें श्रेष्ठ नांव सोडून व 'शाहू' हें औरंगजेबानें नवीन ठेवलेलें नांव धारण करून, आणि मोंगली राजसत्तेच्या सनदा, पत्रें, परवाने वगैरेच्या अधिष्ठानाच्या रथांत आरूढ होऊन शिवाजी महाराजांचेच जेष्ठ नातू त्यांच्याच 'स्वराज्य' कल्पनेच्या अगदीं भिन्न चाकोरींतून मार्ग काढीत आपला वारसा हक्क संपादण्याकरतां दक्षिणेंत येऊं लागले.

---

# प्रकरण ८ वें

## ‘ शाहूराजांचें आगमन आणि वारसाहक्काचें स्पष्टीकरण ’

**१ शाहूराजांचें दक्षिणेंत आगमन. २ शाहूच्या फत्तेला प्रारंभ व फत्तेसिंग भोंसले. ३ ताराबाईचे उद्देश स्पष्ट करणारें पत्र व खुलासा. ४ मराठी राज्यावर खरा वारसाहक्क कोणाचा याची मीमांसा.**

**१ शाहूराजाचें दक्षिणेंत आगमन–** शाहूराजे इ. स. १७०७ च्या मेच्या आरंभीं नर्मदेच्या उत्तरेस नेमावर नजीक दोऱ्हा ह्मणून गांव आहे तेथून दक्षिणेस येण्याकरतां अजीमशहाच्या छावणींतून निघाले. ते सातपुड्याच्या डोंगरांतून बीजागड, सुलतानपुर या वाटेनें खानदेशांत आले. त्यांचेबरोबर मोरोपंत सबनीस, कृष्णाजी महादेव जोशी, गदाधरभट नाशीककर, व हिंदुस्थानी शुक्लजी ब्राह्मण मनरंजन करणार ही मंडळी होती. जोत्याजी केसरकर पातशाही ताकिदीचे कागद घेण्यास मागें ठेविला होता. तोही यांस येऊन मिळाला. बीजागड परगण्यांत मोहनसिंग जमीनदार फुंडाई करून होता, त्यास भेटून शाहूंनीं त्याजकडून द्रव्य, माणसें वगैरे मदत घेतली. मोहनसिंगानेंच शाहूची तजवीज पुढें सुलतानपूर नंदुरबारपर्यंत करून दिली. सुलतानपूर परगण्यांत तापी नदीचे उत्तरतीरीं कोकरमंडा नांवाचा किल्ला आहे. त्यांत अंबु पांडे नांवाचा गृहस्थ सुरतपासून बऱ्हाणपूर पर्वेतोंचा प्रदेश लुटून गब्बर झाला होता, त्यास शाहूंनीं सामील करून घेतलें; आणि तापी नदी उतरून नंदूरबारावरून ते धुळ्याचे वायव्येस सुमारें पंधरा मैलावर लांबकानीं येथें जूनच्या आरंभीं येऊन पोंचले. शाहूराजांचा सासरा रुस्तुमराव जाधव हाही

त्यांना येऊन मिळाला. लांबकानीचा जहागिरदार सुजनसिंग रावळ यानें शाहूराजांना भरपूर मदत केली. या लांबकानी गांवापासून शाहूराजांचा जम आस्ते आस्ते बसूं लागला.याच ठिकाणीं कित्येक मराठे सरदार आपला खरा धनी परत आला अशा भावनेनें येऊन मिळाले. त्यांत मुख्य परसोजी व बापूजी भोंसले हे उभयतां बंधु होते. यांचेच वंशज पुढें नागपूरकर भोंसले ह्मणून प्रसिद्धीला आले. हे दोघे बंधू आपल्या फौजेनिशीं शाहूराजांना येऊन मिळाल्यामुळें ते खरे राज्याचे धनी अशी लोकांची खात्री होऊन बागलाण भागांत वावरणारे हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे यांनीं शाहूराजांचा पक्ष स्वीकारला. त्याचप्रमाणें पिंगळे-पेशव्यांचा हस्तक पारोळ्याचा चिमणाजी दामोदर हाही शाहूराजांना मिळाला.

**२ शाहूच्या फत्तेला प्रारंभ व फत्तेसिंग भोंसलेः**— तेथून शाहूराजे खानदेशांत, चोरवड, कुसुंबी वगैरे ठिकाणीं मुक्काम करीत करीत अहमदनगरला ऑक्टोबर अखेरपर्यंत येऊन पोंचले. नगर हें महाराष्ट्रांतलें मध्य ठिकाण व प्राचीन राजधानीचें शहर आणि औरंगजेबाच्या महाराष्ट्रांतील स्वारीचें केंद्रस्थान असल्यामुळें शाहूराजे यांचे मनांत हीच आपली राजधानी करावी असें होतें. परंतु दक्षिणेचें हें नाक्याचें शहर आपल्या हातून जावें असें झुल्पिकारखान व बादशहा यांना वाटत नव्हतें. तेव्हां नगराहून शाहूराजांनीं ताराबाईबरोबर राज्यासंबंधीं वाटाघाट सुरू केली. परंतु त्या गोष्टीस त्यांचा विरोध आहे असें दिसून आल्यामुळें भीमा उतरून पलीकडे जाणें योग्य नाहीं म्हणून ते नगरच्या आसपास मुक्काम करून राहिले. ताराबाईच्या बरोबर लढा देण्याकरतां मराठे सरदार त्यांना आपल्या पक्षाला सामील करून घ्यावयाचे होते. शिवाय मोंगलांचें पाठबळही त्यांना पाहिजे होते. म्हणून ते भीमा उतरून खालीं दक्षिणेंत आले नाहींत. त्यांनीं नगरास औरंगजेबाच्या मृत्यूभूमीचें दर्शन घेतल्यानंतर ते मुद्दाम औरंगाबादेनजीक खुल्दाबाद ऊर्फ रोजा म्हणून बादशहाची कबर होती, तिचे दर्शनाला गेले. तेथें औरंगजेबाच्या थडग्याची त्यांनीं पूजा केली. ( खंड २ पान ८ ) तिकडे गेले असतानांच पारदच्या

युद्ध प्रसंग घडून आला. पारद हें गांव दौलताबादेच्या पंचेवीस मैलांवर शिवेर परगण्यांत आहे. तथें एक लहानशी गढी असून अंमल मोंगलांचा होता. शाहूराजे यांचे लोक सामान वगैरे आणण्यास गेले असतां गांवचे पाटलांनीं त्यांजवर गोळ्या झाडून मोंगलाई तर्फेनें गांव लढविला. त्यावरून शाहूराजे यांनीं हल्ला करून गांव मारून फत्ते केला. पाटील शहाजी लोखंडे पडला, ते समयीं पाटलाची स्त्री होती तिनें आपला मुलगा आणून शाहूराजांच्या पालखींत टाकिला; आणि म्हणाली कीं, 'यास वाचवावें, अन्यायी होते ते मारले गेले.' त्यावरून समाधान पावून मुलास व आईस आपले आश्रयास घेऊन, ठाणें फत्ते झालें, यास्तव मुलाचें नांव फत्तेसिंग भोंसले ठेविलें.

३ ताराबाईचे उद्देश स्पष्ट करणारें पत्र व खुलासाः— ताराबाई आणि शाहूराजे यांच्यामध्यें जो राज्याबद्दल कलह उत्पन्न झाला त्या संबंधीं ताराबाई यांचे काय उद्देश होते तें व्यक्त करणारें पत्र खालीं दिल्या-प्रमाणें आहे. 'स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्व जित्त. आश्विन शु. तृतीया, सोम्यवासरे, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणीं सोमनाईक देसाई व देशकुलकर्णी ता. सैतवडें यांसी आज्ञा केली ऐसीजेः राजश्री शाहूराजे ताम्रांचे निर्बंधांतून निघाले आहेत, ह्मणून हुजूर वर्तमान आलें. यैशास हें राज्य थोरल्या कै० स्वामींनीं बहुतां श्रमें मेळऊन, सर्वार्थें संपूर्ण केलें होतें. तें राजश्री संभाजीराजे काका यांगीं विध्वंसून कैलासवासी स्वामी राज्याधिकारी झाले. त्यांगीं स्वपराक्रमें नूतनच राज्य संपादिलें. स्वामींनीं त्याचें संरक्षण करून ताम्राचा पराभव केला. राज्याची अभिवृद्धि होत चालली. दुसरी गोष्ट हें राज्य थोरल्या कै. स्वामींनीं तीर्थस्व. कै. स्वामीस द्यावेसें केलें होतें. ऐसें असतां त्यांस या राज्याशीं संबंध नाहीं. त्या डोहणियांत जे मिळाले आहेत व मिळतील त्यांस नतीजा पाववायाची आज्ञा करून, रा. जयसिंग जाधवराऊ सेनापति व हंबीरराव मोहिते सरलष्कर व वरकड सरदारांस फौजेनशीं पाठ-विले आहेत. रा. परशराम पंडित प्रतिनिधि यांसही रवाना केलें आहे. ज्याचे अनुसंधान त्यांकडे लागलें असेल त्यांचा हे मुलाहिजा होणार नाहीं, शासन

करितील. तुम्हीं वतनदार एकनिष्ठ आहां. तुम्हांपासून अनसारखी वर्तणूक होणार नाहीं. परंतु शाहूराजे यांजकडील कागदपत्र तुम्हांस आले असतां कांहीं वर्तमान हुजूर लिहिलें नाहीं म्हणजे काय? त्यांकडून माणूस आले तेच कैद करून पाठवावयाचे होते. ते गोष्टी न केली. यामध्यें बरें काय विचारिलें आहे! याउपरी ऐसें करीत न जाणें. त्यांकडील कागदपत्र घेऊन माणूस येईल ते कैद करून हुजूर पाठवीत जाणें. कदाचित् कोण्हीही त्यांकडे अनुसंधान लावील, राब्ता राखेल, तरी त्याचा उबार राहणार नाहीं. तुम्ही अनसारिखा प्रसंग मनांत आणाल, कागदपत्र येईल तो पन्हाम कराल, तरी तुमचें बरें होणार नाहीं. वतनापासून दूर व्हाल हें जाणोन, स्वामीच्या पायांशीं निष्ठा धरून राहोन, लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. जाणिजे. मर्यादेयं विराजते. लेखन सीमा. सुरू सूद बार.' (मराठी रियासत मध्यविभाग १ पान ६. हें पत्र मावळंकर देसाई सेतवडेकर हल्लीं राहणार अंमदाबाद यांचे दप्तरांतील आहे. वि. ज्ञा. वि. १९२४ माहे फेब्रुवारी.) हें पत्र तारीख १७-९-१७०७ चें आहे.

या वेळीं राज्याचे धनी शिवाजीराजे अल्पवयी होते. त्यामुळें राज्याचा सर्व कारभार पूर्वीप्रमाणेंच ताराबाई पहात होत्या; तेव्हां वरील पत्र जरी श्री राजा शिवछत्रपति यांचे नांवें लिहिलें असलें तरी तें खुद्द ताराबाईचें होतें असें समजण्यास हरकत नाहीं. या पत्राचें स्वरूप ताकीदपत्राचें असल्यामुळें या सारखीं अनेक पत्रें त्या वेळीं अनेकांना गेलीं असतील यांत शंका नाहीं. अर्थात् या पत्रांत केलेलीं विधानें ताराबाई आणि त्यांचे राज्यचालक मंत्री यांच्या विचारविनिमयानें ठरलेलीं होतीं असें गृहित धरून चालण्यास हरकत नाहीं. कारण या पत्रावर नीळकंठ मोरेश्वर प्रधान व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि यांचे शिक्के आहेत. यावरून ताराबाईच्या स्वराज्यपक्षाचें म्हणणें काय होतें हें स्पष्ट दिसतें.

हें राज्य धर्माचें आहे, लोकांचें आहे ही भावना शिवाजी महाराजांच्या योजनेला आणि स्वराज्यसंस्थापनेच्या श्रीसमर्थांच्या वाण्याला अनुसरून

होती. स्वराज्याच्या हक्कासंबंधीं अगर वारसदारांसंबंधीं जो विचार करावयाचा असेल अगर त्यासंबंधीं न्यायान्याय निवडावयाचा असेल तर पहिल्यानें स्वराज्याचें हित कशांत आहे हा प्रधान हेतु जागृत ठेऊन त्याचा विचार करणें योग्य होईल. ताराबाई आणि शाहूराजे यांच्यामध्यें स्वराज्यासंबंधीं कलह उत्पन्न होऊन जो कुरुक्षेत्र-संग्राम माजला त्याची मीमांसा वरील शिवाजी महाराजांच्या कल्पनेला अनुसरून येथें करणें इष्ट आहे. त्याच्याशिवाय पुढील इतिहासाचा योग्यायोग्य संबंध लक्षांत येणार नाहीं. ताराबाईचा पक्ष सत्पक्ष होता असें म्हणणारे जसे इतिहासभक्त आहेत तसेच शाहूराजांचा सत्पक्ष होता असेंही प्रतिपादन करणारे इतिहासकार आहेतच. राज्याच्या वारसाहक्कदारांत ज्यावेळीं कलह माजतो त्या वेळीं राज्यांतील नोकरपेशाचे लोक आणि प्रजाजन यामध्येंही सत्पक्ष कोणता हें ठरविण्यासंबंधीं एकमेकांची दिशाभूल होऊं लागते व जो तो आपापल्यापरीनें कोणतातरी पक्ष सत्पक्ष आहे असें ठरवून त्या पक्षाला मिळतो. नोकर अगर प्रजाजन हे जे आपला सत्पक्ष म्हणून ठरवितात त्या वेळीं त्यांच्यापुढें स्वधर्म, स्वराज्य किंवा स्वातंत्र्य अशा उदात्त कल्पनेला वाहून घेण्याचें त्यांना कारण पडत नाहीं. कारण हा गृहकलह असल्यामुळें अच्या ठिकाणीं ब आला किंवा बच्या ठिकाणीं अ गेला म्हणून स्वराज्याच्या मूलभूत तत्वांना कोठेंच बाध येण्याचा संभव नसतो. अशा परिस्थितींत तादृश फायद्याकडे लक्ष वळणें हें अगदीं स्वाभाविक आहे. राजद्रोह किंवा धर्मद्रोह न करतां स्वार्थ साधणें हा कांहीं गुन्हा नाहीं. स्वार्थ हा जीवमात्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. म्हणून तो आपल्या स्वार्थाच्या दृष्टीनें जो पक्ष फायदेशीर दिसेल व जो पक्ष आपल्या कल्पनेप्रमाणें यशस्वी होईल असें त्याला वाटेल त्याची तो निवड करतो. अशा स्थितींत नोकर अगर प्रजाजन यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अपराध लादतां यावयाचा नाहीं. त्यांना स्वार्थी म्हणून दूषण देतां येणार नाहीं किंवा राजद्रोही म्हणतां येणार नाहीं. गृहकलहाच्या व्यवहारांत इतर जनांचा पक्ष पूर्ण निर्दोषी असतो.

**४ मराठी राज्यावर खरा वारसाहक्क कोणाचा याची मीमांसा**– राजापेक्षां राज्याचें आयुष्य जास्त असतें. एक राजा मरण पावतो. त्याच्या जागीं दुसरा राजा येतो. राजा मेल्यानें जर राज्यही मरत असेल तर तें खरें राज्यच नव्हे. राजाच्या मरणानें किंवा एकाच्या जागीं दुसरा राजा पदारूढ झाल्यानें राज्ययंत्रांत खंड न पडतां तें पूर्ववत् चालणें हेंच खऱ्या राज्याचें लक्षण आहे. ह्मणून हें राज्ययंत्र अखंड चालत रहावें ह्मणून शिवाजी महाराजांनीं अष्टप्रधानांची नेमणूक केली. हे अष्टप्रधान राजाचें व राज्याचें हित पाहणारे असें समजलें जात असे. या अष्ट प्रधानांच्या सल्ल्याप्रमाणें एक राजा मरण पावला किंवा एकादा राजा पदच्युत झाला तर त्याच्या जागीं दुसऱ्या राजाची स्थापना होत असे. स्थापना करण्यापूर्वी अष्टप्रधानांत कोणत्या राजाला सिंहासनारूढ करावें अगर न करावें यांत मत-भेद होईल. परंतु एकदां एकाला राज्याभिषेक झाला ह्मणजे मात्र त्याच्याविरुद्ध अष्टप्रधानांना राज्ययंत्र हांकतां येणार नाहीं. तसें झाल्यास ते राजद्रोही ठरले जातील. राज्याभिषेक हा वैदिक धर्मविधि आहे. एकदां उपनयन झालें ह्मणजे तें जसें पुन्हां करावें लागत नाहीं किंवा एकदां एका स्त्रीबरोबर वैदिक धर्मविधीनें लग्न झालें ह्मणजे तें जसें मोडतां येत नाहीं किंवा लग्न झाल्यावर कोणत्या तरी कारणानें स्त्रीपुरुषांत वैमनस्य होऊन तीं बऱ्याच काला पर्यंत पर-स्परांपासून दूर राहिलीं पण शेवटीं परस्परांत पुनः एकी होऊन तीं एकत्र झालीं म्हणून जसें त्यांचें फिरून लग्न करण्याचें कारण पडत नाहीं, किंवा एकदां यथाविधि दत्तविधान झाल्यानंतर तें जसें मोडतां येत नाहीं, तसेंच राज्याभिषेकाचें आहे. एकदां वैदिक मंत्रविधीनें एक गोष्ट घडून आली ह्मणजे ती बदलतां येत नाहीं. परिस्थिति बदलेल पण झालेले संस्कार बदलणार नाहींत. ताराबाईचा पुत्र शिवाजी यांना राज्याभिषेक झालेला होता. तो फिरविण्याचा अधिकार कोणालाही नव्हता. कोणी तसा प्रयत्न केला तर तो मात्र राजद्रोही ठरतो. अभिषिक्त राजाकडून अधर्माचें अगर प्रजाहित न साध-णारें कर्म होऊं लागलें तर मात्र प्रजेला राजास पदभ्रष्ट करण्याचा अधिकार

पोंचतो. परंतु तसा प्रमाद शिवाजीकडून झालेला नाहीं किंवा तसा प्रवादही नाहीं. अशा स्थितींत मराठी स्वराज्यावर शिवाजीचा खरा हक्क किंवा शाहूचा खरा हक्क याचा विचार करावयाचा आहे. त्याकरतां खालील मुद्दे विचारांत घेणें योग्य होईल.

१ ताराबाईच्या म्हणण्याप्रमाणें छत्रपति संभाजी महाराजांनीं छत्रपति शिवाजी महाराज यांनीं संस्थापिलेलें स्वराज्य विध्वंसिलें काय ?

२ संभाजी महाराजांचे वधानंतर राजाराम महाराजांनीं नूतन राज्य संपादिलें कीं काय ?

३ शिवाजीराजे किंवा त्यांची पालकर्ती आई ताराबाई ही स्वराज्य चालविण्यास नालायक होती कीं काय ?

४ शाहूराजे शिवाजी राजापेक्षां स्वराज्यावर आपला अधिकार सांगण्यास जास्त पात्र ठरतात कीं काय ?

५ स्वराज्याच्या मूलभूत तत्वांचें पालन होऊन व त्याला अनुसरून स्वराज्याचें संरक्षण आणि संवर्धन कोणत्या राजामुळें अधिक होणार होतें ?

या मुद्यांचा विचार केला म्हणजे खरा स्वराज्याचा वारस कोण होता हें लक्षांत येईल. पहिला मुद्दा छत्रपति शिवाजी महाराज यांनीं संस्थापन केलेलें स्वराज्य संभाजी महाराजांनीं विध्वंसिलें कीं काय असा आहे. औरंगजेब दक्षिणप्रांत जिंकण्याकरतां स्वतः दक्षिणच्या स्वारीवर आला. त्यानें विजापूर व गोंवळकोंडें हीं दोन मुसलमानी राज्यें पादाक्रांत केलीं. त्यानंतर तो मराठी राज्य काबीज करण्याच्या उद्योगाला लागला. औरंगजेबानें संभाजी महाराजांबरोबर युद्ध करून आणि प्रसंगविशेषीं आपल्या कपटनीतीचा उपयोग करून घेऊन शिवाजी महाराजांनीं संपादन केलेले किल्ले हस्तगत केले. चारी बाजूंनीं स्वराज्याचा मुलूख आक्रमण करून उध्वस्त केला. संभाजी महाराजांना कैद करून त्यांचा वध केला. स्वराज्याची राजधानी जो रायगड किल्ला तो हस्तगत केला. संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई व पुत्र शिवाजी यांना कैद केलें. रायगड लुटला. औरंगजेबाच्या सरदारांनीं तेथील 'शिवाजीचें सिंहासन फोडून.

शिवाजीनें मोठ्या कष्टानें जमा केलेली मराठशाहींतील पुष्कळ संपत्ति नेऊन बादशहाचे हवालीं केली.' ( मराठी रियासत भाग पान ६१७ ). हा मागील सर्व इतिहास लक्षांत घेतला ह्मणजे संभाजी महाराजांनीं आत्मनाश, राज्यनाश, व सर्वस्वनाश, अर्थात स्वराज्यविध्वंसन केलें यांत मुळींच शंका राहत नाहीं. हा स्वराज्यनाश होण्याचा प्रसंग केवळ दैवदुर्विपाकामुळें आला असें ह्मणावें तर तसेंही नाहीं. ही आपत्ति संभाजी महाराजांनीं आपल्या दुर्गुणामुळें ओढवून घेतली. ' राजा या नात्यानें संभाजी नालायक ठरतो ' ( मराठी रियासत भाग २ पान ६०३ ) अशी कबुली शाहूपक्षाची प्रामुख्यानें तरफदारी करणारे रियासतकार देतात. एकंदरींत संभाजी महाराजांच्या दुष्कृत्यावर व त्यामुळें झालेल्या राज्यनाशावर कितीजरी सोनेरी मुलामा चढविण्याचा प्रयत्न केला तरी ताराबाईच्या विधानाप्रमाणें त्यांनीं राज्यविध्वंस केला नाहीं असा नवीन इतिहास नव्यानें कांहीं निर्माण करतां येणार नाहीं. तसेंच शिवाजी महाराजांनीं स्वराज्यसंस्थापना केली त्यांत संभाजी महाराजांचे कांहीं श्रम खर्च झाले असें ह्मणावें तरी तसाही ऐतिहासिक पुरावा नाहीं. उलटपक्षीं संभाजी महाराजांनीं मोंगलांची चाकरी पतकरून स्वराज्यनाशाचा प्रयत्न केला व या अपराधाबद्दल त्यांना पन्हाळ्यावर बंदिवासांत रहावें लागलें हाही इतिहास मागें आलाच आहे. संभाजी महाराजांच्या या स्वराज्याविरुद्ध केलेल्या प्रयत्नामुळें ते सिंहासनारूढ होण्याला नालायक ठरले,म्हणूनच राजारामाला शिवाजी महाराजांच्या अखेरच्या इच्छेप्रमाणें सोयराबाईनीं सिंहासनीं बसविलें. अशी वस्तुस्थिति असतां मूलतः संभाजी महाराजांचा राज्यावरील हक्कच नाशावीत होतो. परंतु त्याचा प्रस्तुत मुद्याशीं संबंध नाहीं. परंतु स्वराज्यविध्वंसन करण्याचा धर्म शिवाजी महाराजांच्या वेळेपासून संभाजी महाराजांच्या अंगीं खेळत होता व तोच पुढें वाढत जाऊन त्यांनीं स्वराज्यविध्वंसन केलें या ताराबाईच्याच विधानाला त्यामुळें पुष्टी येते. एकंदरींत शिवाजी महाराजांनीं संस्थापिलेलें स्वराज्य संभाजी महाराजांनीं विध्वंसन केलें हें स्पष्ट होतें.

दुसरा मुद्दा असा आहे कीं, संभाजी महाराजांच्या वधानंतर राजाराम

महाराजांनीं नूतन राज्य संपादिलें कीं काय ? राजाराम महाराज संभाजी महाराजांच्या वधानंतर रायगडाहून कांहीं मंडळी घेऊन जिंजीकडे रवाना झाले. त्यांच्या बायकाही त्यांना आपल्याबरोबर नेतां आल्या नाहींत. केवळ शत्रूपासून प्राण रक्षण व्हावें याकरतां जंगम, लिंगायत, कापडी असे वेषांतर करून अनंत संकटांना तोंड देऊन ते जिंजीला आले. त्या वेळीं राजाराम महाराजांच्या जवळ छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांचे पुत्र या जन्मसिद्ध हक्काव्यतिरिक्त दुसरी कोणतीच धनदौलत नव्हती. त्यांनीं बिनभांडवली स्वराज्यसंपादनाचा उपक्रम जिंजीला केला. औरंगजेबाला शह देण्याकरतां नवीन राज्यपद्धतीची मांडणी केली. स्वराज्य याचा हक्कदार केवळ एकटा राजा नसून तें पराक्रमी प्रजाजनांचेंही आहे ही भावना राजाराममहाराजांनीं पहिल्यानें निर्माण केली. स्वामीभक्त आणि पराक्रमी पुरुषांना वतनें, जहागिरी, सरदाऱ्या, किताब वगैरे देऊन त्यांच्या ठिकाणीं स्वराज्य हें आपलें आहे ही भावना त्यांनीं उत्पन्न केली आणि प्रत्येक पराक्रमी व होतकरु मराठ्याला आपला स्वाभिमान, स्वराज्याभिमान, आणि धर्माभिमान दाखविण्याला नवीन क्षेत्र आणि मार्ग उत्पन्न करून दिले. त्यामुळें भराभर मराठे वीर राजाराम महाराजांच्या छत्राखालीं अहमहमिकेनें गोळा होऊं लागले. राजाराम महाराजांच्या या नवीन स्वराज्यसंपादनाच्या उपक्रमामुळें सर्व महाराष्ट्रभर एकदम नवचैतन्य उत्पन्न झालें आणि औरंगजेबाच्या टोळधाड स्वारीमुळें लुप्तप्राय झालेलें मराठ्यांचें शौर्य व विस्कळित झालेली मराठ्यांची संघटना एकदम फोफावून बाहेर पडूं लागली. राजाराम महाराजांची सुमारें अकरा वर्षांची तपश्चर्या अशा प्रकारें नूतन राज्य संपादण्यांत खर्च झाली. राजाराम महाराजांनीं छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याचें संरक्षण केलें नाहीं, तर त्यांनीं स्वराज्याची पुनर्प्राणप्रतिष्ठा केली. त्यांनीं नूतन राज्य संपादिलें हें ताराबाईचें विधान त्रिवार सत्य आहे.

एकदां राजाराम महाराजांनीं औरंगजेबाकडे शाहूराजांच्या सुटकेबद्दल मागणी केली. त्यावेळीं औरंगजेबानें शाहूराजांना म्हटलें "राजे, तुमचे वडील मारिले असतां तुम्ही बहुत नेकीनें चालतां; तुमचे चुलते यांणीं सर्व तुमचें

राज्य, दौलत आटोपून आम्हांशीं लढतात, त्यास तुम्हांस त्यांजकडे लावून देतों; जावें. " बोलिले. तेव्हां यांणीं उत्तर केलें जे, " पूर्वीही आमचे वडील असतां त्यांस नजरबंदींत ठेवून राज्य आपण करावें, ऐसा विचार करून केलें होतें. यानंतर आह्मांस आमचे इलाखासुद्धां रायगडीं टाकून आपले कबिलेसुद्धां निघून गेले. आह्मीं त्यांजकडे गेलों असतां आह्मांस नजरबंद ठेवतील. आपण त्यांचें पारिपत्य करून आह्मांस राज्यावर बसवितील तेव्हां राज्य करूं. " ( थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र पान ५). असे शाहूराजांनीं आपले विचार औरंगजेबाला प्रकट केले. शत्रु-गृहीं शाहूराजे वाढल्यामुळें त्यांची विचारसरणी कशी उलट दिशेनें वाहत जात होती याचें प्रत्यंतर वरील औरंगजेब व शाहूराजे यांच्या संभाषणावरून दिसून येतें. प्रत्यक्ष बापाचा अमानुष रीतीनें वध करणाऱ्या औरंगजेबाच्या रुमालाच्या देणगीला देवासमान मानून त्याची पूजा करणें, औरंगजेबाच्या कबरीचें व त्याच्या मृत्यूभूमीचें देवळांतील देवाप्रमाणें दर्शन घेणें ही शाहूराजांची कृति लक्षांत घेतली ह्मणजे शत्रूच्या घराच्या अन्नाचा त्यांच्यावर केवढा प्रखर परिणाम झाला होता याचा अंदाज लागतो. त्याचप्रमाणें राजाराम महाराजांनीं शत्रूच्या नक्रदाढेंत गेलेलें स्वराज्याचें माणिक स्वपराक्रमानें पुनः ओढून बाहेर काढलें असतां ' सर्व तुमचें राज्य दौलत आटोपून आह्मांशीं लढतात. ' अशा ' चोराच्या उलट्या × ×' मारून शाहूराजे यांचा बुद्धिभेद होण्याचें विपर्यस्त शिक्षण औरंगजेबाकडून मिळाल्यामुळें शाहूराजे मराठी राज्यावर आपला वारसा सांगूं लागले. औरंगजेब जिवंत असेपर्यंत शाहूंना वारसाहक्कानें मराठी राज्यावर यावयास नको होतें. त्यांना मराठ्यांचें पारिपत्य होऊन औरंगजेबाची देणगी म्हणून मराठ्यांचें राज्य पाहिजे होतें. ' आह्मांस राज्यावर बसवितील तेव्हां राज्य करूं ' या वाक्यांत शाहूराजे यांचें सर्व हृद्गत सांठवलेलें आहे. औरंगजेबाच्या दुर्दैवानें त्याला मराठ्यांचें आणि ताराबाईचें पारिपत्य करतां आलें नाहीं. उलट त्यांच्याकडून स्वतःचा पराभव झाल्याचें मरण स्वतःच्या डोळ्यांनीं पहावें लागलें व त्यांतच त्याला खरें मरणही आलें. त्यामुळें औरंगजेबाच्या करवीं राज्य मिळविण्याची

शाहूराजे यांची इच्छा नष्ट झाली. पुढें औरंगजेबाच्या पुत्रांत दिल्लीच्या तख्ताकरतां रणें माजणार याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागल्यामुळें मोंगलांच्या मुलुखाला मराठ्यांचा उपसर्ग पोंचूं नये, त्यांची शक्ति आपसांत लढण्यांत खर्च व्हावी या मुत्सद्दी डावा करतां शाहूराजे यांची मुक्तता अजीमशहानें केली. तेव्हां कोणत्याना कोणत्यातरी कारणानें शाहूराजांना ताराबाईबरोबर कलह उत्पन्न करावयाचा होता व तो उत्पन्न करण्याची शिकवणुक मोंगलांच्या छावणींतून त्यांना बंधमुक्ततेच्या वेळीं मिळाली होती. लांडगा व कोंकरूं यांच्या कलहांतील ' तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील ' या न्यायाला अनुसरून या वेळीं शाहूराजे यांनीं वारसा हक्काच्या सर्पाचें पिलूं मराठ्यांच्या पायांत मुद्दाम सोडल्यामुळें राजाराम महाराजांनीं नूतन राज्य संपादिलें होतें हेंच खरें ठरतें. वारसा हक्काचा प्रश्न केवळ मराठयांची दिशाभूल करून कलहाग्नी पेटविण्या पुरताच होता हें स्पष्ट आहे.

तिसरा मुद्दा शिवाजीराजे किंवा त्यांची पालनकर्ती आई ताराबाई हीं स्वराज्य चालविण्यास नालायक होतीं किंवा काय असा आहे. शिवाजी राजे हे अल्पवयी असल्यामुळें ते केवळ नामधारी छत्रपति होते. त्यांच्यावर राज्य कारभाराचा कांहीं भार नसल्यामुळें त्यांच्यासंबंधीं लायकी अगर नालायकी याचा प्रश्नच राहत नाहीं. आतां त्यांची पालनकर्ती व राज्यसूत्रधारा ताराबाई यांच्याबद्दल लायकी नालायकी पहाणें झाल्यास त्यांच्या कट्टर शत्रूलाही त्यांना पूर्ण लायकीचें शिफारस पत्र द्यावें लागेल. औरंगजेबासारखा कर्दनकाळ आपलें सर्व लष्करी सामर्थ्य; आपला आजपर्यंतचा कीर्तिध्वज आणि आपलें सार्वभौम ऐश्वर्य पणाला लावून सतत सात वर्षें ताराबाईंना जिंकण्याचा निर्वाणीचा प्रयत्न करीत होता. त्याचप्रमाणें मराठयांना भेदनीतीनें दुभंग करण्याकरतां शाहूराजांचें सुदर्शनचक्रही औरंगजेबानें दोन वेळां त्यांच्यावर सोडलें तरी त्यालाही दाद न देतां ज्या स्त्रीनें मराठ्यांची एकजूट कायम राखिली आणि शेवटीं औरंगजेबाला ' त्राहिभगवन् ' करून सोडून त्याला मराठ्यांचें राज्य बुडविण्याचा नाद सोडून देण्यास जिनें भाग पाडिलें; त्या

मोंगलमर्दिनी ताराबाईच्या लायकीचें आणखीं दुसरें कोणतें शिफारसपत्र पाहिजे ? औरंगजेबाच्या हाताखालीं अजीमशहा, झुल्पिकारखान, कामबक्ष, तर्बियतखान, सर्जाखान, बेदरबख्त, फत्तुल्लाखान वगैरे नामांकित सरदार आणि शहाजादे व स्वतः बादशहा अशांशीं सात वर्षें सतत लढूनही ज्या स्त्रीनें हार न घेतां अशा प्रचंड शत्रूला नामोहरम करून पिटाळून लाविलें त्या स्त्रीची योग्यता काय असेल हें केवळ शाई टाकाशीं युद्ध करणाऱ्या लेखकांना समजणार नाहीं. एकादें सामान्य साहित्य संमेलन भरवून तें यशस्वी रीतीनें पार पाडून न्यावयाचें झालें तर या लेखणीबहादुरांची कोण तारांबळ उडते ! मोटारीसारखीं शीघ्रगतीचीं वाहनें त्यांना मिळालीं नाहींत किंवा चहा, चिवडा, भजीं, इडली, दोसे यांचा खुराक त्यांना लाभला नाहीं म्हणजे त्यांचा मेंदू करपून जातो. पंचपक्वांनांचें भोजन मिळालें नाहीं किंवा पलंग मच्छरदाणी लाभली नाहीं तर त्यांच्या तैलबुद्धीचा चिराख होतो. राहण्याला हवाशीर जागा, दिमतीला मुबलक स्वयंसेवक, करमणुकीला नाटकें, सीनेमा, जलसे, रेडियो वगैरे साधनें; हीं जर नसतील तर त्यांच्या कर्तबगारीचें दिवाळें निघतें. हा साहित्य संमेलनसंग्राम अवघ्या एकदोन महिन्याचाच असतो. त्यांत देणग्या मागावयास जाणारे लोक दमतात; तंबु उभारणारे लोक श्रमीं पडतात; वक्ते, लेखक, बातमीदार थकून जातात; रेलवेच्या पहिल्या अगर दुसऱ्या वर्गातून किंवा मोटारीच्या सुखकर वाहनांतून प्रवास करूनही ज्यांना थकवा येतो अशा सर्व लढवय्या सरदारांचा श्रमपरिहार होण्याकरतां निरनिराळे अल्पोपहार किंवा मेजवान्या देऊनही अगर दवापाण्याचा मारा करूनही पुढें कित्येक दिवस त्यांचा हा थकवा जात नाहीं. अशा कलमबहादुरांना ताराबाईच्या सात वर्षांच्या प्रखरतर तपश्चर्येची कल्पना येणार नाहीं. आणि म्हणूनच असे लेखक ताराबाईना स्वार्थी, महत्वाकांक्षी, हट्टी, दुराग्रही गृहकलहउत्पादनीं, अशाप्रकारचीं निंदाव्यंजक विशेषणें देऊन त्यांचा उपहास करण्याचा प्रयत्न करतात. यावरून त्यांना त्या काळाशीं व परिस्थितीशीं समरस होतां आलें नाहीं असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. वयाच्या ऐन

पंचेविसाव्या वर्षी राजाराम महाराजांसारखा उदयोन्मुख पति अस्तंगत होऊन भावी वैभवाच्या आकांक्षा ज्या स्त्रीच्या करपून गेल्या होत्या; धनाजी आणि संताजी यांच्यासारख्या खंद्या मराठ्या वीरांत चुरस लागून संताजी सारखा महारथी योद्धा मारला गेल्यामुळें लष्करी सामर्थ्य निम्में कमी झालें म्हणून काळजीनें ज्या विव्हल झाल्या होत्या; स्वतःचें शील व घराण्याचा लौकिक राखण्याची व बाळराजे शिवाजी व संभाजी यांचें पालन आणि रक्षण सवती-मत्सराच्या कात्रींतून करण्याची आणि अष्टप्रधानांमध्यें आपसांतील मत्सराचा अंगार भडकूं न देण्याच्या खबरदारीची अहर्निश चिंता ज्यांना भाजून काढीत होती अशा असिधाराव्रताच्या परिस्थितींत ताराबाईंनीं स्वराज्याचें संरक्षण आणि संवर्धन केलें ही गोष्ट सामान्य लायकीची नाहीं. ही ताराबाई-ची सात वर्षांची कारकीर्द महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्ण अक्षरांनीं लिहून ठेवण्याच्याच योग्यतेची आहे. ताराबाईच्या छत्राखालीं कांदा भाकरीवर भूक भागवून, एकादें लहानसें घोडें व एकादी घोंगडी याच्यावर संतुष्ट राहून व तहान, ऊन झोंप याची पर्वा न करतां औरंगजेबानें महाराष्ट्रांत पेटविलेल्या रणकुंडांत आत्मबळी देणाऱ्या मराठा वीरांची धन्य आहे आणि त्याबरोबरच त्यांच्या नेत्या ताराबाईची आहे यांत शंका नाहीं. स्वराज्याची व स्वधर्माची सेवा करण्यांत ताराबाईचें रक्त किती आटलें असेल, किती करपलें असेल याची जाणीव शत्रूच्या सोन्याच्या पिंजऱ्यांत मऊमऊ गाद्यांवर सतत अठरा वर्षे पहुडणाऱ्या आणि विलासी उपभोगाच्या साधनांत लोळणाऱ्या शाहू राजांना खात्रीनें येणार नाहीं. मग त्यांचे पक्षपाती म्हणविणाऱ्यांना तरी कोठून येईल ? एकंदरींत तिसऱ्या मुद्याचा विचार करतां छत्रपति शिवाजी महाराजां-च्या स्वराज्य स्थापनेच्या तत्वांच्या चाकोरींतून ताराबाई स्वराज्याचा रथ पूर्ण लायख अशा सारथ्याप्रमाणें बरोबर हांकीत होत्या हेंच खरें ठरतें.

चवथा मुद्दा असा आहे कीं, शाहूराजे शिवाजीराजापेक्षां स्वराज्यावर आपला अधिकार सांगण्यास जास्त पात्र ठरतात कीं काय ? आणि ती पात्रता राज्यक्रांति घडवून आणण्या इतकी श्रेष्ठ दर्जाची आहे काय ? शाहूराजे हे छत्र-

पति शिवाजी महाराज यांच्या वडील पुत्राचे ह्मणजे छत्रपति संभाजी महाराजांचे पुत्र असल्यामुळें शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेल्या व संभाजी महाराजांनीं उपभोग घेतलेल्या राज्याचे शाहूराजे धनी होतात हा सरळ आणि सर्वमान्य शास्त्रार्थ आहे यांत शंका नाहीं. या दृष्टीनें धाकटे शिवाजी राजे यांचा वारसा हक्क राज्यावर पोंचत नाहीं. राजाराम महाराजांची दृष्टीही याच भावनेची होती असें दिसतें. रायगडावर असतांना राजाराम महाराजांची शाहू राजावर प्रीति होती. ( मराठी रियासत भाग २ पान ६१४ ) पुढें शाहूराजे बंदिवान् होऊन शत्रूच्या ताब्यांत गेले तरी त्यांना सोडवून आणण्याचा प्रयत्न राजाराम महाराजांनीं दोन वेळां केला; परंतु तो सफळ झाला नाहीं. शाहूराजे राज्याचे धनी असल्यामुळें त्यांच्या गैरहजेरींत स्वराज्याचें यंत्र बंद पाडतां येत नाहीं ह्मणून राजाराम महाराजांनीं मंचकारोहण केलें. विधिपूर्वक राज्याभिषेक करून घेतला नाहीं. राजाराम महाराजांच्या पश्चात् त्यांचा मुलगा शिवाजी याला राज्याभिषेक करण्याचा प्रश्न ताराबाईनीं उपस्थित केला, त्यावेळीं राजाराम महाराजांना स्वराज्याच्या कामीं तन–मन–धनें करून मदत करणारे रामचंद्रपंत अमात्य यांनीं ' आजच घाई काय आहे, शाहू व शिवाजी यांच्या मुंजी एकदम करूं ' असें उत्तर दिलें. यावरून रामचंद्रपंत हेही शाहू-राजांचा धनीपणाचा हक्क मानीत होते असें ठरतें. शाहूराजे यांचा स्वराज्या-वरील धनीपणाचा हक्क व त्यांची पात्रता दाखविणारा एवढाच पुरावा शाहूराजांच्या पक्षाभिमानी इतिहासकारांकडून याप्रमाणें पुढें येतो.

ताराबाईच्या पक्षाभिमानी इतिहासकारांकडून पुढीलप्रमाणें पुरावा येतो. ' शास्त्रीय हक्क शाहूचा असला, तरी साक्षात् हक्क शाहूचा नव्हता. राजारामानें अतीव कष्ट सोसून मराठेशाहीचें संरक्षण केल्यामुळें त्यास साक्षात् हक्क प्राप्त झाला, व तो हक्क त्याचे कुटुंबांत वंशपरंपरागत चालणें हेंच राजारामाच्या श्रमाचें उत्तम बक्षिस होय. शाहूचे बापानें मराठेशाही बुडविली. प्रत्यक्ष शाहू स्वपराक्रमानें सुटून आला नाहीं, व शेवटीं आला तो तरी मोंगलांचें दास्य पत्करून व मोंगलांनीं दिलेलें शाहू हें अपूर्व अभिधान धारण करून

आला. ताराबाईनें राजारामाचे पश्चात् सात वर्षे युद्धाचें काम नेटानें चालविल्यामुळें,तिला शास्त्रीय हक्क मिळाल्यासारखाच झाला.' ( मराठी रियासत भाग २ पान ७४० ) अशा प्रकारें शाहूचा पक्ष व ताराबाईचा पक्ष यांमधील हक्कासंबंधींची कलहाची रूपरेषा आहे. परंतु एवढ्यावरून राज्याच्या धनीपणाचा हक्क न्याय्यबुद्धीनें कोणाकडे जातो याचा निवाडा होत नाहीं. तो निवाडा करणें झाल्यास आणखींही दुसऱ्या पुष्कळ गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील.

( १ ) ताराबाईचें मुख्य विधान असें आहे कीं, छत्रपती शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेलें राज्य संभाजी महाराजांनीं बुडविलें असून सांप्रत शिवाजीराजे ज्या राज्यावर आहेत तें राज्य राजाराम महाराजांनीं नूतन संपादिलेलें आहे. या विधानाचा विचार मुद्दा नं. २ मध्यें झालेला आहे. राजारामानीं राज्याचें रक्षण केलें नाहीं तें नूतन संपादन केलें हें ताराबाईनीं स्वकृतीनें यथार्थ आणि शास्त्रशुद्ध पद्धतीनें ठरवून घेतलेलें होतें. शिवाजी महाराजांनीं रायगडावर संस्थापिलेलें स्वराज्याचें सिंहासन सन १६९० मध्यें मोंगलांनीं फोडून टाकलें. त्यानंतर बारावर्षांनीं पन्हाळ्यावर नवीन सिंहासन निर्माण करून ताराबाई यांनीं बालराजे शिवाजी यांना यथाविधी राज्याभिषेक केला. संभाजी महाराजांनंतर पूर्वीचें सिंहासन फोडलें जाऊन व छत्रपति शिवाजी महाराजांची रायगडावरील संपत्ति लुटली जाऊन आणि राजधानीचा रायगड किल्लाही शत्रूच्या हस्तगत होऊन बारावर्षांनंतर ज्याअर्थी दुसऱ्याच ठिकाणीं नवीन सिंहासन स्थापून बालराजे शिवाजी यांना राज्याभिषेक झाला त्याअर्थी ताराबाईच्या विधानाप्रमाणें राजाराम महाराजांनीं नूतन राज्य संपादिलें होतें हेंच खरें ठरतें. अर्थात् राजाराम यांनीं नूतन संपादिलेल्या राज्यावर शाहूराजे यांचा कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क पोंचत नाहीं हीच गोष्ट सशास्त्र आणि व्यवहार्य ठरते.

(२) राजाराम महाराजांनीं नूतन राज्य संपादिलें होतें. त्यांची शाहूराजांवर प्रीति होती. औरंगजेबाच्या कैदेंतून शाहूराजांना सोडविण्याचा त्यांनीं

दोन वेळ प्रयत्न केला परंतु तो साध्य झाला नाहीं. तरीपण तो साध्य झाला असता असें गृहीत धरून चालल्यास राजाराम महाराजांनीं त्यांनाच राज्यावर बसवून राज्याभिषेक करविला असता हीही गोष्ट गृहीत धरून चालण्यास हरकत नाहीं. राजाराम महाराजांनीं संपादन केलेल्या प्रत्येक गोष्टीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार त्यांना होतांच. परंतु ज्या अर्थीं बक्षिस, देणगी स्वरूपानें तशी विल्हेवाट राजाराम महाराजांनीं लाविली नाहीं अगर त्यांना लावतां आली नाहीं त्या अर्थीं शिवाजीराजे हेच त्यांच्या नूतन संपादिलेल्या राज्याचे वारस हक्कदार ठरतात.

(३) शाहूराजांची शिवाजी महाराजांनीं संस्थापिलेल्या राज्याबद्दल मागणी होती. हें राज्य ह्मणजे हिंदुपद्पातशाही होय. हें स्वराज्याचें सिंहासन परकीय सत्ता झुगारून केलेलें होतें. पूर्ण स्वतंत्र असें प्रस्थापित झालेलें होतें. त्या सिंहासनावर स्वतंत्र राजाच बसूं शकत होता. मांडलिक अगर दुसऱ्या राज्याचा अंकित ह्मणून त्या सिंहासनावर बसण्याचा कोणाला अधिकार पोंचत नव्हता. राजाराम महाराजांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं शाहूराजांना जर औरंगजेबाच्या कैदेंतून सोडवून आणलें असतें अगर शाहूराजे स्वपराक्रमानें छत्रपति शिवाजी महाराजाप्रमाणें शत्रूच्या बंदिवासांतून मुक्त होऊंन आले असते तरच त्यांना त्या स्वराज्याच्या सिंहासनावर बसतां आलें असतें. तसें ज्या अर्थीं झालें नाहीं उलट शाहूराजे दिल्लीपतीचे अंकित होऊन ज्या अर्थीं राज्यावर वारसा हक्क सांगूं लागले त्या अर्थीं तो हक्क त्यांना न्यायानें मिळूं शकत नाहीं.

(४) हिंदुपद्पातशाही ही हिंदुधर्माचें आणि हिंदुप्रजेचें रक्षण करण्याकरतां संस्थापिलेली होती. शाहूराजे यांना त्यांच्या बालवयापासून सतत अठरा वर्षेपर्यंत हिंदुधर्माचें वारेंही नव्हतें. त्यांनीं आपलें शिवाजी हें नांव सोडून औरंगजेबानें ठेवलेलें शाहू हें नांव धारण करून ते आले होते. त्यांच्या नित्य पूजेंत औरंगजेबानें बहाल केलेला हातरुमाल, बेगमसाहेबांनीं पूजा करण्याकरतां दिलेले सैयद शाहामियाचे पंजे ठेवलेलें होते. शिवाय ' इमामसाहेबाच्या फात्या नैवेद्य, चिराग, दरगा मकान करून फकीर फुकरा मोहरम उत्साह ' चालवि-

ण्याची मुसलमानी दीक्षा घेऊन ते आलेले होते. तसेंच औरंगजेबाचे पायमोजे स्वहस्तानें उचलून देऊन त्या दास्य सेवेंत समाधान मानण्याची प्रवृत्ति बनलेले व औरंगजेबाच्या मृत्यूभूमीचें आणि कबरीचें दर्शन घेऊन त्यांत मनाला पावित्र्य मानणारे असे शाहूराजे बनून गेलेले होते. त्यामुळें मंगलप्रद अशा हिंदुधर्माच्या गादीवर–हिंदुपदपातशाहीच्या सिंहासनावर बसण्यास खात्रीनें लायक राहिले नव्हते.

[५) निसर्ग धर्माला अनुसरूनच धार्मिक अगर व्यावहारिक बंधनें समाजांत रूढ होतात. पक्षी हे मानव जातीची सत्ता न मानणारे पूर्ण स्वतंत्र असे आहेत. ते टोळ्याटोळ्यांनीं राहतात. मानवी जात ही करमणुकप्रिय असल्यानें राघु, मैना वगैरे पक्षी फांसे टाकून पकडतात. व त्यांना पिंजऱ्यांत पाळतात. माणसाच्या सहवासाची गोडी लागण्यापूर्वी तो राघू जर पिंजऱ्यांतून उडून गेला तर त्याला पूर्ववत् त्याच्या समाजांत-त्याच्या टोळींत स्थान मिळतें. मैना, तित्तर, चिमण्या वगैरे पक्षांचेंही असेंच आहे. परंतु पकडून पिंजऱ्यांत कांहीं काल गेल्यानंतर आणि मनुष्याच्या सहवासाची गोडी उत्पन्न झाल्यानंतर जर ते पक्षी मनुष्याच्या प्रतिबंधांतून मुक्त होऊन आपापल्या टोळयांत जाऊन मिळूं पहातील तर त्यांना त्यांचेच जातभाई चोंची मारून मारून ठार करून टाकतील. याचा भावार्थ एवढाच कीं, स्वातंत्र्यप्रिय समाजांत पारतंत्र्यप्रियतेला रिघाव नाहीं. शिवाजी महाराजांचें राज्य पूर्ण स्वतंत्र होतें. त्यांत परतंत्र इसमाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार पोंचत नाहीं. शाहूराजे हे परांकित होऊन आले होते. ते परधर्मीयांच्या सहवासांत अठरा वर्षे समरस होऊन वावरत होते. सर्व साधारणपणें बारा वर्षे पर्यंत मनुष्य येण्याची वाट पहावी असा हिंदुधर्म बंधनाचा परिपाठ आहे. बारा वर्षांनंतर त्याची पूर्व संस्कृति बिघडून कायम होते व तो पूर्व समाजांत येण्याला नालायक ठरतो. म्हणून हें हिंदुधर्मानें बारा वर्षांचें बंधन घालून ठेवलें आहे. ही बारावर्षांची मर्यादा संपून ज्या अर्थी परधर्मीयांच्या कैदेंत आणि सहवासांत शाहूराजांचीं अठरा वर्षे गेलीं त्याअर्थीं शिवाजी महाराजांच्या राज्यावर हक्क सांगण्याचा

त्यांना हक्क पोंचत नाहीं आणि त्यामुळेंच ते त्या हक्काला पात्र ठरत नाहींत. शिवाय मुद्दा नं. २ मध्यें दाखविल्याप्रमाणें शाहूराजे यांची ' आपण ( औरंगजेब ) त्यांचें ( राजाराम महाराजांचें ) पारिपत्य करून आम्हांस ( शाहूराजे यांस ) राज्यावर बसवितील तेव्हां राज्य करूं. ' अशी प्रतिज्ञा होती. म्हणून शाहूराजे यांना वारसाहक्कानें राज्य मागण्याचा अधिकार नव्हता. लष्करी सामर्थ्यावर अगर भेदादि कपट प्रयोगावर कोणीहि त्रयस्थ राज्य संपादूं शकेल; पण जसा त्याचा वारसा हक्काशीं संबंध येणार नाहीं तसाच शाहूराजे यांचाही येणार नाहीं. एकंदरींत शाहूराजे कोणत्याही रीतीनें बालराजे शिवाजी यांच्यापेक्षां राज्यावर आपला अधिकार सांगण्यास जास्त पात्र ठरत नाहींत हेंच उघड आहे.

राज्याच्या, धर्माच्या अगर राष्ट्राच्या दृष्टीनें विचार करणें झाल्यास ' राज्याचें हित पहावयाचें, कोणा एका व्यक्तीचें पहावयाचें नाहीं हा प्रधान उद्देश असे. ( मराठी रियासत भाग २ पान ७३९ ) हा रियासतकारांचा सिद्धांत अगदीं बरोबर आहे. या त्यांच्या सिद्धांताला तावून सुलाखून पहाणें झाल्यास सोयराबाईनीं राजारामाला सिंहासनारूढ करण्याचा जो उपक्रम केला तोच योग्य होता हें स्पष्ट होतें. संभाजीराजे जे राज्याधिकारी झाले त्यांत राज्याचें हित पहाणें ज्याअर्थी झालें नाहीं केवळ संभाजी या एका व्यक्तीचें हित पाहण्यांत आलें त्याअर्थी संभाजीराजे हेच मुळांत राज्यावरील वारसा हक्काला वरील सिद्धांताप्रमाणें पात्र ठरत नाहींत. मग त्यांचे पुत्र शाहूराजे कसे ठरूं शकतील ? अर्थात् नाहीं.

(६) वरील सिद्धांताला अनुसरूनच ' स्वराज्याच्या मूलभूत तत्वांचें पालन होऊन व त्याला अनुसरून स्वराज्याचें संरक्षण आणि संवर्धन कोणत्या राजामुळें अधिक होणार होतें ? असा पांचवा मुद्दा आहे. औरंगजेबानें शाहूराजे यांना बाटवून न घेतां त्यांना जें हिंदू राखिलें होतें त्यांत त्याचा उद्देश स्पष्ट होता. ' कंटकेनैव कंटकम् ' या नीतीचा प्रयोग करण्याकरतां औरंगजेबानें शाहूराजे यांचें साधन आपल्याजवळ ठेविलें होतें. ' मराठ मंडळांत दुष्कळी

करण्याचें बादशहाचे ( औरंगजेबाचे ) प्रयत्न चालले होते. त्यासाठीं शाहूचें मोहरें त्यानें आपल्या हातांत कायम ठेविलें होतें. ( मराठी रियासत भाग २ पान ७१० ) त्याचप्रमाणें अजीमशहा, झुल्फिकारखान आणि वजीर आसदखान यांनीं एकविचारानें शाहूराजे यांच्या मुक्ततेचा जो मनसुबा केला तोही स्पष्ट आहे. ' शाहूस मराठ्यांचा राजा असें कबूल करून परत पाठविलें असतां, मराठे अगदींच स्वतंत्र न होता, त्यांचा थोडाबहुत बंदोबस्त होईल. आपसांत तंटे लागून त्यांची शक्ति कमी होईल, आणि मग मोंगलांच्या मुलखास त्रास देण्यास त्यांस सवड मिळणार नाहीं. (मराठी रियासत भाग २ पान ७३३) याच धोरणानें शाहूराजे यांची मुक्तता स्वराज्याचे शत्रू जे मोंगल त्यांच्याकडून झाली. ताराबाईच्या आधिपत्याखालीं मराठे आपला स्वराज्यांतील गेलेला मुलुख परत जिंकून घेत होते व मोंगली मुलुखांतही आपला अंमल प्रस्थापित करीत होते; आणि त्याचा बंदोबस्त करण्याचें सामर्थ्य दिल्लीचें राजकारण नवीन उपस्थित झाल्यामुळें मोंगलांमध्यें राहिलें नव्हतें, म्हणून मराठ्यांत आपसांत तंटे उत्पन्न व्हावे, त्यांची शक्ति कमी व्हावी, मोंगलांच्या मुलुखास त्रास देण्यास व आपलें स्वराज्यसंवर्धन करण्यास त्यांना सवड मिळूं नये या कारणाकरतांच केवळ शाहूराजे यांची ज्याअर्थी मुक्तता झाली, त्याअर्थी त्यांची मुक्तता अगर राज्याच्या वारसाहक्काची त्यांची मागणी ही त्या प्रसंगीं राज्य नाश करणारी आणि दिल्लीच्या तख्ताबद्दल औरंगजेबाच्या पुत्रांत यादवी माजली असतां त्याचा फायदा घेऊन मराठ्यांना त्यांच्या मुलुखांत प्रवेश करून स्वराज्याचें संवर्धन करण्याला जी सुवर्ण संधि मिळाली होती ती गमावली गेल्यामुळें राज्यसंवर्धनाची हानि करणारी होती हें उघड आहे. यावरून स्वराज्यरक्षण आणि स्वराज्यसंवर्धन या दोन्ही कार्याला त्या वेळीं शाहूराजे हे विघातक होते व शिवाजीराजे हेच योग्य होते असें ठरतें. छत्रपती शिवाजी महाराज यांनीं संस्थापिलेल्या हिंदुपदपातशाहीच्या स्वधर्म, स्वातंत्र्य आणि स्वराज्य या मूलभूत तत्वांचें पालन न होतां शाहूराजे यांचेमुळें त्यांचा नाशच होणार होता हें मागील हकीकतीच्या विस्तारावरून स्पष्ट लक्षांत येण्यासारखें

आहे. एकंदरींत या प्रसंगीं शाहूराजांचें आगमन हें संभाजी महाराजांप्रमाणें स्वराज्याला ' कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ ' या म्हणीप्रमाणें होतें यांत शंका राहत नाहीं.

---

# प्रकरण ९ वें

## ताराबाई व शाहूराजे यांचा रणसंग्राम.

१ शाहूराजे यांना तोतया समजण्याचें कारण. २ शाहूराजे तोतया किंवा खरा याची शहानिशा. ३ तत्वनिष्ठ व भावनानिष्ठ यांत श्रेष्ठ कोण? ४ भोंसले घराण्यांत कलहाला प्रारंभ. ५ बाळाजी विश्वनाथ यांचा पूर्व परिचय. ६ संग्रामांत यशाची गुरुकिल्ली-धनाजी. ७ शाहूराजे सातारा किल्ला हस्तगत करतात. ८ शाहूराजे यांचा राज्याभिषेक. ९ अमात्यांची मुक्तता व कर्तव्यजागृति. १० शाहूराजे यांचा बादशाही कृपेविषयीं उपक्रम. ११ ताराबाई निर्भेळ स्वातंत्र्यवादी व तत्वनिष्ठ. १२ शाहूचे मांडलिक होण्यास ताराबाई नाकबूल. १३ शाहूंची ताराबाइवर मोहीम. शाहूराजे ताराबाईपुढें हात टेंकतात.

**१ शाहूराजे यांना तोतया समजण्याचें कारणः—** गरम दूध पिऊन तोंड पोळलें असलें ह्मणजे थंड ताकही फुंकून पिण्याची जशी संवय लागते, तसाच प्रकार ताराबाईंच्या बाबतींत झाला. मागें औरंगजेबानें शाहूराजांना दोन वेळ प्रतिबंधांतून मुक्त केल्याचें जाहीर केलें. मराठे सरदारांना पत्रें आलीं, वाटाघाटी झाल्या, सत्कारसमारंभ कसे कसे करावयाचे याच्या याद्या झाल्या आणि शेवटीं ॐ फस झालें. त्याचप्रमाणें शाहूराजांचा एक तोतया निर्माण झाला. त्याला पकडून त्याची चौकशी झाल्यानंतर तो खराच तोतया आहे असें ठरलें, तेव्हां त्याला देहांत प्रायश्चित्त दिलें गेलें. शाहूराजे यांच्या बाबतींत असे प्रकार घडून आल्यामुळें व मोंगलांकडून फसवाफसवीचे कपटप्रयोग मराठ्यांवर वरचेवर होत गेले असल्यामुळें शाहूराजांची मुक्तता झाली, ही वार्ता ताराबाईंना समजतांच हा कोणी दुसरा तोतया मोंगलांकडून

येत असावा अशी ताराबाईंना साहजिक कल्पना आली. त्याप्रमाणें या नवीन खुळाला तोंड देण्याचा त्यांनीं निर्धार केला.

**२ शाहूराजे तोतया किंवा खरा याची शहानिशा:—** शाहूराजे आपल्या फौजेसह गोदावरी कांठीं आल्यानंतर त्यांनीं ' आम्हीं बादशहापासोन निघोन मुक्कामास पावलों. लवकरच येतों ' अशीं पत्रें ताराबाई, शिवाजीराजे, प्रधान, अमात्य रामचंद्रपंत, वगैरे मुत्सद्दी, सचिव, चिटणिस यांस पाठविलीं. " हें वर्तमान मातोश्री ताराबाई आईसाहेब परशुरामपंत प्रतिनिधि यांस कळल्यावरून तोतया आहे म्हणून ठरविलें. जर खरा असला तरी लबाड होय,असें मनुष्य योजून पाठवावें.याकरितां खंडेराव बल्लाळ चिटणीस ठीक आहेत. आमचे स्नेही आणि राजांनीं त्यांचे वडील मारले त्याचा सूड हे घेतील. हे आपले मनांतील म्हणून बरोबर पांचशें लोक देऊन रवाना केलें. ते शाहूच्या छावणींत येऊन यांसी व राजांशीं भेटी जाल्या. राजा रांगडी बोली व हिंदुस्थानी चाल अशी वर्तणुक. तेव्हां खराखोटा कशावरून ओळखावा. तंव केसरकर खिजमतगारांचा नाईक याजला ओळखिलें. आणीकही खिजमतगार बरोबर होते ते ओळखीचे पाहून चौकशी केली. केसरकरांनीं वर्तमान सांगितलें तें पक्केपणें ध्यानास आणून राजा खरा जाहला. परसोजी भोंसले व इतर सरदार बरोबर होते त्यांच्याही चिटणीसांनीं भेटी घेतल्या. तेव्हां त्यास शाहूच्या खरेपणाबद्दल शंका राहिली नाहीं. त्यांनीं आईसाहेबांस व परशुरामपंतांस व तसेंच अष्टप्रधानांस आणि जाधवराव आदिकरून सर्वत्रांस पत्रें लिहिलीं जे ' राजा खरा आहे. ' ( नागपूरकर भोंसले यांची बखर पान १९ ) असें झालें. "

हें चिटणीसांचें पत्र आलेवर ताराबाई व त्यांची सर्व मंडळी यांना मोठें संकट पडलें. तेव्हां रामचंद्रपंतांनीं ' यांस माणूस चांगलें पाठविलें पाहिजे. सारे फंदांत मिळाले. ' अशी आईसाहेबांस विनंति केली. तेव्हां त्यांनीं रामचंद्रपंतांना आज्ञा केली कीं, ' हिंगणीकर भोंसले ( नागपूरकर भोंसल्याचे पूर्वज ) बापूजीबोवा हे पहिलेपासून वडिलोपार्जित, इतबारी,

प्रबुद्ध आपलेजवळ आहेत. यांजला पाठवावें. शिवाजी महाराजांसमागमें कामाकाजास आलेले हे खरे म्हणतील तर राजा.' याप्रमाणें ठरल्यानंतर बापूजी भोंसले पांडववाडीस होते, त्यांस बोलावून घेण्यांत आलें; व त्यांचे-बरोबर हजार बाराशें लोक देण्याचें ठरलें. नंतर बापूजी भोंसले व ताराबाई यांची भेट झाली. त्या वेळीं ताराबाईनीं समक्ष त्यांस असें सांगितलें कीं, "तुम्ही वडिलापासून तुमचे वडील पूर्वापार सेवा करीत, विश्वासुक, प्रबुद्ध, याजकरितां पाठवितों. तोतया मनुष्य पाहून यावें म्हणजे सर्वांची खातरजमा होईल. मग पारपत्य केलें जाईल. तुम्हीं आपले कुळास बट्टा लावूं नये, रांगडा कोण आहे. चिटणविसांनीं शाहू केला आहे. याजवरून जाणें. तुम्हीं सांगाल तेंच होईल." (ना. भों. ब. पान २०). याप्रमाणें ताराबाईनीं बापूजी भोंसले यांस सांगून त्यांचेसमवेत हजार लोक देऊन त्यांची शाहूकडे रवानगी केली.

बापूजीबुवा हिंगणीकर हे परसोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांचे सख्खे वडील बंधु होते. ते ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें निघाले व गोदावरी उतरून शाहूराजे यांच्या छावणीला येऊन दाखल झाले. त्यांच्या व शाहूराजांच्या 'भेटी जाहल्या. राजा रांगडा (त्याविषयीं) ठिकाण नाहीं.' ताराबाई तर तोतया म्हणतात. परंतु हे खरे शाहू असून तोतया नाहींत अशी त्यांची प्रत्यक्ष भेटीमुळें खात्री झाली. शाहूराजे खरे असतां ते तोतया आहेत, अशी वार्ता कशी पसरली या विचारानें ते कांहीं वेळ 'अंदेशांत पडले.' नंतर त्यांस चिट-णविसांनीं एकांतीं नेऊन शाहूच्या खिजमतगारांचे नाईक केसरकर यांची भेट घातली. त्याचप्रमाणें बापूजी बुवांनीं आपले बंधु परसोजी भोंसले यांची घेतली. बापूजीस सर्व बाजूंनीं शाहूच्या खरेपणाबद्दल सत्यता पटली. तेव्हां चिटणविसांच्या सांगण्याप्रमाणें प्रत्यक्ष पुराव्यादाखल सर्वांसमक्ष बापूजी व परसोजी हें उभ-यतां भोंसलेबंधु शाहूराजांना एका ताटांत घेऊन जेवले. हें सर्वांनीं पाहिलें 'तेव्हां राजा खरा झाला. तोतया नाहीं.' ही हकीकत बापूजींनीं ताराबाईंना कळविली. त्या वेळीं त्यांची शाहूराजे हे तोतया नसून खरे आहेत अशी खात्री

झाली. ताराबाई या शाहूराजांना बापूजी भोंसले यांच्याकडून नक्की खबर येई पर्यंत तोतया समजत होत्या. परंतु त्यांचेकडून नक्की बातमी आल्यानंतर त्यांची खातरजमा झाली व त्या शाहूराजे यांना खरा समजूं लागल्या. मागील प्रकरणांत सोमनाईक देसाई यांना त्यांनीं जें पत्र पाठविलें तें शाहूराजे खरे आहेत असे समजूनच लिहिलेलें आहे. त्यांत तोतया शाहू असें ह्मटलेलें नाहीं. यावरून ताराबाई शाहूराजे यांना ' शाहू खोटा आहे ' असें ह्मणत होत्या असा कांहीं बखरीकारांचा जो आरोप त्यांचेवर आहे तो कसा विपर्यस्त आहे हें लक्षांत येईल.

**३ तत्वनिष्ठ व भावनानिष्ठ यांत श्रेष्ठ कोण ?**– शाहूराजे हे खरे आहेत असें चौकशीअंतीं ठरल्यानंतर राज्याचे खरे वारस कोण हा प्रश्न सर्वांपुढें उत्पन्न झाला. हा प्रश्न, स्वातंत्र्य कीं पारतंत्र्य, हिंदू कीं मुसलमान यासारखा सामुदायिक स्वरूपाचा नसल्यामुळें या प्रश्नाचा जो तो आपापल्या बुद्धिसामर्थ्याच्या बळावर विचार करूं लागला. या प्रश्नामुळें शाहूराजांचा पक्ष व ताराबाईंचा पक्ष असे दोन स्वतंत्र पक्ष लोकांच्या दृष्टीसमोर आले. समाजांत भावनानिष्ठ आणि तत्वनिष्ठ असे नेहमींच लोक असतात. भावनानिष्ठ लोकांचा भरणा समाजांत नेहमीं अधिक प्रमाणांत असतो. या लोकांची दृष्टि दृश्य फळाकडे असते. परंतु जे तत्वनिष्ठ असतात ते केवळ दृश्य फलाकडेच पहात नाहींत. त्यांना राजकारणाचे व राज्यक्रांतीचे दूरवर परिणाम कसे होतील ? ते राज्याला विघातक होतील किंवा हितावह होतील ? ते प्रजेच्या कल्याणाचे होतील किंवा राजा या व्यक्तीच्या सुखोपभोगाचे होतील ? हें पहावयाचें असतें. ताराबाईंचा जो पक्ष होता तो तत्वनिष्ठ होता. ह्मणूनच त्या पक्षानें वाटेल ते श्रमसाहस करून शत्रूच्या दाढेंतून स्वराज्य ओढून बाहेर काढलें. ताराबाई या स्वतः जहाल तत्वनिष्ठ होत्या. त्यांना शिवाजी महाराजांच्या तत्वनिष्ठ चाकोरींतून आपलें राज्य हांकावयाचें होतें. शाहूराजे यांचा पक्ष केवळ भावनानिष्ठ होता. शिवाजी महाराजांच्या वडील पुत्राचा पुत्र, राज्याचा खरा धनी या भावनेवर शाहूराजे यांना आपला

कार्यभाग साधून घ्यावयाचा होता. एकंदरींत तत्वनिष्ठ आणि भावनानिष्ठ अशा समाजांतील मनोभेदामुळें मोंगलांनीं आपल्या राजकारणाचा बिनतोड डाव मराठ्यांवर केला व त्यामुळें मराठी राज्यांत अंतस्थ कलहाचा वणवा पेटण्यास प्रारंभ झाला.

**४ भोंसले घराण्यांत कलहाला प्रारंभः—** ताराबाई या पूर्ण तत्वनिष्ठ असल्यामुळें शाहूराजे यांना पूर्ण विरोध करण्याचा त्यांनीं संकल्प केला आणि रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधि, शंकराजी सचिव, नीलकंठ मोरेश्वर प्रधान, सेनापति धनाजी जाधव, खंडोबल्लाळ चिटणविस या प्रमुख मंडळीस जमवून त्यांनीं कळविलें कीं, संभाजी महाराजांनीं दौलत गमावली, ती राजाराम महाराजांनीं नूतन संपादिली. तर ' शाहू खरा असो किंवा खोटा असो, त्यास नाहींसा करावा. ( मराठी रियासत भाग १ मध्य-विभाग पान ७ ) ' दूधभाताचें ताट आणून त्यावर हात ठेऊन त्यांनीं वरील मंडळीकडून शपथक्रिया घेतली. 'खोटा असला तर अवश्य लढून मारूं, पण खरा असला तर आपण त्याशीं लढणार नाहीं, ' असें धनाजी व खंडोबल्लाळ यांचे ह्मणणें होतें. त्याचप्रमाणें कान्होजी आंगरे हा आणखी एक बलिष्ठ सरदार पश्चिम किनाऱ्यावर होता, त्यास भेटीस आणवून त्याचेंही इमान ताराबाईनीं घेतलें. नंतर त्यांनीं धनाजी जाधव, परशुरामपंत प्रतिनिधि यांचेबरोबर चाळीस हजार फौज देऊन त्यांना शाहूराजे यांच्यावर रवाना केलें. शाहूराजेही परसोजी भोंसले व इतर सरदारांसह औरंगाबाद, पारद, यावरून खेडकडूस येथें येऊन दाखल झाले. खेड हें ठिकाण जुन्नर तालुक्यांत भीमेच्या उत्तरकांठीं आहे. खेड व कडूस या दोन गांवामधून भीमानदी वाहते. हीं दोन गांवें नजीक असल्यानें याला खेडकडूस असें म्हणतात. या ठिकाणीं ताराबाईच्या व शाहूराजे यांच्या फौजेची गांठ पडली.

खेडकडूस येथें आल्यानंतर धनाजी जाधव यांच्यातर्फे बाळाजी विश्वनाथ शाहूराजांना पहाण्याकरतां आले. उभयतांची भेट झाल्यानंतर खंडो बल्लाळ यांनीं बाळाजी विश्वनाथ यांस सांगितलें कीं, ' तुम्हीं अनमान

कोणताही एक करूं नये. जाधवराव यांजला फौजेसुद्धां आणवावें व तुम्ही आपले पथकासहित येऊन महाराजांस अनुकूल झाल्यास तुमचे जातीस पद मातबरीचें सेनापतीचें बरोबरीचें देण्यांत येईल. परशुरामपंत आजवर दौलत आपण करीत आले, तशीच करावी, यास्तव खोटें ह्मणतात. याजकरितां तुह्मीं त्यांचे ह्मणण्यावर न जावें. हिंगणीकर भोंसले उभयतां बंधु यांचे ताटांत जेवले, तेव्हां खोटें कसें ह्मणाल? जाधवराव सेनापति हेही सोयरेच आहेत. (शाहूराजे धनाजी जाधव यांना मामा ह्मणत होते. सासऱ्याला मामा ह्मणण्याची प्रथा मराठ्यांत आहे. शाहूंची पत्नी राजसबाई ही शिंदखेडच्या रुस्तुमराव जाधवांची कन्या. धनाजी व रुस्तुमराव हे एकच घराण्यांतले होते.) आतां यश तुह्मीं घ्यावें.' (ना. भो. ब. पान २०) हें चिटणिसाचें ह्मणणें बाळाजी विश्वनाथ यांस पटलें. त्यांनीं आपले धनी धनाजी जाधव यांचें मन शाहूराजे यांच्या पक्षाकडे वळविलें.

**५ बाळाजी विश्वनाथ यांचा पूर्व परिचयः**— बाळाजी विश्वनाथ हे भट पेशव्यांचे आदिपुरुष असल्यानें व ते या वेळेपासून मराठी राज्याच्या कारभाराच्या आखाड्यांत उतरले असल्यामुळें त्यांचा थोडा पूर्वेतिहास येथें देणें उचित आहे. त्यामुळें पुढील राजकारणाला जीं जीं वळणें मिळालीं त्याची संगत लक्षांत येईल. सध्यांच्या रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांच्यामध्यें समुद्रकांठीं जंजिऱ्याचें लहान संस्थान आहे. तेथील संस्थानिक जातीनें शिद्दी ऊर्फ हबशी मुसलमान आहे. त्याचे पूर्वज विजापूरच्या आदिलशाहीचा आरमारी सुभेदार होता. औरंगजेबानें महाराष्ट्र जिंकल्यानंतर त्यानें या शिद्दी सुभेदाराला पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील मोंगल आरमाराचें आधिपत्य दिलें. या संस्थानांत समुद्रतीरीं श्रीवर्धन ह्मणून मोठा गांव आहे. हेंच गांव बाळाजी विश्वनाथ भट यांचें मूलस्थान होय. हें भटांचें घराणें चित्तपावन ब्राह्मणाचें होतें. या प्रांताला पूर्वीं दंडाराजपुरी हें नांव चालत असे. भटांचें घराणें मुसलमानी अमलाच्या प्रारंभापासून या प्रांताचे देशमुख ह्मणून अधिकारावर होते. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या शत्रूंनीं

बरीच उचल घेतली. त्या वेळीं ह्मणजे इ. स. १७०१ च्या सुमारास श्रीवर्धनाच्या भट घराण्याचें व शिद्दीचें वैमनस्य उत्पन्न होण्यास प्रारंभ झाला. त्यामुळें बाळाजीनें कायमचें देशांतर करण्याचा निश्चय केला. मुलांमाणसांसह श्रीवर्धन सोडून बाणकोट खाडीच्या दक्षिण तीराजवळ वेळास ह्मणून गांव आहे, तेथें भानु आडनांवाचे बाळाजीचे घरोब्याचे स्नेही रहात होते, त्यांजकडे ते आले. तेव्हां त्रिवर्ग बंधू भानूही बाळाजीबरोबर देशांतरीं जाण्यास सिद्ध झाले. ते साताऱ्यास जाण्याच्या इराद्यानें निघून पुरंदर किल्यानजीक सासवडास आले. तेथें त्यांनीं अंबाजीपंत पुरंदरे यांचे घरीं मुक्काम केला. हे पुरंदरे सासवडचे कुलकर्णी व देशपांडे होते. पुढें रोजगाराबद्दल सर्व मंडळींचीं तेथें बोलणीं होऊन ती सर्व मंडळी निघून साताऱ्यास आली. तेथील महादजी कृष्ण जोशी यांचा व भानूंचा परिचय होता. त्यावरून जोशी यांजकडे जाऊन ते भेटले व त्यांचेमार्फत भोरास शंकराजी नारायण सचिव यांजकडेस कारकुनीवर राहिले. पुढें इ. स. १७०६ च्या सुमारास बाळाजी व अंबाजीपंत पुरंदरे यांस धनाजी जाधवराव सेनापति यांनीं त्यांची हुशारी वगैरे पाहून आपले पदरीं दौलतीसंबंधाचे लिहिण्याचे कामावर ठेविलें. त्यांनीं आपलें कामकाज उत्तमप्रकारें बजाविल्यामुळें धनाजी जाधवांचा त्यांच्यावर लोभ व विश्वास विशेष जडला. बाळाजी विश्वनाथ हा मुलकी कामांत हुशार असून बुद्धिमान होता. तो मिष्टभाषणी असून आपल्या धन्यावर छाप कशी ठेवावी हें तो जाणत असे. या वेळीं धनाजी उतार वयाचे झाल्यानें व ते उदार बुद्धीचे असल्यानें बाळाजी विश्वनाथानें त्यांना आपलेसें करून घेतलें होतें. धनाजीच्या हाताखालीं बाळाजीचें स्वतंत्र पथकही होतें.

६. **संग्रामांत यशाची गुरुकिल्ली–धनाजी:**— ताराबाई व शाहूराजे यांच्यामधील रणसंग्रामांत यश कोणाच्या पदरीं पाडावयाचें याची गुरुकिल्ली सेनापति जाधव यांच्या हातीं होती. जिकडे धनाजी तिकडे विजय हें निश्चित होतें. तेव्हां धनाजीला आपल्या पक्षांत कसें ओढावें हा प्रश्न शाहूराजे यांच्यापुढें होता. लष्करी बाण्याचे लोक नेहमींच भावनाप्रधान असतात.

त्यांच्या हातीं संग्रामाच्या निर्णयाचा कांटा असल्यामुळें त्यांच्या भावनांवर ऐन-प्रसंगीं घाव घालणें हें मुत्सद्याचें काम असतें. त्याप्रमाणें खंडो बल्लाळ व बाळाजी विश्वनाथ यांनीं धनाजीला शाहूराजे यांच्या पक्षाला कसें सामील करून दिलें याची हकीकत पुढें दिल्याप्रमाणें आहे. " धनसिंग [ धनाजी ] जाधवरावांचे मनांत शाहूशीं लढूं नये असें होतें. शाहू हा राज्याचा अधिकारी आहे, अशी त्यांची समजूत झाली होती. प्रतिनिधि परशुराम त्रिंबक मात्र पूर्णपणें ताराबाईकडे होते. परंतु धनसिंग जाधवराव हे हा शाहू खरा आहे कीं काय ? याबद्दल गुप्त माहिती मिळविण्याचे खटपटीस लागले. प्रथम धनसिंग जाधवराव यांनीं खंडो बल्लाळ चिटणीस यांस निराळा वेष देऊन महाराजांचे गोटांत पाठविलें. खंडो बल्लाळ हे गोटांतील सर्वत्र मंडळीस भेटले. जोत्याजी केसरकर व बंकी गाईकवाड यांच्याशीं मसलत करून महाराज खरे आहेत अशी खात्री करून घेतली. पुढें खुद्द शाहू महाराजांस जाऊन खंडो बल्लाळ हे भेटले. महाराजांची व खंडो बल्लाळ यांची भेट झाल्यानंतर, महाराजांनीं खंडो बल्लाळ यांस प्रश्न केला कीं, 'आह्मांस राज्य कसें मिळावें ? मातोश्री काकीसाहेब ( ताराबाईसाहेब ) ह्या आमच्यावर बदलून पडून त्यांच्यातर्फे सेनापति जाधवराव व प्रतिनिधि असे आमच्याबरोबर लढण्यास येऊन दाखल झाले आहेत. सेनापति धनसिंग जाधवराव हे युद्धांत प्रतिभीष्म आहेत. त्यांनीं औरंगजेबासारखा महापराक्रमी व बलाढ्य व पृथ्वीपति बादशहास आपल्या पराक्रमानें पादाक्रांत करून धुळीस मिळविलें, हें आह्मांस खुद्द माहीत आहे. मग अशा शूर सेनापतीपुढें आमचा टिकाव लागणार कसा ? तरी ते आपल्या मसलतींत येतील अशी सल्ला सांगावी.' खंडो बल्लाळ चिटणीस यानें थोडें स्तब्ध राहून महाराज यांस विनंति केली कीं—' सेनापति हे आपले आप्त असून त्यांच्याच घराण्यापासून आपल्या घराण्याचा उदय झालेला आहे. आपले आजे शिवाजी महाराज हे जाधवांच्या कन्येचे पुत्र होत, हें आपणांस विदितच आहे. एका नात्यानें आपण त्यांचे मालक आहांत हें खरें; तरी आप्तसंबंधानें आपणास ते वडील आहेत; तरी

आपण खुद्द वेष पालटून सेनापतीच्या गोटांत त्यांस भेटण्यास चलावें व त्यांस वडील समजून आपले मनोदय त्यांस कळवावें. भीष्मानें निष्पांडवी पृथ्वी करीन अशी जेव्हां प्रतिज्ञा केली, तेव्हां पांडवांवर मोठें संकट आलें, त्यांचें त्यांनीं श्रीकृष्ण भगवान यांच्या सल्लयानें द्रौपदीकरवीं भीष्मास शरण जाऊन निरसन केलें. या वेळीं आपण सेनापतीस भेटलां, तर आपल्या विनंतीचा ते अव्हेर करणार नाहींत. आपणांस त्यांजपासून कोणत्याही प्रकारचा दगाफटका होणार नाहीं.' असें खंडो बल्लाळ यानें आश्वासन दिल्यावर महाराज यांनीं ती गोष्ट मान्य करून बरोबर जोत्याजी केसरकर यास घेऊन ते खंडो बल्लाळ चिटणीस या समागमें वेष पालटून सेनापतींच्या गोटांत गेले. गोटाबाहेर उभे राहिल्यावर खंडो बल्लाळ यांनीं सेनापतीपाशीं जाऊन सर्व राजकारण त्यांस विदित केलें, व महाराज आल्याची वर्दी दिली. त्यावरून सेनापति यांनीं डेऱ्याबाहेर येऊन महाराजांस सन्मानानें आंत नेलें. महाराजांनीं सेनापतीस वडिलाप्रमाणें मान दिला. उभयतांच्या भेटी होऊन महाराजांनीं आपलें हृद्गत सेनापतीस कळविलें व बोललें कीं,–'काकांनीं व आपण श्रम व साहस करून गेलेलें राज्य पुनः मिळविलें. काकांच्या पश्चात् आह्मांस सोडविण्याकरितां आपण पुष्कळ प्रयत्न केले. मातोश्री काकीसाहेब यांनीं दुर्बुद्धि करून आपणांस आह्मांवर पाठविलें. तरी आतां आपण वडील आहांत. राज्यावर हक्क कोणाचा हें आपणांस विदित आहे. उदईक आपली व आमची लढाई होऊन आमचा निभाव आपल्यापुढें कसा लागणार ?' असें ह्मणून महाराज यांनीं वाईट तोंड केलें. त्याजवरून सेनापति जाधवराव यांस गहिंवर येऊन त्यांनीं महाराजांना पोटाशीं धरून 'मी आपल्यांशीं लढाई देणार नाहीं,' असें साफ सांगितलें. आपण आपल्या फौजेसह आमच्या फौजेवर खुशाल हल्ला करावा. आमचे हाताखालील सरदार व सैन्य आपलेविरुद्ध शस्त्र धरणार नाहींत. व मीही उद्यां निःशस्त्र राहणार. प्रतिनिधि मात्र माझे विचारांत नाहींत. तथापि त्यांची मोठीशी काळजी करण्यास नको.' याप्रमाणें जाधवराव सेनापतींनीं आश्वासन देऊन त्यांस मसलत दिली. नंतर महाराज यांस खंडो बल्लाळ

समागमें देऊन आपले गोटाबाहेर पोंहोचविलें. याप्रमाणें महाराज आपले गोटांत सुखरूप येऊन दाखल झाले." (मराठा कुळाचा इतिहास दळवीकृत पान ६६ ).

दुसरे दिवशीं खेडकडूसच्या लढाईचा ताराबाई यांच्याविरुद्ध लुटपुटीची लढाई होऊन कसा रंग पालटला हें पुढील हकीकतीवरून लक्षांत येईल. "एक लढाई करावी. तें कपटयुद्ध करावें. ऐसें ठरवून सर्वांचें इमानप्रमाण घेऊन एक विचार बहूत करून पुन्हां महाराजांकडे खंडोबल्लाळ चिटणीस गेले. सर्व राजकारण विदित केलें आणि सेनापतीपाशीं आले. महाराजांनीं हत्तीचे पायीं अंदू घालून लढावयाचें ह्मणून सिद्ध होऊन बख्तर व टोप घालून, हौद्यांत बसोन, धनुष्यबाण हातीं घेऊन, ढाल तरवार बांधून युद्धास उभे राहिले. सेनापती व प्रतिनिधी सिद्ध होऊन लढाईस गेले. लढाईस प्रारंभ जाला. प्रतिनिधि व आईसाहेबांचे लष्कराचे सरदार बहुत लढले. तिकडून परसोजी भोंसले (व) चिमणाजी दामोदर यांणीं घोडे चालवून लढाई केली. त्यांत महाराजांनीं हत्ती चालवून तिरंदाजी केली. फौजेंत मिसळले. दाहा हजार फौज धारकरी निवडून महाराजांनीं चालून घेतलें. सेनापती हे आपले घोड्या-पर्यंत महाराजांचा हत्ती येईपर्यंत उभे राहिले. प्रतिनिधी वगैरे फौज मोड होऊन पळूं लागले. तेव्हां सेनापतींनीं आपले विचारांतील सर्व सरदार घेऊन, घोड्यावरून उतरोन, मुजरे, नजर करून भेटले. महाराज तेथेंच मुकाम खेडचे मैदानीं करून राहिले. सेनापतींनीं आपली फौज एकवटून तीन कोशांचे अंतरें आज्ञा घेऊन जाऊन उतरले. ते भीमातीरीं राहिले. याप्रमाणें लढाई मुकाम मजकुरीं शके १६२९ सर्वजित संवत्सर सन समान मया व अलफ सालीं होऊन महाराज विजयी जाहले." ( थोरले शाहू महाराज यांचें चरित्र पान १६, १७ ). येणेंप्रमाणें खेडकडूसच्या संग्रामाची हकीकत आहे. या लुटपुटीच्या संग्रामांत शाहूराजे यांचें ठिकाणीं धाडस, तिरंदाजीचें युद्धकौशल्य वगैरे शूराच्या अंगीं जे गुण प्रामुख्यानें लागतात ते सर्व दाखविण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणें राज्यकर्त्यांचे अंगीं मुत्सद्दीपणाचा जो धर्म असावा

लागतो तोही शाहूराजे यांचे ठिकाणीं कसा होता याचेंही प्रदर्शन या संग्रामामुळें लोकांचे नजरेला आलें. लढाई आटोपल्यावर प्रतिनिधि पळून साताऱ्याला गेले. दुसरे दिवशीं सेनापतींनीं खंडो बल्लाळ यांस महाराजांकडे पाठवून सरदार लोकांच्या भेटीचा दिवस ठरविला. त्या दिवशीं महाराजांनीं सर्व सरदारांच्या भेटी घेतल्या. सर्वांस यथायोग्य चादरी व शेले घातले. यानंतर सुमुहूर्तावर धनसिंग जाधवरांव यांस सेनापतीपदाचीं वस्त्रें व बहुमान पद्धतीप्रमाणें हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे दिलें. खंडो बल्लाळ यांस चिटणीसाचीं वस्त्रें, कलमदान, शिरपेंच, कंठी, चौकडा वगैरे दिले आणि सरदार वगैरे यांस सरदारी वस्त्रें बहुमानपूर्वक दिलीं.

यानंतर शाहूराजे हे सेनापति धनाजी जाधव यांसहवर्तमान खेडकडूस-हून कूच करून पुण्यास आले. तेथून कूच करून जेजुरी, वीरवाल्हे, शिरवळ, रोहिडा, दहिगांव यावरून चंदनवंदन येथें येऊन त्यांनीं मुक्काम केला. मार्गांत जेजुरीस देवदर्शन करून ब्राह्मणभोजन व दानधर्म केला. वीरवाल्हे येथें कुल-स्वामी सिद्धाचें दर्शन घेतलें. शिरवळास सचिवांचें प्रकरण उरकलें. रोहिडा किल्ल्यावर शंकराजी नारायण सचिव होता. त्यास भेटीस बोलाविलें. हे ताराबाईच्या पक्षाचे असून त्यांनीं त्यांना इमानप्रमाण देऊन क्रिया केली होती. सबब ते शाहूराजे यांच्या भेटीला आले नाहींत. तेव्हां त्यांनीं सचिवांना सांगून पाठविलें कीं, आह्मीच तुमच्या भेटीला येतों. हा शाहूराजे यांचा निरोप ऐकून त्यांनीं देहत्याग केला. दुसरे दिवशीं महाराज किल्ल्याखालीं गेले तों किल्ल्यावरून शंकराजी नारायण यांचें शव खालीं उतरलें. तें पाहून शाहूराजे किल्ल्यावर गेले व त्यांची स्त्री येसूबाई हिचें समाधान बहुत प्रकारें केलें. पंडित यांस बोलाविले असतां ते न येतां त्यांनीं हिरकणी खाऊन जीव दिला; एकंदरींत शाहूराजे यांच्या आगमनानें मराठी राज्यांतील कांहीं नेकीच्या माणसांना इकडे आड व तिकडे विहीर असा प्रकार होऊन आत्महत्येचा मार्ग सुधारावा लागला. सचिवांनीं आत्महत्या करून घेतल्यामुळें राजगड, प्रचंडगड (तोरणा) विचित्रगड (रोहिडा) वगैरे किल्ले आपोआपच शाहूच्या हस्तगत झाले.

पुरंदर व सिंहगड हेही किल्ले लवकरच शाहूराजांना मिळाले. चंदनवंदनचे हवालदार, सुभेदार यांना बोलावून आणून त्यांना सर्फराज केलें. नंतर साताऱ्या किल्ल्यावर शेखमिरा वांईकर जमादार व प्रयागजी प्रभु सुभेदार, आणि कारखानीस हवालदार यांस भेटीस येण्याबद्दल पत्रें पाठविलीं. परंतु ते शाहूराजे यांच्या भेटीला आले नाहींत. ताराबाई यांनीं साताऱ्याचा बंदोबस्त प्रतिनिधि यांच्यावर सोंपवून त्या पन्हाळ्यास रवाना झाल्या होत्या. प्रतिनिधींनीं सातारा लढविण्याची तयारी केली. आठ दिवसांत साताऱ्याचा किल्ला हस्तगत झाला पाहिजे असा शाहूराजे यांचा आग्रह पडला. सातारा किल्ल्याचा बंदोबस्त शेखमिरा जमादार याचेकडे होता. त्याचीं मुलें माणसें वांईस राहत असत. तेव्हां धनाजींनीं आठ दिवसांत साताऱ्याचा किल्ला शाहूराजे यांना कसा हस्तगत करून दिला हें पुढील माहितीवरून लक्षांत येईल.

**७. शाहूराजे सातारचा किल्ला हस्तगत करतातः—**

" शनवारचे दिवशीं प्रातःकाळीं राजा शाहू व धनाजी जाधवराव हे महाराजांचे मामा एकत्र बसले होते तंव यांना बोलिला कीं, आजचे आठवे दिवशीं याच वेळेस किल्ला घेऊं. ' हें ऐकून जाधवराव हंसले. पातशाहा अलमगीर अवरंगजेब बहुत दिवस खटपट करीत असतां साध्य झाला नाहीं. तोच परशुरामपंत आहे. कसा किल्ला साध्य होईल ? यावर महाराजांनीं हास्यवदन जाधवराव यांचें पाहून उत्तर केलें कीं, ' मामासाहेब आजचे आठवे दिवशीं किल्ला या वेळेस आला हें जाणावें. ' उगीच राहिले. दुसरे दिवशीं वांईकर शेखमिरा किल्लेदार वगैरे किल्ल्यावरचे माणसांचीं मुलें लेंकरें होतीं, बातमी लागतांच धरून तेथून आणिलीं. आणि किल्याखालीं उभीं करून मोर्चास पुढें देतों असा एकच हाहाकार केला. हें पाहून शेखमिराभाई परशुरामपंतांशीं बोलले, जे, ' मुलें माणसांची ही गति तेव्हां जिंदगी कशास करावी ? आम्हांस निरोप द्यावा. ' यावरून पंत बोलले जे, ' दुसरें लग्न करावें, रुपये देतों. ' अशीं नाना प्रकारें बोलणीं झालीं, शेखमिरांनीं तेव्हां त्यां सारखेंच बोलून कबूल केलें, तेव्हां पंतास भरंवसा वाटला कीं, हे माझे झाले.

तों आठवे दिवशीं शनवारीं प्रातःकाळींच शेखमिरा जाऊन बोलले कीं, कांहीं बोलावयाचें आहे. तेव्हां खलबतास जाऊन तेथें शेखमिरांनीं आपली शिबंदी बोलाऊन पंतास गफलतीनें [ कैद केलें ] आणि किल्ल्यावर दरवाज्याजवळ पटका फिरविला. तों सडा घटका दिवस आला. राजांनीं लष्करांतून पाहिलें तेच वेळीं पांच हजार फौज तयार होती, त्या फौजेनिशीं जातीनें किल्ल्यावर गेले. शेखमिरा दरवाज्यांत होता. त्याचा हात धरून बोलले जे, ' तुम्ही आमचे भाऊ आहांत. ब्राम्हण फंदी, त्याचा अन्याय तुम्हाकडेस काय आहे. आमचे तुम्ही आहांत. ' असें म्हणून सर्वत्र मंडळींसुद्धां किल्ल्यांत आले. तों पहिला प्रहर दिवस आला. फत्तेची नौबत तेथेंच वाजविली. त्या दिवसापासून मराठे यांचे राज्यांत शनवारची नौबत वाजत आहे. व नजरा होऊन सारे आपापले स्थळास गेले. नंतर महाराज राजेश्री क्रोधयुक्त होऊन परशुरामपंतास बोलाऊन जीवें मारण्याचा हुकूम दिला. हें वर्तमान खंडेराव बल्लाळ चिटणविसांस समजलें तेव्हां स्नान करीत असतां तसेंच राजेश्रींकडे जाऊन विनंति केली कीं, परशरामपंत होता ह्मणून किल्ला भांडविला. आलमगिरास साध्य झाला नाहीं, व याचा पुत्र श्रीपतराव फौजेनिशीं हैद्राबादेस मोहिमेस आहे, याजवर कृपा करावी. सक्त रदबदली पाहून वांचविलें.' ( ना. भो. ब. पान २१ ) परशुरामपंतांना तेथेंच शाहूराजे यांनीं कैद करून ठेविलें. 'घरचा चोर जिवानिशीं मारी ' हा अनुभव या वेळीं परशुरामपंतांस आला असेल यांत संशय नाहीं. साताऱ्याचा किल्ला हस्तगत झाल्यानंतर शाहूराजे यांनीं दरबार भरवून आपल्या नांवचे शिक्के करून राज्यकारभार सुरू केला. आजुबाजूचे परळी, वर्धनगड, महिमानगड, वगैरे किल्ले हस्तगत करण्यास त्यांना विलंब लागला नाहीं.

८. **शाहूराजे यांचा राज्याभिषेकः**—शके १६२९ सर्वजित् संवत्सरीं माघ शु॥ १ सोमवार तारीख १२ जानेवारी सन १७०८ रोजीं जन्मनांव शिवाजीराजे ऊर्फ शाहूमहाराज यांस राज्याभिषेक झाला. कामदारांच्या नेमणुका यापूर्वीच प्रसंगोपात्त ज्या करण्यांत आलेल्या होत्या त्या यथा-

विधि कायम करण्यांत आल्या. पेशवा बहिरोपंत पिंगळे, सेनापति-धनाजी जाधव, सचिव-नारोशंकर, मंत्री-रामचंद्रपंत पुंडे, सुमंत-महादजी गदाधर, अमात्य-बाळकृष्ण वासुदेव ऊर्फ अंबूराव हणमंते, न्यायाधीश-होनाजी अनंत, पंडितराव-मुद्गलभट अशीं मुख्य पदें तूर्तातूर्त देण्यांत आलीं. याशिवाय परसोजी भोंसले यास सेनासाहेबसुभा हें पद देण्यांत आलें. परसोजीजवळ आनंदराव महादेव प्रभु देशपांडे मुरारबाजीचा पुतण्या काम करीत असून ता ताराबाईना सोडून शाहूराजे यांना मिळाला होता. त्याजकडे पोतनिशी व खासनिशी दिली. हैबतराव निंबाळकर सरलष्करास केलें. खंडो बल्लाळास चिटणिसी दिली. परशुरामपंत प्रतिनिधि कैदेंत असल्यामुळें प्रतिनिधीपद-प्रल्हाद निराजीचा मुलगा गदाधर प्रल्हाद यास तूर्तातूर्त देण्यांत आलें.

९ **अमात्यांची मुक्तता व कर्तव्यजागृति**– इकडे ताराबाई साताऱ्याहून पन्हाळ्यावर येऊन तिकडील कारभार पहात होत्या. ताराबाईंचे मुख्य कारभारी रामचंद्रपंत अमात्य हे होते. परंतु त्यांच्याबद्दल ताराबाईंच्या मनांत संशय उत्पन्न होऊं लागला होता. रामचंद्रपंतांचा ओढा शाहूराजे यांच्याकडे विशेष आहे हें त्या जाणून होत्या. शाहूराजे औरंगजेबाचे कैदेंत असतांना त्यांना सोडवून आणण्याच्या खटपटींत ते होते. त्यांची ती खटपट बाल शिवाजी यांना राज्याभिषेक होईपर्यंत चालू होती. मधून मधून शाहूराजे यांचे निरोपही त्यांना राज्यरक्षण करण्यासंबंधीं येत असत. शिवाय बाल शिवाजी यांच्या राज्याभिषेकाचा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां रामचंद्रपंत त्याच्या विरुद्ध होते. केवळ परशुरामपंत वगैरे इतर प्रधानांचें मताधिक्य झाल्यानें त्यांनीं बाल शिवाजीच्या राज्याभिषेकांत भाग घेतला. देहानें ते आपल्या पक्षाचे पण मनानें ते शाहूच्या पक्षाचे आहेत अशी ताराबाईंची कल्पना झाली होती. त्यामुळें त्यांची सारी भिस्त परशुरामपंतांवर होती. परशुरामपंतांचें व रामचंद्रपंतांचें वैमनस्य उत्पन्न झालें होतें. त्यामुळें रामचंद्रपंतांनीं जो कारभार करावा तो परशुरामपंतांनीं ताराबाईना भलतेंच सांगून मोडवावा असें वरचेवर होऊं लागलें होतें. त्यामुळें रामचंद्रपंतांना

राग येऊन त्यांनीं शाहूराजांना कांहीं उत्तेजनपर निरोप पाठविला. हें वर्तमान ताराबाईना समजतांच त्यांनीं रामचंद्रपंतांना पकडून त्यांच्या पायांत रुप्याची बेडी घातली आणि त्यांना वसंतगडावर पाठवून कैदेंत ठेविलें. त्या योगानें रामचंद्रपंतांना अधिक क्रोध येऊन त्यांनीं धनाजी जाधव वगैरे मराठे सरदार फितुर करून त्यांस शाहूमहाराजांकडे पाठवून दिलें. धनाजी जाधव वगैरे ताराबाईच्या पक्षाचे सेनापति सरदार शाहूराजे यांना फितुर झाल्यानें परशुरामपंतांचा मोड होऊन ते साताऱ्यास आले. नंतर शाहूराजांनीं सातारा हस्तगत करून परशुरामपंतांना कैद केलें. हें वर्तमान ताराबाईना समजतांच त्यांनीं रामचंद्रपंतांना बंधमुक्त करून रांगण्यास आणिलें. आणि आपला मुलगा शिवाजी व सावत्र मुलगा संभाजी या दोघांना रामचंद्रपंतांच्या मांडीवर बसवून राज्यसंरक्षण करण्याविषयीं त्यांची विनवणी केली, तेव्हां रामचंद्रपंत पुनः राज्यकारभार चालवूं लागले. इचलकरंजीचे संस्थापक नारो महादेव व घोरपडे यांची त्यांना उत्तम प्रकारची मदत होती. रामचंद्रपंतांचें मन वळविल्यावर, त्यांच्यामार्फत धनाजी जाधव, खंडो बल्लाळ व परशुरामपंत यांनाही शाहूकडून फोडून, आपल्या पक्षास आणण्याचा ताराबाईनीं प्रयत्न केला. ( खंड ८, ले. ६४-६६ ) पण त्यावेळीं त्यांचा तो बेत फारसा सिद्धीस गेला नाहीं.

**१०. शाहूराजे यांचा बादशाही कृपेविषयीं उपक्रमः—** राज्याभिषेकाच्या वेळीं शाहूराजे यानीं आपला वकील बादशहाकडे पाठवून कळविलें कीं, " आमची चुलती व सर्व नोकर लोक मिळोन फिसात करून आम्हांवर फौजा रवाना केल्या. आम्हांस बुडवावें, आपण राज्य करावें, अशीं चित्तीं द्वेषबुद्धि धरून असें केलें. त्यास बादशाही हुकुमानें देशीं राज्यावर आलों तों हा प्रसंग पडला त्यास, श्रीवरें शूरत्वें करून लढाई केली, तों बादशाही कृपेकरून फत्ते पावलों. नोकर लोकांस धरून नसेती केल्या. बंदोबस्ती करण्याचा क्रम चालला आहे. बादशहांचा हुकूम कीं, ' मनुष्य जरबेंत राखावें, रयत लोकांचें संरक्षण करावें, इनसाफ बराई खुद जातीनें पाहवी, बंडें बुडवावीं म्हणजे धका नाहीं. त्याप्रमाणे हुकूम चित्तीं दृढतर धरून हिंदु-

शास्त्राप्रमाणें राज्यपद्धतीनें चालत आहों. ही खबर कळावी म्हणून अर्जी देऊन वकील पाठविले. त्यांनीं हुजूर अर्जदास्त रसीद करून तुम्हांकडील नौकरांचे मुखें साकल्य मजकूर श्रुत केला. तुम्हांस जमेदारीबद्दल पेशजी फर्मान मिळाला आहे, त्याप्रमाणें मुलकाचा वगैरे बंदोबस्त ठेवून कायम झालां, हा फायदा तुम्हांस बादशाही कृपेनें झाला हा संतोष मानीत आहों. ' रायभानजी राजे भोंसले हा शाहूराजे यांचा वकील बादशहाकडे जा ये करीत होता. या वेळीं शाहूराजे बादशाही कृपेंत व सेवेंत किती एकचित्त होते, त्यांना बादशाही पाठबळ कसें होतें व बादशहा शाहूराजांना मुसलमानी-धर्मरक्षक, बादशाही कृपेचे उमेदवार, इस्लामी धर्मरक्षकाचे पुत्र अशीं गौरवयुक्त पत्रें पाठवून त्यांचा आपल्या संरक्षणाच्या पंखाखालीं कसें प्रोत्साहन देऊन सांभाळ करण्याचा प्रयत्न करीत होता हें दिसून येईल. या वेळीं दिल्लीच्या तख्तावर सुलतान मुआझिम हा औरंगजेबाचा वडील मुलगा आरूढ झाला होता, अजीमशहा दक्षिणेंतून दिल्लीचें तख्त घेण्याकरतां शाहूराजे यांची मुक्तता करून जो पुढें सरसावला तो आग्रानजीक जाऊन पोंचला. अजीमशहाची व मुआझिमची लढाई आग्राजवळच झाली. त्यामध्यें अजीमशहा व त्याचे दोन पुत्र मारले गेले. मुआझिमला विजय मिळाला व त्यानें आपणाला बहादूरशहा हा किताब घेऊन तो औरंगजेबानंतर दिल्लीपति बनला. पुढील चार पत्रें बहादूरशहानें शाहूराजे यांना लिहिलेलीं आहेत. तीं पत्रें शाहूराजे साताऱ्याच्या गादीवर आरूढ होण्यापूर्वीचीं आहेत. त्या पत्रांवरून शाहूराजे बादशहाच्या मदतीवर व प्रोत्साहनावर ताराबाईबरोबर लढत होते हें लक्षांत येईल. हीं पत्रें मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८ वा यांत पत्र नंबर ५४, ५५, ५६, ५७ अशीं प्रसिद्ध झालेलीं आहेत.

---

अलीफ ता. ११ मे १७०७.

सर्व राज्यांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, मुसलमानी धर्मरक्षक, राजे शाहू यांनीं बादशाही सरकारास संतोष मानून समजावें कीं, महंमद अजीम

मारिला जाऊन इकडील फत्ते झाल्यानंतर काय म॥ झाले ते लिहिण्यांत येत आहे कीं, खुजस्ते बखतर यांचें दैव फिरल्यामुळें त्याणें आपले कामगाराचें सांगणें ऐकून इकडील लोभावर लक्ष न ठेवितां लढाईस आला होता. तो छ १० सफर रोज सोमवारीं आपले पुत्रासुद्धां मारला गेला, व कितेक लोक कांहीं कामास आले. ऐशियास तुह्मीं या गोष्टीचा संतोष मानून अशी ताकीद ठेवावी कीं, तुमचे फौजे पै॥ कोणी पादशाही मुलखांत पैगामा करूं नये आणि रयतेस इनाम देऊन हे सर्वकाळ इकडील लोभास आपले उद्योगाचें कारण समजत जावें. छ. १९ सफर सन १ जुलूस.

---

अलीफ तारीख १९ मे सन १७०७

राजे शाहू याणीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें कीं, तुमचें पत्र पावून लोभास कारण झालें. तुह्मास मनसब व दहाहजारी स्वाराची सरदारी दिली असे. व बाकीचे व तुमचे सर्व म॥ सैद अबदुलखान बहादूर कुतबुल मुलख याजकडे सांगितले आहे त्याप्रों अमलांत आणावें आणि आपला वकील एक तुमचें येणें येथें होई त्यापूर्वी पाठवून द्यावा. ह्मणजे मनसबेच्या सनदा सरकारांतून तयार करविल्या जातील. छ. २७ सफर सन १ जुलूस.

---

अलीफ. तारीख २३ जून सन १७०७

सर्व शूरांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, इस्लामी धर्मरक्षकाचे पुत्र, राजे शाहू याणीं पातशाही कृपेतें संतोषी होऊन जाणावें कीं:—तुह्माकडील रायभान वकील याणीं विनंति केली जे, तुह्मीं आपले जहागिरीचे महाली आल्यानंतर इकडे यावयाचा इरादा केला आहे, याजकरितां राणीनें (ताराबाईनें) जमीदारीचा फर्मान मिळावा ह्मणोन कृत्रिमानें अर्जी लिहिली होती. तिला व तिचे चिरंजीवास कपटी समजोन त्याचें उत्तर दिल्हें नाहीं. कारण कीं, आमचे मुलखांतील राज्य जमीदारी तुह्मांकडे असावी आणि तुह्मी आपले वडिलाप्रमाणें तेथें कायम रहावें. नंतर जे किल्ले थोरले पातशाहींतील त्या

वेळेस हातीं आले नउते तेहि फौज पाठवून घ्यावे. जाणोन तुह्मी आत्मिक असें समजोन ह्या फर्मान पंज्यासुद्धां लिहिला आहे. तरी तुह्मीं आपले फौजेसुद्धां जलद येथें येऊन पोहोंचणें. ह्मणजे तुह्मांवरी कृपा आणि लोभ वारंवार उत्कृष्ट होईल. छ. ४ माहे रबिलाखर सन १ जुलूस.

या पत्रांत बहादूरशहानें शाहूराजे यांना 'इस्लामी धर्मरक्षकाचे पुत्र' असें ह्मटलें आहे. याचा अर्थ असा आहे कीं, या वेळीं बहादूरशहा हे दिल्लीच्या तख्तावर बसल्यामुळें इस्लामी धर्माचे रक्षक बनले होते. शाहूराजे हे औरंगजेबाचे नातू समजले जात होते. तेव्हां ते आतां बहादूरशहाला पुत्राच्या स्थानीं आले या नात्यानेंच त्यांनीं वरील विशेषण त्यांना दिलें आहे. तसेंच पुढें 'तुह्मी आत्मिक' असा जो शब्दप्रयोग केला आहे तोही त्याच भावनेचा द्योतक आहे. अर्थात् शाहूराजे यांचे ठिकाणीं बहादूरशहाची पुत्रासमान आत्मिक भावना उत्पन्न झाल्यामुळें ताराबाई व शिवाजीराजे हे त्यांना कपटी वाटणें स्वाभाविक होतें. शिवाय ते बहादूरशहाला व दिल्लीच्या तख्ताला शत्रुस्थानीं होते.

---

अलीफ तारीख १९ आगष्ट सन १७०७

सर्व राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर मुसलमानी धर्मरक्षक, राजे शाहू यांणीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें, कीं सांप्रत ईश्वर कृपेंकरून आमची फत्ते होऊन सिंहासनाधिरूढ झालो. तुमचे निष्ठेविशीचा मजकूर अमीरुल उमराव यांणीं समजाविला. ऐशीयास तुम्हीं पेशजी प्रों. इकडील लक्षांत वागवोन मशारनिल्हे लिहितील तशी वर्तूणूक करीत जावी. छ २ जमादिलाखर सन १ जुलूस.

---

याप्रमाणें वरील चार पत्रें शाहूराजे यांना दिल्लीपतीकडून आल्यानंतर त्यांच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं सातारा काबीज केल्यानंतर स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. त्यानंतर आपला वकील बादशहाकडे पाठवून 'बादशाही कृपें-

निष्ठूरपणा दिसून येतो. परंतु हिंदुपदपातशाहीच्या तत्वाच्या चष्म्यांतून पाहिलें असतां तीच आज्ञा यथार्थ होती असें ह्मटल्याशिवाय राहवत नाहीं. छत्रपति शिवाजी महाराजांचें भोंसले घराणें अस्सल क्षत्रियांचें होतें. ते स्वतः सिंहाच्या मनोधर्माचे होते. शिवाजीमहाराज स्वतः औरंगजेबांच्या कैदेंत पडले त्यावेळीं त्यांनीं त्याचें दास्यत्व पतकरलें नाहीं. ते स्वपराक्रमावर शत्रूचा बंदिखाना फोडून बाहेर पडले. त्याच विक्रमशाली नरश्रेष्ठांचे शाहूराजे हे साक्षात् नातू असतां ते शत्रूची कृपा संपादन करून व आपल्या पायांत परवशतेच्या शृंखला अडकवून घेऊन ज्याअर्थीं त्यांच्या सिंहासनावर आरूढ होण्याकरतां येत आहेत, त्याअर्थीं ते त्यांचे नातू खास नव्हेत, भोंसले घराण्यांतील कुलदीपक पुरुष नव्हेत अगर हिंदुपदपातशाहीचे खरे वारसदार नव्हेत असेंच ताराबाईंना वाटणें व पटणें अपरिहार्य होतें. भोंसले घराण्यांतील पुरुष सिंहाच्या मनोधर्माचेच असले पाहिजेत. ते शेळी मेंढीच्या मनोधर्माचे आहेत अशी त्यांची खात्री होऊन त्यांना अवसर दिला तर भोंसले घराण्याचा सर्व नांवलौकिक जाईल याच तात्विक पायावर त्यांनीं शाहूराजे यांना तोतया कल्पून मारण्याची आज्ञा दिली. शत्रूलाही मारण्याची आज्ञा देतांना विचार पडतो, मनही कळवळून जातें, पण ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष पुतण्या, रक्ताचा संबंधी अशाला मारण्याची आज्ञा देतांना ताराबाई ज्या अर्थीं यत्किंचितही मनोभावनेला बळी पडल्या नाहींत त्याअर्थीं त्या असामान्य तत्वनिष्ठ होत्या असें मोठ्या अभिमानानें व गौरवानें ह्मणावें लागेल.

**१२. शाहूचे मांडलिक होण्यास ताराबाई नाकबूलः**-शाहूराजे यांनीं आपणाला राज्याभिषेक करून घेतल्यानंतर लेगेच चार दिवसांनीं म्हणजे तारीख १६ जानेवारी सन १७०८ रोजीं ताराबाईबरोबर तडजोड करून लढाई निकालांत आणावी अशी मसलत त्यांनीं सुरू केली. या वेळीं ताराबाई या कोल्हापूर पन्हाळाप्रांतीं होत्या. तोच दक्षिणेकडील मुलुख त्यांना तोडून द्यावा [ खंड २० पत्र २८२] व त्यांनीं इतःपर आपल्या वाटेला न जातां आणि आपल्या ताब्यांत राहून सुखानें नांदावें [ इतिहास संग्रह प्राचीन मराठे सरदार

करून फत्ते पावलों; नोकर लोकांस धरून नसेती केल्या; बंदोबस्त करण्याचा क्रम चालला आहे.' अशा प्रकारचा बादशाही आज्ञेवरहुकूम आज्ञापालनत्वाच्या कामगिरीचा अहवाल त्याला सादर करण्यांत आला. त्याचप्रमाणें ताराबाई व त्यांचे नोकर यांनीं आपलेबरोबर कलह उत्पन्न करून 'आम्हांस बुडवावें, आपण राज्य करावें, अशी चित्तीं द्वेषबुद्धि धरून' लढाई केली. वगैरे ताराबाईच्या पक्षासंबंधीं बादशहाचें मन जास्त कलुषित होईल असाही अहवाल त्यांनीं पेश केला. या एकंदर हकीकतीचा विचार करतां औरंगजेबाकडून मराठी राज्य जिंकण्याची जी कामगिरी झाली नाहीं ती त्यांच्या नातवाच्या करवीं म्हणजे शाहूराजे यांचे हस्तें बादशहानें चालविली होती हें उघड उघड दिसून येतें. याचकरतां वकीलामार्फत वरील अहवाल पेश केल्यानंतर 'मुल्काचा वगैरे बंदोबस्त ठेऊन कायम झालां, हा फायदा तुम्हांस बादशाही कृपेनें झाला हा संतोष मानीत आहों.' असे उद्गार परत जबाबांत शाहूराजे यांना बादशहाकडून आले. शाहूराजे यांच्या वारसाहक्काचें राज्य औरंगजेबानें बुडविलें. संभाजी महाराजांचा वध केला. शाहूराजे यांना कैद करून नेलें या प्रमाणें प्रत्यक्ष राज्यबुडवेगिरीचें कृत्य प्रत्यक्ष बादशहाकडून झालें असतां त्यावर अगदीं काळा पडदा टाकून 'हा फायदा तुम्हांस बादशाही कृपेनें झाला' असे उद्गार काढून शाहूराजे यांच्या शिरावर आपल्या उपकाराचें ओझें लादतात व तें शाहूराजे आनंदानें मस्तकीं धारण करतात हें पाहिलें म्हणजे परवशतेच्या जबरदस्त शृंखलांनीं ते कसे बद्ध झाले होते व त्यांनीं नूतन स्थापन केलेली मराठशाहीची साताराची गादी कशा परवशतेच्या स्वरूपाची होती याची कल्पना येईल. मोंगलांच्या दास्यत्वांतील साताराची गादी व छत्रपति शिवाजी महाराजांच्या परंपरेतील पन्हाळ्याची गादी अशा दोन निरनिराळ्या परंपरेच्या मराठशाहीच्या गाद्या शाहूराजे यांच्या राज्याभिषेकामुळें झाल्या हें स्पष्ट होतें. यापुढील राजकारणें या तीव्र मतभेदाच्या स्वरूपाचीं दिसून येतील.

११ **ताराबाई निर्भेळ स्वातंत्र्यवादी व तत्वनिष्ठ**:—ताराबाई

या निर्मळ स्वातंत्र्यवादी होत्या. पारतंत्र्याचा लवलेशसुद्धां त्यांना सहन होण्यासारखा नव्हता. एकदां एक तत्व अंगिकारलें ह्मणजे भावनेच्या तडाक्यांत न सांपडण्याचा त्यांचा मनोधर्म होता. त्यामुळें कित्येक वेळां त्या निष्ठूर अहित असाही भास होत असे. हट्टी, दुराग्रही असेंही कित्येकांना वाटत असे. त्या तत्वनिष्ठ असल्यामुळें कांहीं प्रसंगीं नुकसानीचे प्रसंगही त्यांचेवर ओढवले जात असत. परंतु त्या सर्व गोष्टी तत्वपालनाकरतां त्यांना सहन कराव्या लागत होत्या. पन्हाळ्याच्या मराठशाहीचे मुख्य आधारस्तंभ जे रामचंद्रपंत अमात्य यांनासुद्धां ताराबाईनीं केवळ तत्वाकरतां दया दाखविली नाहीं. परतंत्र शाहूराजे यांना ते सामील आहेत याच केवळ संशयावरून त्यांनीं त्यांना कैद करून किल्यावर डांबून ठेवलें. त्या वेळीं त्यांनीं आपलें अगर आपल्या मुलांचें किंवा आपल्या राज्याचें पुढें काय होईल याचासुद्धां विचार केला नाहीं. त्या वेळीं प्रत्यक्ष आपला पुतण्या शाहूराजे मोंगलांचें पाठबळ घेऊन आपल्याशीं लढाई देण्याकरतां सज्ज होऊन आला आहे, त्याला आपलेच सरदार फितुर झालेले आहेत अशा स्थितींत रामचंद्रपंतासारख्या मुख्य शहाण्या प्रधानाला कैद केलें तर आपला पुढें निभाव कसा लागेल, याचीही कल्पना त्या स्त्रीला शिवली नाहीं यावरून त्या केवढ्या तत्वनिष्ठ होत्या याची सहज कल्पना येते. तत्वाकरतां निष्ठुर व्हावें लागतें, तत्वपालनाकरितां नाशही सोसावा लागतो. तरच तें तत्व शुद्ध स्वरूपांत जिवंत राहतें आणि तरच त्याची कदर लोकांनाही वाटूं लागते. शिवाजी महाराजांनीं हिंदुपदपातशाहीच्या विरुद्ध संभाजी महाराज मोंगलांना फितुर झाले, ह्मणून पुत्रवात्सल्याची भावना अंतःकरणांतून दूर सारून त्यांना पन्हाळ्यावर कैदेंत ठेवलें. महाराणा प्रतापसिंह यांनीं मोंगलांचें दास्य स्वीकारावयाचें नाहीं या तत्वाकरतां, भयंकर हानि सोसून अनंत संकटांना तोंड दिलें, पण परवशता स्वीकारली नाहीं. पुराणकालीं हरिश्चंद्रानें केवळ तत्व आणि सत्व पालनाकरितां आपल्या राज्याचा त्याग करून स्वतःला, स्वपत्नीला आणि स्वपुत्रालाही विकून घेतलें. त्यानेंही अनंत संकटपरंपरेला अत्यंत समाधानानें तोंड देऊन आपल्या प्रेमभावनांची

होळी करून घेतली पण तत्वभंग होऊं दिला नाहीं. बळीराजानेंसुद्धां तत्व-पालनाकरितांच आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेतला. अशीं दिव्य प्रभावी अनंत उदाहरणें भारतवर्षाच्या इतिहासांत चिरस्मरणीय ह्मणून नमूद होऊन राहिलेलीं आहेत. तत्व हें अमर असतें. तें जसें मरत नाहीं तशीं तत्वनिष्ठ माणसें जरी बाह्यात्कारी मेलेलीं दिसलीं तरी तीं तत्वरूपानें अमरच असतात. भावनानिष्ठ माणसांबरोबर त्यांच्या भावनाही मरून जात असतात.

अशाच थेर आणि प्रभावशाली एका क्षत्रिय स्त्रीचें ताजें उदाहरण ताराबाईच्या डोळ्यापुढें खेळत असावें असें अनुमान केल्यास तें यथार्थच ठरेल. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळीं चितोड अगर उदेपूरच्या शिसो-दिया राजघराण्याची भोंसले घराणें हें एक शाखा आहे असें मान्य करण्यांत आलेलें होतें. तेव्हांपासून अर्थात् शिसोदिया राजघराण्याचा इतिहास ह्मणजे भोंसले घराण्याचा पूर्वेतिहास होऊन बसला. पूर्वेतिहासाच्या ओघांतून जाण्याचा ताराबाईचा स्वभावधर्म असल्यामुळें ती अनुकरणवृत्ति ताराबाईच्या अंगीं कशी वसत होती याची कल्पना पुढील इतिहासावरून लक्षांत येईल. मारवाड देशाचा राजा जसवंतसिंग राठोड हा शहाजहान बादशहाच्या वेळीं मारवाडच्या गादीवर विराजमान झाला. तो मोठा शूर व पराक्रमी असल्यानें त्याचेबरोबर उदेपूरच्या महाराणाजींनीं आपली कन्या चंद्रावती हिचा विवाह केला. पुढें दिल्लीपति शहाजहान हा आजारी पडला तेव्हां त्याच्या पश्चात् दिल्लीच्या तख्ताच्या आधिपत्याबद्दल त्याच्या मुलांत रणें माजलीं. शहाजहानचा वडील मुलगा दारा हा कायदेशीर वारस असतां औरंगजेबानें बंड उभारून आपण तख्त हस्तगत करण्याचा प्रयत्न चालविला. त्या वेळीं दाराच्या मदतीकरतां जसवंतसिंग रजपूत सैनिकांच्या सेनेसह औरंगजेबाबरोबर सामन्याला गेला. ही लढाई उज्जनीच्या दक्षिणेस १५ मैलांवर फत्तेहाबाद येथें झाली. या वेळीं रज-पुतांनीं आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली. सुमारें पंधरा हजार रजपूत औरंगजेबाच्या असंख्य सैनिकांचे बळी घेऊन धारातीर्थी पतन पावले. शेवटीं जसवंतसिंगाजवळ फक्त चारपांचशेंच लोक राहिले, व त्यांना शत्रूनें घेरलें

त्या वेळीं तो शत्रूची फळी फोडून बाहेर निघाला; आणि आतां शत्रूसैन्याच्या रेट्यापुढें आपला थोड्याशा लोकांचा निभाव लागणार नाहीं म्हणून त्यानें माघार घेतली. तो तसाच स्वदेशीं परत येण्याकरतां निघाला. राणी चंद्रावती ज्या किल्ल्यावर राहत होती त्या ठिकाणीं जसवंतसिंग जेव्हां येऊन पोंचला तेव्हां राणी चंद्रावतीनें आपल्या पतीचें स्वागत न करतां त्याचा धिःकार करावा ह्मणून मोठ्या निष्ठुरतेनें तिनें किल्ल्याचे दरवाजे लावून घेण्याची किल्लेदाराला आज्ञा दिली*, आणि आपल्या घराण्याचा कीर्तिकलंक जो

---

* ANNALS AND ANTIQUITIES OF RAJASTHAN

*By Lieutenant Colonel James Tod.* page 656 Vol. 1

*Bernier*, who was present, says, I cannot forbear to relate the fierce reception which the daughter of the Rana gave to her husband Jeswant-Sing, after his defeat and flight. When she heard he was nigh, and had understood what had passed in the battle; that he had fought with all possible courage; that he had but four or five hundred men left; and at last, no longer able to resist the enemy, had been forced to retreat; instead of sending some one to condol him in his misfortunes, she commanded in a dry mood to shut the gates of the castle, and not to let this infamous man enter; that he was not her husband; that the son-in-law of the great Rana could not have so mean a soul; that he was to remember, that being grafted into so illustrious a house, he was to imitate its virtue; in a word, he was to vanquish, or to die. A moment after, she

जसवंतसिंग तो आपला पतीच नव्हे ह्मणून त्याला किल्ल्यांत प्रवेश न करूं देण्याबद्दल तिनें बजाविलें. राणी चंद्रावतानें आपल्या सेवकांकडून राजा जसवंतसिंग याला किल्ल्याबाहेर जो निरोप पाठविला त्याचा भावार्थ असा होता कीं, 'माझा पति विक्रमशाली उदेपूरच्या महाराणाजींचा जांवई आहे. तो सिंहाच्या मनोवृत्तीचा असून निधड्या छातीचा आहे. तो राठोड घराण्याचा

---

was of another humour; she commands a pile of wood to be laid, that she might burn herself; that they abused her; that her husband must needs be dead; that it could not be otherwise. And a little while after, she was seen to change countenance, to fall into a passion, and break into a thousand reproaches against him. In short, she remained thus transported eight or nine days, without being able to resolve to see her husband, till at last her mother coming, brought her in time to herself, composed by assuring her that as soon as the Raja had but refreshed himself he would raise another army to fight Arungzebe, and repair his honour. By which "story one may see" says Bernier, "a pattern of the courage of the women in the country;" and he adds this philosophical corollary on this and the custom of suttees, which he had witnessed. "There is nothing which opinion, prepossession, custom, hope, and the point of honour, may not make men do or suffer."

*Bernier's* History of the late Revolution of the the Empire of the Mogal. fol. p. 13 ed. 1684.

अस्सल जातिवंत क्षत्रिय असून तो आपल्या घराण्याची निष्कलंक कीर्ति आपल्या समशेरीच्या अजिंक्य सामर्थ्यावर रक्षण करणारा आहे. तो शत्रूच्या सामन्यांत विजय संपादून एक परत तरी येईल किंवा धारातीर्थी पतन पावून तेथें आपल्या अमरकीर्तीचें मंदिर तरी उभारील. राणी चंद्रावती ही उदेपूरच्या महाराणाजींची कन्या आहे. तिलाही या दोनच अवस्था माहीत आहेत. विजयी नरश्रेष्ठाची सहधर्मचारिणी ह्मणून ती या भरतखंडांत एक सजीव तरी राहील किंवा पतीच्या चितेवर आरूढ होऊन स्वर्ग तरी गांठील.' या आपल्या प्रेमळ पत्नीच्या संदेशानें जसवंतसिंग पहिल्यानें मनांत फार ओशाळला, पण नंतर त्यानें अशी प्रतिज्ञा केली कीं, शत्रूशीं पुनः सामना देऊन विजय संपादीन तेव्हांच चंद्रावतीचें मुखावलोकन करीन. पुढें त्यानें नवीन फौज तयार केली व औरंगजेबावर चाल करून त्याचा अलाहाबादेच्या उत्तरेस कुजवा येथें मोड करून विजय संपादिला, आणि नंतरच आपल्या पत्नीचें दर्शन त्यांनीं घेतलें. ही हकीकत वाचली ह्मणजे प्रत्यक्ष राजाच्या आज्ञेविरुद्ध राणी जाते व तिची आज्ञा राजाचे सेवक मान्य करून किल्ल्याचे दरवाजे बंद करतात, आणि राजा हें सर्व मान्य करून परत फिरतो हा सारा प्रभाव तत्त्वनिष्ठेचा आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

वरील हकीकत पाहिली ह्मणजे तत्वनिष्ठ स्त्रिया कशा स्वाभिमानी व प्रभावशाली असतात याची कल्पना येईल. ताराबाई अगदीं याच बाण्याच्या होत्या. त्यांना शिसोदिया-भोंसले घराण्याचें ब्रीद रक्षण करावयाचें होतें. याकरतां शाहूराजे ज्यावेळीं मोंगलांचे अंकित होऊन हिंदुपदपातशाहीच्या गादीवर येण्याचा प्रयत्न करूं लागले. त्या वेळीं त्यांनीं धनाजी जाधव व परशुरामपंत यांना अशी आज्ञा केली कीं, 'शाहू तोतया असो वा खरा असो त्याला मारून टाका.' अशी त्यांनीं आज्ञा दिली असा प्रवाद आहे. ही त्यांची आज्ञा खरी आहे असें गृहित धरून चालल्यासही ती भोंसले घराण्याच्या पूर्वपरंपरेला कशी अनुसरून होती हें वरील उदाहरणावरून लक्षांत येईल. ताराबाईच्या वरील आज्ञेंत सकृद्दर्शनीं अत्यंत कठोरपणा, अत्यंत

पृ. १०-१२ ] असें शाहूराजे यांचें धोरण होतें. पण ताराबाईनीं शाहूराजे यांच्या या तडजोडीच्या भाषणाला भीक घातली नाहीं. ज्यांनीं दिल्लीपती-बरोबर सतत सात वर्षें लढाई दिली परंतु तडजोडीची भाषा केली नाहीं त्या शाहूराजे यांच्या तोडजोडीला कशा तयार होणार ! त्या दिल्लीपतीच्या मांडलिक म्हणवून घेण्यास जेथें तयार नव्हत्या तेथें मांडलिकाचे मांडलिक किंवा चाकराचे पडचाकर होण्यास त्या कशा तयार होणार ? त्यांनीं शाहूराजे यांच्याबरोबर निकराचा सामना देण्याचा संकल्प केला. त्यांनीं प्रसिद्ध रांगणा गडाची उत्तम प्रकारें मजबुती करून लढाईची सर्व साधनसामुग्री तेथें आणून ठेविली. आंग्रे व वाडीकर सावंत यांचें ताराबाईना पाठबळ होतें. त्याच-प्रमाणें संताजी घोरपडे यांचा पुतण्या सिधोजी हिंदुराव हा बलवान सरदार ताराबाईच्या पक्षाला होता. अशा प्रकारें आपल्या पक्षाची ताराबाईनीं सिद्धता करून शाहूराजे यांच्या पक्षांत आपल्याकडून फितूर होऊन निघून गेलेले व शाहूराजे यांचें बूड स्थिर करणारे धनाजी जाधव आणि खंडो बल्लाळ यांस व परशुरामपंत यांस पत्रें लिहून त्यांना आपल्या पक्षांत घेण्याचाही उद्योग त्यांनीं आरंभिला. तीं पत्रें खालीं दिलीं आहेत.

श्री तारीख २३ मे सन १७०८ इ.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी संवत्सरे ज्येष्ठ चतुर्दशी मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाशिवछत्रपति यांणीं समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति जतन मुलुख यास आज्ञा केली ऐसीजे:—तुमचेविशीं कित्येक राजश्री रामचंद्रपंडीत अमात्य यांगीं विनंति केली त्यावरून विदित जाहालें. ऐसियास, तुम्ही स्वामीचे एकनिष्ठ, विश्वासू, कार्यकर्ते, सेवक आहां. तुमची ही निष्ठा स्वामीच्या पायाशीं आहे. याकरितां सर्वप्रकारें तुमचें चालवणें स्वामीस अगत्य आहे. तरी तुम्हीं सर्व प्रकारें आपलें समाधान असो देऊन कांहीं अनमान न करितां व कांहीं संदेह न धरितां तेथून निघोन सदुबा यासहवर्तमान स्वामीसंनिध दर्शनास येणें. स्वामी तुमचें पूर्ववत् विशेषात्कारें चालवितील. येविशीं सवि-

स्तर पंडित मशारनिल्हेनीं लिहिलें आहे. त्यावरून कळों येईल. बहुत लिहिणें. सुज्ञ असा. मर्यादेयं विराजते. ( म. इ. सा. खंड ८ पत्र नं. ६५ )

श्री तारीख २३ मे सन १७०८ इ.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३५ सर्वधारी संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध चतुर्दशी मंदवासर क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणीं राजमान्य राजश्री खंडप्रभू चिटनवीस यास आज्ञा केली ऐसीजेः—तुमचेविशीं कित्येक राजश्री रामचंद्रपंडीत अमात्य यांणीं विनंति केली त्यावरून कळों अलें. ऐसियास, तुम्ही स्वामीचे कदीम विश्वासू सेवक आहां तुमचें हातें सेवा घेऊन तुमचें चालवणें स्वामीस अगत्य आहे. याकरितां कांहीं संदेह न धरितां, व अनमान न करितां विलंब न लावितां, तेथून स्वार होऊन स्वामीसंनिध दर्शनास येणें. स्वामी तुमचें पूर्ववत् चालवितील. येविशीं आनसारिखें न मानितां सिताब स्वार होऊन येणें. येविशीं सविस्तर पंडित मशारनिल्हेनीं लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. ( म. इ. सा. खंड ८ पत्र नं. ६६ ) जाणिजे. बहुत काय लिहिणें. मर्यादेयं विराजते.

श्री तारीख २३ मे सन १७०८ इ.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३५ सर्वधारी संवत्सरे, ज्येष्ठ शुद्ध चतुर्दशी मंदवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति यांणीं समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशराम पंडित प्रतिनिधि यास आज्ञा केली ऐसीजेः— तुमचेविसीं कितिएक राजश्री रामचंद्रपंडित अमात्य याणीं विनंती केली. ऐसियास, तुह्मीं स्वामीचे, हितकृतकर्मे, विश्वासू सेवक आहां. तुमचें सर्व प्रकारें चालवणें स्वामीस अगत्य आहे. याकरितां तुह्मीं कांहीं संदेह न धरितां व कांहीं अनमान न करितां पत्रदर्शनीं स्वार होऊन संतुबा यासहवर्तमान निघून स्वामी संनिध दर्शनास येणें. स्वामी तुमचें पूर्ववत् चालवितील. येविशीं आन सारिखें कांहीं न मानितां सत्वर येणें. येविशीं पंडित मजकूरनिल्हेनीं लिहिलें आहे, त्यावरून कळों येईल. बहुत लिहिणें. सुज्ञ असा. मर्यादेयं विराजते.

हीं तीनही पत्रें शाहूराजे यांनीं राज्याभिषेक करून घेतल्यानंतर अवघ्या चार साडेचार महिन्यांनीं एकाच दिवशीं लिहिलेलीं आहेत. धनाजी, परशुरामपंत व खंडोबल्लाळ चिटणीस हे त्रिवर्ग ताराबाईच्या पक्षाचे आधारस्तंभ होते. ते शाहूराजे यांना मराठी राज्याचे खरे वारसदार समजून त्यांना सामील झाले होते. धनाजी व चिटणीस हे रामचंद्रपंतांच्या प्रोत्साहनानें शाहूराजांना मिळाले होते. परशुरामपंतांचें व रामचंद्रपंतांचें वैमनस्यच होतें. अशा परिस्थितींत ताराबाईनीं आपले सर्व प्रयत्न संपले तेव्हां पूर्वीच्या कर्त्या लोकांचीं आर्जवें करून त्यांना आपल्या पक्षाला ओढून घेण्याचा हा प्रयत्न केला असावा असें ह्मणतां येण्यासारखें आहे. परंतु रामचंद्रपंत अमात्य यांच्या बाबतींत मात्र तसें ह्मणतां येणार नाहीं. ते छत्रपति शिवाजी महाराजांपासून अमात्याचें काम जबाबदारीनें करीत आले होते. ते मोठे राजकारणी मुत्सद्दी होते. राज्याचें हिताहित त्यांना चांगलें समजत होतें, अशी त्यांची प्रसिद्धी होती. शाहूराजे ने यांचे हितचिंतक होते म्हणून ते त्यांना फितूर आहेत या संशयावरून ताराबाईनीं त्यांना कैदेंत ठेविलें होतें. अशी सर्व त्यांची पूर्वपीठिका असतांना ते या वेळीं ताराबाईचा पक्ष जोरांत उचलून धरून आपला प्रतिपक्षी परशुरामपंत व एकदां शाहूराजे यांचा पक्ष स्वीकारा म्हणून प्रोत्साहन दिलेले धनाजी आणि खंडो बल्लाळ यांना पुनः ताराबाईच्या पक्षाला सामील होण्याबद्दल ज्या अर्थीं सविस्तर पत्रें लिहितात त्या अर्थीं ताराबाईचा पक्ष हाच सत्पक्ष होता अशी त्यांची खात्री झाल्यामुळेच त्यांनीं अशीं पत्रें लिहिण्याचें धाडस केलें होतें हें स्पष्ट दिसतें. ताराबाईनीं आपलीं मुलें रामचंद्रपंतांच्या मांडीवर आणून बसविलीं व त्यांचें रक्षण करण्याकरतां त्यांना विनविलें म्हणून तेवढ्यावर भावनावश होऊन ते मराठी राज्याचा नाश करण्यास खात्रीनें प्रवृत्त झाले नसते. रामचंद्रपंत तत्वनिष्ठ होते. शाहूराजे हे मराठी राज्याचे खरे वारस असें त्यांना प्रामाणिकपणें वाटत होतें; ह्मणूनच त्यांनीं बालशिवाजी राजांच्या मुंजीला प्रथमतः विरोध दर्शविला. परंतु शाहूराजे येऊन त्यांनीं आपणांला राज्याभिषेक करून घेतला व साताऱ्याची गादी ही मोंगलांच्या मांडलिकाची गादी ह्मणून प्रस्थापित झाली

असें जेव्हां त्यांना दिसून आलें तेव्हां मात्र ताराबाईचा पक्ष सत्पक्ष आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यांना शाहूराजे वारस ह्मणून पाहिजे होते पण ते स्वतंत्र असे पाहिजे होते. परकीय सत्तेचे सेवक बनलेले त्यांना नको होते. याकरितांच त्यांनीं धनाजी वगैरेवर सोडलेला आपला मंत्र आणि परशुरामपंत प्रतिनिधी यांच्याविषयींचा विरोध परत घेतला व त्यांना आपल्या पक्षाला येऊन मिळण्याची विनंति केली.

१३ **शाहूंची ताराबाईवर मोहीम**:—ताराबाई आपल्या तडजोडीच्या प्रयत्नाला भीक घालीत नाहीं असें शाहूराजे यांना दिसून आल्यामुळें त्यांनीं त्यांचें पारिपत्य करण्याचें ठरविलें. त्यांनीं सन १७०८ च्या फेब्रुवारी महिन्यांत ताराबाईवर चाल केली. 'कुच करून पन्हाळियावर गेले. तेथून पंचगंगेवर गेले.' ( खं. ३ पत्र ६४ ) पन्हाळ्यास मोर्चे लाविले. इतक्यांत ताराबाई पन्हाळ्यावर होत्या त्या शिवाजी व संभाजी यांना बरोबर घेऊन रांगण्यास गेल्या. शाहुराजे यांनीं पन्हाळगड व पावनगड हे जिंकून घेतले. मार्गांत वसंतगडही हस्तगत केला. परशुराम त्रिंबक प्रतिनिधी याचे कारभाऱ्यानें विशाळगडही शाहूराजे यांच्या स्वाधीन केला. शाहूराजे यांनीं आपलें ठाणें कोल्हापुरीं ठोकलें; व तिकडील प्रांताचाही बंदोबस्त त्यांनीं केला. नंतर त्यांचा रांगण्यावर हल्ला चढविण्याचा मनसुबा ठरला. तेव्हां ताराबाईनीं आपल्या मदतीस वाडीकर खेम सावंत व कान्होजी आंग्रे यांना रांगण्याच्या बचावाकरितां बोलाविलें. शाहूराजे यांनीं मार्च महिन्याच्या सुमारास रांगण्याला वेढा दिला. हल्ला करून किल्ला घेण्याचा हुकूम सोडून स्वतः शाहूराजे फौजेबरोबर घोड्यावर बसून डोंगर चढत असतां घोड्याचा पाय अकस्मात घसरला. त्यावेळीं खंडो बल्लाळ चिटणीस जवळ होते. त्यांनीं एका झाडाला आपल्या पायाचा नेट देऊन घोडा ओढून धरला, आणि शेखमिरा जवळ होता, त्यानें शाहूराजे यांना एकदम खालीं ओढून घेतलें. त्यामुळें त्यांचे जीव वांचले. शाहूराजे हे प्रत्यक्ष रांगण्याच्या हल्यांत सामील आहेत असें पाहून रामचंद्रपंतांनीं ताराबाई व दोघां राजपुत्रांना चोरवाटेनें किल्याबाहेर काढून मालवणाकडे लावून

दिलें आणि सेनापति पिराजी घोरपडे व त्याचा मदतनीस नारोपंत यांसह आपण आंत राहून शाहूराजे यांचेबरोबर किल्ला लढविला. शेवटीं रांगणा किल्ला शाहूराजे यांना हस्तगत करतां आला नाहीं. पुढें पावसाळा अगदीं डोक्यावर आला. तेव्हां रांगण्याची आशा सोडून परत फिरण्याचा सल्ला धनाजी जाधव यांनीं दिल्यामुळें वेढा उठवून ते परत फिरले. तारीख १२ मार्च सन १७०८ ला शाहूराजे यांचा मुक्काम रांगण्याचे बाजूस चिकेवाडी, पाटगांव, माणगांव येथें होता. ( खंड १५ पत्र नं. ५९ ) पुढें तारीख २४ जूनला ते पन्हाळ्यावर असल्याचा उल्लेख आहे. ( खं. जु. ऐ. गो. भाग २ पृ. १४ ) यावरून रांगण्याखालीं शाहूराजे यांचा तळ सुमारें तीन महिने झाला. तारीख ३१ मार्चला ताराबाई लिहितात 'शाहूराजा रांगण्याखालें गोऊन पडला आहे. त्या संधीमध्यें ज्यांनीं त्यांनीं कार्यें करून दाखवावीं.' ( खंड पत्र ६८) हमीदखान, हिंदुराव घोरपडे व नारो महादेव एकत्र झाले होते. विजापुरास दाखल होऊन चालोन यावें असें केलें आहे. त्यामाजी त्याप्रांतें फौजबंदी येत आहेत. घोरपड्यांचा हिसाब आहे असें नाहीं, मारून गर्देस मिळविले जातील. रांगणेकर वळवळ करतात, त्यांस फावेलें, इत्यादि मजकूर शाहूराजे यांनीं शंकराजी महाडिक यास लिहून आपल्या मदतीस बोलाविलें. ( प्रा. म. स. पृ. १८ ) रांगण्यावर मोर्चे देऊन लढाईचें काम जें काय झालें तें बहुधा परसोजी भोंसले यांनीं केलें. 'धनाजी जाधव वगैरे मंडळीचें लक्ष लढण्याकडे फारसें नव्हतें. तो व आणखी पुष्कळ मंडळी शाहूपासून देशमुखी वतनांच्या सनदा करून घेण्यांत दंग होती. या देशमुखीच्या तंट्याचे या वेळचे कितीतरी कागद उपलब्ध आहेत. जगदाळे व पिसाळ यांचे खटले धनाजीच्या आग्रहावरून चालू होते. त्यांत विरुद्ध बाजूनें हिंदुराव घोरपडे सामील झाला. अमात्याचा मुतालिक असलेला बाळाजी विश्वनाथ, सचिवाचा मुतालिक दत्ताजी शिवदेव, नारोराम शेणवी ही मंडळी शाहूबरोबर असून, लढण्यापेक्षां तडजोडींतच दंग असावी. रामजी नारायण कोल्हटकरास पाटगांवचे मुक्कामींच परसोजीचे मध्यस्थीनें शाहूनें वृत्ति करून दिली. (खंड ३-१८३)

'कोल्हापूरचे देशमुखीचें वतन कै. काकास्वामींनीं (राजारामानें) खंडेराव दाभाडे यांस दिलें होतें. ते स्वामीच्या पायाशीं विरुद्धाचरण करून बदलोन गेले. यानिमित्त त्यांचें वतन दूर करून स्वामींनीं दरुणी-महाराज दुसारा वाडा [दुसरी बायको] यांस दिलें, त्यांनीं तें मानीव पुत्र फत्तेसिंग भोंसले यांस दिलें. [पे. द. पृ. १२ (ता. ७ जुलै १७०८)]. अशा अनेक भानगडी मिटवीत असतां, ताराबाई रांगण्यांतून निघून गेलीसें पाहून, पावसाळा आल्यामुळें, मोर्चे कायम ठेऊन, शाहू पन्हाळ्यास परत आला; आणि याच सुमारास ह्मणजे जून १७०८ त, सेनापति धनाजी जाधव वारणेच्या कांठीं वडगांव येथें पायाचा व्रण असाध्य होऊन मरण पावला. तेणेंकरून पुढील राजकारणास थोडेंबहुत निराळें वळण लागलें. [म. रि. मध्यविभाग १ पान १७].

**१४ शाहूराजे ताराबाईपुढें हात टेंकतातः**—सन १७०८च्या अखेरीस शाहूराजे यांनीं ताराबाईबरोबर लढण्याचा नाद सोडून देऊन ते आपली फौज घेऊन साताऱ्यास आले. तेव्हां ताराबाई यांनीं आणखीं जमाव करून व वाडीकर सावंत यांची कुमक घेऊन मालवणाहून त्या रांगण्यास आल्या. पन्हाळ्यास पूर्वी ताराबाई यांचा जो हवालदार होता त्यालाच शाहूराजे यांनीं कायम केलें होतें. त्याच्याशीं भेद करून ताराबाईनीं पन्हाळा किल्ला काबीज केला; नंतर त्या पन्हाळ्यावर राहण्यास आल्या. शाहूराजे यांनीं परसोजी भोंसले यांना कोल्हापूर प्रांताचा बंदोबस्त पहाण्याकरतां मागें ठेवलें होतें. तरीसुद्धां कोल्हापूर प्रांत त्यांनीं हस्तगत केला. शाहूराजे यांनीं वारणेच्या हद्दीपर्यंत ताराबाईच्या वाटेला जावयाचें नाहीं असें आपल्या मनाशीं ठरविलें होतें असें दिसतें. ताराबाईच्या हालचालींना पायबंद असावा म्हणून कृष्णा व वेण्या या दोन नद्यांच्या मधील प्रदेशांत परसोजी भोंसले शाहूराजे यांच्या आज्ञेप्रमाणें वावरत होते. पुढें ते श्रीकृष्णा-वेण्या संगमीं मौजे खडसा जिल्हा पंवाई येथें सन १७१०त मृत्यू पावले. [नागपूरकर भोंसले यांचे कागदपत्र लेखांक ५०] याप्रमाणें ताराबाई शाहूराजे यांच्याशीं झालेल्या या रणसंग्रामांत विजयी झाल्या.

——

# प्रकरण १० वें

## ताराबाईचा अपूर्व त्याग.

१. ताराबाई व शाहूराजे हे उभयतां धनी आपलेच. २. बादशहाची आगींत तेल ओतणारी तोड. ३. ताराबाईचा पक्ष बळावत चालला. ४. चंद्रसेन जाधव व बाळाजी विश्वनाथ यांची चुरस. ५. चंद्रसेन जाधव यांची प्रतिज्ञा. ६. राजकलहाचा प्रवाह स्वराज्यांत वाहूं लागतो. ७. चंद्रसेन जाधव ताराबाईच्या पक्षांत सामील होतात. ८. शाहूराजे यांची हालाखी. ९ पक्षबलवर्धन म्हणजे लष्करी सामर्थ्याचा पाठिंबा. १०. धाकटे शिवाजीराजे यांच्या मरणकालाचा निर्णय. ११. धाकटे शिवाजीराजे यांच्या जन्मकालाचा निर्णय. १२. कोल्हापूरच्या राजक्रांतीची कारणमीमांसा. १३. ताराबाईचा अपूर्व त्याग.

**१. ताराबाई व शाहूराजे हे उभयतां धनी आपलेचः—** शाहूराजे मोंगलांच्या कैदेंतून सन १७०७ च्या मे महिन्यांत सुटून दक्षिणेंत आले. त्यांनीं सन १७०८ च्या जानेवारी महिन्यांत साताऱ्यास आपली स्वतंत्र गादी स्थापन करून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. त्यांनीं ताराबाईबरोबर रांगण्याचा रणसंग्राम केला पण तेथून सन १७०८ च्या जून महिन्यांत पलट खाऊन ते मागें फिरले व पुनरपि ताराबाईनीं सन १७०८ च्या डिसेंबर अखेरपर्यंत पन्हाळा, विशाळगड, कोल्हापूर वगैरे प्रांत व कृष्णा वारणा संगमापर्यंतचा मुलुख काबीज करून आपला अंमल सुरूं केला. हा सुमारें दीड वर्षांचा काल ताराबाई व शाहूराजे यांच्या केवळ वारसाहक्काच्या

कलहांत गेला व त्याला साताराची गादी व पन्हाळ्याची गादी असें कायमच्या दुहीचें स्पष्ट स्वरूप आलें. दोन्ही शाखा शिवाजी महाराजांच्या प्रत्यक्ष वंशजांच्या असल्यामुळें वरिष्ठ वा कनिष्ठ या भेदाशिवाय त्यांत इतरांना कोणताच दोष दिसण्यासारखा नव्हता. शाहूराजे यांची ताबेदारी केली तरी ती मराठी राज्याचीच होती किंवा ताराबाईची केली तरी ती मराठी राज्याचीच होती असें दोन्ही राज्यांतील प्रजाजनांना, परस्परांच्या आप्तसंबंधी लोकांना, सरदारांना, प्रधानांना वाटत होतें. त्यामुळें या भाऊबंदी तंट्याबाबत विशेष असें कोणाला कांहीं प्रथमतः वाटलें नाहीं. दोन्हीही धनी आपलेच या भावनेनें या दोन्ही कलही पक्षांना आपापल्या बुद्ध्यनुरूप ते सहाय्य देऊं लागले. हें सहाय्य देण्यांत प्रत्येक पक्षांतील इसमानें आपला नजीकचा आप्तसंबंध, स्वतःचा फायदा, स्वतःचा पराक्रम दिसून येईल अशा कार्यक्षेत्राची निवड, हा भाऊबंदी तंटा मिटल्यानंतर विजयी पक्ष कोणता होईल आणि आपलें स्थान कोणतें कायम राहील या विषयींची दक्षता वगैरे दृष्टीनें विचार केलेला होता.

**२. बादशहाची आगींत तेल ओतणारी तोडः**— अशाप्रकारें स्वतंत्रपणें विचार करण्याचें मुख्य कारण पुढीलप्रमाणें होतें. 'ताराबाईशीं झगडण्यांत शाहूचा मुख्य आधार बादशहाकडचा होता. ( मराठी रियासत मध्यविभाग १ पान २३ ). सन १७०७ च्या जून महिन्यांत औरंगजेबाचा पुत्र अजमशहा मारला जाऊन जुलईत बहादूरशहानें आपण बादशहा झालों ही खबर शाहूस कळविली; आणि त्यास दहा हजारी मनसब देऊन, ताराबाईच्या अर्जाला न जुमानतां, शाहूस फौज घेऊन आपल्या मदतीस बोलाविलें. सन १७०७ च्या नोव्हेंबरांत रजपुतान्यांतील बंडावे मोडण्यासाठीं बादशहा तिकडे गेला आणि तिकडील व्यवस्था लावून स. १७०८ च्या मार्च महिन्यांत अजमीर येथें आला. तेव्हां त्यास वर्तमान समजलें कीं, दक्षिणेंत विजापूर येथें कामबक्षानें बादशाहीपद धारण केलें आणि स्वतंत्र नाणीं पाडिलीं.' तेव्हां कामबक्षावर चालून जाण्यासाठीं बहादुरशहा मे महिन्यांत नर्मदा उत-

रून अलीकडे आला आणि नोव्हेंबरांत बेदरपर्यंत येऊन पोंचला. जेव्हां त्यानें शाहूराजे यांची मदत मागितली तेव्हां, त्यांनीं नेमाजी शिंदे यांला बादशहा-च्या मदतीकरतां पाठविलें. तारीख ९ जानेवारी सन १७०९ रोजीं हैदराबाद-नजीक लढाई होऊन त्यांत कामबक्षाचा शेवट झाला. ह्या मदतीबद्दल बादशहानें मराठे सरदारांचा मोठा गौरव केला. ही संधि साधून शाहूराजांनीं आपले वकील बादशहाकडे पाठवून सरदेशमुखीच्या हक्कांची सनद करून मागितली. ही विनंति मान्य करून बादशहानें शाहूराजांना सनदा द्याव्या, असा झुल्पिकारखानाचा आग्रह पडला. इतक्यांत ताराबाईनीं आपले वकील बादशहाकडे पाठवून वरील सरदेशमुखीच्या हक्कांची मागणी केली. तेव्हां ताराबाईच्या या मागणीस खानखानान मुन्यिमखान वजीर यांनीं पाठिंबा दिला. झुल्पिकारखान यानें शाहूच्या पक्षाची व खानखानान यानें ताराबाई-च्या पक्षाची शिफारस करण्यांत इतकी शिकस्त केली कीं, बादशहांना या दोघांपैकीं कोणाचेंच मन मोडवना. सरदेशमुखीचीं फर्मानें लिहूनसुद्धां तयार झालीं होतीं. तेव्हां बादशहाच्या दरबारीं अशी शक्कल निघाली कीं, शाहू व ताराबाई ह्यांनीं आपसांत लढून भांडणाचा निकाल करावा, नंतर विजयी पक्षाला सनदा देण्यांत येतील.' ही तोड बादशहाला पसंत पडली. ही तोड म्हणजे मराठ्यांच्या आपसांतील कलहाग्नींत तेल ओतणारीच होती. त्याप्रमाणें ताराबाई व शाहूराजे यांच्या पक्षांतील राजकारणें सुरू होऊन विजयी पक्ष कोणता हें ठरवून घेण्याची त्यांच्यामध्यें अहमहमिका सुरू झाली.

३ **ताराबाईचा पक्ष बळावत चालला:**—"भाऊबंदकीच्या या झगड्यांत लोकांच्या मनांत लढण्याचा आवेश बिलकूल नव्हता असें म्हटलें तरी चालेल. स्वतः ताराबाई मात्र त्वेषानें लोकांस भर देई, शिवाजीच्या नांवानें अनेक आज्ञापत्रें काढी, आणि शाहूस मिळणाऱ्यांचीं जोराजोरानें निर्भर्त्सना करी. तिच्या तोंडावर उलट बोलण्याची छाती नसल्यामुळें लोक होस हो म्हणत, आणि दूर गेल्यावर स्वार्थाकडे नजर देऊन प्रसंग पडे तसें वागत. आपआपल्या वतनाबद्दल इकडे शिवाजीच्या व तिकडे शाहूच्या,

दोघांच्याही सनदा ते मिळवून ठेवीत. कारण न जाणों, उद्यां जो अधिकारावर कायम होईल त्याची मर्जी राखणें त्यांस जरूर होतें. ‘ शाहूराजे यांजकडील कागदपत्र माणूस आपणाकडे आले नाहींत. जर ही गोष्ट आपणाकडे शाबीत जाहली तरी स्वामीनें शासन करितील त्यास मान्य आहों. आज्ञा जाहलिया सेवेसीं येऊं ह्मणून कित्येक तपसिलें भावभक्तिनिष्ठेनें लिहिलें तें विदित झालें. तुह्मी वृत्तिदार एकनिष्ठ वर्तणूक करीत असतां, नसतें तुफान तुह्मांवर कोण ठेवूं पहातो ! हुजूर दर्शनास येणें.’ असें ता. १०-११-१७०७ रोजीं शिवाजी ज्या वतनदारास लिहितो त्यासच पुढें तीन महिन्यांनीं तारीख २ मार्च १७०८ रोजीं शाहू लिहितो, ‘ तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन एकनिष्ठेचें वर्तमान लिहिलें तें सर्व विदित झालें. तरी तुह्मी राज्यांतील वतनदार, तुमचें हातें प्रयोजन घेऊन स्वामी चालवितील. स्वामींचें दर्शनास येणें.’ या मासल्यांचे कागद शेंकडों असून त्यांवरून लोकांस या घरगुती झगड्यासंबंधानें काय वाटत होतें याची कल्पना होते.” (म. रि. मध्यविभाग १ पान १८.)

“ शाहू सातारा प्रांतीं आला ह्मणजे ताराबाई व तिचे साथीदार कोल्हापूर प्रांतीं दंगा करीत. व तो कोल्हापूर प्रांतीं गेला ह्मणजे ते सातारा प्रांतीं दंगा करीत. हा खेळ १७०८ पासून १७१० च्या जूनपर्यंत एकसारखा चालला होता. आप्पाजी थोरात, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे, रामचंद्र निळकंठ अमात्य, खेम सावंत, उदाजी चव्हाण, कान्होजी आंग्रे व शंकराजी नारायण सचिव ह्यांनीं पुण्यापासून कोल्हापूरापर्यंत ताराबाईच्या वतीनें दंगा चालविला होता. धनाजी जाधव सेनापति, हैबतराव निंबाळकर सरलष्कर, खंडेराव दाभाडे, मानसिंग मोरे, परसोजी भोंसले, चिमणाजी दामोदर, खंडो बल्लाळ, बहिरोपंत पिंगळे, वगैरे मंडळी शाहूकडे होती. शाहूच्या हातांत साक्षात् मुलुख ह्मटला ह्मणजे साताऱ्याच्या भोंवतालील पांच पंचेवीस मैलांपेक्षां जास्त नव्हता. सुप्याकडे दमाजी थोरात, भोराकडे शंकराजी नारायण सचिव, फलटणाकडे शहाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण मिरजेकडे, खेम सावंत दक्षिण कोंकणांत व कान्होजी आंग्रे उत्तर कोंकणांत

ताराबाईच्या वतीनें भांडत होते. मोंगलाच्या तर्फेनें उगाच ढोंग करून खटाव-करानें कृष्णेच्या पलीकडील सगळा माणदेश आटोपला होता. परशरामपंत प्रतिनिधि अटकेंत असून त्याच्या औंध वगैरे प्रांतांत शाहूच्या विरुद्ध खटपट चालू होती. १७१०त शाहूची अशी भयंकर स्थिति होती. १७०७ पासून १७१० पर्यंत लढून शाहूची सत्ता पांचपंचेवीस मैलांपलीकडे फारशी पसरली नव्हती; परंतु ताराबाईचा व शिवाजीचा पक्ष दिवसेंदिवस बळावतच चालला होता. १७१०त त्यांनीं कोल्हापुरास आपली कायमची राहण्याची जागा केली." ( खंड २ पान ९ )

**४ चंद्रसेन जाधव व बाळाजी विश्वनाथ यांची चुरसः—** धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर शाहूराजांनीं त्याचा मुलगा चंद्रसेन याला सेनापतीचीं वस्त्रें दिलीं. शाहूराजे यांचा पक्ष नेस्तनाबूद करण्याचा ताराबाईचा प्रयत्न जोरानें चालू होता. शाहूराजे यांच्या पक्षांतील सरदारांना फोडून आपल्या पक्षांत सामील करून घेणें ही जशी खटपट इतर सरदारांच्या बाबतींत त्यांची चालू होती तशीच ती चंद्रसेन जाधव यांचे बाबतींतही होती. सन १७१० मध्यें दमाजी थोरात, उदाजी चव्हाण वगैरे ताराबाईच्या पक्षाच्या सरदारांवर सेनापति चंद्रसेन जाधवराव यांस शाहूराजे यांनीं रवाना केलें व त्यांचा बंदोबस्त करून मोंगलाईतील मराठ्यांचे हक्क, चौथाई, सरदेशमुखी व घांसदाणा हेही वसूल करण्याचें काम त्यांस सांगितलें. त्या वेळीं चंद्रसेन जाधवराव यांनीं बाळाजी विश्वनाथभट यांस बरोबर घेतलें. " एके दिवशीं लष्कर कूच करीत असतां एक हरिण उठलें. त्याचे मागें बाळाजीच्या पथकांतील पिराजी राऊत नांवाचा सरदार लागला. पळतां पळतां पुढें मुक्कामावर डेरे राहुट्या लागल्या होत्या, त्यांत व्यासराव म्हणून जाधवरावांकडील एक ब्राह्मण कारकून होता, त्याचे राहुटींत तें हरण शिरलें. त्याबरोबर व्यासराव व पिराजी यांचा तंटा लागला. पिराजी आपली शिकार मागूं लागला. व्यासराव ह्मणाला, ' आह्मीं ब्राह्मण, आमचे राहुटींत आलें त्याचें संरक्षण आह्मीं करणार. ' शेवटीं पिराजीनें भाला टाकला तों व्यासराव पुढें झाला; त्यास तो लागला. जखम झाली.

हे वर्तमान पिराजीनें बाळाजीस जाऊन कळविलें. इकडे व्यासरावानें जाधवरावाकडे फिर्याद केली. तेव्हां पिराजीस आमचे स्वाधीन करा असें जाधवरावानें बाळाजीस कळविलें. बाळाजीनें उत्तर दिलें, 'पिराजी आह्मांस शरण आला आहे, त्यास जी शिक्षा करावयाची ती आह्मीच करितों.' त्यावरून दोघेही आग्रहास पडले. जाधवरावानें फौज रवाना केली. व पिराजीस पकडून आणण्यास सांगितलें. तेव्हां बाळाजी आपल्या पथकासह कूच करून निघाला. जाधवरावानें पाठलाग सुरू केला. तेव्हां बाळाजी पळत पळत पुरंदर किल्ल्यावर सचिवाच्या आश्रयास गेला. त्याउपर जाधवरावानें बारामतीवरून सुप्यास येऊन पुरंदरास शह दिला, व सचिवास सांगून पाठविलें कीं, बाळाजीस काढून द्या नाहीं तर, तुमचा खराबा करूं.' यावरून सचिवानें बाळाजीस घालवून दिलें. बाळाजी बाहेर पडून कुटुंब, मुलें व अंबाजीपंत पुरंदरे यांसह निघून, पांच सातशें नवे स्वार ठेऊन निरेवर आला. तेथें लढाई होऊन बाळाजी पराभव पावला. तेव्हां तो परिंचे गांवावरून पांडवगडच्या रानांत शिरला, त्या वेळीं बाळाजीच्या शिलेदारांत पिलाजीराव जाधव वाडीकर व परिंच्याचे नाथाजी धुमाळ हे दोन गृहस्थ होते; त्यांनीं हरप्रयत्न करून बाळाजीस कुटुंबासह पांडवगडच्या किल्यावर सुरक्षित पोंचविलें.

**५ चंद्रसेन जाधव यांची प्रतिज्ञाः**—"पांडवगडाहून बाळाजीनें ही हकीकत महाराजांस कळविण्याकरितां अंबाजी पुरंदरे यांजला सातान्यास पाठविलें. अंबाजी व खंडो बल्लाळ यांचा स्नेह होता. त्यांच्यामार्फत शाहूस सर्व हकीकत कळली, तेव्हां त्यानें बाळाजीस सातान्यास बोलावून घेतलें व त्यास आश्रय दिला. त्याजबरोबर चंद्रसेन जाधवरावांनीं निरोप पाठविला कीं, 'स्वामींनीं बाळाजीस माझे स्वाधीन करावें. त्यास आश्रय दिल्यास आह्मांस महाराजांचे पाय सुटतील. परंतु शाहूनें बाळाजीस घालवून देण्याचें नाकारलें व चंद्रसेन जाधवराव यांजवर हैबतराव निंबाळकर यास पाठविलें. हें प्रकरण विकोपास न जावें ह्मणून शाहूनें खटपट केली. पण ती गोष्ट चंद्रसेन जाधवराव यांस मान्य झाली नाहीं. चंद्रसेन पांडवगड सोडून निघाले. त्यांची व

हैबतरावांची गांठ आंदरकीच्या घाटाखालीं जेऊर येथें पडून एक लढाई होऊन, हैबतराव माघारी फिरले व चंद्रसेन जाधवराव पन्हाळ्यास जाऊन उघडपणें ताराबाईस मिळाले. त्यांनीं वडगांव, कुमठें ऊर्फ गुमठें, शिरोळ व कोल्हापूर हीं सर्व ठाणीं शाहू महाराजांशीं लढून घेतली. व ताराबाई-साहेबांकडे दिलीं. पुढें कागलकर घाटगे व दुसरे काटक लोक जमवून ते बाळाघाटीं निघून गेले आणि तेथें त्यांनीं प्रतिज्ञा केली कीं, शाहूमहाराजांबरोबर लढून त्यांस गादीवरून दूर करून ताराबाईसाहेब यांचे चिरंजीव शिवाजी-महाराज यांस गादीवर बसवून मराठेशाही एकछत्री करावी व शाहूमहाराजांचा पराभव करावा. तरच अंगावर दुसरीं वस्त्रें घ्यावींत." (मराठा कुळांचा इतिहास पान ७८.)

**६ राजकलहाचा प्रवाह स्वराज्यांत वाहूं लागतोः—** अशा प्रकारें प्रत्यक्ष सेनापति व शाहूराजे यांच्यामध्यें शत्रुत्व उत्पन्न झालें. सेनापतीच्या आज्ञेचें सरदार उल्लंघन करूं लागले. सरदारांचा शिपायांवर धाक राहिला नाहीं. राजाचा प्रधानांवरील विश्वास उडाला. आपल्याच राज्यांतील मुलुखाची खराबी होऊं लागली. आपल्याच लोकांचें पारिपत्य करण्याची कामगिरी आपल्याच राज्यांतील लोकांवर येऊं लागली. 'चंद्रसेन जाधवराव सेनापति, शंकराजी नारायण सचिव, प्रतिनिधि, व अमात्य वगैरे जुने सरदार यांच्या मतें मराठेशाहीवर एकट्या भोंसले घराण्याचा हक्क नसून, दक्षिणेंतील मराठे, ब्राह्मण, प्रभु वगैरे जातींची सत्ता आहे, असें होतें; व या प्रत्येक लोकांस आपला हात राज्यकारभारांत पूर्ण असावा असें वाटत होतें. शाहू हा राज्याधि-कारास हापापलेला असून राज्यकारभार चालविण्यास नालायक होता. अशी या लोकांची समजूत होती. [ म. कु. इ. पान ७७ ] मराठी राज्याच्या आधारस्तंभांची अशी समजूत झाल्यानें राज्यकारभारांतील एकसूत्रीपणा नष्ट होत चालला. धनी व चाकर ही भावना राज्यकारभारांतील लोकांमध्यें जी अवश्य लागते ती मलीन आणि विकृत होऊं लागली. धन्याला चाकरांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रसंग येऊं लागला. प्रजेवरील राजबंधनें ढिलीं पडूं

लागलीं. त्यामुळें ताराबाई व शाहूराजे यांच्या गृहकलहाचें पर्यवसान प्रत्येक प्रधानाच्या, सरदाराच्या व इतर नोकर वर्गाच्या घरांत होऊं लागलें. हा राजघराण्यांतील कलहाचा प्रवाह क्रमाक्रमानें मराठेशाहींत सर्वत्र पसरण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

**७ चंद्रसेन जाधव ताराबाईंच्या पक्षांत सामील होतातः—** अशी सर्व परिस्थिति असतांना चंद्रसेन जाधव यांनीं वरील प्रतिज्ञा केली. ती फलद्रूप व्हावी ह्मणून त्यांनीं ताराबाईच्या पक्षाला बळकटी आणण्याचा जो प्रयत्न केला त्याची हकीकत त्यांच्या पत्रव्यवहारावरून स्पष्टपणें येण्यासारखी आहे. चंद्रसेनांनीं ताराबाईना जें पत्र पाठविलें त्यांतील मजकूर पुढें दिल्याप्रमाणें आहे. " आपण लिहिलें कीं, आमचे एकनिष्ठ स्वामींचे चरणीं, स्वामींची सेवा करावी व यश कीर्ति संपादावी. राजश्री जाधवराव [ धनाजी जाधवराव ] स्वामींचे पायांव्यतिरिक्त दुसरें दैवत जाणत नव्हते. राज्यांत दुही निर्माण झाली. ते प्रसंगीं त्यांनीं प्रतिज्ञा पुरस्सर स्वामि सन्निध बोलून स्वार झाले. धनसिंग जाधवराव यांनीं ताराबाईसाहेब यांजवळ ' शाहूशीं लढाई देऊन त्याचा मोड करीन ' अशी प्रतिज्ञा केली होती; परंतु धनसिंग जाधवराव यांनीं शाहूशीं लढाई न देतां उलट त्यांस गादीवर बसविलें. त्या योगें राज्यांत दुफळ्या झाल्या. परंतु कालगतीनें सर्वांची बुद्धि एका प्रकारें झाली. तत्मुळें त्यांचा हेतु पूर्ण करावा, हें अंतःकरणीं धरून, आजपर्यंत याच मानीं राहून; राजश्री अपाजी थोरात, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे आदिकरून सामील करून घेऊन, शाहूशीं केल्या लोभाचीं आस्था न धरतां, त्यासही वैमनस्य दर्शवून, प्रतिनिधि व रा. खंडेराव दाभाडे, स्वामींच्या लोभाचे सेवक, त्या प्रसंगांत आणावे, त्या अर्थें आपल्या समाधानास या उभयतांस पाठविणें, म्हणून मुद्दाम सांगून पाठविलें. त्यावरून उभयतांस पाठवून दिलें; त्यांच्या व आपल्या भेटी जाहल्या व रा. हैबतराव निंबाळकर ह्यांचीही भेट जाहली. तों अगोदर आपण, रा. थोरात, खंडेराव दाभाडे, संताजी पांढरे बसोन घाट घातला होता, तो निंबाळकर यास सांगतांच त्यांचे चित्तीं हेंच होतें.

मग आह्मीं अवघे वर्तमान सरदार कटांत घेऊन प्रनिनिधि यांस विचारांत घेतलें. स्वामींची द्वाही फिरविली. खुशाली केली. आणि गड किल्ल्यांस आह्मीं आपलीं व पंडित मशार निल्हेचीं पत्रें पाठविलीं आहेत. या उपरी नीट सातारिया खालें चालून जाऊन राज्यांतील दुही निःशेष करितां स्वामींनीं खुशाली केली पाहिजे " [ म. रि. मध्यविभाग पान ३४–३५. ]

या चंद्रसेन जाधवरावांच्या पत्रास शिवाजीमहाराजांचे नांवें ताराबाईनीं लिहिलेलें उत्तर पुढीलप्रमाणें आहे. " आपण लिहिलेलें वर्तमान श्रवणगोचरें करून संतोषातिशय झाला. तो पत्रारूढ किती काय ह्मणून करावा ? कार्य-कर्तव्य, पराक्रमी, मायेचे हिंदुसेवक असावे, ते तुह्मांसारिखेच कृतकर्मे असावे. रा. जाधवराव ( धनाजी ) यांनीं कै. रा. स्वामींचे ( राजाराम ) वेळेपासून राज्याभिवृद्धीविषयीं केले श्रमसाहस, व सांप्रत दुहीमुळें राज्याभिवृद्धीस झालेला अपाय, चित्तांत आणून पुढें स्वामींचें राज्यवृद्धीतें पाववून यशकीर्ती संपादावी हें मनीं धरून, जो अर्थविशदें लिहिला, तो उचित व यथार्थित लिहिला. तरी तुह्मी दीर्घद्रष्टेच आहां. हें राज्य समग्र ताम्राकांत झालें असतां कै. स्वामींनीं लहानापासून थोरास आपली माया लावून, अवधियांवरी सदयत्वें कृपामृतवृष्टी करून दिनप्रतिदिनीं राज्य वृद्धिंगत पावविलें, ते प्रसंगीं कै. स्वामींचें संपूर्ण कृपेस पात्र एक जाधवराव मात्र झाले, ते आपल्या कर्तृत्वावरी व हुकूमबारदारी एकनिष्ठेवरी झाले. राज्याभिवृद्धीविषयीं त्यांहीं कांहीं सामान्य कसाला श्रमसाहस केला नाहीं. जीविताची तमा न धरितां स्वामीकार्यींच तत्पर राहिले...तों दुहीचा प्रसंग प्राप्त झाला. दुही निःशेष करावी ह्मणून स्वार होऊन गेले. त्यास विपरीत कालवशें सर्व लोकांस एकप्रकारें मोह प्राप्त झाला, त्यामुळें मशारनिल्हेचा कृतसंकल्प सिद्धातें न पावला. त्यांचे पुत्र तुह्मीं त्यांजसारिखे कृतकर्मे आहां. तुम्हांव्यतिरिक्त त्यांचा संकल्प आणखीं कोण शेवटास नेतो. राज्याभिवृद्धीचा उपाय मायेच्या सेवकाविना दुसऱ्याचे मनांत कसा येइल ? तरी दुही निःशेष करून स्वामींचें शासन चालविण्याचा संकल्प सफल करावा. प्रतिनिधी, दाभाडे व **मोरे यांस** एकाग्रतेनें जवळ आणावयाचा

विचार करून आपलें कर्तेपण प्रगट केलें ही गोष्ट कांहीं साहजिक केली नाहीं. हे तुमची दीर्घदृष्टी व मांगेजणीं व बुद्धीचें वैभव व शूरत्वाचा प्रसंग मनन करून पाहतां दुसरी साम्यता आहे असें नाहीं. तुम्हांसारिखे बुद्धिप्रगल्भ पराक्रमी पुत्र जाधवरावास होऊन स्वामींचे सेवेशीं तत्पर झाले. तुमच्या भरंवशानें स्वामी निश्चिंत आहेत, एकाग्रता होय तें करणें, आणि संतोषाचें वर्तमान हुजूर लिहून पाठविणें. प्रतिनिधीही स्वामींच्या मायेचेच सेवक आहेत. गडकिल्ले यांस त्यांहीं व तुह्मीं पत्र पाठविलीं हीं गोष्ट उत्तम केली. पुढेंही त्यास जें लिहिणें तें लिहावें. स्वामीनींही हुजूरहून गडकिल्यांस व हशम लोकांस पत्रें पाठविलीं आहेत. रा. हैबतराव निंबाळकर सरलष्कर यांची चित्तवृत्ती स्वामींचे चरणीं सदृढ आहे. त्यांस समाधानपत्र पाठवावें म्हणून लिहिलें. त्यांचें सर्वप्रकारें स्वामीस अगत्य आहे. हल्लीं तुमच्या लिहिण्यावरून स्वामीनीं त्यांस समाधानपत्र सादर केलें आहे. त्याचप्रमाणें थोरात, खंडेराव दाभाडे व संताजी पांढरे यांनीं तुमच्या चित्ताचे ठायीं एकरूप होऊन महत्कार्य संपादिलें; येणेंकरून स्वामी त्यांवर संतुष्ट आहेत. त्यांचींही पत्रें हुजूर आलीं होतीं, व स्वामीनीं त्यास चित्तानुरूप समाधानपत्रें पाठविलीं आहेत. तसेंच रा. मानसिंग मोरे, शहाजी निंबाळकर, आदिकरून कुल सरदारांस समाधानपत्रें पाठविलीं आहेत. अतःपर कोणी संशय मनांत आणावा असें नाहीं. मध्यें कांहीं दिवस कालाची गति कुटील होती, तथापि स्वामींच्या चित्तीं कोणा एकाचें वैषम्य किंवा संदेह नाहीं. अवघ्यांच्या विचारें स्वामीकार्याची सिद्धि करावी, अशीच स्वामीनीं अवघ्यास आज्ञापत्रीं आज्ञा केली आहे. सर्व गोष्टींनीं मातोश्रीसाहेब व स्वामी बहुत संतोषी आहेत. तुह्मी जें कर्तव्य लिहिलें तें निःशेष करून संतोषाचें वर्तमान लिहून पाठवावें." (म. रि. मध्यविभाग १ पान ३५-३६.

८. **शाहूराजे यांची हालाखीः**— हें पत्र तारीख २७ आगष्ट सन १७११ चें आहे. वरील दोन्हीं पत्रें वाचून मनन केलें असतां असें दिसून येईल कीं, चंद्रसेन जाधवरावांनीं शाहूराजे यांच्याविरुद्ध केवढें जबरदस्त

तुफान उठविलें होतें. पूर्वी शाहूराजांना मिळालेले बहुतेक सरदार चंद्रसेन जाधवराव यांनीं ताराबाईच्या पक्षाला सामील करवून घेतले होते. "ताराबाई व शाहू यांजमधील तंट्याचा निकाल चंद्रसेन जाधवराव व बाळाजी यांच्या कर्तबगारीवर अवलंबून होता. चंद्रसेन जाधवराव यांच्या हातांत सर्व फौज होती, व बाळाजीची कुटकारस्थानें चालू असून, चंद्रसेन जाधवरावांच्या हाताखालील फौजेंत फाटाफूट पडावी म्हणून सरदार लोकांस लालूच दाखवून आपले बाजूस आणण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता, व कांहीं शिलेदार नवीन भरण्याचें काम चालू होतें. या वेळीं शाहूकडे बाळाजी विश्वनाथ यानें जाधवरावांच्या सैन्यांतून फोडलेले हिंदोपंत बरेकर, नारोराम शेणवी, जीवनराम सुमंत औरंगाबादकर, कोकाटे व पिलाजी जाधव असे शिलेदार लोक आले. त्याजवळ फक्त दोन हजार फौज राहिली होती व चंद्रसेन जाधवराव यांजकडे मराठ्यांची मुख्य फौज व सरदार होते. ही सर्व फौज घेऊन नीट साताऱ्याखालीं चालून जाऊन जाधवरावांनीं साताऱ्यास वेढा घातला. तों शाहू महाराज बाळाजी विश्वनाथासह सिंहगडाकडे पळून गेल्याचें समजलें. त्याजवरून मंगळाच्या किल्ल्यास सोन्यारुप्याचे गोळे मारून वेढा उठवून चालते झाले. सेनापतींनीं कांहीं नवाबाकडील फौज कुमकेस घेऊन व पांढरे वगैरे सरदार घेऊन विरुद्धपक्षीय सैन्यावर चालून आले. तेथें लढाई बहुत मातबर झाली. प्रहर दोनप्रहर लढाई होऊन मोंगल लोक अडून उभे राहिले. नंतर बाळाजीपंत माळण्याच्या घाटाखालीं मैदानांत महाराजांसह पळाले. सेनापति नीरेवर येऊन उतरले व पुनः सिंहगड, पुणें वगैरे प्रांतीं लढाई देण्याचा त्यांनीं इरादा केविला. याप्रमाणें चंद्रसेन जाधवराव यांनीं महाराज व त्याबरोबर बाळाजी यांची खोड मोडून टाकली. ही वरील लढाई झाल्यानंतर शाहूची खरी स्थिति काय ? हें हैबतराव निंबाळकरास कळून आलें. ताराबाई व चंद्रसेन यांजकडून त्याजकडे बोलणीं आलीं. तेव्हां सर्व सरदारांनीं शाहूस सोडलें आहे असें पाहून हैबतरावही मनांतून ताराबाईकडे गेला. मात्र तसें त्यानें उघडपणें केलें नव्हतें. तथापि शाहूकडे आतां म्हणण्यासारखे सरदार कोणीच

राहिले नव्हते. परसोजी भोंसले ( सन १७१० मध्यें परसोजी भोंसले मरण पावले. यावेळीं त्यांचा मुलगा कान्होजी भोंसले हा सेनासाहेब सुभा होता. ) व चिमाजी दामोदर आपापल्या सैन्यासह वऱ्हाडांत होते. मुलुखगिरीवर असल्यामुळें राज्यपदाच्या तंट्यांत ते आपला संबंध ठेवीत नव्हते. अमृतराव बांडे नासिक-नंदुरबारकडे होता. बाळाजीनें नवीन ठेवलेल्या शिलेदार लोकांचें वजन लोकांत नव्हतें. अशा भयंकर अवस्थेंत शाहू सन १७११ मध्यें होता" [ जाधव घराण्याची कैफियत म. कु. इतिहास पान ८० ].

**९ पक्ष बलवर्धन म्हणजेच लष्करी सामर्थ्याचा पाठिंबाः—** हा वरील सर्व इतिहास लक्षांत घेतला म्हणजे ताराबाईचा पक्ष शाहूराजे यांच्यापेक्षां कितीपटीनें प्रबळ झाला होता हें दिसून येईल. ताराबाईच्या पक्षाचें कार्य असेंच आणखीं कांहीं दिवस पुढें चाललें असतें तर चंद्रसेन जाधवराव यांनीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें शाहूराजे यांचा पक्ष जमीनदोस्त होऊन मराठे शाहींतील दुही निःशेष झाली असती. सन १७०७ मध्यें ताराबाई व शाहूराजे असे दोनच पक्ष मराठे शाहींत उत्पन्न झाले. त्या पक्षांतील दुहीचें कारण एकच होतें. मराठी राज्याचे खरे धनी कोण ? शाहूराजे कीं शिवाजीराजे ? या एका दुहीच्या मुद्यावर सतत चार वर्षे उभयतांत रणसंग्राम झाला. या दुहीच्या रणसंग्रामाचें पर्यवसान परस्परांकडील प्रधान, सरदार यांच्या दुहींत होऊन त्या दुहीला चंद्रसेन जाधवराव व बाळाजी विश्वनाथ यांच्या दुहीचा नवीन अंकुर फुटला. शाहूराजे यांनीं बाळाजी विश्वनाथ यांना सेनाकर्ते हें पद देऊन त्यांची योग्यता वाढविल्यामुळें तर या दुहीच्या नवीन अंकुराला चांगलीच पालवी फुटली. सर्व साधारणपणें जिकडे जय तिकडे लोकमत अशी प्रथा पूर्वापार आहे. शाहूराजे यांना ताराबाईवर जय मिळूं लागला म्हणून शाहूराजे यांचेकडे लोकमत होऊन ताराबाई संकटांत आल्या. यावेळीं ताराबाईंना शाहूराजे यांच्यावर जय मिळूं लागला म्हणून शाहूराजे संकटांत पडले. कोल्हापूर किंवा सातारा या दोन मराठे शाहीच्या गाद्यांचीं तराजूचीं दोन पारडीं वजनदार होणें किंवा हलकीं होणें मराठे सरदारांच्या जुटीवर व लष्करी बळावर अवलंबून राहिलें. सेनापति

धनाजी जाधवराव शाहूकडे गेल्याबरोबर शाहूराजे यांचें पारडें जड झालें. शाहूराजे यांना आपला पक्ष जड करण्याकरतां त्यावेळीं धनाजी जाधवांच्या छावणींत वेषांतर करून घेऊन जावें लागलें व तेथें त्यांची मनधरणी करावी लागली. तोच प्रसंग या वेळीं प्रत्यक्ष जरी नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें चंद्रसेन जाधवराव यांच्याकरतां ताराबाईंना करावा लागून आपला पक्ष जड करून घ्यावा लागला. याचा भावार्थ एवढाच कीं, राज्यकारभाराच्या तराजूचा कांटा इतके दिवस दुही माजण्या पूर्वी जो छत्रपतिच्या हातीं होता तो यावेळीं सरदार लोकांच्या हातीं गेला होता. सरदार लोक ज्या गादीबद्दल आग्रह धरतील तीच गादी जिवंत ठेवणें हें सर्वस्वी त्यांच्या मर्जीवर अवलंबून राहिलें होतें. त्यामुळें सरदारांचा जिकडे जास्त फायदा तिकडे त्यांचा कल होणें स्वाभाविक होतें. सध्या कोर्टांत न्याय मागण्याकरतां वादी प्रतिवादी उभे राहिल्या नंतर परस्परांकडील साक्षीदार फोडण्याचा किंवा निवडणुकीच्या प्रसंगीं परस्परांकडील मतदार फोडण्याचा जसा उपक्रम होतो व त्यावेळीं वादी प्रतिवादीला अगर निवडणुकीच्या उमेदवारांना जसें साक्षीदारांच्या वा मतदारांच्या मर्जीवर व लहरीवर अवलंबून रहावें लागतें आणि ही चढउताराची अस्थिर स्थिति अखेरच्या निर्णयापर्यंत दोन्हीं पक्षांना जशी सारखीच सहन करावी लागते तशीच स्थिति ताराबाई आणि शाहूराजे यांची झाली होती यांत संशय नाहीं. ताराबाई व शाहूराजे यांचा सरदारांबरोबर झालेला पत्रव्यवहार मननपूर्वक वाचला म्हणजे याची सत्यता पटल्याशिवाय राहणार नाहीं.

**१०. धाकटे शिवाजीराजे यांच्या मरणकालाचा निर्णयः-** वर दर्शविल्याप्रमाणें ताराबाई यांचा पक्ष शाहूराजे यांच्या पक्षापेक्षां कितीतरी पटीनें प्रबळ झाला असतां तो एकदम कसा निर्बल झाला याबद्दल ताराबाईचा पुत्र शिवाजी मृत्यू पावला हें एका पक्षाचें एक विधान व शिवाजीला आणि ताराबाईला संभाजीनें कैदेंत टाकून आपण गादीवर बसला असें दुसरें विधान अशीं दोनच विधानें आजपर्यंतचे इतिहासकार पुढें ठेवतात. " त्याच महिन्यांत [ सन १७१२ च्या जानेवारी महिन्यांत ] ताराबाईचा पुत्र शिवाजी

यास देवी येऊन तो मेला. तेव्हां रामचंद्रपंत यानें ताराबाईला राज्यकार्यांतून काढून राजसबाईचा पुत्र संभाजी यास शिवाजीचे जागीं स्थापून मोठ्या दक्षतेनें आपण कारभार करूं लागला. [ ग्रँट डफकृत मराठ्यांची बखर पान १२६ आवृत्ति ६ वी ] असें डफसाहेब म्हणतो.

" शाहूच्या सरदारांत ताराबाईनें हा जो फितवा केला तो तिच्या फारसा उपयोगीं पडला नाहीं. कारण, ज्याच्या जोरावर ताराबाईनें हें कारस्थान रचिलें होतें तो धाकटा शिवाजी १७१२ च्या मे महिन्यांत वारला. धाकटा शिवाजी १७१२ च्या जानेवारींत वारला म्हणून डफ म्हणतो ( Duff's History, Chap. XII ) परंतु काव्येतिहास संग्रहांतील ४०९ वें पत्र धाकट्या शिवाजीनें राज्याभिषेक शके ३८ नंदननाम संवत्सरे चैत्र बहुल त्रयोदशी भौमवासरे म्हणजे १७१२ च्या एप्रीलच्या १४ तारखेस लिहिलें असल्यामुळें डफचा जानेवारी चुकला आहे हें स्पष्ट आहे. धाकटा शिवाजी वारल्याबरोबर ताराबाईचे सर्व बेत फसले व शाहूचें दैव पुन्हां सांवरलें. " ( खंड २ पान १२ ) असें राजवाडे आपल्या ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' यांत प्रतिपादन करतात.

" सन १७१३ ( शके १६३३ ) सालीं ताराबाईचे पुत्र शिवाजी राजे काळ्या फोड्या येऊन मरण पावले. यावेळीं शिवाजीची पत्नी भवानीबाई तीन महिन्याची गरोदर होती. रामचंद्रपंतानें ताराबाईस कारभारांतून काढून ती व तिची सून भवानीबाई या ऊभयतांस अटकेंत ठेविलें आणि राजारामाची कनिष्ठ पत्नी राजसबाई इचा पुत्र संभाजी यास गादीवर बसवून मोठ्या दक्षतेनें राज्यकारभार चालवूं लागला." [ को. प्रां. अ. इ. पान २६ ] असें ' कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास ' लेखक मोडक म्हणतात.

" सन १७१४ मध्यें ताराबाईचे पुत्र शिवाजीमहाराज मरण पावले. ते मरण्यापूर्वी त्यांस व त्यांच्या भवानीबाई व पार्वतीबाई या दोन्ही स्त्रिया व आई ताराबाई यांस कैदेंत ठेवून राजसबाईचे पुत्र संभाजीमहाराज यांस गिरजोजी यादव व पन्हाळ्याचे गडकरी यांनीं गादीवर बसविलें होतें. तारा-

बाईचे सर्व बेत जागच्या जागीं राहून त्यांस कैदेंत रहावें लागलें. तरी त्यांनीं योजिलेला शाहूमहाराजांशीं वैर करण्याचा संकल्प नवीन कारकीर्दीच्या अधिकाऱ्यांनीं सोडून दिला असें मात्र नाहीं !" [ इ. सं. इ. पान २५ ] असें विधान ' इचलकरंजी संस्थानचा इतिहास ' लेखक खरेशास्त्री करतात. त्याचप्रमाणें शिवाजी महाराज मृत्यू पावल्यावर संभाजी महाराजांस गादीवर बसविण्यांत आलें व शिवाजीमहाराज १७१२ त वारले आणि रामचंद्रपंतांनीं संभाजीमहाराजांस गादीवर बसविलें हीं तीन्हीं डफसाहेबांचीं विधानें चुकलीं आहेत असेंही खरेशास्त्री ह्मणतात.

" शिवाजीची कैद व संभाजीची स्थापना ( स. १७१४ ) चंद्रसेनाच्या कारस्थानांत रामचंद्रपंतांचें अंग होतेसें दिसत नाहीं. त्याच्या पाठबळाशिवाय ताराबाईचा उद्योग यशस्वी होण्याजोगा नव्हता. तिचा पंताशीं पुनः बेबनाव होऊन ताराबाई कैदेंत पडली. ती स्वतः लिहिते. ' कालपरत्वें आमचा प्रसंग विसकळित होऊन संभाजीराजे व राजसबाई यांणीं गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल व गडकरी व तुळोजी शितोळे यांसी पुढें करून किल्ले पन्हाळायेथें संभाजीराजे यांसी राज्यपदास बैसविलें. आम्हांस संकटीं घातलें. बहुत निकड केली. ' शिवाजी यावेळीं फक्त कैदेंत पडला; मरण पावला म्हणून उल्लेख आहेत ते खरे नाहींत. तो २४ मार्च स. १७२६ रोजीं कैदेंतच देवी येऊन वारला. [ का. सं. प. या. ले. ४९२; भा. व. श. पृ. ७; म. द. स. १ पृ. १३२ ] त्याच्या दोघी बायका भवानीबाई व पार्वतीबाई याही कैदेंत पडल्या. या राज्यक्रांतीच्या संबंधांत शाहूचें अंग होतें कीं काय याचा खुलासा होत नाहीं. थोडेंबहुत शाहूचें अंग त्यांत असल्यामुळें संभाजी त्याचा मिंधा राहिला. शाहूविषयीं ताराबाईचा तीव्रभाव संभाजी व राजसबाई यांचे मनांत वागत नसल्यामुळें घरगुती भांडणांतून शाहूचें मन मोकळें होऊन त्यास बाहेरच्या कामांत मन घालण्यास सवड झाली. शिवाजी स. १७१२ त पदच्युत झाला, ( इ. वृ. १८३४ ले. ६०. व पे. द. पृ. २७७-२८१ नं. ३, ४, ५— ता. १-४-१७१४ चे कागद २८-६-१७१४

पर्यंत शिवाजीचे कागद सांपडतात, आणि त्याचवेळीं संभाजी गादीवर आला असे उल्लेख आहेत ते बहुधा खरे नाहींत. कदाचित् दोन गोष्टींच्या दरम्यान वर्ष दोन वर्षांचें अंतर असण्याचाही संभव आहे. उपलब्ध कागदांत ३-२३९चें ता. ११-११-१७१३ चें शिवाजीचें आज्ञापत्र आहे. व इतिहास-संग्रहांत पेशवे दप्तरांतील कागदांत शिवाजीचीं तीन आज्ञापत्रें ता. १-४-१७१४ चीं आहेत. आणि जयसंवत्सरीं म्हणजे ५-३-१७१४ च्या पुढें संभाजी गादीवर आला असा उल्लेख स. प. २०५ वर आहे. यावरून स. १७१४ त केव्हां-तरी तो गादीवर आला असें धरून चालण्यास हरकत नाहीं." [ मराठी रियासत मध्यविभाग १ पान ४० ] असें रियासतकार यांचें विधान आहे. आणि तें किती खरें आहे हें पुढील पत्रांवरून दिसून येईल. शिवाजीराजे यांनीं दिलेलें आज्ञापत्र पुढीलप्रमाणें आहे:—

श्री तारीख १६ नोव्हेंबर १७१३

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४० विजयनाम संवत्सर मार्गशीर्ष शुद्ध पंचमी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणीं मोकदमानी मौजे बाहे ता।। वाळवें यांसी आज्ञा केली ऐसीजे:— (खंड ३ पत्र नं. २३९) मौजे मजकूर रा।। सुंदर तुकदेव यांचे पुत्र रा।। त्र्यंबक सुंदर यांस इनाम दिला आहे. असें असतां तुह्मी हरामजादगी करून यांकडे गांवचा ऐवज वसूल देत नाहीं म्हणून हुजूर विदित जालें. तरी ऐसी बदराह वर्तणूक करावयास गरज काय ? हे रीत एकंदर स्वामीस मानत नाहीं. या उपरी मौजे मजकूरचा सारा ऐवज सुरळीतपणें मशार निलेकडे पाववीत जाणें. दुसऱ्याकडे एक रुपया वसूल न देणें. फिरोन हुजूर बोभाटा आलिया स्वामीस मानणार नाहीं.

श्रीशिवनरपति हर्ष निदान लेखनालंकार. मर्यादेयं विराजते.
मोरेश्वर सुत नीलकंठ प्रधान श्रीआई० आदिपुरुष श्रीराजा
शिवछत्रपति स्वामी कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि.

वरील पत्र ता. १६ नोव्हेंबर सन १७१३ च्या शिवाजीराजे यांच्या

आज्ञापत्रानंतर तारीख १एप्रिल सन १७१४ चीं तीन आज्ञापत्रें काव्येतिहास संग्रहांत दिलेलीं आहेत. त्यानंतर पंत आमात्य बावडा दप्तर भाग १ ला यांत तारीख २० जून सन १७१४ चें व तारीख ११ जुलै सन १७१४ चें अशीं दोन आज्ञापत्रें शिवाजी राजे यांचीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. व त्याच-प्रमाणें श्रीशंभू छत्रपति यांचें आज्ञापत्र तारीख १४ आक्टोबर सन १७१४चें आहे. यावरून पाहतां तारीख ११।७।१७१४ नंतर व तारीख १४।१०। १७१४ चे अगोदर केव्हांतरी मधील तीन महिन्याच्या अवधींत शिवाजीराजे यांनीं गादीचा त्याग करून संभाजीराजे यांना गादीवर बसविलें असें नक्की ठरतें. शिवाजीराजे यांचें तारीख ११।७।१७१४ चें आज्ञापत्र व संभाजीराजे यांचें तारीख १४।१०।१७१४ चें आज्ञापत्र अशीं दोन आज्ञापत्रें पुढें दिलीं आहेत.

श्री ता. ११ ७-१७१४

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४१ जये नाम संवत्सरे आषाढ शुद्ध दशमी रविवासरे क्षत्रियकुलावंतस **श्रीराजा शिवछत्रपति** यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधी यांसी आज्ञा केली यैसिजे—मौजे कडवई ता।। संगमेश्वर हा गांव राजश्री राम-चंद्र पंडित हुकुमतपन्हा यांकडे होता तो तुह्मांस इनाम करून दिल्हा आणि मौजे बुरबाड ता. मजकुर हा गांव तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी स्वामींनीं पंडित मार नीलेची स्त्री सौभाग्यवती जानकीबाई यांस इनाम दिल्हा होता. त्याप्रमाणें स्वामींनीं त्यांचा त्यांकडे इनाम नेमून दिल्हा. ऐसे असतां तुह्मीं बुरबाडास उपद्रव देतां तगादा लावितां ह्मणून हुजूर विदित जालें. तरी कडवई तुह्मास इनाम देऊन बुरबाड जानकीबाई यांस इनाम चालवावयाची आज्ञा केली असतां तुह्मीं या गांवास उपद्रव करावा हे कोण गोष्ट. मौजे बुरबाड सौभाग्यवती जानकीबाई यांस कैलासवासी स्वामीनीं दिल्याप्रमाणें स्वामींनींही इनाम देऊन पत्रें दिलीं आहेत. याकरितां या उपरी तुह्मी बुरबाडास उपद्रव येकंदर न देणें, तगादा कांहीं न करणें, सुरळीत बुरबाड गांव सौ।। जानकी-

बाई यांकडे इनाम चालों देणें बहुत लिहिणें तरी तुह्मीं सूज्ञ असा. मर्यादेयं विराजते.

श्री तारीख १४-१०-१७१४

स्वस्तिश्री राज्याभिषेक ४१ जयेनामसंवत्सरे आस्विन बहुल त्रीतीया गुरुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजाशंभू छत्रपती स्वामी यांणी राजश्री रामचंद्र पंडित हुकमतपन्हा यांसी नाडगौडकीच्या वतनास इनाम कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटीखेरीज हक्कदार व इनामदार करून जलतरु पाशाण निधिनिक्षेपसहीत दिल्हा असे. पुत्रपौत्रादि वौशपरंपरेनें अनभवितील प्रतिवर्षीं नूतन पत्राचा अक्षेप न करणें या सनदेची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटी यास परतोन देणें लेखनालंकार मर्यादेयं विराजते.

वरील आज्ञा पत्रें पाहिलीं ह्मणजे तारीख ११ जुलै सन १७१४ पर्यंत शिवाजीराजे मरण पावले नव्हते हें निश्चित होतें. त्यामुळें डफ साहेब व राजवाडे यांचीं विधानें सहजच खोटीं ठरतात. त्यानंतर काव्येतिहास पत्रें व याद्या लेखांक ४९२; भारत वर्ष शकावली पृ. ७ व मराठी दप्तर रुमाल १ पृष्ठ १३२ वरील माहिती लक्षांत घेतली ह्मणजे रियासतकार याचें विधान 'शिवाजी राजे तारीख २४ मार्च सन १७२६ रोजीं येऊन मरण पावले' हेंच खरें ठरतें. मराठी दप्तर रुमाल १ पृष्ठ १३२; वर 'शके १६४७ विसासु नाम संवछरे फसली सन ११३५ राजेशक ५२ या साली मातोश्री ताराउ आई साहेब याणी आपला पुत्र धाकटे वेडे सिवाजी राजे यास ह्मणविला; तो सातारे किल्ल्यावर नजरबंद शाहु महाराज छत्रपति याणी ठेविले होते; ते मि॥ चैत्र शु॥ ७ रोजीं वेडे सिवाजी राजे हे कैलासवासी शांत जाहाले.' असा स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हां शिवाजीराजे केव्हां मरण पावले यासंबंधीं शंका राहत नाहीं, म्हणून मोडक व खरेशास्त्री यांचीं शिवाजीराजे यांच्या मृत्युकाला संबंधींचीं विधानेंही खोटीं ठरतात. अर्थात् त्याबरोबर शिवाजीराजे मरण पावल्यामुळें संभाजीराजे गादीवर आले हेंही त्यांचें विधान त्याचप्रमाणें खोटें ठरतें.

**११ धाकटे शिवाजीराजे यांच्या जन्मकालाचा निर्णयः—** शिवाजीराजे यांच्या मृत्युकालासंबंधीं जसे इतिहासकारांमध्यें मतभेद आहेत तसेच त्यांच्या जन्मकालाबद्दलही आहेत. या बाबतींत डफसाहेबांची माहिती पुढीलप्रमाणें आहे: ‘ राजारामाचे दोन पुत्र होते. त्यांत वडील शिवाजी. तो राजाराम मेला ते समयीं दहा वर्षांचा होता. त्याची माता ताराबाई, ती मोहित्यांची कन्या. धाकटा संभाजी, तो त्या वेळेस तीन वर्षांचा. त्याची माता राजसबाई, ती घाटगे यांची कन्या.’ [ म. ब. आवृत्ति ६ पान ११८ ] या माहितीप्रमाणें शिवाजीराजे यांचा जन्म सन १६९१ व संभाजीराजे यांचा जन्म १६९६–९७ मधील येतो.

या बाबतींत रियासतकारांची विचारसरणी पुढील प्रमाणें आहे. शिवाजीराजे व संभाजीराजे ‘ या दोघां राजपुत्रांच्या जन्मकाळासंबंधीं संशय आहेत. स. प. पृ. १७६ वर [ सनदा पत्रें ] ता. ९-६-१६९६ रोजीं जिंजी येथें राजारामास पुत्र झाला असा उल्लेख असून, त्याच तारखेस जेधेशकावलींत ‘पुत्र झाला, नांव शिवाजी ठेवलें’ असा मजकूर आहे. अर्थात हा ताराबाईचा शिवाजी होय याविषयीं संशय राहत नाहीं. खं. ३. १६७ पृ. १७३ व १७४ वर राजारामास पुत्र झाल्याबद्दल ‘पांच चावर जमीन इनाम दिल्याची सनद १-४-१६९१ची आहे. हा पुत्र संभाजी असेल तर तो शिवाजीहून वयानें पांच वर्षांनीं मोठा ठरतो; आणि त्याची आई राजसबाई ताराबाईहून कनिष्ठ असल्यामुळें राजारामाचे पश्चात् ताराबाईनें संभाजीस बाजूस करून आपल्या मुलास गादीवर बसविलें असें होईल. कदाचित् संभाजी शिवाजीहून लहान असेल तर सन १६९१ सालीं झालेला तिसराच एक मुलगा असून तो पुढें जगला नाहीं असें म्हणावें लागेल. बहुधा संभाजीच वयानें मोठा असून शिवाजी थोडासा वेडसर असल्यामुळें स. १७१४ त शिवाजीस बाजूस सारून संभाजी गादीवर येऊं शकला असें दिसतें. ’ [म. रि. पान ४०]

वरील प्रमाणें माहिती देतांना रियासतकारांनीं अनुमानांतून अनुमानें काढून असें सिद्ध केलें आहे कीं, संभाजी हा शिवाजीपेक्षां पांच वर्षांनीं वडील

असल्यामुळें सन १७१४ मध्यें शिवाजीला बाजूला सारून आपण गादीवर येऊं शकला. अर्थात रियासतकारांच्या कल्पनासरणीची सारी मदार सन १७१४ मध्यें जी राज्यक्रांति झाली ती संभाजी पांच वर्षांनीं शिवाजीपेक्षां वडील असल्यामुळें झाली यावर आहे. जर संभाजी शिवाजीपेक्षां पांच वर्षांनीं लहान असेल तर ही राज्यक्रांति होणें शक्य नव्हतें हें त्यांच्या कल्पनासरणी-प्रमाणें निश्चित होतें.

वरील कल्पनासरणीचा ओघ वाहूं देतांना रियासतकारांनीं सन १७०१ मधील शिवाजीराजे यांच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगाकडे लक्ष दिलें नाहीं. ही त्यांची केवळ दिशाभूल जेधे शकावलींतील ' पुत्र झाला, नांव शिवाजी ठेवलें ' या मजकुरानें झाली यांत संशय नाहीं. रियासतकार आपल्या ' मराठी रियासत भाग २' पान ६८७ वर पुढील मजकूर देतातः शिवाजीच्या 'मुंजीचा निश्चय करून समारंभ आटपल्यावर पन्हाळे मुक्कामीं राज्याभिषेक झाला ( सन १७०१ ) बुधकर घाडगे यांची कन्या भवानीबाई इच्याशीं शिवाजीचें लग्न करण्यांत आलें. ह्यावेळीं त्याचें वय दहा वर्षांचें होतें. राजसबाई व तिचा तीन वर्षांचा मुलगा संभाजी याला ताराबाईनें कैदेंत ठेविलें. ' ही माहिती लक्षांत घेतां रियासतकारांच्या मनांत पुढील मध्यविभाग लिहितांना जेधे शका-वलीनेंच संशयाचें काहूर माजविलें असें ठरतें. राज्याभिषेक हा धार्मिक संस्कार आहे. राज्याभिषेक करणें झाल्यास अगोदर उपनयन संस्कार व्हावा लागतो. व नंतर विवाह व्हावा लागतो. तरच तो क्षत्रिय पुरुष राज्याभिषे-काला पात्र ठरतो. जेधे शकावलीप्रमाणें शिवाजीचा जन्म जर तारीख ९ जून सन १६९६ रोजीं झाला असता तर राज्याभिषेकाच्या वेळीं शिवाजीचें वय अवघें चवथें वर्ष संपून पांचवें लागलें असतें. शिवाय शिवाजीच्या मुंजीच्या वेळीं रामचंद्रपंतांनीं ' शाहू सुटून आल्यावर त्यांची व शिवाजीराजे यांची एकदम मुंज करूं असें म्हटलें तें शाहू, शिवाजी व संभाजी या सर्वांच्या मुंजी एकदम करूं असें म्हटलें असतें. तसेंच एका घरांत दहा वर्षांचा वडील भाऊ संभाजी याची मुंज न करितां पांच वर्षांच्या लहानभावाची मुंज करणें

हें अगदीं अव्यवहार्य व अनुचित होतें. यावरून पहातां संभाजीपेक्षां शिवाजी पांच वर्षांनीं वडील होता हेंच निश्चित ठरतें. जेधे शकावलींतील संभाजीऐवजीं जो शिवाजी ह्मणून नामनिर्देश आहे तो खात्रीनें चुकीचा आहे. डफसाहेबांचें विधान व रियासतकारांचें पूर्वीचे विधान हीं एकच आहेत. परंतु जेधे शकावलीनें नामनिर्देशाच्या बाबतींत जी चूक केली ती सन १७१४ च्या राजक्रांतीला पोषक आहे ह्मणून रियासतकारांनीं ती अंगिकारली एवढेंच स्पष्ट दिसतें.

**१२ कोल्हापूरच्या राजक्रांतीची कारणमीमांसा**:--वरील हकीकतीवरून शिवाजीराजे मरण पावल्यामुळें संभाजीराजे गादीवर आले. आणि त्यांनीं ताराबाईना कैदेंत टाकल्यामुळें शाहूचा पक्ष जोरावला, हें इतिहासकारांचें विधान कसें सपशेल चुकलें हें लक्षांत येईल. आतां रियासतकारांच्या अनुमानाप्रमाणें संभाजी हा शिवाजीपेक्षां वडील नसल्यामुळें त्यानें स्वपराक्रमावर केवळ गिरसोजी यादव, अंताजी लिमल व गडकरी व तुळोजी शितोळे यांच्या मदतीवर शिवाजी व ताराबाई यांना कैद करून आपण गादीवर बसला हें विधान खरें असेल असें बिलकूल वाटत नाहीं. कारण एका राजाला काढून दुसऱ्या राजानें रक्ताचा एकही बिंदु न सांडू देतां गादीवर येणें हें एकाद्या पाताळयंत्री राजाला एकादे वेळीं साध्य होऊं शकेल. परंतु ती राजक्रांति मात्र फार दिवस टिकूं शकणार नाहीं. संभाजीराजे यांनीं बलात्कारानें शिवाजीराजे यांना पदच्युत करून ताराबाईसह त्यांना कैदेंत टाकलें व आपण राज्याधिकारी झाले हें वर्तमान ताराबाईशीं आणक्रियेनें बद्ध झालेले व शाहूराजे यांच्या निःपाताची प्रतिज्ञा करणारे चंद्रसेन जाधवराव आदिकरून ताराबाईच्या पक्षांतील लोकांना जर समजलें असतें तर संभाजीराजे यांची गादी किती तास टिकली असती याच्याबद्दल शंकाच होती. शिवाय शिवाजी राजे व ताराबाई यांच्याशीं संभाजी आणि राजसबाई यांचें वैमनस्य होतें असा कोठेंच दाखला नाहीं. उलट ताराबाई यांचें शिवाजी व संभाजी यांच्यावर सारखेंच मातृप्रेम होतें. परशरामपंत प्रतिनिधि यांना ज्या वेळीं शाहूराजे

यांनीं कैद केलें त्या वेळीं ताराबाईनीं रामचंद्रपंत अमात्य यांना कैदेंतून सोडवून त्यांच्या मांडीवर या उभयतां पुत्रांस बसविलें आणि त्यांचा सांभाळ करून राज्यरक्षणाविषयीं त्यांना विनंति केली. ताराबाईंच्या ठिकाणीं जर या उभयतां पुत्राबद्दल आपपरभाव असतां तर त्यांनीं एकट्या शिवाजी राजे यांनाच रामचंद्रपंतांच्या मांडीवर बसविलें असतें. त्याचप्रमाणें औरंगजेबाबरोबर युद्ध सुरू असतां या किल्यावरून त्या किल्यावर ताराबाईंना या उभयतां पुत्रांच्या रक्षणाकरतां हिंडावें लागत होतें. त्या वेळींही त्यांनीं या उभयतां पुत्रांची सारखीच दक्षता घेतली होती. शाहूराजे यांनीं रांगण्याला वेढा घातला त्या वेळीं सुद्धां या उभयतां पुत्रांना घेऊन ताराबाई मालवणास गेल्या. एकंदरींत पाहतां ताराबाईंचें व संभाजींचें वैमनस्य होतें व त्याकरतां हीं राज्यक्रांति घडून आली असें दाखविण्यास कोणताच आधार नाहीं. सन १७१२मध्यें शिवाजीराजे यांना संभाजी राजे यांनीं पदच्युत केलें असे जे लेख पेशवेदप्तरांत ता. १ एप्रिल सन १७१२ चे पृष्ठ २२७-२८१ वर सांपडतात, त्यावेळीं संभाजी राजे यांचें वय अवघें १६ वर्षांचें होतें. ताराबाईसारख्या मोंगलमर्दिनी राजकार्य धुरंधर स्त्रीच्या विरुद्ध अल्पवयी व अप्रबुद्ध संभाजीराजे यांनीं कट निर्माण करून यशस्वी राज्यक्रांति घडवून आणली असें म्हणणें अशक्यापलीकडील खास होतें. हें कारस्थान राजसबाईंचें होतें असें म्हणण्यासही कोठें आधार नाहीं. उलट राजकारणांत त्यांचें कोठेंच अंग नव्हतें. शिवाय ही राज्यक्रांति घडवून आणण्याला तशी राज्याची बिकट परिस्थिति झाली होती म्हणावें तर तशीही कोणतीच परिस्थिति नव्हती. ताराबाई यांनीं आपला पक्ष एवढा मजबूत केला होता कीं थोड्याच दिवसांत चंद्रसेन जाधवराव यांनीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें शाहूराजे यांचा निःपात होऊन आपसांतील दुही निःशेष होणार होती. अशा ऐन वेळीं ताराबाईंना कैदेंत टाकणें म्हणजे आपणच आपल्या पायांवर दगड टाकून घेण्यासारखें हास्यास्पद होतें. यावरून शिवाजीराजे मरण पावल्यामुळें संभाजीराजे गादीवर आले किंवा शिवाजीराजे नालायक होते म्हणून त्यांना पदच्युत करून संभाजीराजे गादीवर आले हीं दोन्हीं विधानें सयुक्तिक नाहींत

असें स्पष्ट होतें. शिवाजीराजे यांच्या लायकीचा अगर नालायकीचा प्रश्नच उपास्थित होण्याचें कारण नव्हतें. जोंपर्यंत ताराबाई स्वतः राज्यकारभार पहात होत्या तोंपर्यंत हा प्रश्नच उद्भवत नव्हता.

राज्यक्रांति घडून आली ही गोष्ट निश्चित आहे. या राज्यक्रांतीला सन १७१२ पासून सुरवात होऊन ती १७१४ मध्यें पुरी झाली हेंही तितकेंच खरें आहे. तेव्हां वरील दोन कारणांशिवाय तिसरेंच एकादें अगम्य कारण या राज्यक्रांतीच्या मुळाशीं असावें असें निश्चित ठरतें. ही जी राज्यक्रांति झाली त्याच्याविरुद्ध ताराबाईनीं बंड पुकारलें नाहीं किंवा शाहूराजे यांनीं शिवाजीराजे व संभाजीराजे यांच्यामधील दुहीचा फायदा घेऊन त्यांच्यावर या दोन वर्षांत स्वारी केली नाहीं. यावरून ही राज्यक्रांति जशी संभाजीराजे यांना हितावह होती तशीच ती ताराबाई व शाहूराजे यांना राज्याच्या व राज्यावरील व्यक्तींच्या दृष्टीनें हितावह होती असेंच ठरतें. तेव्हां ही अगम्य घटना कोणती असली पाहिजे हें येथें पहाणें अवश्य आहे.

ही राज्यक्रांति लष्करी बळावर झालेली नाहीं. मुत्सद्यांच्या मुत्सद्देगिरीवर ती घडून आलेली आहे हें स्पष्ट आहे. यावेळीं शाहूराजे यांच्याजवळ खरा मुत्सद्दी जसा सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथ होता तसा ताराबाई यांच्याजवळ रामचंद्रपंत अमात्य हा होता. उभयतांना आपापल्या राजांचें हित साधून मराठी राज्याची इभ्रत कायम ठेवावयाची होती. चंद्रसेन जाधवराव हे शाहूराजे यांची नोकरी सोडून ताराबाईच्या पक्षांत जरी सामील झाले तरी त्यांनीं जो पक्ष निर्माण केला त्या पक्षाचें धोरण मराठेशाही ही केवळ भोंसले घराण्याच्या मालकीची नसून त्यांत आम्हां सरदारांचाही हिस्सा आहे अशा प्रकारचें होतें, हें पूर्वी आलेंच आहे. शाहू व शिवाजी यांमधील दुही परवडली परंतु ही नवीन राज्यखंडाच्या सरदारी तत्वांची दुही नको असें या उभयतां मुत्सद्यांना वाटलें असेल यांत शंका नाहीं. या नवीन पेंचप्रसंगामुळें ताराबाई व शाहू यांना आपसांतील दुहीचा निर्णय आपसांत लावून घेण्याचा प्रसंग आला; आणि याच मुद्यावर कोल्हापूरची राजक्रांति घडवून आणण्याची घटना

निर्माण झाली. ही घटना शाहूराजे, ताराबाई, बाळाजी विश्वनाथ, रामचंद्रपंत अमात्य यांच्या पुरतीच गुप्त स्वरूपाची असल्यामुळें त्यासंबंधीं उघड कागदपत्रांचा पुरावा नाहीं. तरी पर्यायानें जो अस्तित्वांत आहे त्यावरून व प्रत्यक्ष घडून आलेल्या कार्यावरून त्याची रूपरेषा कशी असावी याचें अनुमान काढतां येण्यासारखें आहे.

हें अनुमान काढावयाला सन १७४० मधील घडून आलेल्या गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतील. थोरले बाजीराव तारीख २८ एप्रिल सन १७४० रोजीं मरण पावले. त्यानंतर चिमाजी आप्पा, महादोबा पुरंदरे वगैरेंच्या खटपटीनें (सरदेसाईकृत नानासाहेब पेशवे यांचें चरित्र पान ११) नानासाहेबांस पेशवाईचीं वस्त्रें तारीख २५ जून सन १७४० रोजीं मिळालीं. पुढें दोनच महिन्यांनीं चिमाजी आप्पा व नानासाहेब यांनीं संभाजी महाराजांबरोबर एक गुप्त करार केला. (ना. पे. च. पान १०) 'हा गुप्त करार शाहूच्या हयातींत बाहेर फुटला नाहीं.' त्या करारांतील मतलब असा होता:—'सातारचें राज्य स्वामींचें, आणि एकछत्री शिक्का महाराजांचा म्ह. संभाजीचा चालावा. शाहू महाराजांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी आम्ही त्यांचे सेवक, परंतु अंतर्यामीं स्वामींचे. शाहू महाराज यांनीं कैलासवास केल्यावर दोन्ही राज्यें स्वामींचीं व आम्ही सेवक स्वामींचे, स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करू, अशी शपथ दिली होती. त्याप्रमाणें दोन्हीं राज्यें एक करून स्वामींचा शिक्का चालावा, आणि आम्हीं शाहूमहाराज यांचें कारकीर्दीप्रमाणें सेवा करून असावें हें प्रमाण. यासीं अंतर करणार नाहीं, अशी विनंति सेवकांनीं किल्ले सातारचे मुक्कामीं केली होती. (ना. पे. च. पान १०) शाहूच्या मृत्यूपूर्वीं नऊ वर्षें पेशव्यांनीं हा करार संभाजीराजे यांचेबरोबर केला होता. आणि शाहूराजे यांच्या मृत्यूनंतर तो पेशव्यांनीं पुन्हां ताजा करून दिला होता.

हा करार लक्षपूर्वक वाचला म्हणजे तो नानासाहेब पेशव्यांनीं नवीनच केला असें ठरत नाहीं. नानासाहेबांनीं तो जर नवीनच केला असतां तर त्यांत चिमाजी आप्पाला भाग घेण्याचें कारण नव्हतें. ज्याअर्थीं हा करार

चिमाजी आप्पा व नानासाहेब या उभयतांनीं मिळून केलेला आहे, त्याअर्थी तो त्यांनीं या प्रसंगीं केवळ ताजा करून दिला एवढेंच ठरतें. 'शाहूमहाराज यांनीं कैलासवास केल्यावर दोन्हीं राज्यें स्वामींचीं व आह्मीं सेवक स्वामींचे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं, अशी शपथ दिली होती.' हा या करारांतील भाग पाहिला ह्मणजे दोन्हीं राज्यें एक करून चालण्याचा अधिकार नानासाहेबांना किंवा चिमाजी आप्पांना कोणी दिलेला नव्हता. त्यांनीं शपथ दिली ती पूर्वपरंपरेला अनुसरूनच देणें शक्य होतें. अशा प्रकारचा करार होण्याचा प्रसंग शाहूराजे व संभाजी यांच्या दरम्यान इ. स. १७१२ ते १७१४ च्या कालांत आलेला होता. व त्याचवेळीं आपसांतील दुही नष्ट करण्याकरितां बाळाजी विश्वनाथानें हा पर्याय काढला होता असें ठरतें. याच आपसातींतील पर्यायामुळें शाहूराजे यांचें जीवमान असेपर्यंत दोन राज्यें व त्यांचे पश्चात् पुनः एकछत्री राज्य पूर्ववत् होणार या बाळाजी विश्वनाथानें काढलेल्या पर्यायामुळें शाहूराजे व ताराबाई यांचें समाधान झालें, व तसा करार शपथरूपानें बाळाजी विश्वनाथानें संभाजीराजे यांना करून दिला. त्यांच्या पश्चात् बाजीराव व चिमाजी आप्पा यांनीं तो करार ताजा करून दिला. नंतर तोच करार चिमाजी आप्पा व नानासाहेब यांनीं ताजा करून दिला आणि शाहूमहाराजांच्या मृत्युनंतर तोच करार पुनः नानासाहेबांनीं संभाजी महाराजांना ताजा करून दिला अशी परंपरा ठरते. तेव्हां हा करार नानासाहेबांनीं प्रथमतः अस्तित्वांत आणला नव्हता व पेशवे पदाचीं वस्त्रें मिळतांच शाहूराजे यांच्याविरुद्ध नानासाहेबांनीं व चिमाजी आप्पांनीं हे राज्याच्या उलाढालीचे व अतिप्रसंगाचे करार खात्रीनें केले नसते व ते करण्याचें कारणही त्या वेळीं कोणतेंच नव्हतें. तेव्हां पूर्वीं झालेला करार मात्र ताजा करून मागण्याचा अधिकार संभाजी राजे यांना होता व तो तसा करून देणेंही नानासाहेबांना प्राप्त होतें. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतां हा करार मूळ बाळाजी विश्वनाथानें अस्तित्वांत आणला होता हेंच स्पष्ट होतें. शिवाय रियासतकार अनुमान काढतात त्याप्रमाणें वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं

दोन्हीं राज्यें एक करण्याची जर नानासाहेब पेशव्यांची सद्बुद्धि असती तर पुढें त्यांनीं दोन्हीं राज्यें अपहार करण्याचा कधींच प्रयत्न केला नसता. सांगोलें मुक्कामीं सन १७५० मध्यें रामराजाकडून राजीनामा घेऊन नानासाहेबांनीं सातारचें राज्य बुडविलें आणि सन १७६१ सालीं कोल्हापूरचें राज्य संभाजीराजे मरण पावल्यामुळें त्यांना पुत्रसंतान नाहीं ह्मणून जप्त करण्याकरतां इचलकरंजीकरांचे सरदार हरिराम व विसाजी नारायण यांजबरोबर पांच हजार फौज देऊन रवाना केले. हें कोल्हापूरचें राज्य जप्त करण्याचे बाबतींत खरेशास्त्री आपल्या 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास' यांत लिहितात कीं, 'संभाजीमहाराज हयात होते तोंपर्यंत त्यांची अमर्यादा पेशव्यांनीं कधीं काडींमात्र केली नाहीं. परंतु ते मरण पावल्यावर जिजाबाईचें हातांत एवढें राज्य राहूं न देण्याचा त्यांनीं निश्चय केला. असें करितांना आपण पूर्वीं काय केलें, कसें वागलों हेंही त्यांस भान राहिलें नाहीं! करवीरचें राज्य घेण्याची नानासाहेबांनीं हांव धरिली ही फार वाईट गोष्ट केली.' [इ. सं. इ. पान ८६-८७] यावरून दोन्हीं राज्यें भोंसले घराण्यांतील पुरुषाकडे एकछत्री करण्याची थोर बुद्धि कोणीकडे आणि दोन्हीं राज्यें बुडवून तीं भोंसल्यांच्या चाकरांच्या घरांत--पेशव्यांच्या घरांत आणण्याची स्वार्थी व दुष्ट बुद्धि कोणीकडे? या परस्परविरुद्ध दोन बुद्धि ज्याअर्थीं एका व्यक्तीच्या ठिकाणीं राहूं शकत नाहींत त्याअर्थीं संभाजीमहाराजांबरोबर नानासाहेबांनीं केलेला करार हा नवीन नसून तो पूर्वीच झालेला होता, नानासाहेबांनीं व चिमाजी आप्पांनीं तो फक्त ताजा करून दिला हें उघड होतें.

नानासाहेबांनीं छत्रपति संभाजी महाराज यांना शाहूराजांच्या मरणोत्तर जो ताजा करार लिहून दिला तो काव्येतिहास संग्रह पत्रें, यादी वगैरेंच्या लेखांक ४२८ मध्यें प्रसिद्ध झाला आहे. तो पुढें दिल्याप्रमाणें आहे.

श्री मन्महाराज राजश्री छत्रपति स्वामींचे सेवेशीं—

बाळाजी बाजीराव व सदाशिव चिमगाजी यांणीं लिहून दिला करारनामा ऐसाजे सन इहिदे अर्बैन रौद्रीनामसंवत्सरे.

सातारयास तीर्थस्वरूप शाहूमहाराज राज्य करीत होते त्याजमुळें वारणेचा तह जहाला होता त्यासि तीर्थस्वरूप महाराज यांणीं कैलासवास केला त्यांच्या पोटीं संतान नाहीं तेव्हां तें राज्य स्वामींचें आणि एकछत्री शिक्का महाराजांचा चालावा.

शाहूमहाराज असते समयीं किल्ले सातारच्या मुक्कामीं सेवकांनीं विनंती केली होती जे, शाहूमहाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे सेवक अंतर्यामीं स्वामींच. शाहूमहाराज यांणीं कैलासवास केल्यावर दोहीं राज्यांवर स्वामींची आणि आम्ही सेवक स्वामींचे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं अशी शफत दिली होती. त्याचप्रमाणें दोन्ही राज्यें एक करून एकछत्री स्वामींचा शिक्का चालावा आणि आम्ही शाहूमहाराज यांचे कारकीर्दी-प्रमाणें सेवा करून असावें हें प्रमाण. यासिं अंतर करणार नाहीं...कलम १

वारणे आलीकडे तुंगभद्रापावेतों खासगी प्रांत करून महाराजांस द्यावा.

वारणेपासून तुंगभद्रापावेतों गड, संस्थान बिदनूर व सोंधें व अंतरूज व सावनूर येथील चवथाई तोफेचा ऐवज सरकारांत यावा.

पावत आल्याप्रमाणें ऐवज पावता होईल आणि स्वामींच्या आज्ञेप्रमाणें निर्वेधपणें होई तसें करूं.

स्वामींत व तुम्हांत किमपि पडदा नसावा. स्वामींनीं जें केलें तें तुम्हीं परिणामास नेऊन स्वामींच्या लक्षानुरूप चालून प्रांजळ रीतीनें स्वामींच्या सेवेसीं सादर असावें.

स्वामींची सेवा एकनिष्ठेनें स्वामी आज्ञा करतील तदनुरूप आज्ञेप्रमाणें मनोदयानुरूप वर्तणूक करूं. स्वामीचरणीं द्वैतभाव किमपि न धरूं.

शिंदे, नरगुंदे व पतके पूर्वी हुजूरपागेचे सरदार सरंजामसुद्धां पूर्ववत प्रमाणें स्वामींच्या हुजुरातीस सेवा त्यांणीं करावी त्यांच्या सरंजामाचा व पागेचा फडशा हुजूर होणें तो होत असावा. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक होय ऐशी करून देऊं. आज्ञेप्रमाणें त्यांच्या हातून वर्तणूक होय तरि त्यांजकडील सरंजाम गड, कोटकिल्ले, ठाणीं दरोबस्त खासगीस करून

देऊं. साताऱ्यास राजधानीचा खर्च व खासगी खर्चास सरंजाम महाराजांकडे घ्यावा. शाहूमहाराज यांच्या कारकीर्दीप्रमाणें देऊन वर्तणूक करूं. स्वामींच्या संनिध लहान मोठे सेवक सेवा करून होते त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें चालवावें. योग्यतेनुरूप स्वामींच्या आज्ञेप्रमाणें चालवूं.

हुजूरच्या सनदेनें लोकांस गांव इनाम व वतनें दिलीं तीं चालवावीं अंतर करूं नये. स्वामींनीं कृपाळू होऊन ज्यांस इनामगांव व वतनें जीं दिलीं असतील तीं आज्ञेप्रमाणें चालवूं. किल्ले ठाणीं सरकारांत घेऊन देऊं.

सरदेशमुखी व बाजें वतनें जीं सरकार तालुक्यास आहेत तीं सरकारांत असावीं. शाहूराजांच्या कारकीर्दीप्रमाणें सरकारांत चालवूं.

स्वामींकडे किल्ले हुजुरातीस आहेत त्यांचे सरंजाम पूर्वील वहिवाटीप्रमाणें किल्ल्यांच्या तनख्यास किल्ल्याकडे सुधामत चालावे. पूर्वील भोगवट्याप्रमाणें निर्वेध चालवूं.

सरदेश कुळकर्णीचे व इनामगांव चालवावे. आज्ञेप्रमाणें चालवूं.

आंगरे कडील किल्ले व जंजिरे व भुईकोट व पंचमहाल जयगडापर्यंत सरकारांत यावे. आज्ञेप्रमाणें आंगरेकडील किल्ले व जंजिरे व भुईकोट पंचमहाल जयगडापर्यंत दरोबस्त मुलूक घेऊन स्वामींकडे देऊं.

एकूण कलमें बारा असत.

बाळाजी विश्वनाथानें शाहूराजे यांचेतर्फे ताराबाईच्या बरोबर जी मध्यस्थी केली त्याला परिस्थिति त्यांना कशी अनुकूल होत गेली हेंही पहाणें येथें जरूर आहे. नारो महादेव जोशी या नांवाचे कोंकणस्थ ब्राह्मण सेनापति संताजी घोरपडे यांचे पदरीं होते. संताजीनें आपले दोन पुत्र राणोजी व पिराजी यांच्या प्रमाणेंच नारो महादेव याला आपला मानसपुत्र मानलें होतें. नारो महादेव यांना संताजींच्या जहागिरीपैकीं इचलकरंजी हें संस्थान मिळाल्यामुळें त्यांनीं आपलें पूर्वीचें जोशी हें आडनांव सोडून देऊन घोरपडे आडनांव सुरू केलें. हे संताजीच्या तालमेंत वाढल असल्यामुळें ते जसे शूर आणि पराक्रमी झाले तसेच ते रामचंद्रपंत अमात्यांच्या सहवासानें मुत्सद्दीही झाले. रामचंद्र-

पंतांचा त्यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांच्यावर विशेष लोभ होता. ' रामचंद्रपंत अमात्य यांनीं एकदां सावंतवाडी संस्थानावर स्वारी करून खुद्द सावंतवाडीस वेढा घातला. तेव्हां त्या फौजेंत मुख्य सरदार नारोपंत होते. त्यांनीं सावंतांस तह घडवून आणण्याच्या कामीं मदत करून वाडी संस्थानचा बचाव केला.' [ इ. सं. इ. पान २१ ] त्याचप्रमाणें सन १७०८ मध्यें शाहूराजे यांनीं रांगण्याला ज्या वेळीं वेढा दिला त्या वेळीं रामचंद्रपंत अमात्यांनीं ताराबाई व उभयतां राजपुत्र यांना चोरवाटेनें मालवणाकडे रवाना करून पिराजी घोरपडे व नारो महादेव यांच्या मदतीनें रांगणा किल्ला कित्येक दिवस लढविला. [ म. रि. मध्यविभाग १ पान १६] 'शंकराजी नारायण सचिव हे शाहू महाराजांस न मिळतां ताराबाईच्याच पक्षास चिकटून राहिले होते. ते सन १७११ त मरण पावल्यावर त्यांचे पुत्र नारो शंकर हे शाहू महाराजांस अनुकूल झाल्यामुळें त्यांनीं त्यांजकडे सचिवाचें पद कायम केलें. त्यामुळें करवीरच्या राजमंडळांतलें सचिवाचें पद रिकामें झालें. तेव्हां रामचंद्रपंतांनीं छत्रपतीकडून नारो महादेव यांस त्या वेळीं सचिव पद देववून ती उणीव भरून काढिली असावी.' [ इ. सं. इ. पान २६ ] त्या वेळीं कोल्हापूरच्या छत्रपतींच्या दरबारांत नारो महादेव यांचें फार मोठें वजन होतें. ( इ. सं. इ. पान १७ )

बाळाजी विश्वनाथ भट यांस ' बाजीराव, चिमाजी आप्पा, भिऊबाई व अनूबाई अशीं चार अपत्यें होतीं. यांपैकीं अनूबाईचें वय ६।७ वर्षांचें झाल्यावर त्या काळच्या संप्रदायाप्रमाणें ती उपवर झालीसें पाहून बाळाजीपंत तिला योग्य स्थळ धुंडीत होते. नारो महादेव यांचे पुत्र व्यंकटराव यांचें लग्न व्हावयाचें होतें व तो वर आपल्या कन्येस योग्य आहे हें बाळाजीपंतांच्या लक्षांत आलें. नारोपंतांसही हा श्लाघ्य संबंध प्रिय वाटला व त्यांचे उपाध्ये हर भटजी-बावा यांच्या विद्यमानें बोलणें होऊन अनूबाई व व्यंकटराव यांचा विवाह सन १७१३ सालीं सातारा मुक्कामीं झाला. ' [ इ. सं. इ. पान २६ ] याप्रमाणें बाळाजी विश्वनाथ व नारो महादेव यांचा पुढें जो आप्तसंबंध घडून आला त्याच्या मुळाशीं बाळाजी विश्वनाथ व नारो महादेव यांचा स्नेहसंबंध सातारा व

कोल्हापूर या दोन राज्यांत दुफळी असतांना जमला होता व ती दुफळी नष्ट झाल्यावर हा आप्तसंबंध जोडला गेला असावा असें अनुमान निघतें.

शाहूला नेस्तनाबूद केल्याशिवाय आपसांतील दुही मोडणें शक्य नाहीं असें ताराबाईला वाटत होतें; त्याप्रमाणें ताराबाईच्या पक्षाचें निर्मूलन केल्याशिवाय आपलें स्थान सुरक्षित राहणार नाहीं असें शाहूराजे यांना वाटत होतें. तेव्हां दोन्ही पक्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्यक्ष नातवांचेच त्यांत फरक एवढाच कीं एक पूर्ण सनातनी व दुसरा पूर्ण सुधारक. या भेदामुळें उभय पक्ष आपसांतींत लढून एकानें मरावें व दुसऱ्यानें जगावें किंवा दोन्हीं पक्षांनीं लढून मरून जावें व तिसऱ्यांच्याच हातीं मराठी राज्य जावें त्यापेक्षां उभय पक्षांना जिवंत ठेऊन त्यामध्यें तडजोड घडवून आणावी असें राज्यहित पहाणाऱ्या मुत्सद्यांना वाटणें स्वाभाविक होतें. ही तडजोड सनातनी व सुधारक नवीन पिढी यांच्यामध्यें होणारी असल्यानें उभय पक्षांना जवळ वाटणारा मधला पक्ष बाळाजी विश्वनाथ व नारो महादेव यांचा होता. एक धनाजीच्या हाताखालीं वागलेले तर दुसरे संताजीच्या तालमींत वाढलेले. त्यामुळें नव्याजुन्यांचें एकीकरण या उदयोन्मुख मुत्सद्यांचे ठिकाणीं झालेलें होतें. शिवाय औरंगजेब मरण पावल्यामुळें व त्यानंतर मोंगल राज्यक्रांति जी घडून आली त्या क्रांतीमुळें हिंदुमुसलमानांच्या ज्या परस्पर तीव्र भावना इतके दिवस वादळी वृत्तीच्या बनलेल्या होत्या त्या या वेळीं शांत झाल्या होत्या. शिवाय संभाजी महाराजांच्या वधापासून सतत वीस वर्षें लढाईचा भयंकर ताण महाराष्ट्रावर पडल्यामुळें शांततेच्या काळाची इच्छा नव्याजुन्या पिढीला तीव्रतेनें भासूं लागली होती. तेव्हां तडजोडीचा मार्ग उभय पक्षांना हितावह वाटणारा होता. त्यांतून ताराबाई व शाहूराजे यांच्यामधील दुही ही केवळ आपसांतील —मराठेशाहींतील—असल्यामुळें ती शक्य तेवढ्या लवकर व शक्य त्या मार्गांनीं शांत व्हावी हें राज्याच्या, राज्यावरील व्यक्तींच्या व उभय राज्यांतील प्रजाजनांच्या दृष्टीनेंही हितकारक होतें.

ही भोंसले घराण्यांतील तडजोड केवळ घरगुती स्वरूपाची असल्यामुळें

ती व्याह्याव्याह्यांच्या तडजोडीप्रमाणें गुप्त स्वरूपाची होती. लग्नाचे वेळीं व्याह्याव्याह्यांत मानपानाबद्दल अगर देण्याघेण्याबद्दल जर वाद उत्पन्न झाला तर ते दोघेजण आपला वाद चव्हाट्यावर न मांडतां आपसांतील तडजोडीनें मिटवून घेतात. याचें कारण झालेला शरीरसंबंध त्यांना शेवटपर्यंत टिकवून न्यावयाचा असतो. इतर वऱ्हाडी मंडळींना जर याचा वास लागूं दिला तर या उभयतांतील कलहाचा फायदा घेऊन तेही आपल्या मागण्यांचें घोडें पुढें ढकलतील ह्मणून उभय पक्षाला भीति असते. ह्मणून हा कलह जसा आपसांत तडजोड करून गुप्त रीतीनें शांत करून घ्यावा लागतो तशीच ही तडजोड गुप्त स्वरूपाची होती. ती जर तशी केली गेली नसती तर शाहूराजे यांचे पक्षांतील सरदार व ताराबाईचे पक्षांतील सरदार यांनीं आपल्या स्वार्थाचीं घोडीं पहिल्यानें पुढें दामटलीं असतीं व मुख्य दुहीचा प्रश्न लोंबकळत राहून त्याला निराळेंच स्वरूप आलें असतें. म्हणून ही तडजोड जशी गुप्त स्वरूपाची होती तशीच ती तडजोड झाल्यानंतरसुद्धां अखेरपर्यंत गुप्तच ठेवण्याची जबाबदारी उभय पक्षावर होती. याचें कारण उभयपक्षांतील सरदारांना व मुत्सद्यांना याची गंधवार्ता समजल्यावर आपला फायदा आपल्या स्वामींनीं बुडविल्याबद्दल विश्वासघाताचें खापर उभय पक्षांवर फुटलें जाणार होतें; ह्मणून ही तडजोड गुप्तपणानें टिकवून नेण्याचीही जोखम उभय पक्षावर होती. या दृष्टीनेंही आपसांतील ही दुही मिटविण्याचा कसा प्रयत्न झाला असेल याचें अनुमान काढणें योग्य ठरेल.

ही आपसांतील दुही मिटविण्याचे मुत्सद्यांचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणें होते: १ या तडजोडीनें मराठी राज्याचें हित झालें पाहिजे. २ या तडजोडी मुळें उभय राज्यांवरील व्यक्तींची मानहानि न होतां त्यांचें रक्षण होऊन त्यांचा मरातब उत्तम प्रकारें राहिला पाहिजे. ३ या तडजोडीमुळें मराठी राज्यांतील सरदारांची दुही व भोंसल्यांच्या राज्यांबाबत वारसा हक्कानें उत्पन्न झालेली दुही न झाली पाहिजे. हे तीनही उद्देश राज्यरक्षणाचे, व्यक्तींच्या रक्षणाचे व दुही याचे दृष्टीनें पहातां घडून आलेल्या तडजोडीवरून साध्य झाले

आहेत हें नक्की ठरतें. 'साताराचें राज्य स्वामींचें, आणि एकछत्री शिक्का महाराजांचा चालावा. शाहुमहाराजांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी आम्ही त्यांचे सेवक, परंतु अंतर्यामीं स्वामींचे. शाहूमहाराज यांनीं कैलासवास केल्या-वर दोन्हीं राज्यें स्वामींचीं व आह्मीं सेवक स्वामींचे, स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं, अशी शपथ दिली होती.' यावरून मराठी राज्याचें एकीकरण शाहूराजे यांच्या पश्चात् होणार असल्यानें या तडजोडीमुळें मराठी राज्याचें कल्याणच होतें हें निश्चित आहे. यामुळें मुत्सद्यांचा पहिला उद्देश सफल झाला. साताराच्या गादीवर असलेले शाहूराजे व कोल्हापूरच्या गादीवर असलेले शिवाजीराजे या व्यक्तींचें नुकसान न व्हावें ह्मणून मराठी राज्याचे शाहूराजे यांच्या हयातीपर्यंत दोन भाग करून वारणेच्या उत्तरेकडील भाग शाहूराजे यांना व दक्षिणेकडील भाग शिवाजीराजे यांना देण्यांत आला. त्यामुळें दोन्हीं गाद्या कायम राहून दोन्हीं व्यक्तींचा मानमरातब कायम राहिला आणि त्यांचें रक्षणही झालें म्हणून मुत्सद्यांचा दुसरा उद्देशहि सफल झाला. तिसऱ्या उद्देशा प्रमाणें ही तडजोड गुप्त राहिल्यामुळें मराठी राज्यांतील सरदारां सरदारांमध्यें किंवा मुत्सद्यां मुत्सद्यांमध्यें जी दुही व वैरभाव उत्पन्न झाला होता त्याला खीळ बसली आणि शाहूराजे यांचा जो वारसा हक्का संबंधींचा कलह होता तो शांत झाला. एकंदरींत ही बाळाजी विश्वनाथाची तडजोड सर्वमान्य, राज्याच्या हिताची होती यांत संशय नाहीं.

१३ **ताराबाईंचा अपूर्व त्यागः**—ही तडजोड, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या तत्वांच्या चाकोरींतून सरळ जाणाऱ्या ताराबाईंना व त्यांच्या स्वामिनिष्ठ रामचंद्रपंत अमात्यांना अशा दोनच व्यक्तींना मान्य होण्यासारखी नव्हती. परंतु व्यक्तिगत मानहानी किंवा स्वार्थ याकडे त्यांचें लक्ष नसून राज्याच्या व प्रजेच्या कल्याणाकडे त्यांचें लक्ष होतें. अशा स्थितींत सत्व व स्वत्वहि पाळावयाचें आणि राज्यरक्षणहि करावयाचें अशा परस्परविरुद्ध पेंच प्रसंगांत यावेळीं आल्यामुळें त्यांनीं त्यांतूनहि निभावून जाण्याचा मार्ग काढला. त्याकरितां ताराबाईंनीं व रामचंद्रपंतांनीं राज्यकारभारांतून सेवानिवृत्त

होण्याचें ठरविलें. ताराबाईनीं आपला पुत्र राज्याभिषिक्त शिवाजीराजे यांना पदच्युत करून त्या ठिकाणीं संभाजीराजे यांची स्थापना केली व आपण समाधानानें सेवानिवृत्त होऊन पन्हाळ्यास जाऊन राहिल्या. रामचंद्रपंतांनीं आपला मुलगा भगवंतराव याला अमात्य पदावर नेमून आपणहि पुढें कायमचे संन्यासवृत्तीनें राहिले. [ म. रि. मध्यविभाग १ पा. ४२-४३ ] एकंदरींत ताराबाई या तत्वनिष्ठ असल्यामुळें त्यांनीं आपला पक्ष पूर्ण बलवान् असलेल्या स्थितींतहि केवळ राज्याच्या कल्याणाकरतांच आपल्या आयुष्यांतील सुमारें तीन तपें नजरबंदीच्या तपश्चर्येंत घालवून केवढा अपूर्व स्वार्थत्याग केला याची कल्पना कल्पनेनेंच केलेली जास्त चांगली ठरेल! राजाराम महाराजांच्या पश्चात् दुःखाचे पर्वत दूर सारून ज्या हातांनीं आपल्या दहा वर्षांच्या पुत्राला सिंहासनाची पायरी चढवली; ज्याच्या सामर्थ्यावर दिल्लीपति औरंगजेबाला त्राहि भगवान् करून सोडिलें; ज्या पूर्व प्रतापी पुरुषांच्या पुण्य बळावर जिवाचें रान करून निधड्या छातीनें संकटांच्या परंपरेला तोंड दिलें; त्याच मोंगलमर्दिनी ताराबाईनीं केवळ स्वराज्याच्या कल्याणाकरितां आणि आपसांतील दुही निःशेष करण्याकरतां आपल्या पुत्राला सिंहासनाची पायरी समाधानानें आणि रक्ताचा एकहि बिंदु सांडूं न देतां उतरावयाला लावलें ही सामान्य गोष्ट नाहीं. विचारवंतांनीं या गोष्टीचें विकारवशतेचा पगडा बसूं न देतां मनन केल्यास त्यांना ताराबाईच्या विशाल योग्यतेची आणि त्यांच्या तत्वनिष्ठेची साक्ष पटल्याशिवाय राहणार नाहीं. सोनें जरी कित्येक वर्षें उकीरड्यामध्यें गाडून टाकलें व त्यामुळें त्याच्यावर कितीजरी कृष्णपुटें चढलीं तरी कालपरत्वें त्याला अग्निसंस्कार होतांच पुनः सोनें तेवढेंच त्याचें सुवर्णत्व कायम राहून जसें चमकूं लागतें तद्वत् ताराबाईच्या चारित्र्याकडे संस्कारयुक्त दृष्टीनें पाहिलें ह्मणजे तें किती तेजःपुंज विक्रमशाली, तत्वनिष्ठ, त्यागी आणि सदाचरणी आहे हें दिसून येईल.

---

# प्रकरण ११ वें

## संभाजीराजे व शाहूराजे यांचा पुनः कलह व समेट.

१ त्यागाची निरवानिरव. २ शाहूराजे व खंडेराव दाभाडे यांचा सलोखा. ३ शाहूराजे व कान्होजी आंगरे यांचा समेट. ४ बाह्यात्कारी उपाय योजना. ५ दमाजी थोरात यांचें पारिपत्य. ६ उदाजीराव चव्हाण. ७ स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा. ८ मराठशाहीची रचना व विस्तार. ९ संभाजीराजे यांची कुचंबणा. १० चंद्रसेन जाधव यांचा उठाव. ११ शाहूराजे व संभाजीराजे यांचा पुनः कलह. १२ संभाजी राजे यांचें पारिपत्य. १३ कृष्णा वारणेचा तह. १४ शाहूराजे व संभाजीराजे यांचा समेट. १५ समेटाची कारण मीमांसा.

१. **त्यागाची निरवानिरवः—** ताराबाईनीं व रामचंद्रपंतांनीं सेवानिवृत्त होणें आणि शिवाजीराजे यांनीं राजसंन्यास स्वीकारून त्या जागीं संभाजीराजे यांनीं सिंहासनारूढ होणें या सर्व गोष्टी ताराबाईच्या पक्षांतील लोकांच्या पोटांतील पाणी हालूं न देतां मोठ्या सावधगिरीनें अंमलांत आणणें अवश्य होतें. या करतांच या गोष्टीची ठाम निश्चिती व्हावयाला दोन वर्षांचा काल मध्यंतरी गेला; व त्याकरतां निरनिराळ्या उपाय योजनाही अंमलांत आणाव्या लागल्या. राज्यक्रांतीचें सर्वांना पटणारें मुख्य कारण जें प्रथमतः सन १७१२ मध्यें दाखविण्यांत आलें तें ' मुले कुटारः ' या उक्तीप्रमाणें शिवाजीराजे मरण पावले या बातमीच्या धक्क्यानें ताराबाईच्या पक्षांतील

सरदारांना दाखविण्यांत आलें. त्यांना त्याचवेळीं दुसरा एक जो धक्का देण्यांत आला तोही पहिल्यापेक्षां जास्त जबरदस्त होता. ताराबाई व शिवाजीराजे यांच्या बायकामंडळींना संभाजीराजे व राजसबाई यांनीं गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल व गडकरी व तुळोजी शितोळे यांसी पुढें करून किल्ले पन्हाळा येथें कैद करून राज्यपद हस्तगत केलें हा होय. या बातमीमुळें ताराबाईच्या पक्षांतील सरदारांना ताराबाई कैदेंत पडल्यामुळें त्यांच्या भेटीगांठी घेतां येईनात म्हणून त्यांना संभाजीराजे यांच्या तंत्रानें गेल्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. मुख्य सुत्रधार रामचंद्रपंत अमात्य हेही कानावर हात ठेऊन जसे शिवाजीराजे तसेच आपणाला संभाजीराजे असें म्हणून स्वस्थ बसले. त्यामुळें ताराबाईच्या पक्षांतील चंद्रसेन जाधव, कान्होजी आंग्रे, खंडेराव दाभाडे, उदाजी पवार वगैरे सरदारांची कुचंबणा झाली. सर्वांत चंद्रसेन जाधवाची सर्वांना भीति जास्त होती. ताराबाईचा पाठिंबा गेल्यावर व संभाजीराजे यांचें प्रोत्साहन मिळण्याची आशा खुंटल्यावर त्यांना त्यांचा मार्ग सुधारणें भाग पडलें. त्यावेळीं दिल्लीस मोंगल बादशाहींत भानगडी उपस्थित झाल्यामुळें तिकडे चंद्रसेन जाधव यांनीं आपलें संधान लावून व संभाजीराजे यांचा पक्ष सोडून तिकडे निघून गेले. त्यामुळें भोंसल्यांच्या राज्यांत आमचाही हिस्सा आहे असें म्हणणारांपैकीं एक प्रमुख सरदार निघून शाहूराजे व ताराबाई यांच्या डोक्यावरील फार मोठा भार कमी होऊन आपल्या तडजोडीच्या कार्याला शुभशकुन झाला असें त्यांना वाटलें असेल यांत शंका नाहीं.

**२ शाहूराजे व खंडेराव दाभाडे यांचा सलोखाः**—खंडेराव दाभाडे हा शाहूचा सेनापति ताराबाईच्या पक्षाला मिळाला होता. त्याच्या-बरोबर बाळाजी विश्वनाथानें समेट घडवून आणला. त्यामुळें ताराबाई व शाहू-राजे यांचें मनोमन शुद्ध करून देण्याची कामगिरी सेनापति दाभाडे यांनीं केली. ' खंडेराव दाभाडे शाहूस घेऊन ताराबाईचे भेटीस पन्हाळ्यावर आला. उभयतांची भेट जाहल्यानंतर सर्व मराठमंडळास मेजवानी केली. आईसाहेब व महाराजांनीं एक पात्रांत भोजन केलें. ते वेळेस बोलणें होऊन वारणेपार संभाजी

महाराजांचें राज्य ठरवून दिलें. [ का. सं. दाभाड्यांची ह. पृ. ६ ] वारणेची हद्द ठरवून राज्याचा हिस्सा सुद्धां प्रथमपासूनच शाहूनें त्यांस तोडून दिला होता ( म. रि. वि. १ पा. ४१ ) व तो बाळाजी विश्वनाथाच्याच मध्यस्थीनें ठरला होता. परंतु त्या बाबतींत आणा शपथा या व्यतिरिक्त बाळाजी कांहीं करूं शकला नव्हता म्हणून त्या गोष्टीची रुजु रुजवात यावेळीं खंडेराव दाभाडे यांनीं शाहूराजे व ताराबाई यांची प्रत्यक्ष भेट करवून देऊन केली. दुसरी एक महत्वाची गोष्ट यावेळीं घडवून आणली; ती ह्मणजे सर्व मराठ मंडळाला मेजवानी देऊन ताराबाईनीं शाहूराजे यांना आपल्या पात्रांत भोजनाला घेतलें ही होय. शाहूराजे हे औरंगजेबाच्या कैदेंत बरींच वर्षें असल्यामुळें व त्यांचा संबंध झिबुन्निसा बेगमचा पुत्र ह्मणून मुसलमान लोकांत आल्यामुळें ते जाति-भ्रष्ट झाले अशी कित्येक मराठ्यांची समजूत होती. त्यामुळें कित्येक अस्सल मराठे शाहूराजे यांचेबरोबर पंक्ति भोजन करावयाला नाखूष होते. ती अडचण शाहूराजे यांच्या बाबतींत राहूं नये ह्मणून त्यांना पंक्तिपावन करून घेण्याचा हा ताराबाईच्या मराठ मंडळास दिलेल्या मेजवानीचा हेतु होता. यावेळीं ताराबाईनीं आपल्या मनांतील सर्व किल्मिष काढून टाकून शाहूराजे यांना आपल्या पात्रांत भोजनाला घेतलें व त्यांना आपल्या पक्षांतील सर्व मराठा मंडळाकडून पंक्तिपावन करून दिलें. हा सोहाळा जरी मराठा ज्ञातिविशिष्ट घरगुती स्वरूपाचा असला तरी तो राजकारणांत कित्येक वेळां डोकावून पहात असे. ताराबाईनीं या वेळीं शाहूराजे यांना जरी पंक्तिपावन करून घेतलें तरी मराठा सरदारांत ज्ञातीसंबंधीं तीव्रतर भावना असलेले कांहीं सरदार होतेच. त्यांच्या मनांतून हें ज्ञातीचें किल्मिष अद्याप गेलेलें नव्हतें. परसोजी भोंसले हे दिवंगत झाल्यानंतर त्यांचा मुलगा कान्होजी भोंसले याला शाहूराजे यांनीं सेनासाहेब सुभा नेमलें. एकदां कान्होजी भोंसले सातान्यास आले असतां त्यांस व रघोजी भोंसले यांस राजवाड्यांत भोजनास येण्याची आज्ञा झाली. रघोजी अनमान न करतां भोजनास गेले. सेनासाहेब कान्होजीनें अनमान केला, परंतु राजाज्ञेपुढें अनमान करून भागण्यासारखें नाहीं ह्मणून तेही राजवाड्यांत

भोजनाला गेले. ' परंतु आक्षेपामुळें राजश्रींचे ताटांत ( शाहूराजे यांचे ताटांत ) सेनासाहेबांस ( कान्होजीस ) बसणें प्राप्त झालें. भोजन करून सेनासाहेब आपले बिऱ्हाडीं येऊन बोटें घशांत घालून वमन केलें. ( ना. भों. व. पान ३१ ) हें वर्तमान राजश्रींस बातमीचे द्वारें समजलें.' पुढें शाहूराजे यांनीं कान्होजीला कैद करवून रघोजीला सेनासाहेब नेमलें. एकंदरींत शाहूराजे यांना पंक्तिपावन करून घेऊन व दाभाडे सरदार यांचें मन दुखवूं न देतां शाहूराजे यांच्याशीं ताराबाईनीं अशाप्रकारें समेट करून घेतला. त्यामुळें ताराबाईच्या पक्षाच्या दुसऱ्या एका मोठ्या सरदाराच्या पेंचप्रसंगांतून ताराबाई व शाहूराजे मोकळे झाले.

३ **शाहूराजे व कान्होजी आंगरे यांचा समेटः**—बाळाजी विश्वनाथ यांनीं आपसांतील दुही नष्ट करण्याकरितां जी अत्यंत महत्वाची व गुप्त अशी असामान्य कामगिरी केली त्याबद्दल शाहूराजे यांनीं त्यांना पेशवे पदाचीं वस्त्रें तारीख १६ नोव्हेंबर सन १७१३ रोजीं दिलीं. त्यापूर्वीं त्यांना ताराबाईच्या पक्षांतील तिसरा सरदार कान्होजी आंगरे यांच्यावर पाठविलें होतें. कान्होजी आंगरे ताराबाईच्या वतीनें शाहूराजे यांचेबरोबर लढत होता. त्यानें कल्याणप्रांत काबीज केला व राजमाची, लोहगड वगैरे घाटमाथ्याचे किल्लेही त्यानें हस्तगत केले. त्याच्या बंदोबस्ताकरतां शाहूराजे यांनीं पेशवे बहिरोपंत पिंगळे व खंडोबल्लाळचा भाऊ निळोबल्लाळ या उभयतांस सन १७१२ मध्यें फौज देऊन आंगरे यांचेवर रवाना केलें. कान्होजी आंगरे यानें या उभयतांचा पराभव करून त्यांना पकडून लोहगडावर कैदेंत ठेविलें. हें वर्तमान ऐकून शाहूराजे यांना धास्ती उत्पन्न झाली. पुढें ताराबाई व शाहूराजे यांचा गुप्त तऱ्हेनें सलोखा बाळाजी विश्वनाथ यानें घडवून आणल्यानंतर ते आंगरे यांची समजूत काढण्याकरतां गेले. बाळाजी विश्वनाथ आपल्या फौजेसह लोहगडाखालीं आले. ' नानांचा ( बाळाजी विश्वनाथ यांचा ) व आंगरे यांचा कागदोपत्रीं घरोबा होता. आंगरे यांस पत्र लिहून पाठविलें, व दरमजल कुलाब्यास गेले. सरखेल [ कान्होजी आंगरे ] पुढें सामोरे येऊन भेटीचा समारंभ झाला.

उपरांत खलबतास बसोन त्यांस सांगितलें कीं, तुमचा आमचा भाऊपणा. पेशवाई तुमच्या घरांत. आयते किल्ले देत असाल तरी तसें सांगावें. ' शिक्के करार व वस्त्रें त्यांस दाखविलीं व त्यांस विचार सांगितला कीं, सरखेलीचें पद ताराबाईकडून आहेच; इकडूनहि करून देववितों, महाराजांचे चाकर होऊन कृपा संपादून घ्यावी. त्याजवरून त्यांनीं मान्य करून राजमाची मात्र ठेऊन, लोहगड, व धनगड व तुंगतिकोना या किल्ल्यांच्या चिठ्या देऊन किल्ले देवविले. जंजिरेकर हबशाचा व आंगरे यांचा कलह लागला होता तो तह करून दिला. बहिरोपंतास सोडवून समागमें घेऊन आले. महाराजांचे लोक किल्ल्यावर चढले. सातान्यास जाऊन महाराजांचें दर्शन घेतलें. कान्होजी आंगरे यास सरखेलीचें पद करून वस्त्रें व सिक्के कटार पाठविली. [ रा. खंड ४ पृ. ३५ ] आंगरे यांचे बरोबर झालेल्या तहाचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें होता. शाहूराजांच्या पायांशीं पूर्वी अंतर न जालें, यापुढेंही करणार नाहीं. पेशव्यांनीं थोरातांशीं अवक्रिया करूं नये. भाकर दिली आहे, ते यांनीं खावी. सनदी पत्रांखेरीज कोठें त्यांनीं उपसर्ग न करावा. वरघाटचे किल्ले आंगऱ्यांनें घेतले असतील ते स्वाधीन करावे. तळघाटचे किल्ले पेशव्यांनीं घेतले असतील ते आंगऱ्यांस द्यावे. प्रतिवर्षी दसऱ्यापासून मार्गशीर्षापर्यंत कोंकणची मसलत पेशव्यांनीं करावीं, हबशी फिरंगी मारून गर्देस मिळवावे. एकमेकांचे चाकर इसम असतील ते एकमेकांनीं ठेवावे. परंतु पुढें न ठेवावे. रायगड आंगऱ्यांनीं घेतला तर छत्रपतीकडे द्यावा. लोहगड, तुंग, तिकोना, कोरगड, धनगड सामान सहित पेशव्यांकडे द्यावे. राजमाची वगैरे कित्येक आंगऱ्याकडे द्यावे. याशिवाय महालांच्या वांटणीची यादी आहे. ता. २८-२-१७१४. ( तह व करारमदार पृ. १९७ ) याप्रमाणें आंगरे यांचेबरोबर तह करून मोठ्या सामोपचारानें व मराठ्यांतील दुही निःशेष करण्याचे दृष्टीनें आणि स्वराज्याला पोषक अशी तडजोड बाळाजी विश्वनाथ यानें घडवून आणिली. ही तडजोड ताराबाईचा पक्ष व शाहूराजे यांचा पक्ष कोठेंच न दुखवितां व ताराबाई व शाहूराजे एक झाले असें न दाखवितां दोहींकडील सरखेलपदाचे तुम्हीं अधिकारी आहांत

अशी आंग्रे यांची समजूत घालून त्यांचे मनांतील पक्षभेदाचें वारें काढून टाकलें. यावरून बाळाजी विश्वनाथाची कर्तबगारी, मुत्सद्देगिरी, चातुर्य आणि आपसांतील दुही नष्ट करण्याची तळमळ हीं स्पष्ट दिसून येतात. या तहामुळें ताराबाईच्या पक्षांतील सरदार थोरातांचाहीं प्रश्न सहज सोडवून घेतला. एकंदरींत बाळाजी विश्वनाथ यांनीं ताराबाई आणि शाहूराजे यांच्यामध्यें जी तडजोड घडवून आणली ती पूर्ण यशस्वी झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

४ **बाह्यात्कारी उपाय योजनाः**—भोंसले घराण्यांत उत्पन्न झालेली दुही ताराबाई व शाहूराजे यांच्याच केवळ सलोख्यामुळें नष्ट होणारी नव्हती. त्या दुहीचीं पाळेंमुळें सरदारांपर्यंत जाऊन पोंचल्यामुळें तेथून तीं उखडून काढावीं लागलीं. याकरतां सन १७१२ पासून सन १७१४ पर्यंतचा सुमारें दोन वर्षांचा काळ ही दुही शांत करण्यांत गेला. सन १७१२ या सालीं शिवाजीराजे पदच्युत झाले किंवा ते मृत्यू पावले अशी जी बोलवा किंवा असे जे कागदपत्र सांपडतात याच्या मुळाशीं वर दिल्याप्रमाणें परिस्थिती होती हें आतां लक्षांत येईल. इतिहास संग्रहांत पेशवे दप्तरांतील कागदांत शिवाजीराजे यांचीं तीन आज्ञापत्रें तारीख १ एप्रिल सन १७१४ ची आहेत, तीं पहातां आंग्रे यांचा समेट घडून येईपर्यंत शिवाजीराजे पूर्णपणें सेवानिवृत्त झाले नव्हते हें निश्चित ठरतें. पुढें जेव्हां संभाजीराजे यांचें स्थान स्थिर झाले असें ताराबाईना वाटलें त्याच वेळीं त्या व शिवाजीराजे पूर्णपणें सेवानिवृत्त झाले. शाहूराजे यांचा जीवात्मा असेपर्यंतची ही जी तडजोड निघाली ती ताराबाई या तत्वनिष्ठ व्यक्तीच्या मनाविरुद्ध होती हें मागें आलेंच आहे. हें तत्व ताराबाई व त्यांचा वंश यांकडून पूर्णपणें पाळलें जावें ह्मणून त्यांनीं जसें शिवाजीराजे यांना राज्य पदच्युत केलें तसेंच शिवाजीराजे यांना झालेला मुलगा रामराजे हा मेला असें जाहीर करून त्याला पन्हाळ्यावरून अमात्यांकडे बावड्यास पळवून लावलें. व तेथून पानगांवला पाठविलें. हा जो उपद्व्याप ताराबाईनीं केला त्याच्या मुळाशीं शाहूराजे मोंगलांचे मांडलिक आणि त्यांचे मांडलिक शिवाजीराजे किंवा रामराजे हे होऊन

आपल्या मूळ तत्वाला बाध येऊं नये हीच विचारसरणी होती असें ठरतें. 'भवानीबाई (शिवाजीराजे यांची स्त्री) गरोदर होती ती प्रसूत होऊन तिला शके १६३४ [सन १७१२ सालीं] पुत्र झाला. त्याचें नांव राजाराम असें ठेविलें. याचा घात करावा अशी राजसबाईची बुद्धि दिसल्यावरून पुत्र वारला असें बाह्यात्कारी उठवून रामचंद्रपंताचा पुत्र भगवंतराव याच्या अनुमतें बावड्यास वाड्यांत दाई व माणसें देऊन त्या पुत्रास छपवून ठेवलें. [को. प्रां. अ. इ. पान २६ ] पुत्र वारला असें बाह्यात्कारी जसें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें' तसेंच शिवाजी महाराजांसंबंधींही झालें होतें. याचा भावार्थ एवढाच होता कीं आपलें उदिष्टकार्य सफल करून घेण्याकरतां ज्या ज्या गोष्टी लोकांना पटतील त्या त्या बाह्यात्कारी दाखवाव्या लागत होत्या व त्या त्या त्यावेळीं अंमलांत आल्या होत्या. ताराबाईचा सवतीमत्सर, शिवाजीराजे व संभाजीराजे यांचा सावत्रभाव वगैरे सामान्य लक्षणांचा, लोकमत बनविण्यास जे जे प्रसंग येतील त्या त्या प्रसंगीं बाह्यात्कारी उपयोग करून घेतला होता. अंतर्यामीं ही सर्व मंडळी एकच होती.

**५ दमाजी थोरात याचें पारिपत्यः**— संभाजीराजे गादीवर आले त्यावेळीं त्यांचें वय सत्रा वर्षांचें होतें. ते लहान असल्यामुळें ताराबाईच्या पक्षांतील दुसऱ्या इतर सरदारांना सामोपचारानें शाहूराजे यांच्याबरोबर मिळतें घेऊन स्वस्थ बसवयाला लावण्याची पात्रता त्यांच्या अंगीं अद्यापी आलेली नव्हती. म्हणून ती कामगिरी बाळाजी विश्वनाथ पेशवे यांना जातीनेंच करावी लागली. ताराबाई परवडल्या पण त्यांच्या पक्षांतील ह्मणविणारे मराठे सरदार नकोत अशी बाळाजीची अवस्था झाली. शिवाय त्यांच्या वानवींत गप्प बसावें तर शाहूराजे यांच्याकडे जो मुलुख आला त्यांत राहणारेच ते सरदार असल्यामुळें त्यांचा बंदोबस्त करणें शाहूराजे यांना प्राप्त झालें होतें. त्यापैकीं दमाजी थोरात व उदाजी चव्हाण हे दोन इसम शाहूराजे यांस विशेष त्रास देत होते. दमाजी यास रुस्तुमखान किताब होता. तो बहुधा औरंगजेब बादशहाकडून मिळाला असावा. रामचंद्रपंत अमात्य यांनीं त्यास सुपें व पाटस हे दोन

परगणे जहागीर देऊन पुण्याच्या पूर्वेकडील बंदोबस्ताकरितां नेमिलें. त्यावेळीं जिंजीचा वेढा चालू होता. पाटस तर्फेंत हिंगणगांव येथें गढी बांधून दमाजी थोरातानें कैक वर्षे ताराबाईचे तर्फेनें मर्दुमकी गाजविली. पुढें शाहूराजे आल्या-नंतर त्यांच्याबरोबर हा थोरात ताराबाईच्या पक्षानें लढूं लागला. चंद्रसेन जाधव हे ताराबाईच्या पक्षाला येऊन मिळाले तेव्हां शाहूराजे यांचा पाडाव होतो असा देखावा दिसतांच शाहूच्या विरोधकांना जोर चढला. बाळाजी विश्वनाथाला पेशवाई दिल्यावर पुणें प्रांताच्या अगदीं मध्यभागीं या थोरातांच्या पुंडाव्याला सुरवात झाली व शाहूराजे यांना तो पुंडावा दुःसह झाला. तेव्हां शाहूराजे यांनीं फौज देऊन बाळाजी विश्वनाथाची त्याच्यावर रवानगी केली. बाळाजी विश्वनाथ ' फौज बरोबर घेऊन अंबाजी त्रिंबक व स्त्री राधाबाई व उभयतां पुत्र बाजीराव व चिमाजी आप्पा असे बरोबर घेऊन हिंगणगांवास आले. ती फौज पाहून दमाजी थोरात यानें बाह्यात्कारी गरिबी दाखवून, तहाचें बोलणें लावून, भेटीकरितां बाळाजी विश्वनाथ वगैरे मंडळीस बेलभंडाराचे इमान शफत देऊन विश्वासानें बोलावून गढींत येण्या बरोबर त्यांस कैद केलें. तेव्हां त्यास बेलभंडार इमान दिल्याची ओळख देतां, त्यानें उत्तर दिलें कीं, बेल ह्मणजे झाडपाला व भंडार आह्मीं नित्य पदार्थांत खातच असतों. असें सांगून त्यांजपुढें ऊन ऊन राखेचे तोबरे ठेवून मनस्वी खंडणी मागूं लागला. खंडणी आल्याशिवाय सोडणार नाहीं असा त्याचा निग्रह पाहून, त्याजपाशीं ओलीकरितां राधाबाई स्त्री व बाजीराव व चिमाजी आप्पा पुत्र असे ठेवून पुरंदरे व आपण परत येऊन महाराजांस झालेला मजकूर कळविला. त्यानंतर महाराजांनीं त्याचे कराराप्रमाणें भूर्दंड भरून बाळाजी विश्वनाथ यांचीं मुलें माणसें सोडवून आणलीं. ' [ खंड २ पान १२–१३ ].

शाहूराजे यांना थोराताचें पारिपत्य यावेळीं करतां आलें नाहीं. तो शाहू-राजे यांचें सामर्थ्य ओळखून होता; म्हणून त्यानें पुढें शाहूराजे यांना जास्तच उपद्रव देण्यास सुरवात केली. तेव्हां त्यांनीं सचिवास त्याचेवर स्वारी करण्यास आज्ञा केली. या वेळीं नारो शंकर सचिव हा फक्त बारा वर्षे वयाचा होता.

त्याची आई येसूबाई मोठ्या दक्षतेनें कारभार करीत होती. सचिवाचे ताब्यांतील सिंहगड, पुरंदर, या किल्ल्यांचे जवळच हिंगणगांवास दमाजीचें ठाणें असल्यानें त्याचा बंदोबस्त करणें सचिवाचें काम होतें. मुलगा लहान व आपण बायको माणूस म्हणून घराण्याच्या कर्तबगारीस उणेपणा नसावा या हेतूनें येसूबाईनें आपला कारभारी रांझेकर याच्या मदतीनें थोरातास नरम करण्याचें काम अंगावर घेतलें. सचिवाची फौज हिंगणगांवावर येणार असें पाहून दमाजीनें स्वारी करून रोहिडा ऊर्फ विचित्रगडाखालीं नारो शंकर राहत होता त्यास धरून नेलें. पुढ शाहूराजे यांनीं सचिवाचे प्रदेशाची वहिवाट करण्यास दत्ताजी शिवदेव याची नेमणूक करून तेथील बंदोबस्त करविला परंतु त्यामुळें थोराताचें पारिपत्य होऊं शकलें नाहीं. नंतर शाहूराजे यांनीं पिलाजी जाधव यांचेमार्फत थोरातास भला मोठा भूर्दंड भरून नारो शंकर सचिव यास सोडवून आणलें. नारो शंकर हा सुमारें एक वर्ष थोरातांचे कैदेंत होता. पुढें सन १७१८ मध्यें शाहूराजे यांनीं थोरातांच्या पारिपत्याकरतां सय्यदबंधूंची कुमक घेतली आणि बाळाजी विश्वनाथ व पिलाजी जाधव यांचेबरोबर या मोंगल सय्यदबंधूंना देऊन थोरातांवर रवाना केलें. मोंगलांकडील लष्करी मदत व तोफखाना याच्या बळावर त्यांनीं हिंगणगांवास मोर्चे लाविले. या लढाईंत थोरातांचा पराभव होऊन तो बाळाजी विश्वनाथ याचे हातीं सांपडला. त्यास कैद करून बाळाजीनें पुरंदर किल्ल्यावर ठेविलें. हिंगणगांवची थोराताची गढी पाडवून मुळा नदींत टाकिली. पांढरीवर गाढवांचा नांगर फिरविला. याप्रमाणें थोरातांचा बंदोबस्त करण्याकरतां शेवटीं मोंगलांची मदत शाहूराजे यांना घ्यावी लागली. ' थोरातासारख्या लहानशा इसमास रगडण्याससुद्धां स्वतःचें लष्करी सामर्थ्य पुरें न होऊन त्यासाठीं मोंगलांची मदत घ्यावी लागली, यावरून त्या वेळीं शाहूची शक्ति किती अल्प होती याची कल्पना होते. तो कसाबसा टिकाव धरून राहत होता इतकेंच. मोंगलांची कृपा होती, म्हणूनच त्याचा निभाव लागला. ' ( म. रि. मध्यविभाग १ पान ६२ ) सन १७१४ सालीं बाळाजीनें आंगरे यांचेबरोबर जो तह केला त्यांतील पहिलें

कलम ' थोराताशीं अवक्रिया करूं नये ' असें होतें. परंतु शेवटीं शाहूराजे यांना तशी अवक्रिया करण्याचा प्रसंग थोराताच्या बाबतींत आला. ताराबाईंच्या पक्षांतील थोरात हा एक सरदार होता. त्याचें पारिपत्य करण्यास शाहूराजे यांना केवढे प्रयास पडले व किती खर्च करावा लागला इकडे लक्ष दिलें असतां ताराबाईच्या पक्षांत कसेकसे निर्ढावलेले सरदार होते व त्यांचा पक्ष किती बलवान् होता याची कल्पना आल्याशिवाय रहात नाहीं.

**६ उदाजीराव चव्हाणः**—दमाजी थोराताप्रमाणेंच उदाजी चव्हाण हा आणखी एक शूर सरदार ताराबाईंच्या पक्षातर्फे शाहूराजे यांना त्रास देण्यांत प्रमुख होता. याला दमाजी थोराताप्रमाणेंच चंद्रसेन जाधव यांचें पाठबळ होतें. उदाजीचा मूळ पुरुष राणोजी चव्हाण हा मालोजी घोरपडे यांचेजवळ होता. राणोजी लढाईत पडल्यावर त्याचा मुलगा विठोजी यांस मालोजीनेंच वाढविलें. मालोजीच्या मृत्यूनंतर विठोजी चव्हाण व संताजी घोरपडे यांनीं औरंगज़ेबाच्या तंबूवर छापा घालून सोन्याचे कळस काबीज करून आणले. त्या वेळीं हिंमत बहाद्दर हा किताब विठोजीस मिळाला. तेव्हां-पासून विठोजी चव्हाण हा रामचंद्रपंत अमात्य यांचे हाताखालीं होता. सन १६९६ मध्यें कर्नाटकांत युद्ध चालू असतां बंगलोर येथें विठोजी मारला गेला. नंतर त्याचा पुत्र उदाजी यास हिंमतबहाद्दर पदाचीं वस्त्रें मिळालीं. उदाजीही पूर्वजांप्रमाणेंच पराक्रमी असून या वेळीं ताराबाईचे पक्षांत जाऊन शिरोळ, रायबाग, विजापूर एवढ्या टापूंत दंगा करीत होता. सांप्रत तो बत्तीसशिराळ्यास गढी करून राहिला होता. उदाजी चव्हाण व दमाजी थोरात या उभयतांनीं सातारा प्रांतापर्यंत स्वारी करावी, चव्हाणचौथाई ह्मणून घ्यावी, गांव लुटावें, मारावें, असा क्रम चालविला होता.

**७ स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदाः**—हुसेन सय्यद याची दक्षिणच्या सुभ्यावर बादशहानें नेमणूक केली होती. त्याची दक्षिणेंतील कारकीर्द सन १७१५ ते १७१८ पर्यंत झाली. हुसेन अल्ली जेव्हां दक्षिणेंत आला तेव्हां त्याच्याबरोबर शंकराजी मल्हार यास बाद-

शहानें कारभारी ह्मणून पाठविलें होतें. हा शंकराजी मल्हार पूर्वी राजाराम महाराजांचे वेळीं सचिव होता. परंतु पुढें तें काम सोडून तो काशीस गेला. आणि तेथून दिल्लीस जाऊन मराठ्यांच्या तर्फेनें अनेक कारस्थानें करूं लागला. शंकराजी मल्हार हा दक्षिणेंत आल्यावर त्यानें बाळाजी विश्वनाथ व चिमणाजी दामोदर यांच्यामार्फत शाहूराजे यांच्याशीं वाटाघाट चालविली. तह ठरविण्यासाठीं शंकराजी मल्हार साताऱ्यास आला. त्या वेळीं शाहूराजे व हुसेन सय्यद यांच्या दरम्यान जो तह झाला त्यांतील कलमें पुढें दिल्याप्रमाणें होतीं. (१) शिवाजीच्या वेळचें स्वराज्य, तमाम गडकोट सुद्धां शाहूचे हवालीं करावें, (२) अलीकडे मराठे सरदारांनीं जिंकलेले प्रदेश ह्मणजे खानदेश, गोंडवण, वऱ्हाड, हैदराबाद, कर्नाटक या भागांतले यादींत नमूद केल्याप्रमाणें मोंगलांनीं सोडून देऊन ते मराठ्यांच्या स्वराज्यांत सामील व्हावे; (३) मोंगलांच्या दक्षिणेंतील मुलुखांवर चौथाई व सरदेशमुखीचे तळ मराठ्यांनीं वसूल करावें. या चौथाईचे बदल्यांत आपली पंधरा हजार फौज मराठ्यांनीं बादशहाचे मदतीस ठेवावी आणि सरदेशमुखीचे बदल्यांत मोंगलांचे मुलखांत मराठ्यांनीं चोऱ्या वगैरेचा बंदोबस्त करावा; (४) कोल्हापूरच्या संभाजीस शाहूनें उपद्रव करूं नये; (५) मराठ्यांनीं दरसाल बादशहास दहा लाख रुपये खंडणी द्यावी. (६) आणि शाहूंची मातुश्री, कुटुंब, संभाजीचा दासीपुत्र मदनसिंग वगैरे दिल्लीस बादशहाचे कबजांत आहेत, त्यांस सोडून स्वदेशीं पावतें करावें, असा या तहांतील कलमाचा मुख्य मतलब होता. [ म. रि. मध्यविभाग पान ८२ ] हा तह सन १७१८ मध्यें झाला.

वरील तहाप्रमाणें सनदा घेण्याकरतां बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेले. तेथून सनदा व शाहूराजे यांच्या मातोश्री वगैरे मंडळी बरोबर घेऊन ते दक्षिणेंत सन १७१९ च्या जुलै महिन्यांत साताऱ्यास परत आले. ‘ महाराजांच्या भेटी झाल्या. मुलें भेटविलीं. मातुश्रींची भेट झाली. यावरून बहुत संतोषी होऊन कृतार्थ झाले. सय्यदांकडून पन्नास हजार रुपये दररोज पावत होते, त्याजपैकीं निमे फौजेस खर्च करून बाकी खजिना बाळगून साताऱ्यास

महाराजांचे दर्शनास गेले. दिल्ली स्वारींतून आल्यानंतर बाळाजीपंतांनीं ऐशीं लक्ष वराई व तीस लाख रुपये जामदारखान्यांत भरले व फौजेचे देण्याचा बोभाट महाराजांकडे तिळमात्र ठेविला नाहीं. घरकड सरदारांना कामगिरी सांगितली ह्मणजे त्यांचे लोकांचा गवगवा सरकारांत पडून मनस्वी देणें लागत होतें. बाळाजीपंताचे कारभारापासून कोणास पैसा देणें पडूं नये असा तह झाला. ( भा. व. शा. म. ब. पृ. ५३ ) याप्रमाणें बाळाजी विश्वनाथाची ही दिल्लीवरील पहिली मोहीम सर्व प्रकारें यशस्वी झाली. स्वराज्य व चोथाई, सरदेशमुखीच्या बादशाही सनदा मिळाल्यानें मराठ मंडळास आनंद झाला. शाहूराजे यांना कृतार्थ वाटलें. या मोहिमेंत पैशाची प्राप्ती झाली. सर्व खर्च भागून बराच पैसा सातार्‍याच्या खजिन्यांत जमा झाला. सर्व सरदारांना व लोकांना बादशहाकडून वस्त्रें पोषाख वगैरे मिळाले. संताजी भोंसले दिल्लीच्या मोहिमेंत कामास आला म्हणून त्याचा भाऊ राणोजी भोंसले याला ‘सवाई संताजीराव’ असा किताब बादशहानें दिला. शाहूराजे यांनीं बाळाजी विश्वनाथ वगैरे मंडळी दिल्लीच्या मोहिमेवर जी गेली होती त्यांना सामोरे जाऊन त्यांचा पुष्कळ सन्मान केला. त्यांनीं नजरा केल्या. ज्यांनीं कामें केलीं त्यांना बक्षिसें इनामें दिलीं. पांच महालांचें सरदेशमुखी वतन प्रधानपंतांस शाहूराजे यांनीं करून दिलें. सेनापति यांसही वतन इनाम गांव दिले. बाळाजीपंत भानु हाही दिल्लीच्या मोहिमेंत कामास आला ह्मणून त्यांच्या कुटुंबासही इनामें दिलीं. एकंदरींत ही बाळाजी विश्वनाथाची दिल्लीची मोहीम शाहूराजे यांच्या इच्छेप्रमाणें यशस्वी झाली.

**८. मराठशाहीची रचना व विस्तारः—** बाळाजी विश्वनाथ यांनीं दिल्लीहून शाहूराजे यांच्या नांवानें ज्या सनदा आणल्या त्यांचें स्वरूप कशा प्रकारचें होतें हें येथें पहाणें जरूर आहे. कारण त्या सनदांमुळें सातारा व कोल्हापूर म्हणजे शाहू आणि संभाजी यांच्यामधील राज्याच्या वांटणी संबंधीं पुढे जो कलह उत्पन्न झाला त्याच्या मुळाशीं या सनदा असल्यामुळें त्याचें येथें पृथःकरण दाखविल्याशिवाय पुढील इतिहासाची संगत लक्षांत

येणार नाहीं. यासंबंधीं रियासतकारांनीं पुढीलप्रमाणें साधार हकीकत आपल्या मराठी रियासतींत दिली आहे, ती अशीः—" स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या तीन बाबींच्या तीन सनदा बादशहाकडून बाळाजी पेशव्यास मिळाल्या, त्यांचा मतलब स्पष्ट करून सांगितला पाहिजे. मराठशाहीची रचना व विस्तार वरील तीन बाबतींवर अवलंबून आहे. या बाबतीच्या सनदा सन १७१९ सालच्या महंमदशहाच्या नांवानें लिहिलेल्या असून त्या साताराच्या महाराजांचे दप्तरांत ग्रँट डफनें पाहिलेल्या होत्या. स्वराज्याच्या सनदेंत प्रांताचा उल्लेख आहे ते हेः—१ पुणें, २ बारामती, ३ इंदापुर, ४ वांई, ५ मावळें, ६ सातारा, ७ कसराबाद [ कऱ्हाड ? ], ८ खटाव, ९ माण, १० फलटण, ११ मलकापूर, १२ तारळा, १३ पन्हाळा, १४ आजरें, १५ जुन्नर, आणि १६ कोल्हापूर, कोपळ, गदग, हल्याळ वगैरे तुंगभद्रेच्या उत्तरेकडील परगणे व शिवाजीनें जिंकलेले सर्व किल्ले आणि कोंकण यांचाही निर्देश स्वराज्यांत आहे. किल्ले वगैरे सर्व धरून एकंदर रुइाल ३५ ची याद असून प्रत्येक महालापुढें त्यांतील तर्फा दाखविलेल्या आहेत. कोंकणांत खालील तर्फांचा उल्लेख आहे. रामनगर, गणदेवीसुद्धां, जव्हार, चौल, भीमगड, भिवंडी, कल्याण, राजपुरी, दाभोळ, जावळी, राजापुर, फोंडा, अकोला व कुडाळ. "

" शहाजीच्या पूर्व वयांत पुणें व सुपें मिळून जी एक लहानशी जहागीर होती, ती शिवाजीनें सन १६४६ त स्वतंत्र संस्थानच्या पदवीस आणली. विजापूरच्या आदिलशाहींतून स्वतंत्र झालेलें हें मावळांतील चिमुकलें संस्थान वाढत वाढत सन १६७४ त सह्याद्रीच्या पूर्वेस पश्चिमेस बागलाणपासून फोंड्यापर्यंत वीसतीस मैलांच्या अंतरानें पसरलें. ह्या प्रसाराला 'स्वराज्य' अशी संज्ञा मिळाली. शाहूच्या आगमनापर्यंत ह्या स्वराज्याच्या भानगडी कसकशा होत गेल्या याचें निवेदन मागें ठिकठिकाणीं आलेंच आहे. औरंगजेबानें ह्या स्वराज्याला आपली संमति कधींच दिली नाहीं. तो या स्वराज्यांतील मुलखाची गणना आपल्या औरंगाबादच्या सुभ्यांत करी. त्यानंतर वरील तहानें जें स्वराज्य सन १७१९ त शाहूच्या पदरांत पडलें, त्यांत

समावेश झालेल्या प्रांतांचा निर्देश वर केला आहे. या स्वराज्याचा विस्तार एकसारखा सलग नव्हता; पश्चिमेस समुद्र किनाऱ्यापासून पूर्वेस भीमा आणि नीरा ह्या नद्यांपर्यंत तें पोंचलें होतें. दक्षिणेस गदग, बेलारी, कोपळ, हल्याळ वगैरे कित्येक तुटक परगणे शिवाजीच्या वेळेपासून स्वराज्यांत होते. तंजावर व जिंजी ह्या प्रांतांना जोडून घेण्यासाठीं शिवाजीनें हे मधले मधले भाग मुद्दाम कबजांत ठेविले होते. खानदेश स्वराज्यांत नव्हता त्याच्या बदलीं पंढरपूरच्या बाजूस कांहीं मुलूख वरील तहानें शाहूच्या ताब्यांत आला. ह्या स्वराज्याला लागूनच मोंगलांचे सहा सुभे होते, ( १ बऱ्हाणपूर २ वऱ्हाड ३ विजापूर ४ कर्नाटक बेदर ६ हैदराबाद असे दक्षिणेंतील मोंगलांचे सहा सुभे. ) तंजावर त्रिचनापल्ली सुद्धां ह्या सहा सुभ्यांवर चौथाई व सरदेशमुखी मराठ्यांनीं घ्यावी, असा हा नवीन ठराव झाला. या संबंधाचें उत्पन्न व खर्च यांची एकबेरजी पाहण्यालायक आहे."

" पैकीं सरदेशमुखी हें मूळचें वतन होतें. मावळे देशमुखांस देशमुखी वतनें होतीं, तशाच प्रकारचें हें देशमुखी वतन होय. ठरीव टापूंतील जमीन महसूल गोळा करून सरकारांत भरणें व त्या टापूचा बंदोबस्त ठेवणें हें काम सरदेशमुखांचे होतें. ' तह लिहून दिल्हा ऐसा कीं यजमान खिदमतीच्या लाजिम्याविशीं कायावाचामनें सादर राहून, रयतीस आबादी विशेष होय व सरदारची दौलत व गुन्हेगारांचें पारपात्य घडे तें करितील; व पंधरा हजार फौज सुभेदाराच्या समागमें चाकरीस ठेऊन रयतीस आपल्याकडोन राजी राखतील; व उजाड गावांची लावणी तीन सालांत करोन, ऐसा बंदोबस्त करितील जे दुष्टांचा उपद्रव होणार नाहीं. कदाचित् कोणाचे घरीं चोरी जाली किंवा कोणाचा माल चोरीस गेला, तरीं चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास देतील. कदाचित् चोरास शिक्षा करोन चोरीचें ठिकाण न लगे, तरी चोरीचे मालाची निशा आपण करतील. शिवाय चवथ व सरदेशमुखींत अधिक लोभ धरणार नाहींत. अगर जाहीर जाल्यास जे रुपये जादा तलबी करोन घेतील, ते सरकार–आलींत दाखल करितील. ऐसा तह असे. ' हे करारांतील शब्द लक्षांत ठेवण्या जोगे आहेत. [ तह व क. पृ. २३ ] "

" भोंसल्यांचीं सरदेशमुखी वतनें प्रथम ठिकठिकाणीं असून शाहू तर सर्व राज्याचा सरदेशमुख आपण असें समजे; आणि आपल्या तर्फेनें तो इतरांच्या नेमणुका करी. सरकारच्या वसुलापैकीं शेंकडा दहा टक्के देशमुखांनीं घेण्याची पूर्वीची वहिवाट होती. आरंभापासूनच ठिकठिकाणीं भोंसल्यांचीं सरदेशमुखी वतनें साधेल त्या रीतीनें मिळविण्याचा शिवाजीचा उद्योग होता. शहाजहान व औरंगजेब यांची व शिवाजीची त्यासंबंधानें बोलाचाली झाली परंतु त्यांनीं शिवाजीचे सरदेशमुखीचे हक्क उघडपणें कबूल केले नाहींत. पुरंदरच्या तहांत चौथाईचा किंवा सरदेशमुखीचा उल्लेख नाहीं असें प्रो. सरकार ह्मणतात. सन १६६८ त शिवाजीनें या दोनही बाबतीबद्दल आदिलशाहींतून तीन लक्ष व कुतुबशाहींतून पांच लक्ष रक्कम दरसाल घेण्याचा करार केला; आणि सन १६७१ त मोंगलांच्या मुलखांतून हे हक्क शिवाजी राजरोस वसूल करूं लागला. त्यानंतर पोर्तुगीज लोकांकडून, बेदनूर व सोंधें येथील राजांकडून, आणि पुढें कर्नाटकांतून हे हक्क शिवाजीनें सालोसाल वसूल केले. ( खंड ८-१४ व Mod Rev. July 1916) "

" मराठ्यांचे त्रासापासून आपला बचाव करण्याच्या उद्देशानें दाऊदखान पन्नीनें प्रथम त्यांस चौथाई देण्याचा करार केला. हा निजामुल्मुल्कनें पाळिला नाहीं. तो पुढें हुसेन सय्यदानें कबूल करून मराठ्यांची मदत घेतली; आणि सन १७१९ त बादशहानें तो मंजूर केला. दिल्लीस मिळालेलें चौथाईचें फर्मान ३-३-१७१९ चें व सरदेशमुखीचें १४-३-१७१९ चें आहे. त्यानंतर सहा दिवसांनीं २०-३-१७१९ रोजीं बाळाजी दिल्लीहून परत निघाला. शाहूनें पंधरा हजार फौज मोंगल सुभेदार सांगतील तेथें त्यांच्या मदतीस द्यावी, आणि दर साल बादशहास दहा लाख रुपये खंडणीचे पाठवावे असा करार होता. मोंगलांच्या सहा सुभ्यांचें उत्पन्न त्या वेळीं सालाचे अठरा कोट रुपये टरलेले होते. या वसुलावर शेंकडा दहा सरदेशमुखीबद्दल व शेंकडा २५ चौथाईबद्दल मिळून दर सालची रक्कम शेंकडा ३५ प्रमाणें मराठ्यांस मिळावयाची होती. "

" सरदेशमुखी ही भोंसले घराण्याची खासगत वतनी बाब असल्यानें,

वसुलावर दहा टक्केप्रमाणें या बाबतीचें होणारें सर्व उत्पन्न गादीचे मालकास द्यावयाचें, त्यावर दुसऱ्या कोणाचा हक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें. स्वराज्यांतील वसूल व मोंगली सुभ्यांतील चौथाईचा वसूल मिळून जें उत्पन्न येई तोच सर्व मराठी राज्याचा वसूल होय. या वसुलपैकीं एक चतुर्थांश 'राजबाबती' ह्मणून राजाचे खर्चास द्यावयाचा. वसुलाचे बाकीचे तीनचतुर्थांश ह्मणजे शेकडा पंचाहत्तर 'मोकासा' या नांवानें इतर खर्चाकरतां ठेवावयाचे. या मोकाशांतून 'साहोत्रा' व 'नाडगौडा' असे दोन विभाग राजानें आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल त्यास देण्यासाठीं ठेवलेले होते. साहोत्रा ह्मणजे एकंदर वसुलावर शेंकडा सहा आणि नाडगौडा ह्मणजे त्या वसुलाचे शेंकडा तीन याप्रमाणें ज्या दोन बाबती ठरल्या त्यांपैकीं 'साहोत्रा'चा वसूल शाहूनें सचिवास दिला, तो त्यानेंच स्वतः सर्व प्रांतांतून वसूल करून घ्यावा असें ठरलें. 'नाडगौडा'ची बाबत शाहू निरनिराळ्या वेळीं मर्जीनुरूप पाहिजे त्यास देत असे. या दोन बाबतींचे शेकडा नऊ हिस्से व पहिले राजबाबतीचे २५ हिस्से मिळून ३४ वजा केले ह्मणजे एकंदर वसुलाचे ६६ प्रमाणें निव्वळ मोकासा शिल्लक राहतो. हा सर्व भाग निरनिराळ्या सरदारांस जहागिरीदाखल वांटून देण्यांत यावा असें ठरलें. मुलुखगिरीसाठीं निरनिराळे प्रदेश निरनिराळ्या सरदारांस वांटून देण्यांत आले. राजाची मुख्य फौज पेशवे व सेनापति यांच्या हातांत असून, जेथें जरूर पडेल तेथें ताबडतोब जाऊन देशाचा बंदोबस्त करावा अशी त्यांस शाहूची आज्ञा होती. शिवाय खानदेश, व बालेघांटचा कांहीं भाग यांत पेशव्यानें वावर करावा, सेनापतीनें बागलाण, व गुजराथ प्रांतांतील वसूल करावा, सेनासाहेबसुभा कान्होजी भोंसले यानें वऱ्हाड पाइनघाटचा प्रदेश व गोंडवणच्या पूर्वेकडील भाग यांत वहिवाट करावी, सरलष्कर यानें गंगथडी व औरंगाबादच्या बाजूस उद्योग करावा, फत्तेसिंग भोंसल्यानें कर्नाटकचे बाजूस रहावें, प्रतिनिधीनें नीरेपासून वारणेपर्यंतचा प्रदेश व हैदराबाद--बेदरकडील मुलूख सांभाळावा, चिटणीस व आंगरे यांनीं कोंकणांत काम करावें, आणि पंतसचिवानें आपली पहिली

जहागीर संभाळून इतरत्र 'साहोत्रा'चा वसूल करावा, अशी सरदारांच्या उद्योगाची सामान्य वांटणी शाहूनें करून दिली. एकानें दुसऱ्याच्या प्रांतांत जाऊं नये, अशी त्याच वेळीं ताकीद दिलेली होती."

"ज्या त्या बाजूची चौथाई वसूल करणें हेंच या मुलुखगिरीचें मुख्य प्रयोजन होतें. अर्थात् प्रत्येक सरदारानें आपल्या मुलुखगिरीचा हिशेब सरकारांत रुजू करावयाचा, असा ठराव होता. जहागिरींतील वसूल जरी ज्याचा त्यानें उगवावयाचा होता, तरी वरील व्यवस्थेनें बहुतेक सरदारांस राजबाबती, नाडगौडा, साहोत्रा वगैरेसंबंधानें एकमेकांच्या मुलखांत उत्पन्नाच्या बाबी मिळाल्यामुळें, त्यांचे व्यवहार पृथक्‌पणें तुटले नाहींत. त्यांना आपल्या उद्योगासाठीं फौजा बाळगाव्या लागत. मुलुखगिरी करावी, पैसा वसूल करून आणावा, तेव्हां फौजेचा व आपला खर्च भागणार असा प्रकार झाला. म्हणजे अगोदर खर्च करावा लागून त्याचें उत्पन्न मागाहून यावयाचें होतें. जहागीरदारांस देऊन टाकलेलें शेकडा ६६ चें उत्पन्न, सरकारच्या खजिन्यांत जमा न होतां परभारें सरदारांनीं वसूल करावयाचें असून, त्यांतून त्यांना आपले खर्च भागवावयाचे होते. सरदेशमुखीचें उत्पन्नमात्र त्यांस राजाकडे पाठवावें लागे. तें वसूल करण्यासाठीं नायक किंवा अनहत सरदेशमुख, म्हणजे आपल्या तर्फेनें काम करणारे, शाहूनें ठिकठिकाणीं नेमून दिले. परंतु चतुलाच्या व्यवस्थेंत एकच निश्चित प्रकार कायमचा असा कधींच नव्हता. व्यक्ति, परिस्थिति वगैरे बदलत गेल्या, त्या मानानें निरनिराळ्या पेशव्यांनीं व कारभाऱ्यांनीं त्या त्या वेळच्या जरूरीप्रमाणें भिन्न व्यवस्था ठरवून दिली; आणि अमका फेरफार अमक्यावेळीं अमुक कारणानें झाला, अशी निश्चित माहिती आज मिळत नसल्यानें सामान्य गोळाबेरीज तेवढीच आज आपणापुढें उपलब्ध होते. उदाहरणार्थ कित्येक सरदारांकडून दरसाल एक ठरीव रक्कम सरकार-पोत्यास, जमा व्हावी असे ठराव होते. फत्तेसिंग भोंसल्यानें कर्नाटकांतून सात लक्ष, असे सालोसाल पाठविण्याचा रिवाज होता. सारांश मुख्य सरकारास थोडीबहुत रक्कम देऊन आपण कारभार पूर्ण स्वतंत्रतेनें वाटेल तसा करावा अशी

पद्धत पडली. आणि सरदार शिरजोर होऊन सत्ता दुर्बळ होतांच बेबंदशाही व अव्यवस्था माजली. प्रदेश संपूर्णपणें जिंकून तेथील व्यवस्था लागण्याचे पूर्वीच, नुसती लढाईतील फत्ते ऐकिल्याबरोबर मुलखाची वांटणी व उत्पन्नाची वासलात लावण्याची वहिवाट पडली. त्यामुळें मुलुखगिरीच्या लालुचीनें पुष्कळसे सरदार भराभर बाहेर पडूं लागले, परंतु त्यांच्या स्वैर वर्तनास आळा न राहून स्वतंत्र पंथ काढण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली. ”

“ वसुलाची ही पद्धत मूळ बाळाजी विश्वनाथानें स्थापन केली. सन १७१९ त दिल्लीहून आल्यावर त्यानें ही नवीन व्यवस्था ठरविली. ‘ अष्टप्रधान व सरदार यांस जातीचीं वतनें, दरखदार कारखानदार सुद्धां करून देऊन, त्यांस सरंजाम लावून, इनामगांव करून देऊन, बाकी फौजेच्या खर्चास नेमणूक व हुजूरखर्चाकडे नेमणुका केल्या. जास्ती खर्च लागल्यास हुजूरची आज्ञा घेऊन होईल तसें करावें. ’ चिटणीस, फडणिस व पोतनीस हे कामगार प्रत्येक सरदारापाशीं व सुभेदारापाशीं असत. महाराजापाशीं व अष्टप्रधानाजवळही हे कामगार असत, त्यांस दरखदार ही संज्ञा होती. चिटणिसानें सर्व पत्रव्यवहार करावयाचा, फडणिसानें सर्व देण्याघेण्याचा हिशेब व झाडा ठेवावयाचा, आणि पोतनिसानें खजिना संभाळून देवघेव करावयाची, अशी कामाची वांटणी होती.

“ शिवाजीच्या राज्यपद्धतीचीं धोरणें काय होतीं, आणि तीं पुढें कशीं सुटत गेलीं याची योग्य कल्पना मनांत येण्यासाठीं ‘ संभाजीचें आज्ञापत्र ’ ( कोल्हापूरचे छत्रपति ) म्हणून जो लेख प्रसिद्ध झालेला आहे तो अवश्य वाचला पाहिजे. या लेखांत रामचंद्रपंत अमात्यानें शिवाजीचा अनुभव पूर्णपणें ओतला आहे. हें आज्ञापत्र तारीख १९ डिसेंबर सन १७१५ चें रामचंद्रपंत अमात्य हुकमतपन्हा यानें लिहिलें. [ बावडा दप्तर भाग १ पान १७७ ] प्रधान कसे नेमावे, फौजेचीं, किल्ल्यांची आरमाराची वगैरे व्यवस्था कशी ठेवावी, इत्यादि गोष्टी यांत सांगितलेल्या आहेत. सावकारांच्या प्रकरणांत पाश्चात्यांविषयीं केलेला खालील उल्लेख लक्षांत ठेवण्यासारखा आहे. ‘ फरंगी,

इंग्रज, वलंदेज, डिंगमारादि टोपीकर हेही लोक साहुकारी करितात, परंतु ते वरकड साहुकारांसारखे नव्हत. त्यांचे प्रत्येक खावंद राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुम नें हे लोक साहुकारीस येतात. टोपीकरांस या प्रांतांत प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं, हा पूर्णाभिमान, हें हट्टी जात, हातास आलें स्थळ मेल्यानें सोडावयाचे नव्हत. त्यांस जागा कधींही देऊं नये. आरमार, तोफा, दारुगोळा हेंच त्यांचें बळ. आरमार पाठीशीं देऊन त्यांचें बळें त्या बंदरीं नूतन किल्लाच निर्माण करणार त्यास जागा देऊं नये. शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारा घालाव्या. इमारतीचें वर बांधूं देऊं नये.' कोणासही इनाम अगर कायमची जमीन देऊं नये. असें यांत प्रतिपादन केलें आहे. "

९ **संभाजीराजे यांची कुचंबणा**:—एकंदरींत शाहूराजे यांचा पक्ष बाळाजी विश्वनाथानें धरून त्यांची कीर्ति वाढविली व त्यांच्या राज्यकारभाराची घडीही उत्तम तऱ्हेनें बसवून दिली. इकडे ताराबाईनीं व रामचंद्रपंतांनीं संभाजीराजे यांना गादीवर बसवून त्यांच्या राज्याची व्यवस्था उत्तम प्रकारें लावून दिली; आणि आपण सेवानिवृत्त झाली. बाळाजी विश्वनाथ पेशवा हा तारीख २ एप्रिल सन १७२० रोजीं सासवडास मरण पावला व त्याचा मुलगा बाजीराव हा पेशवा झाला. त्याला शाहूराजे यांनीं ता. १७ एप्रिल सन १७२० रोजीं पेशव्याचीं वस्त्रें दिलीं. त्या वेळीं त्यांचें वय २२ वर्षांचें होतें. बाळाजी विश्वनाथानें दिल्लीहून पातशहाच्या सनदा आणल्यानंतर त्याच्या जोरावर त्यांनीं ताराबाईच्या पक्षाच्या ह्मणविणाऱ्या सरदारांचीं, तह करून, पारिपत्य करून किंवा फितुरी करून बहुतेक वासलात लाविली. त्यामुळें गादी-वरील संभाजी महाराजांचेंही पंख तोडल्याप्रमाणें होऊन नेमून दिलेल्या प्रांतांत विशेष हातपाय न हालवितां शाहूमहाराजांच्या पश्चात् आपण एकटेच दोन्ही गादीचे मालक होऊं या सुखस्वप्नाच्या आनंदांत ते कालक्रमणा करूं लागले.

१० **चंद्रसेन जाधव यांचा उठाव**:—मागें दर्शविल्याप्रमाणें चंद्रसेन जाधवराव संभाजीराजे यांचा तात्पुरता पक्ष सोडून सन १७१२ मध्यें

दिल्लीच्या राजकारणांत शिरून तिकडे निघून गेले. यावेळीं दिल्लीचें राजकारण काय घाटत होतें याचीही थोडी माहिती येथें देणें जरूर होतें. औरंगजेबानंतर बहादूरशहा, जहांदरशहा असे दोन बादशहा झाले. जहांदरशहा हा बादशाही सत्ता धारण करण्यास लायक नव्हता. त्यानें फार क्रूर कर्में केलीं, आसदखानें व झुल्पिकारखान यांना त्यानें मोठ्या योग्यतेस चढविलें. झुल्पिकारखानाच्या हातांत सर्व सत्ता गेल्यामुळें दरबारचे बरेच लोक नाखुष झाले. बादशहाचें छंदानुवर्तन झुल्पिकारखानाला आवडेनासें झालें. त्यामुळें त्या दोघांत वितुष्ट पडलें. इतक्यांत बंगाल प्रांतांत गडबड झाली. शहाजादा अजीमउखान हा पूर्वी बंगालचा सुभेदार होता. हा बहादूरशहाचा दुसरा मुलगा होय. याचा फर्रुखसेअर नांवाचा मुलगा बंगाल्यांत राजमहाल या ठिकाणीं राहत होता. तो दूर देशीं राहत असल्यामुळे जहांदरशहाच्या तावडींहून आजपावेतों सुटला होता. सय्यद हुसेनअल्ली व सय्यद अबदुल्ला हे दोन सरदार फर्रुखशेअरच्या पक्षास जाऊन मिळाले. तेव्हां बादशहा जहांदर, झुल्पिकारखानास बरोबर घेऊन त्यांजवर गेला. तारीख २८ दिसेंबर सन १७१२ रोजीं उभय पक्षांची आग्र्यानजीक गांठ पडली. लढाई होऊन जहांदरशहाचा पराजय झाला; व बादशहा जहांदरशहा आपली राख (लालकुंवर) बरोबर घेऊन पळून गेला. (म. कु. इ. पान ८३) पराभव झालेल्या फौजेची जमवाजमव करून झुल्पिकारखान दिल्लीकडे आला. तेव्हां जहांदरशहा आसदखानाच्या घरीं लपलेला त्यास ओंढळला. परंतु दरबारची सर्व मंडळी फर्रुखसेअर यास जाऊन मिळाली. सबब झुल्पिकारखानाला जहांदरशहास मदत करणें उचित वाटलें नाहीं. तारीख १ जानेवारी सन १७१३ रोजीं फर्रुखसेअर यानें बादशाहीपद धारण केलें. ज्यांनीं ज्यांनीं त्यास मदत केली होती, त्या सर्वांस त्यानें मोठमोठ्या जागा दिल्या. त्यांतच चिंकिलीजखान याची हुशारी पाहून त्यास त्यानें निजाम उल्मुल्क असोफजा असा किताब दिला.

चिंकिलीजखान हा शहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन याचा मुलगा होय. औरंगजेबानें सन १६८३ त दक्षिणेंत स्वारी केली तेव्हां गाजीउद्दीन हा दुराणी

मोंगलांच्या टोळीचा मुख्य होता. त्यानें संभाजीच्या एका टोळीचा पराभव केल्यामुळें, शहाबुद्दीन यास 'गाजाउद्दान' असा किताब मिळाला. याचा मुलगा कमरोद्दीन यासच 'चिंकिलीजखान' अशा औरंगजेबानें पदवी दिली. तो औरंगजेबाच्या दक्षिणेच्या मोहिमेंत हजर होता. पुढें फरुखसेअर व सय्यद बंधु यांचा जो पक्ष निर्माण झाला त्या पक्षाला चिंकिलीजखान मिळाला. याच्या फौजेंत चंद्रसेन जाधवराव हे येऊन सामील झाले होते. आग्र्यानजीक जी लढाई झाली त्यांत जाधवराव यानीं मोठ्या शौर्यानें लढून फरुखसेअर यास सहाय्य केलें. त्यामुळें इतर सरदारांप्रमाणें चंद्रसेन जाधव यांचाही सन्मान बादशहाला करावा लागला. ज्याप्रमाणें चिंकिलीजखान याला 'निजामउल्मुलुख' हा किताब देऊन त्याची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक केली त्याचप्रमाणें त्याच्या हाताखालीं दुय्यम ह्मणून चंद्रसेन जाधवराव यांची नेमणूक झाली. व त्यांस बेदरच्या पूर्वेस भालकी वगैरे परगण्याची मोठी जहागिरी मिळाली.

दक्षिणेंतील सुभेदारीचें काम निजामउल्मुलुक यानें फार हुषारीनें केलें, त्यामुळें त्यांचें वजन दक्षिणेंत फार वाढलें. तेव्हां फरुखसेअर यानें सय्यद हुसेन यास दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें व निजामउल्मुलुकास मुरादाबादच्या सुभ्यावर नेमिलें. पुढें ह्या सय्यद बंधूशीं फरुखसेअर बादशहाचें वांकडें आलें. याचें कारण हे सय्यद बंधु बादशहालाच जुमानीनासे झाले. तेव्हां त्यांची शक्ति कमी करण्याकरतां एका सय्यद बंधूस [सय्यद हुसेन यास] दक्षिणच्या सुभ्यावर नेमलें व आंतून बादशहानें गुजराथचा सुभेदार दाऊदखान यास हुसेनअलीबरोबर लढून त्यास मारून टाकण्याबद्दल लिहिलें. दाऊदखानाची व हुसेनअलीची बऱ्हाणपुरानजीक गांठ पडून सन १७१६ मध्यें लढाई झाली. तींत दाऊदखान मारला गेला. पुढें बादशहानें मराठयांशीं संधान बांधून त्यांचा सेनापति खंडेराव दाभाडे यांस आपल्याकडे वश करून घेतलें. खंडेराव दाभाडे यांनीं हुसेनअलीबरोबर लढाई केली. परंतु हुसेनअलीनें शाहूराजाबरोबर तह केला. या लढाईत झुल्पिकारबेग नांवाचा सरदार हुसेनअलीबरोबर लढत होता त्याचा पराभव झाला. तेव्हां हुसेन अलीनें, आपला दिवाण मोकाबसिंग यास

व त्याचे मदतीला चंद्रसेन जाधवराव देऊन खंडेराव दाभाडे यांजवर पाठविलें. तेव्हां चंद्रसेन जाधवराव व मोकाबसिंग यांची खंडेराव दाभाडे यांच्याशीं मोठी निकराची लढाई झाली. तींत कोणाचाही पराभव झाला नाहीं. याप्रमाणें बादशहाचे सय्यदबंधूंचा नाश करण्याबद्दलचे सर्व डाव फसले. नंतर सय्यदबंधूंनीं सन १७१९ मध्यें फर्रुखसेअर याचे डोळे काढून त्यास वीष देऊन मारून टाकलें, व रोशन-अख्तर नांवाचा बहादूरशहाचा नातु १८ वर्षे वयाचा होता, त्यास महंमदशहा असा किताब देऊन सय्यदांनीं तख्तावर बसविलें. याप्रमाणें चंद्रसेन जाधवराव व निजाम उल्मुलुक या उभयतांनीं सय्यद बंधूंस चांगल्या तऱ्हेनें साहाय्य केलें, परंतु सय्यदांच्या मनात निजामउलमुल्काबद्दल आंतून वांकडें सुरू झालें. मुरादाबादच्या सुभ्यावरून निजाम व चंद्रसेन जाधवराव दिल्लीस आले व त्यांनीं सय्यदबंधूंना मदत केली तरी निजामाचें व सय्यदबंधूंचें पटेनासें झालें. सय्यदांनीं शाहूमहाराजांची मदत मागितली, त्यामुळें चंद्रसेन व निजाम यांचें वांकडें आलें. सय्यदांनीं निजामाची नेमणूक माळव्याच्या सुभ्यावर केली. चंद्रसेन व निजाम यांनीं माळव्याचा बंदोबस्त करून दक्षिणेकडे दृष्टि फिरविली. चंद्रसेन जाधवराव यांस कोल्हापुरास पाठवून कोल्हापूरचे संभाजी महाराज यांच्याशीं निजामानें संधान बांधलें. नंतर बारा हजार फौज बरोबर घेऊन निजाम व चंद्रसेन नर्मदा उतरून दक्षिणेंत आले. चंद्रसेन जाधवराव यांनीं आपल्या बरोबर हैबतराव निंबाळकराचा मुलगा रावरंभा व आणखीं पुष्कळ मराठे सरदार निजामाचे मदतीला आणले होते. या सर्व लोकांनिशीं निजाम दक्षिणेंत येऊन त्यानें अलीगडचा किल्ला व बऱ्हाणपूर शहर आपल्या ताब्यांत घेतलें व बऱ्हाडचा सुभेदार घोसखान हाही निजामास येऊन मिळाला. माळव्यांत जी बादशाही फौज सय्यदांनीं ठेविली होती, तिचा मुख्य दिलावर अलीखान हा निजामाचा पाठलाग करीत आला. बऱ्हाणपुरानजीक उभयतांची लढाई होऊन तींत दिलावरअलीखान मारला गेला.

आलमअली नांवाचा दुसरा एक मोंगली सरदार दक्षिणेंत होता. तो हुसेन सय्यदाचा पुतण्या असून त्याच्या वतीनें दक्षिणचा कारभार पहात

होता. त्यास दिलावर अल्लीची पराभव झालेली फौज जाऊन मिळाली व तो लगेच निजामाशीं सामना देण्याकरतां वऱ्हाडांत गेला. निजामाचा बंदोबस्त विशेष होता. या दोन्हीं सैन्याची गांठ पैनघाटांत बाळापूर नांवाचें लहान शहर आहे तेथें पडली. यावेळीं शाहूमहाराजांचे तर्फे सेनापति खंडेराव दाभाडे हे सय्यद हुसेनच्या बाजूनें लढण्यास आले होते. व निजामाच्या वतीनें चंद्रसेन जाधवराव व कोल्हापूरचे संभाजी महाराजांचे पक्षांतील सरदार हे आले होते. यावेळीं चंद्रसेन जाधवराव व निजाम यांनीं मोठ्या शर्तीची लढाई देऊन आलफअल्ली यास रणांत ठार केलें; व निजामास स्वतंत्रतेचा पाया घालण्यास पूर्ण मदत केली. ही बाळापूरची लढाई तारीख १० आगष्ट सन १७२० रोजीं झाली. याप्रमाणें चंद्रसेन जाधवराव यांनीं निजामउल्मुलुख यास मोठे श्रम व साहस करून संभाजी महाराजांचे बाजूस वळविलें.

**११ शाहूराजे व संभाजीराजे यांचा पुनः कलहः**— बाळाजी विश्वनाथ मरण पावल्यानंतर शाहूराजे व संभाजीराजे यांच्यामध्यें राज्याच्या वांटणीबद्दल कलह उत्पन्न व्हावयाला सुरवात झाली. बाळाजीनें या उभयतांत परस्परांचे हक्काबद्दल मध्यस्थी केली असल्यामुळें व या मध्यस्थीचें स्वरूप बहुतांशीं गुप्त स्वरूपाचें असल्यामुळें आणा शपथा या पलीकडे त्याचें स्वरूप गेलेलें नव्हतें. उभयतां पक्षाचे मध्यस्थ बाळाजी असल्यामुळें त्यांनीं आपल्या जबाबदारीवर जीं ताराबाईच्या पक्षाला अभिवचनें दिलीं किंवा आणा शपथा घेतल्या त्याची कल्पना प्रत्यक्ष शाहूराजे यांना किती देण्यांत आली होती हेंही बाळाजी मरण पावल्यावर बाहेर येणें अशक्य होतें. भोंसले घराण्यांतील कलह चव्हाट्यावर यावयास नको म्हणून त्या वेळीं करार किंवा तहनामा प्रत्यक्ष स्वरुपांत आला नाहीं. सर्वच गोष्टी मोघम व गुप्तपणाच्या झाल्या. बाळाजी विश्वनाथ मरण पावतांच मागील लोकांना त्याची पूर्ण जाणीव नसल्यामुळें क्रमाक्रमानें त्याला तोंड फुटूं लागलें व शेवटीं तें त्रयस्थाकडे राज्याच्या वांट्या संबंधीं व हक्का संबंधीं कलह तोडण्याचें काम गेलें. अर्थात् हा भोंसले घराण्यांतील कलह आतां चव्हाट्यावर आला व त्याचा फायदा तंटे तोडण्याकरतां पुढें

येणाऱ्या व्यक्ती आपपलीं राजकारणें साधतील या दृष्टीनें करून घेण्याच्या प्रयत्नाला लागल्या. " शाहूच्या दरबारांतील दुफळीचा फायदा घेऊन निजामानें लगेच भयंकर कारस्थान रचिलें. चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर, दाभाडे व पिलाजी गायकवाड हे सरदार त्यास थोडे बहुत वश होतेच. प्रस्तुत कोल्हापूरच्या संभाजीसही त्यानें वश करून घेतलें. संभाजीस चिथवून त्याजकडून शाहूपाशीं राज्याचा निम्मा हिस्सा त्यानें मागविला. दोघां बंधूंचा हा कज्जा आपण मध्यस्थ होऊन तोडूं, असा बहाणा करून निजामानें चौथाई व सरदेशमुखी या हक्कांचा पैसा जप्तींत ठेविला. या उपक्रमानें शाहू संभाजींचा तंटा पुनः उपस्थित होऊन, लवकरच शाहूची सर्वथैव उचल बांगडी होण्याचा समय आला. " [ म. रि. मध्यविभाग १ पान १९२–९३ ] ही हकीकत रियासतकारांनीं दिली आहे.

संभाजी या राजकारणांत कां सामील झाला त्याची मीमांसा शाहूचे बखरींत पुढील प्रमाणें दिली आहे. " संभाजीराजे विपरीत बुद्धि करून, हें राज्य देव ब्राह्मणांचें, त्यांत श्रीसांब व श्रीभवानीची कृपा, यवन लोकांचा नाश करून राज्य वडिलांनीं स्थापिलें व आह्मीही तेंच करतों; यांत आपण यवनांचे आश्रयास जाऊन राज्यास अपाय करूं इच्छितों, हें शेवटास कसें जाईल, हा विचार करीत नाहींत. त्यापक्षीं आपणांस ही मसलत करणें प्राप्त जाली, ह्मणोन वर्तमान समजलियावरून विचार करून सर्व प्रधान व फौज यांस तयारी करून येण्याविशीं पत्रें पाठवून तयारी करविली. नवाब यांणीं तोफखाना व जंगी सामान गारदी वगैरे मजबूद करून, जाधवराव वगैरे सरदार मनसबदार व संभाजीराजे फौज सुद्धां कूच करून पुढें चालून आले. महाराजांनीं सर्व प्रधान बोलावून विचार केला जे, " संभाजीराजे यांणीं मनांत दुर्बुद्धी धरिली आहे. हें राज्यश्रीचे कृपेचें. थोरले महाराज यांजपासोन आजपर्यंत साध्य करण्यास कोण प्रयास लागले ? म्हणोन त्यांस पत्रें लिहिलीं जे " हें राज्य श्रीचें. यवन लोकांचे आश्रयास जाऊन त्यांचा आश्रय केला त्यास जय कसा येईल ? तुम्हांस राज्यलोभ बहुत होता तरि आम्हांस सांगोन पाठवावयाचें होतें. आह्मां-

पात्रीं सेवक लोक दिगांत प्रताप करावे ऐसे आहेत. यांतील तुमचे बराबर एकास देऊन एकादें राज्य साधून दिल्हें असतें. किंवा पूर्वी महाराजांनीं साध्य केलें त्यांतून तुम्हीं साध्य करून आह्मांस पराक्रम करून दाखवावा होता. किंवा आम्हीं तें राज्य यवनांनीं घेतलें तें पुन्हा सोडवितों, ( तेव्हां ) तुम्हांसही या खेरीज त्यांतील सोडवून दिलें असतें. आम्हीं सोडविलें त्यांत मागावें, व राज्याचा विभाग करावा द्यावा म्हणावें, हे कोठें नीत आहे ? पूर्वीही कोठें जालें नाहीं. हे कोण बुद्धी केली ? कैलासवासी राजाराम साहेब यांणीं औरंगजेब मोठे बलाढ्य शत्रू दोन लक्ष फौज दोन लक्ष पायदळासुद्धां येऊन संभाजीराजे यांचे अव्यवस्थेमुळें राज्य हरण केलें, सर्व फौज बुडाली, ऐसे समयांत कोणते प्रकारें चंदीकडे आम्हांस टाकून जाण्याचा समय प्राप्त जाला [तेव्हां] तसें करून चंदीस जाऊन पावले. तेथें फौज व सुभे जमवून दौलत जमविली. आणि तेथून रात्रंदिवस शत्रूशीं लढाया देऊन, फौज त्याची बुडवून राज्याचा भाग अम्मल नेला. पुन्हा तेथें प्रसंग पडला असतां देशीं येऊन लढाया जातीनें देऊन त्यांचीं मोठीं स्थळें औरंगाबाद जाऊन लुटलीं. ऐशी ख्यात केली. आम्ही नजरबंदींत होतों. त्यांचे पोटीं ते समयीं आपणच राज्याभिषेक करून राज्य करणें, सिंहासन करणें असतें, तरि त्यांचे हातीं काय न होतें ? आमची ठायीं कसें लक्ष ठेविलें, हें तुम्हीं जाणत असोन हा विचार केला. बरें, असो. जाली ती गोष्ट बरीच जाहाली. याउपरी तरि यवनाचा आश्रय करावा हें विहित नव्हे, ऐसें मनांत हरप्रकारें निघावें. तुम्हांस दौलत पाहिजे ती आम्ही नवीन सिद्ध करून देऊं अगर यांत खर्चास नेमणूक अधीक करून मागावी. (याच्या-पुढें कोल्हापूर प्रतींत मजकूर पुढें दिल्याप्रमाणें आहे:— " अगर ह्या दौलतींतच विभाग कसा करावा हे तुमचे आमचे विचारें बोलून घेऊं. तुम्ही व आम्ही राज्याचे मालक, घरगुती कामास यवनांचा आश्रय करूं नये. वडिलांनीं केलें त्याप्रमाणें तुम्हीं आम्हीं यवनांचा पराभव एकविचारें करून राज्य साधून वडिलांचा नेम सिद्धीस न्यावा. ") राज्याचा वांटा म्हणणें हें पुराणांतरींही जाहालें नाहीं. हे बुद्धी धरूं नये. " ऐशीं पत्रें व सांगोन पाठविलें

कीं, "सेनापती सेवक-लोक असोन, लढाई करून, हरामखोरी करून, महाराष्ट्रराज्य व धर्म सोडून यवनास शरण गेले. तेही मोठे कुळींचे रामदेवराव जाधवराव यांचा वंश. परंतु ( त्यांगीं ) धर्म सोडिला. त्यांची अनकूलता करून सेवक लोकांस व यवनास शरण जाणें हें फार वाईट. " म्हणून बहुतारितीनें सांगून पाठविलें असतां ते गोष्ट त्यांचे चित्तीं कांहींच आली नाहीं. आणि केले मनसुब्याचे अभिमानास पडून निजामउल्मुल्क यांणींही प्रतिनिधीचे विद्यमानें बोलणें करून तह जाला असतां लागलेच बिघाड करणें [ बरें नव्हे ] हा विचार न करतां ते व हे मिळोन चालून पुढें आले " [ थो. शा. म. च. आवृत्ति ३ री पान ७४-७५-७६.

शाहूराजे यांचें वरील पत्र व निरोप लक्षपूर्वक पहातां खालील गोष्टी खऱ्या ठरतात. (१) छत्रपति संभाजी राजे यांच्या अव्यवस्थेमुळें औरंगजेबानें राज्य हरण केलें. सर्व फौज बुडविली. तेव्हां राजाराम महाराजांनीं चंदीस जाऊन तेथें फौज व सुभे जमवून दौलत जमविली, असें शाहूराजे आतां कबूल करतात. ताराबाईचें ह्मणणें तेंच होतें. राजाराम महाराजांनीं नूतन राज्य संपादिलें असें ताराबाई ह्मणत असतांना त्यावर शाहूराजे मोंगलांच्या पाठबळामुळें आपला वारसा हक्क सांगत होते. आतां बादशहाकडून त्यांच्या नांवानें सनदा मिळाल्या बरोबर तेच ताराबाईचें ह्मणणें कबूल करूं लागले.

( २ ) ताराबाई बरोबर लढून राज्य संपादण्याकरितां मोंगलांची मदत घेऊन शाहूराजे दक्षिणेंत आले. मोंगलांच्या बळावर ते ताराबाईबरोबर लढले. आतां बादशहाकडून सनदा मिळून आपल्या गादीची स्थिरस्थावरता होतांच तेच शाहूराजे ' घरगुती कामास यवनांचा आश्रय करूं नये, यवनांस शरण जाणें हें फार वाईट; राज्याचा वांटा ह्मणणें हें पुराणांतरीही जाहालें नाहीं. महाराष्ट्र राज्य व धर्म सोडून यवनांस शरण जाणें हें फार वाईट" वगैरे वगैरे नीतीधर्मांचे पाठ संभाजीराजांना देऊं लागले. हें पाहिलें ह्मणज ' दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें पण स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं ' या ह्मणीची सत्यता पटल्याखेरीज राहत नाहीं.

(३) कोल्हापूरच्या प्रतींत ' ह्या दौलतींतच विभाग कसा करावा हें तुमचे आमचे विचारें बोलून घेऊं. तुम्हीं व आम्हीं राज्याचे मालक, घरगुती कमास यवनांचा आश्रय करूं नये. ' असा जो मजकूर आहे तोच खरा आहे. कारण चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा बादशहाकडून आल्यावर मराठी राज्याचे आपण उभयतां मालक आहोंत हीं भावना शाहूराजे यांचे मनांत जिवंत राहिली नव्हती. त्यांना आपण एकटेच राज्याचे धनी आहोंत असें वाटूं लागलें होतें. संभाजीराजे हे केवळ एक सरंजामी मांडलिक आहेत असा त्यांचा समज झाला होता. ' खर्चास नेमणूक अधिक करून मागावी ' या त्यांच्या शब्दप्रयोगावरून संभाजीराजे यांनीं खर्चापुरती नेमणूक घेऊन स्वस्थ रहावें व एवढाच त्यांचा हक्क आहे असें शाहूराजे यांना वाटूं लागलेलें स्पष्ट दिसतें. ' संभाजी नाराज होता, शाहू त्यास राज्याचा वांटा हवा तितका देईना. उत्तरोत्तर शाहूची भरभराट होऊन त्याचे सरदार गुजराथ, माळवा वगैरे प्रांतांत कारभार करूं लागले. त्याजबद्दल वैषम्य वाटून आपली हीन स्थिति सुधारण्यासाठीं संभाजीनें आपला प्रधान केशव त्र्यंबक यास चंद्रसेनाकडे पाठवून त्याचेमार्फत निजामाशीं मसलत केली. ' [ म. रि. म. वि.१ पान १९३ ] यावरून शाहूराजे व संभाजीराजे यांच्यामध्यें वाटणीचा जो प्रश्न होता तो मुख्यतः या सनदांच्या बाबतींत होता हें नक्की ठरतें. कारण चौथाई व सरदेशमुखी याच्या सनदा शाहूराजे यांना मिळाल्याबरोबर त्याच्या वसुलाकरतां त्यांच्या सरदारांना आपापलें पराक्रम दाखवावयाला नवीन क्षेत्र मिळालें तसें क्षेत्र संभाजीला न मिळाल्यामुळें संभाजीराजे नाराज होते. सरदेशमुखी ही भोंसले घराण्याची खासगत वतनी बाब असल्यानें, वसुलावर दहा टक्के प्रमाणें या बाबतीचें होणारें सर्व उत्पन्न गादीचे मालकास द्यावयाचें, त्यावर दुसऱ्या कोणाचा हक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें. ' [ म. रि. म. वि. १ पान १०० ] अर्थात् सरदेशमुखीच्या हक्कांतून संभाजीराजे यांना शाहूराजे यांनीं अचानक उडवून लावल्यामुळें संभाजीराजे यांना आपला हक्क प्रस्थापित करून घेणें क्रमप्राप्त झालें.

या कलहाचें शमन करण्याकरतां शाहूराजे यांनीं संभाजीराजे यांना तारीख ३० डिसेंबर सन १७२५ रोजीं तहनामा लिहून दिला तो असा:–

सन ११३५ फसली श्री फेरिस्त नंबर २

तहनामा चिरंजीव रा० संभाजीराजे यांस प्रती शाहूराजे यांणीं लिहून दिला सुरु सन सीत अशरीन मया व अल्लफ छ ५ माहे रबिलाखर उर्फ पौष शुद्ध ७ गुरुवार विश्वावसुनाम संवत्सरे........बितपशील. (का. सं. प. या. नं. ४१९)

[१] हद्द श्रीकृष्णा धौम महाबळेश्वरापासून दक्षिण तीर तहत निवृत्ति संगमपर्यंत कुल दुतर्फा मुलुख दरोबस्त ठाणीं व किल्ले तुह्मांस दिले असत. कलम १

[२] श्री सावित्री नदी संगमापासून तहत समुद्र गामिनीपर्यंत दक्षिण तीरं जंजिरे, कोट किल्लेसुद्धां व ठाणीं दरोबस्त मशूल अकोलेंपर्यंत तुह्मांस दिलीं असत....कलम १

[३] तुंगभद्रा दक्षिण तीरापासून श्रीकृष्णा समुद्रगामिनी व श्रीरामेश्वर देखील संस्थानें निमीं आह्मांकडे करार करून दिलीं असत...कलम १

[४] मोंगलाईतील वगैरे उत्तरेकडील मुलुख सुटले त्यांतील निम्मे प्रांत तुह्मांस देऊं व तुह्मांकडून सुटला असतां निम्मा प्रांत आह्मांस द्यावा... कलम १

[५] मीरत प्रांत व विजापूर प्रांतींचीं ठाणीं देखील अथणी, तासगांव वगैरे तुह्मीं आमच्या स्वाधीन करावें...कलम १

[६] इकडील चाकर तुह्मीं ठेवूं नयेत व तुह्मांकडील चाकर आह्मीं ठेवूं नयेत...कलम १

तुह्मांशीं जे वैर करतील त्यांचें पारिपत्य आह्मीं करावें, आह्मांशीं जे वैर करतील त्यांचें पारिपत्य तुह्मीं करावें. तुह्मीं आम्हीं एक विचारें राज्याभिवृद्धि करावी...कलम १

एकूण सात कलमें करार करून तहनामा लिहून दिला असे. सदहूप्रमाणें आह्मीं चालूं कांहीं अंतर येणार नाहीं. "मोर्तब"

याप्रमाणें शाहूराजे यांनीं करार लिहून दिला असतां व कलम ३ प्रमाणें कर्नाटक प्रांत संभाजी राजे यांना मिळाला असतां त्यावर शाहूराजे यांनीं आपले सरदार पाठवून मोहीम सुरूं केली व त्यामुळें नवीन कलहाचें बीज शाहूराजे यांनीं कसें पेरलें व त्यामुळें संभाजीराजे यांना आपले हक्क संरक्षण करण्याकरतां कसे प्रयत्न करावे लागले हें पुढें दिसून येईल.

चौथाई व सरदेशमुखी याच्या सनदा मिळतांच शाहूराजे यांचे सरदार जसे गुजराथ माळवा प्रांतांत कारभार करूं लागले तसाच प्रयत्न कर्नाटकांत फत्तेसिंग भोंसले करूं लागले. कृष्णा व तुंगभद्रा यांमधील प्रदेशावर संभाजी-राजे यांची मालकी ठरली होती. असें असतां शाहूराजे यांनीं आपल्या जबाब-दारीवर फत्तेसिंग भोंसले यांच्याबरोबर प्रतिनिधि, दाभाडे, सरलष्कर, पेशवे, बाबूजी नाईक, घोरपडे वजारतमाब इत्यादि सरदारांना देऊन कर्नाटकांत पाठविलें. त्यांनीं जाऊन तुंबलेल्या खंडण्या वसूल घेतल्या. सालाबाद पुढें घेण्याचा ठराव केला. हुजूरचीं ठाणीं गेलीं होतीं तीं सोडविलीं. ज्यांनीं मगरूरी केली त्यांचे प्रांतास जरब दिली. पेशवे व प्रतिनिधि यांनीं सोंद्यावर चाल करून जरब दाखविली. वगैरे प्रकार घडून आल्यामुळें संभाजीराजे यांच्या कारभारास व्यत्यय आला. (म. रि. म. वि. १ पान १८३) त्यामुळें स्वतःचे हक्कसंरक्षण करण्याकरतां संभाजीराजे यांना शाहूराजे यांचेविरुद्ध मसलत उभारणें भाग पडलें.

वरील योग्य कारणांकरतां संभाजीराजे यांना आपला स्वतंत्र मार्ग स्विकारावा लागला. दुसरी एक महत्वाची गोष्ट संभाजीमहाराज व त्यांचे हितचिंतक यांच्या डोळ्यापुढें खेळत असावी असें अनुमान निघतें. मागें दिल्याप्रमाणें दिल्लीच्या तख्तावर कोणी बसावें अगर जो तख्तावर असेल त्याला मारून टाकून तिसऱ्यालाच तख्तावर कसें बसवावें हे खेळ पातशहाचे नोकर ह्मणविणारे झुल्पिकरखान, सय्यद बंधु, निजाम वगैरे सरदार खेळत होते. स्वतःजवळ कर्तबगारी नसली ह्मणजे बलाढ्य सरदारांच्या आधीन राजा होता व त्यामुळें त्याचें राजेपण जाऊन तो सरदारांच्या हातांतील खेळणें बनतो.

तसाच प्रकार मराठी राज्यांत होईल कीं काय व तो तसा झाल्यास पुढें आपल्याला तें घातुक होईल असें संभाजीराजांना वाटत असावें असें दिसतें. शाहूराजे हे केवळ कागदी घोडे नाचविणारे होते. ऐषआरामी होते. तेव्हां त्यांचे सरदार त्यानांच डोईजड होतील व ते राज्यनाशाला केव्हां व कसे प्रवृत्त होतील याचा भरंवसा नाहीं अशी भीति त्यांना वाटत होती. कारण शाहूराजे यांचे जीवमानापर्यंत कशातरी गोष्टी ढकलल्या जातील परंतु त्यांच्या पश्चात् एक राज्य झाल्यानंतर हे डोईजड झालेले सरदार वागवून घेणें आपणाला जड जाईल या दृष्टीनेंहि विचार करणें संभाजीराजे यांचें कर्तव्य होतें. म्हणून पेशव्यासारख्या एकाद्या सरदाराला जास्त बलिष्ठ होऊं न देतां त्याचे प्रतिस्पर्धी चंद्रसेनासारख्यांना हातांत ठेऊन व त्यांचा सांभाळ करून आपली एक स्वतंत्रशक्ति कायम ठेवावी याकरतां संभाजीराजे यांची धडपड चालली होती. त्याकरतांच शाहूराजे यांच्या बोधपर पत्राचा त्यांच्या मनावर कांही एक परिणाम झाला नाहीं व ते आपल्या पुढील उद्योगाला प्रवृत्त झाले.

चंद्रसेन जाधवराव यांनीं प्रति.नि.धि यांस आंतून अनुकूल करून घेतलें. निजामानें चंद्रसेनाच्या मार्फत संभाजीराजे यांना असें पत्र लिहिलें कीं "संभाजी राजे यांनीं आपली सर्व फौज जमा करून शाहूवर स्वारी करण्याची तयारी ठेवावी. इकडील आम्ही फौज सामान पोक्त करून निघतो; आणि फौजेचा खर्च पाहिजे तो तुमच्या राज्याचा वाटा सिद्ध होईपर्यंत आम्हीं दरमहा चालवितों." याप्रमाणें संभाजीराजे किल्लेकोट घेत घेत अमात्यांसह निजामाकडे येऊन दाखल झाले. त्यानंतर निजामानें संभाजीराजे यांच्यातर्फे राज्याची वांटणी निम्मेनिम करून द्यावी असें शाहूराजे यांच्याबरोबर बोलणें सुरू केलें. तें शाहूराजे यांनीं नाकबूल केल्यामुळें पुढील युद्धाची तयारी निजामानें सुरू केली. या युद्धाच्या खटपटीकरतां संभाजीराजे कोल्हापूर सोडून सन १७२५ ते १७२८ पर्यंत तीन वर्षें बाहेर होते.

शाहूराजे यांनीं निजामाचें पारिपत्य करण्याकरितां सेनापति, सरलष्कर, सेनासाहेब सुभा, बाजीराव आणि आंग्रे यांना स्वारीवर पाठविलें. त्याप्रमाणें

बाजीराव व बाकीचे सरदार निघून मोगलांच्या मोंकाबल्यास जालना प्रांतांत गेले. पावसाळा संपल्यावर निजामातर्फे येऊन खान यानें मराठ्यांच्या फौजेवर हल्ला केला. तेथून बाजीराव मराठी फौजेसह मातुरकडे पळून गेला व तेथून औरंगाबादेस आला. बऱ्हाणपूर वगैरे शहरें निजामाच्या फौजेनें जाळलीं. चंद्रसेन व ऐवजखान हे बाजीरावाचे पाठीवर होते. ते आजिंठ्याचा घांट उतरल्यावर बाजीराव गुजराथेंत गेला, व सरबुलंदखान यास जाऊन भेटला. सरबुलंदखान व निजाम यांचें वांकडें होतें. त्यामुळें सरबुलंदखानानें त्यास मदत दिली. हें ऐकून निजाम व चंद्रसेन जाधवराव हे पुण्याकडे वळले, व त्यांनीं अहमदनगर येथें मुक्काम केला. बाजीराव कासारबारी घांटामध्यें येऊन उतरला. त्यानें गांडापूर वैजापूर हे प्रांत लुटले. चंद्रसेन जाधवराव व निजाम गोदावरी उतरून आले. तेव्हां बाजीरावानें डोंगरास आग लाऊन दिली. त्यामुळें गवत वगैरे मिळण्याची फारच मारामार पडली. मराठ्यांच्या चाली प्रमाणें मंडळें करून मराठे निजामाच्या फौजेवर चाल करूं लागले. निजामाचा तोफखाना मराठ्यांवर सारखा सुरू असल्यांकारणानें मराठ्यांचा बराच नाश झाला. परंतु मराठ्यांचे घोडेस्वार चपळ असल्याकारणानें ते टोळ्या करून लढूं लागले. चंद्रसेन जाधवरावानें आपल्याकडून मोठ्या निकराच्या लढाया दिल्या. परंतु त्यांच्या सैन्यांत मोंगली घोडेस्वार असल्याकारणानें त्यांस मराठ्यांचे बरोबर पल्ला करवत नसे. लढाईत निजाम व चंद्रसेन यांची फौज आसपास पुष्कळ मैलांवर पाणी नाहीं अशा ठिकाणीं येऊन उतरली; व मराठ्यांनीं इतक्यांत पाण्याची जागा अडवून धरली. त्यामुळें निजामाचें सैन्य फार हैराण झालें, व त्यांस तह करणें भाग पडलें. निजामानें ऐवजखानामार्फत बाजीरावाबरोबर मुंगीशेवगांवानजीक जो तह केला त्यांतील अटींचा आशय पुढीलप्रमाणें होता. १ संभाजीस आपल्या हवालीं करावें. २ मोंगलांचे सहा सुभ्यांवर मराठ्यांचे हक्क सुरळीत चालवावे. ३ पुनः या हक्कास हरकत न व्हावी म्हणून ठिकठिकाणीं तटबंदीच्या जागा आहेत त्या मराठ्यांचे हवालीं कराव्या. निजामानें शेवटच्या दोन अटी कबूल केल्या, पण पहिली संभाजीची

अट मात्र मान्य केली नाहीं. त्यासंबंधीं वाटाघाट होऊन संभाजी पन्हाळ्याकडे गेलाच होता. त्याजबद्दल पाहिजे ती व्यवस्था शाहूनें करावी असें ठरविण्यांत आलें. याप्रमाणें तह तारीख ६ मार्च सन १७२८ रोजीं होऊन दोनही पक्षाचे लोक आपापल्या ठिकाणीं निघून गेले.

**१२. संभाजीराजे यांचें पारिपत्यः**—संभाजीराजे पन्हाळ्यास निघून आल्यानंतर त्यांचें पारिपत्य करण्याचें शाहूराजे यांनीं ठरविलें. उदाजी चव्हाण हा संभाजीराजे यांच्या पक्षाचा शूर सरदार होता. त्यानें सन १७२९ च्या सुमारास वारणेच्या तीरीं येऊन शाहूराजे यांचा मुलुख लुटण्यास प्रारंभ केला. त्यानें आपलें ठाणें शिरोळ येथें केलें. शाहूराजे त्या बाजूस शिकारी करतां गेले असतां चव्हाण जवळच आसपास आहे असें त्यांना समजलें. पुढें एके दिवशीं शाहूराजे यांना मारण्यासाठीं आलेले चार मारेकरी जंगलांत भेटले. चौकशी अंतीं असें समजलें कीं, ते मारेकरी चव्हाणाकडून किंवा संभाजीराजे यांचेकडून आले होते. तेव्हां संभाजीराजे व चव्हाण यांचें पारिपत्य करण्याचा शाहूराजे यांनीं संकल्प करून त्यासाठीं मोठी तयारी चालविली. त्यांनीं शंभुसिंग जाधव, दावलजी सोमवंशी, सिधोजीराव निंबाळकर, सेखोजी आंग्रे, बाजीराव प्रधान, पिलाजी जाधव या सर्वांस पत्रें लिहून मोहिमेस बोलाविलें. शाहूराजे यांनीं युद्धाची तयारी केली तेव्हां उदाजी चव्हाण यानें संभाजीराजे यांस हिंमत देऊन लढाईस प्रवृत्त केलें. संभाजीराजे यांनीं आपल्या अष्टप्रधानांस व सरदारांस पत्रें लिहून आपापल्या फौजांसह हजर होण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें सर्व फौज येऊन वारणातीरीं जमा झाली. व्यंकटराव घोरपडे व भगवंतराव अमात्य हेही या फौजेंत होते. पण त्यांची अंतर्यामीं भक्ति संभाजीराजे यांच्याकडे नव्हती. शाहूराजे यांची तयारी होतांच त्यांनीं श्रीनिवासराव प्रतिनिधि यांस संभाजीराजे यांच्यावर चालून जाण्यास आज्ञा केली. उदाजी चव्हाण शिरोळ येथें धुमटांत होते. त्यास प्रतिनिधि व शंभुसिंग जाधव यांनीं वेढा घातला. संभाजीराजे यांनीं शिरोळचा वेढा उठवून उदाजीस ठाण्यांतून लष्करांत आणिलें. दुसरे दिवशीं पुन्हां लढाई होऊन मोड

झाला. तेव्हां चव्हाणासह निघून संभाजीराजे पन्हाळ्यास आले. जाधवराव व प्रतिनिधींनीं बुणगे लुटले. सडेच पळून गेले. प्रतिनिधीनें सर्वच लष्कर लुटून फस्त केलें. आणि हजारों लोक पाडाव केले. पाडाव झालेल्यांत ताराबाई, राजसबाई, संभाजीच्या बायका, भगवंतराव अमात्य व व्यंकटराव घोरपडे हे प्रमुख होते. यांपैकीं राजसबाई व संभाजीराजे यांच्या बायका यांस पन्हाळ्यास पोंचवून बाकीच्या तिघांस घेऊन प्रतिनिधी सातान्यास आला. ताराबाईंना परत कोल्हापुरास पाठविण्याचा विचार शाहूराजे यांचा होता, परंतु ' मला कोठें झालें तरी कैदेंतच रहावयाचें, त्याअर्थी तुम्हांजवळच राहूं. ' असें त्यांचें म्हणणें पडल्यावर, सातान्याच्या किल्ल्यावर राजवाडा होता तो दुरुस्त करून तेथें ताराबाईंना ठेवण्यांत आलें; आणि यादो गोपाळ यास त्यांचा कारभार सांगितला. भगवंतराव अमात्य यांचा दंड संभाजीराजे यांनीं स्वतः भरून त्यास सोडवून आणलें. व्यंकटराव घोरपडे प्रतिनिधी यांचेबद्दल बाजीराव पेशवे यांनीं दहा हजार रुपये दंड शाहूराजे यांच्या श्रीपतराव प्रतिनिधींस भरून त्यांची सुटका केली. ( इ. सं. इ. पान ४० ) प्रतिनिधि व बाजीराव एकाच धन्याचे चाकर होते. परंतु लढाईत पाडाव झालेल्या शत्रूचा दंड एक चाकर दुसऱ्या चाकरापासून घेतो हा राजनीतीचा मासला तत्कालीन राज्यव्यवस्थेचा निदर्शक आहे. [म. रि. म. वि. १ पा. २०६] शिवाय ही पद्धत लक्षांत घेतली म्हणजे या उपक्रमामुळें धनी व चाकर यांच्यामधील अविभक्तपणाचे व एकीचे संबंध होते ते नष्टप्राय होऊं लागले व त्यामुळें धन्याचें चाकरांवरील वजन उडून जाऊन चाकरांचाकरांमध्यें स्वार्थाचा प्रादुर्भाव उत्पन्न झाला; व तोच शेवटीं राज्याच्या नाशाला कारणीभूत झाला असें दिसून येतें. ही प्रथा शाहूराजे यांनीं चालू दिली. ' म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ सोकावतो ' या म्हणीप्रमाणें याचवेळीं जर शाहूराजे यांनीं श्रीपतराव प्रतिनिधींना थोडा दम भरला असता व व्यंकटराव घोरपडे यांची मुक्तता दंड न घेतां करविली असती तर हे गादीच्या चाकरांचाकरांमधील स्वार्थाचे उदय झाले नसते. शाहूराजे हे केवळ आपल्या जीवात्म्यापर्यंतच मराठी राज्याच्या अस्ति-

त्याकडे पहात होते. म्हणूनच त्यांना दूरदृष्टीचें राजकारण पहाण्याची जरूरी नव्हती असें विचारांतीं वाटूं लागतें.

१३ **कृष्णा वारणेचा तहः**—सर्व मराठी राज्यावर वारसा सांगण्याचा, निदान शाहूराजे यांच्या बरोबरीनें राज्याची वांटणी घेण्याचा हट्ट आजपर्यंत संभाजीराजे यांनीं धरला होता. परंतु वारणातीरीं त्यांचा पराभव झाल्यामुळें तो हट्ट त्यांनीं सोडला व मराठी राज्यांत लौकिक दृष्टीनें दुय्यम प्रतीचा धनीपणा स्वीकारण्यास ते प्राप्त परिस्थितीमुळें तयार झाले. शाहूराजे व संभाजीराजे यांच्यामध्यें तारीख १३ एप्रील सन १७३१ रोजीं राज्याच्या वांटणीचा तहनामा झाला. त्याला कृष्णावारणेचा तह अशी संज्ञा आहे. हा तह असा—

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजीराजे यांसी प्रती राजश्री शाहूराजे यांणीं लिहून दिल्हा. सुरू सन इहिदे सल्लासीन तथा व अल्लफ फ. ११४० छ. १६ साबान, विरोधीकृत संवत्सरे (शके १६५३ इ. स. १७३१ तारीख १३ माहे एप्रील) चैत्र वद्य २ बितपसील:—

कलम १ इलाखा वारूण महाल तहत संगम दक्षिण तीर कुल दुतर्फा मुलूख दरोबस्त देखील ठाणीं व किल्ले तुह्मांस दिले असत.

कलम २ तुंगभद्रेपासून तहत रामेश्वरदेखील संस्थानें निम्मे आह्मांकडे ठेऊन निम्मे तुह्मांकडे करार करून दिलीं असत.

कलम ३ किल्ले कोपळ तुह्मांकडे दिल्हा त्याचा मोबदला तुह्मीं रत्नागिरी आह्मांकडे दिला.

कलम ४ वडगांवचें ठाणें (किल्ला) पाडून टाकावें.

कलम ५ तुह्मांशीं जे वैर करितील त्यांचें पारिपत्य आह्मीं करावें. आह्मांशीं वैर करितील त्यांचें पारिपत्य तुह्मीं करावें. तुह्मीं आह्मीं एकविचारें राज्याभिवृद्धि करावी.

कलम ६ वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षिण तीर तहत निवृत्ति संगम तुंगभद्रेपावेतों दरोबस्त देखील गड ठाणीं तुह्मांकडे दिलीं असत.

कलम ७ कोंकण प्रांत साळशीपलीकडे तहत पंचमहाल अकोलें पावेतों दरोबस्त तुह्मांकडे दिले असत.

कलम ८ इकडील चाकर तुह्मीं ठेवूं नये. तुह्मांकडील चाकर आह्मीं ठेवूं नये.

कलम ९ मिरज प्रांत विजापूर प्रांतींचीं ठाणीं देखील अथणी तासगांव वगैरे तुह्मीं आमचे स्वाधीन करावी.

येकूण नऊ कलमें करार करून तहनामा लिहून दिल्हा असे. सदरहूप्रमाणें आह्मीं चालूं. यास अंतराय होणार नाहीं.

**१४ शाहूराजे व संभाजीराजे यांचा समेटः**—याप्रमाणें शाहूराजे यांनीं संभाजीराजे यांना तहनामा लिहून दिला. हा तहनामा सातारा मुक्कामीं झाला. शाहूराजे यांनीं संभाजी राजांना साताऱ्यास बोलावून घेतलें व तहनामा लिहून दिला त्या संबंधाची हकीकत मराठी रियासतमध्यें साधार दिली आहे ती अशी— ‘सन १७३१च्या माघमासीं साताऱ्याहून संभाजीस आणण्याकरितां श्रीपतराव प्रतिनिधि, नारोराम मंत्री, बाळाजी बाजीराव, भवानीशंकर मोरेश्वर, अंबाजीपंत पुरंदरे, कृष्णाजी दाभाडे, निंबाळकर व पांढरे वगैरे कित्येक नामी नामी सरदार फौजसुद्धां पन्हाळ्याच्या मुक्कामीं आले. सर्वांनीं नजरा ठरून जडजवाहीर हत्ती घोडे नजर केले. उपरांत पद्धतीप्रमाणें पोशाख घेऊन किल्ल्याखालीं उतरले. नंतर संभाजीची स्वारी किल्ल्याखालीं येऊन देवाळेनावली येथें मुक्काम जाहला. तेथून कूच दर कूच जाऊन वाठारावर मुक्काम केला. भगवंतराव अमात्यासही शाहूनें आदरपूर्वक बोलाविलें. पन्हाळ्याहून कऱ्हाडास थेट दक्षिणोत्तर रस्ता येतो त्यावर पन्हाळा, नावली, वडगांव, वारणातीर, इसलामपुर, वाठार, जखीणवाडी, कऱ्हाड हीं ठिकाणें आहेत. जखणवाडीच्या मैदानांत भेटीची जागा मुक्रर केलेली होती. श्रीपतराव व नारोराम मंत्री वाठाराहून पुढें उंब्रजेस गेले. सफाईचीं बोलणीं समजाविलीं. शाहूनें कऱ्हाडावर श्रीकृष्णेतीरीं डेरे देऊन मुक्काम करविला. जखीणवाडीपासून वाठारापावेतों उभयतांकडील संपूर्ण सरदार वगैरे मिळून दोन लक्ष पावेतों जथ

जाहला. उभय महाराजांच्या स्वाऱ्या हत्तीवर बसून बिछायतीवरून मोठ्या मिरवणुकीनें लोकांचे मुजरे घेत घेत भेटीच्या जागेपावेतों आले. थोडें अंतर राहिल्यावर उभयतां महाराज हत्तीवरून उतरून स्वार झाले. नजीक आल्यावर उभयतां घोड्यावरून उतरले. संभाजीनें शाहूच्या पायांवर मस्तक ठेविला. शाहूनीं त्यास उठवून आलिंगन दिलें. उभयतांच्या प्रथम भेटी श्रीकृष्णसानिध्यें होऊन बहुत आनंद जाहला. त्या वेळीं परस्पर सुवर्ण रौप्य वगैरे सत्के व पुष्पांची वृष्टि झाली. वाद्यें वाजलीं. तोफांची सरबत्ती झाली. फाल्गुन शुद्ध द्वितीया मंदवार शके १६५२ फेब्रुवारी तारीख २७ सन १७३१ रोजीं राजश्री स्वामी कऱ्हाडास जाऊन राजश्री संभाजीराजे यांची भेट चवदावे घटकेस मध्यान्हीं झाली, आणि सायंकाळीं माघारे कऱ्हाडास गेले. मुदपाक कऱ्हाडास केले. कऱ्हाड व जखीणवाडीमध्यें माळावर दुसरी भेट होऊन कसब मज्कुरीं श्रीकृष्णतीरावर मुक्काम केले. नंतर शाहूनें संभाजीचा हात धरून उभयतांबंधू एका हत्तीवर स्वार झाले. खवासखान्यांत शंभुसिंग जाधव दोन मोर्चेले घेऊन बसले. नंतर संपूर्ण लोकांचे मुजरे घेत स्वाऱ्या मुक्कामाच्या डेऱ्यावर आल्या. येथें बहुत प्रकारें बोलणीं झालीं, आणि हत्ती, घोडे, सुवर्णाचें सामान, जवाहीर, कोठार ऐसें शाहूनें संभाजीस दिलें. पुढें कऱ्हाडाहून उंबरजेस उभयतां महाराजांच्या सड्या स्वाऱ्या आल्या. तेथें मेजवान्या भोजनें झालीं. साताऱ्यास शिमगी पौर्णिमा व्हावी म्हणून ममतायुक्त आग्रहानें बोलावून साताऱ्यास घेऊन आले. त्यासमयीं संपूर्ण शहरचे लोक बाहेर येऊन उभयतां बंधूंचा समारंभ पाहून सत्के व खैरात बहुत जाहली. संभाजीचा मुक्काम साताऱ्यास पेशव्यांच्या वाड्यांत म्हणजे अदालतीच्या वाड्यांत होता. दोन महिने मुक्काम झाला. मागें दर्शविल्याप्रमाणें तारीख १३ एप्रील सन १७३१ रोजीं शाहूराजे यांनीं तह-नामा संभाजीराजे यांना लिहून दिला तो याच मुक्कामाचे वेळीं झाला. फाल्गुन व चैत्र दोन महिने संभाजीचा मुक्काम साताऱ्यास होता. मोठमोठ्या सरदारांनीं संभाजीस मेजवान्या केल्या. शाहूनें हत्ती, घोडे, जडावाचा खंजीर, पोषाख, व रोख दोन लक्ष रुपये असें देऊन रवानगी केली. बरोबर फत्तेसिंग भोंसले

फौजेनिशीं पन्हाळ्यापर्यंत दिले. स्वतः शाहू चार कोसपावेतों पोंचविण्यास गेला होता.

**१५ समेटाची कारणमीमांसा:**—वरील सर्व हकीकत वाचली म्हणजे खालील विचार मनांत आल्याशिवाय राहत नाहींत. १ शाहूराजे यांनीं संभाजी राजे यांचा पराभव करून त्यांना पन्हाळ्यास पळवून लाविलें; त्यांचा साथीदार निजाम याचा पराभव करून त्याच्याबरोबर तह केला आणि संभाजीराजे यांच्या पक्षांतून त्याला कायमचा फोडला; चंद्रसेन जाधवराव हाही त्यामुळें संभाजीराजे यांना अंतरला; ताराबाई, अमात्य व प्रतिनिधी यांचें बळही संभाजीराजे यांना अंतरलें. अशा सर्व निराशामय स्थितींत संभाजीराजे हे असतां शाहूराजे यांनीं त्यांना सरदार वगैरे पन्हाळ्यास पाठवून मोठ्या मान-मरातबानें भेटीस बोलाविलें; बंधुप्रेमाचें प्रदर्शन जितक्या तऱ्हेनें करतां येईल तेवढें केलें; जेवढें धाकट्या भावाला देतां येईल तेवढें दिलें; मराठी राज्यावर संभाजीराजे यांचा बरोबर निम्मा हक्क आहे असें उघड जगजाहीर केलें; हें सर्व वाचलें ह्मणजे शाहूराजे किती थोर अंतःकरणाचे होते, आपल्या चुलत भावाच्या भयंकर अपराधांची विशुद्ध मनानें क्षमा करणारे केवढे दयाशील होते हें सकृद्दर्शनीं प्रत्येक वाचकाला वाटल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु ऐतिहासिक गोष्टींच्या बाह्य पटांतून थोडें आंत घुसलें ह्मणजे असें वाटतें कीं, ज्या शाहूराजांनीं ताराबाईना नेस्तनाबूद करण्याकरितां रांगण्याची मोहीम केली त्या वेळीं त्यांचें मातृप्रेम किंवा बंधुप्रेम कोठें अदृश्य झालें होतें? आणि आणि याच वेळीं तें एकदम कोठून व कसें प्रगट झालें? अशी शंका आल्याशिवाय रहात नाहीं. या शंकेच्या निरसनाचा प्रयत्न करूं लागलें ह्मणजे ता. ३० डिसेंबर सन १७२५ रोजीं शाहूराजे यांनीं संभाजीराजे यांना लिहून दिलेला तहनामा प्रामुख्यानें डोळ्यापुढें येऊन उभा राहतो. त्या पूर्वी शाहूराजे यांनीं बाळाजी विश्वनाथाचे करवीं दिलेलीं वचनें, राज्याच्या वांटणीसंबंधींचे करारमदार वगैरे केवळ शपथप्रमाणांवर अवलंबून होते. परंतु वरील तहनामा शाहूराजे यांच्या शिकामोर्तबाचा पांढऱ्यावर काळें होऊन

बसलेला होता. हा तहनामा एका हातानें संभाजीराजे यांना लिहून दिला व त्या तहनाम्याविरुद्ध दुसऱ्या हातानें कर्नाटकाच्या मोहिमेची आपल्या सरदारांना आज्ञा दिली. त्या आज्ञेप्रमाणें 'पेशवे व प्रतिनिधी यांनीं सोंध्यावर चाल करून जरब दाखविली.' [ म. रि. म. वि. भाग १ पान १८० ] वगैरे संभाजीराजे यांच्या मुलुखांत शिरून शाहूराजे यांनींच तहनामा मोडून संभाजीराजे यांच्याबरोबर कलागत उत्पन्न केली. त्यामुळें, संभाजीराजे यांना आपल्या हक्कसंरक्षणाकरितां शाहूराजे यांच्याबरोबर सामना द्यावा लागला. हा अपराध संभाजीराजे यांचा नसून तो उघड उघड शाहूराजे यांचा होता. स्वतःच्या सामर्थ्यावर संभाजीराजे यांचा जरी पराभव होऊं शकला तरी नैतिक दृष्टीनें आपण अपराधी आहोंत ही जाणीव होण्याइतके शाहूराजे विचारवंत होते. शिवाय ताराबाई या साताऱ्यास जाऊन राहिल्यामुळें त्यांनींही या बाबतींत शाहूराजे यांची उत्तम प्रकारें कानउघाडणी केली असेल यांत शंका नाहीं. याकरितां कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन शाहूराजे यांनीं कृतापराधाचें परिमार्जन व्हावें म्हणून संभाजीराजे यांना मोठ्या गौरवानें बोलावून त्यांचा सन्मान व सत्कार केला हें उघड दिसतें. शाहूराजे व संभाजीराजे यांचा वरिष्ठ व कनिष्ठ बंधुभावाचा संबंध होता. तेव्हां कृतापराधाबद्दल शाब्दिक खेदप्रदर्शन करतां येण्यासारखें नव्हतें. म्हणून शाहूराजे यांनीं संभाजीराजे यांचा सन्मान व सत्कार करण्यांत ज्या मनोभावना व्यक्त केल्या त्यांतूनच वरील त्यांचा हेतू स्पष्ट दिसल्याशिवाय राहिला नाहीं.

(२) शाहूराजे यांनीं लिहून दिलेला तहनामा पाहिला म्हणजे जय कोणाचा झाला व पराभव कोणाचा झाला याची शंका आल्यावांचून राहत नाहीं. ज्याचा जय होतो त्यानें पराभव झालेल्या पक्षाकडून तहनामा लिहून घ्यावयाचा असतो. पराजित पक्षानें तहाच्या अटी पाळावयाच्या असतात. शाहूराजे व संभाजीराजे यांच्या कलहसमरांत शाहूराजे जर विजयी झाले असते तर त्यांनीं संभाजीराजे यांचेकडून तहनामा आपले नांवें लिहून घेतला असतां व त्या तहनाम्याच्या अटी आपण संपूर्णतन्हेनें पाळूं असें संभाजी महाराजां-

करून शेवटीं लिहून घेतलें असतें. परंतु हा तहनामा ज्याअर्थीं शाहूराजे यांनीं संभाजीराजे यांना लिहून दिला आहे व शेवटीं ' सदरहूप्रमाणें आम्हीं (शाहूराजे) चालूं. यास अंतराय होणार नाहीं ' असें शाहूराजे लिहून देतात त्याअर्थीं संभाजीराजे हे संपूर्ण मराठी राज्याचे खरे धनी असून त्या राज्याचा निम्मा हिस्सा शाहूराजे यांच्याकडे कांहीं कालपर्यंत ह्मणजे त्यांचा केवळ जीवात्मा असेपर्यंतच चालावयाचा होता असा अर्थध्वनि निघाल्याशिवाय राहत नाहीं. संभाजीराजे हे वयानें व मानानें शाहूराजे यांच्यापेक्षां लहान असतां त्यांना हा जो मोठेपणाचा मान शाहूराजे यांचेकडून मिळाला त्याचा संदर्भ मागें दर्शविल्याप्रमाणें ताराबाईचा अपूर्व त्याग, शिवाजीराजे यांचा राजसंन्यास आणि बाळाजी विश्वनाथ यांचा उभय पक्षांतील तडजोडीचा प्रयत्न यांच्याशीं लागल्याशिवाय रहात नाहीं.

[३] शाहूराजे यांनीं संभाजी राजांना जो तहनामा लिहून दिला त्याची अंमलबजावणी पुढें कशी काय झाली याच्याविषयीं खरेशास्त्री यांनीं इचलकरंजी संस्थानच्या इतिहासांत बरेंच स्पष्टीकरण केलें आहे तें असें; [इ. सं. इ. पान ४३–४४] ' कलम तीन, पांच व आठ यांखेरीज हा तह उभयपक्षीं मुळींच पाळिला गेला नाहीं हें दाखविण्यासाठीं आम्ही कलमवारीनें विवेचन करितों.

कलम १ हल्लीं सातारा जिल्ह्यांत बत्तीसशिराळ्याचा पेटा आहे त्यालाच पूर्वीं वारुण महाल हें नांव होतें. तो महाल तह झाला तेव्हां उदाजी चव्हाणाच्या ताब्यांत होता. पुढें शाहू महाराजांनीं चव्हाणाचें पारिपत्य करून त्यापासून तो महाल घेऊन प्रतिनिधीस दिला. महाराज वारल्यावर पेशव्यांनीं तो महाल प्रतिनिधीपासून घेतला. तात्पर्य करवीरकरांस तो महाल कधीं मिळाला नाहीं.

कलम २. तुंगभद्रेपलीकडच्या संस्थानांत शाहू महाराजांच्या हयातींत एक स्वारी झाली होती. त्या वेळीं तिकडील संस्थानांपासून मिळालेल्या खंडणीचा हिस्सा करवीरकरांस मिळाला नाहीं. पुढें पेशव्यांनीही तुंगभद्रेपलीकडे पुष्कळ स्वाऱ्या केल्या, परंतु करवीरकरांस कधीं हिस्सा दिला नाहीं. त्या

स्वाऱ्यांतून करवीरकरांची फौजही कधीं हजर नव्हती. असती तर खंडणीचा हिस्सा मिळाला असता. फक्त सोंधें व बिदनूर या संस्थानांची खंडणी मात्र संभाजी महाराजांस मिळत होती. पण पुढें तीही वसूल करवेना म्हणून त्यांनीं ती घेण्याचा हक्क पेशव्यांस देऊन टाकला.

कलम ४. तहाप्रमाणें करवीरकरांनीं वडगांवचें ठाणें पाडलें नाहीं. पेशवाईत तें ठाणें मजबूत असल्याबद्दल प्रसिद्धि होती.

कलम ६. वारणा-कृष्णेच्या संगमापासून निवृत्ति संगमापर्यंत ( कृष्णा-तुंगभद्रा यांच्या संगमापर्यंत ) मुलूख संभाजी महाराजांस दिल्याचें या कलमांत लिहिलें आहे. याचा अर्थ इतक्या टापूंत तुम्हीं स्वारी शिकारी करून मिळेल तो मुलूख मिळवावा अगर या सर्व टापूंतील चौथसरदेशमुखी होईल तर वसूल करावी एवढाच होता. तह झाला तेव्हां तो मुलूख शाहूमहाराजांच्या हातीं मुळींच नव्हता. व पुढें तो संभाजी महाराजांनींही घेण्याचा प्रयत्न केला नाहीं. तो मुलूख दुसऱ्याच्या हातीं जाणार असें पाहतांच शाहूमहाराज व त्यांचे पेशवे यानीं आपला अंमल बसविला व त्याची वांटणी करवीरकरांस त्यांनीं मुळींच दिली नाहीं.

कलम ७. या कलमांत लिहिलेल्या मुलुखाचीही गोष्ट बहुतेक अंशीं ६ व्या कलमांत लिहिलेल्या हकीकतीसारखीच आहे.

कलम ९. प्रांत मिरज व विजापूर येथील ठाणीं अथणी तासगांव-सुद्धां उदाजी चव्हाणाच्या स्वाधीन असल्यामुळें संभाजी महाराजांनीं तीं शाहू महाराजांच्या स्वाधीन केलीं नाहींत. शाहूमहाराज व त्यांचे पेशवे यानीं तीं ठाणीं चव्हाणापासून परस्पर घेतलीं, व मिरजेचा किल्ला मोंगलांच्या ताब्यांत होता तो खुद्द शाहूमहाराजांनींच काबीज केला.

याप्रमाणें खरे शास्त्रयांनीं शाहूराजे यांच्या तहनाम्यांतील सहा कलमांची वासलात लाविली आहे. ही वासलात लावतांना खरेशास्त्रयांचे मनाला हा तह म्हणजे शुद्ध पोरखेळ होता असें वाटत असलें पाहिजे असें दिसतें. परंतु वस्तुस्थिति खात्रीनें तशी नव्हती. वरील कलमांचा विचार करतांना खरे

शास्त्रयांच्या ज्ञानचक्षूपुढें नानासाहेब पेशव्यांनीं व चिमाजीआप्पांनीं सन १७४० मध्यें संभाजीराजे यांना जो करारनामा लिहून दिला तो अजिबात नव्हता अगर त्याबद्दल त्यांनीं बिलकुल विचारच केला नव्हता असें दिसतें. कारण वरील कलमांची झडती घेतांना कलम ८ हें त्यांनीं ताऊनसुलाखून पाहिलें नव्हतें. ' इकडील चाकर तुम्हीं ठेऊं नये. तुम्हांकडील चाकर आम्हीं ठेवूं नये. ' असें स्पष्ट कलम असतां नानासाहेब पेशवे व चिमाजीआपा या उभयतांनीं संभाजीराजे यांना गुप्त करार करून दिला. तो मागील प्रकरणांत आलाच आहे. त्यांत त्यांनीं बाह्यात्कारी आम्हीं शाहूराजे यांचे सेवक पण अंतर्यामीं संभाजीराजे यांचे सेवक असें स्पष्टपणें म्हटलें आहे. यावरून या गुप्त करारनाम्याच्या मूळ उद्देशांतच वरील कलमांची अंमलबजावणी कां झाली नाहीं याचें उत्तर आहे. शाहूमहाराजांचा जीवात्मा असेपर्यंतच जर हीं दिसा-वयाला दोन राज्यें होतीं व त्यानंतर जर त्यांचें एकछत्री राज्य होऊन सर्व राज्याचे धनी एकटे संभाजी महाराज होणार होते तर वरील तहनाम्याप्रमाणें कलमांची अंमलबजावणी होणें अगर न होणें हें संभाजी महाराजांच्या मर्जीवर अवलंबून होतें. शाहूराजे यांनीं तहनामा लिहून दिल्यानंतर ' वाटींत राहिलें काय किंवा ताटांत सांडलें काय ' अशी भावना संभाजीराजे यांची झाली असेल यांत संशय नाहीं. शाहूराजे यांचीही तीच भावना असल्यामुळें उभय-बंधूंत सदर तहनाम्याच्या अटी कारण पडल्याशिवाय अंमलांत आणल्याच पाहिजेत असें कोठें होतें ? शिवाय पेशवे हे संभाजीराजांना धनीच समजत होते. त्यामुळें संभाजीराजे यांनीं आपल्या अष्टप्रधानांत बाह्यात्कारीं पेशव्याची जागा रिकामी ठेविली होती; परंतु अंतर्यामीं पेशवे हे त्यांचें काम करीतच होते. या स्पष्टीकरणावरून सदरी तहनाम्यांतील कलमांची अंमलबजावणी कर-ण्याचें कां कारण पडलें नाहीं याचा बोध होईल.

( ४ ) शाहूराजे मोंगलांच्या कैदेंतून सुटून आल्यानंतर मराठी राज्यां-तील दुफळीला प्रारंभ झाला. ही दुफळी ताराबाई व शाहू यांच्यामध्यें सुरू झाली. या राजघराण्यांतील दुफळीमुळें अष्टप्रधान, सरदार वगैरे यांच्यामध्यें

दुफळी झाली. ती पुढें किती प्रमाणांत विकोपाला गेली व त्यामुळें मराठी राज्याचें किती व कसें नुकसान होऊं लागलें हा इतिहास मागें आलाच आहे. या मराठ्यांच्या आपसांतील दुहीला ताराबाई या कारणीभूत झाल्या असा एका पक्षाचा प्रवाद आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें शाहूराजे हे दिल्लीपतीचे अंकित होऊन त्यांचें इष्टकार्य साधण्याकरतां मुक्त झाले व त्यांनीं मराठी राज्यांत पहिल्यांदा दुफळीचें बीज पेरलें. या बाबतींत कोणीं कोणाला किती प्रमाणांत दोष द्यावयाचा हा विषय स्वतंत्र असल्यामुळें आजपर्यंतच्या इतिहासकारांनीं आपल्या बुद्धीप्रमाणें ती कामगिरी बजावलेली आहे. परंतु त्या बाबतींत येथें एकच गोष्ट निदर्शनाला आणून द्यावयाची आहे ती ही कीं, प्रतिनिधींनीं ताराबाई यांना पकडून साताऱ्यास आणिलें त्या वेळीं शाहूराजे यांचा विचार त्यांना परत कोल्हापुरास पाठविण्याचा होता. ताराबाईच्या मनांत शाहूराजे या व्यक्तीविषयीं जर द्वेषभाव असतां तर त्या कोल्हापूरास खात्रीनें गेल्या असत्या. शाहूराजे या व्यक्तीबद्दल ताराबाईच्या मनांत लोक समजत होते तसा द्वेषभाव मुळींच नव्हता. त्यांचा लढा केवळ तत्वापुरताच असल्यानें त्यांनीं व त्यांच्या अभिषिक्त पुत्रांनीं राजत्याग केल्यामुळें तो सहजच नष्ट झाला. परंतु हा समज शाहूराजे यांच्या मनांतून जाण्याकरतां ताराबाई यांनीं आपला पुत्र शिवाजीराजे यांना साताऱ्यास शाहूराजे यांच्याकडे रवाना केलें. त्यांचेकडे शिवाजीराजे यांना पाठविण्याचा ताराबाईचा प्रधान हेतु त्यांना योग्य औषधोपचार व्हावा व त्यांतून ते बरे व्हावे असा असणें स्वाभाविक होतें. शिवाजीराजे शाहूराजे यांच्या सांनिध्यांत राहिल्यामुळें शाहूराजे यांचेंही मन आपल्याबद्दल निर्मळ होईल असा दुसराही त्यांचा हेतु असणें शक्य होतें. पुढें शिवाजीराजे मागील १० व्या प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणें तारीख २४ मार्च सन १७२६ रोजीं सातारा किल्ल्यावर शाहूराजे यांच्या स्वाधीन असतां मरण पावले. त्यामुळें शाहूराजे यांचें मन ताराबाईच्याबद्दल शुद्ध झालें होतें. परंतु शिवाजीराजे यांचा सहवास व मृत्यु हे गुप्त स्वरूपाचे असल्यानें लौकिकांत ताराबाई यांचेबद्दल जो प्रवाद होता तो

त्यामुळें गेला नव्हता. ह्मणून या प्रसंगीं ताराबाई ह्मणाल्या कीं मला कोठेंही नजरबंद रहावयाचें. कोल्हापूर काय किंवा सातारा काय? असें सांगून ज्या अर्थी त्या सातान्यास शाहूराजे यांच्याकडे राहिल्या व त्यांची राहण्याची वगैरे उत्तम व्यवस्था त्यांनीं लावून दिली, व शेवटपर्यंत ताराबाई तेथेंच राहिल्या, त्या अर्थी मराठी राज्यांत दुहीचें बींज ताराबाईनीं पेरलें असा जो लोकांचा समज अथवा भ्रम होता तो ताराबाईच्या या कृतीनें साफ नष्ट झाला. यामुळें लोकांना व इतर राजकर्त्यांना मराठ्यांतील दुहीचा जो भ्रम वाटत होता तो ताराबाईनीं नष्ट केल्यामुळें त्यांनीं मराठी राज्यांतील अष्टप्रधान आणि सरदार वगैरेमधील दुही घालवून राज्याभिवृद्धीचा मार्ग पूर्ण मोकळा करून दिला. मराठी राज्याचा जो पुढें भारतवर्षांत दिग्विजय झाला त्याला मूळ कारण ताराबाईचा हा अपूर्व त्याग होय. याप्रमाणें मोठ्या समाधानानें जसें शाहूराजे व संभाजीराजे यांचा समेट होऊन त्यांना आनंद झाला तसाच मराठी राज्यांतील अष्टप्रधान, सरदार, प्रजा यानांही झाला यांत संदेह नाहीं.

——

# प्रकरण १२ वें

## शाहूराजे यांची अखेर.

१ शाहूराजे व संभाजीराजे यांचे एकोप्याचे व्यवहार, २ पेशवेपद कोणाला द्यावें याची वाटाघाट. ३ संभाजीराजे यांचें नानासाहेबांस पाठबळ. ४ संभाजीराजे व पेशवे यांमधील गुप्त करार. ५ गुप्त करारासंबंधीं रियासतकारांची विचारसरणी. ६ गुप्त करारांचें खरें रहस्य. ७ कोल्हापूरच्या राज्याची स्थिरस्थावरता. ८ चाकर पेशवे सामर्थ्य-वान् व धनी छत्रपति सामर्थ्यहीन. ९ शाहूराजे यांची वनवासवाडी व दत्तकाच्या योजना. १० रामराजे यांचा पूर्व वृत्तांत. ११ शाहूराजे यांचें वचनपालनत्व. १२ शाहूराजे यांच्या दोन यार्द्यांची छाननी. १३ शाहूराजे यांचा अंत. १४ सकवारबाईचें सहगमन. १५ खून कीं आत्महत्याकारांचे उद्गार.

**१. शाहुराजे व संभाजीराजे यांचे एकोप्याचे व्यवहारः-** मागील प्रकरणांत शाहूराजे व संभाजी यांचा वारणेच्या तहनाम्याप्रमाणें समेट झाल्यावर भोंसले घराण्यांतील दुही कायमची नष्ट झाली. ताराबाई शाहूराजे यांच्याच जवळ राहिल्या. संभाजीराजे कोल्हापुरास येऊन राज्य करूं लागले. उभयतां बंधूंत पुढें कधींच तंटा उत्पन्न झाला नाहीं. बंधुभावाचें संबंध अखेरपर्यंत चालू राहिले. या उभयतां बंधूंच्या भेटी वारंवार एकदोन वर्षांनीं तरी होत असत. संभाजीराजे यांस आणण्याकरतां शाहूराजे मुद्दाम फत्तेसिंग भोंसले, प्रतिनिधि, पेशवे वगैरेस कोल्हापूरास पाठवीत होते. सन १७३२ च्या नोव्हेंबर महिन्यांत संभाजीराजे साताऱ्यास आले असावे. फत्तेसिंग भोंसल्यास

ते दादा ह्मणत असत. सन १७३४ ३५ त संभाजीराजे व जिजाबाई यांच्या स्वाऱ्या जेजुरीस गेल्या होत्या; तेथून प्रतापगड व महाबळेश्वर या ठिकाणीं जाऊन साताऱ्यास आल्या. त्या वेळीं शाहूराजे आपल्या सर्व सरदारांसह त्यांना सामोरें जाऊन आपल्या बरोबर वाड्यांत घेऊन आले. तेथें त्यांचा त्यावेळीं दोन महिने मुक्काम झाला. नंतर शाहूराजे यांच्यासह या खाश्या स्वाऱ्या शंभु महादेवाच्या दर्शनाला गेल्या. तेथून परत येतांना बोरगांवपर्यंत ते एकत्र आले. तेथून शाहूराजे साताऱ्यास गेले व संभाजीराजे कोल्हापूरास परत आले. त्यानंतर संभाजीराजे सन १७४० मध्यें साताऱ्यास आले. ते पहिल्यानें जेजुरीस दर्शनाकरितां तारीख २ जून १७४० ला गेले. (ना. सा. रो. ले. १९३) तेथून ते साताऱ्यास आले. बाजीराव पेशवे हे तारीख २८ एप्रिल सन १७४० रोजीं निवर्तल्यामुळेंही संभाजीराजे यांची साताऱ्याची भेट महत्वाची होती. (म. रि. म. वि. भाग १ पान २१४) बाजीराव यांच्या पश्चात् पेशवेपदाचीं वस्त्रें नानासाहेबांना तारीख २५ जून सन १७४० रोजीं मिळालीं. त्यानंतर तीन महिने पावेतों नानासाहेबांचा मुक्काम साताऱ्यास होता. ते तारीख ११ आक्टोबर सन १७४० रोजीं पुण्यास आले. संभाजीराजे हे ता. ३० मार्च सन १७४१ला साताऱ्याहून कोल्हापूरास परत गेले. (शा. म. रो. ले. १७८) यावरून संभाजीराजे यांचा मुक्काम या प्रसंगीं साताऱ्यास नऊ दहा महिने होता असें ठरतें ह्या अवधींत मराठी राज्याचें मुख्य कर्तबगार बाजीराव पेशवे निवर्तल्यामुळें शाहूराजे यांच्याकडे साताऱ्यास राजकारणें घाटत होतीं. त्यामुळें संभाजीराजे यांचा मुक्काम इतके दिवस तेथें झाला होता. संभाजीराजे यांनीं आपल्या राज्यांत पेशव्याव्यतिरिक्त सर्व प्रधान नेमले होते. ते बाजीराव यांना आपला पेशवा समजत होते. अर्थात् बाजीरावानंतर पेशवेपद कोणाकडे जातें व त्यामुळें आपल्या हक्कांना बाध येईल कीं काय हें पहाणें संभाजीराजे यांना भाग पडलें. ह्मणूनच त्यांची ही साताऱ्याची भेट राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची होती.

नानासाहेब पेशवे हे चिमाजी आपांसह तारीख ५ जून रोजीं पुण्याहून

निघून तारीख १३ जून सन १७४० रोजीं सातार्‍यास आले. त्याच सुमारास संभाजीराजे जेजुरीहून सातार्‍यास आले असावे. यावेळीं पेशवेपद कोणाला द्यावें यासंबंधीं शाहूराजे यांच्याकडे वाटाघाटी सुरू होत्या. अर्थात् त्या वाटाघाटींशीं राजकारणाच्या दृष्टीनें पहातां संभाजीराजे यांचा राज्याचे धनी या दृष्टीनें शाहूराजे यांनीं सल्ला घेणें योग्य होतें; आणि संभाजीराजे यांनीं तो सल्ला विचारपूर्वक देणेंही अगत्याचें होतें. या बाबतींत संभाजीराजे यांनीं शाहूराजे यांना जो सल्ला दिला तो ताराबाईंच्या सल्ल्यानेंच दिला असेल यांत शंका नाहीं. कारण शाहूराजे व संभाजीराजे या उभयतांना त्याच वडील असून त्या तेथेंच होत्या.

**पेशवेपद कोणाला द्यावें याची वाटाघाटः—** या वेळीं पेशवे पद कोणाला द्यावें हा महत्वाचा मुख्य प्रश्न शाहूराजे यांच्यापुढें होता. त्या बाबतींत दोन पक्ष निर्माण झाले. एक पक्ष नागपूरचे रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा व दुसरा पक्ष नानासाहेब पेशव्यांचा होता. रघोजी भोंसले हे शाहूराजे यांच्या विश्वासांतले, आप्तसंबंधीं व लोभांतले होते. त्यावेळीं रघोजी हे मोठे मुत्सद्दी आणि पराक्रमी सरदार गणले जात होते. ते भोंसले कुळांतील असून शाहूराजे यांच्या पत्नी सकवारबाई व रघोजी भोंसले यांच्या पत्नी सुळाबाई या चुलत बहिणी होत्या. शिवाय शाहूराजे यांना गादी प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नांत रघोजी भोंसले यांचे आजे बापूजी भोंसले व त्यांचे बंधु परसोजी भोंसले हे होते. ताराबाईंनीं हे खरे शाहूराजे आहेत कीं खोटे—तोतया आहेत हें ठरविण्याकरतां बापूजी भोंसल्यांनाच पाठविलें होतें. त्यांनीं आपल्या ताटांत शाहूराजे यांना जेवावयाला घेऊन शाहूराजे हे खरे आहेत, तोतया नव्हेत अशी सर्वांची खात्री केली. त्या प्रमाणें ताराबाईंचीही झाली. हा विषय मागें आलाच आहे. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं ती उपकारांची जाणीव शाहूराजे यांना होती व त्याकरतांच त्यांनीं रघोजीला आपल्याजवळ ठेऊन त्याला सेनासाहेबाचीं वस्त्रें देऊन मोठ्या पदाला चढविलें होतें. त्याचप्रमाणें रघोजी भोंसल्यांनींही आपण सेनासाहेब सुभ्याच्या पदाला पूर्ण लायक आहोंत हें आपल्या पराक्रमानें शाहूराजे यांच्या

नजरेला आणून दिलें होतें. त्यामुळें आपलें वजन शाहूराजे यांच्याजवळ फार मोठया प्रमाणांत आहे असा विश्वास रघोजी भोंसले यांना वाटत असला पाहिजे. पेशवे पदाचे बाबतींत रघोजी भोंसले यांचें ह्मणणें असें होतें कीं, पेशवे ह्मणजे मुख्य प्रधान. छत्रपतींच्या गादीचें स्थैर्य व नांवलौकिक याची जबाबदारी बहुतांशीं पेशव्यावर आहे. तेव्हां अशा परिस्थितींत वंशपरंपरेनें पेशवेपद चालविण्याची प्रथा पडल्यास ती गादीला हितपरिणामी होणार नाहीं; म्हणून नानासाहेब यांना पेशवेपद न देतां तें बाबूजी नाईक बारामतीकर यांना द्यावें. हे बाबूजी नाईक बारामतीकर जोशी शाहूराजे यांचे सावकार होते. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची वडील मुलगी व नानासाहेब पेशवे यांची आते भिऊबाई हिला याच बाबूजी नाईकाचे भावाला आबाजीला दिली असल्यानें पेशव्यांचा व बाबूजी नाईकांचा आप्तसंबंधही होता. तसेंच हें नाईकांचें घराणें जसें श्रीमंत होतें तसेच त्यांच्या घराण्यांतील पुरुष बुद्धिवान्हि होते. [ म. रि. म. वि. १ पान १२५ ] तसेंच कोणतीही मसलत उभारून मोहीम करावयाची म्हणजे पहिल्यानें सावकारांचें घर पाहिल्याशिवाय पेशव्यांना कोणतीच मसलत साधतां आली नाहीं. बाबूजी नाईक ह्यांना पेशवेपद दिल्यानें राज्याचें मुख्य अंग जें पैसा त्या बाजूनें राज्याची बळकटी होईल असा रघोजी भोंसले यांचा मनसुबा होता. दुसरा पक्ष नानासाहेबांचा. त्या दृष्टीनें विचार करतां बाळाजी विश्वनाथ यानें शाहूराजे यांचा पक्ष धरला. आपल्या कर्तबगारीवर त्यांनीं शाहूराजे यांच्या गादीचा व राज्यकारभाराचा जम बसविला. पुढें बाजीराव व चिमाजीआपा यांनीं सुमारें वीस वर्षे अहर्निश सेवा करून मराठेशाहीचा अंमल दिल्लीपर्यंत बसविला व संपूर्ण भारतवर्षांत आपली कीर्ति व मराठी राज्याचा डंका गाजविला. या उभयपक्षीं समतोल गुणधर्माची परिस्थिती शाहूराजे यांच्यापुढें पेशवेपद कोणाला द्यावें या गोष्टीचा विचार करतांना उभी राहिली. अशा परिस्थितींत मराठी राज्याचे धनी, आपले बंधु संभाजीराजे साताऱ्यास हजर असतां त्यांचा सल्ला शाहूराजे यांना घेणें उचित होतें यांत शंका रहात नाहीं.

**३ संभाजीराजे यांचें नानासाहेबांस पाठबळः—** या वेळीं संभाजीराजे साताऱ्यास आले त्यासंबंधींची माहिती काव्येतिहास संग्रहाच्या पत्रें यादी वगैरे नं. ४२९ मध्यें खालील प्रमाणें दिली आहे. ' इहिदे अर्बैन रौद्री नाम संवत्सरे श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति व श्रीमन्महाराज सकल सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब यांची स्वारी सातारियासि जहाली. ते समयीं पालीपर्यंत श्रीपतराव व बाळाजी पंडित व सदाशिव चिमणाजी व जनार्दन बाजीराव असे पुढें आले. महाराजांची स्वारी पुढें होती तेथें पंडित मशार निल्हे यांगीं दर्शन घेऊन जोहार केले. उपरांत चादरा देऊन बहुमान केले. तदनंतर महाराजांची आज्ञा घेऊन श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादि संपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब यांच्या जोहारास आले. ते समयीं बराबर चादरा दोन होत्या त्या आर्दी श्रीपतराव याच्या अंगावरी चादर घालते समयीं त्यांगीं अर्ज केला जे, " हीं मुलें आहेत त्यासि चादरा आदीं द्याव्या उपरांत आह्मी म्हातारे आहोंच. त्या उपरी त्रिवर्गांपैकीं दोघांस चादरा दोन व शेला एक याप्रमाणें दिले. उपरांत श्रीपतराव यांसि दिले. यांणीं पुढें स्वारी जहाली तेव्हां निमपाडलीपर्यंत शाहू महाराज सामादिकसह." या हकीकतीवरून पुष्कळच बोध होण्यासारखा आहे. नानासाहेबाच्या पक्षाला प्रतिनिधि श्रीपतराव यांचें पाठबळ होतें. ' प्रतिनिधि रघूजीस अनुकूल नव्हता, आणि नानासाहेबानें त्यास अगोदरच सर्वस्वी आपलासा करून घेतला होता. ' ( म. रि. म. वि. २ पान ७ ) असें रियासतकारही ह्मणतात. यावरून श्रीपतराव प्रतिनिधि हे नाना साहेबांना घेऊन संभाजीराजे यांना आपल्या पक्षांत घेण्याकरतां पालीपर्यंत सामोरे गेले व त्यांनीं संभाजीराजे यांची मनधरणी करून त्यांना आपल्या पक्षांत आणण्याचा प्रयत्न सुरू केला. जिजाबाईसाहेबांनीं चादरा देण्याचे वेळीं श्रीपतरावांचा चादर घेण्याचा मान पहिला असतां तो मान हीं मुलें आहेत या सबबीवर अर्ज करून नानासाहेबांस व सदाशिवराव भाऊंस द्यावयास लाविला. यावरून नानासाहेबांस पेशवाई पदाचीं वस्त्रें मिळविण्यास संभाजीराजे यांच्या पाठबळाची मुख्य आवश्यकता होती असें स्पष्ट ठरतें. म्हणून मागें दर्शविल्या

प्रमाणें संभाजीराजे यांच्या पाठबळाच्या वजनावर नानासाहेबाचें पारडें वजनदार बनणार होतें व त्यामुळें यांना पेशवे पदाची प्राप्ति होणार होती हेंच निश्चित होतें. शिवाय संभाजीराजे हे नानासाहेबास पेशवे पद मिळण्याचे अगोदर साताऱ्यास उपस्थित झाले होते व त्याच पदाच्या वाटाघाटीमध्यें संभाजी महाराजांनीं कसून भाग घेतला होता हेंही उघड होतें.

**४ संभाजीराजे व पेशवे यांमधील गुप्त करारः**—संभाजीराजे यांना नानासाहेबाला पेशवे पदाचीं वस्त्रें मिळावीं असें वाटणें स्वाभाविक होतें. याचें कारण शाहूराजे यांचे पश्चात् एकछत्री राज्य व्हावें ही मूळ बाळाजी विश्वनाथाची जी योजना होती व त्यासंबंधीं त्यांनीं ज्या आणाशपथा घेतल्या होत्या त्याची परंपरा बाजीरावापर्यंत आलेली होती. तीच परंपरा पुढें चालविण्याचे कामीं नवीन इसम पेशवे झाल्यास नवीनच कलहाचें प्रकरण उपस्थित होईल; याकरतां नानासाहेबांकडून सरळ करारमदार करून घेऊन त्याला पेशवेपदाचीं वस्त्रें देण्यास शाहूराजे यांनीं मान्यता द्यावी असें संभाजीराजे यांना वाटणें साहजिक होतें. ह्मणून त्यांनी नानासाहेब व चिमाजी आपा यांचेकडून जो लेखी करार लिहून घेतला त्याचा मूळ हेतू हा होता. सन १७३१ मध्यें शाहूराजे यांचेकडून संभाजीराजे यांनीं जसा लेखी तहनामा लिहून घेतला आणि आपसांतील दुहीचें कारण नष्ट केलें त्याप्रमाणें यावेळीं केवळ आणाशपथांनीं बद्ध झालेल्या पेशव्यांना लेखांत गुंतवून घेणें संभाजीराजांना योग्य वाटल्यामुळें त्यांनीं मागें प्रकरण १० मध्यें नमूद केल्याप्रमाणें नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ पेशवे यांचेकडून करारनामा लिहून घेतला. रियासतकारांनीं हा करार नानासाहेब व चिमाजी आपा यांनीं लिहून दिला असें ह्मटलें आहे पण तें खरें नाहीं. तो करारनामा पहातां नानासाहेब व सदाशिवराव भाऊ यांनीं तो लिहून दिलेला आहे. त्या वेळीं सदाशिवराव भाऊ फक्त दहा वर्षांचे होते. तेव्हां त्यांचे अज्ञान पालनकर्ते चिमाजी आपा असल्यानें जरी करारनाम्यावर सदाशिवराव भाऊचें नांव असलें तरी तें बाह्यात्कारी होतें. त्याचा पुढाकार चिमाजी आपानींच

घेतलेला होता याबद्दल शंकाच रहात नाहीं. एकंदरींत हा करारनामा लिहून घेऊन संभाजीराजे यांनीं नानासाहेबाला पेशवेपद देण्याची शिफारस शाहूराजे यांचेकडे केली म्हणूनच रघोजी भोंसले यांचें पारडें हलकें होऊन नानासाहेबास पेशवेपदाचीं वस्त्रें मिळालीं. हीच ऐतिहासिक हकीकतीची विचारसरणी योग्य, व्यवहार्य व पूर्व गोष्टींच्या संगतीला धरून अशी आहे.

**५ गुप्त करारासंबंधीं रियासतकारांची विचारसरणी**:—या बाबतींत रियासतकारांची विचारसरणी अशी आहे. नानासाहेबाच्या पेशवेगिरीचें पहिलें मोठें कारस्थान म्हणजे हा करार होय. (हा गुप्त करार सन १७४० मध्यें झालेला का. सं. प. या. ले. ४२८) दुहीच्या योगानें राज्याचें होणारें नुकसान नानासाहेबांस कळून चुकलें असून बाजीरावाच्या पराक्रमास यश न येण्याचें तें एक मुख्य कारण होतें. ही गोष्ट नानासाहेब व चिमाजी आपा यांनीं परिहार करण्याचा हा उपाय, अधिकार हातीं येतांच त्यांनीं तात्काळ स्विकारला. संभाजी शाहूस भेटण्यासाठीं सातान्यास आला. प्रतिनिधीनें नानासाहेबाची बाजू सांवरून धरिली; आणि नानासाहेबानें संभाजीशीं हा गुप्त करार केला. तो शाहूच्या परोक्ष झाला असला पाहिजे; कारण त्यास या कराराची खबर कळती तर नानासाहेबावर लगेच त्याची इतराजी झाली असती. संभाजीनें आपल्या पश्चात् साताऱ्याच्या गादीवर बसणें शाहूस कधींच पसंत नव्हतें, आणि बाहेरून कितीही गोडी दिसली तरी भाऊबंदकीचा अंतर्यामीचा फार दिवसांचा वैरभाव, शाहूच्या मनांतून साफ नाहींसा होणें शक्य नव्हतें. मात्र दोन राज्यांचें एक राज्य करण्याची नानासाहेबाची कल्पना राष्ट्रहिताची व मुत्सद्देगिरीची दिसते. शाहूला संतान नव्हतें. राज्याची वृद्धि होत होती. तरी नानाप्रकारच्या अडचणीही होत्या. शाहूच्या हयातीपर्यंत मराठेराज्याचें गाडें कसेंबसें चालेल; परंतु पुढें काय? हा प्रश्न धूर्त मुत्सद्यांच्या दृष्टीपुढें डोकावत होता. अशा स्थितींत शाहूच्या पश्चात् संभाजीस साताऱ्याची गादी देऊन राज्यव्यवस्था मजबूत करावी अशी कल्पना निघाली, आणि त्याप्रमाणें स. १७४० च्या भेटींत नानासाहेबानें

संभाजीशीं त्याजबद्दलची वाटाघाट करून ले. ४२८ चा कागद बाळाजी व चिमाजी आपांनीं संभाजीस लिहून दिला. (म. रि. म. वि. २ पान ४-५) नानासाहेबाची अवास्तव बडेजावी दाखविण्याकरतां व असामान्य बुद्धिमत्ता आणि मुत्सद्देगिरी नानासाहेबाच्या गळ्यांत अडकविण्याकरतां रियासतकारांनीं हीं विधानें ले. ४२८ मधून काढलीं आहेत. परंतु तीं मूलतःच खरीं आहेत असें वाटत नाहीं. वरील लेख पहातां नानासाहेबाला पेशवे पद मिळण्याचे अगोदरच संभाजीराजे तेथें आले होते हें निश्चित ठरतें. त्याची चर्चा जिजाबाई यांनां चादरी देण्याचे वेळीं पूर्वी झालेली आहे.

६. **गुप्त करारांचें खरें रहस्यः**— नानासाहेब पेशव्यांनीं हा जो गुप्तकरार संभाजीराजे यांना लिहून दिला; तो शाहूच्या परोक्ष झाला असला पाहिजे; कारण त्यास या कराराची खबर कळती तर नानासाहेबावर लगेच त्याची इतराजी झाली असती.' असें रियासतकारांचें विधान आहे; पण तेंही खरं नाहीं, हा करार तोंडी नव्हता, लेखी होता. यांत प्रतिनिधी वगैरे सामील होते. शिवाय हा करार सातान्यासच झाला होता. तेव्हां त्याची दखलगिरी शाहूराजे यांना नव्हती असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. शिवाय त्यावेळीं नानासाहेबाच्या विरुद्ध असलेला रघोजी भोंसले यांचा पक्ष तेथें नांदत होता. विरुद्धपक्षाच्या हालचालींवर त्यांची पूर्ण नजर असणें ही अगदीं स्वाभाविक होतें. तसेंच जा करार पुढें आला असतां शाहूराजे यांची नाना-साहेबांवर इतराजी झाली असती असा आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्याचा प्रयत्न निदान एका हातानें पेशवेपदाचीं वस्त्रें घेऊन दुसऱ्या हातानें लगेच वस्त्रें देणाऱ्या धन्याच्या विरुद्ध कारस्थान रचण्यामध्यें खात्रीनें केला गेला नसता. संभाजीराजे यांच्या हातांत विश्वासानें सर्वस्वी आपली मान देण्याइतके ते नानासाहेबाच्या विश्वासाला पात्र ठरल होते असाहि कोठें दाखला नाहीं. उलट शाहूराजे व संभाजीराजे आतां एकचित्त झाले असून त्यांच्यामध्यें दुहीचें कारण राहिलें नव्हतें. असें असतां बंधुबंधूंत गुप्त राहील अशा भरंवशा-वर नानासाहेबानें संभाजीराजे यांच्या हातांत प्रत्यक्ष राजद्रोहाचा पुरावा

सिद्ध करणारा कागद देणें अगदींच अशक्य होतें. बरें, या गुप्त करारानें संभाजीराजे यांचें कोटकल्याण नानासाहेब करून देणार होते असें म्हणावें तर शाहूराजे यांना संतान नव्हतें ही गोष्ट खरी पण पुढें होणारच नाहीं किंवा ते दत्तक घेऊन आपल्या राज्याला वारस करणार नाहींत याचाहि भरंवसा नव्हता. त्यामुळें संभाजीराजे हेही त्या करारानें निश्चिंत झाले नव्हते. तेव्हां अधर असा करार लिहून देऊन आपलीच तेवढी मान अडकवून घेण्याइतके अविचारी नानासाहेब व चिमाजीआपा खात्रीनें नव्हते. तेव्हां हा गुप्त करार शाहूराजे यांच्याच संमत्तीनें झाला होता असेंच ठरतें. फक्त तो इतरांपासून गुप्त होता. तो करार शाहूराजे यांना आपल्या राण्यांपासून गुप्त ठेवावयाचा होता. रघोजी भोंसले व इतर सरदार यांच्यापासून गुप्त ठेवावयाचा होता. हा गुप्त करार जर आपल्या राण्यांना समजेल तर त्यांचें मनस्वास्थ्य आतांपासून बिघडेल ही भीति शाहूराजे यांना होती. म्हणूनच तो करार गुप्त ठेवण्यांत आला. बाळाजी विश्वनाथाच्या मध्यस्थीमुळें पूर्वी जो ताराबाईबरोबर शाहूराजे यांनीं आणाशपथा देऊन तोंडी करार केला होता व ज्यामुळें ताराबाई व शिवाजीराजे यांनीं एकछत्री राज्य व्हावें या तत्वावर आपला अधिकार त्याग केला होता त्याला आपल्या मुख्य प्रधानाची मान्यता मिळवून देणें हें शाहूराजे यांचें काम होतें व तें संभाजीराजे यांना अवश्यही होतें. एवढ्याचकरतां हा करार सर्वांचे हितसंबंध कायम राखण्यांकरतां व पूर्वींच्या आणाक्रियांचें पालन करण्याकरतां अशा प्रकारच्या कराराला मूर्तस्वरूप देणें प्राप्त झालें. हा करार शाहूराजे यांच्या इच्छेप्रमाणें व त्यांच्या संमतीनें झाला याला प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे पुढें ज्यावेळीं शाहूराजे यांनीं दत्तक घ्यावा अशी उठावणी त्यांच्या राण्यांनीं केली व तें प्रकरण कित्येक दिवस गाजत असतां शाहूराजे यांनीं अखेरपर्यंत दत्तक घेतला नाहीं हेंच होय. या दत्तक प्रकरणाचा विचार पुढें ओघानें येणार असल्यामुळें येथें एवढेंच दर्शवावयाचें आहे कीं सर्व गोष्टींची अनुकूलता असतां शाहूराजे यांनीं ज्याअर्थी दत्तक घेतला नाहीं त्याअर्थी एकछत्री राज्य व्हावें ही कल्पना पूर्वींची होती; त्याला अनुसरून शाहूराजे यांनीं

नानासाहेबाकडून हा करार संभाजीराजे यांना करवून दिला व शेवटपर्यंत ते त्या कराराप्रमाणें वागले. हीच ऐतिहासिक संगती या कराराच्या बाबतींत योग्य ठरते.

**७ कोल्हापूरच्या राज्याची स्थिरस्थावरता:—** शाहूराजे यांच्या हयाती पुरतें कोल्हापूरचें राज्य अलग झाल्यावर संभाजीराजे यांनीं आपले अष्टप्रधान नमून त्यांना सरंजाम करून दिले. भगवंतराव व परशुराम त्रिंबक यांचे नातु यांस विशाळगडची जहागीर देऊन प्रतिनिधिपद दिलें. भगवंत रामचंद्र यास पंत अमात्य हा किताब देऊन बावड्याची जहागीर दिली. संताजी घोरपडे याचा पुतण्या शिधोजीराव यास कापशीची जहागीर देऊन सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. त्याचप्रमाणें मंत्रि, सुमंत, न्यायाधीश नेमले; व त्यांच्याकडून आपल्या मुलुखाचा कारभार चालविला. खेड्यापाड्यांतील दिवाणी व फौजदारी कामें पंचांच्यामार्फत चालविलीं. अष्टप्रधानाशिवाय कित्येक सरदारांना सरंजाम करून दिले. या सरदारांनीं नियमित फौज ठेऊन आपल्या तनख्याचा बंदोबस्त राखावा आणि कारण पडेल तेव्हां स्वारी शिकारीस महाराजांकडे फौज घेऊन यावें असा नियम घालून दिला. छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांच्या राज्यकारभाराच्या दंडकाप्रमाणें वहिवाट सुरू केली. त्यामुळें कोल्हापूरच्या राज्याचें वजन वाढलें. या राज्याच्या मर्यादा पश्चिमेस सह्याद्री पर्यंत असून ठिकठिकाणीं बिकट व घनदाट अरण्यें होतीं. त्यांतून परकीयांना फौज वगैरे नेण्यास अत्यंत त्रास पडण्यासारखा होता त्यामुळें निसर्गसिद्ध राज्यरक्षणाचा फायदा मिळत होता. घाटमाथा बिकट व दुर्धर तटाप्रमाणें होता. पन्हाळा, विशाळगड, बावडा, रांगणा, भुधरगड, सामानगड वगैरे पहाडी किल्ले इतस्ततः पसरले असून त्यावेळीं त्यांची हिंदुस्थानांतील इतर बळकट किल्ल्यांत गणना होत होती. सर्व किल्ल्यांत पाण्याचे सुंदर झरे असून पाण्याचा मोठा सांठा रहाण्यासारखे तलाव होते. धान्याचीं मोठमोठीं कोठारें होतीं. प्रत्येक किल्ल्यावर त्या किल्ल्याच्या मानाप्रमाणें व जरूरीप्रमाणें फौज ठेवण्यांत आली होती. ही फौज किल्ल्याच्या दुर्धरतेमुळें शत्रूच्या कशाही बलाढ्य फौजेला सामना देण्यास

सर्वदा तयार असे. प्रत्येक किल्ल्यावर रक्षणाकरितां गडकरी नेमलेले होते. ते भिन्नभिन्न जातीचे होते. त्यामुळें राजाविरुद्ध फंदफितुरी होण्यास जागा नव्हती. किल्ल्यानजीक गडकऱ्यांना वंशपरंपरा चालणाऱ्या जमिनी दिलेल्या होत्या. त्या जमिनीबद्दल महाराजांना स्वामित्व म्हणून ठरवून दिलेला पैसा मिळत असे. गडकरी लोक आपल्या किल्ल्याला पोटास घालणाऱ्या मातेच्या ठिकाणीं मानीत असत. जासुदाचें काम करण्यास महार, मांग, रामोशी वगैरे प्रत्येक गांवीं असत. शिवाय शेत-सनदी नांवाचे मराठे शिपायी गांवोगांव ठेवण्यांत आलेले होते. त्यांनाही नोकरीकरतां इनामी जमिनी दिलेल्या होत्या. यांना लहानपणापासून तरवार चालविणें व बंदुकीचे नेम धरणें यांचें शिक्षण मिळत असे. त्यामुळें आपल्या प्रांतावर गनीम चालून आला अशी सूचना येतांच आपल्या मुलुखाच्या संरक्षणार्थ हे शिपायी मोठ्या खुशीनें व उत्साहानें एकत्र जमत असत. यामुळें अल्पावधींत दहाहजारपर्यंत फौज सहज जमवितां येत असे. कोल्हापूरप्रांत हा एका बाजूस पडल्यामुळें त्या मुलुखांतील लोकांची एकजूट व एकवाक्यता होण्यास उशीर लागत नसे. कोल्हापूरचे सर्व सरदार आपापल्या हद्दीमधील तंटे तोडण्यांत व मुलुखाचें रक्षण करण्यांत सर्वदा तत्पर असत. संभाजीराजे हे थोरल्या शिवाजी महाराजांची परंपरा चालविणारे असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं लोकांची अत्यंत पूज्यबुद्धि होती.

**८ चाकर पेशवे सामर्थ्यवान् व धनी छत्रपति सामर्थ्यहीनः-** शाहूराजे व संभाजीराजे या उभयतांचे पंतप्रधान पेशवे हेच एकटे असल्यामुळें व ते जसे कर्तबगार तसेच मुत्सद्दी असल्यामुळें राज्याभिवृद्धी करतां या उभयतां महाराजांना स्वतंत्रपणें प्रयत्न करण्याचें कारण पडलें नाहीं. बाळाजी विश्वनाथानें बादशहाकडून चौथाई सरदेशमुखीच्या सनदा आणल्यानंतर त्याच्या बळावर बाजीरावानें आपल्या पराक्रमाची इमारत उभी केली. दिल्ली, राजपुताना, माळवा, गुजराथ, वऱ्हाड, मध्यप्रांत, बंगाल, खानदेश, नगर, कर्नाटक, कोंकण वगैरे प्रांतावर आपला अंमल बसवून व निरंतर मोहीमेचें काम करून त्यांनीं मराठी राज्याची अभिवृद्धी आणि कीर्ति संपादन केली. त्याचप्रमाणें बाजीरावानें

आपलें लष्करी सामर्थ्य फार मोठ्या प्रमाणांत वाढविलें. शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरकर भोंसले अशा नवीन मोठमोठ्या फौजबंद सरदारांना पुढें आणून आपला दरारा सर्व भरतखंडांत बसविला. मराठी राज्यांतील आपल्याविरुद्ध वागणाऱ्या सरदारांचें पारिपत्य करून बाजीरावानें एकमेव लष्करी सत्ता आपल्या ठिकाणीं केंद्रित केली. त्यामुळें बाजीराव म्हणजे मराठी राज्य अशी भावना भरतखंडांत पसरली. बाजीरावाच्या तेजामुळें इतर सरदार मागें पडले. फिके झाले. छत्रपती दिल्लीच्या बादशहाप्रमाणें विलासी व परावलंबी बनत चालले. छत्रपतींचें उतार वय झाल्यानें व पेशव्यांच्या तारुण्याची चढती कमान नानासाहेबांच्या कारकीर्दीपासून सुरू होऊन त्यांचे हातीं लष्करी सत्ता बळावल्यानें दिल्लीच्या बादशहाप्रमाणें छत्रपतींना आपल्या नोकरांपुढें--पंतप्रधानापुढें मान तुकविण्याचे प्रसंग येऊं लागले. त्यांच्याच हातानें पाणी पिण्याची छत्रपतींवरही पाळी येऊं लागली. छत्रपतींच्याच सामर्थ्यावर छत्रपतींच्याच चाकरांचीं पारिपत्यें पेशवे आपल्या व्यक्तिविषयक वैमनस्यामुळें करूं लागले. नानासाहेबाच्या पेशवेपदाच्या आड आलेले रघोजी भोंसले व बाबूजी नाईक बारामतीकर यांचा सूड नानासाहेबानें घेतला. सन १७४२ च्या आक्टोबर महिन्यांत नानासाहेबाची स्वारी उत्तर हिंदुस्थानांत गेली असतां व रघोजी भोंसले अलिवर्दीखानाचें पारिपत्य करण्याकरतां बंगाल्यावर गेला असतां नानासाहेबानें अलिवर्दीखानाचा पक्ष घेऊन रघोजीवर स्वारी केली व भडाले गांवीं त्याचा पराभव केला. हें भडाले गांव प्रयाग व जबलपूर यांच्या रस्त्यावर मध्यंतरीं असावें. पुढें शाहूराजे यांनीं पेशव्यांचा व भोंसल्यांचा जरी तह घडवून आणून सलोखा करून दिला तरी त्यांचे मनांतील वैमनस्य गेलें नाहीं. त्याचप्रमाणें नानासाहेब पेशव्यांनीं बाबूजी नाईक यांस पुण्यांतून काढून हांकलून लाविलें. ते नंतर बारामतीस जाऊन राहिले. एकंदरींत नानासाहेबांच्या लष्करी सत्तेमुळें व मुत्सद्दी डावपेंचामुळें छत्रपतीही कसे निर्बल बनूं लागले होते हें खालील पत्रावरून दिसून येईल.

हें पत्र साताऱ्याहून महादोबा पुरंदऱ्यानें नानासाहेब पेशव्यांना सन

१७४७ च्या एप्रिल महिन्यांत लिहिलेलें दिसतें. (ना. पे. च. पान ५०-५१) " पु।। सेवेशीं विज्ञापना. आजी शनिवार प्रातःकाळीं दरबारास गेलों होतों. राजश्रींचा मुजरा जाहाला. दरबार भरला होता. चार घटका दरबार जाहला. तद्दोत्तर राजश्री स्नानास गेले. मी धाकटे बाईकडे मुजऱ्यास गेलों. दहापांच जण बाईजवळ बसले होते. त्यांस बाईनीं सर्वांस उठोन जा म्हणून आज्ञा केली. सारे उठोन गेले. मला व सुकानंद यास बसा ह्मणाली. तद्दोत्तर आज्ञा केली कीं, नानाला ( नानासाहेब पेशवे यांना ) राजश्रींची ( शाहूराजे यांची ) मर्जी राखणें आहे कीं नाहीं. महाराज अतिशय रात्रौ रागें नानावर भरले; व त्रिवर्ग राऊ मशारनिल्हे यांजवरही भरले. त्यावरून बाई म्हणाली कीं, म्यां महाराजांस अर्ज केला कीं, आपण उगीच रागें भरूं नये. विचारें करून नानास आज्ञा केली तर साहेबांचे सेवेशीं हजीर आहेत. साहेबीं दुसरा विचार न आणावा. नानाची एकनिष्ठता साहेबांचे पायांशीं फार आहे. तेव्हां राजश्रींनीं बाईशीं उत्तर दिलें कीं, ' मी नानाजवळ एक तिरुका मागेन तर बाळकृष्णाची मला आण, व तुमच्या गळ्याची आण. मला पुरें जाहलें. नानाला म्यां कागद लिहिला, त्याचें उत्तर " तिघांजवळ बोललों आहेंच " असें लिहितो. तस्मात् माझा चाकर नाना नव्हे. या त्रिवर्गाचा चाकर नाना. असो. मला कांहींच मागणें नाहीं. नाना माझा माझा मी म्हणत होतों, त्याची गत ही जाहली. त्रिवर्गांनीं जी केली ती बरीच केली. त्यांहींमध्यें गोविंदरायाचा उपकार तो मजवर फारच आहे. मला गोविंदरायानें करंगळीवर खेळवून असा परिणाम केला. असो. मी तिघांच्या पायांवर डोकीं ठेवितों. ऐसें फार फार रागास येऊन गोष्टी बोलले. ' बाई म्हणाली कीं, म्यां फार गोष्टी सांगितल्या. विचारें करून गोष्ट सांगा, मी नानास सांगोन ऐकवितें. तेव्हां मागती महाराज बाईशीं बोललें कीं, "तुह्मीं तोंडघशीं पडाल. ते तुह्मांस पाडतील. तुह्मी मूर्ख आहां, आम्हांस कळत नाहीं. नाना कांहीं ऐकतो असें नाहीं. " ऐसे बोलल्याचा विचार तुह्मीं काय करतां ? खावंदाला खट्ट केल्यांत जीव नाहीं. देणें तें द्यालच, परंतु नासवूं नका. तेव्हां म्यां बाईसाहेबांस अर्ज केला कीं, महाराज जर विचारें

करून आज्ञा करतील तर प्रधानपंतांस लेहून पाठवूं. साहेबांचे आज्ञेशिवाय काय आहे ? व नानाचें पत्रही महाराजांस असेंच आलें आहे. आपणच विचार करोन आज्ञा करणें ती करावी. आज्ञेशिवाय नाना नाहींत. तेव्हां मागती बाईनीं आशंका हे पुसली कीं, कदाचित् महाराजांचे मर्जी पाहून म्यां अर्ज केला तर नाना ऐकतील ? गोविंदराव व तुह्मी...'' [ या पुढील पत्र फाटलेलें आहे. ] हें पत्र वाचलें ह्मणजे शाहूराजे किती जिकीरीला आले होते हें दिसून येतें. 'मी तिघांच्या पायावर डोकी ठेवितों,' या शाहूराजे यांच्या भाषणावरून या प्रधानांनीं त्यांची कशा प्रकारें गळचेपी चालविली होती याचाही बोध होतो. एकंदरींत उत्तरेस दिल्लीचा बादशाही दरबार व दक्षिणेस छत्रपतींचा दरबार जवळ जवळ एकच स्वरूपाचा बनला होता असें ह्मणावें लागतें. बादशाही दरबारमध्यें जो सरदार पराक्रमी व फौजबंद त्याच्याच मर्जीवर बादशहाचें अस्तित्व जसें अवलंबून होतें तसेंच दक्षिणेस पेशव्यांच्या मर्जीवर छत्रपतीचें जिणें होतें व ते ज्याला छत्रपति करतील तो छत्रपति राहणार होता. यावेळीं मराठी राज्यांत पेशवे हे एकटेच 'कर्तुं अकर्तुं' या शक्तीचे प्रतिनिधि बनले होते एवढेंच वरील पत्राचें सार आहे.

या बाबतींत रियासतकार पुढीलप्रमाणें माहिती देतात—'' नानासाहेबा-संबंधानें विरुद्ध पक्षानें शाहूचें मन अती कलुषित केलें होतें. विरुद्ध पक्षाची ही भीति अगदींच निराधार नव्हती. नानासाहेब पेशवाई पदावर राहील तर शाहूचे पश्चात्, दुसरा कोणीही राजा गादीवर आला किंवा कोणतीही व्यवस्था झाली तरी पेशव्यांचे हातांत सर्व सत्ता जाणार ही गोष्ट उघड उघड दिसत होती. अशा प्रसंगीं सामान्य जनसमूहाचे मनावर विचारापेक्षां विकारा-लाच आसर ज्यास्त होत असतो. हा प्रश्न हुषारीचा किंवा कर्तबगारीचा नव्हता. सर्व सरदार व प्रधान मंडळी शाहूच्या आज्ञेत वागण्यास तत्पर होती; परंतु ती आज्ञाधारकता त्यांनीं पंचवीस वर्षांच्या पोरास काय ह्मणून दाखवावी! आजपर्यंत पेशव्यांशीं विरोध करीत आल्यामुळें पेशव्यांकडेच सगळी सत्ता आली ह्मणजे ते आपली वाट लाविल्याशिवाय राहणार नाहींत अशी भीति

राण्यांच्या व इतर मंडळींच्या मनांत निःसंशय वागत होती. या भीतीचा निरास होईल तितका करावा अशी त्यांनीं मनापासून खटपट केली. शाहू कर्जाच्या पेंचांत होता. पेशव्यानें द्रव्यसंचय चांगला केला आहे, अशी सर्वांची समजूत होती. तेव्हां यांचें प्रधानपद दूर केलें ह्मणजे सरकारास द्रव्य मिळून, पुढील व्यवस्था निराळी करतां येईल, असा या मंडळीचा थाट होता. बाळाजीराव उघड बंडावा करील, शाहूचा हुकूमही धाब्यावर बसवील, अशी कदाचित् या मंडळीची अटकळ होती. परंतु नानासाहेब अत्यंत धूर्त; शाहूचा स्वभाव ओळखून मर्जी कशी राखावी, हें त्यांस उत्कृष्ट ठाऊक होतें. ह्मणून त्यानें सर्वस्वी शरण आल्याचा भाव दाखविला." (म. रि. म. वि. भाग पान २) शाहूराजे यांनीं नानासाहेबांना दोनचार महिने पेशवे पदावरून दूर केलें होतें. या वेळीं नानासाहेबांनीं आपणांस पुनः पेशवेपद लाभावें व दुसरा कोणी पेशवेपदावर येण्यास तयार होऊं नये अशी सर्व बाजूनीं खटपट चालविली. गोविंदराव चिटणीस हा नानासाहेबांच्या पक्षांतील होता. त्याचेकडून व शाहूराजे यांच्या राण्यांकडून वगैरे जिकडून साधेल तिकडून वशिला लावून आपला कार्यभाग साधून घेण्याच्या खटपटींत ते होते. त्या वेळीं नानासाहेबांनीं हें पुढील पत्र गोविंदराव चिटणीस यांस लिहिलेलें आहे. [आ. व. पु. १ ऐ. पत्रें यादींत ले. ४५]

'आशीर्वाद उपरी. रात्रीं राजश्री स्वामींची गांठ पडली नाहीं म्हणून लिहिलें, ऐशियास ईश्वरी इच्छेस तुमचा इलाज काय! या उपरी तरी खामखास गांठ दुपारीं घालून येणेंप्रमाणें विनंति करणें:—

क. १ दोनही महालांतील गुंते फार करून दूर केले. रोज नवे निघतात त्यांस मात्र आमचा इलाज नाहीं. मोघम बोलले चालले असतील. वारूं. महाराज कर्जाचे मजकुराचा गुंता तो महाराज सर्व विचार ध्यानांत आणून आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक, जेथें असूं तेथें करूं. हुजूर असल्यास आज्ञा मान्य करूं, बाहेर गेल्यास न करूं ही सबब होणार नाहीं. परंतु निभावे ऐशी आज्ञा केली पाहिजे. सांप्रत मनसबा होऊन खचित जाहला आहे. मनसब्याचा

कळेस रक्षण करावयाचे दिवस थोडे असतात. यास्तव दोहीं वाड्यांत समजून सेवकास निरोप द्यावा. एका दों दिवसांत हा अर्थ उत्तम असें महाराजांनीं कृपा करून करावें.

क. २ महाराजांचे कर्जाचा उरक करावा तेव्हांच जावें, ऐशीच मर्जी असली तर पुण्यास न जातांच, इकडून फिरून सेवेशीं येऊं. सावकाशीनें महाराज कृपा करून पुण्यास व वसईस जावयास आज्ञा देतील तेव्हां जाऊं. या मनसब्याचा डौल पंधरा दिवसांअलीकडे आहे. तेव्हां मालकास ऐसा गुंता काढल्यानें, मनसबा नासतो. ये समयीं महिना दोन महिन्यांचा निरोप द्यावा. फिरोन सावकाशीं सुमुहूर्ते महाराजांनीं देणें तर द्यावा.

क. ३ नायकांशीं कज्जा करावयासी जातां, ऐसा संदेह, जनवार्तेवरून, मनांत वाटला असला, तर त्याविशीं निशा करून घ्यावी. जो तालुका महाराजांनीं नायकास करार केला, त्यांत त्यांनीं जावें. कज्जा करावा हे गोष्ट महाराजांचे हुकमावांचून सहसा होणार नाहीं.

क. ४ चिरंजीव भाऊ तिकडे गेले आहेत. नबाबही तिकडे गेले म्हणजे गोव्याच्या शहास अंतर होऊन, आणखी किरकोळ गुंते तसेच अडकून पडतील. तेव्हां त्याचा लौकीक एकप्रकारें होऊन येईल, हा अर्थ महाराजांनीं ध्यानांत आणावा. सरकारांत भर करूं द्यावा, तो उगवला ( वसूल केला ) पाहिजे. सर्वांही गोष्टींत आम्हांवर तोटा पडे असें करावें कीं काय ? निदान येथून दो जमलीवर जाण्यास आज्ञा करावी. सर्व फौज व पिलाजी जाधव यांस चिरंजिवाकडे रवाना करितों; आणि सेवेशीं फिरोन येतों.

क. ५ महाराज निरोप देतात हा लौकिक जनांत जाहला. नबाबापावेतों बातमी जाईल. फिरोन दिल्हे हेंही वर्तमान जाईल. तेव्हां सर्वप्रकारें आम्ही इतराजींत, हा लौकिक जाहला आहे, व बाकी राहिला आहे हाही होईल.

इतके प्रकार निखालसतेनें विनंति केली असतां महाराज ध्यानांत न आणीत तर ईश्वरें या दौलतीवर इतराजी केली अशी जाणावी. मग बाहेरीलही

इज्जतीचा दरकार सोडून बसूं. सर्व मजकूर, वरल्याप्रमाणें विनंति करून उत्तर घेऊन येणें. ”

हें नानासाहेबांचें गोविंदराव चिटणीस यांस पाठविलेलें पत्र ह्मणजे शाहूराजे यांनीं त्यांना पेशवेपदावरून दूर केल्यानंतर व मध्यस्थीचे सर्व प्रयत्न थकल्यानंतर त्यांनीं शाहूराजे यांना दिलेला हा निर्वाणीचाच खलिता होता असें स्पष्ट दिसतें. नानासाहेबानें बाबूजी नाईक यांचे बाबतींत शाहूराजे यांची आज्ञा झुगारून देऊन त्यांच्यावर धरलेलें शस्त्र व शाहूराजे यांच्या झालेल्या कर्जाकडे दुर्लक्ष या मुख्य दोन गोष्टींमुळें नानासाहेबांवर शाहूराजे यांची अवकृपा झाली होती. आणि या दोन गोष्टींचा निकाल लागेपर्यंत शाहूराजे यांनीं नानासाहेबांना कामावरून दूर केल्याची आज्ञा केली होती. कांहीं दिवस तरी दुसऱ्या एकाद्या योग्य इसमाला पेशवेपदावर नेमून राज्यकारभारांत कांहीं सुधारणा होते कीं काय हें पहावें ह्मणून प्रयोगादाखल ते हा प्रयत्न करणार होते. रघोजी भोंसले, बाबूजी नाईक, दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधि व त्यांचा मुतालिक यमाजी शिवदेव वगैरे मंडळींचें या बाबतींत शाहूराजे यांना पाठबळ होतें. नानासाहेबांना शिंदे होळकर वगैरे चांगल्या फौजबंद सरदारांचा पाठिंबा होता. महत्वाची लष्करी सत्ता नानासाहेबाच्या पाठीमागें असल्यामुळें व प्रसंग विशेषीं एकादी मसलत करण्याचा प्रसंग आल्यास त्याला लागणारा द्रव्यसंचय नानासाहेबानें करून ठेवलेला होता. ह्मणून नानासाहेबाच्या सामर्थ्याचें पारडें या वेळीं वजनदार होतें. या वेळीं शाहूराजे वृद्ध व कर्तृत्वहीन झाल्यामुळें केवळ छत्रपतीची आज्ञा एवढ्याच नैतिक बळावर त्यांचे राज्यकारभाराची मदार येऊन बसली होती. आज्ञा देण्याचे अधिकारी शाहूराजे पण ती अंमलांत येण्याचें साधन व शक्ति केवळ पेशवे हे होते. पेशवे विरुद्ध झाले ह्मणजे शाहूराजे यांचें छत्रपतिपद गेलें एवढी कमान या वेळीं पेशव्यांची होती. पेशवे तारुण्याच्या ऐन अमदानींत होते. सर्व कारभारावर त्यांचें नियंत्रण बसलेलें होतें. अशा स्थितींत शाहूराजे यांनीं नानासाहेबांना आपल्या अधिकारांत पेशवेपदावरून दूर केलें खरें पण त्याची अंमलबजावणी केवळ शिक्का कट्यार परत मागवून घेण्यानें होणार

नव्हती. नानासाहेबांना हा धनी व चाकर यांच्यामधील कलह सामोपचारानें व आपला दुर्लौकिक न होता मिटला तर पाहिजे होता; आणि त्यांकरतांच त्यांचे सारखे प्रयत्न चालू होते. परंतु त्यांना ज्या वेळीं हें प्रकरण सामोपचारानें मिटेल असें वाटलें नाहीं त्या वेळीं त्यांनीं आपल्या पंजांत दडलेलीं नखें बाहेर काढलीं व त्याची जाणीव शाहूराजे यांना स्पष्ट करून दिली. ' इतके प्रकार निखाल-सतेनें विनंति केली असतां महाराज ध्यानांत न आणीत तर ईश्वरें या दौलतीवर इतराजी केली अशी जाणावीं. मग बाहेरीलही इज्जतीचा दरकार सोडून बसूं ' या धमकावणीनें नानासाहेबांनीं शाहूराजे यांना आपल्या अधिकाराची, आपल्या सामर्थ्याची, आपल्या भावी प्रयत्नाची आणि शाहूराजे यांच्या दौलतीच्या होणाऱ्या पर्यवसानाची ओळख करून दिली. जर आमची विनंती महाराजांनीं मान्य केली नाहीं तर ' ईश्वरें या दौलतीवर इतराजी केली अशी जाणावी.' ह्मणजे नानासाहेबांची विनंति मान्य न केल्यास भोंसल्यांच्या दौलतिवर ईश्व-राची अवकृपा होईल असें शाहूराजे यांनीं समजावें. याचा थोडक्यांत स्पष्ट अर्थ द्यावयाचा ह्मणजे नानासाहेब बलहीन नाहीं. तो आपल्या सामर्थ्याच्या बळावर छत्रपतीला पदच्युत करून मराठी राज्य आपल्या अंमलाखालीं आणील. आणि असें करतांना त्याला आपला बाहेरील लौकिकही गुंडाळून ठेवावा लागेल. [ मग बाहेरील इज्जतीचा दरकार सोडून बसूं ] मागें दिल्याप्रमाणें दिल्लीच्या बादशहाच्या बाबतींत ज्या ज्या राज्यक्रांत्या होत गेल्या त्या शाहूराजे यांनीं लक्षांत आणून यावेळीं आमचेबरोबर समेट करून घ्यावा नाहीं तर परिणामाला सिद्ध रहावें इतका स्पष्ट निर्णयाचा खलिता नानासाहेबांनीं शाहू-राजे यांना पाठविला. यावरून शाहूराजे यांनीं नानासाहेबांना पेशवेपदावरून दूर केल्यानंतर त्यांच्या मनांत कशा प्रकारचे मनसुबे तयार होत होते याची कल्पना येईल. नानासाहेबांनीं आपलें हें विराट स्वरूप शाहूराजे यांना दाखविल्याबरोबर आपल्या अखेरीच्या वेळीं आपल्या सर्व इभ्रतीचा नाश व छत्रपतीपदाचें विडंबन व्हावयाला नको ह्मणून शाहूराजे यांनीं सर्व बाजूनें पडतें घेतलें व नानासाहेबांना पुनः पेशवेपदावर आरूढ केलें. या वेळेपासून शाहूराजे पेशव्यांच्या ओंजळीनें पाणी पिऊं लागले.

**९. शाहूराजे यांची वनवासवाडी व दत्तकाच्या योजना:-** ' मानभंगो नरेंद्राणाम् ' या उक्तीप्रमाणें आपल्या चाकराकडून झालेला आपला मानभंग शाहूराजे यांना अशस्त्रानें वध झाल्याप्रमाणें दुःसह झाला असेल यांत संशय नाहीं. ही हकीकत सन १७४७ मध्यें झाली तेव्हां-पासून शाहूराजे यांनीं जवळ जवळ वैराग्य धारण केलें. त्यांची वृत्ति उदास झाली. त्यांचें वयही जवळजवळ सत्तरीला आलें. शरीर अशक्त झालें तेव्हां त्यांच्या मागें पुढील राज्यकारभारासंबंधीं राण्या, मुत्सद्दी वगैरे मंडळींचें सुदर्शन लागलें. शाहूराजे यांना कोणालाच दुखवावयाचें नव्हतें. सर्वांनाच समाधान होईल असा पर्याय ते आचरणांत आणूं लागले. त्यामुळें कोणाचेंच समाधान न होतां त्यांच्यामागें सर्वांची जांचणी सुरू झाली म्हणून ते माहुली व सातारा यांचे दरम्यान डेरे व छावणी छपरबंदी करून राहिले. त्यास वनवासवाडी म्हणूं लागले. शाहूराजे तेथें जरी राहूं लागले तरी त्यांचा मागचा शशिमिरा कमी झाला नाहीं. त्यांच्या पश्चात्च्या व्यवस्थेबद्दल सर्वांनीं सारखीच उचल खाल्ली होती. त्या बाबतींत शाहूराजे यांच्यापुढं निरनिराळ्या व्यक्तींच्या चार योजना होत्या. १ छत्रपती संभाजीराजे यांस सातार्‍यास आणून राज्य-पदावर बसवावें व एकछत्री राज्य करावें. २ विठोजी किंवा शरीफजी यांचे वंशांतील भोसले किंवा तत्संबंधीं दुसरा लायक इसम दत्तक घेणें. ३ राणी सकवारबाईनीं आपल्या मर्जीप्रमाणें मुलगा दत्तक घेऊन राज्य चालविणें. ४ रामराजा गुप्त होता, त्यास राज्यावर आणवून कारभार चालविणें. या चार योजनांच्या मागें स्वतंत्र निरनिराळे पक्ष होते. व त्या त्या पक्षाकरवीं या उठा-वणी होत होत्या. शाहूराजे यांना स्वेच्छेनें कोणतीच नवीन गोष्ट करावयाची नव्हती. त्यांचें स्वत्व पेशव्यांनीं हरण केलें होतें अर्थात् त्यांच्या ते अंकित होऊन बसले होते. परंतु बाह्योपचारी आपण त्याचा विचार करीत आहोंत असें त्यांना दाखविणें प्राप्त होतें. पहिली योजना संभाजीराजे यांचेबद्दल होती. संभाजीस सातार्‍यास आणून दोनही राज्यें एक करावीं, असा पूर्वी पेशव्यांचा घाट होता. [ म. रि. म. वि. २ पान १३१ ] परंतु या प्रसंगीं तो त्यांनीं

बदलविला. शाहूराजे यांचे पश्चात् एक छत्री राज्य संभाजी महाराजांचें करावयाचें असा स्पष्ट लेख नानासाहेबांचा असतां त्यांना आपलाच लेख रद्दबातल ठरविण्याचा अधिकार नव्हता. दुर्बलांनीं आपले करार मोडूं नये असा दंडक असतो. बलवंतांना तो नियम लागू नाहीं. यावेळीं नानासाहेब बलवंत होते. ते पेशवेपद मिळण्याच्या वेळेचे राहिले नव्हते. शाहू महाराजांनीं त्यांना पेशवे पदावरून कांहीं काळ दूर करून आपल्या छत्रपतिपदाच्या अधिकाराचा मासला दाखविला होता. त्यामुळें नानासाहेबांना चांगलीच ठेंच लागली होती. एकदां लागलेली ठेंच पुन्हां न लागूं देण्याइतके धूर्त नानासाहेब असल्यानें त्यांना स्वतःच्या अधिकारांत ढवळा ढवळ करतां येणारी स्वाभिमानी छत्रपतीची अडगळ वाटत होती. म्हणून यावेळीं संभाजीराजे सातारच्या गादीवर येणें त्यांना अगदीं वावडें होऊन बसलें होतें. त्यामुळें संभाजीराजे यांना सातारच्या गादीवर न आणण्याचा त्यांचा गुप्त प्रयत्न चालू होता. संभाजीराजे मात्र पेशव्यांनीं लिहून दिलेल्या करारावर विश्वास ठेऊन स्वस्थ होते. भोंसले घरण्यांतील दौलत पेशव्यांच्या घरांत जाऊं शकेल व त्याबद्दल मनसुबा होऊं शकेल याची कल्पना सुद्धां संभाजी महाराजांना इतर राजकारणी व्यक्तीप्रमाणें त्या वेळीं शिवली नाहीं; म्हणून ते निर्धास्त होते.

दुसरी योजना विठोजी किंवा शरीफजी यांचे वंशांतील भोंसले किंवा तत्संबंधी दुसरा लायक इसम दत्तक घेणें अशी होती. याच्या मागें पेशवे व गोविंदराव चिटणीस होते असें दिसतें. कारण त्या वेळीं तेच राज्याचा कारभार पहात होते. ‘मालोजीराजे यांचे कनिष्ठ बंधु विठोजी यांचे आठवे पुत्राचा वंश बहुत आहे; व शरीफजीराजे शहाजी महाराजांचे बंधु यांचा वंश आहे. त्यांत चांगला मूल कोण, कोठें राजचिन्हें व बुद्धी करून लक्षणें शूर, उदार व चतुर, धीर ऐसे पाहणें, शोध करणेस लावणें.’ ‘खानवटें, मुंगी, सिंगणापूर, हिंगणी सर्व अधिकारी बाबाजी महाराजांचा वंश विस्तार आहे. यांतून दैव ज्यास असेल तो लक्षणवान अधिकारी करण्यास तुह्मीं मोठमोठे सेवक लोक कोट्यावधी द्रव्य मुलूख व लाखों फौजेचे अधिकारी करून ठेविले आहेत.’

[ थो. शा. म. च. पान १२८ ] असें सांगून वाटाण्याच्या अक्षता लाविल्या. हें सांगण्यांत शाहूराजे यांनीं मुत्सद्यांना चांगलाच चिमटा घेतला आहे. 'अधिकारी करण्यास तुह्मीं मोठमोठे सेवक लोक. कोट्यावधी द्रव्य मुलूख व लाखों फौजेचे अधिकारी [ पेशवे व चिटणीस वगैरे ] करून ठेविले आहेत' या वाक्यावरून शाहूराजे यांचे मनांत त्यापैकीं दत्तक घ्यावयाचा नव्हता, पण त्यांच्या मागें या मोठमोठ्या लोकांची टोंचणी होती असें ठरतें. शाहूचें ह्मणणें दत्तक घेऊन मी अधिकारी करीत नाहीं त्याला, अधिकारी करणारे तुह्मीं मोठमोठे लोक आहांत. अर्थात् हे जे करतील तेंच होईल. आपल्या हातीं कांहीं सत्ता नाहीं असेंच या वाक्यावरून स्पष्ट दिसतें.

तिसरी योजना ह्मणजे सकवारबाई यांनीं आपल्या मर्जीप्रमाणें मुलगा दत्तक घेऊन राज्य चालविणें. हा पक्ष राणी सकवारबाईचा होता. त्यांच्या पक्षाला प्रतिनिधि व त्यांचा मुतालिक यमाजी शिवदेव, रघोजी भोंसले, दमाजी गायकवाड यांचें पाठबळ होतें. सकवारबाईच्या मनांत रघोजी भोंसले यांचा मुलगा मुधोजी यास दत्तक घ्यावयाचें होतें. त्याला नानासाहेब पेशव्यांचा पूर्ण विरोध होता. रघोजी भोंसले व नानासाहेब यांचें विळ्याभोंपळ्याइतकें सरळ होतें. रघोजीचा मुलगा दत्तक झाला तर राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें रघोजीच्या हातीं जातील व आपली तावडतोब उचलबांगडी होईल ही पूर्ण खात्री नानासाहेबाची असल्यानें या दत्तकाला नानासाहेबाचा कसून विरोध होता हें सांगण्याचें कारण नाहीं. त्यामुळें नानासाहेबांच्या पक्षांतीलही मंडळी या दत्तकाच्या विरुद्ध होती. शाहूराजे मात्र या सर्व गोष्टीपासून अलिप्त होते.

चवथी योजना रामराजा गुप्त होता, त्यास राज्यावर आणवून कारभार चालविणें या योजनेला विशेष महत्व होतें. ही ताराबाईची योजना होती. शाहूमहाराजांच्या पश्चात् एकछत्री राज्य व्हावें याला ताराबाईची संमती होती म्हणूनच त्यांनीं राज्याधिकाराचा त्याग केला होता. असें असतां त्यांनीं संभाजी महाराजांना पुढें न करतां रामराजांना पुढें कां आणलें हा प्रश्न

उद्भवतो. परंतु त्याचें निराकरण असें आहे कीं, यावेळीं संभाजी महाराजांचें वय पन्नास वर्षांपेक्षां जास्त झालें होतें; आणि त्यांना पुत्र संतानही नव्हतें. तेव्हां साताऱ्च्या गादीवर संभाजीराजांना आणून पुनः दत्तकाचा प्रश्न उपस्थित करण्यापेक्षां रामराजांना पुढें आणण्यांतच गादीचें हित होतें. या योजनेमुळें संभाजीराजे यांचें जीवमान असेपर्यंत कोल्हापूरची गादी पूर्वीप्रमाणें स्वतंत्रच रहाती. त्यानंतर एकछत्री गादी साताऱ्याची झालीच असती. शिवाय रामराजांच्या बाबतींत त्यांच्या जन्मकाळापासून जो अन्याय झाला त्याचें परिमार्जन या योजनेनें होणार होतें. त्याचप्रमाणें या योजनेनें ताराबाईंचें छत्रपतीच्या बाबतींत जें तत्व होतें त्यालाही बाध येत नव्हता. कारण शाहूराजे हे दिल्लीपतीचे अंकित मांडलिक होऊन आले होते. तो कलंक रामराजे यांना शाहूराजे यांच्या पश्चात् गादीवर आल्यामुळें लागणारा नव्हता. ते स्वतंत्रच होते; म्हणूनच अज्ञातवासांत त्यांना ताराबाईनीं ठेविलें होतें. रामराजे गादीवर आल्यानंतर पूर्ववत् शिवशाहीचा जम बसविण्याची ताराबाईंची इच्छा होती म्हणूनच त्यांनीं ही योजना शाहूराजे यांच्यापुढें मांडली. रामराजे हे खरे आहेत कीं हें सारें थोतांड आहे याची चौकशी करण्याकरतां शाहूराजे यांनीं बाळाजीपंत प्रधान यांजकडील कारकून व पांचशेंस्वार व गोविंदराव चिटणीस यांजकडील कारकून विश्वासू देऊन पानगांवीं रवाना केलें.

**१०. रामराजे यांचा पूर्व वृत्तांतः—** रामराजासंबंधींचा पूर्ववृत्तांत बखरी व पत्रें यांच्या आधारें रियासतकारांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे. शाहूमहाराजांस समाधान वाटेनासें झालें. त्याकाळीं राज्यास अधिकारी कोणी नाहीं. यास्तव संभाजी महाराजांस बोलावणें पाठविलें असतां आले नाहींत, ( पेशव्यांनीं संभाजीराजे यांना करार लिहून दिल्यामुळें ते निश्चिंत होते शिवाय या दत्तकाच्या भानगडींत तुम्हीं पडूं नये अशी कदाचित् सूचना पेशव्यांकडून त्यांना आली असावी म्हणून ते साताऱ्यास आले नसावे असें दिसतें. ) म्हणोन पांच चार मुलें आणून दत्तक घेणेचा बेत होऊन मुधोजी भोंसले नागपूरकर यास दत्तक घेणेचा निश्चय चिटणीस यांचे विचारें ठरला. तेव्हां

मातुश्री ताराबाईसाहेब यांनीं समाचारास येऊन सांगितलें, जे तुम्हीं दत्तक मुलगा घेण्याचा निश्चय केला, त्यास आपला वंश प्रत्यक्ष असतां परकी कां घ्यावा ? असें म्हणतांच महाराजांनीं उत्तर केलें जे, मला मूल नाहीं; व आबा-साहेब यांस मूल नाहीं, व आपल्यास नातू जाहला होता तो वारला. तेव्हां प्रत्यक्ष कोणाचा ? असें म्हणतांच आईसाहेबांनीं उत्तर केलें जे, शिवाजी माझा पुत्र याचे पोटीं तिघी कन्या व भवानीबाई गरोदर असतां चिरंजिवाचा काल जाहला. नंतर तीन महिन्यांनीं प्रसूत जाहली. पुत्र जाहला. पन्हाळे मुक्कामीं आबासाहेब यांनीं पुत्र पाहून पुत्रावण करून मुलास जतन करा म्हणून सांगून गेले. नंतर विपर्यास दिसों लागलें, म्हणून मूल वारलें असा बहाणा करून, किल्ले खालीं घालवून दिला. तो मूल थोर जाहला आहे, तो तुमचा आणावा, दुसरा घेऊं नये असें ऐकून महाराज बोलले जे, मूल वारलें जगप्रसिद्ध. आबासाहेबही मुलाकरितां मजपाशीं श्रमी जाहले व मलाही श्रम वाटला. आपण वडील, आज्ञा करितां हें मला प्रमाण वाटतें. परंतु लोकांची खात्री कशी होईल ? त्यावरून आईसाहेब बोलली कीं, मी बायको गजढाळ असें लोक ह्मणतात. त्यास मूल वारल्याचा बहाणा करण्यास पारसनीस व वाकनीस व काकासाहेब भोंसले जिंतीकर व भवानीबाई यांच्या विचारें असें करावें असें ठरलें. परंतु मूल कोणाचे स्वाधीन करावें ? त्या वेळेस त्यांनीं ठरविलें जे, खासगी चौकीचा परदेशी रजपूत [ घाशीराम-खं. ८–१८४ ] विश्वासू, त्याची बायको बाळंत जाहली. तिचें मूल वारलें. तिचे स्तनीं दूध आहे. तो देशास जातो; म्हणोन त्याचे तलबेचा हिशेब करून निरोप द्यावा; आणि मूल वारलें असा बहाणा करून त्याचे बाय-कोचे स्वाधीन करून किल्ले बावडे येथें जाऊन बाजीराव अमात्य यांजपाशीं राहून मुलास संरक्षण करून असावें, असें ठरवून, रजपुताचा हिशेब करून देऊन, उदईक जातो असें, आबासाहेबसुद्धां कळवून दुसरे दिवशीं मुलास अफू जास्त दिली. त्यामुळें चलन वलन राहिलें. दोन घटका रात्रीं मूल वारलें म्हणोन रडारड होऊन, मूल रजपुताचे बायकोचे स्वाधीन केलें. काकासाहेब यांनीं मूल पुरावयास जातों म्हणून बराबर जाऊन, खळगा उकरवून, त्यांत भाकर १ व

कोंबडीं २ घालून पुरवून, रजपुताचे घरीं मूल पोंचतें करून माघारे आले. दुसरे रोजीं रजपूत बायको मुलास किल्लेखालीं उतरून बावडेस जाऊन अमात्य यास जाहलेला वृत्तांत सांगून, पांच वर्षे येथें राहून मुलाचें संरक्षण अमात्य-पंतांनीं केलें. हें वृत्त जिजाबाईस कळलें. चौकशी होणार हें आह्मांस व अमात्य यांस कळलें. यावरून खालीं कोंकणांत दोन वर्षे मुलासह रजपूत होता. नंतर रजपूत याची बायको वारली. नंतर रजपुतानें पानगांवीं कृष्णाबाई वडील बहीण ( दर्याबाई निंबाळकर ) यांपाशीं ( ता. २६ जानेवारी १७४५ नंतर ) मुलास नेऊन ठेविलें. पुढें दोन वर्षांत तो रजपूत मेला. सांप्रत कृष्णाबाईजवळ मूल पानगांवीं आहे. मूल वारल्याचें जगप्रसिद्ध झालें. याप्रकारें, मुलाचें संरक्षण केलें आहे. ह्मणोन आईसाहेब यांनीं लिहून दिल्हें. त्यावरून महाराजांनीं विचारलें जे, यांपैकीं कोण मेले व कोण आहेत ? आईसाहेबांनीं उत्तर केलें जे, बाजीराव अमात्य आहेत. तेव्हां महाराज बोलले कीं, अमात्यांनीं येऊन माझे हातावर श्रीकृष्णेचें उदक घालावें; ह्मणजे माझी खात्री होईल आणि तो मूल राज्याचा धनी आहे, दुसरा मूल दत्तक घेणेचें कारण नाहीं. त्यावरून भगवंत-राव रामचंद्र अमात्य ऊर्फ बाजीराव यांस सातारेहून आज्ञापत्र पाठवून घेऊन गेले. महाराजांस समाधान बहुतच वाटेनासें जालें. ह्मणोन अमात्य यांस आई-साहेबांनीं मुलाविषयींचा मजकूर सांगितला, तो महाराजांनीं अमात्यांस सांगि-तला. अमात्य यांनीं मजकूर वास्तविक आहे, ह्मणोन विनंति केली. तेव्हां शाहू महाराजांनीं आज्ञा केली जे, तुह्मीं कृष्णेचें उदक हातावर घालावें. अमात्य यांनीं मान्य केलें. आपल्यास समाधान नाहीं; सबब जगजीवन परशराम प्रतिनिधि यांस बरोबर देऊन संगमीं पाठविलें. अमात्य यांनीं हा मजकूर वास्तविक आहे, ह्मणोन उदक प्रतिनिधि यांचे हातावर घातलें. हें वर्तमान गोविंदराव चिटणीस यां वांचून दुसरे कोणास माहीत नाहीं. ' [ म. रि. म. वि. २ पान १४२–४४ ].

याप्रमाणें रामराज्यांचे बाबतींत शाहूराजे यांनीं आपली खात्री करून घेतली. ताराबाई यांनीं पहिल्यानें रामराजाचें नांव आपल्या पतीचें राजाराम

असें ठेवलें होतें. परंतु पतीच्या नांवाचा उच्चार त्यांना करावयाचा नसल्यामुळें त्या नांवांत थोडा फरक करून त्या त्यांना रामराजे या नांवानें संबोधूं लागल्या. ह्मणून तेंच नांव पुढें रूढ झालें. पुढें रामराजे यांची हकीकत सकवारबाईंना प्रतिनिधि यांचेकडून ज्या वेळीं समजली ' तेव्हां प्रतिनिधि व यमाजी शिवदेव यांस धनीणसाहेब यांनीं नेऊन मसलत केली; आणि आईसाहेब यांचा नातू दत्तक घेऊं देऊं नये, करवीरकर यांचे घरीं राज्य जातें, या मसलतींत गोविंद-राव चिटणीस आहेत, ते पेशवे यांचे लक्षानें वागतात, यास्तव तुह्मीं सरकार लक्षानें वागोन, रघूजी भोंसले यांचा मूल मुधोजी आणोन दत्तक घ्यावा, दौलतीचें काम तुह्मीं चालवावें असें ठरलें. हें वर्तमान महाराजांस कळलें. नाना पेशवे व महादेव पुरंदरे व गोविंद खंडेराव चिटणीस यांस बोलावून सविस्तर दौलतीचें वृत्त सांगोन, बायको वेडी जाहली ही मसलत करूं नये, आईसाहेबांचा नातू आणावा, आमचा काल समीप आला, यास्तव जलद मूल आणावा, असें सांगोन दौलतीचा बंदोबस्त प्रधानांचे हातें करविला. मूल आणावयास पाठवावें इतक्यांत महाराजांनीं कैलासवास केला.

**११ शाहूराजे यांचें वचनपालनत्वः**—ही हकीकत वाचली ह्मणजे दत्तकाच्या बाबतींत शाहूराजे यांनीं कोणतीच प्रत्यक्ष गोष्ट घडवून आणली नाहीं हें स्पष्ट दिसतें. त्यांची दत्तक घेण्याची जर खरोखर इच्छा असती तर त्यांनीं ती केव्हांच अंमलांत आणली असती. परंतु ते ताराबाई व संभाजीमहाराज यांचेबरोबर एकछत्री राज्य करण्याच्या वचनानें बद्ध झाल्यामुळें व पेशव्यांनीं संभाजीराजे यांना लेखी करार करून दिलेला अस-ल्यामुळें त्यांनीं दत्तकाची कोणतीच योजना अंमलांत आणली नाहीं. नवीन बखेडे राज्यांत उत्पन्न होऊं नयेत ह्मणून बाह्यात्कारी खेळ चालविले होते असें उघड दिसतें. दत्तकाच्या बाबतींत ज्या वेळीं राणी सकवरबाई यांनीं कमर बांधली त्या वेळीं दौलत दुसऱ्या घराण्याच्या मुलाकडे जाऊं नये ह्मणून ताराबाईनीं रामराजे यांना पुढें आणलें. दत्तकाचें प्रकरण उपस्थित होत नव्हतें तर गेलीं अठरा वर्षें ज्याप्रमाणें ताराबाई गप्प बसल्या होत्या त्याप्रमाणें या

वेळींही त्या गप्पच राहिल्या असल्या. परंतु दत्तकाचा मनसुबा परिपक्क दशेला येत आहे असें समजतांचें त्यांनीं रामराजे यांना प्रकाशांत आणलें व तो गुप्त बाण एकदां हातचा सुटल्यानंतर त्याला आवरून धरणें त्यांचें हातीं राहिलें नाहीं. म्हणून शेवटीं त्यांना रामराजे यांचा पक्ष धरून पुढें यावें लागलें. रामराजे यांना आणून राज्याचे धनी करावें अशी शाहूराजे यांची आज्ञा नाहीं. ती केवळ उठवलेली आहे. रामराजे यांचे बाबतींत आपलेकडून अन्याय होत आहे असें त्यांना वाटणें हें अगदीं योग्य होतें. पण त्यांचें वचन गुंतल्या-मुळें त्यांना कोणताच दुसरा निर्णय घेतां येण्यासारखा नव्हता. तो प्रश्न ताराबाई, संभाजीमहाराज व पेशवे यांनीं आपसांतींत सोडवून घ्यावयाचा होता. शाहूराजे यांच्या अगदीं अखेरीच्या वेळीं नानासाहेब पेशवे व गोविंद-राव चिटणीस यांनीं जें राजकारण लढवून व मनसबे करून शाहूराजे यांच्या-कडून सकवारबाईचे पहारे बसले असतां दोन याद्या लिहून घेतल्या व त्यांनीं त्या दिल्या. त्या यादींत ज्याअर्थीं अमुकच दत्तकाचा किंवा रामराजे यांचा उल्लेख नाहीं त्या अर्थीं शाहूराजे हे शेवटपर्यंत आपल्या वचनाला धरून वागले असेंच ठरतें. त्या याद्या पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

**१२. शाहूराजे यांच्या दोन याद्यांची छाननीः**— रा. रा. यशवंत राजाराम गुप्ते, बी. ए. यांनीं ‘ इतिहास-संग्रह ’ पुस्तक सातवें याचा पुरवणी अंक ४, ५, ६, [ नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी सन १९१५-१६] याच्या आरंभीच श्री. शाहूमहाराज यांच्या स्वदस्तुरच्या दोन अस्सल याद्या मोडीलिपींत असलेल्यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत. त्याचा बालबोध उतारा खालीं दिल्याप्रमाणें आहे.

यादी १ ली

श्री

राजमानरा।।बाळाजीप्रधानपंडीतयासआज्ञातुम्हीफौजधरनेसरवासआज्ञाकेली त्याच्यादैवनाहीमाहाराजासदुखनेजालेनाहीबरहातनाहीराजभारचालापाहीजेतरपुढेवं-सबसवनेकोलापूरचेनकरनेचीटनीसासरवसागीतलेतसेकरनेवंसहोईलत्याच्याआज्ञेत

चालूनराजमडळचालवनेचीटनीसस्वामीचेइसवासूत्याच्यातुमच्याविचारेराजराखने वंसहोईलतोतुमचीघालेमेलकरनारनाहींसुदनआसा.

या यादीचें सांप्रतच्या मराठी भाषेत भाषांतरः— राजमान्य राजश्री बाळाजी प्रधान पंडित यांस आज्ञा. तुम्हीं फौज धरणें, सर्वांस आज्ञा केली त्यांच्या दैवीं नाहीं. महाराजांस दुखणें झालें. नाहीं बरें होत नाहीं. राज्यभार चालला पाहिजे. तर पुढें वंश बसवणें. कोल्हापूरचें न करणें. चिटणीसास सर्व सांगीतलें तसें करणें. वंश होईल त्याच्या आज्ञेत चालून राजमंडळ चालवणें. चिटणीस स्वामींचे विश्वासू त्यांच्यातुमच्या विचारें राज्य राखणें वंश होईल तो तुमची घालमेल करणार नाहीं. सूज्ञ असा.

वरील यादी लक्षपूर्वक वाचली म्हणजे त्याचा भावार्थ सहज लक्षांत येण्यासारखा आहे. कित्येक विद्वान् 'माहाराजासदुखनेजालेनाहीबरहात नाही' या वाक्याचा अर्थ निराळ्या पद्धतीनें लावण्याचा प्रयत्न करतात. वरील वाक्यांत 'दुखने' या शब्दाऐवजीं 'दु' या अक्षराऐवजीं 'लि' हें अक्षर असलें पाहिजे अशी कल्पना करून 'लिखने' असा शब्द घालून 'नाही' या शब्दाच्या ठिकाणीं वाक्य पुरें करतात. म्हणजे 'महाराजांस लिखणें झालें नाहीं' असें वाक्य बनवितात व 'बरें होत नाहीं असें पुढील वाक्य करतात. परंतु त्यांची ही विचारसरणी अगदीं योग्य नाहीं. या वाक्यांत कोठेंतरी लिहिण्याची चूक आहे किंवा कोठेंतरी लिहितांना लेखणीचा दोष झाला आहे ही गोष्ट खरी. परंतु 'दु' च्या ठिकाणीं 'लि' मात्र खास नाहीं. 'महाराजांना लिहिणें झालें नाहीं,' 'बरें होत नाहीं.' या दोन वाक्यांचा संबंध कसा जोडावयाचा? 'दु' च्या ऐवजीं 'लि' अक्षर वाचलें म्हणजे प्रधान वाक्य लिहिणें झालें नाहीं असें होतें मग त्या 'बरें होत नाहीं' या गौण वाक्याचा संबंध प्रधान वाक्याशीं कसा जोडतां येतो? लिहिणें बरें होत नाहीं असा त्याचा अर्थ लावावयाचा किंवा काय? तरी तसा अर्थ संभवत नाहीं. वरील यादी लिहिण्याचा हेतु लक्षांत घेतां शाहूराजे हे दुखण्यानें अजारी होते व त्यांतून ते बरे होतील असें जेव्हां त्यांना व त्यांच्या प्रधानांन

वाटलें नाहीं त्या वेळीं ही यादी त्यांच्याकडून पुढील राज्यव्यवस्थेसाठीं लिहून घेण्यांत आली हें निश्चित आहे. अशा स्थितींत अक्षराची चूक न होतां अक्षराच्या वळणांत किंवा लिहितांना हात कांपण्याच्या स्थितींत कोठें तरी फरक पडणें शक्य होतें. मूळ यादींत स्पष्ट 'ना' अक्षर दिसतें. त्या दृष्टीनें पहातां 'नाही' या पहिल्या शब्दांतील 'ना' च्या वळणांत लिहितांना थोडा फरक होण्याचा संभव आहे. मोडी ना अक्षरांत वर एक गांठ व खालीं दोन गांठी असतात. 'का' या अक्षराला खालीं तीन गांठी असतात. लिहिण्याच्या ओघांत 'का' हें अक्षर 'ना' सारखें निघूं शकतें. वरील यादी वाचतांना 'ना' ऐवजीं 'का' अक्षर वाचलें ह्मणजे यादींतील हेतूचा सहज उलगडा होतो. ह्मणजे हीं वाक्यें ' महाराजांस दुखणें झालें. कांहीं बरें होत नाहीं ' अशीं होतात. या 'कांहीं' याचा अर्थ थोडें सुद्धां असाच होतो. महाराजांना दुखणें झालें परंतु थोडें सुद्धां बरें होईना ह्मणून त्यांनीं ही यादी लिहून राज्याची निरवानिरव केली असें स्पष्ट होतें.

## दुसरी यादी

श्री.

राजामानराबालाजीपडीतप्रधानआज्ञाजेराजभारतुह्मीचालवालहाभरवसा स्वामीसआहेपहिलेसागीतलेखातरजमातीचीटनीसानीआसलकलीतुमचेमसतकीहत ठवीलाआहेवसहोईलतोतुमचेपदप्रधानचालवीलकरीलआतरत्तरसफतआसेत्याचेआ ज्ञेतचालूनसेवाकरनेराजराखनेबहूतकायलिहीनेसुदनआसा.

या यादीचें सांप्रतच्या मराठी भाषेंत भाषांतरः— राजमान्य राजश्री बाळाजी पंडीत (यांस) आज्ञा जे. राज्यभार तुह्मीं चालवाल हा भरंवसा स्वामींस आहे. पहिलें सांगीतलें (त्याची) खातरजमा ती चिटणीसांनीं असेल केली. (केली असेल). तुमचे मस्तकीं हात ठेविला आहे. वंश होईल तो तुमचें पद प्रधान चालवील. (यांत) अंतर करील तर (त्याला) शपथ असे. त्याचे आज्ञेंत चालून सेवा करणें (आणि) राज्य राखणें, बहुत काय लिहिणे. सूज्ञ असा.

या दोन शाहूराजे यांच्या स्वदस्तूरच्या याद्या आहेत असें मानलें जातें.

तसेंच या दोन याद्यांच्या बळावर पेशवे अधिकारी झाले अशी समजूत आहे. परंतु या याद्या काळजीपूर्वक वाचल्या म्हणजे निरनिराळ्या शंका आल्यावांचून रहात नाहींत. या याद्या अगदीं अखेरीला घेतलेल्या आहेत. दत्तक घेण्या-संबंधीं शाहूराजे यांनीं ठिकाठिकाणाहून मुलें आणलीं; रघोजी भोंसले यांचा मुलगा मुधोजी आणला, कोल्हापूरास संभाजीराजे यांना येण्याकरतां लिहिलें, रामराजे यांचा वृत्तांत ऐकून घेतला आणि त्यानंतर कोणतीही गोष्ट निश्चित न करतां या दोन याद्या नानासाहेब पेशवे यांचे नांवें लिहिल्या असें स्पष्ट होतें. या याद्या म्हणजे शाहूराजे यांची अखेरची इच्छा व अखेरची आज्ञा होय. पेशवे हे मराठीराज्याचे मुख्य प्रधान असल्यामुळें त्यांना शाहूराजे यांनीं आपली आज्ञा केली व ती आज्ञा पेशव्यांनीं या यादीबरहुकूम अंम-लांत आणिली किंवा कसें हें तपासण्याकरतां वरील याद्या वाचून ज्या शंका उत्पन्न होतात त्या येथें देणें जरूरीचें आहे. त्या अशा:—

[१] ' वंश बसवणें ' ही शाहूराजे यांची आज्ञा नानासाहेबांनीं पाळली काय ?

[२] ' कोलापूरचे न करणें ' ही आज्ञा नानासाहेबांनीं पाळली काय ?

[३] ' वंश होईल त्याच्या आज्ञेंत चालून राजमंडळ चालवणें ' या आज्ञेप्रमाणें नानासाहेबांनीं वर्तन केलें काय ?

[४] ' चिटनीस स्वामींचे विश्वासू, त्यांच्या तुमच्या विचारें राज्य राखणें ' ही आज्ञा नानासाहेबांनीं बजाविली काय ?

[१] पहिल्या यादींत वंश बसविणें असें आहे. वंश म्हणजे दत्तकपुत्र. शाहूराजे यांच्या पश्चात् दत्तक घेण्याला त्यांची एकच पत्नी सकवारबाई या होत्या. त्यांच्या मांडीवर मूल दत्तक दिल्याशिवाय शाहूराजे यांची आज्ञा पालन होणारी नव्हती व त्यांचा वंशही ठरणार नव्हता. या याद्यांमुळें शाहू-राजे यांचे मनांत सकवारबाईनीं सती न जातां आपल्या व पेशव्यांच्या विचारें दत्तक घ्यावा आणि राज्यकारभार चालवावा असें स्पष्ट होतें. सकवारबाईचे मनांत रघोजी भोंसले यांचा मुलगा दत्तक घ्यावयाचा होता आणि पेशव्यांना

संभाजीराजे यांना करारनामा लिहून दिल्याप्रमाणें त्यांना सातार्‍याच्या गादीचे धनी बनवून एकछत्री राज्य करणें प्राप्त होतें. अशा स्थितींत कलहाला मार्ग राहूं नये म्हणून शाहूराजे यांनीं या याद्यामुळें सकवारबाई व पेशवे यांच्यावर हवाला सोंपविला आणि आपल्या मरणापूर्वी स्वतःच्या डोक्यावरील जबाबदारी काढून टाकली हें स्पष्ट होतें. या याद्यांमुळें शाहूराजे यांची अखेरची आज्ञा पाळण्याची जबाबदारी सकवारबाई व पेशवे या उभयतांवर सारखी पडलेली आहे. सकवारबाईचें मन न दुखवितां व त्यांना सती न घालवितां वंश करण्याची शाहूराजे यांची आज्ञा पार पाडणें ही जबाबदारी सर्वस्वी पेशव्यांवर होती. त्याचप्रमाणें पेशव्यांचें मन न दुखवितां व त्यांनीं संभाजीराजे यांना लिहून दिलेला करार न मोडतां दत्तक घेऊन राज्यकारभार चालविणें ही जबाबदारी सकवारबाईवर होती. असें असतां या याद्यांप्रमाणें पुढें या उभयतांनीं परस्परांवर असलेल्या जबाबदार्‍या पार पाडल्या काय ही शंका शिल्लक रहाते ?

या शंकेचें निरसन करूं पहातां त्या वेळीं घडून आलेली हकीकत लक्षांत घ्यावी लागेल. या बाबतींत डफसाहेब पुढीलप्रमाणें माहिती देतात. " बाळाजीनें तर तिनें ( सकवारबाईनें ) पहिल्यानें झटलें होतें कीं ' मी सती जाईन ' तेव्हांपासून मोठ्या मेहनतीनें तें लोकांत प्रसिद्ध केलें होतें. कां कीं, तिचें सती जाणें त्यास अत्यंत हितावह होतें. यास्तव तें अवश्य घडावें याकरितां त्यानें तो उद्योग केला. मग शाहू मेल्यावर बाळाजीनें सकवारबाईला कपटानें विनंतीपूर्वक आग्रहाचा निरोप पाठविला कीं, ' मी तुमचे आज्ञेंत वागणारा इमानी चाकर असतां तुह्मीं कां सती जातां ? आपण न जावें ' असें तिला सांगून पाठवून तिचे भाऊ कुंवरजी शिरके यांस बोलावून सांगितलें कीं, ' तुमची बहीण सती न गेली तर तुह्मी व तुमचे जातीचे मराठे यांचा मान राहणार नाहीं, त्यास तिनें तें अवश्य केलें पाहिजे; जर तुह्मीं करवाल तर तुह्मांस कोंकणांत जहागीर देऊं.' अशा कृत्रिमें करून बाळाजी बाजीराव पेशवा यानें आपली मसलत सिद्धीस नेली. त्या सकवारबाईस अशा अडचणी उत्पन्न करून सती घालविलें, त्यापेक्षां जर तिकडे कांहीं अन्याय आहे असें

मिष करून तिचा शिरच्छेद करविता तर लोकांत त्याच्या पराक्रमास एवढें दूषण न लागतें. ज्या शास्त्रजाणत्यांस हें यावत् वर्तमान ठाऊक आहे ते हा केवळ अधर्मसा जाणून हें कर्म अश्लाघ्य मानितात." (मराठ्यांची बखर आ. ६ वी. पान १७७)

या बाबतींत रियासतकारांची विचारसरणी पुढें दिल्याप्रमाणें आहे. "सकवारबाई सती न जाती तर पुढील इतिहासाचा ओघ बदलला असता किंवा जास्त यशस्वी झाला असता, असें मानण्यासही कांहीं कारण दिसत नाहीं. पुराव्याच्यां दृष्टीनें पाहतां या कामीं ताराबाईचा आग्रह विशेष होता, हें नमूद आहे. 'सकवार राहिल्यास राज्याचा डोहाणा करील, राज्य बुडवील, कोणाचे पाय भुईस लागूं देणार नाही. याकरितां (शाहू) बरोबर राहील तर फार चांगलें; सहगमनाचा विचार कळेल तसा तिनें करावा,' असे ताराबाईचे शाहूच्या मृत्युसमयींचे उद्गार आहेत. तसेंच प्रतिनिधि, अक्कलकोटकर, दाभाडे, राजाज्ञा आदिकरून लहानाथोर एकविचारें मनसोबा ठरला कीं, 'सकवारबाईसाहेबांस सती घालवावी, न जातील तर बळें न्यावी. महाराजांमागें दुर्लौकिक बखेडा करितील.' असेंही नमूद आहे. बाईच्या बंधूंनींच पेशव्यास व चिटणीसास येऊन सांगितलें कीं, '(सहगमनाची) सिद्धता करावी, गेली तर बरें न गेली तर आम्हीं तिला नेतों.' 'राजश्री (शाहू) च्या कानांतील कुड्यांची जोडी प्रसाद म्हणून सकवारबाईनें पेशव्यांस दिली' असें लिखित आहे. या सर्व लिखाणांचा विचार करतां असें स्पष्ट दिसून येतें कीं, पेशव्याची मनोभावना त्या कालास अनुसरून बाई सती गेल्यास उत्तम अशी असली, तरी त्यानें मागें राहण्याचा हट्ट धरल्यास जबरदस्तीनें तीस सती घालवण्याची त्याची इच्छा सिद्ध होत नाहीं. मात्र राज्ययंत्र ताब्यांत घेण्याचा त्यानें पूर्ण निश्चय केला होता व तशीच वेळ आल्यास जय्यत तयारीही ठेविली होती. [ना. पे. यां. चरित्र पान ७९]

रियासतकारांनीं नानासाहेबांवरील डफ साहेबांनीं केलेला प्रवाद धुऊन काढण्याचा प्रयत्न वरील उताऱ्यांत केला आहे. परंतु तो यथार्थ नाहीं. नाना

साहेबांनीं शाहूराजे यांच्याकडून ज्या दोन याद्या घेतल्या त्या ताराबाई, प्रतिनिधि, अक्कलकोटकर, दाभाडे शिर्के वगैरे कोणाला माहीत नव्हत्या. सकवारबाईनाही त्यांची गंध वार्ता नव्हती. असें असतां सकवारबाईनीं सती न जाणें यांतच मराठी राज्याचें कल्याण आहे अशी शाहूराजे यांची खात्री झाल्यामुळें त्यांनीं या दोन याद्यांच्या द्वारें नानासाहेबांस आज्ञा केली होती. नानासाहेब हे शाहूराजे यांचे एकनिष्ठ सेवक, बलवान्, सर्व जय्यत तयारीनें साताऱ्यास ठाण मांडून बसलेले आणि बुद्धिवान् मुत्सद्दी म्हणून त्यांनीं पुढील राज्याच्या निरवानिरवीची यादी त्यांना दिली होती. असे असतां बाकी मंडळीच्या मनांत जरी सकवार-बाईनीं सहगमन करावें असें होतें व नानासाहेबांच्या मनांत सती जाणें हा पुण्य मार्ग आहे अशी जरी त्या कालाच्या मानानें भावना होती तरी त्याबद्दल स्वतंत्रपणें विचार करण्यास ते स्वतंत्र राहिले नव्हते. ते शाहूराजे यांचे सेवक होते व त्यांची आज्ञा त्यांना अंमलांत आणणें प्राप्त होतें. हें जर स्पष्ट आहे तर नानासाहेबांनीं सकवारबाईना सहगमनापासून परावृत्त करणें हें त्याचें आद्य कर्तव्य होतें. त्यांना सती घालविण्याच्या प्रयत्नांत किती तरी लोक सामील होते असें गृहीत धरलें तरी त्यांचा पूर्णपणें बंदोबस्त करण्याइतकी जय्यत तयारी नानासाहेबांची होती. तसा सती जाण्याबद्दलें नानासाहेबांनीं विरोध केला नाहीं. शिवाय सकवारबाईनीं सती जाऊं नये याला रामबाण उपाय नानासाहेबांच्या हातीं होता. शाहूराजे यांची शेवटची आज्ञा लेखी असलेली याद्यांच्या रूपांत नानासाहेबांच्या हातांत होती. त्या याद्या त्यांनीं सकवारबाईना दाखविल्या असत्या तर प्रत्यक्ष आपल्या पतीची आज्ञा म्हणून त्या खात्रीनें सती गेल्या नसत्या. या दोन्ही याद्यांत रामराजे यांना दत्तक घेण्याची शाहूराजे यांची आज्ञा नाहीं. किंवा अमका एक दत्तक घ्यावा असा नामनिर्देषही नसल्यामुळें सकवारबाईच्या मनाविरुद्ध त्यांत कोणतीच गोष्ट शाहूराजे यांनीं आज्ञापिलेली नसल्यामुळें सकवारबाईना ती आज्ञा भंग करून सती जाण्याचें प्रयोजन नव्हतें. असें असतां जी गोष्ट सहज घडून येण्यासारखी होती व ती सर्वांस मान्य करावयास लावण्यासारखी होती ती गोष्ट नानासाहेबांनीं ज्याअर्थी घडवून आणली

नाहीं त्याअर्थी मुद्दाम सकवारबाईंना सती घालविण्यांत नानासाहेबांचें अंग प्रामुख्यानें होतें हें डफसाहेबांचेंच विधान सत्य ठरतें. रियासतकारांची मल्लि-नाथी या पुराव्यापुढें अगदींच टिकूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें त्यांचें दुसरें विधान सकवारबाईंनीं सती जावें असा 'ताराबाईचा आग्रह विशेष होता' हेंही खरें नाहीं. ताराबाईंनीं फक्त आपली इच्छा दर्शविली आहे. 'सहगमनाचा विचार कळेल तसा तिनें करावा' असें ताराबाईचें स्पष्ट वाक्य आहे. सकवार-बाईंनीं आपल्या इच्छेप्रमाणें सहगमनाचा विचार करावा असें ताराबाईंनीं म्हटल्यामुळें त्यांचा आग्रह विशेष होता असें विधान ठरविणें खात्रीनें अन्यायाचें होईल यांत संशय नाहीं.

[ २ ] या दोन याद्यांपैकीं पहिल्या यादींत 'वंश बसवणें. कोलापूरचें न करणें' असा स्पष्ट मजकूर आहे. रामराजांना आणून गादीचे धनी करावें असा दोन्हींही याद्यांत कोठें खुलासा नाहीं. पण कोल्हापूरचें करूं नये अशी मात्र आज्ञा आहे. आतां कोल्हापूरचें कोण याचा खुलासा नाहीं. कोल्हापूरच्या गादीवर असलेले संभाजीमहाराज यांना संतान नव्हतें. त्यांचें वयही पन्नासी उलटून गेलेलें होतें. तेव्हां ते शाहूराजे यांचे दत्तक पुत्र होऊन त्यांचा वंश चालविण्यास पात्र ठरत नव्हते. तेव्हां संभाजीराजे यांच्या व्यतिरिक्त दुसराच कोणीतरी कोल्हापूरापैकीं दत्तक म्हणून उमेदवार पुढें आला होता व त्याला शाहूराजे यांनीं या पहिल्या यादीप्रमाणें आपली अमान्यता दर्शविली होती असें ठरतें. हे कोल्हापूरापैकीं उमेदवार कोण तर दुसरे कोणी नसून रामराजे हेच होते. या रामराजांना दत्तक घ्यावयाला सकवारबाई या तयार नव्हत्या; म्हणून त्यांच्या मर्जीविरुद्ध पेशव्यांनीं जाऊं नये याकरतां शाहूराजे यांनीं रामराजांना वंश करूं नये अशी आज्ञा केली होती. रामराजे यांना ते कोल्हा-पूराचेंच असे त्यावेळीं कसें संबोधिलें जात होतें हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. रामराजे हे शिवाजीराजांचे पुत्र आहेत हें आजपर्यंतचें गौप्य बाहेर आलेलें ज्या वेळीं सकवारबाईंना समजलें "ते समयीं सकवारबाईस वर्तमान कळलें, तेव्हां प्रतिनिधि व यमाजी शिवदेव यांस धनीणसाहेब यांनीं नेऊन

मसलत केली; आणि आईसाहेब यांचा नातू दत्तक घेऊं देऊं नये, करवीरकर [ कोल्हापूरकर ] यांचे घरीं राज्य जातें, या मसलतींत गोविंदराव चिटणीस आहेत, हे पेशवे यांचे लक्षानें वागतात, यास्तव तुह्मीं सरकार लक्षानें वागोन, रघूजी भोंसले यांचा मूल मुधोजी आणोन दत्तक घ्यावा, दौलतीचें काम तुह्मीं चालवावें, असें टरलें." [ म. रि. म. वि. २ पान १४४ ] यावरून रामराजे यांनासुद्धां कोल्हापूरापैकींच समजलें जात होतें. असें असतां शाहूराजे यांच्या पश्चात् नानासाहेबांनीं रामराजांना आणून सातारच्या गादीवर बसविलें हें कृत्य शाहूराजे यांची आज्ञा उल्लंघून त्यांनीं केलें असें ठरत नाहीं काय? वंश करण्याच्या बाबतींत गोविंदराव चिटणीस व पेशवे हे शाहूराजे यांच्या लक्षानें वागत नव्हते ह्मणून सकवारबाईनीं प्रतिनिधींना 'यास्तव तुह्मीं सरकारलक्षानें वागावें' असें सांगितलें. हें नानासाहेब पेशव्यांच्या वर्तनाबद्दल नीट लक्षांत ठेवण्यासारखें त्यांचें वाक्य आहे.

नानासाहेबांना सातारच्या गादीवर रामराजे यांना आणण्यांत शाहूराजे यांचा धडधडीत आज्ञाभंग होतो याची जर दिक्कत वाटली नाहीं, तर संभाजीराजे यांना सातारच्या गादीवर आणून एकछत्री राज्य करण्यासही त्यांना तसें वाटण्याचें प्रयोजन नव्हतें. शिवाय त्यांनीं तसें केलें असतें तर शाहूराजे यांच्या पश्चात् एकछत्री राज्य संभाजी महाराजांचें असा जो स्वदस्तूरनें करार त्यांनीं लिहून दिला होता तो पाळल्याचें पुण्यतरी त्यांच्या पदरीं पडलें असतें. संभाजीराजांनीं सातारच्या गादीवर येऊं नये असें जरी सकवारबाईना पहिल्यानें वाटत होतें तरी शेवटीं त्यांच्या विचाराचें परिवर्तन झालेलें होतें. संभाजीराजे यांनीं शाहूराजे यांच्या पश्चात् सातारच्या गादीवर यावें असें सकवारबाईना वाटत होतें पग त्याला खुद्द नानासाहेब पेशव्यांनींच विरोध केला हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. "राणी सकवारबाई यांस पेशव्यांच्या हातीं राज्य जाणार ही गोष्ट अर्थातच खपली नाहीं व रामराजे गादीवर बसल्यास ताराबाईचें प्रस्थ वाढेल हेंही त्यांस भय पडलें. त्यांनीं प्रतिनिधीस सामील करून घेऊन निराळेंच कारस्थान तयार केलें. त्यांनीं संभाजी महाराजांस

सांगून पाठविलें कीं, महाराज वारल्याबरोबर तुम्ही कोल्हापुराहून जलदीनें येऊन राज्य हवालीं करून घ्यावें. आम्हीं सरदार व फौज अनुकूल करून घेत आहों व तुम्हांस मदत करण्यास सिद्ध आहों. या गोष्टीस संभाजी महाराजांचा रुकार मिळाला व त्यांनीं करवीरास फौजेची तयारी सुरू केली. ” ( इचलकरंजी सं. इतिहास, खरेकृत पान ६७ ) यावरून स्पष्ट होतें कीं पेशव्यांनीं संभाजी महाराज यांना करार लिहून दिल्याप्रमाणें त्याची पूर्तता होण्यास सकवारबाईची व संभाजीराजे यांची पूर्ण संमती होती व त्याप्रमाणें त्यांचा प्रयत्नही चालू होता. शिवाय ताराबाई या नंजरकैदेंतच असल्यामुळें त्यांचा जरी या गोष्टीला विरोध होता असें गृहीत धरून चाललें तरी त्यांच्यामुळें कोणतीच अनिष्ट गोष्ट घडून येण्याची भीति पेशव्यांना वाटण्यासारखी नव्हती. असें असतां ह्या गोष्टीला ज्याअर्थी पेशव्यांनीं विरोध केला त्याअर्थी सकवारबाईच्या म्हणण्याप्रमाणें नानासाहेब पेशव्यांना सातारचें राज्य अपहार करावयाचें होतें हाच त्यांचा हेतु स्पष्ट होतो.

(३) नानासाहेब पेशव्यांना वरील याद्यां प्रमाणें शाहूराजे यांची अशी आज्ञा होती कीं ‘ वंश होईल त्याच्या आज्ञेत चालून राजमंडळ चालवणें. ’ या त्यांच्या आज्ञेप्रमाणेंही नानासाहेब पुढें चाललें नाहींत. रामराजे यांना आणून गादीवर बसविल्यानंतर थोड्याच दिवसांनीं सन १७५० मध्यें रामराजांकडून सांगोलें मुक्कामीं छत्रपतीपदाच्या अधिकाराचा राजीनामा घेऊन त्यांना त्यांनीं निवळ बाहुलें बनविलें. त्यामुळें ‘ वंश होईल त्याच्या आज्ञेत चालून ’ या शाहूराजे यांच्या आज्ञेचा त्यांनीं सरळ भंग केला. छत्रपति पेशव्यांचे अंकित होऊन त्यांचें बाहुलें बनल्यानंतर त्यांचें ‘ राजमंडळ चालवणें, ’ हा प्रश्नच शिल्लक राहत नाहीं. राजमंडळांतील पेशवे सोडून जे चिटणीस, प्रतिनिधि सचिव, न्यायाधीश वगैरे अष्ट प्रधान होते त्यांचेही अधिकार संपुष्टांत येऊन तेही पेशव्यांचीं बाहुलीं बनलीं. त्यामुळें राजमंडळ चालविण्याची शाहूराजे यांची आज्ञाही पेशव्यांनीं वेशीला टांगली असें सरळ सिद्ध होतें.

[ ४ ] ‘ चिटनीस स्वामींचे विश्वासू. त्यांच्या तुमच्या विचारें राज्य

राखणें ' अशी शाहूराजे यांची आज्ञा आहे. छत्रपतीच्या राज्याचा कारभार पेशवे व चिटणीस या उभयतांच्या सल्ल्यानें चालावा अशी स्पष्ट आज्ञा असतांना पेशव्यांनीं चिटणीसांना गुंडाळून ठेऊन रामराजांकडून छत्रपतीपदाच्या अधिकाराचा राजीनामा घेतला. त्यामुळें राज्यकारभारांतून चिटनीसांना हद्दपार करून पेशवे एकटेच सर्वाधिकारी बनले यामुळें हीही शाहूराजे यांची आज्ञा नानासाहेबांनीं भंग केली. एकंदरींत वरील या दोन याद्यांतील शाहूराजे यांनीं केलेल्या चार आज्ञा पेशव्यांनीं कशा उधळून लाविल्या हें लक्षांत येईल. केवळ राज्य अपहार करण्यास जरूर लागणारी एक आज्ञा मात्र त्यांनीं अक्षरशः पाळली. ती ह्मणजे पेशवेपदाबरोबर ' फौज धरणें ' ही होय. पंतप्रधानाच्या पदाबरोबर सेनापतीचा अधिकार प्राप्त करून घेऊन त्याच्या बळावर त्यांनीं मराठी राज्याचा सकवारबाईनीं ह्मटल्याप्रमाणें कसा अपहार केला हें लक्षांत येईल. त्याचप्रमाणें वरील सर्व हकीकत पाहिली ह्मणजे शाहूराजे यांनीं पेशव्यांच्या हातांत सर्व अधिकार दिले अशी जी समजूत रूढ आहे ती धादांत खोटी आहे हेंही प्रत्यायास येईल. (या याद्यांच्या बाबतींत विशेष चिकित्सक रीतींनें व विस्तारपूर्वक 'खून कीं आत्महत्या' या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणांत विचार केला आहे. तो अवश्य वाचावा.)

**१३ शाहूराजे यांचा अंतः**—वरील दोन याद्या शाहू महाराजांनीं ज्या लिहिल्या व आपल्या एवढ्या मोठ्या राज्याची जी निरवानिरव केली त्यांवर शाहूराजे यांची सही अगर शिक्काही नाहीं. त्याचप्रमाणें त्यावर मिती वार वगैरेही नाहीं. हा यांतील दोष विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. हा दोष लक्षांत घेतां त्यांनीं त्या याद्या थोडी शुद्धी थोडी गैरशुद्धी अशा स्थितींत लिहिल्या असाव्या व त्या अगदीं आपल्या अखेरीच्यावेळीं लिहिल्या असाव्या असें दिसतें. या नंतर शाहूराजे यांनीं मार्गशीर्ष वद्य ३ भृगुवारीं पुष्य नक्षत्र शके १६७१ शुक्ल संवत्सरीं सकाळीं चार घटका दिवसास विष्णुलोकवास केला. सर्व जनांस दुःख जाहलें. मनुष्यमात्र लहान थोर दासदासी पदरचे त्यांचा बाप, प्रतिपालनकर्ता, तें दुःख स्मरून क्लेश जाले, ते लिहावयास

असमर्थता आली. कारण असा प्रभु दयावंत दुसरा जाला नाहीं. धन्याचे राज्यांत अपराधी झाला तरी, 'हत्यारें करून घ्या,' परंतु 'मारा' असा शब्द त्याचे मुखीं आला नाहीं. अजानुबाहु, आजात शत्रु, पुत्र-मित्र-अरी एकरूप व्यवस्थेनीं वागवायाचे. कोणास गेर भाषण केलें नाहीं, असा पुण्यश्लोक राजा निधन पावला. असे शाहूराजे यांच्याबद्दल उल्लेख आढळतात.

**१४ सकवारबाईचें सहगमनः**—शाहूराजे यांनीं कैलासवास केल्यानंतर पेशव्यांनीं चिटणीसांस हाताखालीं घेऊन वाड्याचा व शहराचा बंदोबस्त करून दादोबा प्रतिनिधि ऊर्फ जगजीवनराव हे सकवारबाईचे पक्षांतील ह्मणून त्यांस व त्याचे मुतालिक यमाजी शिवदेव यांस कैद करून, सकवारबाईसाहेबांपुढें करंडा सदाशिव चिमणाजी यांनीं ठेविला. [ म. रि. म. वि. २ पृ. १४४ ] शाहूराजे यांचा अंत्यविधि श्रीक्षेत्र माहुली येथें श्रीकृष्णेच्या कांठीं संगमावर झाला. त्यांच्याबरोबर सकवारबाई सती गेल्या. त्याचप्रमाणें त्यांच्या आणखी दोन रक्षा होत्या त्याही सती गेल्या. सकवारबाईच्या सती जाण्याबद्दल पुढीलप्रमाणें उल्लेख आढळतात. 'सकवारबाई साहेबांस सती घालवावी, न जातील तर बळें न्यावी, महाराजांमागें दुर्लौकिक बखेडा करितील, मग विचारीं पडावें, नीट नाहीं, आतांच शेवट केला पाहिजे.' नंतर बाईचे भाऊ चांगले थोर माणूस शहाणे होते, त्यांस बोलावून आणिलें आणि 'तुह्मीं बाईस समजून सांगून समागमें जाण्याचा विचार ठरवा.' त्यावरून त्याणीं जाऊन बाईस वाईटबरेपणानीं परनिष्ठ सांगितलें कीं, 'उद्यां या ब्राह्मणाशिवाय [ नानासाहेब पेशव्याशिवाय ] राज्यास आवर घालील, असा दुसरा सरदार मला दिसत नाहीं. तूं उगाच भलत्याचे नादास लागून मागें राहशील तर, यांचे हरभरे भरडावे लागतील. त्यांत तुझा पुरुषार्थ नाहीं. आमचे कपाळास आलें तें भोगूं, पण तूं आपला लौकिक मिळवून जा, यांत फार चांगलें लोक ह्मणतील.' असें पर्यायानें सांगितल्यावर उमेदवारी जी मनांत धरली ती खचली. बरें बोलली, ह्मणोन त्यांणीं रायास व पंतास येऊन सांगितलें, कीं सिद्धता करावी, गेली तर बरें, न गेली तर

आह्मीं तिला नेतों. असें बोलल्यानंतर सहगमनाची सिद्धता करून हळदकुंकू वाणें दिलीं.' ( म. रि. म. वि. २ पान १५६ ) याप्रमाणें सकवारबाई सती गेल्या व शाहूराजे यांची अखेर शोकपर्यवसायी झाली.

**१५ 'खून कीं आत्महत्या'कारांचे उद्गार:**—या बाबतींत 'खून कीं आत्महत्या'कारांचे उद्गार पुढीलप्रमाणें आहेत. "तारीख १५ डिसेंबर सन १७४९ रोजीं शाहूमहाराज मरण पावले. त्यांच्या शवाबरोबर श्रीकृष्णेच्या कांठीं माहुली येथें संगमावर राणी सकवारबाई यांनीं सहगमन केलें. शाहूमहाराजांच्या इतर तीन नाटकशाळाही सती गेल्या. त्या जागीं अद्यापही त्यांचें स्मारक आहे. राणीसाहेबांचा देह अग्निसंस्कारानें पंचतत्वांत मिळाला, पण पेशव्यांच्या कारस्थानामुळें त्यांच्या अंतःकरणांत पेटलेला द्वेषाग्नी मात्र निवाला नाहीं. तो पुढें बारा वर्षांनीं पानिपतच्या रणभूमीवर उत्पन्न होऊन त्यानें रणकुंड पेटविलें. त्यांत लक्षावधि मराठे वीरांच्या आहुति पडल्या, नानासाहेबांचा वडील मुलगा विश्वासराव हाही त्यांत दग्ध झाला. सदाशिवराव भाऊ अदृश्य झाला. मराठी राज्याचा नांवलौकिक होरपळून निघाला. या वर्तमानानें नानासाहेब पेशव्यांना धक्का बसून ते कालवश झाले. ज्याप्रमाणें नानासाहेबांनीं आपल्या कुटिल कारस्थानाचें विष छत्रपतींच्या—आपल्या स्वामींच्या गादीवर ओकून तिचें जीवन हरण केलें, त्याचप्रमाणें पुढें पेशव्यांच्या गादीवर स्वामिभक्त ह्मणविणाऱ्या त्यांच्या मुत्सद्यांनीं आपलें कारस्थानी विष ओकून त्या गादीचेही प्राणहरण केले. हा सती राणी सकवारबाईच्या शापाचाच घोर परिणाम आहे असें एकाद्या भाविक इसमानें ह्मटलें तर त्याला दोष देतां येईल काय?" [ 'खून कीं आत्महत्या' पान ३९ ]

———

# प्रकरण १३ वें

## रामराजे यांचा राज्याभिषेक व राजीनामा.

**१ रामराजे यांचें साताऱ्यास आगमन. २ राज्यारोहण. ३ राज्यव्यवस्थेसंबंधीं घासाघीस व बेबनाव. ४ पुण्यांतील पेशव्यांचीं कारस्थानें. ५ सांगोल्याचें कारस्थान व रामराजे यांचा राजीनामा. हिंदुपद्पादशाही केव्हां बुडाली ?**

**१. रामराजे यांचें साताऱ्यास आगमनः**—शाहूराजे यांच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच दिवशीं रामराजे यांना आणण्याकरतां पानगांवास मंडळी पाठविण्यांत आली. पानगांवास रामराजांची पूर्वींच चांगली व्यवस्था करून ठेविली होती. सर्व कारखाने व शागीर्दपेशा, हत्तीघोडे, जवाहीर, पोशाख, व खजिना देऊन बापूजी खंडेराव चिटणिस व ताराबाईकडील चिंतो विनायक आणि नानासाहेबांचा फौजबंद सरदार लिंबाजी अनंत व इंद्रोजी कदम असे पानगांवीं गेले. तेथें रामराजे यांची मावशी दर्याबाई निंबाळकर राहत असे. त्यावेळी रामराजे पानगांवीं नव्हते. त्यांना तुळजापुरास ठेवण्यांत आलेलें होतें. रामराजे पानगांवीं आपल्या मावशीकडे राहण्यास गेल्यावर तेथेंही ते उघडकीला येतील या भीतीनें दर्याबाईनें ताराबाईच्या सल्लयास अनुसरून त्यांना तुळजापुरच्या एका भोप्याकडे नेऊन ठेविलें. भोप्या म्हणजे तुळजापुरच्यां देवीचा पुजारी. त्या भोप्यानें रामराजे यांना भुत्याची दीक्षा देवविली. भुत्या म्हणजे देवीला वाहिलेला मुलगा. ही भुत्याची दीक्षा देतांना कुलगोत्र वगैरे विचारण्याचें कारण पडत नाहीं. फक्त तो हिंदु असला म्हणजे झालें. ही दीक्षा देतांना कवड्याची माळ, कवड्याचा टोप व कापडाचा पोत हे देतात. हा संस्कार झाला म्हणजे देवीला वाहिलेल्या मुलाची कोणी चौकशी करीत नाहीं. रामराजे हे तेथें देवीला वाहिलेल्या मुलांमध्यें भुते होऊन राहिले होते. रामराजे

यांना आणण्याकरतां जी मंडळी गेली त्यांचे ताब्यांत त्यांना भोप्यानें कोणतीच अडकाठी न घेतां द्यावें ह्मणून ताराबाईनीं आपल्या हातची आंगठी खूण ह्मणून त्याला दाखविण्याकरतां दिली होती. ( इतिहास संग्रह ) त्याप्रमाणें तुळजापूरच्या भोप्याला खूण दाखवून व त्याला पांच चार हजार रुपये देऊन रामराजे यांची मुक्तता करवून त्यांना पानगांवीं आणण्यांत आलें. नंतर या मंडळी बरोबर दयाबाई निंबाळकर आपल्या फौजेसह सातान्यास येण्याकरतां निघाल्या. डिसेंबर तारीख २६ रोजीं ही सर्व मंडळी कृष्णाकांठीं वडुथाजवळ येऊन पोंचली. ताराबाई शाहूराजे यांचें उत्तरकार्य होईतों पर्यंत सातारा शहरांत होत्या. शाहूराजे यांचें उत्तरकार्य मालोजी भोंसले मुंगीकर यांचे हस्तें करविण्यांत आलें. त्यांच्या उत्तरकार्याला एकंदर खर्च ४५४१२ रुपये झाला. ताराबाईची व रामराजे यांची भेट बारावर्षांच्या कालमर्यादे नंतरची होणारी असल्यामुळें ती श्रीकृष्णा उत्तरतीरीं शकुंतेश्वराच्या मंदिरांत होण्याचें ठरलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं तिसरे प्रहरीं रामराजे यांची भेट घेतली. त्या ठिकाणीं सर्व सरदार, मानकरी वगैरे मंडळी रामराजांना जाऊन भेटून आली. सदाशिवराव भाऊ हे पुण्याहून तारीख २० डिसेंबर रोजीं सातान्यास आले नंतर तेही रामराजांना जाऊन भेटून आले. रामराजे यांचा सातारा शहरांत सुमुहूर्तानें प्रवेश व्हावा ह्मणून ते तारीख ४ जानेवारी सन १७५० पर्यंत वडुथ-आरळेनजीक मुक्काम करून होते. पौष शुद्ध अष्टमी शके १६७१ शुक्ल संवत्सरीं रोज गुरुवारीं ( तारीख ४ जानेवारी सन १७५० ) सातान्यास येण्यास मुहूर्त होता, त्या दिवशीं शहरांत येऊन दाखल झाले. ‘ त्याच दिवशीं अठरावे घटकेस ( त्यांना ) राज्यास बैसविलें; आणि लोकांच्या नजरा झाल्या. ’

२. **राज्यारोहणः**— या राज्यारोहण समारंभाची हकीकत चिटणीसांनीं रामराजे यांच्या चरित्रांत पुढीलप्रमाणें दिली आहे. “ पौष शुद्ध अष्टमीस सहा घटका दिवसास [ राजे ] वाड्यांत आले. राज्याभिषेकास प्रारंभ करावा असें करून सर्व शहरांत गुढ्या, तोरणें उभी केलीं. रस्त्यांत सडे

घालवून रांगोळ्या घालविल्या. घरोघरीं सुवासिनी आर्त्या घेऊन उभ्या केल्या. त्यांणीं लाह्या व अक्षता उधळाव्यासें सांगितलें, याप्रमाणें नगरची तरतूद करवून सर्व देवता नगरच्या यांच्या पूजा, वस्त्रें, अलंकार, साहित्य देऊन करविलें. वाड्यांत रांगोळ्या व मंडप जागे बहुत शोभायमान करविले. आणि राज्याभिषेकास साहित्य लागावयाचें तें सिद्ध केलें. समुद्रोदक, महानदींचें उदक, सर्व सिद्ध करविलें. मोठमोठे ब्राह्मण पंडित, वैदिक बोलावून सभा करविली. नृत्य व गायन गुणीजन जमा करविले. मंगळवाद्यें सिद्ध केलीं. आणि सर्व अष्टप्रधान हत्ती, घोडे, फौज सहवर्तमान प्रातःकाळींच जाऊन म्हसवें येथून महाराजांची स्वारी निघाली. बाळाजीपंत प्रधान यांणीं राजे यांस अंबारींत बसवून खवाशांत ( अंबारीच्या पाठीमागें खिजमतगाराच्या जागेंत ) आपण रुमाल उडवावयाचा हातीं घेऊन बसले. चंद्रसेन जाधवराव यांचे बंधु शंभुसिंग महाराजांचे लक्षांत राहिले, त्यांस हत्तीचे किलाव्यांत [ हत्तीच्या गळ्यांत सुताच्या अगर रेशमाच्या दोरीचें पेंडें महाताला आपले पाय अडकवितां यावे ह्मणून घातलेलें असतें त्याला किलावा ह्मणतात. ] दुसरा रुमाल हातीं देऊन बसविलें. आणि शहाजानें, मंगळवाद्यें वाजवीत स्वारी निघाली. जिलीब ( अघाडी ) वगैरे बहुत तरतुदीनीं शहरांत आले. मार्गीं देवांस दक्षणा, विडे, नारळ देऊन राजवाड्यांत येऊन द्वारीं सुवासिनी यांणीं पुढें कुंभ, आर्त्या, निंबलोण केलें. गृहप्रवेश करून देवदर्शन करवून सभेस बसले. नंतर महाराजांस मंगलस्नान करवून राज्याभिषेकविधीस व्रतबंधपूर्वक प्रारंभ करविला. शांति होऊन सिंहासनारोहण मुहूर्त नेमिला त्याप्रमाणें यथाशास्त्र विधीपूर्वक केलें. शके १६७१ विकारी नाम संवत्सरे पौष शुद्ध अष्टमीस, नांव राजाराम ठेविलें. सर्व अष्टप्रधान यांस, वस्त्रें यथापद्धति व दरखदार ( चिटणीस, खासनीस, फडणीस वगैरे वंशपरंपरेचे कामगार ) व कारखानदार या सर्वांस दिल्हीं. आणि ब्राह्मणांस दक्षणा देकार यथायोग्य करावा तसा केला. याप्रमाणें राज्याभिषेक जालियानंतर सर्व मराठे सोयरे शिर्के व मोहिते व महाडीक व पालकर व जाधव जमा केले. त्यांत ज्यांनीं कल्पना (संशय) केल्या

त्यांस गोविंदराव चिटणीस यांजपासून खातरजमा करवून एक ताटांत जेवावें ऐसें केलें. आणि भोजनसमयीं शंभुसिंग जाधवराव वगैरे सर्वांनीं आईसाहेब यांस आधीं आपण घांस घ्यावा ह्मणजे सर्व आह्मीं घेऊं, बोलले. तेव्हां "आमच नातु खरे" ह्मणून प्रथम ग्रास आईसाहेबीं, एक ग्रास राजांनीं, घेतल्यावरि सर्व मराठे यांनीं घेऊन भोजन जालें."

३ **राज्यव्यवस्थे संबंधीं घासाघीस व बेबनावः**– "या नंतर रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा दहाबारा हजार फौजेनिशीं येऊन पावले. त्यांस महाराज व पंतप्रधान सामोरे म्हसव्यापुढें जाऊन पद्धतीप्रमाणें भेटी सन्मान नजरा झाल्या. त्यांस चादर (सुवर्ण तंतुमय महावस्त्र) घालून वाड्यांत येते जाले. आणि डेरियांत उतरण्यास निरोप दिल्हा. त्यानंतर महाराजांचीं लग्नें दोन, मोहिते यांची कन्या करून मोठे समारंभें करून केलीं. अष्टप्रधान व सर्व; सरदार जमा जाले. प्रधानपंत यांजकडील शिंदे, होळकर व पिलाजी जाधव पंचवीस हजार फौज व आपाजी सोमवंशी सर लष्कर पथके सरंजामी सुद्धां व रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा फौजेनिशीं व हुजुरात मानकरी ऐसे मराठे साठ हजार फौज जमा केली. नंतर प्रधानपंत व सर्व सरदार यांगीं विचार केला जे महाराजांची स्वारी निघावी, कांहीं प्रथम स्वारीस फत्ते करून यावें, सर्व पदाधिकारी यांगीं नजरा द्याव्या, त्यांचे सन्मान करावे, कोणाचीं पदें ठेवणें व घालमेल करणें हें व्हावें, राज्यकारभार कोणते पद्धतीप्रमाणें कसा चालावा, कैलासवासी महाराज यांनीं आज्ञा केली त्याप्रमाणें खासगी खर्च व तालुके करार करून त्यांजवर नेमणुका ठराव व्हावे, याप्रमाणें सर्वांच्या विचारें ठरलें. तो सदाशिव चिमणाची यांची स्त्री [ उमाबाई ] वारली ह्मणून पुण्यास प्रधानपंत जाऊन त्यांचें लग्न करून येऊन विचार करावा ऐसें ठरविलें आणि निघोन गेले. त्या प्रसंगांत ताराबाईसाहेब यांचें मनांत आलें जे, "पूर्वी आपले पुत्र शिवाजीराजे होते ते अव्यवस्थित होते. त्यांचें नांव मात्र करून सर्व कारभार आपण केला. त्या अन्वयें हल्लीं आपणापाशीं राजे यांसी बसवून जें करणें तें आपण सर्व कारभार करावा. सर्वांनीं आपले आज्ञेंत चालावें." पंतप्रधान यांच्या विचारें

" बायकोचा कारभार, व्यवस्था राहणार नाहीं. पूर्वीपासून कारभारी आहेत त्यांणीं महाराजांस माहीत करावें. राजेही प्रबुद्ध, तीस वर्षांचे वय आहे. करण्याचा धारा सर्वांचे विचारें कैलासवासी शाहूमहाराज यांचे आज्ञेप्रमाणें करून कारभार चालावे असें करून मातबर मनसबा अथवा वडीलपणें कानावरी घालणें तितकें आईसाहेबांचे कानावरी घालून त्यांचे संमते होणें तितकें घेऊन चालवें, हिंदुस्थान, कर्नाटक परराज्यांत लौकिक बायकोचा कारभार ठीक दिसणार नाहीं."

वरीलप्रमाणें माहिती लक्षांत घेतली ह्मणजे शाहूराजे यांच्या पश्चात् मराठी राज्याचा कारभार कोणत्या धोरणानें चालवावा यासंबंधींची वाटाघाट यावेळीं साताऱ्यास प्रामुख्यानें चाललेली होती व त्याकरतांच सर्व सरदार, मुत्सद्दी वगैरे तेथें जमा झालेले होते हें लक्षांत येईल. या वाटाघाटीच्या निष्कर्षावरच मराठी राज्याचें अस्तित्व, मराठी राज्याची कीर्ति आणि मराठी राज्याची भावी संघटणा अवलंबून होती. याकरितां मराठी राज्याचा पुढील इतिहास अभ्यासावयाच्या अगोदर या वेळेच्या वाटाघाटीचें स्वरूप कसें होतें, छत्रपति शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेचें प्रतिबिंब कोणत्या वाटाघाटीच्या मनसुब्यांत दिसणार होतें; कोणत्या योजनेमुळें राज्याचें कल्याण होणार होतें; कोणती मसलत स्वराज्याला, राजमंडळाला व प्रजाजनांना हितावह होणारी होती याचा विचार येथें करणें जरूर आहे. त्या दृष्टीनें विचार करावयाचा झाल्यास वरील हकीकतीवरून दोन योजना प्रामुख्यानें या वाटाघाटींत पुढें आल्या. ( १ ) " पूर्वी आपले पुत्र शिवाजीराजे होते ते अव्यवस्थित होते. त्यांचे नांव मात्र करून सर्व कारभार आपण केला. त्याअन्वयें हल्लीं आपणापाशीं राजे [रामराजे] यांसि बसवून जें करणें तें आपण सर्व कारभार करावा. सर्वांनीं आपले आज्ञेत चालावें." अशी ताराबाईची योजना होती. [ २ ] " बायकोचा कारभार, व्यवस्था राहणार नाहीं. पूर्वीपासून कारभारी आहेत त्यांणीं महाराजांस [ रामराजे यांस ] माहीत करावें. राजेही प्रबुध्द, तीस वर्षांचें वय आहे. करण्याच्या धारा सर्वांचे विचारें कैलासवासी शाहूमहाराज यांचे

आज्ञेप्रमाणें करून कारभार चालावे. असें करून मातबर मनसबा अथवा वडीलपणें कानावरि घालणें तितकें आईसाहेबांचे कानावरि घालून त्यांचे संमते होणें तितकें घेऊन चालावें. हिंदुस्थान, कर्नाटक, परराज्यांत लौकिक बायकोचा कारभार ठीक दिसणार नाहीं." ही योजना नानासाहेब पेशवे पंतप्रधान यांची होती. या दोन योजना साधकबाधक रीतीनें येथें विचारांत घेणें प्राप्त आहे.

पहिली योजना ताराबाईची होती. या वेळीं त्यांचें वय पाऊणशें वर्षांचें होतें. छत्रपति शिवाजीमहाराज यांनीं संस्थापिलेल्या हिंदुपदपादशाहीच्या व व छत्रपति राजाराममहाराज यांनीं पुनर्प्राणप्रतिष्ठा केलेल्या स्वराज्याच्या त्या धनीण होत्या. हा त्यांचा धनीणपणा केवळ नामधारी नव्हता तर राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याची धूरा त्यांनीं आपल्या खांद्यावर घेतलेली होती. औरंगजेबासारख्या अजिंक्य सार्वभौम बादशहाशीं त्यांनीं सतत सात वर्षे टक्कर देऊन मराठ्यांची यशोदुंदुभी सर्व भारतवर्षाला ऐकविली होती. त्यांनीं आपल्या रक्ताचें पाणी पाणी करून मराठी स्वराज्याचे बकासुरी शत्रूकडून संरक्षण केलें होतें. त्यांनीं स्वराज्यावर एकछत्री अंमल चालवून, राजमंडळाला आज्ञेंत वागवून, सरदारांना राजकार्यदक्ष ठेऊन, चाकरांना स्वामीभक्तीचे पाठ पढवून, प्रजाजनांत स्वराज्याचा अभिमान व आपुलकीची भावना वाढवून आणि सर्व पक्षांत व सर्व हिंदुजातींत एकजूट नांदवून घेऊन मराठी स्वराज्याच्या भगव्या झेंड्याचें नांव त्यांनीं सार्थ केलें होतें. त्यांच्या पराक्रमाबद्दल मुत्सद्देगिरीबद्दल, किंवा राज्यकारभाराच्या धोरणाबद्दल त्यांना दोष देण्याची त्यांच्या शत्रूचीही प्राज्ञा नव्हती. प्रत्यक्ष छत्रपति शिवाजी महाराजांच्या तालमींत तरबेज झालेल्या सेनापति हंबीरराव मोहित्यांच्या त्या साक्षात् कन्या होत्या. शिवाजी महाराजांच्या राजकारणाचे खेळ खेळण्यांत प्रवीण झालेले व राजनीतिकुशल बनलेले रामचंद्रपंत अमात्य ज्यांचे एकनिष्ठ सेवक अखेरपर्यंत राहिले, ज्यांच्या पाऊणशें वर्षांच्या कालाच्या ओघांत भल्याबुऱ्या राजकारणाच्या घडामोडी होऊन ज्यांच्यावर प्रत्यक्ष अनुभवाचे संस्कार घडले

व ज्या संस्कारामुळें स्वराज्याचें, स्वराज्याच्या कीर्तीचें, स्वराज्याच्या आधारस्तंभांचें, स्वराज्यांतील प्रजाजनांचें आणि स्वधर्माचें हिताहित कशांत आहे याचें मर्म ज्यांना प्रत्यक्ष आपल्या दीर्घकालीन अनुभवानें समजलें होतें त्या थोर, ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध ताराबाईची वरील पहिली योजना होती. स्वराज्य हें भोंसले घराण्यांतील पुरुषांनीं कमावलें आहे, त्यांनींच संरक्षण केलें आहे व पुढेंही त्याच दर्जानें त्यांना तें चालवावयाचें आहे याच भोंसले घराण्याच्या स्वाभिमानाच्या दृष्टीनें त्यांनीं वरील पहिली योजना सर्व सरदार मंडळी व मुत्सद्दी यांच्यापुढें मांडली होती. ती व्यक्तिविषयक स्वार्थाची नव्हती किंवा आपल्या अधिकारलालसेच्या पूर्तीकरतां राक्षसी महत्वाकांक्षेचीही नव्हती. त्यांचें वय पाऊणशें वर्षाचें झालेलें होतें. त्यांच्या वयाच्या पंचेवीसाव्या वर्षी राजाराममहाराज कालवश झाल्यामुळें त्यांचा व्यक्तिगत स्वार्थ, उत्साह, आशा, महत्वाकांक्षा सर्व कांहीं होरपळून गेल्या होत्या. राज्यकारभाराचा त्याग करून त्या विरागी बनल्या होत्या. त्यांचा मुख्य आधार त्यांचा मुलगा शिवाजी हा कालवश झाल्यामुळें त्यांचें आयुष्य शून्यवत् झालेलें होतें. भोंसले घराण्यांतील आपल्या सिंहाच्या छाव्याचें लोकांकडून विडंबन होऊं नये म्हणून आपल्या कोमल मातृहृदयावर कठोरपणाचें वज्रकवच धारण करून आपला एकमेव राहिलेला आशांकुर जो रामराजे त्यालाही तुळजापूरच्या देवीला वाहून टाकल्यामुळें अज्ञानांत आणि अज्ञातवासांत कायमचें ठेऊन त्यांनीं आपल्या सर्व आकांक्षांची राखरांगोळी करून घेतलेली होती. अशा मनाच्या हताश व उदास स्थितींत मरणाला आव्हान देत बसलेल्या ताराबाईच्या नशिबीं शाहूराजे यांचा अवसान-काळ पाहण्याचा प्रसंग ओढवला व त्यामुळें रामराजांचें रहस्यमय गोप्यगोपन प्रकाशांत येऊन ते राज्यारूढ झाले, तेव्हां ते निव्वळ दरवेशाचें खेळणें अस्वल बनूं नयेत एवढ्याकरतांच अशा उतार वयांत पुढाकार घेऊन त्या पुढें आल्या होत्या व त्यांनीं आपली वरील योजना सर्वांपुढें मांडली होती.

ताराबाईच्या मनांत मराठी राज्याची घडी जी शाहूराजे यांच्या उत्तर

कारकीर्दींत बिघडली होती ती पूर्ववत् बसवावयाची होती. राज्यांत जर एकसूत्रीपणा नसेल तर राज्याचा नाश कसा होतो याची चांगलीच कल्पना ताराबाईंना होती. एकसूत्रीपणा केव्हां व कसा होता याची कल्पना त्यांनीं पहिल्या वाक्यांत दिलेली आहे. ‘ पूर्वी आपले पुत्र शिवाजीराजे होते ते अव्यवस्थित होते. त्यांचें नांव मात्र करून सर्व कारभार आपण केला. ’ या वाक्यानें पूर्वींच्या एकसूत्रीपणाचा सर्व इतिहास त्यांनीं सर्वांस दाखवून दिलेला आहे. राजा अव्यवस्थित असल्यास किंवा अज्ञान असल्यास त्याच्या केवळ नांवानें राज्यकारभार चालवून राज्याचें कसें संरक्षण करावें लागतें व एकसूत्रीपणा कसा टिकवून घ्यावा लागतो व तो आपण त्याप्रसंगीं कसा टिकवून घेऊन राज्यकारभार केला आणि औरंगजेबासारख्या सार्वभौम शत्रूबरोबर सामना देऊन राज्याचें पूर्वपरंपरेनुसार कसें रक्षण केलें हा मागील आपल्या कारकीर्दीचा व आपल्या कारभाराच्या लायकीचा सर्व इतिहास वरील त्यांच्या एका वाक्यांत आहे. ती आपली पूर्वींची कारकीर्द ज्याप्रमाणें राज्याच्या व राजाच्या हितपरिणामाची झाली त्याचप्रमाणें सांप्रतचा प्रसंग असल्यामुळें तीच योजना या प्रसंगीं अंमलांत आणली जावी हा मुख्य हेतु ताराबाईचा होता. या वेळीं रामराजे यांचें वय तेवीस वर्षांचें होतें. “ सन १७२६ च्या मार्च एप्रिलांत बाप ( शिवाजीराजे ) वारला, त्यापूर्वी थोडे दिवसांतला राजारामाचा जन्म. त्याचीं पहिलीं दोनतीन वर्षें पन्हाळ्यावर गेलीं. नंतर पंधरा सोळा वर्षे वावड्यास गेलीं. सन १७४५ च्या जानेवारीनंतर त्याची तुळजापुरावरून पानगांवास रवानगी झाली. म्हणजे राज्यारोहणसमयीं रामराजाचें वय तेवीस वर्षांचें असलें पाहिजे. जन्मापासून सर्व कारभार गुप्तपणाचाच असल्यामुळें प्रत्येक प्रसंग केव्हां घडला, हें सांगणें शक्य नाहीं; आणि त्याच कारणास्तव निरनिराळ्या लेखांत लेखकाच्या माहितीप्रमाणें तपशीलाची थोडीबहुत तफावत आहे. ” [ म. रि. म. वि. २ पान १५१ ] याप्रमाणें रियासतकार रामराजे यांच्याबद्दल वय वगैरे संबंधीं माहिती देतात. यावेळीं रामराजे यांच्या वयाच्या तपशीलापेक्षां त्यांच्या अंगच्या राज्यकारभाराच्या ज्ञानाच्या लायकीचा विचार करणें जास्त महत्वाचें

होतें. रामराजे या वेळीं वयानें प्रबुद्ध होते पण राज्यकारभारांत ते वयाप्रमाणें प्रबुद्ध होते किंवा नाहीं हें येथें पहाणें युक्त आहे. ताराबाईनीं रामराजे यांचा जो पूर्ववृत्तांत कथन केला तो पहातां रामराजे यांना अज्ञातवासांत जिवंत ठेवण्यापेक्षां त्यांच्या ज्ञानाच्या वाढीचा कोणताच प्रयत्न केलेला दिसून येत नाहीं; एवढेंच नव्हे तर तो राजपुत्र आहे याची त्याला कल्पनाही राहूं नये म्हणून त्याला भुत्याची दीक्षा देण्यांत आलेली होती. भावार्थ एवढाच कीं, रामराजे यांना राज्याभिषेक होईतोंपर्यंत म्हणजे वयाच्या तेवीस वर्षांपर्यंत राज्यकारभार कशाशीं खात असतात याचें अंशमात्रही ज्ञान त्यांना नव्हतें. म्हणजे वयांत मुलगा येऊन तो अव्यवस्थित किंवा वेडा असणें काय ? अथवा बालअर्भक राजे असणें काय ? किंवा वयांत आल्यामुळें सज्ञानपणाचा शिक्का मारून घेऊन राज्यकारभारांत पूर्ण अज्ञान असणें काय ? या सर्वांची गोळाबेरीज एकच आहे. म्हणून रामराजे यांची लायकी किती आहे याचा अंदाज बांधून ताराबाईनीं दुसऱ्या वाक्याची योजना केली. "त्यान्वयें ( शिवाजीराजे यांच्याप्रमाणें ) हल्लीं आपणापाशीं राजे [ रामराजे ] यांसी बसवून जें करणें तें आपण सर्व कारभार करावा." या वाक्यामुळें ताराबाईचा हेतु स्पष्ट होतो. रामराजे यांना राज्यकारभाराची बिलकुल माहिती नाहीं तेव्हां तें शिक्षण योग्य अधिकारी व्यक्तीकडून त्यांना मिळावें हा होता. यावेळीं ताराबाई यांच्याशिवाय रामराजे यांना भोंसले राजघराण्याच्या राजनीतीचें योग्य शिक्षण देणारें दुसरें लायक अधिकारी माणूस कोणी नव्हतें. बालवयांत अष्टप्रधानांतील अगर दुसरा कोणी योग्य इसम राजाला राज्यकारभाराचें शिक्षण देऊं शकतो. परंतु तो मोठा झाल्यानंतर आप्तवर्गीय अधिकारी मनुष्या-खेरीज त्याला वळण लावतां येत नाहीं, व त्याच्यावर त्या इसमाचा धाकही राहूं शकत नाहीं. हा धाक लहानपणापासूनच असावा लागतो. या वेळीं मुख्य प्रधान पेशवे होते. पेशव्यांच्या शिक्षणाखालीं रामराजे यांना द्यावें तर या वेळीं नानासाहेब पेशव्यांचें वय अठ्ठावीस एकोणतीस वर्षांचें होतें. रामराजे यांचें वय तीस वर्षांचें असावें असें ते समजत होते. म्हणजे उभयतां एकमेकांना ते

सारख्याच वयाचे मानीत होत. त्यांतून नानासाहेब हे चाकर व रामराजे हे धनी. तेव्हां चाकराचा धन्यावर धाक बसूं शकत नाहीं. तसा धाक चाकरानें बसविण्याचा प्रयत्न केलाच तर त्यामुळें स्वाभाविक अनर्थ ओढवत असतो. म्हणून अष्टप्रधानांतील पूर्वीचीं माणसें राजारामाला राज्यकारभार समजावून देण्याला व योग्य प्रकारचें वळण लावून देण्याला असमर्थ होतीं. ताराबाई मात्र रामराजे यांची सख्खी आजी असल्यामुळें व त्यांनीं त्याचें बालपणापासून संगोपन करविलें असल्यामुळें त्यांच्याच धाकांत त्यांनीं या वयांत वागणें शक्य होतें. फक्त ताराबाई या एकट्याच रामराजे यांना राज्यकारभाराचें शिक्षण व भोंसले राजांचें वळण लावण्यास समर्थ होत्या. व त्यांनींच त्यांना कान धरून सर्व शिक्षण दिलें असतें. या विश्वासावरच त्यांनीं वरील वाक्य उच्चारलें होतें.

'सर्वांनीं आपले आज्ञेंत चालावें' असें ताराबाईचें वाक्य आहे. या वाक्यानें धनी आणि चाकर यांच्या संबंधाचा स्पष्ट खुलासा त्यांनीं केलेला आहे. धन्याच्या आज्ञेंत चाकरांनीं वागावें असा दंडक पूर्वापार असतां या वेळीं ताराबाईनीं त्याचा ज्या अर्थीं मुद्दाम उल्लेख केलेला आहे. त्या अर्थीं त्यांतही ताराबाईचा कांहीं हेतु असावा हें उघड आहे, या वेळीं अष्टप्रधानांतील मुख्य जे पंतप्रधान नानासाहेब पेशवे हे स्वतः आज्ञेबाहेर वर्तन करीत होते असें ताराबाईना वाटत असल्यामुळें त्यांनीं या वाक्याचा उपयोग मुद्दाम केला असावा असें दिसतें. शाहूराजे यांनीं नानासाहेबांना कांहीं दिवस पेशवेपदावरून ज्या वेळीं दूर केलें त्या वेळीं त्यांनीं आज्ञाभंग कसा केला होता हें मागील प्रकरणीं आलेंच आहे. पेशवे हे चाकर धन्याची आज्ञा भंग करणारे आहेत याकरितांच पुनः त्यांचेकडून तसें वर्तन होऊं नये ह्मणून शाहूराजे यांनीं शेवटीं ज्या दोन याद्या नानासाहेब पेशव्यांच्या नांवें लिहिल्या त्या दोन्हींमध्येंही त्यांनीं प्रामुख्यानें त्याचा उल्लेख केलेला आहे. 'वंश होईल त्याच्या आज्ञेंत चालून राजमंडळ चालवणें.' असें पहिल्या यादींत आहे. वंश होईल 'त्याचे आज्ञेंत चालून सेवा करणें; राज्य राखणें' असें दुसऱ्या यादींत आहे. याप्रमाणें शाहूराजे यांनीं नानासाहेबांना पुनः पुनः वंशाच्या आज्ञेंत वागण्याबद्दल जी

आज्ञा केलेली आहे, त्या अर्थी छत्रपतींची आज्ञा भंग करण्याची मनोवृत्ति नानासाहेबाच्या ठिकाणीं होती व ती त्यांनीं सोडून देवून कार्यक्षम असावें असाच या वाक्याचा निष्कर्ष निघतो. त्याचप्रमाणें शाहूराजे यांनीं नानासाहेब पेशव्यांना रामराजे यांना आणवून गादीचे धनी करावें अशी आज्ञा केली होती असें गृहीत धरून चाललें तर रामराजे अधिकारारूढ झाल्याबरोर ताराबाई या कारभारांत येणार हें क्रमप्राप्तच होतें. तेव्हां रामराजे यांच्यासह ताराबाईच्या आज्ञेत पेशव्यांनीं चालणें हें शाहूराजे यांच्या आज्ञापालनाचें मुख्य अंगच होतें. त्या बाबतींत पेशव्यांना निराळा विचार करण्याचें कारण नव्हतें. त्या बाबतींत त्यांनीं जर निराळा विचार करण्याचा प्रयत्न केला तर तो उघड शाहूराजे यांची आज्ञाभंग करणारा व स्वतःच्या अधिकाराचें अतिक्रमण करणारा होता यांत संशय नाहीं. गादीला होणाऱ्या वंशाच्या आज्ञेंत चालून राज्य रक्षण करण्याची आज्ञा शाहूराजे यांनी नानासाहेबांस दिली होती, वंशाला आपल्या आज्ञेंत चालवून घेऊन राज्य रक्षण करावें अशी त्यांची बिलकुल आज्ञा नव्हती. ह्मणून शाहूराजे यांच्या आज्ञेचा स्पष्ट भावार्थ ‘ सर्वांनीं आपल्या आज्ञेंत चालावें ’ या वाक्प्रयोगानें ताराबाईनीं सर्वांना दर्शविला होता असें दिसतें. एकंदरींत पुढील राज्यकारभारविषयीं ताराबाईनीं जी योजना पुढें मांडली होती ती सर्व बाजूंनीं राज्याच्या, राजाच्या, चाकरांच्या व प्रजाजनांच्या वगैरे सर्वांच्या हिताचीच होती हें स्पष्ट आहे.

आतां नानासाहेब पेशव्यांची योजना कशा स्वरूपाची होती हें पहाणें अवश्य आहे. “बायकोचा कारभार, व्यवस्था राहणार नाहीं. हिंदुस्थान, कर्नाटक, परराज्यांत लौकिक बायकोचा कारभार ठीक दिसणार नाहीं.” हा मुख्य मुद्दा नानासाहेबाच्या योजनेंत होता. हा मुद्दा पुढें मांडतांना ताराबाईच्या पूर्वेतिहासाचें त्यांना एक पूर्ण अज्ञान तरी असलें पाहिजे किंवा जाणूनबुजून ते अज्ञानाचें पांघरूण घेत असले पाहिजेत असें ठरतें. राजाराममहाराज कालवश झाल्यानंतर बालशिवाजीना एकछत्री राज्यावर बसवून त्यांच्या नांवानें पूर्ण सात वर्षे रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्रिंबक प्रतिनिधि, धनाजी जाधव

सेनापति, कान्होजी आंग्रे सरखेल, शंकराजी नारायण सचीव, पेशवे, नीळकंठ मोरेश्वर पिंगळे, श्रीशंकराचार्य कालगांवकर पंडितराव, त्याचप्रमाणें भोंसले, आटोळे, दाभाडे, पवार, चव्हाण, थोरात, पाटणकर वगैरे वगैरे सरदारांना आणि अष्टप्रधानांना आपल्या आज्ञेंत वागवून राज्यरक्षण व संवर्धन ताराबाईनीं केलें एवढेंच नाहीं तर औरंगजेबासारख्या शत्रूला आपल्या सव्यसाची बुद्धिसामर्थ्यावर 'त्राहि भगवन्' करून सोडलें. त्या आणीबाणीच्या प्रसंगा ताराबाईंना कोणीं "बायकोचा कारभार, व्यवस्था राहणार नाहीं." असें म्हटलें नाहीं, किंवा "हिंदुस्थान कर्नाटक परराज्यांत लौकिक बायकोचा कारभार ठीक दिसणार नाहीं" असाही आक्षेप कोणीं घेतला नव्हता. असें असतां यावेळीं म्हणजे मराठ्यांचा दरारा हिंदुस्थानभर बसलेला असतां व दिल्लीपतीचें पूर्वीचें सामर्थ्य त्यांच्या आपसांतील कलहामुळें बरेंच खचीं झालें असतां 'बायकोचा कारभार, व्यवस्था राहणार नाहीं' वगैरे ताराबाईच्याबद्दल उद्गार काढणारा इसम अधिकारमदानें धुंद झालेला, स्वार्थानें अंध बनलेला अगर प्रत्यक्ष घडलेल्या गतगोष्टींसंबंधीं पूर्ण अज्ञानी तरी असला पाहिजे असें ठरतें. नानासाहेबांनीं यावेळीं आपल्या लष्करी सामर्थ्यावर शाहूराजे यांच्या कारभारी मंडळींना आपल्या बगलेंत मारिलें होतें. त्यांना छत्रपतींच्या आज्ञेंत रहावयाला नको होतें. छत्रपतींना इतर कारभारी मंडळीप्रमाणेंच बगलेंत मारून आपल्या आज्ञेंत राबवून घेणेची महत्वाकांक्षा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली होती म्हणून सरदार लोकांच्या वगैरे डोळ्यांत धूळफेंक केली जाईल अशा योजनेच्या मार्गे ते लागले होते. त्यांना ताराबाईचा करडा अंमल याचकरतां विषाप्रमाणें वाटत होता. केवळ स्वार्थ साधण्याकरतां ते ताराबाईंना दूर ढकलून मराठी राज्याचा कुलअखत्यार संपादण्याच्या मार्गाला लागले होते हें वरील त्यांच्या योजनेमुळें स्पष्ट होतें. या मतभेदावर ताराबाई व पेशवे म्हणजे धनी व चाकर यांच्या कलहाला राजकारणानें नवीन तोंड फुटलें व त्याप्रमाणें परस्परांचे राजकारणी डावपेंच सुरू झाले.

वास्तविक हा झगडा शाहूराजे मरण पावल्याबरोबरच सुरू झाला होता.

'शाहूची निधनवार्ता समजतांच किल्ल्यावरून ताराबाई खालीं वाड्यांत येऊन तेरा दिवस राहिली. नंतर किल्ल्यावर जाऊन प्रयागजी बांदल सुभेदार याजपासून ताराबाईनें क्रिया घेतली कीं, फितुरांत येणार नाहीं, आपल्या आज्ञेंत चालेन. त्यांत यमाजी शिवदेवानें पहिल्या दिवसापासून बखेडा चालविला; परंतु गोविंदराव व पेशवे यांनीं रामराजा गादीवर येईपर्यंत बालाग्र वांकडेपणा केला नाहीं. [ चिटणीस कृत शा. म. ब. ] रामराजा सिंहासनारूढ झाल्या-बरोबर ताराबाईचें तंत्र कारभाऱ्यांनीं सोडून दिलें.' या माहितीप्रमाणें नाना-साहेबांना ताराबाईची जरूरी फक्त गादीवर रामराजे यांना आणण्यापुरतीच होती असें ठरतें. रामराजे यांना ताराबाईच्या वतीनें गादीवर आणण्यांत पेशव्यांचा सर्व बाजूनीं स्वार्थ साधणार होता. [१] ताराबाईच्या वतीनें रामराजे गादीवर आले ह्मणजे त्यांच्या खरेखोटेपणाबद्दल कोणालाही संशय राहणार नव्हता. [२] ताराबाईचे नातु रामराजे हे खरे ठरले गेल्यामुळें तेही राज्याचे धनी आहेत हें संभाजी महाराजांना मान्य करणें भाग होतें; व त्यामुळें नानासाहेब व सदाशिवराव भाऊ यांनीं संभाजी महाराज यांना जो गुप्त करार लिहून दिला होता त्यांतून ते सहजच मुक्त होणार होते. तसेंच संभाजीराजे यांनाही त्या कराराबद्दल पेशव्यांना बोल लावावयाला मार्ग राहणार नव्हता. [३] एकछत्री राज्य झालें ह्मणजे मध्यस्थाची कुशलता बंद पडते, याकरितां आपलें मध्यस्थाचें स्थान अढळ रहावें ह्मणून मराठी राज्याचीं दोन निरनिराळीं शकलें कायम ठेवल्यानें पेशव्यांना आपला स्वार्थ साधण्याला मनमुराद क्षेत्र मिळणार होतें. [४] रामराजे हे राज्यकारभारांत अप्रबुद्ध ह्मणून त्यांना ताटाखालचें मांजर बनवून ठेवावयाला पेशव्यांना पूर्ण संधि लाभणार होती. (५) करवीरकरांच्या हक्कावर पाणी ओतण्याकरितां रामराजे प्रतिस्पर्धी ह्मणून पुढें आल्यामुळें त्यांची अस्मानी सुलतानी केल्यास संभाजीराजे यांना त्याबद्दल वाईट वाटण्यासारखें नव्हतें. व पेशव्यांविरुद्ध काहूर माजविण्यास त्यांस कारण उरणार नव्हतें; वगैरे पुष्कळ गोष्टी रामराजांना गादीवर बसविण्यांत ताराबाईच्या आज्ञेंत आपण आहोंत असें दाखविल्यानें साधणार होत्या. त्यामुळें

रामराजे गादीवर येईपर्यंत पेशव्यांनीं त्यांच्या सर्व आज्ञा वरच्यावर झेलल्या व त्यांचा योग्य मानमरातब ठेवला. तें कार्य संपतांच त्यांना ताराबाईची अडगळ वाटूं लागली व रामराजे यांना बगलेंत मारून ताराबाईंना पूर्वींप्रमाणें साताऱ्च्या किल्ल्यावर बंदींत ठेऊन निर्माल्यवित् करण्याचा पेशव्यांचा प्रयत्न सुरूं झाला.

नानासाहेब पेशव्यांनीं आपला मतलब साध्य होईपर्यंत ताराबाईंना जसें लोभांत ठेवलें होतें तसेंच गोविंदराव चिटणीस यांसही लोभांत घेतलें होतें. शाहूराजे यांच्या अखेरच्या दोन याद्या पाहिल्या ह्मणजे त्यांचा नानासाहेबांवर विश्वास नव्हता असें स्पष्ट होतें. व तें त्या वेळीं जगजाहीरही झालेलें होतें. शाहूराजे यांचा विश्वास चिटणीसांवर होता. ह्मणून त्यांनीं पेशवे व चिटणीस यांनीं मिळून राज्यकारभार करावा अशी आज्ञा केली होती. याकरतां चिटणीसांना विश्वास दाखवून कांहीं कालपर्यंत कारभार चालविणें नानासाहेबांना प्राप्त होतें व त्यांच्या मदतीनें त्यांना ताराबाईचा कांटा काढावयाचा होता. याकरतां नानासाहेबांनीं चिटणीसांस स्वदस्तुरची यादी करून देऊन आपल्या लोभांत घेतलें. (भा. व. ऐ. प. या. ले. ५९) यादींतील कलमांचा भावार्थ पुढें दिल्याप्रमाणें:—नानासाहेब पेशव्यांनीं गोविंदराव चिटणीस यांचें कार्य करून द्यावयाचीं कलमें [१] किल्लेकोटांस कर्ज दिलें असेल तें रुजवातीनें मनास आणून सरकारांतून द्यावें. सरंजाम व किल्ले द्यावयाचे करार केले आहेत ते ताकीद हवालीं करावे. हे करार. [२] हातरोखयामध्यें मजमुदार नवा दाखला करूं इच्छितात. तो करूं देऊं नये. याचा कायदा शाहूमहाराजांचें वेळेस चालत आल्याप्रमाणें चालवावा. करार. [३] राज्यकारभाचे कार्यासाठीं व मराठे राजापाशीं व्हावयाचे मजकुरासाठीं, जें ज्याशीं बोललें असाल तें मनास आणून, योग्यायोग्य करून देऊन, गोविंदरावांचें वचन रक्षावें. करार. [४] राजश्रींचे मनांत यांचेविशीं वाईट आलें असेल तें सर्व दूर करून राजश्रींची यांची निखालसता, शपथपूर्वक करून द्यावी. करार. गोविंदराव यांणीं आह्मांशीं येणेंप्रमाणें वर्तावें. (१) आईसाहेबांचा लगाम मनापासून सोडून, सर्व प्रकारें आमचे राजश्रींचे विचारांत यावें. जें कार्य आह्मीं अवलंबूं, त्याचे

प्रयत्नांत मनापासून असावें अंतर करूं नये. (२) हरएक मजकुराची तोडजोड जें बोलणें तें निखालसतेनें आपले जागां बोलावीं. परंतु बाहेर जें करणें तें आमचे विचारास येईल तें करावें. याप्रमाणें नानासाहेब पेशवे व गोविंदराव चिटणीस यांचे करारमदार झाले. याचेवर तारीख नाहीं हें जरी या करारनाम्याचें वैगुण्य असलें तरी त्या करारनाम्यांतील मजकुरावरून तो केव्हां अस्तित्वांत आला हें ठरवितां येतें. ताराबाई व पेशवे यांमधील कलहाला प्रारंभ झाल्यानंतर परस्परांनीं आपले पक्ष मजबूत करण्याकरितां जे प्रयत्न केले त्याच्या इतिहासाची संगत लक्षांत येण्याच्या दृष्टीनें हा करारनामा फारच महत्वाचा आहे.

सामर्थ्यवान् व्यक्तीचे अन्याय न्याय म्हणूनच बहुजन समातांत रूढ होत असतात. यावेळीं नानासाहेब पेशवे आपल्या लष्करी सामर्थ्याचा गराडा घालून साताऱ्यास ठाण मांडून बसले होते. त्यांच्या या कडेकोट सामर्थ्यामुळें न्याय–अन्याय भोंसलें घराण्याचें हित–अनहित; स्वराज्याचें कल्याण–अकल्याण; किंवा पूर्वजांची कीर्ति–अपकीर्ति वगैरेचा निर्णय त्यांच्या मर्जीप्रमाणें व इच्छेप्रमाणेंच लागणार होता. ताराबाईचें सामर्थ्य यावेळीं आपला नातु साताऱ्याच्या गादीवर आला व तो स्वराज्याचा धनी झाला या फक्त भावनेपुरतेंच होतें. छत्रपति म्हणून आज्ञा करण्याचा अधिकार रामराजे यांना मिळाला पण ती अंमलांत आणण्याचें सर्व सामर्थ्य पेशव्यांच्या हातीं असल्यामुळें ताराबाईची योजना अर्थात् पेशव्यांनीं सहज धुडकावून लावली. ताराबाईचें अंग राज्यकारभारांतून काढून टाकण्याचा सामर्थ्यवान् पेशव्यांचा प्रयत्न असल्यामुळें सहजच त्यांचें स्थान पूर्ववत् नजरकैदेचें होणार होतें. ही पेशव्यांची चाल ताराबाईच्या लक्षांत आल्यामुळें ‘पेशवा राज्यापहार करून राज्याचें नुकसान करीत आहे,’ यांतून तरणोपाय काढावा या विवंचनेंत त्या पडल्या. पेशवे आपल्या योजनेचा आग्रह धरून बसले हें पाहून ताराबाईना वाईट वाटलें. ‘दोन महिन्यांचे आंतच आईसाहेबांचे मनांत विकल्प येऊन त्यांहीं उदासवृत्ति धरली; आणि सिंहगडावर राजाराम छत्रपतीची छत्री होती तेथें फाल्गुन

व॥ ८ ( २० मार्च १७५० ) चा वार्षिक उत्सव असे, त्या निमित्तानें ताराबाई, मनांत रुसवा ठेवून सातारा सोडून सिंहगडास जाऊन राहिली.' ( म. रि. म. वि. २ पान २२७ ) तेव्हां रामराजे हे सातान्यास एकटेच सांपडल्यामुळें त्यांना ताराबाईच्या मंत्रांतून अलग काढून पूर्णपणें आपल्या बगलेंत मारण्याचा नानासाहेब पेशव्यांनीं घाट घातला.

नानासाहेबांनीं रामराजे यांना आपल्या बगलेंत मारण्याचे जे प्रयत्न केले त्यापैकीं एक प्रयत्न त्यांच्या पत्रावरून स्पष्ट दिसतो. हें पत्र ता. १६ एप्रिल सन १७५० रोजीं ह्मणजे ताराबाई सातान्याहून निघून सिंहगडावर गेल्यानंतर नानासाहेबांनीं औरंगाबादचा वकील वासुदेव दीक्षित यांना लिहिलेलें आहे. तें येणेंप्रमाणें ' वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षितस्वामी गोसावी यांसीः— सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल चैत्र व॥ ६ पावेतों ( शके १६७२ ) जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष आपणाकडून सांप्रत विस्तारें पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. ऐसें नसावें. येथील वर्तमान तरीः- सात महिने येथें आलियास जाहले. रिकामे किरकोळ अर्थ दोन्हीं माहालांत आह्मांविशीं मनांत आणून राजश्री स्वामीशीं कजिये कारितात. राजश्री स्वामी तो मळमळीत दोन्हीकडे आहेत. आणखी किती दिवस गुंता होईल न कळे. एतदर्थी कांहीं दैवी उपाय वो बापूभट टोकेकर यांजकरवीं आपण करवावा, कीं राजश्रींची कृपा चित्तांत आहे ते वृद्धीस पाऊन निरोप देत. ऐसें महिन्यापंधरा दिवसांअलीकडे होय असें असलें तरी करावें ! परंतु, बहुत लौकिकही कार्याचा नसावा. द्रव्यवृद्धि अति करतां येत नाहीं, याचा विचार आपलें विचारें कसा तो लाह्यावा. जे काळीं जें होणें असेल तें त्याहावें. परंतु उद्योग आहेत. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.' या पत्रावरून ता. १६ मार्च सन १७५० पर्यंत रामराजे पेशव्यांच्या पंजाखालीं पूर्णपणें आले नव्हते हें स्पष्ट होतें. रामराजे या वेळेपर्यंत ताराबाई व पेशवे या दोन्ही पक्षाला सहानुभूति दाखवून वागत होते असें ठरतें. तारीख २१ एप्रिल रोजीं नानासाहेब पेशवे सातान्याहून परत पुण्यास येऊन

दाखल झाले. ताराबाई सिंहगडाला निघून गेल्यानंतर नानासाहेबांनीं रघोजी भोंसले यांना आपल्या मंत्रांत सामील करून घेतलें. रघोजी भोंसले हे सकवारबाईच्या पक्षाचे होते. आपला मुलगा मुधोजी हा साताऱ्याच्या गादीवर यावें त्यांना इष्ट वाटत होतें. परंतु त्यांचे जागीं रामराजांना ताराबाईनीं आणलें ह्मणून ते ताराबाईच्याविरुद्ध पहिल्यापासून होते. रघोजींचें व नानासाहेबांचेंही वैमनस्य होतेंच. पण तें केवळ स्वार्थापुरतेंच होतें. नानासाहेबांनीं यावेळीं रघोजीच्या मागण्या कबूल केल्यामुळें रघोजी व नानासाहेब यांचा समेट झाला. त्यानंतर तारीख १८ एप्रिल रोजीं नानासाहेब, सदाशिवरावभाऊ व महादाजी अंबाजी हे रघोजीच्या भेटीला त्यांच्या घरीं गेले. त्यावेळीं रघोजीनीं त्या त्रिवर्गांना मिळून सातशें रुपये किंमतीचे पोषाख दिले. ( नानासाहेबांची रोजनिशी पृ. १८२ ) यावरून यापूर्वी नानासाहेबांनीं रघोजीस आपल्या पक्षांत घेतलें होतें हें निश्चित ठरतें. त्यानंतर ह्मणजे साताऱ्याहून पुण्यास निघण्याच्यापूर्वी पेशव्यांनीं गोविंदराव चिटणीस यांची समजूत घालण्याकरतां मागें दिल्याप्रमाणें त्यांचेबरोबर याचवेळीं करार केला व त्यांनाही आपल्या मंत्रांत ओढून घेतलें असें ठरतें. या गोष्टी जर यावेळीं झाल्या नसत्या तर नानासाहेबांना रामराजे यांना एकटे सोडून पुण्यास येतां आलें नसतें. रघोजी भोंसले व गोविंदराव चिटणीस या दोघांचें पूर्णपणें समाधान करून व त्यांना आपल्या पक्षांत पूर्णपणें घेतल्यामुळें त्यांचेवर रामराजे यांची व्यवस्था निःशंकपणें सोंपवून ते पुण्यास येऊं शकले असें स्पष्ट होतें.

**४ पुण्यांतील पेशव्यांची कारस्थानें:—** नानासाहेब पुण्यास आल्यावर त्यानीं तारीख २६ एप्रिल रोजीं सदाशिवरावभाऊचें पार्वतीबाईशीं व तारीख २ मे सन १७५० रोजीं विश्वासरावाचें लक्ष्मीबाईशीं अशीं दोन लग्नें मोठ्या समारंभानें उरकून घेतलीं. या लग्न समारंभाकरतां नानासाहेबांनीं ताराबाईना आग्रहाचें निमंत्रण केलें होतें परंतु त्या आल्या नाहींत. सिंहगड हा किल्ला सचिवांचे ताब्यांत होता. तेथें गेल्यावर ताराबाईनीं चिमणाजी नारायण सचिवास आपल्या पक्षांत घेतलें हें वर्तमान नानासाहेब पेशव्यांना समजतांच

त्यांनीं ताराबाईंना ' तुम्हांला राज्यकारभारांतील बहुत कामें मिळतील ' ( डफ कृत मराठ्यांची बखर आवृत्ति ६ वी. पृ. १७९ ) असें सांगून मोठ्या प्रयासानें त्यांना सिंहगडावरून पुण्यास तारीख २९ मे रोजीं आणविलें. पुण्यास त्यांची राहण्याची व्यवस्था बाबूजी नायकाचे वाड्यांत केली. ताराबाईंना आणण्याकरतां रघुनाथराव शिवापुरास व स्वतः नानासाहेब कांहीं अंतरावर सामोरे गेले होते. ताराबाईंबरोबर भगवंतराव अमात्य व सचिवपंत पुण्यास आले. भेटीच्या प्रसंगीं नानासाहेब पेशव्यांनीं ताराबाईंना पांच हजार रुपयांचा नजराणा केला. ( पुरंदरे रोजनिशी खंड पृ. ५२ ) या वेळीं ताराबाईंच्या पक्षांत दाभाडे, सचिव, बाबूजी नाईक, प्रतिनिधि वगैरे कित्येक मंडळी होती. त्यांत प्रतिनिधीचा मुतालिक यमाजी शिवदेव हा शहाणा गणला जात होता.

ताराबाई पुण्यास आल्यावर नानासाहेब पेशव्यांनीं रामराजे यांना पत्र पाठवून असें कळविलें कीं, ' स्वारी पुण्यास येऊन मातुश्रीचें समाधान करून सातारियास जावें ' ( धा. रामराजे यांचें चरित्र पृ. ४ ) या पत्रावरून ताराबाई या रामराजे यांची मार्गप्रतिक्षा करीत पुण्यास राहिल्या. त्या अवधींत पेशव्यांनीं आपल्या विरुद्ध त्यांच्या हालचाली बंद पाडण्याचा उपक्रम केला. सिंहगड सचिवांचे ताब्यांत असल्यानें ताराबाईचा जोर चालतो व राजाराम महाराजांची समाधि तेथें असल्यानें ताराबाईंना सिंहगडावर जाण्यास अटकाव करतां येत नाहीं म्हणून सचिवांचें पारिपत्य पहिल्यानें करण्याचें पेशव्यांनीं ठरविलें. सचिव ताराबाईबरोबर पुण्यास आले होते त्यामुळें त्यांचा बंदोबस्त पेशव्यांना सहज करतां येण्यासारखा होता. नानासाहेबांनीं सचिवांचे ताब्यांतील तुंगतिकोन किल्ला व त्या खालील मुलूख आपल्या ताब्यांत घेऊन तारीख १४ जून सन १७५० रोजीं सचिव व त्यांचा मुलगा चिटकोपंत यांस पुण्यांत अटकेंत ठेवलें. त्याचप्रमाणें पेशव्यांनीं जिवाजी गणेश खासगीवाले यांजबरोबर फौज देऊन सिंहगड काबीज करण्याकरतां पाठविलें. सचिवाच्या लोकांनीं किल्ला लढविला परंतु शेवटीं तारीख ६ जुलई रोजीं जिवाजी गणेशानें सिंहगड हस्तगत केला. त्यामुळें ताराबाईंना सचिवांचें असलेलें पाठबळ नष्ट झालें व

सिंहगडासारखा मजबूत किल्लाही त्यांच्या हातांतून निघून गेला. अशा प्रकारें ताराबाईंना मोठ्या विश्वासानें व आग्रहानें पुण्याला बोलावून व त्यांना नजराणे वगैरे करून आंतून त्यांच्या पक्षाचे पंख तोडण्याचा सपाटा पेशव्यांनीं चालविला. धन्याविरुद्ध चाकराच्या कपटकारस्थानाला आणि अष्टप्रधानांतील एक एक प्रधानाच्या स्वाहाकाराला नानासाहेबांनीं सिंहगडापासून प्रारंभ केला.

नानासाहेबांनीं रामराजे यांना ताराबाईचें समाधान करण्याकरितां ह्मणून पुण्यास बोलाविलें होतें. परंतु हें कारण केवळ बाह्योपचारी ताराबाई यांना व त्यांच्या पक्षांतील इतर सरदारांना दाखवण्यापुरतेंच होतें. नानासाहेबांचा मुख्य हेतु छत्रपतीचे अधिकार आपल्या हातीं घ्यावयाचे होते. त्याकरितां त्यांना ताराबाईचे प्रयत्न ह्मणून पाडावयाचे होते; शाहूराजे यांच्या विश्वासाला पात्र ठरलेले गोविंदराव चिटणीस यांच्या तोंडाला पानें पुसावयाचीं होतीं; ताराबाईच्या पक्षांतील ह्मणजे छत्रपतीची सत्ता कायम ठेवूं इच्छिणाऱ्या पक्षांतील सरदारांना व प्रधानांना नेस्तनाबूत करावयाचें होतें; आणि या सर्व गोष्टी छत्रपतीची सर्व सत्ता आपण अपहार करतों याची कोणाला गंधवार्ता लागूं न देतां साधून घ्यावयाच्या होत्या. रामराजे हें छत्रपतीची सत्ता अंमलांत आणण्यांत अगर राज्यकारभारांत पूर्ण अज्ञान असल्यामुळें जसा पुजारी भेटेल तशी छत्रपती ह्मणून पूजा करून घेणें एवढेंच त्यांना समजत होतें. राज्यकारभारांत केवळ छत्रपतीच्या एका मुद्रेनें आज्ञापत्रें निघत नव्हतीं. त्या आज्ञापत्रांवर छत्रपतीच्या मुद्रेनंतर उजव्या बाजूस प्रतिनिधीची मुद्रा व डाव्या बाजूस प्रधानाची मुद्रा असावी, अशी प्रथा राजाराममहाराजापासून चालत आली होती. प्रतिनिधि ह्मणजे आपले 'प्रत्यक्षच' [ थो. राजाराममहाराज यांचें चरित्र पृ. ३२ ] ह्मणजे प्रतिमा आहेत असें मानण्यांत येत होतें. त्यामुळें प्रधान [पेशवे] हे प्रतिनिधीच्या खालच्या दर्जाचे होते, छत्रपतींचे अधिकार हस्तगत करून घेऊन आपण सर्वाधिकारी व्हावयाचे झाल्यास नानासाहेब पेशव्यांना प्रतिनिधीची आडकाठी येत होती. ह्मणून प्रतिनिधींना पहिल्याने आपल्या हातचें बाहुलें बनविण्याचा त्यांनीं घाट घातला.

नानासाहेब पेशव्यांनीं रामराजे यांना पुण्यास बोलाविलें तेव्हां त्यांचें पुण्यास जाणें जेव्हां नक्की ठरलें तेव्हां पुढील व्यवस्था सर्वांनीं एकाविचारें ठरवावी या हेतूनें रघूजी भोंसले पुण्यास येण्याकरतां निघाले. ते पुण्यास तारीख ३० जुलै रोजीं येऊन पोंचले. रामराजे तारीख १४ आगष्ट रोजीं पुण्यास आले. [ म. रि. म. वि. २ पृ. २३१ ] त्यांस पेशव्यांनीं आपल्या डेऱ्यांत उतरवून घेतलें. रामचंद्रबाबांच्या पुण्यांतील सातमजली वाड्यांत रामराजे यांना उतरविलें असेही लेख आहेत. पहिल्यानें पेशव्यांनीं त्यांना आपल्या डेऱ्यांत उतरविलें असेल व नंतर त्यांची उतरण्याची व्यवस्था रामचंद्रबाबा यांच्या वाड्यांत झाली असेल असाही संभव आहे. रघोजी भोंसले यांना साताऱ्यास येऊन सातआठ महिने झाले होते म्हणून त्यांना परत स्वदेशीं जाण्याची निकड होती. तेव्हां पेशव्यांनीं त्यांना जीं आश्वासनें दिलीं होतीं तीं रीतसर अंमलांत आणविण्याच्या खटपटींत ते होते. नानासाहेबांनीं अद्यापी रामराजे यांचा शिक्काही चालू केला नव्हता. तेव्हां तो सुरू करवून व प्रतिनिधि आणि पेशवे यांच्या शिक्यानिशीं नवीन फर्मानें व सनदा त्यांना घेऊन जाणें प्राप्त होतें. त्याकरतां रघोजी भोंसले यांनीं नवीन व्यवस्था सर्वांचे विचारें ठरवून घेण्याची निकड चालविली होती. शाहूराजे यांच्या मृत्यूसमयीं दादोबा प्रतिनिधि व यमाजी शिवदेव यांना पेशव्यांनीं कैद करून पुरंदर किल्ल्यावर पाठविल्यामुळें रामराजे यांच्या राज्यारोहणाच्यावेळीं पेशव्यांनीं आपल्या पक्षांतील भवानराव यास प्रतिनिधिपदाच्या जागीं तात्पुरतें उभें केलें होतें. परंतु त्यामुळें प्रतिनिधिपदाचा व सरंजामाचा हक्क दादोबांकडून गेलेला नव्हता. शिवाय दादोबाप्रतिनिधि हे पूर्णपणें राजनिष्ठ होते. शाहूराजे यांच्या यादींतील ‘ वंश ’ करावा या मताचे ते होते, सकवारबाईनीं दत्तक घेऊन राजमंडळ रक्षण करून राज्य चालवावें या मताचे म्हणजे निर्भेळ राजपक्षाचे होते. अशास्थितींत पेशव्यांनीं आपल्या लष्करी सामर्थ्याच्या बळावर ते सकवारबाईच्या पक्षाचे म्हणून त्यांना कैद केलें व सकवारबाईना सती घालविलें. केवळ या घडामोडीमुळें प्रतिनिधींचें पद व त्यांचा सरंजाम पेशव्यांना कायदेशीर रीतीनें

कांढून घेतां येण्यासारखा नव्हता. त्यावर छत्रपतीचा शिक्कामोर्तब चालू राज्य-कारभाराच्या पद्धतीप्रमाणें व्हावयास पाहिजे होता. म्हणून भोसल्यांनीं प्रतिनिधींची कैदेंतून मुक्तता करवून त्यांना पुण्यास आणविण्याची खटपट चालविली. 'त्यावेळीं रघूजी भोंसले वगैरे मंडळीच्या आग्रहावरून पेशव्यानें उभयतांस (दादोबा प्रतिनिधि व यमाजी शिवदेव) बंधमुक्त केलें.' [ म. रि. म. वि. भाग पृष्ठ २४६ ] आणि त्यांना पुण्यास आणलें. पेशव्यांच्या मनांत दादोबाचा पूर्ण नाश करावयाचाच होता. साताऱ्याच्या पूर्वेकडील बराचसा प्रदेश प्रतिनिधींच्या हातांत असल्यामुळें साताऱ्यास छत्रपतींच्या कारभारावर प्रतितिधींचा ताबा राहत असे; परंतु त्यामुळें आतां पेशव्यांच्या सर्वाधिकाराला ही पूर्वीची योजना बाधक वाटूं लागली म्हणून तो प्रदेश प्रतिनिधींकडून कांढून घेण्याचा पेशव्यानें मनसबा रचला. दादोबा पुण्यास आल्यावर त्यांच्या या प्रदेशाबद्दल वाटाघाट सुरू झाली व तो आपल्या ताब्यांत देण्याबद्दल पेशव्यांनीं मागणी केली. या वेळीं दादो-बांना जरी लोकदृष्टीनें बंधमुक्त केलें होतें तरी ते पेशव्यांच्या नजरकैदेंतच होते. प्रतिनिधि आपला प्रदेश सोडण्यास तयार नव्हते. ते या वेळीं असहाय्य असल्यामुळें त्यांनीं वरवर होय होय म्हटलें. परंतु ते आपला प्रदेश पेशव्यांच्या ताब्यांत देण्यास नाखूष होते. पेशव्यांनीं त्याबद्दल निकड लावल्यामुळें दादोबा प्रतिनिधींचा मुतालिक यमाजी शिवदेव तो प्रदेश पेशव्यांच्या ताब्यांत देण्याच्या निमित्तानें सांगोलें व मंगळवेढें इकडे केला. पेशव्यांनीं दादोबाला मात्र पुरंदर किल्यावर कैदेंतच ठेविलें.

नानासाहेब पेशव्यांनीं छत्रपतींचा व प्रतिनिधींचा आपल्यावरील अधि-कार झुगारून देऊन मराठी राज्याचे एकमेव मुखत्यार आपणच बनण्याकरतां पुढें काय करावयाचे याची योजना आंखून ठेवली होती. ती योजना पार पाडण्याकरितां ताराबाईचा विरोध उत्पन्न होईल ह्मणून त्यांच्या परोक्ष सर्व गोष्टी घडवून आणाव्या असा मनसुबा त्यांनीं ठरविला. त्याचप्रमाणें दादोबा यासही प्रतिनिधिपदावरून दूर करून आपल्या पक्षाच्या भवानरावाला तें पद कायम करावें असेंही त्यांनीं ठरविलें होतें. दादोबा प्रतिनिधि हे सकवार-

बाईंच्या पक्षाचे असल्यामुळें त्यांचें पारिपत्य झाल्यास त्यास ताराबाईंचा विरोध उत्पन्न होणार नाहीं असें पेशव्यांना वाटत होतें. रामराजे तारीख १४ आगष्ट रोजीं पुण्यास आले. त्यांनीं ताराबाईंचें समाधान केलें. याचा भावार्थ एवढाच कीं, पेशव्यांनीं ताराबाईंना सिंहगडावरून पुण्याला मोठ्या आग्रहानें जें आणलें तें 'तुह्मांला राज्यकारभारांतील बहुत कामें मिळतील' याच आश्वासनावर पेशव्यांनीं रामराजे यांच्या मुखें ताराबाईंची खातरजमा केली असावी व त्यामुळें त्यांचें समाधान झालें असावें असें दिसतें. यावेळीं 'तुमच्या आज्ञे-प्रमाणें आपण वागूं असें पेशव्यांनीं ताराबाईजवळ कबूल केलें. तेव्हांच शाहू-महाराजांनीं पेशव्यांस दिलेली राज्याच्या वडीलकीची सनद बाईंनीं मान्य केली. ( खरेकृत इचलकरंजी संस्थानचा इतिहास पृ. ७० ) ताराबाईंचें समाधान होण्यास हें मुख्य कारण होतें. 'यानंतर आईसाहेब यांचें समाधान करून सातारियास जावें, प्रतिनिधि कैद जाले, सांगोले, मंगळवेढें हीं ठाणीं त्यांजकडोन बदलोन राहिलीं तीं घ्यावीं ऐसें ठरोन, महाराजांची स्वारी सातारां जावी ऐसें ठरोन, स्वारी निघाली.' [ धाकटे रामराजे यांचें चरित्र पृ. ४ ] तारीख २२ ऑगष्ट रोजीं पुण्याहून रामराजे यांची स्वारी साताऱ्यास निघाली. रामराजे यांचा मुक्काम पुण्यास फक्त आठ दिवस झाला. त्यांचेबरोबर नाना-साहेब पेशव्यांनीं सदाशिवराव भाऊ यांना दिलें होतें. सदाशिवराव भाऊंनीं रामचंद्र मल्हार ह्मणजे रामचंद्र बाबा यांना शहाणे व कर्ते ह्मणून बरोबर घेतलें. त्याचप्रमाणें गोविंदराव चिटणीस व यशवंतराव पोतनीस वगैरे हुजूरचे कारभारी आणि त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यांसहि समागमें स्वारी बरोबर घेतलें. 'रघोजी भोंसले, व सरलष्कर व सरंजामी पथके व हुजुरात, पंत यांजकडील जयाजी शिंदे व मल्हारजी होळकर [ शिंदे होळकर यापूर्वींच स्वदेशीं निघून गेल्यामुळें त्यांचीं पथकें या स्वारींत असावीं ] याप्रमाणें साठ हजार फौज बरोबर निघाली.' [ धा. रा. यांचे च. पृ. ६ ] नानासाहेब पेशवे हिंदुस्थानांत स्वारी करण्याचा मनसुबा ठरविण्याकरतां पुण्यास राहिले. ताराबाईनाही याकरितां व दुसऱ्या राज्यकारभाराच्या व्यवस्थेकरितां ह्मणून पुण्यास

पेशव्यांनीं ठेऊन घेतलें. रामराजे यांची स्वारी अशा थाटाच्या लवाजम्याविशीं पुण्याहून निघून श्रीजेजुरी, मोरेश्वर करून श्रीपंढरीस देवदर्शनास गेली. तेथून निघून रामराजे यांनीं सांगोल्यास येऊन मुक्काम केला.

**५. सांगोल्याचें कारस्थान व रामराजे यांचा राजीनामाः-** यमाजी शिवदव यानें प्रतिनिधीचा मुलूख पेशव्यांच्या ताब्यांत देतों असा बहाणा करून सांगोल्याकडे गेला हें पूर्वीं आलेंच आहे. तो सांगोल्यास येऊन त्यानें सांगोलें व मंगळवेढें हीं दोन ठाणीं पेशव्यांशीं लढण्याकरतां सज्ज केलीं होतीं. ' सोलापूरच्या पश्चिमेस पंढरपूर, सांगोलें व मंगळवेढें या तिहींचा त्रिकोण बनलेला असून, पंढरपुराहून सातान्यास येण्याच्या हमरस्त्यावर नजीकच सांगोलें असल्यामुळें, तें काबीज करण्याचा निश्चय सदाशिवरावानें केला. सचिवाच्या सिंहगडासारखाच हा प्रकार होता. उलटपक्षीं प्रतिनिधीच्या तर्फेनें भांडून रामराजास आपल्या कबजांत घेतल्यानें पेशवा उघडा पडेल, असा यमाजीला घाट होता. परंतु सदाशिवरावानें मोठ्या धूर्ततेनें वागून आपला डाव सिद्धीस गेला. सांगोल्याची गढी यमाजीनें आठपंधरा दिवस लढविली. सदाशिवरावानें मोर्चे देऊन ठाणें काबीज केलें. दसऱ्याचे दिवशीं [ २९ सप्टेंबर ] यमाजी शिवदेव बाहेर येऊन भेटले. दादोबा पुरंदरावर कैदेंत आहे, त्यास सोडवून आणावें, अशी मागणी यमाजीनें केली. त्याप्रमाणें पुण्यास लिहून दादोबास पुरंदरावरून मुक्त केलें. ह्यापूर्वीच म्हणजे ता. २५ सप्टेंबर रोजीं सदाशिवरावानें सांगोलें येथें भवानरावास आणून त्यास प्रतिनिधिपदावर कायम केलें होतें. नंतर दादोबास आणून त्याचेमार्फत सदाशिवरावानें सांगोल्याचें ठाणें हस्तगत केलें; आणि तें महाराजांच्या खासगीकडे घेऊन गणोजी मोहिते यांच्या ताब्यांत दिलें. मंगळवेढ्याचें ठाणेंहि त्यानें त्याचवेळीं हस्तगत केलें; इतका उद्योग केल्यास सांगोल्यास महिनाभर मुक्काम करून पुढील कारभाराची व्यवस्था व सरदारांचे ठराव रामचंद्र मल्हाराच्या विद्यमानें सदाशिवरावानें महाराजांपासून लेखी करून घेतले. सातान्यास अनेकांची भीड पडेल; आणि ताराबाई तेथें आल्यास त्या कामास हरकत येईल,

सबब मुद्दामच ही व्यवस्था सांगोल्यास बसून करण्यांत आली. (म. रि. म. वि. भाग २ पृ. २४७)

सदाशिवराव भाऊंनीं रामराजे यांच्याकडून सांगोलें मुक्कामीं जी व्यवस्था करून घेतली ती येणेंप्रमाणें. (१) भवानरावास राज्याभिषेकसमयीं प्रतिनिधि पदावर आणलें होतें, त्यास कायम करून यमाजी शिवदेव याचा पुतण्या वासुदेव यास त्याचा मुतालिक नेमिलें. (२) दाभाडे सेनापति नाकर्ते बेहोष जाहले. त्यांचा अंमल गुजराथेंत बरोबर चालत नाहीं म्हणून त्यांस खर्चापुरती रक्कम गायकवाडांनीं देण्याचें ठरवून गुजराथप्रांत निम्मा पेशवे व निम्मा गायकवाड यांनीं वांटून घेण्याचा करार झाला. (३) कर्नाटकचा सुभा बाबूजी नायकाकडे होता, तो ज्यास्ती रसद कबूल करून पेशव्यांनीं स्वतःकडे घेतला. (४) रघोजी भोंसले यांस वराड, गोंडवण व बंगाल याची सनद आणि प्रतिनिधींची जहागीर वराड प्रांताला लागून होती तीहि करार करून दिली. (५) गोविंदराव चिटणीस यांनीं महाराजांपाशीं राहून पंतप्रधानांचे अनुमतानें कारभार करावा. बापूजी खंडेरावांनीं फौजेसह महाराजांपाशीं रहावें. त्याजबद्दल प्रतिनिधीकडील कांहीं मुलूख व इतर मिळून चार लक्षांचा सरंजाम हे दोघे चिटणीस व त्यांचा पुतण्या रामराव जिवाजी या तिघांच्या नांवें करून दिला. (६) यशवंतराव पोतनीस यांस अठरा कारखाने व खासगी कारभार सांगून पोतनिशी आणि चाळीस हजारांचा सरंजाम नेमून दिला. (७) देवराव लपाटे यांस हुजूर खासगीचें काम व तालुके त्यांजे त्यांजकडे करार करून दिले. (८) हुजूरचे खर्चास पूर्वी अष्टप्रधानांकडून व सरदार मामलेदारांकडून नेमणुकी प्रमाणें सालाबाद पाठवावा. त्याच्या वराता हुजूरून करून ऐवज मागवून घ्यावा. (कोणी काय ऐवज द्यावयाचा याची तपशिलवार यादी धाकटे रामराजे यांचे चरित्र पृ. ७ वर दिलेली आहे) त्याचप्रमाणें हुजूर खासगीचे कारखानदार लोक, शागिर्दपेशाचे लोक, जिलिबीचे लोक यांच्या तैनाता व नेमणुका ज्या ज्या कमी जास्त करावयाच्या होत्या त्या त्या करून त्यांजकडे गांव जमिनी होत्या तेच त्यांचकडे करार करून दिले. हवालदार, दरखदार, गडकरी वगैरेंचे

हुजूरून जे करार करावयाचे तेहि तसे करावे असें ठरलें. हुजूर खासगीस ऐवज खासगीचे खर्चाकडे व किल्ले वगैरे ठेविले. (ग्रां. ड. म्हणतात ही सर्व व्यवस्था पुणें येथें बाळाजी बाजीराव यांणीं केली. बखरीचा आभिप्राय सदाशिवराव यांणीं सांगोलें येथें हा सर्व कारभार केला. यावरून असें दिसतें कीं सदाशिवराव व त्यांचे दिवाणजी रामचंद्र बाबा यांच्यामार्फत सर्व बोलणीं चालणीं सांगोल्यास होऊन तेथेंच ठराव कायम झाले खरें, परंतु हें सर्व काम बाळाजी बाजीरावाच्या सांगण्याप्रमाणें त्यांणीं केलें.) त्याचप्रमाणें सांगोल्यास अष्टप्रधानांच्या नेमणुकाही खालीं दिल्याप्रमाणें झाल्या. [१] प्रधान-बाळाजीपंत. [२] प्रतिनिधि-भवानराव गंगाधर. [३] सेनापति व सेनाखासखेल-त्रिंबकराव दाभाडे. [४] न्यायाधीश-खंडेराव काशी मुतालिक गोविंद मल्हार. [५] पंडितराव-धोंडभट उपाध्ये. [६] मंत्री-घनश्याम नारायण. [७] सचिव-चिमणाजी नारायण. [८] अमात्य-भगवंतराव रामचंद्र. [९] सुमंत-विठ्ठलराव आनंदराव. याशिवाय इतर मुख्य नेमणुका झाल्या त्या अशाः— (१) चिटणीस-रामराव जिवाजी. काम गोविंदराव पहात असे. (२) खासनीस व पोतनीस-यशवंत महादेव. (३) सरखेल-तुळाजी आंग्रे. (४) राजाज्ञा-भवानी शंकर. (५) वजारतमाब-मानाजी आंग्रे. (६) सरलष्कर- निंबाजी नाईक निंबाळकर. याशिवाय बाबूजी नाईक, यमाजी शिवदेव, दाभाडे, यांच्या संबंधानें व गुजराथ कर्नाकट संबंधानेंही सांगोल्यास वाटाघाटी झाल्या असें का. सं. प. या. ले. १७४ व १८४ वरून दिसतें. तसेंच सन १७३९ त मिरजेचें ठाणें मोंगलांकडून काबीज करण्यांत आल्यावर तें धुळगांवचे साळुंके उर्फ डुबल बाळोजी बिन शिवाजी याजकडे देण्यांत आलें होतें. हा साळुंके सकवारबाईचा आप्त असून पटवर्धनांचे पदरीं होता. सांगोल्याचे स्वारींत मिरजेचें ठाणें डुबल याजकडून काढून तें शिवाजी बल्लाळ जोशी याजकडे देण्यांत आलें. (म. रि. म. वि. २ पृ. २५०—५१).

याप्रमाणें नानासाहेब पेशव्यांनीं सांगोल्यास आपण हजर न राहतां सदाशिवरावभाऊ यांच्याकरवीं ताराबाईना या राज्यकारभाराची गंधवार्ता लागूं न देतां आपल्या इच्छेप्रमाणें व आपल्या पक्षाच्या संवर्धनाच्या दृष्टीनें

राज्यकारभाराच्या सर्व नवीन घडामोडी रामराजे यांचा नवीन शिक्का चालू करून शिक्कामोर्तब करून घेतल्या. तुमच्या आज्ञेप्रमाणें आपण वागूं असें पेशव्यांनीं ताराबाई जवळ कबूल केलें असतां त्यांच्याविरुद्ध हें पाताळयंत्री कारस्थान करून त्यांचा सर्वस्वी पेशव्यांनी विश्वासघात केला हें उघड आहे. वरील राज्यकारभारांतील कलमें लक्षपूर्वक इतिहासाच्या संगतीला धरून वाचलीं म्हणजे ताराबाईचा पक्ष नेस्तनाबूद करण्याकरतां व मराठी राज्य अपहार करण्याकरतां पेशव्यांनीं हें कारस्थान केलें हें स्पष्ट दिसतें. या कारस्थानाची मजल वरील राज्यकारभारापुरतीच मर्यादित झालेली नाहीं. त्याचा विस्तार याही पलिकडे होता. तो प्रकार वरील पाताळयंत्री कारस्थानांतील कारस्थान या स्वरुपाचा होता. वरील राज्यव्यवस्थेचें काम आटोपल्यानंतर सदाशिवरावभाऊनीं रामराजे यांचेकडून ' सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा आणि आपणास साताऱ्याभोंवता थोडकासा मुलूख खासगीकडे असावा. ' असें पत्र लिहून घेतलें. ( श्री. ड. मराठ्यांची बखर आवृत्ति ६ पृ. १८० ) हें पत्र म्हणजे रामराजे यांच्याकडून पेशव्यांनीं घेतलेला मराठी राज्याचा राजिनामाच होय.

६ **हिंदुपद्पातशाही केव्हां बुडाली:**— या बाबतींत ' खून कीं आत्महत्या 'कारांनीं आपल्या ग्रंथाच्या पृष्ठ ४५-४६ वर पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. ' छत्रपतीचे सर्व अधिकार पेशव्यांनीं कपटानें गिळंकृत केले असें ह्मणणारा एक पक्ष आहे. त्या पक्षाचें चातुर्यानें खंडन करणारा दुसरा पक्ष आहे. 'ज्यांच्या हातांत ससा तो पारधी' या न्यायानें वागणारा दुसरा पक्ष असला तरीं त्या बाबतींत जास्त विचार करण्याचें कारण नाहीं. तात्विक दृष्टीनें दोष कोणामध्यें आहे तो निःपक्षपातानें पहाणें असेल तर छत्रपतींची सर्व सत्ता लुबाडण्याच्या आरोपांतून नानासाहेब पेशवे कधींच शीरसलामत बाहेर पडूं शकत नाहींत. पेशव्यांनीं मराठी राज्याच्या हितापेक्षां स्वार्थाकडे विशेष लक्ष दिलें असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. पेशवे आपल्या कर्तव्याला जागले असें इतिहासकारांनीं एकमतानें ह्मणावें अशी जर नानासाहेब

पेशव्यांनीं इच्छा धरली असती तर त्यांना कोणत्याहि प्रसंगांतून योग्य मार्ग काढतां आला असता. सांगोल्याला रामराजांना नेऊन त्यांच्याकडून राजीनामा लिहून न घेतां त्यांना त्यांनीं पुण्यास ताराबाईंचा उपसर्ग न पोंचेल अशा बंदोबस्तानें ठेवावयाचें होतें. मराठी राज्याचें कल्याण छत्रपतिपद कायम ठेवण्यांत होतें, तें लाथाडून देण्यांत नव्हतें खास! देवळांतील देव उकीरड्यावर फेंकून दिल्यानें पुजाऱ्यांचें महत्व वाढत नसतें. देवाचें रक्षण करूनच पुजाऱ्याला आपलें आस्तित्व दाखवावें लागतें. पण हा साधा मानवी धर्म नानासाहेबांनीं न स्वीकारतां त्यांनीं आसुरी कपटनीति अंगिकारली. देवाला फेंकून दिलें पुजारी देव बनला. तेव्हां पुजाऱ्याच्या ठिकाणीं दुसरा पुजारी आला. त्या पुजाऱ्यानें पहिल्या पुजाऱ्याला फेंकून दिलें. शेवटीं देव गेला, देऊळ गेलें, पुजारी आटोपले आणि सर्वांचा नाश झाला. क्रांति ही पहिल्यानें तत्वांत होत असते. तत्व हा पाया असतो. एकदां तत्व लाथाडून दिलें ह्मणजे सर्वस्वाचा नाश व्हावयाला विलंब लागत नाहीं. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं हिंदुधर्माचें गो-ब्राह्मण प्रतिपालकत्व हें रहस्यमय तत्व अंगिकारून हिंदुपद्पादशाहीची स्थापना केली. शस्त्रधारी क्षत्रियांनीं राजदंड हातीं धरला. शास्त्र ब्राह्मणांच्या हातीं दिलें. गोब्राह्मण पालकत्वाला क्षत्रियांच्या तीव्रतर समशेरीचें कुंपण घातलें. परंतु ज्याचें क्षत्रियांनीं रक्षण करावयाचें त्यांनींच संरक्षक कुंपाला खाऊन टाकल्यानंतर ह्मणजे मूलतः हिंदुपद्पादशाहीचें तत्वच उपटून टाकल्यानंतर पुढें सर्वस्वाचा नाश झाला यांत कोणतें नवल! इतिहासकार मराठी राज्य १८१८ मध्यें बुडालें असें समजतात, परंतु जें राज्य छत्रपति शिवाजीमहाराजांनीं इ. स. १६७४ मध्यें स्थापिलें तें तात्विक दृष्टीनें इ. स. १७५० मध्यें सांगोलें मुक्कामीं बुडालें असेंच ह्मणणें जास्त खरें आहे.

——

# प्रकरण १४ वें

## ताराबाईपुढें पेशव्यांची शरणागति.

१ ताराबाईच्या संरक्षणाखालीं रामराजे यांचें वास्तव्य. २ रामचंद्रबाबांची खरी मुत्सद्देगिरी व त्यावर पेशव्यांची तोड. ३ ताराबाईंचें पवित्र कर्तव्य. ४ दमाजी गायकवाड व पेशवे यांचा संग्राम. ५ पेशव्यांकडून दमाजीचा विश्वास घात. ६ दाभाडे व गायकवाड यांची थोर मनोवृत्ति. ७ चाकरानें धन्यास वेढ्यांत अडकविलें. ८ रामराजे यांचा तोतया. ९ ताराबाईशीं पेशव्यांचा तह. १० तहाची फलश्रुति म्हणजे पेशव्यांची शरणागति. ११ ताराबाईचे खरे श्रमसाहस होते उपद्व्याप नव्हते.

**१. ताराबाईच्या संरक्षणाखालीं रामराजे यांचें वास्तव्यः-** मागील प्रकरणीं सांगीतलें मुक्कामीं राज्यव्यवस्था ताराबाईच्यापरोक्ष करण्यांत आली त्याचा थोडाबहुत सुगावा त्यांना पुण्यास लागल्यामुळें पेशवे विश्वास-घातानें मराठीराज्य अपाहार करीत आहेत अशी शंका त्यांना आली. त्यानीं तारीख १५ व २० सप्टेंबरास सातारा किल्ल्यावरील हवालदार शेखमिरा यास दोन पत्रें पाठविलीं. त्यांत किल्ल्यावरील दारू वावगी खर्च न करण्याबद्दल व लोकांस ताकीद करून वाड्यांत रात्रंदिवस चौकीपहारा करून खबरदार राहण्या-बद्दल आज्ञा केलेली आहे. ( खं. ३ ले. ७१ व ७३ ) याप्रमाणें साताऱ्याचा बंदोबस्त पूर्वीच करून शंभु महादेवाचे दर्शनाला जाण्याच्या निमित्तानें तारा-बाई पुणें सोडून निघाल्या व त्या साताऱ्यास येऊन पोंचल्या. त्यांनीं किल्ल्यावरील हवालदार, सुभेदार, कारखानीस व इतर लोक यांजकडून आपणास मदत करण्याबद्दल शपथा घेवविल्या; बक्षिसें देऊन त्यांना आपलेंसें

करून घेतलें; आणि दोनहि राण्या व नाती वगैरे घेऊन त्यांसह किल्ल्यावर बंदोबस्तानें राहूं लागल्या. नंतर रामराजे शिंगणापूर महादेव करून फौजेसह कार्तिक अखेर म्हणजे ता. १७ नोव्हेंबरचे सुमारास साताऱ्यास आले. त्यांचे बरोबर गोविंदराव बापूजी चिटणीस व त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे हे प्रमुख गृहस्थ होते. महाराजांचा मुक्काम शाहुनगरच्या वाड्यांत किल्ल्याखालीं झाला. त्यांनीं मातुश्री ताराबाईस दाबून सर्व बंदोबस्त करावा असें प्रधानांचें मानस होतें. उलटपक्षीं ताराबाईचा हेतु रामराजानें पेशव्यास दाबून आपल्या-विचारें कारभार करावा असा होता. [ ना. पे. च. पृ. ९६ ] परंतु रामराजे हे सांप्रत पेशव्यांच्या पक्षांतील कारभाऱ्यांच्या ताब्यांत असल्यानें ताराबाईच्या मनसुब्यास जोर येईना म्हणून त्यांनीं रामराजे यांना आपल्या कबजांत घेण्याचा प्रयत्न चालविला. रामराजे यांनीं ताराबाईना किल्ल्याखालीं आणवून त्यांचें समाधान करावें म्हणून किल्ल्यावर मध्यस्थ पाठविले; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं आपणच किल्ल्यावर जाऊन त्यांची समजूत घालून त्यांना किल्ल्याखालीं आणावें असें मनांत आणून ता. २३ नोव्हेंबर रोजीं ते त्यांच्या भेटीकरतां किल्ल्यावर गेले. त्यांनीं आपल्याबरोबर शागिर्द लोक व बापूजी खंडेराव चिटणीस यांचे लोक बरोबर घेतले होते. ताराबाईनीं रामराजे यांची एकांतीं भेट घेऊन पुष्कळ प्रकारें त्यांना बुद्धिवाद सांगितला; त्यांची निर्भत्सना करून यापुढें तरी पेशव्यास दाबून कारभार करावा असें त्यांना सांगितलें. तें रामराजांना मानवलें नाहीं. तेव्हां निरोप घेऊन खालीं येतांना किल्लेकरी वगैरे लोकांचा फितुरीचा विचार पाहून बापूजी खंडेराव सावध होऊन पालखी समोंवार त्यांनीं आपले लोक गराडा देऊन उभे केले व दरवाज्यावर किल्लेदार वगैरे जमा झाले असतां दाबून महा-राजांसह वर्तमान किल्याखालीं उतरले. नंतर दुसऱ्याच दिवशीं चंपाषष्ठी असल्यानें ताराबाईनीं रामराजांकडे माणसें पाठवून किल्यावर पारण्याच्या भोजनाला यावें असा निरोप पाठविला. त्यावेळीं बापूजी खंडेराव चिटणीस वगैरे मंडळींनीं 'मातुश्रींचा कारभार ठीक दिसत नाहीं, दुर्बुद्धि धरिली आहे,

जावयाचें नाहीं.' असें सांगितलें; परंतु रामराजे यांनीं 'कोणी लोक व बापूजी खंडेराव बराबर न घेतां व कोणासही कळूं न देतां' [धा. रा. च. पृ. ११] अकस्मात् एकटेच किल्ल्यावर निघून गेले. पारण्याचें भोजन आटोपल्यानंतर बापूजी खंडेराव आपल्या जमावानिशीं रामराजे यांना शहरांत नेण्याकरतां किल्ल्याच्या दरवाजाजवळ आले. तेथेंच त्यांना अटकाव करण्यांत आला. किल्ल्याचा दरवाजा बंद केला व 'त्यांस खालीं उतरोन जावें, नाहीं तरि धोंडी लोटूं व गोळ्या घालूं असें सांगितलें. तेव्हां ते खालीं उतरले.' ताराबाईनीं रामराजांना किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तानें आपल्या संरक्षणाखालीं ठेवलें. ताराबाईनीं रामराजांना त्यांच्या मर्जीविरुद्ध प्रतिबंधांत ठेवलें असा जो प्रवाद आहे तो धादांत खोटा आहे. तो प्रवाद ताराबाईच्या विरुद्ध पक्षाकडून उत्पन्न झालेला आहे. रामराजे यांनीं पहिल्या दिवशीं ताराबाईची भेट घेतली व त्या वेळीं त्यांनीं त्यांना ज्या बोधाच्या गोष्टी सांगितल्या त्यावरून भोंसले घराण्याच्या कीर्तीला बट्टा लागेल असें वर्तन आपल्या हातून घडलें असें त्यांना वाटलें असेल यांत शंका नाहीं. परंतु त्या वेळीं ते पेशव्यांच्या पंजाखालीं सांपडले होते. तेव्हां इतःपर ती चूक न व्हावी म्हणून त्यांनीं त्याचवेळीं किल्ल्यावर राहण्याचा संकल्प केला. परंतु त्या वेळीं बापूजी खंडेराव यांचे लोक, शागिर्द पेशाचे लोक बरोबर असल्यानें याचवेळीं किल्ल्यावर राहिल्यास कटकटी उत्पन्न होऊन विनाकारण आपसांत रक्तपात होईल याकरतां ते त्या दिवशीं खालीं गेले व दुसऱ्या दिवशीं कारभाऱ्याच्या विरुद्ध एकटेंच कोणाला कळूं न देतां किल्ल्यावर निघून आले. या प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टीवरून ते विचारपूर्वक व स्वसंतोषानें किल्ल्यावर गेले असें ठरतें. कारभाऱ्यांचा ताबा झुगारून देण्याकरतां त्यांना त्या बाबतींत कांहीं गोष्टी बाह्यात्कारी दाखवाव्या लागल्या असतील यांत संशय नाहीं; परंतु अंतर्यामीं ते ताराबाईच्याच आज्ञेत व लोभांत होते. ते किल्ल्यावर जाऊन राहिल्यानंतर ताराबाईच्या प्रतिबंधांतून मुक्त व्हावें असा त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. उलट त्यांना ताराबाईच्या ताब्यांतून आपल्या ताब्यांत घेण्याबद्दल कारभाऱ्यांचे प्रयत्न झाले तरी रामराजांनीं कोण-

तीच धडपड केली नाहीं त्या अर्थी ताराबाईंच्या संरक्षणाखालीं ते जास्त संतुष्ट होते असेंच ठरतें. या गोष्टी लक्षांत घेतल्या ह्मणजे वरील प्रवाद कसा खोटा आहे हें लक्षांत येईल. पेशव्यांनीं रामराजे यांना बाजूला काढून ताराबाईंच्या विरुद्ध कारस्थान जरी सुरू केलें होतें तरी पाण्यावर काठी मारल्यांनें तें जसें क्षणमात्र दुभंगतें पण तें लगेंच एक होतें तसेंच रामराजे थोड्याच कालापुरते पेशव्यांच्या पंजाखालीं सांपडले पण शेवटीं पश्चात्ताप होऊन ताराबाईंना येऊन कायमचे मिळाले. रक्ताचा धर्म असाच असतो.

**२ रामचंद्र बाबांची खरी मुत्सद्देगिरी व त्यावर पेशव्यांची तोडः**—धन्याला वरिष्ठ चाकरान लुबाडण्याला सुरवात केली ह्मणजे त्याच्या हाताखालचेही चाकर त्याला लुबाडण्याला सुरवात करतात. तसेंच धन्याची सत्ता झुगारून देऊन वरिष्ठ चाकर स्वतंत्र होऊं लागला ह्मणजे त्याच्याही हाताखालचे चाकर स्वतंत्र होण्याकरितां धडपड करूं लागतात. धनी-रामराजे यांना लुबाडून त्यांची सत्ता अपहार करण्याचा प्रयत्न वरिष्ठ चाकर-नानासाहेब पेशवे करूं लागल्याबरोबर इतरांच्याही तोंडाला पाणी सुटूं लागले. सेनापति दाभाडे यांच्याकडील गुजराथ प्रांत नानासाहेबांनीं निम्मा आपल्याकडे घेतल्याबरोबर रघोजी भोंसले यांना वऱ्हाडांतील प्रतिनिधींच्या जहागिरीची लालसा उत्पन्न झाली. त्याकरतां तो मुलूख त्यांना द्यावा लागला. चिटणीसांनाही प्रतिनिधींच्या मुलुखाची खैरात वांटण्यांत आली. त्याचप्रमाणें बाबूजी नाईक बारामतीकर यांना प्रतिनिधीप्रमाणें जमीनदोस्त करण्याचा नानासाहेबांनीं शाहूराजे यांच्या वेळेपासून विडा उचललेला होता. तेव्हां त्यांच्याकडे असलेला कर्नाटकचा सुभा आपण स्वतः गिळंकृत करावा अशी नानासाहेबांना इच्छा झाली. परंतु लोकदृष्टीला तें एकदम अनुचित न दिसावें ह्मणून जास्त रसद वाढवून छत्रपतींचें आपण कल्याण केलें अशा बहाण्यानें त्यांनीं मनसुबा रचला व ही कामगिरी इतर कामगिरीबरोबर सांगोल्यास पार पाडून घेण्याची आज्ञा नानासाहेबांनीं सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा यांना केली. यावेळीं नानासाहेबांच्या योजनेप्रमाणें सर्व राज्यव्यवस्थेच्या कामाचा

उलगडा झाल्यानंतर रामराजे यांचेकडून छत्रपतीच्या अधिकारांचें उदक त्यांना आपल्या हातावर सोडून घ्यावयाचें निश्चित ठरल्यामुळें ही पर्वणी नंतर येणार नाहीं याची पूर्ण कल्पना सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा यांना होती. यावेळीं सदाशिवरावभाऊ यांचें वय वीस वर्षांचें होतें. शाहूराजे यांनीं नानासाहेबांना पेशवेपदाचीं वस्त्रें दिलीं त्यावेळीं सदाशिवरावभाऊ अल्पवयी असल्यामुळें पेशव्यांचे कारभारी किंवा दुय्यम पेशव्याचें काम चिमाजी आपा हयात असेंपर्यंत त्यांनीं केलें. नंतर त्या कामावर नानासाहेबांनीं आपल्या वतीनें महादाजीपंत पुरंदरे यांची नेमणूक करून घेतली. सन १७४६ मध्यें शाहूमहाराजांनीं दुय्यम पेशव्याचीं वस्त्रें सदाशिवरावभाऊंना दिलीं. व त्यांस सातान्याहून पुण्यास पाठवून दिलें. त्या वेळीं नानासाहेबांची पत्नी गोपिकाबाई यांना सदाशिवरावभाऊ हे पेशव्यांचे कारभारी झाले ही गोष्ट मानवली नाहीं. "असे भाऊबंद जवळ आणून आपले पोरास ठिकाण नाहीं असें करतील" (पे. ब. पृ. ४८) असें त्या नानासाहेबांस ह्मणाल्या. त्यांनीं आपल्या पत्नीची ही सूचना लक्षांत ठेवली व त्याप्रमाणें सदाशिवरावभाऊ यांचा त्यांनीं राज्यकारभारांत कोठेंच हात शिरूं दिला नाहीं. "भोजन करून पंक्तीस होते. कामकाज कांहीं नाहीं. पंक्तीस जेवावें व दसरांत लिहावें." अशा स्थितींत त्यांना नानासाहेबांनीं ठेवलें. सर्व कारभार महादजीपंतांकडून नानासाहेब घेत होते. त्यामुळें सदाशिवरावभाऊंना आपली स्थिति अपमानकारक वाटत होती. रामचंद्रबाबांचा लोभ सदाशिवरावभाऊ यांच्यावर फार होता. त्यांनाही सदाशिवरावभाऊसारखा कर्तृत्ववान तरुण पुरुष निर्माल्यवत् पडून राहणें इष्ट वाटत नव्हतें. त्यांना पुढें आणण्याची संधि ते पहात होते. त्यांच्या दैवयोगानें ही सांगोल्याची पर्वणी चालून आलेली होती. त्या खैरात-गंगाप्रवाहांत सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा यांनीं हात धुवून घेण्याचा मनसुबा ठरविला; व नानासाहेबांच्या सांगोल्याच्या राज्यव्यवस्थेच्या कटांत नवीन गुप्त कट त्यांनीं निर्माण केला.

'ही सर्व व्यवस्था ठरवून देण्यांत सदाशिवरावास मुख्यत्वें रामचंद्र-

बाबाचें साह्य होतें. गोविंदराव चिटणीस रामराजाबरोबर सांगोल्यास होता. तरी त्याचा हात या व्यवस्थेंत नसावा. पेशव्यांचे सातारचे कारभारी महादोबा पुरंदरे यांचें व गोविंदरावांचें जूट असून त्यांचा ओढा छत्रपतीकडे होता व ताराबाईशींही ते सेवकधर्मानें वागत. पेशव्यांचा कारभार सदाशिवरावाकडे यावयाचा तर जुना कारभारी महादोबा पुरंदरे यास काढून टाकणें जरूर होतें. पुरंदरे हे छत्रपतींशीं अनुरक्त पण पेशव्यांचे इतबारी नोकर होते. त्यांचें व रामचंद्रबाबांचें सख्य होतें. रामचंद्रबाबांचा हेतु ताराबाईच्या कलानें वागून सदाशिवरावानें साताऱ्यास आपलें स्वतंत्र बस्तान बसवावें असा असावा.' (सरदेसाईकृत नानासाहेब पेशवे यांचें चरित्र पृ. ९६–९७) या वरील रियासतकारांच्या माहितीप्रमाणें व अनुमानाप्रमाणें रामचंद्रबाबा, सदाशिवराव भाऊ, गोविंदराव चिटणीस व महादोबा पुरंदरे हे एकमताचे होते असें ठरतें. यांनाही आपापलें स्थान नवीन राज्यव्यवस्थेंत स्थिर करून घ्यावयाचें होतें. त्यांत रामचंद्रबाबा हें प्रमुख होते. रामराजे यांचा राजिनामा घेऊन त्यांना निर्माल्यवत् करण्याचा नानासाहेबांचा मनसुबा गोविंदराव चिटणीस व महादोबा पुरंदरे यांना माहीत नव्हता. तो फक्त रामचंद्रबाबा व सदाशिवराव भाऊ यांनाच माहीत होता. ही नानासाहेबांची कामगिरी या उभयतांना बिनबोभाट पार पाडणें अवश्य होतें. ते त्यांचे इतबारी सेवक होते. नानासाहेबांचे हातीं छत्रपतीचे सर्व अधिकार आल्यानंतर त्यांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रसंग या मंडळींना येणार होता. तेव्हां नानासाहेबांची आज्ञा तर पाळावयाची पण ती पाळल्यामुळें जे अनर्थ ओढवतील ते न होऊं देण्याची खबरदारी घ्यावयाची असा नवीन मनसुबा रामचंद्रबाबांना या वेळीं रचणें प्राप्त झालें, आणि त्याप्रमाणें त्यांनीं सांगोल्यास नवीन राज्यव्यवस्थेंत कामगिरी घडवून आणली. ज्या त्यांच्या कामगिरीमुळें नानासाहेब पेशव्यांच्या पायाची आग मस्तकाला चढली ती पुढें दिल्याप्रमाणें होती.

नानासाहेब पेशव्यांनीं कर्नाटकचा सुभा बाबूजी नाईकांकडून काढून आपल्याकडे घ्यावा अशी आज्ञा रामचंद्रबाबांना दिलेली होती. त्यांनीं राज्याचें

व राजाचें हित सांभाळून जुन्या कारभाऱ्यांची योग्य व्यवस्था लावण्याकरतां सांगोल्यास जो मनसुबा केला त्या दृष्टीनें नानासाहेबांच्या आज्ञेंत त्यांना थोडा फरक करावा लागला. कर्नाटकचा सुभा जो नानासाहेबांच्या नांवें करावयाचा होता, तो त्यांनीं सदाशिवरावभाऊ यांचे नांवें केला. 'कर्नाटकचा सुभा बाबूजी नाईक यांजकडे होता, तेथें पेंचांत कर्ज भारी जहालें, नीट अंमल येत नाहीं, तो मक्ता ठरावून जाजती रसद ठरावून सनदा द्याव्या, म्हणोन कर्नाटकचा सुभा सदाशिव चिमणाजी यांनीं आपणांकडे करून घेतला.' (धाकट रामराजे यांचें चरित्र पृ. ५) सदाशिवरावभाऊंनीं कर्नाटकचा सुभा आपल्या नांवानें करून घेतला यामुळें इतर कारभाऱ्यांना वैषम्य वाटण्याचें कारण नव्हतें. सदाशिवरावभाऊ झाले तरी ते पंतप्रधानांचे चुलत भाऊच होते. त्यांच्या पूर्वापार पेशवेपदाच्या अधिकाराप्रमाणें त्यांना नवीन कारभारांत योग्य स्थान मिळणें न्यायाचें होतें. नानासाहेब त्यांची सर्व बाजूंनीं कुचंबणा करीत होते. हा होत असलेला अन्याय रामचंद्रबाबांना खपत नव्हता म्हणून या नवीन राजव्यवस्थेंत सदाशिवरावभाऊंना आपली स्वतंत्र कर्तबगारी दाखवितां येईल व त्यामुळें छत्रपतींच्या गादीची सेवा होईल अशी रामचंद्रबाबांनीं मुत्सद्देगिरी लढविली होती.

कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊ यांचे नांवानें करून घेण्यांत रामचंद्रबाबांनीं दुसरें एक राजकारण लढविलें होतें. शाहूराजे व संभाजीराजे यांच्या दरम्यान जो कृष्णावारणेचा तह सन १७३० मध्यें झाला होता त्यामुळें कृष्णानदीच्या उत्तरेकडील मुलूख शाहूराजे यांचेकडे व दक्षिणेकडील संभाजीराजे यांचेकडे आला. परंतु शाहूराजे यांच्या मरणोत्तर एकछत्रीराज्य करण्याचा करार पेशव्यांनीं संभाजी महाराजांना करून दिल्यामुळें कृष्णावारणेच्या तहांतील कलमांची अंमलबजावणी पूर्णपणें घडवून आणण्याची आवश्यकता सहाजिक संभाजीराजे यांना वाटली नाहीं. म्हणून कर्नाटकच्या सुभ्यामध्यें शाहूराजे यांच्या सरदारांनीं आपले जरी पाय पसरले होते तरी शेवटीं आपण त्याचे धनी होणार हा विश्वास संभाजीराजे यांना होता. परंतु शाहूराजे यांच्या पश्चात्

एकछत्रीराज्य पेशव्यांच्या मतलबानें होऊं शकलें नाहीं. रामराजे यांना गादीवर आणून पुनः सातारा व कोल्हापूर हीं मराठी राज्याचीं दोन शकलें कायम राहिलीं. त्यामुळें कोल्हापूरच्या राज्याचें संवर्धन न होतां उलट तें दिवसेंदिवस क्षीण होत जाऊन संभाजीराजे यांचें नुकसान होऊं लागलें म्हणून तें न व्हावें अशीही योजना रामचंद्रबाबा यांना करणें भाग होतें. या दृष्टीनेंच त्यांनीं संभाजीराजे यांच्याबरोबर राजकारण चालविलें होतें. सातारा व कोल्हापूर या दोन्ही राज्यांतील पेशवेपद इतके दिवस बाळाजी विश्वनाथापासून बाळाजी बाजीरावापर्यंत चालत आले. या पेशव्यांनीं सदर काळांत फक्त शाहूराजे यांच्या राज्याभिवृद्धीचा प्रयत्न केला. एक पुरुष दोन्हीं राज्याचे पेशवे झाल्यानें कोणत्यातरी एका राज्याकडे दुर्लक्ष होतें म्हणून कोल्हापुरास सदाशिवरावभाऊ यांची पेशवेपदावर स्वतंत्र स्थापना केल्यास त्यांच्या कर्तबगारीला भरपूर क्षेत्र मिळेल व त्यामुळें त्या राज्याचें आजपर्यंत झालेलें नुकसान भरून येईल, या रामचंद्रबाबांच्या राजकारणाला संभाजी महाराजांनीं आपली अनुमती दिली. त्यांनीं सदाशिवरावभाऊ यांना आपल्या राज्यांतील पेशवेपद व भीमगड, पारगड आणि कलानिधी हे तीन किल्ले शिवाय पांच हजारांचा मुलुख जहागीर म्हणून देण्याचें कबूल केलें. रामचंद्रबाबांच्या या मनसुब्यानें मराठी राज्याला हितावह अशा बऱ्याच गोष्टी घडून येणार होत्या. [१] सदाशिवराव भाऊ कोल्हापूरच्या राज्याचे पेशवे झाल्यानें त्यांच्या नांवानें सांगोल्यास केला गेलेला कर्नाटकचा सुभा कोल्हापूरच्या राज्याच्या अंमलाखालीं येऊन त्या राज्याची अभिवृद्धि दक्षिण प्रांतांत होण्याला मोठें सहाय्य झालें असतें. [२] सदाशिवरावभाऊंच्या कर्तृत्वाला व पुरुषार्थाला दक्षिण प्रदेशाचें विपुल क्षेत्र मिळालें असतें. [३] महादोबा पुरंदरे यांचें कारभाराचें पद कायम राहून त्याचा आजपर्यंतच्या सर्वांबरोबरीचा सलोखा कायम राहिला असता व ते नानासाहेब पेशव्यांचे पूर्वीप्रमाणें इतबारी चाकर राहूं शकले असते. [४] गोपिकाबाईच्या गृहकलहाच्या प्रेरणेला बराच पायबंद बसला असता. [५] राघोबादादांच्या पराक्रमाला जास्त उठाव मिळाला असता. (६) कोल्हापूरच्या

राज्याचें वजन वाढून संभाजीराजे यांचा शह नानासाहेब पेशव्यांना कायमचा बसला असता व त्यामुळें नानासाहेब पेशव्यांच्या अधिकाराला मर्यादेचें बंधन राहून त्यांना ताराबाईंच्या आज्ञेंत वागणं भाग पडलं असतें. [७] साताऱ्याच्या छत्रपतींशीं राजनिष्ठ राहणारे सरदार व अष्टप्रधान यांची अस्मानीसुल्तानी करण्यांत नानासाहेबांचें सामर्थ्य खर्ची पडलं नसतें. तेंच स्वराज्याच्या अभिवृद्धीला ताराबाईंना लावतां आलें असतं. [८] मराठी राज्य कायम टिकलें असतें व तें राज्य नानासाहेबांनीं अपहार केलें असा त्यांना दोष न येतां त्यांच्या पराक्रमाला जास्त प्रोत्साहन मिळालें असतें. एकंदरींत कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊ यांचे नांवानें करण्यांत व कोल्हापूरच्या राज्याच्या पेशवेपदाची खटपट करण्यांत रामचंद्रबाबांच्या ठिकाणीं स्वराज्यनिष्ठेचें व बुद्धिकौशल्याचें केवढें जबरदस्त रहस्य सांठलेलें होतें हें दिसून येईल. अशा या खऱ्या बुद्धिवान व खंद्या मुत्सद्याच्या चातुर्याचा प्रभाव मराठी राज्यकारभारावर पडून त्याचें सर्वस्वीं कल्याण होण्यासारखें होतें. परंतु केवळ स्वार्थावर लक्ष ठेवून राज्यकारभार करण्याचा विडा नानासाहेब पेशव्यांनीं उचलल्यामुळें रामचंद्र बाबांची ही वरील योजना नानासाहेबांनीं पुढें सर्वस्वीं कशी हाणून पाडली हें पुढील इतिहासावरून दिसून येईल.

सांगोल्याची कामगिरी आटोपून सदाशिवरावभाऊ व रामचंद्रपंत बाबा हे पुण्यास नोव्हेंबर सन १७५० च्या अखेरीच्या सुमारास येऊन दाखल झाले. ' सांगोले मुक्कामीं सर्व राज्यकारभाचा बंदोबस्त व पदें व मुलुक, महाल सदाशिव चिमणाजी यांणीं रामचंद्रबाबा शेणवी व गोविंदराव चिटणवीस यांचे विद्यमानें महाराज यांचे विचारें केला. यावरून बाळाजीपंत नाना यांचे मनांत कांहीं विषम वाटलेलें जे, आम्हीं सातारा मुक्कामीं जावें, तेथें त्यांनीं येऊन आमचे विचारें व्हावें, तें न करितां परभारें सारीं कामें विल्हे लाविलीं. याजमुळें बाळाजीपंत नाना व सदोबाभाऊ व महादोबा पुरंदरे यांचे ठायीं विकल्प वाढला. हें करणें कारस्थान विकल्प वाढवण्याचें रामचंद्रबाबा यांचें. नाना यांचे चित्तांत विकल्प आला असें समजोन सदाशिवभाऊ व रामचंद्रबाबा महा-

राजांचा निरोप घेऊन पुण्यास आले.' [ धा. रा. या. च. पृष्ठ १० ]
'याच समयास कर्नाटकांतील बोभाट बंडें झाल्याचीं पत्रें सरसुभा यांची व मामलेदार यांचीं आलीं. तीं पत्रें पाहून श्रीमंतांनीं ( नानासाहेब पेशव्यांनीं ) विचारलें, "आतां बंडाचे बंदोबस्तास कोणास पाठवावा?" हें ऐकून रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेब यांस इशारत केली कीं, आतां बोलायची संधी हीच आहे. तेव्हां भाऊसाहेब उठून श्रीमंतांस विनंती केली कीं, "मला आज्ञा झाली असतां मी जाऊन बंडाचा बंदोबस्त करून येईन. करणार स्वामींचा प्रताप!" असें उत्तर श्रीमंतांनीं ऐकून नानासाहेब ह्मणतात, "तूं कधीं बाहेर गेलास नाहीं, व लढाईही कोठें केली नाहींस. ह्मणून तुला जा म्हणावयाचें अनमान." तेव्हां भाऊसाहेब यांणीं उत्तर केलें कीं, "माझ्याकडे करणें न करणें कांहीं नाहीं, सर्व पुण्य प्रताप चरणांचा आहे." ही गोष्ट ऐकतांच नानासाहेब यांणीं आज्ञा केली, "हाच मुहूर्त आहे; निघावें." असें ऐकतांच भाऊसाहेब यांणीं तोच नमस्कार केला आणि निघून सर्व फौजेस सरकारची आज्ञा बाहेर निघण्याची झाली. भाऊसाहेब डेऱ्यास जाऊन दाखल झाले. त्या वेळेस रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेबांस एकांतीं गांठून मजकूर सांगितला कीं, तुह्मांस जाण्याची आज्ञा झाली, परंतु तुह्मांस पाठीमागें यावें म्हणून सरकारचा सांडणीस्वार जाईल; यासाठीं येथून कूच करून वीस कोसांचा मुक्काम करावा. तेथेंही माघारी येण्याची चिटी तुह्मांस येऊन पोंचेल, तरी तुह्मीं माघारी येऊं नये. त्या चिटीचें उत्तर पाठवावें कीं, "स्वामी राज्यावर आहेत; मी बेरोजगारी, तेव्हां मला पोटाचा उद्योग पाहिला पाहिजे. यासाठीं मला कोल्हापूरचे राजमंडळचें बोलावणें आलें आहे तिकडे मी जातों. हें खटले संभाळावयास पाठवावयाचा असेल तो पाठवावा." त्या वेळेस कोल्हापूरचे राजाचीं पत्रें भाऊसाहेब यांचे नांवाचीं आलीं होतीं तीं रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेब यांचे स्वाधीन केलीं.'

'असा मजकूर झाल्यानंतर भाऊसाहेब डेऱ्यास गेले होते, तेथून कूच करून वीस कोसांचा मुक्काम केला. इकडे पाठीमागें नानासाहेब व

सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब यांची गांठ पडल्यानंतर श्रीमंतांचे बुद्धीस बाईनें भ्रंश केला. तो मजकूर श्रीमंतांचे मनांत भरला, आणि तेच समयीं चिटी लिहून सांडणीस्वार याजजवळ देऊन भाऊसाहेब यांजकडे रवाना केला. सांडणीस्वार रात्रौ जाऊन भाऊसाहेब निजले आहेत त्यांजला उठवून चिटी आणि मुख-जबानी सांडणीस्वार बोलला कीं, " आपणांस याच समयीं माघारें बलाविलें आहे. " तो मजकूर ऐकून चिटी वाचून त्या चिटीचा जाब लागलाच माघारा पाठविला कीं, " हें खटलें संभाळावयास कोण तो पाठवा. मला कोल्हापूरचे राजाचें बलावणें आलें आहे तिकडे मी जातों. " असें उत्तर लिहून सांडणीस्वार माघारा रवाना केला. तो उजाडाला पुण्यास येऊन श्रीमंतांचे हवालीं चिटी केली. चिटी वाचतांच नानासाहेब घाबरले, आणि मनांत विचार केला कीं, हें सारें कृत्य रामचंद्रबाबाचें आहे. असा पक्का मजकूर ध्यानांत आणून रामचंद्रबाबास समागमें घेऊन, लगेच श्रीमंत, भाऊसाहेब होते तेथें येऊन, भाऊसाहेब यांची व नानासाहेब यांची भेट झाली. त्यावेळेस नानासाहेब यांगीं भाऊस विचारलें कीं, " तुझे मनांत काय आहे हें खरें सांग. " हें ऐकून भाऊसाहेब बोलले, " माझे मनांत आपणांविषयीं कांहीं नाहीं. आपण राज्यावर आहांत, मला माझी सोई कांहींतरी पाहिली पाहिजे, यासाठीं कोल्हापूरचे महाराजांचीं पत्रें मला बलावण्याविषयीं आलीं आहेत तिकडे मी जातों. " असें बोलून राजपत्र होतें तें श्रीमंतांस दाखविलें. त्यांत मजकूर " साताऱ्याचे राज्यांत पेशवे आहेत, आमचे राज्यांत कोणी पेशवे नाहींत. आम्ही आपले राज्याची पेशवाई तुम्हांस देतों. " असा मजकूर नानासाहेब यांणीं वाचून घटकाभर उगेच राहून भाऊसाहेबांशीं बोलले " हेंच निदान शेवटील कीं काय ? " तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, " आपले आज्ञेशिवाय नाहीं. " तेव्हां नानासाहेब बोलले कीं, " तूं पुण्यास चलावें, " हें ऐकून भाऊ ह्मणतातः " पुण्यास येऊन काय करावयाचें ? " तें ऐकून नानासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, " सारा राज्यभार आजपासून तुझ्यावर ठेविला. सारा राज्याचा कारभार तूं कर, तुझ्या इतल्या-

शिवाय मी चालवयाचा नाहीं. ” अशी आणभाष क्रिया उभयतां बंधूंची झाली. भाऊसाहेब यांस पुण्यास घेऊन आले. कर्नाटकांत फौज रवाना केली तिचे बराबर दुसरा सरदार दिला. त्या दिवसापासून भाऊसाहेब राज्यकारभार करूं लागले. ’ [ पे. ब, पृ. ४८-४९ ]

या माहितीवरून रामचंद्रबाबांच्या मनसुब्यांवर चांगलाच प्रकाश पडतो. कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊंच्या नांवानें करून घेतल्यानंतर त्याचा ताबा घेण्याची संधि कर्नाटकांतील बंडामुळें सहजच भाऊंना मिळणार होती. ह्मणून त्यांनीं कर्नाटकच्या स्वारीवर निघण्याचा भाऊंना सल्ला दिला. पहिल्यानें नानासाहेबांना रामचंद्रबाबांच्या राजकारणाचें स्वरूप लक्षांत आलें नाहीं. कर्नाटकाच्या स्वारीवर एक मजल निघून गेल्यानंतर गोपिकाबाईच्या मंत्रानें त्यांच्या मनांत सर्व मनसुब्याचा प्रकाश पडला. कोल्हापूरची पेशवाई भाऊंना मिळाल्याचें संभाजीराजे यांचें राजपत्र पहातांच नानासाहेब घाबरले. यावरून कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊंच्या नांवानें करून घेतल्यामुळेंच नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांच्यामध्यें वैषम्य उत्पन्न झालें होतें हें निश्चित ठरतें. त्याचे पडसादही पुढीलप्रमाणें आहेत. ( १ ) सांगोल्याच्या राज्यव्यवस्थेमुळें नानासाहेबांच्या मनांत वैषम्य उत्पन्न झालें. (२) या कारस्थानाच्या मुळाशीं रामचंद्रबाबा आहेत अशी नानासाहेबांची खात्री झाली. (३) ‘ असे भाऊबंद जवळ आणून आपले पोरांस ठिकाण नाहीं असे करतील.’ हें गोपिकाबाईचें ह्मणणें नानासाहेबांच्या प्रत्ययास आलें. कर्नाटकचा सुभा भाऊंनीं आपल्या नांवानें घेतल्यामुळें गोपिकाबाईच्या ह्मणण्याची सत्यता नानासाहेबांना पटली असेल यांत संशय नाहीं. (४) सांगोल्याची राज्यव्यस्था महादोबा पुरंदरे यांस मान्य होती. त्यामुळें त्यांचें स्थान स्थिर होणार होतें. परंतु त्याचा अवलंब नानासाहेबांनीं न केल्यामुळें त्यांचें व नानासाहेबांचें वैषम्य उत्पन्न झालें. सदाशिवरावभाऊंना कारभार दिल्यामुळें महादोबा पुरंदरे यांना घरीं बसावें लागलें. त्यामुळें ते रुष्ट झाले. गोविंदराव चिटणीसही याच कारणामुळें नानासाहेबांच्या पक्षांतून अलग झाले. (५) कोल्हापूरच्या महाराजांचें राजपत्र

पाहून नानासाहेब घाबरले. अर्थात् कृष्णावारणेचा तह व कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊ यांचे नांवानें करण्याचा हेतु यांच्या जुळणीची सांगड त्यांच्या डोळ्यापुढें नाचूं लागली. सदाशिवरावभाऊ कोल्हापुरास गेल्यानंतर आपण कसे निर्माल्यवत् होऊं याचीही कल्पना त्यांना आली; ह्मणून त्यांनीं 'सर्वनाशे संमुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या उक्तीप्रमाणें सदाशिवरावभाऊंना गोपिकाबाईच्या इच्छेविरुद्ध सर्व राज्याचा कारभार सांगितला. एकंदरींत रामचंद्रबाबांनीं कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊंच्या नांवानें केल्यामुळें नानासाहेब पेशवे किती हवालदिल झाले हें दिसून येईल. शेवटीं या पेंच-प्रसंगांतून मुक्त होण्याकरतां नानासाहेबांना 'जर भाऊ असलेस तर पत्र दर्शनीं येणें.' अशा घराण्याच्या रक्तसंबंधाची ओळख शेवटीं सदाशिवराव-भाऊंना देऊन व राज्यकारभार त्यांचे अंगावर सोंपवून पार पडावें लागलें. रामराजे ज्याप्रमाणें शेवटीं रक्ताच्या संबंधानें ताराबाई यांच्याकडे गेले; त्याच-प्रमाणें यावेळीं रक्ताच्याच ओढ्यानें सदाशिवरावभाऊ हे नानासाहेबांच्याकडे निघून गेले. यामुळें रामचंद्रबाबा यांनीं रचलेला मनसुबा नानासाहेबांनीं शेवटीं वाटेल ती किंमत देऊन हाणून पाडला. आणि आपल्या नवीन गृहकलहांतून तात्पुरते तरी ते शीरसलामत बाहेर पडले.

मागें दर्शविल्याप्रमाणें रामचंद्रबाबा व सदाशिवरावभाऊ यांच्या संभा-षणांत 'स्वामी राज्यावर आहेत, मी बेरोजगारी.' असा वाक्यप्रयोग आहे. त्याचप्रमाणें नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांच्या संभाषणांत 'आपण राज्यावर आहांत, मला माझी सोई कांहींतरी पाहिली पाहिजे,' असा दुसरा वाक्यप्रयोग आहे. यावरून पहातां सांगोल्याच्या व्यवस्थेमुळें रामराजे हे मराठी राज्यावरून दूर होऊन त्या राज्याचे अधिपति नानासाहेब हे झाले होते असें जनतेंत सर्वांमुखीं झालें होतें असें मानण्यास हरकत नाहीं. सांगोल्यास छत्रपतींचे अधिकार काढून घेण्याचा नानासाहेबांनीं जो मनसुबा करविला त्याला महिना दोन महिन्याचा काळ लोटतो न लोटतो तोंच त्यांची स्थिती कशी बिकट झाली याची कल्पना देणारें एक पत्र नानासाहेबांनीं जानेवारी

सन १७५१ मध्यें जयाजी शिंदे यांना लिहिलें आहे. तें पुढें दिल्याप्रमाणें आहे.

श्री. [का. सं. प. या. ले. ३५९]

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि.

आशीर्वाद उपरि. राजश्री महादोबाशीं आह्मांशीं विमनस्कता तीन वर्षें आहे. सातारियांपासून विशेष वृद्धि पावली. तुमचे पक्षपातामुळें अतिकष्टी हेते. याजमुळें आह्मांस हरएक कामांत मुरदाड करावें याची तजवीज रामचंद्रबाबा भाऊंकडें राजकारणें पत्रें जात येत असत. आह्मांपासून हरएक मसलत पुर्ती पायाशुद्ध शेवटास न जावी या भावें भाऊंकडेच फौज पाठवावी, आह्मांस घरीं बसवून गोविंदरायाचे आज्ञेंत वर्तवावें, उमाबाईस ( दाभाडे ) राखावें, ताराबाईसि गोविंदरायाचे मार्फतीनें चढवावें, आह्मांवर सर्वांचे हुकूम राहावे, ऐसा विचार दिसोन आला. तेव्हां आह्मी भाऊंस साफ लिहिलें कीं, जर भाऊ असलेस तर पत्रदर्शनीं येणें. दाभाडियांकडील काम चांगलें करूं. त्यांवरून भिडेस पडून आले. दाभाडियाकडील काम रगडून आरंभिलें. नासरजंग मेला. जफती करावी, दहावीस लाख मेळवावे, सरदारही बलवावे, हिदायत [ मुजफरजंग ] मोहिदीखानावर जावें; गरमी ( जरब ) दाखवून जें मिळेल तें मेळवावें, ऐसा विचार आह्मीं केला. याजमुळें बाबांनीं [ महादोबा ] बहुत बाइट मानून घरास गेले. कोणी ह्मणतात कीं ताराबाईकडे जातील. परंतु ते कुलीन, जुने चाकर, हरामखोरी कधी करणार नाहींत ऐसें वाटतें. कालगत मात्र न कळे. असो आह्मांशीं बाबाशीं तूट पडली. भाऊ अर्धे इकडे अर्धे तिकडे. रामचंद्रबाबा बाह्यात्कारें आह्मांकडे, अंतर्यामीं बहुत गुप्त रीतीनें बाबांकडे. येथें बाहेर तो सर्वत्र दाखवितात कीं, खावंदाची मर्जी तेंच प्रमाण. परंतु अंतर्भाव तुह्मी जाणतच आहां. त्रिंबक विनायक कोनेरपंत हे केवळ बाबांचे. गंगोबाशीं ( होळकरांचे दिवाण ) त्यांशीं राजकारणपूर्ण. तेथून मल्हार [बा]स लिहितील कीं, खामखा (जरूर) बाबांचा पक्षपात करोन आमचे केलें घडावें. मल्हारबा भला माणूस येखादे जागां वचनास गुंतल्यास आह्मांशीं तूट मात्र पडेल. आमचे विचारें चालले तर समाजाविशी करावी, चालवावें, ऐसें आमचे मनांत

आहेच. आतां जहाले तरि बरें न जहालें तरि पुढें ही जो विचार आमचे मनपासून खुलासियानें ठरेल तोच शेवटास न्यावा. गंगोबांनीं त्रिंबक विनायकाचे मार्फतीनें लिहिलें तर साफ जाब करावा कीं, खावंदाशीं आह्मी इरे [ईर्षा] वाढविणार नाहीं. ऐसें साफ बोलावें. जें करणें तें आमचे विचारें करावें. या मजकुरावर मल्हारवास कायम अगोदर करून ठेवणें. असें असतां आह्मांशीं विरुद्ध करतील तर करोत. आमची तवकल ( भरंवसा ) ईश्वरावर आहे. तुमचे भरंवसियावर ऐसें केलें.' या पत्रावरून सांगोल्याच्या राज्यव्यवस्थेच्या प्रकरणानें व सदाशिवरावभाऊ यांना परत बोलावून कारभारी केल्यानें इतर कारभारी मंडळींत नानासाहेब पेशव्यांबद्दल कसे विरोध उत्पन्न झाले याची कल्पना येते. महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस, रामचंद्रबाबा, सदाशिवराव भाऊ इत्यादि नानासाहेबांच्या पक्षांतीलही मंडळींस ताराबाईंना खूष ठेऊन रामराजे यांच्या सल्ल्यानें कारभार व्हावा असें वाटत होतें. उलटपक्षीं रामराजे, ताराबाई, कारभारी, अष्टप्रधान वगैरेंना बाजूला सारून आपल्यावर कोणाची हुकमत न रहातां आपणच राज्याचे धनी होऊन बसावें असा नानासाहेबांचा प्रयत्न चालला होता हें वरील पत्राच्या सारांशावरून स्पष्ट होतें.

**ताराबाईचें पवित्र कर्तव्यः—** 'ओळखीचा चोर जिवानिशीं मारी' या म्हणीप्रमाणें यावेळीं ताराबाईची स्थिति झाली होती. छत्रपति शिवाजी महाराजांच्या घराण्यांत छत्रपतींची सत्ता कायम राहून हिंदुपदपातशाहीची गादी चालावी असे त्यांचे या वेळेपर्यंत अविश्रांत प्रयत्न चालू होते. त्याकरितां त्यांनीं परकियांबरोबर अनंत सामने देऊन स्वराज्याचें रक्षण केलें. छत्रपतींची सत्ता कायम राखण्याकरतां त्यांनीं स्वाधिकाराचा त्याग केला आणि कित्येक वर्षें बंदिवासही सहन केला. ताराबाईला त्यांच्या वयाच्या पंचेविसाव्या वर्षापासून पाऊणशेंवर्षापर्यंत म्हणजे पन्नास वर्षांच्या दीर्घकाल पर्यंत परकीय शत्रुपक्षाच्या कपटकारस्थानांना तोंड देऊन स्वराज्यरक्षणाचे मार्ग चोखाळावे लागले होते. परंतु यावेळीं त्यांना स्वराज्याचे चाकरच शत्रू झाले असल्यामुळें

पूर्वीच्या प्रसंगापेक्षां चालू प्रसंग त्यांना जास्त भयावह वाटत होते यांत शंका नाहीं. ' चाकरांनीं धन्याची सत्ता अपाहार करावी ' हा प्रसंग त्यांना नवीनच होता. ताराबाईनीं हिंदुपदपातशाहीच्या शत्रूंना जमीनदोस्त केलें होतें. शत्रूचीं कपटकारस्थानें लीलेनें पचविलीं होतीं. गृहकलहाचा रोग त्यांनीं त्यागाच्या रामबाणमात्रेनें मारून टाकला होता. परंतु यावेळीं हिंदुपदपातशाहीच्या चाकरानें-नानासाहेबपेशव्यानें हिंदुपदपातशाहीच्या धन्याचा-छत्रपतिपदाचा नाश करण्याकरतां ' चाकरानें धन्याची सत्ता अपाहार करण्याचें ' जें जालीम नवीन विष निर्माण केलें तें प्लेगच्या नवीन सांथीप्रमाणें अत्यंत भयंकर व प्राणघातक होतें असें ताराबाईना वाटलें असेल यांत शंका नाहीं. धनी व चाकर ही परंपरा अबाधित आहे. त्याचीं बंधनेंहीं निसर्गसिद्ध आहेत. असें असतां त्या बंधनांचा नाश होईल असें नवीन विष निर्माण झाल्यास व तें कायम टिकल्यास त्या परंपरेचा आमूलाग्र नाश होणार म्हणून त्याचा शक्य तो प्रतिकार करणें ताराबाईचें कर्तव्य होतें. या विषाचा प्रयोग जरी रामराजे यांच्यावर नानासाहेब पेशव्यांनीं करविला होता तरी तें विष योग्य उपचारांनीं काढून टाकण्याचे प्रयत्न ताराबाई करीत होत्या. हे त्यांच प्रयत्न असाध्य होणार असा जरी सर्व रंग दिसत होता तरी त्यांचा जिवात्मा असेपर्यंत ते प्रयत्न चालू ठेवणें हें त्यांचें कर्तव्य होऊन बसलें होतें. ' यावत्कंठगतः प्राणस्तावत्कार्या-प्रतिक्रिया । कदाचिद्दैवयोगेन दृष्टारिष्टोपिजीवति ॥ ' या उक्तीप्रमाणें कंठांत जीव असेपर्यंत औषधोपचार चालूच ठेवले पाहिजेत, ते बंद करतां येत नाहींत. कदाचित् दैवयोगानें संकट दूर होऊन रोगी वांचेल अशी शेवटपर्यंत आशा असते. त्याच आशेवर विश्वास ठेऊन यावेळीं नानासाहेब पेशव्यांबरोबर ताराबाईच्या प्रतिक्रियेचे प्रयत्न चालू झाले. हे प्रयत्न करणें त्यांचें पवित्र कर्तव्य होतें व तें त्यांनीं योग्य वेळीं व योग्य मोल देऊन आपला जीवात्मा असेपर्यंत केलें हें पुढील इतिहासावरून दिसून येईल. ताराबाईचे पुढील सर्व प्रयत्न नानासाहेब पेशव्यांनीं छत्रपतींच्या आज्ञेंत वागून हिंदुपदपातशाहीची चाकरी करावी या करीतां होते. परंतु तसें न साधल्यास नानासाहेबांना पेशवेपदावरून

दूर करून दुसरा पेशवा नेमून राजमंडळ चालवावें. हा त्यांच्या प्रयत्नांचा मुख्य उद्देश लक्षांत घेऊन पुढील ऐतिहासिक घडामोडी व राजकारणें विचारवंतांनीं अभ्यासावीं.

सांगोल्यास रामराजे यांच्याकडून नानासाहेबांनीं जी राज्यव्यवस्था शिक्कामोर्तब करून घेतली त्यामुळें गुजराथचा निम्मे सुभा पेशव्यांकडे आला होता. परंतु तो सुभा दाभाडे व गायकवाड यांचेकडे असल्यामुळें तो बऱ्या बोलानें नानासाहेबांच्या अंमलाखालीं येण्यासारखा नव्हता. यावेळीं गुजराथेंत दमाजी गायकवाड हा कर्ता पुरुष होता. सांगोल्याची व्यवस्था ताराबाईच्या परोक्ष करून घेतल्यामुळें स्वराज्याचे पूर्वीचे संबंध तोडण्याचाच प्रामुख्यानें नानासाहेबांकडून प्रयत्न झाला. छत्रपतींच्या गादीचें स्थैर्य राखून स्वराज्य संपादण्याच्या कामीं व रक्षण करण्याच्या कामीं ज्या ज्या पुरुषांची सर्वतोपरी मदत झाली असेल त्यांचे त्यांचे पूर्वीचे हितसंबंध कायम ठेऊन नवीन व्यवस्था अंमलांत आणावी लागते. एकदम जुन्या व्यवस्थेला पलटणी देणारी क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न केला ह्मणजे आपसांत लढाईचा प्रसंग उद्भवून त्यामुळें स्वराज्याचे अकल्याण होतें. सांगोल्यास ताराबाईच्या परोक्ष जी राज्यव्यवस्था नानासाहेबांनीं घडवून आणली त्यामुळें सेनापति दाभाडे, अमात्य, सचिव, प्रतिनिधि, बापूजी नाईक, वगैरे स्वराज्याच्या आधारस्तंभांत कलह माजून त्यामुळें स्वराज्याचे नुकसान झालें. नानासाहेब पेशव्यांनीं ताराबाईना वचन दिल्याप्रमाणें जर नवीन राज्यकारभार त्यांच्या सल्याप्रमाणें झाला असतां तर छत्रपतींची सत्ता नामधारी न होतां व स्वराज्याच्या आधारस्तंभांत फूट न पडतां स्वराज्याचें दृढीकरण झालें असतें. परंतु पेशव्यांनीं केवळ सामर्थ्याच्या बळावर आणि स्वार्थाच्या लालुचीवर दृष्टि ठेऊन सांगोल्याची व्यवस्था ताराबाईचा विश्वासघात करून घडवून आणली, व त्यामुळें मराठी राज्यांत रणें पेटवून स्वराज्याचा नाश, आत्मनाश व सर्वनाश क्रमाक्रमानें करून घेतला. या सर्व उत्पाताचें मूळ सांगोल्यास घडवून आणलेल्या नानासाहेब पेशव्यांच्या कपटकारस्थानांत आहे.

**४ दमाजी गायकवाड व पेशवे यांचा संग्रामः**— खंडेराव दाभाडे यांनीं स्वपराक्रमावर सेनापतिपद प्राप्त करून घेतलें होतें. त्यांनीं स्वराज्याची सेवा बहुमोल केली होती. त्यांच्या नंतर त्यांचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे हे सेनापति झाले. त्यांचें व बाजीराव पेशवे यांचें वैमनस्य उत्पन्न होऊन परस्परांचें युद्ध झालें व त्यांत त्रिंबकराव दाभाडे हे ठार झाले. हा बाजीराव पेशवे यांचा अतिप्रसंग शाहूराजे यांना अत्यंत अनुचित वाटला. बाजीरावाच्या या अपराधाबद्दल प्रत्यक्ष शाहूराजे यांना खंडेराव दाभाडे यांची पत्नी उमाबाई यांची समजूत काढतां काढतां नाकीं नऊ आले. उमाबाई यांना त्रिंबकरावाशिवाय यशवंतराव व सवाई बाबूराव हे मुलगे होते. शाहू महाराजांनीं यशवंतराव यांस सेनापतिपद व सवाई बाबूराव यांस सेनाखासखेल हें पद देऊन उमाबाईची समजूत केली. ही व्यवस्था आपला जीवात्मा असेपर्यंत शाहू महाराजांनीं चालविली. शाहू महाराजांचें तत्व 'जुनें मोडूं नये व नवें करूं नये' (म. रि. म. वि. २ पृ. २४५) असें होतें. त्या तत्वाला अनुलक्षून ते आपल्या चाकरांचे अपराध पोटांत घालून बिघडणाऱ्या राज्यव्यवस्थेला निरनिराळ्या परीनें आळा घालीत होते. शाहू महाराजांनीं आपल्या अंतकाळीं ज्याप्रमाणें इतर सरदारांना साताऱ्यास बोलाविलें त्याप्रमाणें दाभाडे यांनाही बोलाविलें होतें. परंतु ते त्या प्रसंगीं साताऱ्यास आले नाहींत. रघोजी भोंसल्याप्रमाणें त्यांनींही साताऱ्यास जाण्याचें टाळलें. याचें मुख्य कारण असें संभवतें कीं, पेशवे व दाभाडे यांचें गेलीं वीस वर्षें वैषम्य असल्यामुळें व शाहूराजे यांच्या अंतकाळीं पेशव्यांच्या सामर्थ्याची चढती कमान असल्यामुळें ते आपला कसा व केव्हां सूड घेतील याचा विश्वास त्यांना न वाटल्यामुळें ते साताऱ्यास गेले नाहींत. रघोजी भोंसले यांचे बाबतींतही तेंच मुख्य कारण संभवतें. पुढें रघोजी भोंसले आपल्या फौजेसह व आपल्या संरक्षणाची जबाबदारीची जाणीव ठेऊनच साताऱ्यास गेले. त्याप्रमाणें दाभाड्यांस जावें लागलें असतें. परंतु एवढा खर्च करून व शेवटीं पेशव्यांकडून आपला अपमान करून घेऊन परत येण्यापेक्षां पुढील व्यवस्था लागल्यानंतर छत्रपतींच्या

गादीशीं पूर्ववत् एकनिष्ठ असल्याची खातरजमा करून स्वराज्यसेवेची आज्ञा मागतां येईल या भरंवशावर ते गप्प बसले असावे असें दिसतें. उमाबाई दाभाडे या मोठ्या दक्ष, पराक्रमी व उद्योगी होत्या. त्यांना पूर्वीपासून साताऱ्याचें राजकारण माहित होतें, ह्मणून या प्रसंगीं त्यांनीं साताऱ्यास न जाण्याचा निर्णय घेतला असावा. उमाबाईनीं गायकवाडांस आपले दुय्यम ह्मणून नेमून घेऊन गुजराथच्या सुभ्याचा कारभार चालविला. यशवंतराव दाभाडे जरी व्यसनी बनले होते तरी शाहूमहाराजांनीं उमाबाई व सवाई बाबूराव यांचेकडून स्वराज्याची सेवा घेतली. व्यक्तिविषयक व्यसनापासून स्वराज्याच्या कामगिरीला जोंपर्यंत अडथळा येत नाहीं तोंपर्यंत शाहूमहाराज तिकडे दुर्लक्ष करीत होते. यशवंतराव सेनापतीची कामगिरी उमाबाई व बाबूराव पार पाडीत होते. ह्मणून शाहूमहाराज यशवंतरावाकडे दुर्लक्ष करीत होते. बाजीराव पुढें पुढें मस्तानीच्या नादानें व्यसनाधीन झाले. तेव्हांसुद्धां शाहूमहाराजांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. चिमाजी आप्पा बाजीरावाची कामगिरी निभावून नेतच होते. मुख्य अधिकारी पुरुषाला या गोष्टी निभावून न्याव्या लागतात. तरच स्वराज्याचा जम कायम राहतो. यशवंतराव व्यसनी होते या सबबीवर त्यांचें घराणें नेस्तनाबूद करणें हें स्वराज्याच्या हिताचें खास नव्हतें. नानासाहेब पेशव्यांचे पक्षपाती इतिहासकार याबद्दल नानासाहेबांची तारीफ करतात. पण त्यांनीं दूरदृष्टीनें या बाबतींत विचार केलेला नाहीं असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. पुढें सांगोल्याच्या व्यवस्थेंत पेशव्यांनीं दाभाड्यांना आपल्या पूर्वीच्या वैमनस्याचा सूड घेण्याकरतां चिरडून टाकण्याचा मनसबा केला व गायकवाडांस दाभाड्यांच्या पक्षांतून फोडून आपल्या पंखाखालीं ओढण्याकरितां 'त्वयार्धं मयार्धं' या न्यायानें अर्धी गुजराथ गायकवाड यांना व अर्धी गुजरात आपणाकडे घेतली. ही व्यवस्था गायकवाडांच्या नाशाची नव्हती. उलट ती त्यांना दाभाड्यांपासून स्वातंत्र्य देणारी होती. असें असतां सुद्धां ती दमाजी गायकवाड यांना पसंत पडली नाहीं. गुजराथचे मालक दाभाडे हीच भावना गायकवाडांची होती. सांगोल्याची व्यवस्था नानासाहेब पेशव्यांनीं रामराजे

यांचेकडून जबरीनें करून घेतली, अर्थात् ती अन्यायाची आहे असें दमजी यांस वाटलें त्याचप्रमाणें धनी उमाबाई दाभाडे यांना सर्वस्वीं पेशव्यांच्या हवालीं करणें हेंही त्यांना अपमानाचें वाटलें. तसेंच 'जो पेशवा, शाहूनें जुनीं वतन जशींच्या तशीं राखावीं (वंश होईल त्याच्या आज्ञेंत चालून राजमंडळ चालवणें. शाहूराजे यांची यादी नं. १) असें सांगितलें असतांसुद्धां, दाभाड्याकडील गुजराथ काढतो, तो पुढें आपली अर्धी तरी आपणाकडे ठेवील याचा काय विश्वास मानावा' (ना. पे. च. पृ. १०५) अशी कल्पना यमाजी गायकवाड यांचे मनांत येणें क्रमप्राप्त होतें. ह्मणून उमाबाईनीं व दमाजींनीं ताराबाई यांच्याकडे दाद मागितली. दमाजीस ताराबाईचें पत्र असें आलें कीं, 'सांप्रत तुह्मांस कोणी येथें प्रतिपक्षी नाहीं, त्यास तुहीं लवकर येऊन राजा व मराठे यांचें राज्य ब्राह्मणांच्या हातचें सोडवावें.' (म. ब. आ. ६ पृ. १८२) या त्यांच्या आज्ञेप्रमाणें 'छत्रपतीस आपल्या ताब्यांत राखणाऱ्या शिरजोर पेशव्यांस तोंड देऊन, राजास मोकळें करण्याचा हेतु योजला.' (ना. पे. च. पृ. १०५) रामदासपंत, प्रतिनिधि, यमाजी शिवदेव वगैरेच्या मदतीनें पेशव्यांचा आपण मोड करूं असा दमाजींना विश्वास वाटत होता. त्याकरतां त्यांनीं तयारी करून ते गुजराथेंतून पुण्यावर स्वारी करण्याच्या इराद्यानें निघाले.

रामदासपंत या नांवाचा तेलंगा ब्रम्हाण त्या वेळीं निजामशाहींत दिवाण-पदावर होता. मुजफरजंग मेला तेव्हां निजामशाहींत गोंधळच व्हावयाचा, पण रामदासपंतानें मुजफरजंग जिवंत आहे अशी हूल उठवून व सर्व सैन्यास वश करून घेऊण सलाबतजंगाला निजाम केलें. या वेळीं निजामास साह्य करण्यास आलेल्या फ्रेंच सैन्यावर मुख्य सेनापति बुसी हा होता. त्याचें व रामदासपंतांचें सख्य होतें. बुसीच्या सैन्याच्या जोरावर रामदासपंत सलाबत-जंगास घेऊन औरंगाबादेस येऊं लागला. तेव्हां नानासाहेब पेशव्यांनीं निजा-माचे दौलताबाद व खानदेश हे दोन सुभे जप्त केले. पुढें सलाबतजंगाला अडविण्याकरतां नानासाहेब निघाले तेव्हां सैय्यद लष्करखानाजवळून सवा लक्ष

रुपये खंडणी घेऊन नानासाहेबांनीं ते दोन सुभे मोकळे केले, व तेथून पुढें निजामाच्या राज्यांत शिरून वाटेनें घांसदाणा, खंडणी घेत घेत रघोजी व फत्तेसिंग भोंसले यांच्या सैन्यासह रायपूरच्या पूर्वेस चाळीस मैलांवर कृष्णा कांठीं पानगळपर्यंत येऊन पोंचले. परंतु इकडे सलाबतजंगाचा धाकटा भाऊ निजामअल्ली यांस हाताशीं धरून रामदासपंतानें ताराबाईशीं नवीनच कारस्थान उभारलें. सलाबतजंग यास शह देण्याचा निजामअल्लीचा विचार होता. पण याचवेळीं दमाजी गायकवाडानें पेशव्यांच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन पुणें सातारा भागांत ताराबाईतर्फे धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. हें वर्तमान ऐकून नानासाहेब लगोलग साताऱ्याकडे येण्यास निघाले. सलाबतजंगानें जानबा निंबाळकरामार्फत कांहीं पैका पेशव्यास दिला त्यावरच त्यास संतुष्ट व्हावें लागलें. अशा रीतीनें निजामाचे दोन सुभे चापण्याचा नानासाहेबाचा हेतु मनांतल्या मनांत राहून आपली पुढील मोहीम तहकूब करून त्याला माघारी फिरावें लागलें.

दमाजी गायकवाड आपल्या फौजेसह गुजराथेंतून खानदेशांत उतरून पेशव्यांचीं ठाणीं उठवूं लागले. त्यांच्या दराऱ्यानें रयत पळाली. गांवें ओसाड पडलीं. पेशव्यांचीं माणसेंसुद्धां पुणें सोडून सिंहगडास पळालीं. पुण्याच्या उत्तरेस पेशव्यांच्या सरदारांबरोबर दमाजीनें लढाई दिली. त्यांत रंभाजी पांढरे, दत्ताजी भापकर, दादजी माणकर, वगैरे पेशव्यांचे सरदार पडले. हत्ती, घोडे व सामुग्री गायकवाड यांना मिळाली. पुण्यांत जनार्दनबाबा फडणीस कारभारी होते, त्यांनीं महादोबा पुरंदरे याकडून दमाजीना विनंति करविली, त्यामुळें ते पुण्यावर न येतां साताऱ्याकडेच वळले. तेव्हां नाना पुरंदरे यांनीं साताऱ्यास ठेवलेली पेशव्याची फौज बरोबर घेतली व ते दमाजीबरोबर लढण्याकरतां निघाले. त्यांना त्र्यंबकरावमामा पेठे, बळवंतराव मेहेंदळे, रेठरेकर, विठ्ठल शिवदेव, निंबाळकर, बापूजी खंडो चिटणीस वगैरे पेशव्यांच्या बाजूचे सरदार येऊन मिळाले. यावेळीं पेशव्यांची फौज वीस हजार झाली. तेव्हां त्या फौजेसह नाना पुरंदरे वगैरे सरदार कृष्णेच्या कांठीं आरळें गांव आहे तेथें येऊन

उतरले. दमाजी गायकवाड आपल्या पंधरा हजार फौजेसह सालप्याच्या घाटानें आरळ्याजवळ आले. त्यावेळीं त्यांच्या फौजेवर पेशव्यांच्या फौजेनें हल्ला केला. परंतु दमाजीच्या फौजेनें मोठ्या हिंमतीनें त्या हल्ल्याला तोंड देऊन त्यांचा हल्ला परतविला. पेशव्यांच्या फौजेनें नंतर तेथून पळ काढून निंबासला ठाणें दिलें. 'दुसरे दिवशीं गायकवाडाचे लोकांनीं त्यांवर पडून त्यांचा अगदीं मोड केल्यानंतर दमाजी साताऱ्यास जाऊन ताराबाईस भेटला, तेव्हां ताराबाईनें साताऱ्याजवळचे कितीएक किल्ले हस्तगत केले. तिला प्रतिनिधि अनुकूल होता हें वर्तमान ऐकून पेशव्याला मोठ्या त्वरेनें साताऱ्यास यावें लागलें. तो येऊन पोंहचण्याचे पूर्वीच नाना पुरंदऱ्यानें गायकवाडाचे फौजेशीं लढून त्यास साताऱ्यांहून जोर खोऱ्यापर्यंत घालविलें होतें.' (म. ब. पृ. १८३) ही हकीकत नानासाहेब पेशव्यांना ता. २९ मार्च १७५१ रोजीं निजाम-कोंड्यावर समजली. 'तेव्हां लगेच त्यानें सरदारांस उत्तेजनाचीं पत्रें पाठविलीं कीं, "लेखनार्थश्रवणें संतोष झाला. मोठी गोष्ट झाली. शाबास तुमची लोकांची. बरी केली. सारे एकदिल होऊन गायकवाडास जाऊं देणें. जोर पोंचल्यास लुटून नेस्तनाबूद करणें. जोंपर्यंत गायकवाडाचा वारापाणी झाला नाहीं, तोंपर्यंत फौज न फोडणें, आमचा मोंगलांचा सलुख झाला. इकडील सर्व गुंते उरकले. आम्ही मजल दरमजल येत असों. गायकवाड जाऊं न द्यावे तें करणें. तुम्हीं सर्वांचीं समाधानें करणें. बाजी तुम्हीं सांवरली. जी गोष्ट तुमचे वडिलांचे वडिलांस योग्य तें तुह्मी केलें. या उपर बहुत सावधतेनें जरब देणें. मळमळीत न करणें." या पत्रावरून नानासाहेबांच्या मनांतून दमाजीची पुरी खोड मोडून आपणांविरुद्ध कारस्थानें रचणारांस दहशत बसविण्याचें होतें असें दिसतें. पेशव्याच्या सरदारांनीं याप्रसंगीं जोर करून गायकवाडाचा अगदीं कोंडमारा केला. साताऱ्याच्या भोंवतालचा प्रदेश उध्वस्त करून त्यास दाणापाणी न मिळे अशी व्यवस्था केली. त्यास कोणीही या संकटांत कुमक केली नाहीं.'

दमाजीची अशी जरी स्थिति झाली होती तरी त्यांची फौज सातारा

शहरांत तळ धरून होती. ता. २३ मार्च रोजीं ताराबाईकडील बन्हाणजी मोहिते, फराटखान, जाधव वगैरेशीं पेशव्यांचा सरदार मानाजी पायगुडे याचें झुंज झालें. त्यांत परस्परांस जखमा लागल्या. त्यामुळें नाना पुरंदरे वगैरेंनीं दमाजी यांच बरोबर तहाचें बोलणें लाविलें. परंतु निजामाचें प्रकरण यशस्वी करून आह्मी लौकरच येतों, गायकवाडास निरोप दिला नसेल तर तसाच अडकावून धरावा. दम धरून त्याचें कबिलाबाड बंद करून शर्मिंदा करणें. आह्मी येऊन पावतों. त्याजपासून दोनच गोष्टींचा निकाल करून घेणें आहे,' असें नानासाहेब पेशव्यांनीं आपल्या सरदारांस पुनः कळविल्यामुळें त्यांनीं दमाजीला तहाच्या वाटाघाटींत घोळत ठेविलें. 'पुढें नानासाहेब ता. २४ एप्रिल रोजीं सदाशिवरावासह सातान्यास आला. तेव्हां प्रथम त्यानें गायकवाडावर जोराचा हल्ला चढविला. आपला निभाव नाहीं असें पाहून दमाजीनें सलुखाचें बोलणें काढलें. सटवोजी जाधव, जानोजी ढमढेरे, नाना पुरंदरे, रामचंद्रबाबा यांच्या मध्यस्थीनें भेटी झाल्या. पेशव्यानें दमाजीस शहर सोडून वेण्णा दक्षिणतीरीं जाऊन राहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो गेला. पेशवा उत्तरतीरीं राहिला. नानासाहेबानें भेटींत निमे गुजराथ व पंचवीस लक्ष रुपये मागितले. तेव्हां दमाजीनें शिक्के कटार उमाबाईसमोर ठेऊन, दाभाडे धनी आहेत त्यांशीं काय तें बोला, असें टाळाटाळीचें उत्तर दिलें. यानंतर चार दिवसांनीं काय कारण घडलें कोण जाणें, पेशव्यानें गायकवाड बेसावध असतां त्याजवर हल्ला करून त्यास लुटलें. या प्रसंगीं दमाजीनें त्यास प्रतिबंध केला नाहीं. त्यामुळें दाभाडे सेनापति, दमाजी वगैरे सर्व कैद झाले. पेशव्यानें या वेळीं दगाबाजी केली असा या प्रकरणीं त्याच्यावर प्रवाद उठला होता. पण नानासाहेब पुढें याबद्दल ह्मणतो "आह्मीं गायकवाडाचें पारिपत्य केलें, त्यांत आह्मीं बेइमानी, दगाबाजी केली, असें नानाप्रकारें लोकांनीं दर्शविलें. परंतु ईश्वर साक्ष आहे. मोठमोठे मराठे, मोठे कारभारी यांणीं त्याचें घर बुडविलें. आह्मांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरे, त्यामुळें बंदीखाने, गड, सर्वही प्राप्त त्यांचे कर्मानुरूप झालें. एतद्विषयीं विस्तार कशास! परंतु आईसाहेबांशीं विरुद्ध

वाढलें. त्यांचेमतें सर्व प्रकारें आम्हांस मोडावें. रामदासपंताचे पुतण्यास पेशवाई द्यावी; त्यांनीं आम्हांस बुडवावें; दाभाडे, प्रतिनिधि, रघूजीबाबा सर्वांनीं त्यास मिळावें, ऐसा पूर्णभाव.'' [ ना. पे. च. पृ. १०६-७ ] यावरून खालीं दिलेल्या गोष्टी स्पष्ट होतात.

[१] नानासाहेब पेशव्यांनीं गायकवाड बेसावध असतांना त्यांच्यावर हल्ला केला व सेनापति यशवंतराव दाभाडे, उमाबाई, दमाजी गायकवाड वगैरे सर्व कैद केले म्हणून त्यांचेवर 'बेइमानी, दगाबाज' असा लोकांनीं त्यांना ठपका दिला. आपल्या समर्थनार्थ नानासाहेबांनीं आपली बाजू पुढें मांडण्या-करतां 'मोठमोठे मराठे, मोठे कारभारी यांणीं त्यांचें घर बुडविलें.' असें स्पष्टी-करण केलें. याचा अर्थ एवढाच कीं, मोठमोठ्या मराठ्यांनीं मोठमोठ्या कारभाऱ्यांनीं जर त्यांचें घर बुडविलें तर आम्हीं त्यांच्याशीं बेइमानी व दगाबाजी केली त्यांत विशेष काय झालें ? इतरांप्रमाणें आम्हींही वागलें. 'आम्हांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरे, त्यामुळें बंदीखाने, गड, सर्वही प्राप्त त्याचे कर्मानुरूप झालें.' असें दुसरें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. हें नानासाहेबांचें स्पष्टीकरण धादांत खोटें आहे. नानासाहेबांनीं निजामकोंड्याहून साताऱ्यास आपल्या सरदारांना जें मागें दिल्याप्रमाणें पहिलें पत्र पाठविलें त्यांत 'जोर पोंचल्यास लुटून नेस्तनाबूद करणें. जोंपर्यंत गायकवाडाचा वारा-पाणी झाला नाहीं, तोंपर्यंत फौज न फोडणें.' असें स्पष्ट म्हटलें आहे. या वरून गायकवाडांचा सर्वस्वी नाश करण्याचा संकल्प नानासाहेबांनीं निजाम-कोंड्यासच केला होता हें उघड आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या त्यांच्या पत्रांत 'गायकवाडास निरोप दिला नसेल तर तसाच अडकावून धरावा. त्याज-पासून दोन गोष्टींचा निकाल करून घेणें आहे.' असा मजकूर आहे. या पत्राप्रमाणें नानासाहेबांनीं दमाजीची भेट घेऊन त्यांना त्या दोन गोष्टी विचा-रल्या. पहिली गोष्ट निम्मे गुजराथ स्वाधीन करणार कीं नाहीं ? आणि दुसरी गोष्ट पंचवीस लक्ष रुपये देणार कीं नाहीं ? या दोन गोष्टींची नानासाहेबांनीं मागणी केल्यानंतर दमाजींनीं आपल्या अधिकाराबाहेरील त्या गोष्टी असल्यामुळें

त्यांनीं आपली शिक्काकट्यार काढून आपल्या धनीणीपुढें ठेविली त्यामुळें सेनापति व पेशवे यांचा प्रत्यक्ष संबंध आला. तेव्हां सर्वांनाच नेस्तनाबूद केल्याशिवाय गुजराथचा निम्मा भाग आपल्याला मिळत नाहीं असें पेशव्यांना वाटलें. पेशवे व दाभाडे यांची चार दिवस जी वाटाघाट झाली त्या वाटाघाटींत पेशव्यांनीं जबरदस्तीनें रामराजे यांचेकडून निम्मा गुजराथेची सनद घेतली अर्थात् ती अन्यायाची आहे; अन्यायाच्या सनदेवरून पेशव्यांना त्याची अंमलबजावणी करतां येणार नाहीं वगैरे वगैरे न्यायअन्यायाचे मुद्दे निघाले असतील यांत संशय नाहीं. तेव्हां ही न्यायान्यायाची वाटाघाट न करीत बसतां पेशव्यांनीं त्यांच्यावर हल्ला केला व त्यांना कैद केलें. ' आह्मांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरे ' हें नानासाहेबांचें विधान केवळ दिशाभूल करणारं आहे. रामराजे यांचकडून गुजराथची घेतलेली सनद बळजबरीनें घेतली गेली नाहीं हें अर्थात् नानासाहेबांना सिद्ध करतां येण्यासारखें नव्हतें. शिवाय या सनदेविरुद्ध प्रत्यक्ष ताराबाई होत्या. अशा स्थितींत उमाबाई-बरोबर न्यायानें वागून नानासाहेबांचा कार्यभाग होणार नव्हता. म्हणून त्यांना दगाबाजीचा मार्ग स्वीकारावा लागला. वरीलप्रमाणें दोन स्पष्टीकरणें त्यांनीं केलीं पण त्यामुळें आपल्यावर ठेवलेल्या आरोपाचें योग्य समर्थन केलें जात नाहीं हे नानासाहेब जाणून होते. म्हणून त्यांनीं ' एतद्विषयीं विस्तार कशास ! ' असें सांगून आपलें स्पष्टीकरण आखडतें घेतलें. यावरून नानासाहेबांनींच वरील आरोपांस आपली मुग्ध संमति दिली असें स्पष्ट होतें. नानासाहेबांनीं गायकवाडांना नेस्तनाबूद करण्याचा जो संकल्प निजामकोंड्यास केला होता तो संकल्प त्यांच्या सरदारांचा जोर न पोंचल्यानें इतके दिवस राहिला होता. परंतु नानासाहेबांची फौज आल्यानंतर त्यांचा जोर वाढला आणि त्यांनीं कांहीं तरी निमित्त पुढें करून दाभाडे व गायकवाड यांचा नाश केला असें उघड उघड दिसून येतें. न्यायान्यायाची चाड निःस्वार्थी लोकांना असते. स्वार्थांधाना त्याचें काय ?

[२] त्रिंबकराव दाभाडे सेनापति असतांना बाजीरावांचें व त्यांचें

वैमनस्य उत्पन्न झालें आणि बाजीरावांनीं छत्रपतींची आज्ञा न घेतां दाभाड्यां-बरोबर युद्ध केलें. त्यांत दाभाडे ठार झाले. मराठी राज्यांतील अष्टप्रधानांची आपसांतील ही दुही स्वराज्यनाशाची होती हें जाणून शाहू महाराजांनीं कसा पर्याय काढला व दाभाडे सेनापति घराणें कसें राखलें हें मागें आलेंच आहे. शाहू महाराज जिवंत असेपर्यंत दाभाडे घराण्यावर पेशव्यांना सूड उगवतां आला नाहीं. तेव्हां त्यांच्या पश्चात् नानासाहेबांनीं त्यांचा सूड उगविण्याची सांगोल्याची पर्वणी साधली. छत्रपतीपदाच्या स्थैर्याच्या दृष्टीनें सेनापतीचें घराणें नामशेष करणें अनिष्ट होतें. शाहूमहाराजांची शेवटची आज्ञा राजमंडळ राखणें अशी असतांनासुद्धां नानासाहेबांनीं सेनापतीपदाचा आपल्या इच्छेप्रमाणें असा नाश केला. ही गोष्ट अर्थात् ताराबाईंना सहन होण्यासारखी नव्हती. ताराबाईऐवजीं दुसरी कोणतीही स्वाभिमानी व्यक्ति राज्यावर असती तरी तिलाही ही पेशव्यांची कृति सहन झाली नसती. त्या व्यक्तीनें पेशवेपदाच्या अधिकाराचें अतिक्रमण करणाऱ्या इसमाला पदच्युत केलें असतें. ताराबाईही तेंच करणार होत्या. मराठी राज्याचें हिताहित नानासाहेब पेशव्यापेक्षां सहस्रपटीनें ताराबाई जाणत होत्या. अशा स्थितींत कोणत्या योजनेनें स्वराज्याचें कल्याण होतें, कोणती व्यक्ति मराठी राज्याचा नाश करणारी होती हें त्या उत्तम प्रकारें जाणत होत्या. नानासाहेबांच्या वरील स्पष्टीकरणांत त्याचा स्पष्ट खुलासा आहे. "परंतु आईसाहेबांशीं विरुद्ध वाढलें. त्यांचे मतें सर्वप्रकारें आह्मांस मोडावें. रामदासपंताचे पुतण्यास पेशवाई द्यावी; त्यांनीं आह्मांस बुडवावें, दाभाडे, प्रतिनिधि, रघूजीबाबा सर्वांनीं त्यास मिळावें ऐसा पूर्ण भाव." या वाक्यांत ताराबाई मराठी राज्याचें कसें संरक्षण करणार होत्या हें दिसून येतें. ताराबाईंना मराठी राज्य रक्षावयाचें होतें. नानासाहेबांना मराठी राज्याची किंवा मराठी राज्याच्या कीर्तीची कदर नव्हती. त्यांना फक्त स्वतःचें पद सांभाळावयाचें होतें आणि तें सांभाळण्याकरतां मराठी राज्याचें कोणतेंही व कसलेंही नुकसान झालें तरी त्याकडे त्यांना दृष्टि द्यावयाची नव्हती. ताराबाई, रामराजे, प्रतिनिधि, सचिव, अमात्य, सेनापति सर्व गेले तरी बेहत्तर पण आपलें

पद कायम राहिलें पाहिजे हा नानासाहेबांचा मुख्य हेतु होता. याच हेतूवर त्यांच्या पराक्रमाची सर्व मदार होती. ते यावेळीं सर्वांना सैन्य बळाच्या सामर्थ्यावर डोईजड झाले होते. ताराबाईंना आज्ञापालन करणाऱ्या पेशव्याची जरूरी होती. त्याकरतां नानासाहेबांना शह बसून व त्यांचा पुंडावा बंद पडून राजमंडळ पूर्ववत् चालेल असा प्रयत्न त्या करीत होत्या. रामदासपंतांचा पुतण्या पेशवे पदावर आणण्यांत त्यांचा मुख्य हेतु हाच होता. एकंदरींत अष्टप्रधान मोडून टाकण्याचा आपला हट्ट पेशव्यांनीं स्वसामर्थ्यावर पुरा केला. ताराबाईचा पक्ष सर्व बाजूंनीं नेस्तनाबूद होईल असे प्रयत्न केले. सेनापती यशवंतरावे दाभाडे व उमाबाई यांना कैद करून तळेगांवीं रवाना केलें व दमाजी गायकवाड व यांचे पुत्र व पुतणे यांच्या पायांत बेड्या ठोकून त्यांना लोहगडावर नेऊन ठेवले. ( धा. रा. यां. च. पृ. १५ ) अशाप्रकारें नानासाहेबांनीं गुजराथेच्या बाबतींत ताराबाई विरुद्ध निकाल लाविला.

**५ पेशव्यांकडून दमाजीचा विश्वासघातः**—दमाजी गायकवाडाचा पेशव्यांनीं कसा विश्वासघात केला हें 'बडोदें राज्य दप्तरांतील ऐतिहासिक वेचे' पुस्तक १ लें पृ. ३८।३९ यांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. 'शके १६७३ प्रजापति नाम संवत्सरे सन ११६० वैशाख शु. १० सह ११ बुधवारीं ( २४।४।१७५१ ) श्रीमंत पंतप्रधान फोजेसुद्धां भागानगराकडून सातारियास दाखल जाले. गुरुवारीं येवतेश्वरावर व गणेश खिंडीकडे फौजा रवाना केल्या. येवतेश्वरावर आईसाहेबांची व गायकवाडांची चौकी होती ती उठवली. गायकवाड मदार दरियांत राहिला होता. त्याजवर बाग व जेजाला यांचा मार केला. गायकवाडांचे बुणगे व किरकोळ लोक गडाच्या कडाणीस गेले. हजार बारारों, गायकवाड उभा राहिला मरावयास. श्रीमंत व भाऊ फौज तयार करून चालोन घेतले. यांची फोज भारी. त्याचा परिणाम होईना. तेव्हां गायकवाडाकडून भेटीचा मजकूर जाला. त्यांजला ( नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांना ) विचार पडला कीं, तो मरावयास तयार झाला, बहुतांचा नाश करील. मग सटवोजी जाधव; जानोजी ढमढेरे, शिदोजी

राऊत, नाना पुरंदरे, रामचंद्रबाबास पाठविलें. गायकवाड भेटीस आला; भेटी घेऊन आपल्या गोटांत गेला. दुसरे रोजीं यांणीं गायकवाडास सांगोन पाठविलें कीं, गोटाशेजारीं वेगेवर येऊन रहा. त्याजवरून वेगेवर दक्षण तीरीं येऊन राहिला. श्रीमंत उत्तर तीरीं येऊन राहिले. सेनापतीही (यशवंतराव दाभाडे) गायकवाडाबा। आले होते. गायकवाडास ह्मणो लागले पंचवीस लक्ष रु॥ व निम्मे गुजराथ वांटणी दे. त्याणें ह्मटलें उमाबाई धणी आहेत. त्यासी जें बोलणें तें बोला. उमाबाईकडे गायकवाड जाऊन शिक्के करार त्याजपुढें ठेविलीं. दाली सोडली ह्मणून बोलोन आपल्या डेरियांत गेला. चौथे रोजीं मंगळवारीं सकाळींच श्रीमंतांनीं फौजा पाठवून गायकवाड लुटला. त्याणें स्नान केलें होतें. तयार नव्हता. नाना बेवसवास होता. यांची फौज जाऊन घोडीं ओढूं लागली. गायकवाड ह्मणों लागला, त्याचे वचनावर आपण बेवसवास होतों, त्यांणीं वचन सोडून हे गोष्टी करूं लागले. तरी कोणी हत्यार धरूं नका, सुखरूप लुटूं द्या. मग यांणीं अगदीं गोट लुटला. गायकवाड दोघे भाऊ विठ्ठल शिवदेव यांणीं आपल्या डेरियास नेले. सेनापति मानाजी पायगुडियांनीं आपल्या डेरियांत नेले. गायकवाड पायउतारांच गेले. जैशिंग बरगियाच्या डेरियास नेले. अवघ्यापासीं चौकिया ठेविल्या, गायकवाड तिघे भाऊ एकत्र केले. सेनापति श्रीमंताबा॥ उमाबाई अंबिकाबाई होती. खासखेल होते, त्याजपाशीं नेले. दाभाडियांनीं अवघी गुजराथ पेशवियांच्या हवाला केली. त्याप्र॥ गायकवाडांनींहि देविली. ठाणीं गोंदे, वाजपूर व दावडी गायकवाडास रहावयास दिल्हीं. त्रिवर्ग गायकवाड पुणियास पाठविले. वैशाख वद्य १३ शनवारीं (ता. ११-५-१७५१) पुणियास आले. आवजी कवडी-याच्या वाडियांत ठेविले. चौक्या भोंवताल्या ठेविल्या. ठाणीं आलियावरी सोडावें याजकरितां अटकेस ठेविले आहेत. गायकवाडाजवळ दोघे मुलें होतीं, तीं आईसाहेबापाशीं सातारियावरी ठेविलीं होतीं, तीं तेथेंच आहेत. ऐशी हकीकत जाली असे."

**६ दाभाडे व गायकवाड यांची थोर मनोवृत्तिः—** या हकी-

कतीवरून नानासाहेब पेशवे व दमाजी गायकवाड आणि उमाबाई दाभाडे यांच्या मनोधर्मांवर फारच मोठा प्रकाश पडतो. (१) नानासाहेब वचन भ्रष्ट होऊन त्यांनीं दमाजीच्या गोटावर हल्ला केला तेव्हां दमाजीनें त्यांना विरोध न करतां सुखरूप घोट लुटूं दिला. याचा अर्थ एवढाच होतो कीं वचन भ्रष्ट होणें हें पाप आहे व अशा वचन भ्रष्ट पापी लोकांवर वीर पुरुषानें हत्यार चालविणें ह्मणजे आपल्या पराक्रमी समशेरीचा अपमान करणें होय अशीच त्यांची भावना झाली असेल यांत संशय नाहीं. (२) नानासाहेबांनीं दमाजी यांचेकडे पंचवीस लक्ष रुपये व अर्धी गुजराथ याची मागणी केली त्यावेळीं त्यांनीं 'उमाबाई धनी आहेत. त्यासी जें बोलणें तें बोला.' असा जबाब दिला. पेशवे दमाजीला अर्धी गुजराथ द्यावयास तयार होते. दाभाडे यांच्या हिश्याची अर्धी गुजराथ ते मागत होते. परंतु धन्याची अर्धी गुजराथ देऊन चाकरनें अर्धी गुजराथ घेणें हा न्यायमार्ग नव्हे, हा सद्धर्म नव्हे याची पूर्ण जाणीव दमाजींना होती. ह्मणून या पापाला प्रवृत्त होण्याची बुद्धि होऊं नये ह्मणून त्यांनीं आपल्या धनीणीकडे जाऊन शिक्का कटार त्यांच्यापुढें ठेऊन सेवानिवृत्त झाले. पेशव्यांनीं उमाबाईकडे अर्धी गुजराथेची मागणी केली तेव्हां 'दाभाडि-यांनीं अवघी गुजराथ पेशव्यांच्या हवाली केली. त्याप्रा। गायकवाडांनीहि देविली.' अर्धी गुजराथ मागत असतां सर्व गुजराथ उमाबाईनीं देणें व त्याला त्रिनदिक्कत दमाजीनें अनुमती देणें या गोष्टी सामान्य नाहींत. याच्या बुडाशीं मरठयांच्या अस्सल मनोधर्माचें रहस्य एकवटलेलें आहे. उमाबाईनीं सर्व गुजराथ पेशव्यांच्या हवालीं करणें व त्याला दमाजीनीं अनुमती देणें याचा अर्थ असल्या वचन भ्रष्ट, विश्वास घातकी आणि दगाबाज पेशव्यांना धनी मानून चाकरी करण्यापेक्षां दारिद्र पतकरून उपाशीं मेलेलें बरें याच भावनेच्या बळावर त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा त्याग केला हें उघड होतें. त्याच्या अगदीं उलट नानासाहेबांचा मनोधर्म होता. दमाजी गायकवाड आपल्या धनीणीला देवता मानून आज्ञा पाळीत होते तर नानासाहेब पेशवे आपल्या धनीणीला ताराबाईंना आश्रित वागण्याचीं वचनें देऊन त्यांची सत्ता व त्यांचें राज्य अप-

हार करण्याच्या प्रयत्नांत होते. दाभाडे व गायकवाड हे पूर्ण स्वामिभक्त तर नानासाहेब पेशवे पूर्ण स्वामिद्रोही अशा दोन निरनिराळ्या मनोभावना सेनापति व पेशवे या अष्टप्रधानांतील इतिहास प्रसिद्ध व्यक्तींच्या कृतीवरून या दाभाडे प्रकरणांतून स्पष्ट होतात. त्याचप्रमाणें नानासाहेबांनीं मराठी स्वराज्यांत शाहूराजे यांच्या मृत्यूनंतर दगलबाजी, विश्वासघातकीपणा, वचन भ्रष्टता, कापट्य वगैरेचा जो पायंडा घातला तो प्रथमतः त्यांना जरी भाग्याचा वाटला तरी पुढें त्यांना व त्यांच्या वंशजांना तो क्रमाक्रमानें नाशाचा झाला हें इतिहासज्ञांना निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. विषवृक्षाला अमृताचीं फळें कशीं लागतील ? विषारी फळेंच लागावयाचीं हा निसर्गाचा सिद्धांत आहे. नानासाहेबांपासून मराठी राज्यकारभारांत अशा प्रकारच्या विषवृक्षांचें बीजारोपण झालें व त्याचे क्रमाक्रमानें स्वराज्यांत ठिकठिकाणीं वृक्ष वाढूं लागले.

**७. चाकरानें धन्यास वेढ्यांत अडकविलें:**— ताराबाईनीं दमाजी गायकवाड यांना फौजेसह साताऱ्यास बोलाविलें याचें कारणहि तितकें महत्वाचेंच होतें. ताराबाईनीं रामराजे यांना सातारा किल्ल्यावर बोलावून आपल्या संरक्षणाखालीं ठेवलें हें नानासाहेब पेशव्यांना रुचलें नाहीं. तेव्हां त्यांनीं ताराबाईचा जो बंदोबस्त केला त्यासंबंधीची हकीकत भारतवर्ष शकावलींत पुढीलप्रमाणें दिली आहे. 'तेव्हां नानासाहेबांनीं आज्ञा करून आह्मांकडून किल्ल्या-भोंवत्या चौक्या बसविल्या. मार्गशीर्षापासून फाल्गुन वद्य ६ [ता. ७-३-१७५१] पावेतों मोर्चेबंदी रात्रंदिवस झुंज भांडणें करून राहिलों. तों दमाजीनें खान-देशांत दंगा मांडला. ह्मणोन नानांनीं पारपत्यास बापूजी बाजीराव व बळवंतराव गणपतराव रवाना केले. त्यांचें यांचें युद्ध जालें. हे मोडले. गायकवाड पाठीं लागत जेजुरी मोरगांवाकडून साताऱ्याकडे चालला.' या माहितीप्रमाणें नाना-साहेबांनीं निजामावर जाण्यापूर्वी साताराकिल्ल्याला वेढा देऊन ताराबाईना व रामराजे यांना वेढ्यांत कोंडलें होतें हें नक्की ठरतें. या वेढ्यांत ताराबाई सांपडल्यामुळें त्यांना आत्मरक्षणाकरतां युद्धप्रसंग घडवून आणणें प्राप्त होतें. या सुमारें चार महिन्याच्या वेढ्याच्या अवधींत ताराबाईची काय स्थिती झाली

असेल याची कल्पना वेढ्यांत सांपडलेल्या लोकांना पूर्णपणें येईल. सातारा शहराचा व किल्ल्याचा संबंध तुटल्यामुळें किल्ल्यावर रोज जाणारी रसद बंद झाली. धान्यगोटा, वस्त्रप्रावरण, भाजीपाल्यापासून जनावरांच्या वैरणीपर्यंत सर्व किल्ल्यावरील व्यवहार बंद झाले. किल्ल्यावरील फौजेच्या पगाराकरतां व नोकरांच्या तनख्याकरतां बाहेरून येणारी पैशाची मदत बंद पडली. त्याकरतां 'जवाहिर सर्व खराब झालें. प्रधान यांची फौज बाहेर नेहमीं येऊन उतरली, महाल मुलुख परभारें विल्हेस लाविले, ह्मणोन निरुपाय जाला.' [ धा. रा. या. च. पृ. ११ ] यावरून या वेढ्यामुळें नानासाहेबांनीं ताराबाईंची व रामराजे यांची कशी स्थिति केली होती हें लक्षांत येईल. अशाप्रकारचा वेढा शत्रूला जेरीला आणण्याकरतां देण्यांत येतो. तोच मार्ग नानासाहेबांनीं आपल्या धन्याकरतां स्वीकारला होता. अशास्थितींत दमाजी गायकवाडाची मदत ताराबाईनीं मागीतली. 'ह्मणून ताराबाईंच्या तंत्रानें वागून दमाजीनें छत्रपतीस आपल्या ताब्यांत राखणाऱ्या शिरजोर पेशव्यास तोंड देऊन, राजास मोकळें करण्याचा हेतु योजला. ( ना. पे. च. पृ. १०५ ) ताराबाई व छत्रपति अशा बिकट संकटांत सांपडल्या वेळीं दमाजी गायकवाड साताऱ्यास धावून आले व त्यांनीं ताराबाई व रामराजे यांची नानासाहेबांच्या वेढ्यांतून कांहीं काल मुक्तता केली.

ताराबाईचा व पेशव्यांचा कलह चालल्यावेळीं पेशव्यांच्या बाजूचे जसे मुबलक कागद सांपडतात तसे ताराबाईंच्या पक्षांतील लोकांचे सांपडत नाहींत. त्यामुळें त्यांच्या पक्षाचें काय काय ह्मणणें होतें हें विस्तारानें सांगतां येत नाहीं. ताराबाईंच्या पक्षांतील लोकांचे कागदपत्र नाश केले गेले असावे अशी त्यामुळें शंका उद्भवते. तरी पण तशा प्रकारचें एक पत्र ताराबाईंच्या पक्षांतील कोणीतरी इसमानें नानासाहेब पेशव्यांना लिहिलेलें उपलब्ध आहे. तें खंड ६ ले. २७८ चें प्रसिद्ध झालें आहे. तें शके १६७४ ह्मणजे सन १७५१-५२ चे सुमाराचे आहे. "कैलासवास केलियावर [शाहू महाराजांनीं] तुह्मीं असा डोल घातलात कीं, सर्वाध्यक्षता आपली, आमचे तर्फेचे माणसानें

राजाजवळ एकांतीं बसूं देखील नये. रात्रीं दिवसा तुमची चौकी. ते प्रसंगीं जे जे तुमचे पक्षीं लागले ते वाचत चालले, असें दिसों लागतांच वडूथचे तळावर रामाजी बावाजवळून तुह्मांस सांगितलें कीं, ऐसें न करावें. बावानींहि सांगितलेंच असेल. परंतु, आपण बहुमान मात्र बावासी करीत गेलेत. ते गोष्टीचीहि आह्मीं गमच खादली. तदोत्तर सातारियासी दाखल होतांच, आह्मीं शिवाजी हरि, देवराव, बाबूजी नाईक यांचा अभिमान धरिला. तुह्मीं जे माणूस आह्मांकडे आले तें मोडीतच चाललेस. तथापि आह्मीं, शिवाजी हरि केवळ तुमचा ग्रामकंटक व लबाड ऐसें जाणून, त्याचा अभिमान सोडिला; देवरायास पोटास मात्र देविलें; नाइकास कर्णाटक द्यावें, नाहींतर, पांचा साताचा सरंजाम द्यावा. तेव्हां तुह्मीं बावांनीं मिळोन कर्णाटक मस्त हस्ती जळाली फाकिराचे दारी बांधला—ह्मणजे दउलतीची फजिती केली. अखेर कर्णाट काढलें. तेव्हां सरंजामहि न दिल्हा. या प्रकारें ज्या ज्यांनीं मुख्यपणें आमचा पक्ष मनांत आणिला ते सर्वस्वें बुडाले. या प्रसंगामुळें फारच आह्मांस राग येऊन आम्हीं रुसून बाहेर आलों. ते समयीं तुम्हीं बावांनीं आपले जागां विचार करून आह्मांपासून इमान तुह्मांस देविलें. तुह्मीहि शपथ केली कीं, सहसा स्वामीचे हिताविशीं मजपासून कायावाचामनें अंतर होणार नाहीं. त्या दिवसापासून तुम्हीं कोणेप्रकारें चाललेस हें मी जाणतों. मी कसा चाललों हें तुम्हीं जाणत असाल. सांप्रतकाळीं नानाप्रकारें लोक सांगतात तें एकीकडे ठेवून तुह्माजवळून पूर्ते अंतर पडेल, तेव्हां आपणहि अंतर करावें. इतक्यांत तुह्मीहि सर्वप्रकारें आमचे पक्षीं, हें भाऊनीं बावांनीं सांगितलें. तदनरूप तुम्हीं गडकरी यांस भरवसा पुरवून राजे आईसाहेबांस खालीं आणावयाचा विचार केला; चवकी मारली. एका दो दिवशीं खालीं उतरून सुरळीत चालावें, दुर्लौकिक उभय पक्षींचा वारावा, ता विचार टाकून, बावा रुसून घरास गेले. हें आइकतांच सुस्त पडलेत. माणसंदेखील पळूं लागलेत. हें कांहीं तुमचे इमानास योग्य नाहीं. बावाचा आमचा रुसवा जाहाला तर तुह्मांस इतकी योग्यता आहे—

यावरूनहि शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर नानासाहेब कसे कसे वागत आले, त्यांनीं कसे कसे अन्याय केले याचें प्रत्यंतर येईल. शेवटीं या पत्रलेखकानें नानासाहेबांवर धडधडीत ' हें कांहीं तुमचे इमानास योग्य नाहीं ' असा शेरा मारला आहे. यावरून नानासाहेब पेशव्यांकडून मराठी-राज्य बुडवेगिरीचीं कामें घडत होतीं हें सिद्ध होतें. स्वराज्य बुडावयाला अनेक कारणें असूं शकतात. परंतु त्यांत निमक हरामी, विश्वास घातकी, कपटी, स्वार्थी, जुलमी अशीं राजकारणें हटकून राज्य नाश आणि सर्व नाश करीत असतात. नानासाहेब पेशव्यांचें चित्र रियासतकारांनीं पुढील प्रमाणें रेखाटलें आहे. ' सन १७४३ त द्रव्य नद्यांचा प्रवाह दक्षिणेंत आणण्याचा नानासाहेबाचा उपक्रम पुढें दहा वर्षांनीं सिद्धीस गेला. तदुत्तर पेशव्यानें आपल्या दरिद्रतेचें रडगाणें गाइलेलें आढळत नाहीं; उलट उदगीर पानपत वगैरे मोहिमांचे जबरदस्त खर्च पेशव्यानें सहज भागविले; तथापि हा पैसा केवळ लुटीनें व खंडण्यांनीं जबरदस्तीनें फौजेच्या बळावर त्यानें मिळविला. राज्य-कारभारांतील कौशल्यानें धनोत्पादनाचे मार्ग नानासाहेबास उमगले होते असें लागवत नाहीं. म्हणूनच मराठ्यांचे ( पेशव्यांचे ) अंमलास 'राज्य' न म्हणतां, ' लुटारू संस्था ' असें सामान्यतः हिंदुस्थानभर पुढें समजण्यांत येऊं लागलें. शिवाजीच्या राज्य स्थापनेंतील उच्चतर हेतु कालांतरानें बदलत गेले, आणि बाहेरील दिखाऊ ऐश्वर्यांत अंतर्यामीं राज्यास भयंकर कीड लागून राहिली. नानासाहेब, सदाशिवराव, रामचंद्रबाबा, महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस इत्यादि त्यावेळच्या मुख्य मुख्य पुरुषांच्या मनांत वैमनस्य उत्पन्न झालें. त्यांत दोन पक्ष कोणते याचा उलगडा पाहूं गेलें तर फक्त पेशवा ( नानासाहेब ) एका बाजूस व इतर सर्व मंडळी दुसऱ्या बाजूस अशी होती. ' [ म. रि. म. वि. २ पृ. २६० ] यावरून नानासाहेबांच्या राज्यकारभाराचा डौल कसा होता व शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराच्या चाकोरींतून जाणाऱ्या ताराबाईच्या राज्यकारभाराचा कसा होता हें लक्षांत येईल.

नानासाहेब पेशव्यांनीं दमाजी गायकवाड व दाभाडे यांची वासलात

लावल्यावरहि सातान्याच्या किल्ल्याभोंवतीं त्यांनीं घातलेला वेढा उठविला नाहीं. त्यामुळें ताराबाई पुनः संकटांत पडल्या. त्यावेळीं ताराबाईनीं रामराजे यांना घेऊन किल्ल्यांतून खालीं यावें अशी सारखी नानासाहेबांची खटपट सुरू झाली. या त्यांच्या खटपटीचा हेतु उघड होता. ताराबाई खालीं उतरल्या म्हणजे रामराजे यांना पूर्ववत् आपल्या ताब्यांत घेऊन ताराबाईना कोणता तरी कायमचा किल्ला दाखवावयाचा असा होता. ताराबाई सहजा सहजीं किल्ल्या-खालीं येणार नाहींत तेव्हां त्यांना सर्व बाजूंनीं कोंडमारा करून अन्नान्नदशा करून सोडावी म्हणून त्यांनीं किल्ल्याला वेढा घातला होता. हा वेढा घालूनहि किल्ल्यांत त्यांचे फितुरीचे प्रयत्न चालूच होते. नानासाहेबांनीं आनंदराव जाधव हा सातारा किल्ल्यावर हवालदार होता. त्याला फितुर करून घेतलें व त्याच्याकडून रामराजें यांना किल्ल्यावरून बाहेर काढण्याचा प्रयत्न चालविला. 'तेव्हां त्यांणीं सर्व लोक यांचा गाहा (जमाव) करून महाराजांस खालीं घेऊन उतरावें, ऐसा विचार केला तों बारीक बातमी आईसाहेबांस कळोन सदरेस बोलाविलें. हेही कांहीं लोक तयारीनेंच गेले. तों बाबाजी जाधवराव शिरवळकर याजपासून सदरेसच आनंदराव जाधव हवालदार यास खलबतास म्हणून नेऊन शिरच्छेद करविला. लोक सरदार वगैरे फार मारिले, आणि राजे यांस चौकी-शीनें प्रतिबंध बहुत जपून करूं लागली. सर्व कारभार पुराणीक व बाबाजी जाधव करूं लागले.' ( धा. रा. च. पृ. १५७ )

अशाप्रकारें पेशव्यांनीं किल्याला वेढा घालून व फितुरी चालवून सर्व बाजूंनीं जरी आपल्या धनीणीला--ताराबाईना पेंचांत धरलें होतें तरीं अशा संकटांतून ताराबाई आपल्या अगदीं वृद्धावस्थेंतही तरणोपाय काढण्याचा प्रयत्न करीत होत्या. रामदासपंताबरोबर मनसबा करून त्याच्या पुतण्याला पेशवे-पदावर आणण्याचा त्यांचा प्रयत्न हुकल्यानंतर त्यांनीं बाबूजी नाईक बारा-मतीकर यांच्याबरोबर नवीन मनसबा चालविला. प्रतिनिधि पेशव्यांच्या जाळ्यांत अडकल्यामुळें त्यांचा ताराबाईशीं विरोध चालू झाला. पेशव्यांनीं बाबूजी नाईक यांचेकडून कर्नाटकचा सुभा काढून घेतल्यामुळें बहुतेक ते

नेस्तनाबूद झालेच होते. तरीपण त्यांना ताराबाईनीं हाताशीं धरून त्यांस प्रतिनिधिपद देण्याचें ठरविलें आणि त्यांस आपल्या फौजेसह पेशव्यांच्या पारिपत्याकरतां बोलाविलें. त्याचप्रमाणें कोल्हापूरास संभाजी महाराजांबरोबर राजकारण सुरू करून त्यांसही पेशव्यांच्या पारिपत्याकरितां बोलाविलें. बाबूजी नाईक आपल्या हजार पांचशें जमावासह सातान्यास आले व प्रतिनिधींच्या वाड्यांत उतरले. ' आणि हुजरातचीं पतकें लोक वगैरे घेऊन प्रतिनिधी यांचा तालुका आधीं घ्यावा, ह्मणोन रवाना केले. ते तांदुळवाडीनजीक गेले. तों जगजीवनपंडित प्रतिनिधि चालून आले. लढाई मातबर जाली. नाईकास जखमा लागल्या. शिपायगिरी बहुत केली. परंतु मोड जाला. पळून शहरांत येऊन राहिले. पिच्छावर प्रतिनिधि येऊन राहिले. तेव्हां नाईक मशारनिल्हे आठ चार दिवस जखमा बांधून आपलें करणें सिद्धीस जावयाचें नाहीं ऐसें समजोन बारामतीस निघोन गेले. ' [ धा. रा. च. पृ. १७ ] याचवेळीं कोल्हापूरच्या संभाजी महाराजांबरोबर ताराबाईचें जें राजकारण चालू होतें तें त्यांनीं ताबडतोब बाबूजी नायकांच्या मदतीस यावें असें होतें. त्याप्रमाणें ते आपल्या फौजेसह सातान्याला येण्याकरतां निघाले होते. ' संभाजीराजे यांजकडे आईसाहेबांनीं राजकारण केलें. त्यांनीं तयार होऊन यावें, प्रधान यांचें पारपत्य करावें, [ असें ठरलें. ] ते निघाले तों जिजाबाईनीं या कामांत पडूं नये ह्मणोन माघारे नेलें. ' [ धा. रा. च. पृ. १७ ] या माहितीवरून ताराबाई यांचा या वेळेचा मनसुबा काय होता याची कल्पना येते. बाबूजी नाईक यांनीं प्रतिनिधि यांचेबरोबर सामना द्यावा व संभाजीराजे यांनीं पेशव्यांबरोबर सामना द्यावा अशी पेशव्यांच्या पारिपत्याची जोडगोळी त्यांनीं तयार केली होती. प्रतिनिधींनीं बाबूजी नायकांचा जरी मोड केला होता तरी ते ज्याअर्थीं सातान्यास येऊन ' आठ चार दिवस ' राहिले त्याअर्थीं ते संभाजी महाराजांच्या येण्याची मार्गप्रतीक्षा करीत होते असें दिसतें. त्यांच्या येण्याची वाट खुंटल्यानंतर ते बारामतीला निघून गेले असें ठरतें. ठरल्याप्रमाणें संभाजी महाराज आले असते तर त्यांच्याबरोबर पेशव्यांना सामना द्यावा लागला

असतां; व त्यामुळें पेशव्यांची थोडीबहुत शिल्लक राहिलेली अब्रू चव्हाट्यावर आली असती. परंतु ते कारस्थानें रचण्यांत कमी नव्हते. त्यांनीं कोल्हापुरास कारस्थान करून जिजाबाईंना इमानप्रमाण देऊन आपल्या पक्षांत ओढलें. याकरितां संभाजी महाराज लढाईवर निघाले असतां ' जिजाबाईंनीं या कामांत पडूं नये ह्मणोन माघारें नेलें. ' ही गोष्ट घडून आली नसती. ही वेळ ह्मणजे ताराबाई व रामराजे यांच्या जीवितरक्षणाची होती-भोंसले घराण्याच्या मानप्रतिष्ठेच्या रक्षणाची होती. म्हणूनच संभाजीराजे स्वतः पेशव्यांशीं आपल्या चाकराशीं लढण्याकरतां चालले होते. अशा वेळीं त्यांना ज्याअर्थीं जिजाबाईच्या सांगण्यावरून माघारें फिरावें लागलें त्याअर्थीं भोंसले घराण्याची मानप्रतिष्ठा संरक्षण करण्याचीं इमानप्रमाणें पेशव्यांनीं जिजाबाईंना दिलीं असलीं पाहिजेत हें निश्चित ठरतें. नानासाहेब आपण दिलेलें इमानप्रमाण पाळतील अशी जिजाबाईंची या वेळीं खात्री झाली असावी म्हणूनच त्यांनीं संभाजी महाराजांना माघारीं फिरविलें. पुढें सातआठ वर्षांच्या अवधींतच जिजाबाईच्या नशीबींही नानासाहेब पेशव्यांवर ' बेइमान ' ह्मणून शिक्कामोर्तब करण्याचा प्रसंग ओढवला. हा इतिहास पुढें योग्य स्थळीं येईलच. परंतु या वेळीं तरी नानासाहेब इमानप्रमाणाच्या मंत्रावर विजयी झाले व त्यांनीं त्याच्या बळावर ताराबाईचे सर्व प्रयत्न अयशस्वी करून सोडले.

नानासाहेब पेशव्यांना वठणीवर आणण्याकरितां ताराबाईचे कसे प्रयत्न चालले होते याची कल्पना नानासाहेबांनीं जयाजी शिंदे यास लिहिलेल्या पत्रावरून येण्यासारखी आहे. ' आशीर्वाद उपरि. गु॥ ( गुजराथे ) पासून ताराबाईशीं बिघाड पडला. त्याजमुळें नानाप्रकारें पेंच त्यांनीं केले. ज्याशीं आह्मीं गोड न बोललों ते त्यांचे लगामी. ज्याशीं आह्मीं गोड बोललों तोही त्यांनीं लटका चढीं लावून आपले लगामी लावलेच आहेत. कोठें ताळ राहिला नाहीं. यास्तव आह्मीं कबूल केलें कीं, दादोबांस प्रतिनिधि द्यावी, सर्व कारभार त्यांनीं करावा. आमची गुजराथ कर्नाटक दिल्याप्रमाणें चालवावें त्यांनींही कबूल केलें. परंतु खालीं उतरल्यावांचून, भेट जाल्यावांचून, जनांत नीट

दिसत नाहीं, संशय तुटत नाहीं, यास्तव बहुतां प्रकारें आग्रह करतों. परंतु खालीं उतरतांच राजा पळून जाईल, अगर आह्मी मागती राजास हातीं धरून आपल्यास मुरदाड करतील, हा संशय मानून संकटांत आहेत. परंतु सभोंवतीं भलताच गुरें वळितो. पोटास एक पैसा येत नाहीं, सोनें, रुपें मोडून खावें येथपावेतों आलें. यास्तव मातबर मराठे मध्यस्त घेऊन उतरावें. ऐसा करार जाहला आहे. उतरलीं तर उत्तम, नाहींतर एका खांशानें दहाहजार फौजेनिशीं येथें असलें पाहिजे. मुरारजी घोरपडे व मोंगल यांजकडे नानाप्रकारें आह्मांशीं अतिवादास प्रवर्तून राजकारणें करितात. सर्व संभाळलें पाहिजे. घरकलह कठीण आहे. येतद्विषयीं कसें करावें ? तुह्मांकडे, मल्हाररायाकडे देखील, राजकारणें करितात ऐसें ऐकितों. त्यास तुह्मांशीं राजकारण केल्यास काय होणें ? परंतु यत्नास चुकत नाहींत. पुढें जें होईल तें लिहून पाठवूं हे आशीर्वाद.' ( का. सं. प. या. ले. ३५३ ) हें सर्व पत्र नानासाहेब पेशव्यांच्या हातचें आहे. या पत्रावरून नानासाहेबांनीं ताराबाईंची स्थिति जवळचें सोनें रुपें मोडून खाण्यापर्यंत कशी बिकट करून टेविली होती याचा उलगडा होतो. शिवाय या वेळेच्या ताराबाईंच्या आर्थिक बिकट परिस्थितींत त्यांनीं रामराजे यांना घेऊन किल्ल्याखालीं यावें असा जो पेशव्यांचा प्रयत्न चालला होता तो केवळ रामराजे यांना आपल्या ताब्यांत घेऊन ताराबाईंना मृतप्राय करावें हा त्यांचा मुख्य डाव होता. पण तो डाव ताराबाई ओळखून असल्यानें किल्ल्यावर भुकेनें मरून जाऊं पण भोंसल्यांचा वंश दरवेशी—पेशव्यांच्या हातांतील आस्वल होऊं देणार नाहीं अशी ताराबाईंची प्रतिज्ञा असल्यानें त्या किल्ल्याखालीं आल्या नाहींत. किल्ल्याखालीं ताराबाईनीं यावें या नानासाहेबांच्या मायावी प्रयत्नास ताराबाईनीं रोखठोक उत्तर पाठविलें कीं, ' तुम्हीं फौजेसुद्धां येऊन परिघ घातला आहे, तो उठवून तुम्हीं स्वस्थळास जावें. तदनंतर जें बोलणें तें सांगोन, हरकोणी आपले तर्फेनें पाठवून द्यावा. त्यांसी जाबसाल करावा तो केला जाईल.' ( इ. सं. ऐ. टि. भाग १ ले. ३५ ) ताराबाईनीं आपल्या अगदीं वृद्धावस्थेंत आणि पेशव्यांनीं त्यांच्या अगदीं नरडीवर आण-

लेल्या संकटांतसुद्धां सिंहीणीच्या मनोधर्माला साजेल असें वरील ताठ उत्तर पेशव्यांना पाठविलें. हें वाचून कोणत्या महाराष्ट्र–सत्पुत्राला आणि कोणत्या तेजस्वान् आर्य महिलेला ताराबाईच्या प्रभावी धीरोदात्ततेबद्दल आनंदाचें व कौतुकाचें भरतें येणार नाहीं ? खात्रीनें प्रत्येकाच्या अंगावर त्यामुळें रोमांच उभे राहतील व त्याच्या नसानसांतून वीरश्रीच्या रक्ताचा ओघ तुफानी वादळाप्रमाणें वाहूं लागेल ! आणि त्याच हर्षोन्मादांत 'धन्य ती ताराबाई,' 'धन्य ती मोंगलमर्दिनी,' 'धन्य ती वीरांगना,' 'धन्य ती वीर कन्या' 'धन्य ती भोंसले कुलदीपिका' असे धन्योद्गार त्याच्या मुखावाटे स्वाभाविक बाहेर पडल्याशिवाय राहणार नाहींत.

याच सुमारास ह्मणजे ता. ११ जून सन १७५१ इ. रोजीं नानासाहेबांनीं सातान्यास आपला कारभारी दिनकर महादेव यास ताराबाईपाशीं ठेवला होता त्याला हें पुढील पत्र लिहिलें आहे: [ हें पत्र खंड ३ ले. १३६ चें आहे. ] 'राजश्री दिनकर महादेव गोसावी यांसी:— सु॥ इसने खमसैन मया व अल्फ. रा. गणेश बल्लाळ आज मंगळवारी प्रविष्ट जाहाले. त्यांनीं वर्तमान सांगितलें. तेथें भावर्थ कीं, गुजराथ निम्मे व सिंहीगड मात्र करार कर्नाटक न द्यावें, कारभार राजश्रींनीं खातेरेस येईल तें करावें. ऐशीयास, राजश्रीस अटकाव गडावर जाहाला, यासाठीं इतके दिवस भांडलों, ज्यांनीं अटकाव केला त्यांचे दावेदार जालों. सर्व मातब्बरांचा डौल एकीकडे. एक आमचा मात्र निश्चय कीं भांडून अथवा सलूखानें राजा सुटावा, ज्याचे चाकर ह्मणविलें त्यासाठीं मेहनत करावी, मग तो बूज करून कृपा करील तेच विशेष. या अर्थें लाखों रुपये खाऊन आपले मनसब बुडवून, राजा सुटावा या थरास आणिलें. सर्व आईसाहेबांचे पक्षी मिळाले होते. एक आम्ही मात्र राजश्रींचे पक्षींचे जाणून आमचे पारिपत्यास सर्व राज्यांतील सरदार प्रेरिले. गायकवाड तो सर्व देश लुटीत सातारियासच आला, याजमुळें भागानगर व कर्नाटक प्रांतींचीं कामें अन्तर जाहालीं. इतके पदार्थ राजश्रींचे सुटकेचे उपयोगास लागलों यास्तव प्राप्त जाहाले. आतां गडावर सर्वाध्यक्षता राजश्रींची जाहालिया

उपर आमचे मनोरथ बाकी राहिले नाहींत. मतलबाचे यादीवर करार त्यांनीं संतोषें करून देणें उचित. यद्यपि न दिल्हे तरी आम्हीं त्यासाठीं अडवावें असें नाहीं. जेव्हां खालीं येतील तेव्हां सर्व सेवकांच्या रीती व आमचे स्थितीची तुळणा करितील. राजास वर बसविलें होतें यास्तव आम्हीं किल्ल्याशीं भांडत होतों. आतां राजाचा यख्तियार परिच्छिन्न जाहला असिला तरी एके दिवसांत आमची फौज उठोन येईल. आपलें पदरचें खाऊन बसावयाचें प्रयोजन काय? परंतु सांगोल्याहून राजे गेले ते समयीं चिं. नाना व चिरंजीव भाऊनीं अर्ज राजश्रीस केला होता कीं गडावर न जावें. परंतु आमचा अविश्वास यामुळें गेले. शेवटीं कर्मभोग अपकीर्ति येथपावेतों जाहाली. आतां राजे वर राहिले, आमचे फौजेस उठवून लाविलें, तरी मागती अनेक कल्पना व्हावयास अंतर होणार नाहीं. करवीरकरांकडील वगैरे पेंच बहुत आहेत. खावंद लोकांनीं व जे हालीं तेथें मंत्र सांगणार असतील त्यांसीं दीर्घ विचारून जें करणें तें करावें. सर्वोत्तम पक्ष हाच कीं, तिळमात्र संशय न धरतां राजश्रींनीं खालीं यावें. दिल्ली, इरान, तुरानापासून रामेश्वरापावेतों दुर्लौकिक जाहला आहे तो दूर करावा. कारभाराचा अर्थ तर जोरावारीनें आजपर्यंत कोठेंहि कारभार शेवटास गेले नाहींत. सर्व योग खावंदाची रजावंदी राखावी, हेच आमची इच्छा. खावंदानीं आपले आवडीनें कारभार घेतील तेव्हांच करू. कारभाराकरितां बहुतांचा दावा पदरीं पडतो तो कारभार कशास पाहिजे? खावंदांनीं दिल्हे दौलतींत कारभार बहुत आहेत. नवा तोतया लबाडी करील यास्तव ठेविला, त्यास जिवें न मारावें, वरकड खातरेस येईल तेथें ठेवावा. आमचा गुंता तिळमात्र नाहीं. खावंदांनीं सुखरूप राज्य करावें. याप्रकारें बोलोन हवालदारास समजोन सांगोन खालीं प्रतिपदेस येत तें करणें. वेरझारेवर काम पडल्यास अनेक विघ्नें उपस्थित होतात. यास्तव रंग भरून त्यांची निशा करून खालीं येत, आम्हीं श्रम केलियाचें सार्थक होय, तें करणें. छ. २७ मंगळवार, संध्याकाळ.

हें पत्र नानासाहेबांचें दिनकर महादेव या त्यांच्या ताराबाईकडील कारभाऱ्यास लिहिलेलें आहे. रामराजे यांना ताराबाईच्या संरक्षणाखालून

पळवून नेण्याचा जो उपक्रम त्यांनीं चालविला होता त्याची स्पष्ट कल्पना या पत्रावरून येण्यासारखी आहे. म्हणून या पत्राची येथें थोडीबहुत चिकित्सा करणें प्राप्त आहे. सांगोल्याहून रामराजे साताऱ्यास आल्यानंतर नानासाहेब यांचा एक पक्ष व ताराबाई आणि इतर सर्व मातब्बर मंडळी यांचा दुसरा पक्ष असे उघड दिसूं लागले. ' सर्व मातब्बरांचा डौल एकीकडे. ' या वाक्यप्रयोगावरून स्पष्ट होतें. अर्थात् हे दोन पक्ष नानासाहेबांनीं सदाशिवरावभाऊंना कोल्हापूरच्या महाराजांकडे न जाऊं देतां महादोबा पुरंदरेना कारभारीपदावरून दूर करून त्यांना कारभारीपद दिल्यानंतरच हे दोन पक्ष निर्माण झाले यांत संशय नाहीं. कारण ' गुजराथ निम्मे व सिंहीगड मात्र करार कर्नाटक न द्यावें ' यावरून म्हणजे ' कर्नाटक न द्यावें ' याकरतां प्रथमतः वादास प्रारंभ झाला. सांगोल्यास जी राज्यव्यवस्था झाली त्यावेळीं तेथें महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस, रामचंद्रबाबा, सदाशिवरावभाऊ हे होतेच. असें असतां तेथें ज्याअर्थीं कर्नाटकाबद्दल वाद उत्पन्न झाला नाहीं, एकमतानें कारभाराची निरवानिरव केली गेली, त्याअर्थीं नानासाहेबांच्या कोणत्यातरी नवीन कारस्थानामुळें या सर्व मुत्सद्यांमध्यें व नानासाहेबांमध्यें वाद उत्पन्न झाला हें निश्चित होतें. आणि तो वाद प्रामुख्यानें ' कर्नाटका ' बद्दल होता. कर्नाटक सदाशिवरावभाऊ यांच्या नांवानें करून त्यांना कोल्हापूरच्या राज्यांतील पेशवेपदावर नेऊन बसविण्यांत मुत्सद्यांनीं जें राज्यरक्षणाचें धोरण आंखलें होतें तें नानासाहेबांनीं सदाशिवरावभाऊंना बगलेंत मारून हाणून पाडलें. त्यामुळें बाकीच्या मुत्सद्यांचा डाव हुकला व ते क्रुद्ध झाले. त्यांची मोठी बिकट परिस्थिति झाली. इकडे यांच्या पक्षांतून सदाशिवरावभाऊ गेला व जातांना कर्नाटकचा सुभा घेऊन गेला. त्यामुळें गुजराथ गेली ती गेलीच आणि कर्नाटकहि गेलें. त्यामुळें पेशव्याची सत्ता अमर्यादित होऊन छत्रपतीसुद्धां निर्बल झाले. या सर्व स्वराज्यनाशाच्या गोष्टी घडून आल्यामुळें साताऱ्यास वरील दोन पक्ष निर्माण झाले हें स्पष्ट होतें आणि याच वादाकरतां ताराबाईनीं रामराजे यांना किल्ल्यावर स्वरक्षणाखालीं नेऊन ठेविलें होतें हें स्पष्ट आहे.

नानासाहेबांचा हेतु आपल्याविरुद्ध असलेल्या सर्व मुत्सद्यांना, सर्व सरदारांना ताराबाईसह रसातळाला पोंचवून मराठी राज्याचे एकमेव सर्वाध्यक्ष होण्याचा होता व त्याला राजमान्यता आणि लोकमान्यता मिळण्याकरतां रामराजे यांच्या कबजाची त्यांना जरूरी होती. रामराजे एकदां त्यांच्या हातांत सांपडले कीं, त्यांच्याकडून कोणतीही गोष्ट सामोपचारानें अगर जोरावारीनें पेशव्यांना करून घेतां आली असती. रामराजे यांना सातारा किल्ल्यांत अडकवून नानासाहेबांनीं जो त्या किल्ल्याला वेढा घातला होता व रामराजे यांना सर्व बाजूंनीं संकटांत आणलें होतें त्यामुळें त्यांचा दुर्लौकिक सर्व हिंदुस्थानभर पसरला होता. ‘ दिल्ली, इरान, तुरानापासून रामेश्वरापावेतों दुर्लौकिक जाहाला आहे तो दूर करावा.’ असें जें नानासाहेबांचें म्हणणें आहे तें याचकरतां आहे. साम, दाम, दंड हे तीनही मार्ग आतांपर्यंत त्यांनीं केले. परंतु ताराबाईंच्या दक्षतेमुळें ते फसले. याकरितां हा शेवटचा भेदाचा मार्ग त्यांनीं दिनकर महादेव या आपल्या कारभाऱ्याच्या हस्तें चालविला होता. सांगोल्याचा कारभार जोरावारीनें झाल्यामुळें पेशव्यांबद्दल रामराजे यांचे मनांत अविश्वास उत्पन्न झाला असावा अशी शंका नानासाहेबांना आल्यावांचून राहिली नाहीं. आणि त्या शंकेमुळेंच रामराजे यांना कोणतींही आमिषें दाखविलीं तरी ते खालीं उतरण्याचा प्रयत्न करीत नाहींत असें नानासाहेबांना वाटत होतें. त्याकरतां रामराजे यांच्या मनांत निखालसता उत्पन्न व्हावी म्हणून ‘ सांगोल्याहून राजे गेले ते समयीं चिं. नाना व चिं. भाऊंनीं अर्ज राजश्रीस केला होता कीं गडावर न जावें. परंतु आमचा अविश्वास यामुळें गेले. ’ ‘ सर्वोत्तम पक्ष हाच कीं, तिळमात्र संशय न धरतां राजश्रींनीं खालीं यावें. ’ ‘ कारभाराचा अर्थ तर जोरावारीनें आजपर्यंत कोठेंहि कारभार शेवटास गेले नाहींत. ’ अशा मायावी वाक्यप्रयोगांनीं रामराजे यांना भारून टाकण्याचा नानासाहेबांचा हेतु होता. रामराजे यांच्या बाबतींत त्यांचे हे भेदाचे प्रयत्न निव्वळ मायावी कसे होते याचें त्यांच्या पुढील वाक्यावरून प्रत्यंतर येतें. ‘ यास्तव रंग भरून त्यांची निशा करून खालीं येत, आम्ही श्रम केलियाचें सार्थक होय, तें करणें.’

या वाक्यांत नानासाहेबांच्या मायावीपणाचा सर्व रंग भरलेला आहे. रामराजे यांनीं खालीं यावें याकरतां दिनकर महादेवानें वाटेल तो रंग भरावा, वाटेल त्या आणा शपथा घ्याव्या, वाटेल तीं आमिषें दाखवावीं, वाटतील तेवढीं कपटकारस्थानें उभारून रामराजे यांची खात्री पटवून द्यावी आणि त्यांना कसेंही व कोणत्याही मोलानें खालीं आणावें अशी नानासाहेबांची आज्ञा होती हें त्यांच्या वरील वाक्यप्रयोगावरून उघड होतें.

**८. रामराजे यांचा तोतया:**— रामराजे यांनीं ताराबाईना सोडून नानासाहेबांच्या अंकित रहावें याकरितां नानासाहेबांनीं जे जे विश्व प्रयत्न केले त्यापैकीं रामराजे यांचा 'तोतया' निर्माण केला हा एक त्यांचा महत्त्वाचा पाताळयंत्री प्रयत्न होता असें वरील पत्रावरून दिसतें. सांगोल्याहून रामराजे परत आल्यानंतर ताराबाईनीं त्यांना किल्ल्यावर नेलें. त्यावेळीं ताराबाईच्या सल्ल्याशिवाय मुत्सद्यांनीं जो राज्यकारभार आटोपून घेतला होता व त्याला रामराजे यांनीं जी संमति दिली होती त्याबद्दल ताराबाईना त्यांचा मनस्वी राग आला होता. त्या रागाच्या भरांत त्यांनीं रामराजे यांची, 'अरे, तूं वंशज नव्हेस; मीं आपला मूल गोंधळ्याचे घरीं लपवून ठेविला होता, त्यानें तो ठेवून आपला पुत्र दिला असेल. त्या तुला चौकशी न करितां मी एवढ्या-पदावर बसवून आतां मोठा पश्चात्ताप पावलें कीं, जो गोंधळ्याचा पोर तो शिवाजीचा वंशज मीं केला. त्या पापाचें प्रायश्चित मला कृष्णेचे कांठीं जाऊन केलें पाहिजे.' (म. ब. पृ. १८२) याप्रमाणें निर्भर्त्सना केली होती. रामराजे यांनीं कारभाऱ्यांच्या जोरावारीला भीक घालून सांगोल्यास ताराबाईच्या परोक्ष ज्याअर्थीं राज्यकारभाराला संमति दिली त्याअर्थीं रामराजे हा शिवाजीचा वंशज नव्हे अशी ताराबाईना शंका आली. शिवाजी महाराज आपल्या मातेच्या ठिकाणीं केवढी भक्ति व श्रद्धा ठेवीत होते! त्यांच्या सल्ल्याशिवाय कोणताही राज्यकारभार घडवून आणीत नव्हते. असें असतां ज्या अर्थीं सांगोल्यास रामराजे यांनीं ताराबाईचा सल्ला न घेतां राज्यकारभाराला संमति दिली त्या अर्थीं तो शिवाजीचा वंशज नसला पाहिजे अशी

आजपर्यंतच्या प्रथेवरून ताराबाईची समजूत होणें स्वाभाविक होतें. त्याला अनुसरूनच वरील ताराबाईचे उद्गार होते. 'रामराजांत बिलकूल करामत नाहीं, असें पाहून ताराबाईस मोठा त्वेष उत्पन्न होई, आणि आवेशाच्या भरांत 'तूं खरा नव्हस खोटा आहेस,' असे उद्गार सर्वांचे देखत तिच्या तोंडांतून वारंवार निघत, तेव्हां हळुहळु त्यांचा प्रसार जनवार्तेंत झाला. 'तूं राजबीजाचा नव्हस, खरोखर उचल्या आहेस,' असें ताराबाई त्याची वारंवार निर्भर्त्सना करतांना त्यास ह्मणे. त्यामुळें रामराजाचा तोतया उत्पन्न झाला. 'लटका राजा राजमाचीस ठेविला होता. तो साताऱ्यास रामराजाकडे पाठविला होता. तो लबाड, त्याजला डाग देऊन डावे हाताची करंगळी तोडून, पांच पाट काढून त्याजला बाहेर घातला. त्याजबरोबर गोसावी होता, त्याचे कान कापले. तोतयानें सांगितलें, मी अहीररायाचा, माझें नांव संताजी, बापाचें नांव संभाजी अहीरराव. मजला यशवंतराव प्रभूंनीं व आणख्यांनीं भर देऊन राजा म्हण, म्हणून सांगितलें.' [ पु. रो. पृ. ६७-१५ जुलई १७५१ ] ( म. रि. म. वि. २ पृ. २७० )

वरील रामराजे यांच्या तोतयासंबंधीची, डफसाहेबानें दिलेली व पुरंदरे यांचे रोजनिशींचे आधारें रियासतकारांनीं दिलेली माहिती मागील नानासाहेबांच्या ता. ११ जून १७६१ च्या पत्राबरोबर वाचली ह्मणजे पेशव्यांच्या कारस्थानांवर नवीन प्रकाश पडल्यावांचून राहत नाहीं. पेशव्यांनीं या तोतयास राजमाचीहून रामराजे यांचेकडे सातारा किल्ल्यावर पाठविलें. त्या ठिकाणीं त्याची चौकशी सुरू झाली व तो खोटा आहे असें निश्चित झालें. त्याच्या लबाडीबद्दल त्याला जिवें मारण्याची शिक्षा होणार हें जेव्हां नानासाहेबांना समजलें तेव्हां त्यांनीं तोतयाच्या वतीनें ताराबाईशीं रदबदली करण्याकरितां व वशिला लावण्याकरतां आपल्या दिनकर महादेव कारभाऱ्यास लिहिलें. 'नवा तोतया लबाडी करील यास्तव ठेविला, त्यास जिवें न मारावें, वरकड खातरेस येईल तेथें ठेवावा. आमचा गुंता तिळमात्र नाहीं.' हा मजकूर नानासाहेबांनीं लिहिल्यानंतर एक महिना चार दिवसांनीं त्या तोतयाला जिवें न मारतां

त्याला डाग देऊन, त्याच्या डाव्या हाताची करंगळी कापून व त्याचे पांच पाट काढून त्याला बाहेर घातलें. पेशव्यांच्या आग्रहामुळेंच त्याला महाअपराधी ह्मणून जिवें मारण्याची शिक्षा न होतां अगदीं सामान्य शिक्षा ताराबाईनीं दिली. पेशव्यांना या तोतयाच्या बाबतींत एवढी भीड घालण्याचें काय कारण होतें ? अर्थात् तेथें कांहींतरी पाणी मुरत होतें हें उघड आहे. 'मजला यशवंतराव प्रभूंनीं व आणख्यांनीं भर देऊन राजा म्हण, म्हणून सांगितलें.' या वरील माहितींत विशेष महत्व आहे. यशवंतराव प्रभू म्हणजे यशवंतराव पोतनीस हे होत. यांना सांगोल्याच्या नवीन व्यवस्थेंत कारखाने व खासगी कारभार मिळून चाळीस हजारांचा सरंजाम मिळाला होता ह्मणून ते पेशव्यांच्या लगामीं होते. यांच्या व आणखीं कांहीं मंडळींच्या प्रेरणेनें हा तोतया निर्माण झाला होता. अर्थात हा तोतया निर्माण करण्यांत या मुत्सद्यांना कोणतें तरी राजकारण साधावयाचें होतें हें निश्चित ठरतें. तें राजकारण म्हणजे रामराजे यांच्या खरेपणाबद्दल ताराबाईना शंका वाटूं लागली होती ह्मणून त्यांना जास्त बुचकळ्यांत घालण्याकरतां ही नवीन तोतयाची योजना असावी असें दिसतें. या नवीन तोतयाची छाप ताराबाईवर पडून व रामराजे यांना त्यांनीं तोतया ठरवून त्यांना गडाखालीं सोडलें तर आयतेंच काम होईल अशी मुत्सद्यांची कल्पना असावी. रामराजे खालीं येतांच त्यांना हाताशीं धरून मनमानेल त्याप्रमाणें पुढील राज्यकारभार हांकण्यास ते मोकळे होणार होते, व ताराबाई वृद्धापकाळामुळें पागल झाली असें जाहीर करून त्यांना बंदीखान्यांत डांबून टाकण्याची नवीन व बिनतोड संधि प्राप्त होणार होती. शिवाय या नव्या तोतयास सातारा किल्ल्यावर पाठविल्यानंतर त्याविषयीं ताराबाईच्या खरा अगर खोटा या निकालाकडे डोळे लावून रामराजे यांना आपलें जीवित कंठावें लागणार होतें. तेव्हां ताराबाईच्या या निकालाची वाट पहात न बसतां त्यांनीं पेशव्यांच्या इच्छेप्रमाणें किल्ल्याखालीं उतरून पेशव्यांना मिळावें हा त्यांचा हेतु साध्य व्हावा ह्मणून ही तोतयाची क्लृप्ति मुत्सद्यांनीं काढली असली पाहिजे असें दिसतें. पेशव्यांनीं या नव्या तोतयास

राजमाचीवर जें ठेविलें होतें तें खऱ्या रामराजे यांची भूमिका तयार करण्याकरतां ठेऊन घेतलें असावें असें अनुमान निघतें. हें अनुमान ताराबाईनीं काढूं नये किंवा तसें अनुमान काढल्यास त्यास ताबडतोब उत्तर देतां यावें म्हणून नानासाहेबांनीं आपल्या पत्रांत दिनकर महादेव यास सूचना दिली आहे. ' नवा तोतया लबाडी करील यास्तव ठेविला. ' हें उत्तर ' तोतयास पेशव्यांनीं साताऱ्यास न पाठवितां आपल्या ताब्यांत राजमाचीस कां ठेवलें ' अशा ताराबाईच्या प्रश्नांस दिनकर महादेव यास उत्तर देतां यावें म्हणून पूर्व तयारी त्यांनीं करून ठेवलेली दिसते. यावरून हा तोतया निर्माण करण्यांत खऱ्या रामराजांची किल्ल्यावरून सुटका व्हावी असा जरी मुत्सद्यांचा डाव होता तरी ताराबाईना फसवण्याकरतांच तो निश्चित केला होता असें स्पष्ट दिसतें. त्या तोतयानें यशवंतराव प्रभूंचें नांव सांगितलें. ' व आणखयांनीं ' भर दिली असें सांगितलें. ते आणखी कोण ? हा प्रश्न राहतोच. तेव्हां त्यांचीं नांवें सांगतां येत नाहींत किंवा तीं सांगितलीं असतां बाहेर फोडतां येत नाहींत अशींच तीं नांवें पाहिजेत. अर्थात् नानासाहेबांची रामराजे यांना किल्ल्याखालीं आणण्याची चालू असलेली खटपट; पहिल्यानें तोतयास आपल्या ताब्यांत राजमाचीस ठेवण्याची योजना व शेवटीं त्याला जिवें मारूं न देण्याची खटपट ही सर्व माहिती लक्षांत घेतां हा तोतया निर्माण करण्यांत नानासाहेब हेच मुख्य प्रेरक होते अशी जबरदस्त शंका आल्याशिवाय रहात नाहीं. ताराबाई या औरंगजेबासारख्या जहाल कपटकारस्थान्याबरोबर राजकारण खेळलेल्या असल्यामुळें या मुत्सद्यांच्या कपटाला त्या बळी पडल्या नाहींत व त्यांनीं त्या तोतयाला अपराधी ठरवून आणि पेशव्यांच्या शब्दाला मान देऊन त्या तोतयाची सामान्य पारिपत्यानें मोकळीक केली. पेशव्यांच्या म्हणण्याप्रमाणें एखाद्या किल्ल्यावर अडकून ठेविलें असतां पुनः शंकेला व नवीन कारस्थानें रचण्याला मार्ग शिल्लक राहतो म्हणून हें तोतयाचें प्रकरण ताराबाईनीं निकालांत काढलें. खरें व सरळ राजकारण हें असेंच असावयास पाहिजे.

**९ ताराबाईशीं पेशव्यांचा तहः–** नानासाहेबांनीं रामराजे यांना आपल्या कबजांत घेऊन व ताराबाईंना अलग करून राज्यकारभार स्वतंत्रपणें करण्याचे विश्वप्रयत्न केले. परंतु ताराबाईंनीं ते सर्व हाणून पाडाले. शेवटीं ताराबाईपुढें नानासाहेब पेशव्यांनीं हार खाल्ली आणि त्यांनीं ताराबाईबरोबर सलोखा घडवून आणल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं असें ठरविलें. शेवटीं 'पेशव्यानें आंतून अनेक इसमांच्या मार्फत ताराबाईशीं लेखी सलूख करावा, असा घाट रचिला.' (म. रि. म. वि. २ पृ. २७८) या सलोख्याचें काम ता. ३ मे सन १७५१ च्या मागील ताराबाईच्या पत्रापासून चाललें होतें. त्या पत्रानंतर पेशव्यांनीं रामराजांना किल्ल्यावरून पळविण्याचा प्रयत्न केला. तोही पेशव्यांच्या फितुरी हवालदाराला ठार करून ता. १६ जुलै सन १७५१ रोजीं हाणून पाडला. याच वेळीं म्हणजे ता. १५ जुलै सन १७५१ रोजीं रामराजे यांच्या तोतयाचाही निकाल लावून तोही पेशव्यांचा डाव त्यांनीं हुकवून लाविला. या सर्व पेशव्यांच्या कारस्थानामुळें त्यांचा दुर्लौकिक हिंदुस्थानभर पसरला. तेव्हां ताराबाईच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्याबरोबर सलोखा करून घेणें पेशव्यांना प्राप्त झालें. त्यांनीं नंतर ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें सातारा किल्ल्याला वेढा घातलेलें आपलें सैन्य काढून घेतलें व त्यांच्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्या वेळीं ताराबाईंना नानासाहेब पेशवे बरेच वठणीवर आले असें पाहून बरीच वाटाघाट होऊन जो तह झाला तो खालीं दिला आहे. हा तह शके १६७४ मध्यें म्हणजे सन १७५१ च्या ऑगष्ट नंतर व आक्टोबरच्या आंत झाला असला पाहिजे. कारण ता. १३ आक्टोबर सन १७५१ रोजीं ताराबाई सातारा किल्ल्यावरून खालीं शहरांत रहावयास आल्या. तेव्हां त्यापूर्वीं हा तह घडून आला असला पाहिजे हें निश्चित ठरतें. तसेंच रामराजे यांना किल्ल्यावरून पळवून नेण्याचा जो मनसुबा नानासाहेबांनीं केला तो जुलै महिन्यांतला असल्यामुळें त्यानंतरच हा सलूख घडवून आणण्याचा नानासाहेबांचा प्रयत्न यशस्वी झाला यांत शंका नाहीं. या तहाची यादी खंड ६ ले. २७६ वर खालीं दिल्याप्रमाणें आहेः–

श्री शके १६७४

यादी ——————————— ———

तह श्रीमंत महाराज मातुःश्री आईसाहेब यांसी राजश्री नाना पेशवे यांनीं करून दिल्हा. वि॥ राजश्री मोरो शिवदेव व कारभारी नि॥ श्रीमंत महाराज मातुःश्री व महादाजी नाईक निंबाळकर व दिनकर महादेव वकील निसबत राजश्री पंतप्रधान. कलम बंदाचें अक्षर मोरो शिवदेव यांचे हातचें. कलमागणित मखलाशी खुद्द श्रीमंत राजश्री पंतप्रधान नानासाहेब यांचे हातची.

१ कैलासवासी चिरंजीव राजश्री यांचे कारकीर्दीचा मामला आहे. त्याचा सरकारचा दरमाहे वगैरे ऐवज हुजूर पावत आहे. त्याजप्रों द्यावा. आणि एकनिष्ठेनें सेवा करावी. कलम १

याचें प्रतिउत्तर. मागील राहिला पैका मुदती फुरसतीनें घ्यावा. पुढें पूर्ववत् साहेब खालीं आलियावर दरमाहे वगैरे सर्व चालेल.

२ राजश्री यमाजी शिवदेव यांची वस्तभाव हत्ती घोडे जी नेली असेल ते त्यांचे स्वाधीन करून मानिलेस हुजूर आणून स्वाधीन करावें. कलम १

जामीन घ्यावा, मुतालकी न सांगावी, एणेंप्रमाणें जाहाल्यास त्यास सोडून साहेबांपाशीं पाठवूं.

३ विष्णू विश्वनाथ व रामाजी केशव यांजपासून सेवा अनुकूल पडली तरी घेतली जाईल. साहेबाचे चित्तास न आलें तरी सेवा न घेऊं. परंतु त्यांचे इज्जतीस खता न करितां निरोप देऊं. त्यांनीं दुसाला हिशेब सरकारचा वारून द्यावा. कलम १

वरकडाप्रमाणें यांजवरीही कृपा करावी. पुढें अंतर पडले यास निरोप द्यावा.

४ हुजूरचे खासगीचे महाल व गांव याची घालमेल करून दुसरियास दिल्हे असतील ते हुजूरचे हुजूर ठेविले जातील. कलम १

राजश्रींचे सनदेशिवाय जें जाहालें असेल तें न चालवावें.

५ राजश्री पंतप्रतिनिधी यांचे तालुकियाचे गड व ठाणीं व कोट व

महाल व फुटगांव वगैरे लोकांकडे जे असतील ते व वस्तभाव व चिरंजीव श्रीनिवास गंगाधर व गोपाळराऊ महादेव यांजकडे आहे तें हुजूर आणून द्यावें. कलम १

राजश्रीचे सनदेशिवाय जें गांवखेडें गेलें असेल तें सर्व नीट करून द्यावें, उचित असे.

६ उमाबाई दाभाडे व सेनापति व दमाजी गायकवाड व मुलें व अंबिकाबाई यांस हुजूर आणून द्यावें. कलम १

साहेबांचे सनदेप्रों सर्वांनीं वर्तावें. तें न करितां कलह वृद्धि केली. सेवकाजवळ साहेबांची व महाराजांची सनद त्याप्रों कलहांत ईश्वरें यशच दिल्हें. परंतु एक साल मात्र गेलें. पदरचे तीस लाख खादले. पंचवीस लाखांची निशा रोख केली. आणि निमे गुजराथ सनदेप्रों ठाणींसुद्धां न झुंजतां सनदेप्रों दिल्हेंयावर सेवकाचा तिळमात्र गुंता नाहीं. येणेंप्रमाणें निकाल करावयास साहेबीं उमाबाईस हुजूर बोलाविलें. यास साहेबांचें येणें खालीं होतांच उमाबाईस साहेबांकडे जावयास सांगू. साहेबीं जी उचित आज्ञा कर्तव्य ते करून सेवकाचा बाजवी निकाल करून देवावा. न देत तर त्यांस सेवकाकडे पाठवावें. साहेबांचे सनदेप्रों सेवक वर्ततील.

७ किल्ले सिंहगड साहेबीं दिल्हा तो करार असे. कलम १

साहेबांचे प्रमाणवचन रामबाण आहे. करार केला, उत्तम असे.

८ निम्मे गुजराथ साहेब तुह्मांवर कृपाळू होऊन दिल्ही. त्यास सरकारचा ऐवज दाभाडे हुजूर देत आहेत त्याजपैकीं निम्मे ऐवज तुह्मीं सन इहिदे खमसैनपासून द्यावा. कलम १

अंमल बसल्यावर रु॥ सरकारचे प्रविष्ट होतील. तूर्त तीस चाळीस पदरचे मात्र खादले. गुजराथेंतील एक पैका आला नाहीं.

९ हुजूरचे कारभारी रा। गोविंदराव व यशवंतराव, नागोजीराव, विष्णुपंत व रामाजी केशव, वगैरे कारकून तुह्मांकडे गेले. त्याजमुळें दिवाण कामास अंतर पडलें. याजकरितां त्यास हुजूर पाठवून द्यावें. आणि त्यांनीं

एकानिष्ठेनें वर्तणूक केलियानें त्यांचे हातें सेवा घेतली जाईल. कलम १

सर्व लहानमोठे कारभारी यांचे पूर्व दोषगुण एकीकडे ठेऊन सर्वांपासून सेवा घ्यावी. वर्षा दों वर्षां जो लबाडी करील त्यास सुखरूप दूर करावें. सेवकाचे आड नाहीं.

१० हुजूरचे कारभारांत पेशजी चिरंजीवांचे कारकीर्दीस तुमचे विद्यमानें जो काम कारभार होत होता त्याजप्रों तुमचे हातें घेतला जाईल. व हुजूरून जो काम कारभार होत होता त्याजप्रों हुजूर होणें तो होईल. त्याजमध्यें चित्त घालूं नये. कलम १

थोरले महाराजांनीं कैलासवास केलियावर साहेबीं सर्वां सेवकांपेक्षां सेवकावरच कृपा विशेष करून सर्व यख्तयार दिल्हा. इमान प्रमाण दिल्हें. आतां जी मर्जी असेल ते प्रमाण दुराग्रह नाहीं.

११ किल्ले सातारा वगैरे किल्ले यांचे तनखियांचे गांव लष्करचे लोकांनीं लुटून नेले आहेत. तेथें जो नागाटा न न्यावा तो नेऊन किल्लयांचे तनखेखोरी केले. त्याची वस्तभाव वगैरे जें गेलें असेल तें भरून द्यावें. कलम १

गनीमी लष्करची लूट येणें कळतच आहे. हवालदाराची समजाविशी करावयाचे रीतीनें केली जाईल.

**१०. तहाची फलश्रुति ह्मणजे पेशव्याची शरणागतिः—** ताराबाई व नानासाहेब यांच्यामधील वरील तह राज्यकारभारांतील अनेक धोरणांच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. त्यांतील कांहीं महत्वाचीं धोरणें खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

(१) हा तह ताराबाईच्या नांवानें नानासाहेब पेशव्यांनीं लिहून दिलेला आहे. खरें पाहिलें असतां तो रामराजे यांचे नांवानें पेशव्यांनीं लिहून द्यावयास पाहिजे होता. असें असतां तो ज्याअर्थी ताराबाईच्या नांवानें आहे त्याअर्थी तो ताराबाईच्या नांवानें लिहून देण्यांत व ताराबाईनीं तो आपल्याच नांवानें नवीन प्रथा पाडून लिहून घेण्यांत कांहींतरी नवीन राजकारण होतें हें नक्की ठरतें. रामराजे यांना राज्याभिषेक झाल्यानंतर पुढील राज्यकारभार

कशा पद्धतीनें चालावा याची जेव्हां चर्चा सुरू झाली त्यावेळीं ताराबाईंचें मुख्य म्हणणें रामराजे यांना आपल्याजवळ बसवून घेऊन सर्व कारभार आपल्या विचारें चालावा व सर्वांनीं आपल्या आज्ञेंत चालावें असें होतें. परंतु या गोष्टीला नानासाहेब पेशवे हे एकटेच विरुद्ध होते. नानासाहेबांचें म्हणणें रामराजांना आपण हाताशीं धरून राज्यकारभार करावा असें होतें. शिवाय ताराबाईंचा कारभार म्हणजे 'बायकोचा कारभार, व्यवस्था राहणार नाहीं, हिंदुस्थान, कर्नाटक, परराज्यांत लौकिक बायकोचा कारभार ठीक दिसणार नाहीं.' असेंही होतें. त्यामुळें ताराबाई व नानासाहेब यांच्यामध्यें कलह उत्पन्न झाला. तो सतत दीड वर्ष चालू होता. त्या कलहाचा सर्व वृत्तांत मागें आलाच आहे. या अवधींत नानासाहेबांचे अराजक सर्व प्रयत्न हाणून पाडून त्यांचेवर ताराबाईंनीं जो विजय मिळविला त्याचें प्रत्यंतर म्हणजे हा तह होय. नानासाहेबांनीं हा तह ताराबाईंच्या नांवानें लिहून दिल्यामुळें 'बायकोचा कारभार ठीक दिसणार नाहीं' वगैरे आपमतलबाचीं विधानें सोडून देऊन ताराबाईंना या राजकारणी डावपेंचाच्या सामन्यांत नानासाहेबांना कसें शरण यावें लागलें याचें लेखी चित्र म्हणजे हा तह आहे. ताराबाईंनीं या तहामुळें नानासाहेबांना राज्यकारभारांत नकर्ते केलें व आपली झालेली मानखंडना त्यांनीं भरून काढली. हा तह म्हणजे नानासाहेबांकडून ताराबाईंनीं घेतलेलें माफीपत्रच आहे.

(२) 'सर्वांनीं आपल्या आज्ञेंत चालावें' असें ताराबाईंचें पहिल्यापासून म्हणणें होतें. तें सेव्यसेवकभाव कायम ठेऊन राज्यकारभार पुढें चालविण्याकारितां पहिल्या कलमांत ताराबाईंनीं नानासाहेबांना 'एकनिष्ठेनें सेवा करावी' असें आज्ञापिलें आहे.

(३) या तहांत दहावें कलम तितकेंच महत्वाचें आहे. 'हुजूरचे कारभारांत पेशजी चिरंजिवांचे कारकीर्दीस तुमचे विद्यमानें जो काम कारभार होत होता त्याजप्रें॥ तुमचे हातें घेतला जाईल.' या वाक्यांत गर्भित अर्थ फार महत्वाचा आहे. 'हुजूरचे कारभारांत पेशजी चिरंजिवांचे कारकीर्दीस' म्हणजे

सरकारी कारभारांत पूर्वी शाहूराजे व रामराजे या उभयतांचे कारकीर्दीस, असा अर्थ घ्यावयाचा आहे. ‘ चिरंजिवांचे ’ हा प्रयोग अनेकवचनी आहे म्हणून शाहूराजे व रामराजे अशा उभयतांची कारकीर्द असा त्याचा अर्थ आहे. शिवाय या उभयतांची कारकीर्द केव्हांची हें दाखविण्याकरतां ‘ पेशजी ’ या शब्दाचा उपयोग करण्यांत आला आहे. ‘ पेशजी ’ ह्मणजे पूर्वीची. शाहूराजे यांची कारकीर्द जशी पूर्वीची झाली तशीच रामराजे यांचीही कारकीर्द पूर्वीची झाली. चालू कारकीर्द ताराबाईची आहे असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. ताराबाईना रामराजे यांच्या अधिकाराबद्दल पेशव्यांकडून बांधून घेणें प्राप्त होतें. पेशव्यांची राज्यकारभाराची अख्त्यारी ताराबाईनीं मान्य केल्यानंतर रामराजे यांना बगलेंत मारून सांगोल्यास जो खेळखंडोबा केला व पुढें त्यांना आपल्या कबजांत घेण्याकरतां जे प्रयत्न केले ते त्यांना पुढें करतां येऊं नयेत व रामराजे पुढें पेशव्यांच्या हातीं जरी सांपडले तरी कोणतीही अस्मानीसुलतानी त्यांना करतां येऊं नये अशा सर्व धोरणाकरतां वरील वाक्यप्रयोगाची योजना आहे. वरील वाक्यामुळें पेशव्यांनीं ताराबाईचा अधिकार मान्य केलेला आहे. व रामराजे हे ताराबाईच्या कारभाराशिवाय व संमतीशिवाय अनधिकारी असल्याचें कबूल करून घेतलें आहे. त्याचप्रमाणें शाहूमहाराजांपासून छत्रपतीकडे जी खातीं राज्यकारभाराचीं होतीं तीं पूर्ववत् ताराबाईच्या हातीं असल्याचीही कबुली या कलमांतील दुसऱ्या वाक्यांत आहे. ‘ हुजरून जो काम-कारभार होत होता त्याजप्रो हुजूर होणें तो होईल. ’ या शर्तीमुळें अर्थात् कारभाऱ्यांच्या व सरदारांच्या नेमणुका आणि संरजाम देणें अगर काढून घेणें वगैरेचे सर्व अधिकार ताराबाईच्या हातांत असल्याबद्दलचीही मान्यता पेशव्यांकडून या शर्तीप्रमाणें घेण्यांत आली आहे. ही शर्त म्हणजे छत्रपतींचे सर्व अधिकार ताराबाईच्या हातीं आल्याची व ती पेशव्यांनीं मान्य केल्याची ग्वाही आहे. त्याचप्रमाणें या कलमांतील ‘ त्याजमध्यें तुम्हीं चित्त घालूं नये ’ या वाक्यानें, इतके दिवस पेशवे इतर लोकांचा संरजाम काढून घेणें, सरदारांच्या अगर कारभाऱ्याच्या नवीन नेमणुका करणें वगैरे छत्रपतींच्या अधिकारांत लांडा

कारभार करीत होते. तो त्यांनीं इतःपर करूं नये म्हणून त्यांना समज देण्यांत अलेली आहे. या दहाव्या कलमामुळें पेशवे जोंपर्यंत ताराबाईंच्या आज्ञेंत वागत आहेत तोंपर्यंतच ते पेशवेपदावर आहेत आणि जेव्हां ते त्यांचा आज्ञा-भंग करतील तेव्हां त्यांना कामावरून दूर करून व त्यांचा सरंजाम जप्त करून दुसऱ्याला पेशवेपद व सरंजाम देणें हे अधिकार ताराबाईंच्या हातीं आले. त्यामुळें नानासाहेब पेशव्यांची केविलवाणी स्थिति झाली. त्यांच्या पेशवे-पदाच्या अधिकाराबद्दल ‘ विळा भोंपळा ’ ताराबाईंच्या हातीं गेला असें पाहून या कलमावर मखलाशी करतांना नानासाहेबांनीं ताराबाईवर नैतिक-बंधनाची जबाबदारी टाकण्याचा ‘थोरले महाराजांनीं कैलासवास केलियावर साहेबीं सर्वां सेवकापेक्षां सेवकावरच ( नानासाहेबांवरच ) कृपा विशेष करून सर्व यखत्यार दिल्हा. इमानप्रमाण दिल्हें.’ या वाक्यांनीं केलेला आहे. तसेंच ‘आतां जी मर्जी असेल ते प्रमाण. दुराग्रह नाहीं.’ या वाक्यांनीं नानासाहेबांनीं यापुढें आपला सर्व दुराग्रह सोडून दिला आणि ताराबाई जें ठरवितील व जें करतील तें आपण मान्य करूं असें लीनतेनें आणि आर्जवानें कबूल केलें. सामर्थ्यवान् शत्रूवर सामर्थ्यानें विजय संपादन करतां येतो. परंतु सामर्थ्यवान् सेवकावर तो सेव्यसेवकभावाचीं बंधनें तोडून शत्रू होत असतांना त्याला पूर्ववत् स्वस्थळीं आणून कार्यक्षम करण्यास लावणें हा विक्रम सामान्य कोटींतला खास नाहीं. सेवक-शत्रूवरील विजय हा महाविजयच मानावा लागेल.

(४) ताराबाई आपल्या वचनाला कशा जागत होत्या हें कलम सात-वरून दिसून येणारें आहे. सिंहगडावर राजाराम महाराजांची छत्री असल्यामुळें ताराबाईंना तेथें वरचेवर दर्शनाकरितां जावें यावें लागे. त्याकरितां सिंहगड आपल्या लगामी असलेल्या इसमांकडे ठेवणें त्यांच्या हिताचें होतें. परंतु पेशव्यांना तो किल्ला त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें महत्वाचा असल्यामुळें तो प्रतिनिधींकडून काढून घेऊन त्यावर पेशव्यांनीं अंमल केला होता. याला पूर्वीं ताराबाईंनीं संमति दिली होती. पेशव्यांकडे अखत्यारी सोंपविल्यामुळें त्यांना नजीकचें असें संरक्षणक्षम स्थान मिळणें वाजवी होतें. तेव्हां या तहामध्यें

ताराबाईनीं सिंहगड हा किल्ला पूर्वीच्या वचनाप्रमाणें आपल्या सर्व गैरसोई बाजूला ठेऊन पेशव्यांना दिला. त्याबद्दल या कलमावर मखलाशी करतांना 'साहेबांचें प्रमाणवचन रामबाण आहे' असें नानासाहेबांनीं ह्मटलें आहे. धन्याबद्दल चाकरानें काढलेले हे उद्गार सोन्याच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्याच्या मोलाचे आहेत. थोर माणसें स्वार्थापेक्षां 'प्रमाण वचना'लाच जास्त महत्व देत असतात. धन्यानें आपल्यापेक्षां आपल्या सेवकांच्या सोईगैरसोईकडे लक्ष पुरविणें हा थोरांचा स्वभावधर्मच असतो.

(५) सांगोल्यास ताराबाईंच्या सल्ल्याखेरीज जो राज्यकारभार रामराजे यांच्या शिक्यामोर्तबानें उरकून घेण्यांत आला होता त्याला बट्टा लागूं नये, व रामराजे यांना कमीपणा येऊं नये ह्मणून कलम चार, पांच, सहा, सात, आठ यांतील शर्ती ताराबाईनीं मान्य केल्या आहेत. छत्रपतींच्या शिक्याची कदर राखण्याकरतां ताराबाईना दाभाडे, प्रतिनिधि वगैरेंच्या बाबतींत झालेले अन्याय सहन करावे लागले. या अन्यायाचें दुःख त्यांच्या अंतःकरणाला सर्वदा टोंचत राहिलें असेल यांत शंका नाहीं. एकंदरींत हा तह अनेक राजकारणाच्या दृष्टीनें संस्मरणीय असा झालेला आहे. इतिहासअभ्यासूंना याहीपेक्षां य तहांत ताराबाईच्या प्रभावशाली बुद्धिमत्तेच्या आणखी पुष्कळ गोष्टी दिसूं शकतील. त्या त्यांनीं जरूर निवडून काढण्याचा प्रयत्न करावा.

**११ ताराबाईचे खरे श्रम साहस होते. उपद्व्याप नव्हते:—** रामराजे यांच्या राज्यारोहणानंतर नानासाहेब पेशव्यांनीं ताराबाईबरोबर जो अव्यवहार्य कलह उत्पन्न केला तो शांत करण्यामध्यें सुमारें दीड वर्षाचा काल व्यर्थ गेला. या कालांत ताराबाईंच्या पक्षाचें व नानासाहेबांच्या पक्षाचें सामर्थ्य अर्थात् मराठी राज्याचें सामर्थ्य विनाकारण खर्ची पडलें. औरंगजेबाच्या दाढेंतून मराठी राज्याचें संरक्षण करण्याकरतां ताराबाईना जे प्रयास पडले तितकेच किंबहुना जास्त प्रयास या आपसांतील लढ्यांत त्यांना घ्यावे लागले. स्वराज्यांतील बेदिली नष्ट करून त्याचें सामर्थ्य व भावना एके ठिकाणीं केंद्रित केल्याशिवाय राज्यांत सुसंघटितपणा उत्पन्न होत नाहीं या तत्वावर ताराबाईचा

लढा होता. पेशव्यांना हिंदुपदपादशाही मोडून ब्राह्मणपदपादशाही स्थापन करावयाची होती. अर्थात् छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेली हिंदु-पदपादशाही नामशेष न होऊं देणें, त्याचें संरक्षण करणें हें ताराबाईचें आद्य कर्तव्य होतें. तें कर्तव्य पार पाडण्याकरतां व स्वराज्याचे एक प्रमुख आधार-स्तंभ जे पेशवे त्यांना वठणीवर आणून स्वकर्तव्यतत्पर करण्याकरतां ताराबाईंना अनंत राजकारणें करावीं लागलीं. (१) दादोबा प्रतिनिधि व त्यांचा मुतालिक यमाजी शिवदेव यांना पेशव्यांविरुद्ध हाताशीं धरावें लागलें. (२) बाबूजी नाईक बारामतीकर यांचेकडून पेशव्यांना शह देण्याचा प्रयत्न करावा लागला. (३) सलाबतजंगाचा दिवाण रामदासपंत याच्याशीं राजकारण करून पेशवेपद रामदासपंताच्या पुतण्याला देण्याचा बहाणा दाखवून पेशव्याला मार्गावर आण-ण्याचा प्रयत्न केला गेला. (४) सदाशिवरावभाऊ, महादोबा पुरंदरे, रामचंद्र-बाबा, गोविंदराव चिटणीस यांना आपल्या पक्षांत घेण्याचा डाव टाकून पेशव्यांना भयभीत केलें. (५) दमाजी गायकवाड यांस साताऱ्यास बोलावून पेशव्यांच्या सामर्थ्यास विरोधी शक्ति निर्माण केली. (६) पेशव्यांच्या साम-र्थ्याला आळा पडण्याकरतां शिंदे होळकर यांच्याबरोबर मसलती सुरू केल्या. (७) उमाबाई दाभाडे यांना पेशव्यांविरुद्ध ईर्षेला घातलें. (८) पेशव्यांच्या पूर्वीचा प्रतिस्पर्धी रघोजी भोंसले यांना पेशव्यांच्या पक्षांतून फोडण्याचें राज-कारण सुरू केलें. (९) धन्यावर शस्त्र धरणाऱ्या चाकर पेशव्याचा नैतिक अधः पात करण्याकरतां त्याच्या अपकीर्तीचा डांगोरा सर्व भारतवर्षात पिटविला. (१०) छत्रपति शिवाजी महाराजांचे वंशज वैभवाच्या प्रसंगाप्रमाणें आपत्काळींही [ पेशव्यांच्या फौजेचा वेढा सातारा किल्ल्याला पडला असतां व जवळील सोनें जवाहीर विकून स्वतःचा गुजराणा करण्याचा प्रसंग पेशव्यांनीं आणला असतां ] धैर्यानें व शौर्यानें लढून आपलें स्वत्व कायम ठेवतात; स्वतःच्या जीविताकरतां स्वतःच्या चाकर-शत्रूलाही शरण जात नाहींत किंवा आपलें तत्व सोडीत नाहींत अथवा वचनभ्रष्टही होत नाहींत याची तीव्र जाणीव पेशव्यांना देऊन पेशव्यांचें स्वतःचें मनही त्यांच्या अराजक कृतीला विरोधक बनेल अशी खटपट केली.

पेशव्यांचे भेदनीतीचे व कपटकारस्थाती सर्व डाव हाणून पाडून त्यांना दिङ्मूढ करण्याचा प्रयत्न केला. (११) कोल्हापूरचे संभाजी महाराजही आपल्या आज्ञेंत असल्याची चुणूक दाखवून पेशव्यांना भयभीत करून सोडलें. वगैरे वगैरे सर्व गोष्टी ताराबाईंनीं मराठी राज्याची संघटना करण्याकरतां एवढ्या दीर्घ प्रयत्नानें केल्या. अगोदर संघटन व नंतर संवर्धन हा स्वराज्याचा खरा मार्ग आहे. स्वराज्यांतील चाकरांची ओदिली नष्ट करून धन्याचें ठिकाणीं सर्व चाकरांनीं एकनिष्ठेनें वर्तावें, हें राज्यकारभाराचें मूलतत्व प्रस्थापित करण्याचा ताराबाईंचा हा प्रयत्न होता. त्याला अनुलक्षून ताराबाईंनीं श्रम साहस केलें. कांहीं इतिहासकारांच्या विधानाप्रमाणें ते उपद्व्याप नव्हते असें विचारवंतांना उघड उघड दिसून येईल.

——

# प्रकरण १५ वें

## ताराबाईंची अखेर.

**१ निजामाची पेशव्यांवर मोहीम. २ पेशव्यांची निजामाकडे जहागिरीची मागणी. ३ पेशव्यांचें कपटी वर्तन. ४ त्रिंबकराव मामा साताऱ्चे कारभारी. ५ कर्नाटकावर स्वारी. ६ ताराबाईंच्या अखेरच्या कर्तबगारीचा आढावा. ७ जिजाबाईंशीं पेशव्यांची बेइमानी. ८ ताराबाई व राघोबादादा. ९ रामराजे उचले नसून खरे होते. १० ताराबाईंचा तारा अस्तास गेला.**

**१ निजामाची पेशव्यांवर मोहीमः**---मागील प्रकरणीं विशद केल्याप्रमाणें नानासाहेबांनीं ताराबाईंना तहनामा लिहून दिल्यानंतर त्या तारीख १३ आक्टोबर १७५१ रोजीं दोनप्रहरीं रामराजांना घेऊन किल्ल्याखालीं आल्या, व फत्तेसिंगबाबाचे हवेलींत येऊन राहिल्या. त्यांना किल्याखालीं आणण्याकरतां पेशव्यांनीं महादाजी निंबाळकर, धोंडो गोविंद वकील, व दिनकर महादेव यांस पाठविलें होतें. ताराबाई साताऱ्यास येऊन कारभार पाहूं लागल्यानंतर थोड्याच दिवसांनीं ह्मणजे 'सन १७५१ च्या नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांत निजामानें पुण्यावर चाल करून पेशव्यांची तारांबळ उडविली.' [ म. रि. म. वि. २ पृ. २८२ ] त्या वेळीं ताराबाईंनीं पेशव्यांचे मदतीस जगजीवन ऊर्फ दादोबा प्रतिनिधीस पाठविलें आणि 'अविंधांचा पराजय करून तुह्मीं हुजूर यावें,' अशी नानासाहेब पेशव्यांना आज्ञा केली. त्यावेळीं ताराबाई व नानासाहेब यांच्यामध्यें जो पत्रव्यवहार झाला तो अत्यंत महत्वाचा आहे. नानासाहेबांनीं ताराबाईंच्या बरोबर तह केला व त्यांचा धनीपणा जरी मान्य केला तरी ताराबाईंच्या थोर अंतःकरणाची त्यांना अद्यापी

पारख झालेली नव्हती. थोर अंतःकरणाची पारख व्हावयाला तशींच थोर मनाचीं माणसें असावीं लागतात. नानासाहेबांचा स्वभाव संशयी असल्यामुळें ताराबाई आपल्या विरुद्ध कांहीं मनसुबा करतील अशी भीति 'चोराच्या मनांत चांदणें' या म्हणीप्रमाणें त्यांच्या मनाला सारखी वाटत होती. त्या संशयपिशाचानें पछाडलेल्या स्थितींत नानासाहेबांनीं ताराबाईंना जें पत्र लिहिलें त्याचें उत्तर ताराबाईकडून नानासाहेबांना ता. २५ नोव्हेंबर सन १७५१ चें गेलें तें पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

'राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांसी पत्राचें उत्तर जे. 'राजश्री यशवंतराव दाभाडे सेनापति व सेना खासखेल पुण्याहून (ता. १७ नोव्हेंबर १७५१ रोजीं) पळोन गेले, ते सातारा आले असतील. येथें आल्यामुळें तुह्मांस साहेबीं निमे गुजराथ दिली; व त्यांनीं तुह्मांशीं करार केला, त्यांत येथील आस्था करून केल्या करारांत अंतर पाडतील व साहेबही त्यांचें अगत्य धरतील ह्मणून तुह्मांस संशय जाहला आहे, ह्मणून हुजूर विदित जाहलें. ऐशियास सेनापति व सेना खासखेल हुजूर आले नाहींत, कदाचित् आले असते, तथापि तुमचे नुकसानाचा प्रकार सहसा न घडतां तुह्मांस येथील संशय होतात, याकरितां चेलभंडार पाठविला. अद्यापवर संशय धरितां हे गोष्टी न आणणें. साहेबांची कृपा अंतःकरणापासून तुह्मांवरी जाहली, कांहीं किल्मिष राहिलें नाहीं. तुमचें न्यून तेंच पूर्ण करावें, हेंच आवश्यक जाणून शत्रूचा उपमर्द तुमचे हातून करवावा, त्याचे साहित्यास राज्यांतील सरदार अनुकूल व्हावे, ह्मणून आज्ञापत्रें कारकून रवाना केले. रात्रंदिवस तुमचे साहित्याचीच तरतूद होत असते. या उपरी येथील कोणे गोष्टीविशीं संशय न धरितां निःसंशय होऊन शत्रूचा पराजय करणें. सेनापति पळाले, त्याचे कांहीं संशय धराल तर, जर धरणें कोठेंही गेलें तथापि निमे गुजराथ तुह्मांस, व त्यांनीं पैका कबूल केला तो त्यांस सुटतो असें नाहीं. त्यास ताकीद करून देविला जाईल.' [ शा. म. रो. ११५ ] हें ताराबाईचें पत्र वाचलें ह्मणजे ताराबाईच्या सरळ व थोर मनाची साक्ष पटल्याशिवाय

रहाणार नाहीं. एकदां शत्रू म्हटलें म्हणजे शत्रू व मित्र म्हटलें म्हणजे मित्र या परता दुजाभाव थोर माणसांच्या ठिकाणीं कसा वसत नसतो याचें प्रत्यक्ष प्रतीक म्हणजे वरील पत्र आहे. विश्वासघात, कपट किंवा वचनभ्रष्टता हा हीन मनोधर्म त्यांच्या ठिकाणीं नसतो. पण त्यांच्या या थोर मनोधर्मांची ओळख कपटी व विश्वासघातकी लोकांना पटत नाहीं म्हणून ते संशयाच्या फेऱ्यांत सांपडतात व तदनुरूप कृति घडवून आणतात. या पत्रांत धनी व चाकर यांच्या स्वभावसिद्ध मनोधर्मांचें चित्र पूर्णपणें उठलेलें दिसतें. पुढील पत्र ता. २६ नोव्हेंबर सन १७५१ चें नानासाहेबांनीं ताराबाईना लिहिलेलें आहे. त्या पत्रावरूनही ताराबाईच्या थोर मनोधर्मांची, निश्चयी स्वभावाची आणि एकवचनी बाण्याची साक्ष पटेल.

श्री शके १६७३ मार्गशीर्ष वद्य ५ पौ छ. २२
मोहरम (ता. २६।११।१७५१)

श्रीमत् माहाराज मातुश्री आईसाहेबांचे सेवेसीः— विनंति सेवक बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ता।। छ. १८ मोहरम मु।। घोडनदीनजीक मलठणपर्यंत साहेबांचे कृपावलोकनें करून यथास्थित असें. विनंति. साहेबीं कृपा करून आज्ञापत्र सादर केलें. तेथें आज्ञा जे, राजश्री यशवंतराव दाभाडे सेनापति व सेनाखासखेल येथें आले नाहीं. तुम्हीं किमपी संशय न धरणें. तुम्हांस निमे गुजराथ दिल्ही ते दिल्ही. शत्रु आला, त्याच्या पराभवास्तव व सरदारांस सामील व्हावयाविशीं पत्रें हुजरे पाठविलीं आहेत. म्हणोन आज्ञा. ऐसियासीं, साहेबधणी कृपापुरःसर आज्ञा केली असतां, सेनापतीचा संशय केल्या सरकारास होईल. सेनापति हुजूर जाते, तऱ्ही साहेब ताकीद च करितील. निशा आहे. मोगल जवळ्यापुढें गुगोरियावर कुकडीचे कडेस मुकामास आला. सेवकाच्या फौजा मोंगलाभवत्या लागल्या आहेत. नित्य झीटपीट होते. दहावीस घोडीं, पंनास बैल, आणितात. मोगल दोन कोस चालतो. साहेबाचा पुण्यप्रताप समर्थ आहे. तद्योगें शत्रूचा पराभव होणें तो होईल. सेवकास सामील सरदारांस साहेबीं आज्ञापत्रें सादर

केलीं, उत्तम आहे ! जलदीनें सामील होत ते करावें. तर साहेब धणी आहेत. एकाएकीं मोगलानें दगाबाजीचा प्रसंग केला. हा समय सेवकाचे केवळ अबरूवर आहे. सेवकाची अबरू गेलिया मग राज्याची अबरू राहणार नाहीं, हा अर्थ सर्व साहेब जाणतात. तथापि अमर्यादा करून लिहिलें. याची क्षमा करून सर्वप्रकारें साहित्य केलें पाहिजे. हे विज्ञापना. ( खंड ६ पृ. ३३२ )

हें वरील पत्र वाचलें म्हणजे नानासाहेबांची दाभाड्यांच्या बाबतींत ताराबाईनीं जे करार मान्य केले त्याविषयीं संशयनिवृत्ती झाली. परंतु धनी-पणाचा अधिकार ताराबाईकडे गेल्यानंतर त्यांच्या आज्ञेप्रमाणें इतर सरदार वागतात कीं नाहीं व आपणाला प्रसंगीं धन्याकडून सहाय्य होतें कीं नाहीं हा संशय त्यांच्या मनांत कायम होताच. त्याला अनुसरून त्यांनीं वरील पत्रांत ताराबाईना एक टोमणा मारण्याचा प्रयत्न केला आहे. ' जलदीनें सामील (सरदार) होत तें करावें तर साहेब धणी आहेत.' या वाक्यप्रयोगानें नानासाहेब धनी या नात्यानें ताराबाईची योग्यता काय आहे हें पहाणार होते. ' एकाएकीं मोंगलानें दगाबाजीचा प्रसंग केला.' असें कारण दाखवून ' हा समय सेवकांचे केवळ अबरूवर आहे. सेवकाची अबरू गेलिया मग राज्याची अबरू राहणार नाहीं ' अशी कार्याची तीव्रता व धनीपणाची जबाबदारी प्रकट करून या प्रसंगीं मदतीला फुरसत न देतां ताराबाई कशी मदत करतात हें नानासाहेब पहाणार होते. यावेळीं ताराबाईनीं पेशव्यांच्या संकटांतून नुकतेंच डोकें वर केलें होतें. इतर सरदारांनाही हुकमतींत आणण्याला त्यांना फुरसत मिळालेली नव्हती. तेव्हां त्यांच्या आज्ञा कोणते सरदार मान्य करतात हें पेशव्यांना पहावयाचें होतें. पण ताराबाई अशा कित्येक परीक्षा पास होऊन गेलेल्या होत्या. त्यांनीं लगेंच आपल्या सरदारांना पेशव्यांस जाऊन सामील होण्याकरतां आज्ञा पाठविल्या. त्याप्रमाणें प्रतिनिधि पेशव्यांचे जरी शत्रू होते तरी ते कांकूं न करतां पेशव्यांना मदत करण्याकरतां निघाले. हें पाहून नाना-साहेबांना ओशाळल्याप्रमाणें झालें व त्यांनीं ताराबाईना पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें. हें पत्र ता. २१ डिसेंबर सन १७५१ चें आहे.

श्री शके १६७३ पौष शुद्ध १५ पो॥ छ. १४
मोहरम पांच घटका रात्र.

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेबांचे सेवेसीः—
विनंति सेवक बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना. ता॥ छ १३ मोहरम मु॥ हागेपळबे, पर्यंत साहेबांचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विनंति. साहेबीं आज्ञापत्र सादर केलें तेथें आज्ञा जेः मोगलाची दाटी जाली. याजकरितां तुम्हीं मोगलांवरी गेला. राजश्री जगजीवन पंडीत प्रतिनिधी यांस रवाना केलें. हें वर्तमान राजश्री मोरो शिवदेव व विठ्ठल बयाजी यांणीं लि॥ त्याजवरून पंडित मशारनिल्हे तुह्मांबरोबर राहण्याची आज्ञा केली असे. व वरकड सरदारांस आज्ञापत्रें सादर केलीं आहेत. तुम्हांस सामील होतील. अविंधाच्या पराजय करून तुह्मीं हुजूर येणें. तुह्मांवरी साहेबाची कृपापूर्ण आहे ह्मणोन आज्ञा. त्यांस, प्रतिनिधीबरोबर फोज नाहीं व साहेबांसंनिधही या समयांत मातबर मनुष्य असले पाहिजेत. याजकरितां प्रतिनिधीस हुजूर नेऊन तेथील बंदोबस्त करावा. सरदार सर्वांस सामील सेवकास व्हावें ह्मणोन पत्रें पाठविलीं तीं उत्तम आहेत. सरदार जलदीनें फौजेनसी सेवकास सामील होत ते करणार साहेब धणी आहेत. साहेबाचा पुण्यप्रताप सेवकाचे मस्तकीं असतां कोणेविसी मोगलाचा डर धरीत नाहीं. जें होणें तें धन्याचे प्रतापें करून होईल. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

वरील पत्र लक्षपूर्वक वाचलें ह्मणजे धनी व चाकर यांचेमधील राजकारणाचा ओघ कसा वाहत होता याची सुंदर कल्पना येते. पेशव्यांनीं ताराबाईचा अधिकार धनी ह्मणून मानल्यानंतर प्रसंगविशेषीं त्यांचेकडे मदतीची मागणी करणें हें चाकराचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें चाकराला मदत देणें धन्याचें कर्तव्य आहे. त्याला अनुसरून ऐनप्रसंगी नानासाहेबांनीं आपली अडचण व मराठी राज्याचा अंतर्बाहेरील प्रसंग दाखवून धनी ताराबाई यांचेकडे मदत मागितली. ताराबाईनींही चाकर पेशव्यांना धन्याच्या पद्धतीनें मदत करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं छत्रपतींचे प्रतिनिधि यांना पेश-

त्यांच्या मदतीस जाण्याची आज्ञा दिली. प्रतिनिधि हे यावेळीं ताराबाईंची प्रतिमा ह्मणून मदतीला निघाले. खुद्द प्रतिनिधींची जरी विशेष फौज नव्हती तरी ताराबाईंची आज्ञा इतर सरदारांना गेली असल्यामुळें ते आपापल्या फौजेनिशीं प्रतिनिधींना येऊन मिळाले असते. व त्यामुळें धन्याच्या मदतीचा एक जथ्था प्रतिनिधींच्या आधिपत्याखालीं पेशव्यांकडे गेला असता. त्यामुळें रणसंग्रामांत पेशव्यांच्या बरोबरीनें किंबहुना थोडें चढ असें स्थान प्रतिनिधींना मिळालें असतें. अर्थात् मोंगलांबरोबर होणाऱ्या लढाईंत पेशवे व प्रतिनिधी यांच्या कामगिरीची, शौर्याची व मुत्सद्देगिरीची तुलना स्वतंत्रपणें ताराबाईंच्या नजरेस आली असती. शिवाय मोंगलांबरोबर तह वगैरे जो घडवून आणावयाचा त्यांतही प्रतिनिधींच्या सल्ल्याशिवाय पेशव्यांना जातां येणार नव्हतें. ह्मणून प्रतिनिधीनें मदतीला धावून येणें नानासाहेबांना महाग वाटलें. ह्मणून ते न यावेत याकरितां वरील पत्रांत त्यांनीं पर्यायानें आपली नापसंती दाखविली आहे. नानासाहेबांना इतर सरदारांची मदत मिळाली तर पाहिजे होती. पण ती प्रतिनिधींच्या आधिपत्याखालीं नको होती. ह्मणून त्यांनीं या पत्रांत ‘ साहेबाचा पुण्यप्रताप सेवकाचे मस्तकीं असतां कोणेविशीं मोंगलाचा डर धरीत नाहीं. ’ असें लिहिलें आहे. अर्थात् ही स्वारी स्वसामर्थ्यावर यशस्वी करण्याची पेशव्यांची तयारी होती. त्या बाबतींत ताराबाईंच्या बाह्यात्कारी आशिर्वादाशिवाय त्यांना दुसरी जरूरी नव्हती असें दिसतें. त्यांना फक्त ताराबाईंची कर्तबगारी व त्यांचें मराठी राज्यांतील वजन आजमावून पहावयाचें होतें. या मोंगलांबरोबरील युद्धांत पेशव्यांना प्रतिनिधींची कां अडचण होत होती यासंबंधीं रियासतकारांचें अनुमान पुढीलप्रमाणें आहे. ‘ प्रतिनिधीस ताराबाईनें पेशव्याचे मदतीस ह्मणून पाठविला असेल, पण वेळेवर तो निजामासच सामील होणार नाहीं कशावरून ? अशी पेशव्यासही भीति होतीच. ’ ( म. रि. म. वि. २ पृ. २८३ ) पण हें अनुमान बरोबर दिसत नाहीं. नानासाहेब राजकारणांत अंतर्यामीं व बाह्यात्कारीं निरनिराळे होते हें पुढील त्यांच्या पत्रावरून स्पष्ट होतें. हें पत्र नानासाहेब पेशव्यांनीं औरंगाबाद-

चा वकील वासुदेव दीक्षित यास सन १७५२ च्या जानेवारींत लिहिलेलें आहे.

श्री. शके १६७३ पौष

वेदमूर्ती वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती. येथील वर्तमान नारायणभट्ट सांगतील. राजांजी ( रामदासपंत ) स्वभावानें कुटील बोलतात, तो भरंवसा येत नाहीं. भेट इनाम सर्वाविध जालें. परंतु परिणाम कठीण दिसतो. पांचा लक्षांची जागीर द्यावयाचा करार जाला. देतील तेव्हां खरें. त्याणीं जागीर दिली, दाभाडियांचा आभिमान सोडिला, तर आह्मी त्रिंबक देऊं. सारांश दैवी मानवी रीतीनें पाहतां काल कठीण आहे. सर्व स्वामींचें आशीर्वादें उत्तम होईल. पत्र पाठवीत जावें. जर जाला सलूख शेवटास गेला तर येथून कूच होईल. आपण भेटीस यावें. कृपा केली पाहिजे. हे विनंती. [ का. सं. प. या. ले. १९ ]

**२ पेशव्यांची निजामाकडे जहागिरीची मागणीः—** मागील ता. २१ डिसेंबरचें नानासाहेबांनीं प्रतिनिधींना न पाठविण्याबद्दल लिहिलेलें पत्र व त्यानंतरचें सुमारें दहा बारा दिवसांनीं दीक्षितांना त्यांनीं पाठविलेलें वरील पत्र हीं एके ठिकाणीं ठेऊन वाचलीं ह्मणजे नानासाहेबांचा अंतर्यामीं कोणता हेतू होता हें स्पष्ट दिसून येईल. वरील पत्र लिहिलें त्या वेळीं निजाम व पेशवे यांचा सलोखा रामदासपंताचे विद्यमानें झालेला होता. फक्त त्याची अंमलबजावणी व्हावयाची राहिलेली होती. नानासाहेब आपल्या ता. २६ नोव्हेंबरच्या पत्रांत ताराबाईंना लिहितात, ' हा समय सेवकाचे केवळ अबरूवर आहे. सेवकाची अबरू गेलिया मग राज्याची अबरू राहणार नाहीं. ' यावरून मराठा राज्याची धनी ताराबाई यांची समजूत ते पेशव्यांची अब्रू व मराठी राज्याची अब्रू एकच आहे अशी करून देतात. म्हणजे पेशवे हे मराठी राज्याचे एकनिष्ठ सेवक आहेत असें दर्शवितात. त्याचप्रमाणें एका हातानें मराठी राज्याचा शत्रू निजाम आहे, तो मराठी राज्याची अब्रू घेण्यास तयार झाला आहे असें भासवितात व ताराबाईची मदत मागवितात. तर दुसऱ्या

हातानें वरील पत्राप्रमाणें आपणास पांच लक्षाची जहागीर निजामाकडून घेण्याचा करार करतात. या परस्पर विरुद्ध गोष्टी पाहिल्या म्हणजे नानासाहेबांच्या खऱ्या स्वभावाची पारख होते. छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेल्या हिंदुपदपादशाहीचें धोरण नानासाहेब पेशवे चालवीत होते अशी जर कोणाला शंका येत असेल तर त्यांनीं निजामाजवळ स्वतःकरतां पांच लक्षांच्या जहागिरीची केलेली वरील मागणी पहावी म्हणजे त्यांची शंका सहज निरसन होईल. शाहू महाराजांपासून याद्या लिहून घेण्यांत, सकवारबाईंना सती घालविण्यांत, रामराजे यांना गादीवर आणण्यांत, सांगोल्याच्या व्यवस्थेंत, अर्धी गुजराथ व कर्नाटकचा सुभा बळकावण्यांत, रामराजे यांचा राजिनामा घेण्यांत, इतर अष्टप्रधानांना निर्माल्यवत् करून सोडण्यांत आणि ताराबाईबरोबर शत्रुत्वानें वागण्यांत नानासाहेबांचा कशा तऱ्हेचा हेतू होता हें स्पष्ट दिसून येईल. रामराजे मळमळीत किंवा कर्तृत्वहीन होते म्हणून नानासाहेबांना त्यांची अडगळ वाटत होती असें कांहीं इतिहासकारांना वाटलें म्हणूनच त्या मुद्यावर त्यांनीं नानासाहेबांना अगदीं वरच्या पायरीवर नेऊन बसविण्याचा प्रयत्न केला. परंतु ताराबाई या पूर्ण प्रखर आणि कर्तबगार असतांना त्यांना बाजूला सारण्याचा पेशव्यांनीं कां प्रयत्न केला याचें मात्र समर्पक उत्तर त्या इतिहासकारांना देतां आलें नाहीं. वरील निजामाकडून जहागीर घेण्याचा नानासाहेबांनीं जो करार करून घेतला त्यावरून त्यांना हिंदुपदपादशाहीची चाड अगर मराठी राज्याचा अभिमान होता असें बिलकुल ठरत नाहीं. त्यांना फक्त ‘ स्वराज्य ’ पाहिजे होतें. स्वराज्य म्हणजे आपलें राज्य; आणि राज्य म्हणजे नानासाहेब पेशव्यांचें राज्य—केवळ ‘ नानाशाही’चें राज्य पाहिजे होतें, हें त्यांच्या पुढीलही कृतीवरून ओघानें दिसून येईल. हिंदुपदपादशाहीच्या किंवा मराठी राज्याच्या अभिमानाचा थोडा तरी ओलावा त्यांच्या अंतःकरणांत होता असें त्यांच्या कोणत्याच कृतीवरून दाखवितां येण्यासारखें नाहीं.

३ **पेशव्यांचें कपटी वर्तनः**— नानासाहेब पेशव्यांबद्दल रियासतकारांचे पुढीलप्रमाणें उद्गार आहेत. [१] ‘ रामराजांत कर्तृत्व नसल्यामुळें,

ताराबाईशीं झोंबी करण्याचा पेशव्यास एकसारखा प्रसंग येऊन, त्यांचेवर स्वामीद्रोहाचा आरोपही आला.' [ म. रि. म. वि. २ पृ. २८५ ] [ २ ] 'पेशव्यांनीं प्रतिनिधीस कर्नाटकांत कामगिरीवर पाठवून युक्तीनें तोंडघशीं पाडिलें.' 'दादोबा प्रतिनिधि सावनूरच्या मोंगलापासून खंडणी घ्यावयास गेले होते. त्यांचे मदतीस नारायण व्यंकटेश घोरपडे यास रवाना केलें. प्रयोजन कीं, मोंगलांसही चार गोष्टी सांगोन दादोबांस तोंडघशीं पाडावें. तूर्त दादोबाचा आमचा थोडासा स्नेहही आहे. आम्हींच सावनूरच्या मोगलांस सांगून व आपली फौज दुतर्फा डौल दाखवून फशीं पाडलें. हें दादोबास ठाऊक नाहीं. कागद आमचे कोणास दाखवित न जाणें [ का. सं. प. या. ले. ३८४ ] २५ मे १७५२ रोजीं हें पत्र रघुनाथरावानें जयाजी शिंद्यांस लिहिलेलें आहे. अशा कपटवर्तनानेंच पेशव्याच्या कारभारावर पुष्कळसे लोक त्या वेळीं कष्ट झाले असले पाहिजेत.' ( म. रि. म. वि.. २ पृ. २८६ ) नानासाहेबांकडून मराठी राज्य बुडविण्याचे असे जरी विश्वप्रयत्न चालू होते तरी ताराबाई नाइलाजानें त्यांना चुचकारून आवरून धरण्याचा प्रयत्न करीत होत्या. निजामाचा पेशव्यांनीं बंदोबस्त केल्याबद्दल ताराबाईनीं मार्च १७५२ च्या एका पत्रांत पेशव्यांचें अभिनंदन केलें आहे. ( भा. व. पु. १ ऐ. प. यां. ले. ६१ ) त्यानंतर ताराबाईना रघोजी भोंसले यांचे चिरंजीव जानोजी व बिंबाजी हे उभयतां पुण्यास येणार ही वार्ता समजली. बिंबाजीस मोहित्यांकडील सोयरिकी केल्यामुळें तो ताराबाईचा आप्त लागत होता. तेव्हां ताराबाई साताऱ्याचा बंदोबस्त करून पुण्यास निघून आल्या. या वेळीं नानासाहेब पेशव्यांनीं ताराबाईची व्यवस्था उत्कृष्ट प्रकारें ठेविली होती. पेशव्यांनीं केलेल्या कराराप्रमाणें ते वागतात किंवा नाहीं हें ताराबाईना अजमावून पहावयाचें होतें. शिवाय ताराबाईना पेशव्यांनीं करार लिहून दिला त्याला केवळ राजकारणापुरतेंच स्वरूप राहू नये, त्याला नीतिमत्तेचें सुद्धां बंधन असावें म्हणून या वेळीं वचनाप्रमाणें चालेन अशी जेजुरीस जाऊन देवासमक्ष पेशव्यानें शपथ घ्यावी अशी ताराबाईनीं अट घातली. त्याप्रमाणें नानासाहेब पेशव्यांनीं

जेजुरीस जाऊन देवापुढें ताराबाईसमक्ष ता. १४ सप्टेंबर सन १७५२ रोजीं शपथ घेतली. [म. रि. म. वि. २ पृ. २८९] याप्रमाणें ताराबाईनीं पेशव्यांना राजकारणाचे दृष्टीनें व नैतिक दृष्टीनें बांधून घेतलें. नंतर त्या सातान्यास येऊन राज्यकारभार पाहूं लागल्या.

**४ त्रिंबकराव मामा साताऱ्चे कारभारीः**—या वेळीं ताराबाई पुण्याहून सातान्यास परत जातांना त्यांचा कारभार पहाण्याकरतां पेशव्यांनीं त्रिंबक विश्वनाथ पेठे यांची त्यांचे समागमें रवानगी केली. या कामावर पूर्वी त्रिंबक सदाशिव पुरंदरे हे होते. ते पोटदुखीच्या विकारानें आजारी पडल्यामुळे व त्यांची पत्नी निवर्तल्यामुळें ते पुरंदरास आपल्या घरीं निघून गेले. गोविंदराव चिटणीसही पुण्यास निघून गेले. त्यांचे जागीं रामराव जिवाजी व लक्ष्मणराव गोविंद हे दोन लहान मुलगे सातान्यास चिटणिसीवर राहिले. त्रिंबकराव मामा पेठे यांनीं ताराबाईची सर्व बाजूनें मर्जी संपादन करून कारभार चालविला. "त्रिंबकराव यांणीं बहुतच मर्जी राखून जें पाहिजे तें द्यावें, अशी मर्जी प्रसन्न करून घेतली. आणि किल्लेकरी फंद करून चालतात, आणि हरामखोरी करतात, त्यांचा बंदोबस्त करण्याची परवानगी घेऊन त्यांशीं राजकारण बहुत ममतेनें केलें व बक्षिसें देऊन नख्त रुपयेही बहुत दिल्हे. आणि किल्ला पहावयास जाऊन आपले लोक वरती नामजाद हवालदार व सुभेदार व दरकदार व गडकरी सर्व उतरून खालीं आणले. सुभेदार कारखानीस वगैरे कैद केले. बक्षिसें दिल्हीं तीं माघारीं घेतलीं. गडकरी लोक पुण्यास आणोन त्यांच्या पोटापाण्याचा बंदोबस्त सनदा व जमिनी चालवून चाकरी नेमिली. सिंदखेडकर बाबाजी जाधवराव कारभारी होते ते लावून द्यावे असें जेजोरीचे मुक्कामीं प्रधानपंत आईसाहेब यांस पाववयास आले, तेथें ठरवून लावून दिल्हे. सातारियांतील सर्व बंदोबस्त करून त्रिंबकराव मामा कारभारी होऊन गेले. त्याजपाशीं बहुत रीतीनें राजे यांस काढावें असें सांगितलें. त्याजवरून त्यांजपाशीं आत पुराणीक व चिंतो अनंत देवस्थळे व मोरो शिवदेव थिटे व विष्णु नरहर यांस त्रिंबकराव यांणीं गांव इनाम व सरंजाम

देण्याचे करार करून, आपले लक्षांत आणोन, त्यांजपासून प्रयत्न तितका सामोपचारें बलात्कारें केला. ऐसें केलें असतां आईसाहेब यांस बुद्धि न जाली. राजे यांणीं तरी पराक्रम किंवा ईर्षा धरून आईसाहेब यांचा बंदोबस्त करून आपण राज्य करावें हें बुद्धिवैभव त्यांजमध्येंहि नाहीं. ऐसें जालें. तेव्हां मोठ्या मोठ्या मसलती व राजकारणें चाललीं पाहिजेत, सर्व सरदार फौज महाराजांनीं ज्यांस जे तालुके सरंजाम दिल्हे व तालुकदार यांजकडील ठरावाचे ऐवज येणें हें व कोणास इनामगांव व जामिनी वगैरे देणें तें कानावर घालावें. राजपत्रें करून द्यावीं. यास आज्ञा आईसाहेब यांची घ्यावी. हुजरोन तालुकदार, भोंसले गाईकवाड, मंत्री, सचीव, प्रतिनिधी, यांजवर वराता नेमणुकेच्या होतील त्या कार्याकारण पावते करून सर्व कारभार [ करण्यास ] आपले कारभारी त्रिंबकराव ठेविले. त्यांचे विद्यमानें करावें ऐसें करून मातोश्रींची मर्जी राखून सर्व आपण करूं लागले." ( धा. रा. च. पृ. १९ ) या प्रमाणें जरी व्यवस्था सुरू झाली तरी अंतर्यामीं कपटकारस्थानें रचण्याची संवय नानासाहेबांना जी लागली होती ती अधून मधून चालूच होती. रामराजे यांना ताराबाईच्या रक्षणाखालून बाहेर काढण्याची योजना त्यांचे मनांत एकदां ठाण मांडून जी बसली होती ती तशीच कायम होती. 'परंतु रामराजाचीच तयारी नसल्यामुळें तूर्त ताराबाईच्याच सल्ल्यानें सनदा पत्रें वगैरे कारभार चालूं लागला. आणि तिची मर्जी राखून पेठ्यानें बंदोबस्त केला.' ( म. रि. म. वि. २ पृ. २८४ )

ताराबाईनीं नानासाहेब पेशव्यांकडून करार करून घेतल्यानंतर त्या कारभार पाहूं लागल्या, त्यामुळें पूर्वी स्वतंत्र होऊं पहाणाऱ्या पेशव्यांना त्यांनीं किती वठणीवर आणलें होतें हें पुढील पत्रावरून दिसून येईल. हें पत्र तारीख ३१ मे सन १७५२ चें असून तें नानासाहेब पेशव्यांनीं गोविंदराव चिटणीस यांना लिहिलेलें आहे. [ खंड ६ ले. २५६ ].

श्री शके १६७४ ज्येष्ठ वद्य १४

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री गोविंदराव गोसावी यांसी:—

स्ने॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. चिरंजीव नानाचे पत्रीं विस्तारें लिहिलें आहे. सारांश ज्या काळीं जो प्रसंग प्राप्त होईल, तो त्या त्या प्रकारें निभावावा. एतद्विषयीं प्राचीन चमत्कारिक कार्यकर्ते यांच्या प्रासंगिक युक्ति, मोंगलाईतील व दक्षणेंतील, व शास्त्रांतील तुह्मांस स्फुरद्रुप आहेत; व मनन केलिया तुम्हांसच सुचतील, हा भरवसा पूर्ण मजला आहे. हरप्रकारें आहे. साहेबासीं राजकारण करून, त्यांचे संशय दूर करून, स्वस्थ रीतीनें जसें प्रशस्त वाटे, तैसें राज्य करीत. दुर्लौकिक दिल्लीपावेतों विरुद्ध न होय, ऐसें हरएक तजाविजेनें करणें. आमचा अर्थ तरीः जें खावंदानें दिल्हें तें खाऊन, चाकरीस हाजर राहून, जें काम सांगतील व आपल्याच्यानें होईल, तें करूं. आईसाहेबांनीं सुखरूप आपले खातेरस येईल, तसे कार्यभाग करावे. या विचारें बोलून वसवास दूर होय, ऐसें करणें. नच होय, तर आम्हीं व आमच्या पक्षीचे जे मनापासून असतील ते उदास रीतीनें हरामखोरी न करितां, आपलें संभाळून आम्हां सहवर्तमान राहातील. ज्याची जे क्रिया असेल, तसें फल होईल. त्या अन्वयें बोलून लौकिक विरुद्ध करणें. आमचा अर्थ तर, दोन वर्षे कर्जदार जाहालों. आतां आह्मांस दरबारचे तेल मिठाचा कारभाराचा उत्साह नाहीं. विशेष काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

५ **कर्नाटकावर स्वारीः**—मागें दर्शविल्याप्रमाणें ताराबाईनीं नानासाहेबांच्या स्वार्थी धोरणास आळा घालून त्यांना बऱ्याच अंशीं ठिकाणावर आणल्यानंतर कोल्हापूरच्या संभाजी महाराजांच्या बाबतींत एक अपूर्ण राहिलेलें मागील-राजकारण त्यांना साधून घ्यावयाचें होतें. सांगोल्याचें स्वार्थी राजकारण नानासाहेबांनीं जें रचिलें होतें त्याला तोड ह्मणून रामचंद्र-बाबा, महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस यांनीं कर्नाटकचा सुभा सदाशिवरावभाऊ यांचे नांवें करून कोल्हापूरचें पेशवेपद त्यांना संभाजीराजे यांचेकडून देवविण्याचा मनसुबा तयार केला होता. परंतु नानासाहेबांच्या त्या वेळच्या प्रतिडावामुळें तो फसला होता. तो पुनः अंमलांत आणण्याचें राजकारण सुरू झालें. हें राजकारण ह्मणजे ताराबाईनीं नानासाहेब

पेशव्यांकडून जो तहनामा लिहून घेतला त्याचाच पडसाद आहे. साताऱ्याचें पेशवेपद जसें आपल्याकडे आलें तसेंच कोल्हापूरचेंही यावें अशी नानासाहेबांची इच्छा होती. परंतु सदाशिवरावभाऊ साताऱ्याच्या कारभारांत आल्यानंतर तो त्यांचा हट्ट इतर बऱ्याच त्यांच्या हट्टाबरोबर विरघळून गेला होता. इ. स. १७५४ मध्यें सावनूरच्या नबाबाचें पारिपत्य करण्याचा पेशव्यांचा मनसुबा ठरला. इ. स. १७३० मधील शाहूराजे व संभाजीराजे यांच्या तहान्वयें कृष्णेच्या दक्षिणेकडील कर्नाटक मुलुखावरील चौथ वगैरे हक्कांच्या अंमलबजावणीचा अधिकार संभाजीमहाराजांकडे आला होता. तेव्हां सावनूरच्या नबाबावरील स्वारीला संभाजीमहाराजांची आज्ञा मिळणें जरूर होतें. ही आज्ञा ह्मणजेच कोल्हापूर दरबारकडून पेशवेपदाचा मान मिळविणें हीं होय. रीतसर कोल्हापूर दरबारचीं पेशवेपदाचीं वस्त्रें मिळालीं ह्मणजे दक्षिणेकडील प्रांतावर चौथ, सरदेशमुखी वगैरे वसूल करण्याचा अधिकार पेशव्यांना मिळणार होता. हीं पेशवेपदाचीं वस्त्रें पूर्वीं संभाजीराजे यांचेकडून सदाशिवरावभाऊंना देणेंचें ठरलें असलेमुळें ती गोष्ट याप्रसंगीं नानासाहेबांनीं मान्य केली व तीं वस्त्रें सदाशिवरावभाऊंना देवविण्याकरतां व सावनूरच्या नबाबाचा बंदोबस्त करण्याकरतां नानासाहेब व सदाशिवरावभाऊ पुण्याहून कोल्हापूरास येण्याकरतां निघाले, या मोहिमेची हकीकत पुढील उताऱ्यांवरून लक्षांत येईल.

" सन खम्मस खमसैन मय्या व अल्लफ शालिवाहन शके १६७६ राज्याभिषेक शके ८१ भावनाम संवत्सरे. श्रीमन्महाराज शंभु छत्रपति महाराज यांचें दर्शन करून सावनूरकर नबाबसाहेब यांचे प्रांतास जाऊन लढाई करावी असा बेत पुणें मुक्कामीं ठरून, श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब व सदाशिव चिमणाजी पंडित ऊर्फ भाऊसाहेब हे फौजेसुद्धां पुण्याहून दरकूच निघाल्यावर पंडित प्रधान यांहीं महाराज सरकारांत विनंतिपत्रें देऊन वकील पाठविले. नंतर किल्ले पन्हाळेहून महाराज सरकारची स्वारी व खाशा महालांच्या स्वाऱ्या करवीरीं येऊन दाखल जहाल्या. नंतर पंडित प्रधान यांची स्वारी फौजेसुद्धां कऱ्हाडानजीक येऊन पोंचली. तेथून कूच दरकूच पंडित प्रधान

यांची स्वारी फौजेसुद्धां निघोन कसबा बावडे तर्फ हवेलीनजीक पंचगंगा तीरास मुक्काम जहाला. दुसरे दिवशीं महाराज सरकारची खांसा स्वारी हत्तीच्या अंबारींत होऊन कोश दीडकोश श्री पंचगंगेच्या ऐलतीरास महाराज सरकारचे डेरे दिले होते त्या डेऱ्यांत दाखल जह्यालयावर पंडित प्रधान यांजकडील तोफखाना सुरू जहाला व पंडित प्रधान महाराज सरकारच्या डेऱ्यानजीक आल्यावर पाय उतारा होऊन डेऱ्याच्या दरवाजांत हात जोडून हातांवर रुमाल घालून महाराज सरकारच्या सदरेनजीक येतांच महाराज सरकारनीं पंडित प्रधान यांच्या आंगावर चादर भरगबी पंडित प्रतिनिधि यांजकडून घातल्यावर दोन्ही हातांवरील रुमाल काढून महाराज सरकारचे पायांवर मस्तक ठेवून नंतर जोहार केल्यावर बसावें ह्मणून आज्ञा जह्यालयावर सदरेनजीक पंडित प्रधान मर्यादेप्रमाणें बसून आपल्याकडील सरदार व मानकरी यांजकडून सरकारास जोहार करवून दर्शनें करावेलीं. नंतर महाराज सरकारची खांसास्वारी हत्तीच्या हौद्यांत जह्याल्यावर पंडित प्रधान व सदाशिवरावभाऊ ऊर्फ भाऊसाहेब खवास-खान्यांत बसून उभयतां पंडित यांहीं मोर्चेलें आपले हातांत घेऊन महाराज सरकारावर उडविण्यास प्रारंभ केल्यावर महाराज सरकारची खांसास्वारी देशख करवीरास येण्याविषयीं जहाली. [ का. सं. प. या. ले. ४०८ ] महाराजांची स्वारी चालती होतांच पंडित प्रधान यांचे फौजेनें दोन्ही बाजूस फेर धरून पद्धती अन्वयें मुजरे केले. महाराजांची स्वारी येऊन पोंचल्यावर पंडित प्रधान यांहीं महाराजांची डेऱ्यांत जाण्याविषयीं आज्ञा घेऊन श्रीचें दर्शन करून पंडित प्रधान यांची स्वारी डेऱ्यास आली. पंडित प्रधान यांचे डेरे रंकाळ्या नजीक बागत शेतवाडींत दिले होते; व सरदार लोक व मानकरी लोक यांचे डेरे पद्धतिप्रमाणें फौजेसुद्धां पंचगंगा किनारेनीं झाले होते. पंडित प्रधान यांचा फौजेसुद्धां करविरीं मुक्काम वीस पंचवीस दिवस झाला होता. ”

“ ते समयीं महाराज सरकारांत पंडित प्रधान यांणीं विनंति करून सदाशिवराव चिमणाजी पंडित यांस प्रधानपद देऊन वस्त्रें दिलीं. त्यावेळीं महाराज सरकारांतून किल्ले पारगड, भवानगड, वल्लभगड, भिंवगड व

सामानगड दिल्हे. यांपैकीं चार किल्ले पंडितप्रधान यांच्या हुकुमांत वागले. किल्ले सामानगडकरी हे पंडितप्रधान यांचे हुकुमांत वागले नाहींत. कर्नाटक प्रांतांतील संस्थानिक दौलतदार यांजकडून चौथाईचा ऐवज दरसाल महाराज सरकारांत यावयाचा तो ऐवज पंडितप्रधान यांही संस्थानिक यांजकडून घेऊन महाराज सरकारांत दरसाल देत जावा असा करार ठरला. नंतर दरसाल चौथाईचा ऐवज महाराज सरकारांत येणेचा तो पंडितप्रधान यांजकडे देत जावा, म्हणजे पंडितप्रधान चौथाईचा ऐवज महाराज सरकारांत पावता करतील ह्मणून महाराज सरकारांतून संस्थानवाले यांचे नांवें ताकीदपत्रें लिहून पंडितप्रधान यांजजवळ दिलीं. महाराज सरकारची आज्ञा घेऊन पंडितप्रधान निघून नबाबसाहेब सावनूरकर यांचे प्रांतांत पोंचल्यावर नबाबसाहेबांच्या फोजेची व पंडितप्रधान यांच्या फौजेची लढाई होऊन पंडितप्रधान यांगीं फौजेसुद्धां सावनुरास जाऊन शह दिला. तेव्हां नबाबसाहेबांकडून सल्ल्याचें बोलणें झालें. ते समयीं खंडणीचें बोलणें ठरून खंडणींत बावीस महालपैकीं नबाबसाहेबांनीं अकरा महाल पंडितप्रधान यांशीं खंडणींत लावून दिले. १ बागलकोट १ गदग १ नवलगुंद १ बाळगीनजीक कृष्णातीर १ हुनगुंद १ डंबळ १ गोकाक १ बदामी १ अणगीगिरी १ सालवतनूर" (वगैरे)

"नंतर पंडितप्रधान यांचे फौजेसुद्धां सावनूर मुक्कामाहून कुच होऊन पुण्यास जाण्यास दरकूच स्वारी परत निघून महाराज सरकारचे सरहद्दीस येऊन पोंचल्यावर पंडितप्रधान यांची सडीस्वारी करविरास येऊन महाराज सरकारांत विनंति करून श्रीमन्महाराज सकल सौभाग्यदिसंपन्न ( जिजाबाई ) यांची खासास्वारी सरंजामसुद्धां करविराहून निघाली तेव्हां पंडितप्रधान यांची स्वारीही दरकूच जात होती. ते समयीं कऱ्हाडनजीक श्रीकृष्णतीरीं उतरल्यावर पुढें एकदोन मुक्कामावर वळवाचा पर्जन्य अकालीं फार पडला. त्या मुक्कामास श्रीमन्महाराज सकल सौभाग्यदिसंपन्न जिजाबाईसाहेब यांच्या खासास्वारीच्या डेऱ्यापुर्ती जमिनींतील भिजलेली माती कामाठी यांजकडून पंडितप्रधान यांहीं काढवून कोरडी जमीन करवून डेरे दिले. आणि स्वारीचे तळाची तयारी

होईपर्यंत पंडितप्रधान डेऱ्यांत राहून आपल्या आज्ञा घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. पुढें दरकूच होऊन स्वारी पुणें मुक्कामीं दाखल झाल्यावर दररोज स्वारीचे दर्शनास पंडितप्रधान यांची स्वारी येत होती; आणि पंडितप्रधान यांच्या कुटुंबांच्या स्वाऱ्या दररोज स्वारीचे दर्शनास येऊन स्वारीं तटें होईपर्यंत राहून स्वारीचें सुख झाल्यावर आपल्या हातांनीं स्वारीच्या पायांची सेवा करून आज्ञा घेऊन आपल्या वाड्यास जावें असा नेम स्वारी पुणें मुक्कामीं होती तोंपर्यंत चालविला होता. पुणें मुक्कामीं स्वारीस पंडितप्रधान यांणीं आपल्या दौलतीचें ऐश्वर्य सर्व दाखवून स्वारीची मर्जी संतोषित केली. नंतर पुणें मुक्कामाहून श्रीमन्महाराज सकळ सौभाग्यादिसंपन्न जिजाआईसाहेब यांची स्वारी करवीरास येण्यास निघाली. ते समयीं पंडितप्रधान यांणीं आपलेकडील सरदार फौजेसुद्धां स्वारी समागमें दिल्यावर स्वारीचें कूच होऊन मजल दरमजल स्वारी करवीरास येऊन दाखल झाल्यावर पंडितप्रधान यांजकडील सरदारांस महाराज सरकारांतून वस्त्रें देऊन परत जाण्यास आज्ञा झाली." (को. प्रां. अ. इ. पुरवणी नं. ७)

**ताराबाईच्या अखेरच्या कर्तबगारीचा आढावाः**—वरील हकीकत वाचली म्हणजे ताराबाईनीं रामराजे यांच्या राज्यारोहणानंतर राज्यकारभाराची जी दिशा आंखली होती त्याच्याविरुद्ध दिशेनें नानासाहेब पेशव्यांनीं जाण्याचा संकल्प करून पुरीं दोन वर्षे जे जे उपद्व्याप केले व स्वराज्याच्या पूर्वीपासून चालत आलेल्या राजकारभाराच्या गाड्याला खीळ घालून स्वार्थ साधण्याचीं जीं कपटकारस्थानें रचिलीं तीं कशीं फुस्स झालीं व पुनः त्यांना पूर्वस्थळावर कसें यावें लागलें हें दिसून येईल. (१) नानासाहेब पेशव्यांना ताराबाईचा कारभार मान्य करावा लागला. (२) कोल्हापूरच्या राज्यांत सदाशिवरावभाऊंना देऊ केलेल्या पेशवेपदाला शेवटीं मान्यता द्यावी लागली. (३) बायकोचा कारभार बरा दिसणार नाहीं हें विधान परत घ्यावें लागलें. (४) सदाशिवरावभाऊंना आपल्या मर्जीविरुद्ध कारभारांत घ्यावें लागलें. (५) रामराजे यांना आपल्या हातचें बाहुलें बन-

विण्याचा मनसुबा सोडून द्यावा लागला. वगैरे कार्यें घडवून आणून ताराबाईनीं नानासाहेबांना राज्यकारभाराच्या पूर्ववत् चाकोरींत आणून सोडलें. कोल्हापूरच्या जिजाबाईही ताराबाईच्या पाऊलांवर पाऊलें टाकीत जाणाऱ्या होत्या. त्याही ताराबाईप्रमाणें स्वाभिमानी, कर्तबगार, मुत्सद्दी आणि तेजस्वी होत्या. नानासाहेबांनीं ताराबाईना करार लिहून दिल्यानंतर चाकराप्रमाणें ते आपल्याशीं वर्तणूक ठेवितात कीं नाहीं हें पहाण्याकरतां त्या जशा पुण्यास गेल्या तशाच यावेळीं जिजाबाईही पुण्यास गेल्या होत्या. त्यांनींही पेशव्यांकडून व पेशव्यांच्या स्त्रियांकडून चाकरांच्या कर्तव्याचे पाठ पूर्णपणें पढवून घेतले; व शेवटीं 'बायकोचा कारभार बरा दिसणार नाहीं,' या त्यांच्या विधानास त्यांच्याच हस्तें हरताळ फांसून नानासाहेबांना कायमचें राज्यकारभारांत नकटें करून ठेविलें.

प्रतिनिधीचा मुतालिक यमाजी शिवदेव हा पहिल्यानें ताराबाईच्या लक्षानें वागत होता, परंतु पुढें तो बंडखोर निघाला अशी ताराबाईची खात्री झाली. ह्मणून त्याचा बंदोबस्त करण्याकरितां सिलीमकर देशमुख यांस ताराबाईनीं आज्ञापत्र पाठविलें. हें आज्ञापत्र तारीख २९ जानेवारी सन १७५४चें पुढीलप्रमाणें आहे. 'यमाजी शिवदेवांनीं जावळी प्रांतें फौज पाठवून दंगा केला आहे, त्याचें पारिपत्य करणें साहेबांस आवश्यक जाणून तुह्मांस आज्ञापत्र सादर असे. तुह्मी, कंक, मालुसरे, खोपडे व जेधे ऐसे एकत्र होऊन, समस्त सरदारांस सामील होऊन गनिमांस धुडावून देणें. [खं. १७ ले. ४१] पुढें नागपूरचे रघोजी भोंसले हे पोटशूळाच्या विकारानें शके १६७७ फाल्गुन शु॥ ३ तारीख १४ फेब्रुवारी सन १७५५ रोजीं नागपुरीं दिवंगत झाले. त्यानंतर त्यांचे जेष्ठ पुत्र जानोजी यांना ताराबाईनीं रामराजे यांचेकडून सेनासाहब सुभ्याचीं वस्त्रें दवविली. याप्रमाणें ताराबाई छत्रपतींच्या अधिकाराची अंमलबजावणी करीत होत्या. त्याचप्रमाणें ता. २३ जून सन १७५८ चें ताराबाईनीं पेशव्यांना आज्ञापत्र पाठविलें तें असें:—"चिरंजीव शाहूबाबा यांसी कैलासवास जाइलियानंतर साहेबांत व तुह्मांत कितेकांनीं नानाप्रकारें

विकल्प घालून राज्यांत बखेडे केले, येविशीं सदाशिव दीक्षित ठकार यांणीं श्रमसाहस करून साहेबांचें व तुमचें एक लक्ष करून बंदोबस्त केला, त्यावरून राज्योपयोगी मनुष्य ऐसें जाणून इनामगांव पंधरा सहस्र रुपयांचें द्यावें व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवावें." ( खं. ११ ले. ११३ )

याप्रमाणें राज्यकारभाराचा अंकुश आपल्या हातीं ठेऊन ताराबाई कारभार डोळ्यांत तेल घालून पहात होत्या. अधून मधून नानासाहेब पेशवे पुनः आपल्या चालीवर जात होते. तरी त्यांना कित्येक वेळां चुचकारून तर कित्येक वेळां धाकदपटशानें त्या ठिकाणावर आणीत होत्या. त्या बाबतींत नानासाहेबांचा व ताराबाईचा जो पत्रव्यवहार झाला तो पुढें दिल्याप्रमाणें होता. नानासाहेबांचें पत्र ता. १५ मे सन १७५८ चें आहे. 'साहेबीं प्रथम मजला वचन दिलें कीं, सर्वप्रकारें तुमचा विश्वास, तुह्मीं नातवापेक्षां साहेबांस अधिक. असें असतां साहेबीं गायकवाडास हुजूर आणिलें; रामदासपंतांस कागदपत्र लिहिले. बापूजी नाइकास नेलें. यमाजीपंताचें पारिपत्य योजिलें. रात्रंदिवस सेवकास विरोध पडे ऐसीं राजकारणें होत जातात. मोंगल केवळ हिंदु राज्याचा शत्रु, त्यास देखील अनुसंधानें होत असतां, सेवकच वांकडे वर्ततात, हा दोष साहेबीं आज्ञापत्रीं लिहून सर्वांशीं बोलतात. ( इ. सं. पे. द. मा. ले. ८ ) दुसऱ्यावर दोषारोप करतांना मनुष्य आपले दोष पूर्णपणें विसरत असतो. नानासाहेब या गोष्टीला अपवाद कसे असू शकतील ? 'मोंगल केवळ हिंदु राज्याचा शत्रु, त्यास देखील अनुसंधानें होत असतां,' असा आरोप ताराबाईवर करण्याचा नानासाहेबांनीं अश्लाघ्य प्रयत्न केला आहे. दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ नानासाहेबांना दिसलें परंतु स्वतःच्या डोळ्यांत मुसळ होतें हें नानासाहेबांना त्यावेळीं आठवलें नाहीं. 'घरचा चोर जिवानिशीं मारी' या म्हणीप्रमाणें चाकर नानासाहेबांनीं धनी रामराजे व ताराबाई सातारा किल्यावर असतां किल्याला वेढा देऊन त्यांची अन्नान्न दशा करून त्यांना शरण येण्याचा प्रसंग आणला, ही हकीकत मागें आलीच आहे. चाकर–शत्रू हा प्रत्यक्ष शत्रूपेक्षां जास्त

घातुक असतो. अशा वेळीं प्रत्यक्ष शत्रूलाही आत्मरक्षणाकरतां मित्र करून घ्यावें लागतें. असे कित्येक प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासांत नमूद आहेत. असें असतांही तो दोष नानासाहेबांनीं ताराबाईच्या माथीं मारण्याचा प्रयत्न केला. परंतु नानासाहेबांनीं निजामावर स्वारी करून त्याचेबरोबर ज्या वेळीं तह केला त्या वेळीं स्वतःकरतां पांच लाखांची जहागीर घेऊन हिंदु राज्याचा जो शत्रू मोंगल त्याची ताबेदारी ऊर्फ गुलामगिरी त्यांनीं पतकरली हें आपलें कृत्य हिंदु राज्यांतील मुख्य आधारस्तंभ—चाकराला लांछनास्पद होतें, स्वतःच्या ‘ मुसळ ’ स्वरूपाच्या दोषाचें होतें याचें स्मरण त्या वेळीं त्यांना झालें नाहीं हेंच खरें. वरील नानासाहेबांच्या पत्रास ताराबाईनीं पुढीलप्रमाणें उत्तर पाठविलें. साहेबांची तुमचे ठायीं पूर्ण कृपा, म्हणूनच पुण्यास साहेबांची स्वारी झाली होती, कीं येणें करून तुह्मांस संतोष व्हावा आणि साहेबीं प्रारंभापासून घडत आलें, त्याची निव्वळ आज्ञा करावी. चित्तांतील आशय निष्प्रांजल आज्ञा कर्तव्य ते करावी. ऐसें साहेबांस दिसून आलें. ये निमित्त श्रीशिखर यात्रेच्या उद्देशें करून स्वारी झाली तेव्हांच दर्शन घेऊन किल्ले सातारियावर मुक्काम झाला. त्यानंतर तुमचे विचारें वे. शा. नारायणबोवा विद्यमानी असतां किल्ल्याहून खालतें येणें झालें. तुह्मांकडून मध्यस्थीस महादाजी निंबाळकर व दिनकर महादेव नेहमीं हुजूर होते. साहेबांचा हेतु कीं, तुह्मांस दर्शनांतीं आज्ञा कर्तव्य ते करून, राज्याचा बंदोबस्त करावा. हेंच धनी यांचें मानस. तों तुमचा दर्शनास यावयाचा योग आजपर्यंत घडून न आला. दिवसेंदिवस विक्षेपावरच गोष्टी पडल्या. आताही या क्षण पावेतों साहेबांचें वचन जें प्रारंभीं दिधलें आहे तेंच प्रमाण आहे. तुम्हींही साहेबांस आपल्या आराध्यदेवतेच्या दूर्वा व बेलभंडार क्रियापुरःस्पर दिल्हा आहेत, त्याचें स्मरण असों देणें. राज्यकारभाराचा अखत्यार तुह्मांवरच आहे. तुह्मांपेक्षां दुसरा सेवक उपयोगी सांप्रत कालीं कोण ? सर्व राज्यकारभाराचें कामकाज तुमचेच हातें घ्यावें. हेंच साहेबांचें मानस. एतदर्थीं चित्तांत किमपि संशय न धरणें. ” या ताराबाईच्या पत्रावरून नानासाहेबांबद्दल ताराबाईचें मन शुद्ध होतें. परंतु नानासाहेबच

आपल्या संशयी स्वभावामुळें नेहमीं मनांत ताराबाईविषयीं निरनिराळे आक्षेप घेत होते. याकरितांच त्यांच्या वचनाबद्दल व त्यांच्या इमानप्रमाणाच्या क्रियेबद्दल ताराबाईंना वरीलप्रमाणें वरचेवर स्मरण करून देऊन नानासाहेबांना ठिकाणावर आणावें लागत होतें. नानासाहेबांना आपल्या इमानप्रमाणाची विस्मृति स्वार्थापुढें कशी पडत होती हें पुढील कोल्हापूरच्या इतिहासावरून दिसून येईल.

**७ जिजाबाईशीं पेशव्यांची बेइमानीः—** इ. स. १७६० च्या प्रारंभींच कोल्हापूरच्या राज्याचे प्रधानपंत सदाशिवरावभाऊ हे निजामाच्या स्वारीवर गेले. उदगीरची लढाई आटोपल्यानंतर ते दिल्लीस रवाना झाले. नोव्हेंबर महिन्यापर्यंत सदाशिवरावभाऊंनीं दिल्ली काबीज करून कुंजपुराही हस्तगत केला. पानपतच्या मुक्कामीं भाऊसाहेबांनीं ५० हात रुंद व १२ हात खोल असा प्रचंड खंदक खणून व मातीचे उंचवटे बांधून स्वसंरक्षणाची तयारी केली. परंतु त्या ठिकाणीं अब्दालीनें त्यांना वेढा घालून कोंडण्याचा प्रयत्न चालविला. तेव्हां त्यांच्या मदतीस नानासाहेबांनीं जाण्याचें ठरविलें. जातांना निजामअल्लीस बरोबर न्यावयाचा त्यांनीं मनसबा ठरविला व त्याला आणण्या-करतां रघुनाथरावदादा यांस त्याचेकडे पाठविलें. या वेळीं नारायणराव तात्या घोरपडे इचलकरंजीकर हे आपल्या पथकासह राघोबादादांच्या फौजेंत सामील झाले होते. त्यांची मातोश्री अनूबाई या इचलकरंजीलाच मुक्काम करून होत्या. या वेळीं कोल्हापूरचे संभाजीमहाराज वार्धक्यानें व दुखण्यानें बहुत जर्जर झाले होते. त्यांना सात राण्या होत्या. परंतु त्यांत थोरल्या जिजाबाई याच राज्याचा कारभार पहात होत्या. पुढें शके १६८२ राज्याभिषेक शक ८७ मार्गशीर्ष शुद्ध १२ रोजीं [ तारीख १८ डिसेंबर सन १७६० ] ठाणें वडगांव येथें संभाजीराजे मरण पावले. प्रेत करविरीं आणून पंचगंगातीरीं सार्थक केलें. हें वर्तमान अनुबाई यांनीं नानासाहेब पेशव्यांस टाकोटाक लिहून पाठविलें. त्या वेळीं नानासाहेब पेशवे पानिपताकडे जाण्याकरतां स्वारीवर होते. त्यांचा मुक्काम ता. २१ डिसेंबर रोजीं राक्षसभुवनावर होता. ता. २७ डिसेंबर रोजीं त्यांचें

दुसरें लग्न पैठणास नारोबा नाईक वाखरे देशस्थ ब्राह्मण सावकार यांच्या मुलीबरोबर झालें. ( म. रि. म. वि. ३ पृ. २११ ) नानासाहेबांच्या स्वारीच्या या मुक्कामावरून संभाजी राजे यांच्या मृत्यूची बातमी त्यांना राक्षसभुवनच्या अलिकडे कोठें तरी पोंचली असावी असें ठरतें.

" राज्यांत सरंजामदार व सरदार वगैरे आहेत. त्यांचे इतमाम व सरंजाम चालविण्याविषयीं जरी पेशव्यांनीं पूर्वीं शाहूमहाराजांजवळ कबूल केलें होतें तरी...प्रतिनिधीकडे मुलुख होता त्यापैकीं निदान तीनचतुर्थांश तरी मुलुख त्यांनीं आजपर्यंत काढून घेतला होता. दाभाडे सेनापति ह्मणजे अर्थात् त्यांचे मुतालिक गायकवाड यांजपासून गुजराथेचा अर्धा अंमल त्यांनीं हिसकून घेतला होता. फत्तेसिंग भोंसले यांचीही जहागीर त्यांनीं बरीच कमी केली होती...संभाजीमहाराज हयात होते तोंपर्यंत त्यांची अमर्यादा पेशव्यांनीं कधीं काडीमात्र केली नाहीं. परंतु ते मरण पावल्यावर जिजाबाईंचे हातांत एवढें राज्य राहूं न देण्याचा त्यांनीं निश्चय केला. असें करितांना आपण पूर्वीं काय केलें, कसें वागलों, हेंही त्यास भान राहिलें नाहीं ! करवीरचें राज्य घेण्याची नानासाहेबांनीं हांव धरिली ही फार वाईट गोष्ट केली. सामान्य व्यवहारास नीतीचीं बंधनें आहेत तीं राजनीतीस लागू नाहींत असें ह्मणतात. तें खरें असलें तरी दिलेल्या वचनाची ओळखही ठेवूं नये असा राजनीतीचा सर्वसंमत सिद्धांत असेल असें आह्मांस वाटत नाहीं ? त्यांतून जिजाबाईनीं कोठें फंदफितूर केला असता तर हें वर्तन कांहींतरी क्षम्य होतें ! परंतु येथें तशीही कांहीं सबब नव्हती ! असो. इचलकरंजीकरांचे सरदार हरिराम व विसाजी नारायण हे श्रीमंतासमीपच होते. त्यांसच पांचसहा हजार फौज बरोबर घेऊन श्रीमंतांनीं करवीरचें राज्य जप्त करण्याच्या कामावर पाठविलें. ते त्वरेनें येऊन वारणातीरीं पिरान कवठ्यापाशीं उतरले व राज्यांतले किल्ले व ठाणीं हवालीं करण्याविषयीं जिजाबाईस तगादा करूं लागले."

" रांगणा व सामानगड वगैरे एकदोन किल्ले व दोन अडीच लक्षांचा मुलुख मात्र जिजाबाईकडे ठेवून बाकी सर्व राज्य घ्यावें असा पेशव्यांचा

मनोदय होता. तो सिद्धीस जाता तर सरंजामदार राजपथकी असल्यामुळें सातारच्या राजमंडळांतल्याप्रमाणें यांचेही सरंजाम चाललेच असते. इनामदारांसही कांहीं भय नव्हतें. येऊन जाऊन खालसा मुलुख होता त्यापैकीं सुमारें तीनचतुर्थांश मुलुख पेशव्यांस मिळाला असता. बाकीचा एकचतुर्थांश मुलुख व एकदोन किल्ले देऊन ताराबाई साताऱ्यास होत्या त्याप्रमाणें जिजाबाईस निर्माल्यवत् करून रांगण्यावर बसवून ठेवावें, असा पेशव्यांनीं मनांत बेत योजिला असावा. परंतु जिजाबाई किती पाणीदार व कारस्थानी बायको होती हें त्यांनीं अजून ओळखिलें नव्हतें. पेशव्यांच्या वचनावर विश्वास ठेवून गेलीं सात वर्षें जिजाबाईनीं त्यांशीं विरुद्ध आचरण तिलप्राय केलें नव्हतें. त्या अवधींत त्या एकदोनदां पुण्यास गेल्या होत्या. तेव्हां त्यांच्या उच्च पदास अनुरूप असा बहुमान ठेवण्यांत अगर मिष्ट व लीन भाषण करण्यांत पेशव्यांकडून कमतरता कांहींच दिसली नव्हती. असें असतां संभाजीमहाराज वारले नाहींत तोंच राज्याची जप्ती करण्याकरितां पेशव्यांची फौज आलेली पाहून जिजाबाईचा क्रोधाग्नि प्रज्वलित झाला! तथापि त्यांनीं तो आंतल्या आंत दाबून जप्तीची फौज परत नेण्याविषयीं पेशवे व नारायणराव तात्या यांस पत्रें पाठविलीं व कृष्णराव अमात्य यांच्या द्वारें अनुबाई इचलकरंजीस होत्या त्यांसही लिहून कळविलें. परंतु "आतां पेशव्यांचीं लष्करें लांब बऱ्हाणपुरापलीकडे गेलीं आहेत, तेथून त्यांचीं उत्तरें येत तोंपर्यंत जप्तीच्या कामावर आलेली फौज स्वस्थ बसणें अशक्य दिसतें," असें उत्तर अनुबाईकडून करवीरास गेलें. त्याबरोबर जिजाबाईनीं सामादि चतुर्विध उपायांपैकीं दंडाचा प्रयोग तात्काळ सुरू केला. हरिराम व विसाजी नारायण या सरदारांस 'ठाणीं आज हवालीं करितों, उद्यां करितों,' ह्मणून त्यांनीं नादीं लाविलेंच होतें. इतक्या सुलभ रीतीनें आपली एवढी दुर्घट कामगिरी पार पडणार ह्मणून ते सरदार मनांत मांडे खात बेफामपणानें राहिले असतां जिजाबाईनीं अकस्मात् त्यांवर फौज पाठवून छापा घालून त्यांची धुळधाण उडविली व त्यांचें लष्कर लुटून घेतलें." (खरेकृत इ. सं. चा इतिहास पृ. ८७, ८८.)

यावेळीं जिजाबाईनीं नानासाहेब पेशव्यांवर बेइमानाचा आरोप करून त्वेषाची चडफड केली त्यावरून नानासाहेबांनीं संभाजी महाराजांना व जिजाबाईना यापूर्वी कांहींतरी वचन दिलें होतें हेंच ठाम मत होतें. तो प्रसंग ह्मणजे मागील प्रकरणीं निवेदन केल्याप्रमाणें ताराबाईच्या मदतीकरतां संभाजी महाराज साताऱ्यास निघाले पण जिजाबाईनीं त्यांना परत फिरविलें तो होय. त्यावेळीं पेशवे संभाजी महाराजांच्या भेटीला गेले होते. पेशवे त्यावेळीं राज्याचे कुलमुखत्यार झाले होते. ते शाहूमहाराजांच्या सनदा धाब्यावर बसवून आपलें राज्य घेतील कीं काय अशी चिंता संभाजी महाराजांना पडली होती. 'पण पेशव्यांची गांठ पडतांच ती त्यांची चिंता पार नाहींशी झाली. या भेटींत तुमचें राज्य तुह्मांकडे चालवूं असें पेशव्यांनीं संभाजी महाराजांजवळ कबूल केलें असेलच. त्यांत कांहीं विशेष नाहीं. पण तुह्मांस औरस पुत्र न झाला तरीसुद्धां दत्तक देववून तुमचें राज्य चालवूं, असें कांहींतरी वचन पेशव्यांनीं संभाजी महाराज व जिजाबाई यांस याप्रसंगीं दिलें असावें असें वाटतें. पुढें सात वर्षांनीं संभाजी महाराज मृत्यु पावल्यावर त्यांचें राज्य जप्त करण्याचा पेशव्यांनीं यत्न केला तेव्हां जिजाबाईनीं त्यांवर बेइमानाचा आरोप करून त्वेषाची चडफड केली आहे, त्यावरून असलें कांहींतरी वचन यावेळीं पेशव्यांनीं दिलें असावें हेंच ठाम मत होतें.' (इ. सं. इ. पृ. ७३) खरे शास्त्र्यांच्या वरील माहितीप्रमाणें नानासाहेब पेशव्यांचे मनांत कोल्हापूरचें राज्य खालसा करावयाचें होतें हें स्पष्ट ठरतें. परंतु हें त्यांचें ह्मणणें योग्य दिसत नाहीं असें रियासतकारांचें मत आहे. त्याला रियासतकार पुढीलप्रमाणें पत्राचें प्रमाण देतात. हें पत्र संभाजी महाराज निवर्तल्याचे दुसरे दिवशीं ह्मणजे ता. १९ डिसेंबरचें आहे. "सेवेशीं विज्ञापना:—येथील वर्तमान ताागाईत चंद्र १० जमादिलावलपर्यंत यथास्थित असे. विशेष, संभाजीराजे समाप्त जाहल्याचें वर्तमान येथें आल्यावर श्रीमंतीं विसाजी नारायण व सदाशिव अवधूत यांस जिजाबाईकडे रवाना केलें. त्यांजबरोबर महादाजी भोंसले मुंगीकर यांचा धाकटा भाऊ उमाजी त्यास बरोबर द्यावा; आणि तेथें जाऊन

त्यास राजा करावा; कारभार जिजाबाईनें करावा; पनाळा, रांगणा याप्रमाणें किल्ले द्यावे; बरकड बंदोबस्त करणें तो सर्वत्रांनीं करावा; आणि ताराबाईप्रमाणें खर्च नेमून द्यावा, त्याप्रमाणें खाऊन स्वस्थ राहावें; याप्रमाणें कबूल केल्यास उत्तम. नाहींतर जप्ती करावी. ज्या किल्ल्यावर जिजाबाई असेल त्या किल्ल्या-भोंवतीं वेढा घालून बसावें याप्रमाणें जाहलें वर्तमान लिहिलें असे. मागाहून होईल तें लिहून पाठवूं. सेवेसीं कळावें. हे विज्ञापना." (इ. सं. ऐ. टि. भा. २ पृ. २२) या पत्रावरून नानासाहेबांचे मनांत कोल्हापूरचें राज्य खालसा करावयाचें नव्हतें; महादाजीराजे भोंसले मुंगीकर याचा भाऊ उमाजी यास जिजाबाईनें मांडीवर घेऊन राज्य करावें; फक्त जिजाबाईच्या हातांत कारभार असूं नये; एवढाच नानासाहेबांचा हेतु होता असें रियासतकारांचें मत वरील पत्रावरून झाल्यानें त्यांनीं खेरशास्त्र्यांचें प्रतिपादन योग्य नाहीं असें म्हटलें आहे. या आपल्या विधानाला पुष्टी ह्मणून रियासकारांनीं 'ता. २५ मे. स. १७६१ रोजीं माधवराव साताऱ्यास पोंचला. आईसाहेबांचे मर्जीचा विचार पाहिला तों त्यांचे चित्तांत दुसरा दत्तक करावयाचा नाहीं, रामराजासच बाहेर काढावा असा आग्रह दिसला. तेव्हां माधवराव निघोन पुण्यास गेले.' ( था. रा. च. पृ. २९) याचा आधार दिला आहे. पण हा आधार चुकीचा आहे. नानासाहेब पेशवे ता. २३ जून सन १७६१ रोजीं मरण पावले. त्यापूर्वीं सुमारें एक महिना ता. २५ मे सन १७६१ रोजीं माधवरावांस नानासाहेबांनीं ताराबाई-कडे पाठविलें असा तर्क थाकटे रामराजे यांच्या चारित्राच्या आधारावरून रियासतकारांनीं केलेला आहे. परंतु राजवाडे खंड १ ले. २८९ यावरून पहातां माधवराव हे साताऱ्यास नानासाहेबांचे मृत्यूनंतर तेरा दिवसांनीं म्हणजे ता. ६ जुलै रोजीं गेले होते हें निश्चित ठरतें. हें पत्र ता. ४ जुलै सन १७६१ चें आहे. त्यांत पुढें दिल्याप्रमाणें माहिती आहे. " श्रीमंतांचा ( नानासाहेबांचा ) आजचा बारावा दिवस आहे. दानधर्म उत्तमप्रकारें दानें वगैरे होतच आहेत. राजश्री माधवराव क्रिया करितात. तेरावा दिवसही उत्तम होईल. श्रीमंत राजश्री माधवराव सातारियास जाणार. एक विचार, एकटेच जाणार. एक

विचार दादाहि बराबरीच जातील. मुत्सद्दी अवघे बरोबर जातील. श्रीमंत राजश्री नानासाहेबीं राजा करावयाचा नेमिला होता तो राहिलासा जाला आहे. श्रीमंत राजश्री दादांचे व गोपिकाबाईचे मतें ताराबाईचे विचारें जों राजा बसवावयाचा अगर न बसवावयाचा विचार जो करितील त्याप्रों ताराबाईचे विचारें करावें. त्यास रामराजाच बाहेर काढावा असें असे. श्रीमंत राजश्री माधवराव उद्यांच्या सोमवारीं सातारियास जाणार. सप्तमीस पेशवाईचीं वस्त्रें घ्यावयाचा मुहूर्त आहे. "

वरील पत्रांतील माहिती लक्षांत घेतली असतां बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो. हा प्रसंग माधवराव पेशव्यांना छत्रपतीकडून पंतप्रधानपदाचीं वस्त्रें घेण्याचा होता. अर्थात् या वेळीं पंतप्रधानपदाच्या मान्यतेबरोबर छत्रपति पदाचीही मान्यता ठरणार होती. नानासाहेब पेशव्यांनीं रामराजे यांच्याकडून छत्रपतीपदाच्या अधिकाराचा राजीनामा घेतल्यामुळें रामराजे निर्माल्यवत् झाले होते. परंतु ताराबाईनें नानासाहेबांकडून तह लिहून घेतल्यामुळें छत्रपतींचे अधिकार त्यांच्या हातांत खेळूं लागले. त्यामुळें अखत्यारीच्या नानासाहेबांच्या अधिकारांना साताऱ्याच्या राज्यांत बराच पायबंध बसला. त्याचप्रमाणें कोल्हापूरच्या राज्याला नानासाहेबांच्या हस्तक्षेपाची झळ लागूं नये ह्मणून संभाजी महाराजांनीं सदाशिवरावभाऊंना आपले राज्यांतील पेशवेपदाचीं वस्त्रें व सरंजाम दिला त्यामुळें तिकडेही त्यांची लुडबुड चालण्यासारखी नव्हती. तेव्हां सातारा व कोल्हापूर या दोन्हीं राज्यांची पूर्ण अखत्यारी आपल्या हातीं आणण्याची नानासाहेबांनीं मसलत तयार करून ठेविली होती. ती मसलत ह्मणजे वरील पत्रांत दर्शविल्याप्रमाणें 'श्रीमंत राजश्री नानासाहेबीं राजा करावया नेमिला होता' ही होय. महादाजी भोंसले मुंगीकर यांचा धाकटा भाऊ उमाजी यास सातारा व कोल्हापूर या दोन्हीं राज्याचा एकछत्री राजा करून त्याला आपल्या हातांतील बाहुलें नानासाहेब करणार होते. एकछत्री राज्य करावयाचें हें थोर व उदात्त तत्व पुढें ठेऊन या वेळीं नानासाहेब आपला पूर्ण स्वार्थ साधून घेणार होते. हा नानासाहेबांचा डाव ताराबाई व जिजाबाई या उभयतांच्या डावांला

प्रतिडाव असाच होता. ताराबाई एकछत्री राज्य व्हावें याच मताच्या पूर्णपणें पूर्वीपासून होत्या. शिवाय त्यांनीं रामराजे हे उचले आहेत असा बभ्रा केला असल्यामुळें तो पेशव्यांच्या पथ्यावरच होता. सकवारबाईनीं शाहूराजे यांच्या मरणकालीं संभाजीराजे यांना साताऱ्यास बोलावून एकछत्री राजा करण्याचा प्रयत्न केला होता. ताराबाईनींही संभाजीराजे यांना साताऱ्यास बोलावून त्यांना एकछत्री राजा करण्याचा दुसरा प्रयत्न केला. दोन्हीं प्रयत्न त्या वेळीं नानासाहेबांनीं जरी हाणून पाडिले होते तरी एकछत्री राजा असावा ही मूलभूत इच्छा ताराबाईची असल्यामुळें त्यांचकडून या बाबतींत नानासाहेबांना विरोध होणार नव्हता. संभाजीमहाराज जास्त दिवस जगत नाहींत असें नानासाहेबांना वाटल्यावर त्यांनीं उमाजी भोंसले यांस आपल्याजवळ आणून ठेवलें व कोल्हापूरवर त्याची स्थापना करून त्यालाच नंतर साताऱ्याच्या गादिवर आणावयाचें असा संकल्प केला. आपल्या लगामीं असलेला उमाजी भोंसले एकछत्री राजा झाल्यानंतर त्याचे पंतप्रधान म्हणजे संयुक्त मराठी राज्याचे पंतप्रधान नानासाहेब हेच बनणार होते. त्यामुळें कोल्हापूरचे पंतप्रधान बनलेले सदाशिवरावभाऊ आपोआप पदभ्रष्ट होणार होते. त्यामुळें संभाजी महाराज, जिजाबाई, रामचंद्रबाबा आणि महादोबा पुरंदरे यांचा साधलेला डाव सहजच विस्कटून पडणार होता व सदाशिवरावभाऊचा दर्जाही उतरणार होता. त्यामुळें त्यांना नानासाहेबांचे अंकित होऊनच राहणें प्राप्त होणार होतें. त्याचप्रमाणें ताराबाईना तहनाम्याप्रमाणें कबूल केलेले छत्रपतिपदाचे अधिकारही संपुष्टांत या योजनेनें येणार होते. यावरून उमाजी भोंसले याला राजा बनविण्यांत नानासाहेबांचा कसा स्वार्थी डाव होता हें लक्षांत येईल.

संभाजीमहाराज मरण पावतांच कोल्हापूरचें राज्य एकदम जप्त करण्याची नानासाहेबांनीं जी आज्ञा दिली ती वरील त्यांच्या डावाला अनुसरूनच होती. खरें पाहूं जातां कोल्हापूरच्या राज्यांत हस्तक्षेप करण्याचा यावेळीं त्यांना अधिकार नसून तो पंतप्रधान या नात्यानें सदाशिवरावभाऊंचा होता. ते त्यावेळीं पानपतावर होते. शिवाय संभाजी महाराजांची धाकटी पत्नी कुसाबाई या त्यावेळीं

गरोदर होत्या. त्यांना मुलगा होईल कीं मुलगी होईल हें अनिश्चित होतें. अशा वेळीं उमाजीला जिजाबाईच्या गळ्यांत दत्तक ह्मणून बांधण्याचा नानासाहेबांनीं जो प्रयत्न केला तो न्यायाचा होता कीं अन्यायाचा होता याकडे रियासतकारांचें लक्ष न गेल्यामुळें नानासाहेबांची बाजू सावरून धरण्याचा हास्यास्पद प्रयत्न त्यांनीं केला आहे. या बाबतींत खरेशास्त्री यांचेंच विधान बरोबर आहे हें दिसून येईल. जिजाबाईनीं कोल्हापूर राज्याच्या जतीस आलेल्या सरदारांची धूळधाण उडवून दिल्यानंतर उमाजी भोंसले याला राजा करण्याचे व आपला स्वार्थ साधण्याचे नानासाहेबांचे मनांतील मांडे त्यावेळीं त्यांच्या मनांतच राहिले व पुढें ते दिवंगत झाल्यामुळें कायमचेच थंड झाले. यालाच अनुसरून वरील पत्रांत श्रीमंत राजश्री नानासाहेबीं राजा करावयाचा नेमिला होता तो राहिलासा जाला आहे ' असें ह्मटलें आहे. तेव्हां माधवराव पेशव्यांना छत्रपतीकडून वस्त्रें घ्यावयाचीं झाल्यास छत्रपती कोणास समजावयाचें हें नानासाहेबांनीं घालून ठेवलेलें कोडें माधवराव पेशव्यांना अगोदर उलगडून घ्यावयास पाहिजे होतें. त्याप्रमाणें राघोबादादा व गोपिकाबाई यांच्या विचारें ताराबाई सांगतील त्याप्रमाणें नवीन राजा करून वस्त्रें घ्यावयाचीं किंवा रामराजे यांना बाहेर काढून त्यांचे हस्तें घ्यावयाचीं याचा निर्णय त्यांनीं ताराबाईशीं विचारविनिमय करून ठरविला. ताराबाईनीं रामराजे यांना बाहेर काढून त्यांचे हस्तें वस्त्रें घ्यावीं असा निर्णय दिल्यामुळें माधवरावांनीं रामराजे छत्रपति यांचे हस्तें पंतप्रधानाचीं वस्त्रें घेतलीं. हा पूर्वीपासूनचा इतिहास लक्षांत घेतला ह्मणजे एकछत्री राजा करण्याची नानासाहेबांची पूर्वीपासून इच्छा होती, पण ती शाहूमहाराज, ताराबाई व जिजाबाई यांनीं सफल होऊं दिली नाहीं असें कोडकौतुक रियासतकार नानासाहेबांविषयीं जें गातात तें किती अप्रयोजक आहे याची कल्पना येईल.

ताराबाईचे कारकीर्दींत मराठी राज्याचा झेंडा अटकेवर नेऊन फडकविण्याचें महत् कार्य राघोबादादा ऊर्फ राघोभरारी यांनीं इ. स. १७५९ मध्यें केलें. हें मराठ्यांच्या साहसी वृत्तीला, पराक्रमाला आणि कीर्तीला साजेल असेंच

झालें. राघोभरारी हे जसे खंदे सेनापति आणि युद्धकलाविशारद होते, तसेंच त्यांचे हाताखालीं मानाजीराव फांकडे, सखाराम हरी गुप्ते यांच्यासारखे सरदार जिवाला जीव देणारे समरवीर होते. हे योद्धे म्हणजे त्या वेळेचीं महाराष्ट्रांतील नररत्नें होतीं. अटकेच्या चिरस्मरणीय विजयानंतर प्रत्यक्ष पेशव्यांच्या घरांत बेदिली उत्पन्न झाली. त्याचें पर्यवसान कारभाऱ्याला सेनापति व सेनापतीला कारभारी करण्यांत झालें. पुढें दोनच वर्षांनीं पानिपतची मोहीम निघाली. त्यांत पेशव्यांचे कारभारी सदाशिवरावभाऊ हे सेनापति होऊन मोहिमेवर गेले. खरे सेनापति राघोबादादा कारभार पाहूं लागले. त्यामुळें लढणाऱ्या फौजेवरील सेनापतीच्या वजनाचा दरारा कमी झाला. त्याचप्रमाणें राज्यकारभारावरील खंद्या कारभाऱ्याचें वजन सेनापति कारभारांत आल्यामुळें कमी झालें. हीच अदला-बदल मूलतः नानासाहेब पेशव्यांनीं जी केली तीच पानिपतच्या अपयशाला आणि नाशाला कारणीभूत झाली. ' अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम्। अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ' या उक्तीप्रमाणें नानासाहेब पेशव्यांच्या योजकत्वाचा तोल या प्रसंगीं सुटला होता हेंच खरें. स्वार्थानें बुद्धि-भ्रंश होतो व बुद्धिभ्रंशानें सर्वनाश होत असतो.

पानिपतच्या रणकुंडांत नानासाहेब पेशव्यांचे वडील चिरंजीव विश्वासराव मारले गेले. मुख्य सेनापति अदृश्य झाले. लक्षावधि सैनिकांचे बळी पडले. कांहीं नामांकित सरदारांनीं पळ काढले तर कांहीं धुळीला मिळाले. एकंदरींत पेशव्यांचें बहुतेक वैभव, पराक्रम आणि कीर्ति पानिपतच्या समरभूमीवर लोप पावली. या अपयशाला ज्या ज्या निरनिराळ्या कारणपरंपरा दाखविल्या जातात त्यांत पेशव्यांच्या सैन्यांतील बेदिली हें एक मुख्य कारण आहे. या मोहिमेंत बाहेरून जरी सैन्याचें मोठें अवडंबर दिसत होतें तरी त्या सैन्याची अंतस्थ स्थिति विचित्र आणि बेदिलीची होती. ज्या नानासाहेब पेशव्यांनीं प्रत्यक्ष भाऊवर शस्त्र धरलें ते प्रसंगविशेषीं इतर सरदारांवर कां धरूं शकणार नाहींत ही भीति प्रत्येक सरदाराला वाटत होती. नानासाहेबांचा हा दुर्लौकिक केवळ मराठी राज्यापुरताच नव्हता तर तो इराण–तुराणापर्यंत गेलेला होता. त्यामुळें

पेशव्यांच्या सैन्यांत आंतड्याला पीळ पडून ईर्षेनें लढण्याची खरी इच्छा फार थोड्या लोकांत होती. राघोबादादांना अटकेवर जो विजय मिळाला त्याला मुख्यतः त्यांचें व त्यांच्या सरदारांचें व्यक्तिमत्व कारणीभूत झालें होतें. तें भाग्य सदाशिवरावभाऊंना लाभलेलें नव्हतें. एकंदरींत नानासाहेबांच्या आजपर्यंतच्या विश्वासघातकी राज्यकारभाराच्या धारणामुळें पानिपतासारख्या निर्वाणीच्या युद्धांत अपयश आलें, हें एक मुख्य कारण इतर कारणांत इतिहासांत नमूद होऊन राहील यांत संशय नाहीं.

**८ ताराबाई व राघोबादादाः**—या पानिपतच्या प्रळयाच्या धक्यामुळें नानासाहेब शोकाकुल होऊन लवकरच ता. २३ जून सन १७६१ रोजीं पुण्यास पर्वतीवर कालवश झाले. त्यानंतर त्यांचे द्वितीय चिरंजीव माधवराव यांना राघोबादादांनीं साताऱ्यास नेऊन ताराबाईच्या सल्याप्रमाणें रामराजे यांचेकडून पंतप्रधानाचीं वस्त्रें देवविलीं. यावेळीं ताराबाईनीं रामराजे यांना बाहेर काढलें. याचें मुख्य कारण कपटकारस्थानी नानासाहेब पेशवे कालवश होऊन राघोबादादासारख्या उघड अंतःकरणाच्या आणि लष्करी बाण्याच्या पुरुषाच्या हातांत वडीलकीचा मान आला होता. माधवराव हे यावेळीं अल्पवयी असल्यामुळें राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें राघोबादादांच्याच हातीं राहणार तेव्हां रामराजे यांच्या जीविताला अगर इभ्रतीला दगाफटका होणार नाहीं अशी ताराबाईची खात्री झाली ह्मणून ताराबाईनीं रामराजे यांना बिनधोक बाहेर काढलें. वीरांच्या अंतःकरणाची पारख वीर माणसांनाच होत असते. ताराबाईनीं राघोबादादांवर विश्वास ठेऊन रामराजे यांना बाहेर काढलें. राघोबादादांनीं रामराजे यांना धनी मानून त्यांचा कसा दर्जा सांभाळिला हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. "महाराजांनीं (रामराजे यांनीं) खालीं राहून (सातारा शहरांतील राजवाड्यांत) कारभार करावासें केलें. आपणाकडील कारभारी एक जवळ मुतालकीचे कामावर राहिले ते आणि महाराजांकडील सर्व कारभारी अमात्य व सचिव चिटणीस व खासनीस कारखानदार रहावे. हुजूरचे महाल वतनें किल्ले ठाणें वगैरे यांचे मामलेदार करणें ते महाराजांनीं

पाहिजेत ते करावे. गायकवाड, सेनासाहेब सुभा व सचिव व मंत्री व सरदेशमुखी, आंगरे वगैरे यांच्या नेमणुका ऐवज ठराव येणें ते हुजूर द्यावे, असें करून त्रिंबकराव सदाशिव पुरंदरे यांचे पुत्र महिपतराव त्रिंबक हे मुतालिकीवर ठेविले. महाराज वाड्यांत राहिल वाडा नीट करणें यांस तालुकदारांकडे वराता करून ऐवज आणून नीट करविला. सर्व मुत्सद्दी जवळ राहून काम कारभार कागदपत्र, व मामले विल्हेस लागणें करूं लागले. महाराजांस कन्या दोन्हीं जाल्या. त्यांचें लग्न करावयाच्या वराता भोंसले गायकवाड यांजकडे ऐवजाच्या करविल्या." (धा. रा. च. पृ. ३०-३१.)

वरील हकीकत वाचली ह्मणजे ताराबाई आणि राघोबादादा या दोन्ही थोर आणि उमद्या व्यक्तींच्या मनोधर्माची ओळख पटल्याशिवाय राहणार नाहीं. ताराबाईनीं रामराजे यांनीं 'दरवेशाच्या हातांतील अस्वल'.होऊं नये ह्मणून त्यांना इतके दिवस आपल्या संरक्षणाखालीं ठेविलें होतें. राघोबादादांनीं छत्रपतींच्या बाबतींत नानासाहेबांकडून झालेला अन्याय दूर सारून त्यांचें पूर्ववत् छत्रपतित्व मान्य केलें. त्यांचे राज्यकारभारांतील सर्व अधिकार त्यांस परत दिले. त्यांस त्यांच्या कारभारांत पूर्ण स्वातंत्र्य दिलें. हें स्वातंत्र्य देण्यांत राघोबादादांची जेवढी न्यायप्रियता दिसून येते तेवढीच किंबहुना जास्त रामराजांना सिंहत्व प्राप्त करून देण्याची ताराबाईंची कर्तबगारी नजरेला पडते. त्याचा परिणाम एकंदरींत निःस्वार्थी, सरळ व उघड्या स्वभावाच्या आणि वीरवृत्तीच्या माणसांत समजविशी होण्याला वेळ लागत नसतो; थोर माणसाकडून कपटी माणसाची किती जरी समजाविशी करण्याचा प्रयत्न झाला तरी 'आधीं होता वाघ्या, दैवयोगें झाला पाग्या, त्याचें येळकूट राहीना, मूळ स्वभाव जाईना,' या उक्तीप्रमाणें कायम टिकत नसतो. केवळ स्वतःचा स्वार्थ साधून आपलीच तेवढी बडेजावी वाढविण्यांत आणि त्याकरितां धन्याचा व इतर प्रधानांचा निःपात करण्यांत नानासाहेब पेशव्यांनीं जें श्रमसाहस केलें, तें योग्य मार्गानें जर स्वराज्याच्या कामीं लावलें असतें तर खात्रीनें त्यांना सोनपतपानिपतावर सोनेंच पिकवितां आलें असतें. नानासाहेबांच्या या स्वार्थी

स्वभावामुळें शाहूमहाराजांनीं त्यांना कांहीं दिवस पेशवेपदावरून दूर केलें होतें. तरी त्यामुळें त्यांच्या त्या स्वभावांत बदल न होतां त्याला जास्तच जोम चढला. शाहूमहाराजांच्या पश्चात् आपणाला मराठी राज्याची अखत्यारी मिळाली अशी विपर्यस्त भावना करून घेऊन छत्रपतींच्या अधिकारांत जो त्यांनीं हस्तक्षेप केला त्याला आळा घालण्याकरतां ताराबाईंना आपल्या वृद्धापकाळीं अनेक दिव्यें करावीं लागलीं व शेवटीं त्यांनीं नानासाहेबांकडून अधिकारमर्यादेचा स्पष्ट खुलासा होईल असा तह्ही लिहून घेतला. तरीसुद्धां नानासाहेबांच्या स्वभावांत फरक पडलेला दिसून आला नाहीं. शेवटीं नानासाहेबांकडून जेजुरीच्या जागृत देवापुढें ताराबाईंनीं आणक्रियाही करून घेतली. तरीसुद्धां त्यांना आपल्या वचनांची विस्मृति अधूनमधून पडत असलेली ताराबाईंना दिसून आल्यामुळें आपल्या पत्रांतून त्या वरचेवर नानासाहेबांना त्यांच्या वचनाचें व त्यांनीं 'आपल्या आराध्यदेवतेच्या-दूर्वा व बेलभंडार क्रियापुरःसर दिल्या आहेत' त्याचें स्मरण करून देतच होत्या. तरीसुद्धां नानासाहेबांना स्वार्थापुढें आणक्रियेचें स्मरण होत नव्हतें. शेवटीं शेवटीं तर त्यांच्या आणक्रियेच्या विस्मरणाची कमाल होऊन जिजाबाईंना दिलेलें वचन मोडून कोल्हापूरचें राज्य जप्त करण्याचा उपद्व्याप त्यांनीं केला आणि आपल्या नांवावर कायमचा इतिहासांत 'बेइमानाच्या आरोपाचा' शिक्कामोर्तब करून घेतला. अशा प्रकारें नानासाहेब पेशव्यांच्या स्वार्थी आणि स्वराज्यघातकी स्वभावांत शेवटपर्यंत बदल झाला नाहीं. नानासाहेबांचे सख्खे बंधु राघोबादादा हे होते. परंतु त्यांचा स्वभाव थोर आणि दिलदार असल्यामुळें साताऱ्याच्या छत्रपतींना त्यांनीं आपल्या अधिकारांत जसें पूर्ण स्वातंत्र्य दिलें तसेंच जिजाबाईंना त्यांच्या इच्छेप्रमाणें वाटेल त्या मुलाला दत्तक घेऊन आपलें स्वराज्य पूर्ण स्वतंत्रतेनें चालविण्याचीही मोकळीक दिली. त्याप्रमाणें जिजाबाईंनीं शहाजी भोंसले खानवटकर यांचा पुत्र दत्तक घेऊन व त्याचें नांव 'शिवाजी-राजे' असें ठेऊन राज्यकारभार चालविला. 'भोंसले राजघराण्याविषयीं राघोबादादांची केवढी निष्ठा व 'धन्या'विषयीं केवढी श्रद्धा होती हें या गोष्टी-

वरून स्पष्ट लक्षांत देईल. नानासाहेब पेशवे व राघोबादादा हे जरी एकाच वृक्षाचीं दोन फळें होतीं तरी तीं आपापल्या गुणधर्मात कशीं भिन्न भिन्न होती हें आतां निराळें सांगण्याची जरूरी राहिली नाहीं.

**९. रामराजे उचले नसून खरे होतेः**—राघोबादादांच्या प्रयत्नाप्रमाणें ताराबाईनीं रामराजे यांना पुढें आणून त्यांचेकडून माधवराव पेशव्यांना पंतप्रधानाचीं वस्त्रें ता. २७ जुलै सन १७६१ रोजीं सातारा मुक्कामीं देवविलीं. या वस्त्रें देण्याच्या समारंभामुळें नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत रामराजे यांच्याविषयीं ' शिवाजीचा अस्सल वंशज नव्हे ' असा जो आक्षेप उत्पन्न करण्यांत आला होता तो सर्वथैव खोटा होता; तो केवळ नानासाहेब पेशव्यांच्या डावाला प्रतिडाव ह्मणून उत्पन्न करण्यांत आलेला होता हें यावेळीं जगजाहीर करण्यांत आलें. ताराबाईनीं नानासाहेब पेशव्यांच्या राजकारणाच्या कपटी डावपेंचाच्या युद्धांत स्वतःचा न्याय्य पक्ष तोलून धरण्याकरतां जे प्रतिडावपेंच निर्माण केले व ज्यांमुळें नानासाहेबांकडून त्यांनीं शरणागती घेतली त्याची अखेरची सांगता माधवरावांना पेशवेपदाचीं वस्त्रें देण्याच्या समारंभानें झाली हें आतां निराळें सांगण्याची जरूरी राहिली नाहीं. इ. स. १७१४ मध्यें ताराबाईनीं स्वराज्याची धुरा कोल्हापूरच्या संभाजी महाराजांच्या खांद्यावर चढवून आपण राज्यकारभारांतून सेवानिवृत्त झाल्या. त्यानंतर सुमारें तीन तपांनीं त्यांना ' भोंसले राजघराण्याच्या ' इभ्रतीच्या रक्षणाकरतां पुनः आपल्या वृद्धावस्थेंत राज्यकारभारांत पडावें लागलें. ही त्यांची अगदीं वृद्धावस्था असतांही त्यांनीं ' भोंसले घराण्याची मृगेंद्रता ' यत्किंचितही ढळूं दिली नाहीं, यावरून या ग्रंथाच्या प्रारंभीं उद्धृत केलेल्या वामनपंडितांच्या दिलेल्या श्लोकाचें सार ताराबाईच्या चारित्र्यांत कसें सर्वथैव उतरलेलें होतें हें लक्षांत येईल.

**१०. ताराबाईंचा तारा अस्तास गेलाः**— अशाप्रकारें मृगेंद्रतेला ललामभूत होणारी आपली दीर्घकालीन जीवनयात्रा पुरी करून मार्गशीर्ष शुद्ध ८ शके १६८३ रोजीं ( ता. ४ डिसेंबर सन १७६१ )

सातारा मुक्कामीं ताराबाईंनीं कैलासवास केला. त्यावेळीं त्यांचें वय ८६ वर्षांचें होतें. " ताराबाई मरणपर्यंत बाळाजी बाजीराव पेशवा व सदाशिवराव-भाऊ यांचा द्वेष करीत होती. ती मरणसमयीं बोलली कीं, ' हे दोघे दुर्दशा होऊन मेले, तेणेंकरून माझे मनोरथ पूर्ण झाले.' " [ डफकृत म. ब. पृ. २१४ ] त्याप्रमाणें " ताराबाई जिवंत होत्या तोंवर नानासाहेब यांच्या नांवानें खडे फोडीतच होत्या. त्या नुकत्याच वारल्या तेव्हांही ' हे मेले माझ्या देखतच उलथून पडले, यानें माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें. आतां मी सुखानें मेरन ! हे त्यांचे शेवटचे शब्द होते ! " ( खरेशास्त्रीकृत इ. सं. इ. पृ. ९३ ) ताराबाईच्या या शेवटच्य उद्गारावरून नानासाहेबांच्या वर्तनाबद्दल त्यांच्या अंतःकरणाला कशा प्रकारचा भयंकर पीळ पडला होता याची कल्पना येते. सर्वसाधारणपणें शत्रूच्याही मृत्यूनंतर त्याच्याविषयीं बुरे उद्गार सहसा कोणी काढीत नाहीं. असें असतां नानासाहेब निवर्तल्यानंतर सुमारें पांचसहा महिन्याच्या अवधीनंतरही ताराबाईंना ज्याअर्थी नानासाहेबांच्या बेइमानाची विस्मृति पडूं शकली नाहीं त्याअर्थी त्यांच्या अंतःकरणावर नानासाहेबांच्या कृतीनें जबरदस्त जखम झाली होती यांत संशय नाहीं. धन्याविरुद्ध चाकरानें बंड उभारून राज्यापहार करण्याचा प्रयत्न करणें या यावनीय प्रथेला नाना-साहेबांनीं मराठी स्वराज्यांत प्रारंभ केला हेंच शल्य ताराबाईच्या हृदयांत शेवटपर्यंत टोंचत राहिलें होतें असें यावरून दिसतें. ताराबाईच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रांत क्षात्रतेजाच्या दिव्यप्रकाशानें चमकणारा एक महान् तारा अस्तास गेला असेंच सर्व वीरवृत्तीच्या स्त्रीपुरुषांना वाटलें असेल यांत शंका नाहीं.

---

# उपसंहार.

मागील पंधरा प्रकरणांतून मोंगलमर्दिनी ताराबाई यांनीं हिंदुपदपादशाहीच्या रक्षणाकरितां व संवर्धनाकरितां जी जी मौलिक कामगिरी केली व त्याकरितां जें जें श्रमसाहस केलें त्याचें यथामति विवेचन देण्यांत आलेलें आहे. ताराबाईनीं ही जी हिंदुपदपादशाहीची निःस्वार्थ दृष्टीनें दीर्घकालपर्यंत अविश्रांत सेवा केली त्याचा गुणगौरव न करतां आजपर्यंतच्या बऱ्याच इतिहासकारांनीं हिंदुपदपादशाहीच्या ध्येयाला, तत्वाला आणि राज्यपद्धतीला बाजूला सारून व ऐतिहासिक सत्याला बगल देऊन, ताराबाईना महत्वाकांक्षी, स्वार्थी, हट्टी, उपद्व्यापी वगैरे विशेषणें देऊन जी त्यांची संभावना केली त्याचा परामर्ष या ग्रंथांत मागें ठिकठिकाणीं आह्मीं घेतलाच आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनींही ताराबाईच्या कर्तबगारीचें विडंबन केवळ स्वतःच्या ऐतिहासिक अज्ञानामुळें केलेलें आहे. त्याचा या उपसंहारांत समाचार घेतल्याशिवाय 'मोंगलमर्दिनी ताराबाई' हा ग्रंथ पूर्णत्वाला येणार नाहीं ह्मणून त्यासंबंधींचें विवेचन येथें करणें क्रमप्राप्त आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' खंडरूपानें बरींच प्रसिद्ध केलीं. खंड पहिलें याला राजवाडे यांनीं सुमारें सव्वाशें पानांची प्रस्तावना लिहिलेली आहे. ही प्रस्तावना विद्वत्ताप्रचुर व मार्मिक असल्याबद्दल ख्याति आहे. हा राजवाडे प्रथम खंड ग्रंथ इ. स. १८९८ मध्यें प्रसिद्ध झाला. या खंडांत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ह्मणून जीं अस्सल पत्रें दिलेलीं आहेत तीं तीनशें चार असून सन १७५० पासून १७६३ पर्यंतचीं आहेत. या सर्व पत्रांतून दोनच वाक्यें अत्यंत महत्वाचीं ह्मणून राजवाडे यांनीं तीं या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर दिलेलीं आहेत.

" आपल्यांत दुही पडते, तेव्हां शत्रूस बळ फावतें." (रघुनाथरावदादा, लेखांक ७१) व " सर्वांचें एकचित्त असतें, तेव्हां कार्य होतें." (गोविंदपंत बुंदेले, लेखांक १३३) वरील रघुनाथरावदादा यांचें वाक्य इ. स. १७५७ मधील आहे. आणि गोविंदपंत बुंदेले यांचें वाक्य इ. स. इ. स. १७५९ मधील आहे. वरील दोन्हीं वाक्यांचा भावार्थ सर्वसाधारणपणें एकच असल्यामुळें रघुनाथरावदादा यांच्या वाक्याला जास्त महत्व आहे. त्यांनीं वरील वाक्यानें जो स्वानुभवानें सिद्धांत बसविला तो अर्थात् राजवाडे यांना मान्य झाला; आणि ह्मणूनच त्यांनीं ती आपली मान्यता सिद्धांतरूपानें आपल्या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर दिली असें ठरतें. आतां या सिद्धांताला अनुसरून राजवाडे यांनीं लिहिलेली प्रस्तावना आहे किंवा नाहीं व तो सिद्धांत बनविणाऱ्या व तदनुरूप वर्तन करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या प्रस्तावनेंत योग्य स्थान मिळालें आहे किंवा नाहीं हें पहाणें जरूर आहे.

आचार्य राजवाडे यांनीं जी प्रस्तावना लिहिली आहे त्याचे १ स्वराज्य स्थापना. २ हिंदुपदबादशाही. ३ ब्राह्मणपदबादशाही असे तीन खंड पडतात. स्वराज्य स्थापनेचा काल सन १६४६ ते १७३१; हिंदुपदबादशाहीचा काळ सन १७३१ ते १७५० व ब्राह्मणपदबादशाहीचा काल सन १७५० ते १७९६ पर्यंत असे त्यांनीं मानले आहेत. या तीन खंडांना उपमा द्यावयाची म्हणजे वृक्षाची द्यावी लागेल. या स्वराज्यवृक्षाचीं मुळें म्हणजे स्वराज्य स्थापना; त्याचा विस्तार म्हणजे हिंदुपदबादशाही आणि त्याचीं फळें म्हणजे ब्राह्मणपदबादशाही असें म्हणावें लागेल. स्वराज्याची स्थापना शिवाजी महाराजांनीं केली. त्यांनीं त्याचा उपक्रम इ. स. १६४६ पासून करून इ. स. १६७४ मध्यें स्वतःला राज्याभिषेक करवून घेऊन स्वराज्याच्या स्थापनेला मूर्तस्वरूप दिलें. " ब्राह्मण मंडळ्या मेळवाव्या। भक्त मंडळ्या मानाव्या। संतमंडळ्या शोधाव्या भूमंडळीं ॥ " या समर्थांच्या उक्तीला अनुलक्षून ' ह्या एक विचारानें भरलेल्या मंडळयांचें पुढारपण शिवाजीनें व त्याच्या मुत्सद्यांनीं स्वीकारलें; आणि स्वराज्याची स्थापना करण्याचें अति मानुष कृत्य घडवून

आणिलें. येणेंप्रमाणें महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राम्हण प्रतिपाल + स्वराज्यस्थापना + एकीकरण + धुरंधरण म्हणजे महाराष्ट्रांतील हिंदुधर्म होतो अशी त्या काळीं समजूत होती. ह्याच समजुतीला महाराष्ट्रधर्म म्हणून समर्थांनीं संज्ञा दिली आणि ह्या धर्माची स्थापना व प्रसार करण्या-करितां शिवाजी महाराज व त्यांचे अनुयायी ह्यांनीं प्राणांचा व वित्ताचा अपरंपार व्यय केला...स्वराज्य साधून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा विचार शिवाजीच्या राजनीतींत प्रधान होता. संभाजीराजालाही महाराष्ट्रधर्म पसर-विण्याचा उपदेश समर्थांनीं केला आहे. राजाराम व त्याच्या वेळचे मुत्सद्दी व सेनापति ह्यांनींही हा स्वराज्यसाधनाचा कित्ता उत्तम गिरविला. ( हा कित्ता गिरविलेला दाखविण्यांत राजवाडे यांनीं ताराबाईचा उल्लेख केला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ) पुढें शाहूमहाराज आले. त्यांनीं १७०७ पासून १७१४ पर्यंत जो प्रांत ताराबाईच्या हातून त्यांना मिळाला तेवढ्याची व्यवस्था करून, नंतर १७१४ त बाळाजी विश्वनाथास स्वराज्यसाधन करण्याकरितां मतलबाची याद करून दिली....बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून जें फर्मान घेऊन आला त्याची अंमलबजावणी करण्यास तो जगला नाहीं. तेव्हां बाजी-रावाला पेशवाई देतांना साधावयाच्या राहिलेल्या मतलबांची याद जशीच्या तशीच शाहूनें त्याच्या स्वाधीन केली. बाजीरावाच्या कारकीर्दींतील पहिलीं दहाअकरा वर्षं ह्या यादींतील मतलब साधण्यांत गेलीं. १७३१ च्या सुमारास बाजीरावानें वरील यादींतील कलमें सर्व साधिलीं. येथपर्यंत म्हणजे १७३१ पर्यंत स्वराज्य-साधनार्थ मराठ्यांच्या सर्व खटपटी झाल्या. ह्यापुढें आतां मराठ्यांच्या राजनीतीनें दुसरें स्वरूप धारण केलें. तें स्वरूप म्हणजे हिंदुपदबादशाहीची स्थापना करणें हें होय. ' [ खंड १ प्रस्तावना पृ. ३४ ते ३८ ]

" हिंदुपदबादशाहीची स्थापना करण्याची प्रस्तावना बाजीरावानें शाहूपुढें केलेली सर्वश्रुत आहेच. १७३१ पासून १७४० पर्यंत बाजीरावाची सर्व खटपट ह्याच स्थापनेच्या प्रीत्यर्थ झाली. दक्षिणेस तुंगभद्रा, उत्तरेस यमुना, पश्चिमेस समुद्र व पूर्वेस निजामुल्मुल्काचा प्रांत व पूर्व समुद्र ह्या

वाढत्या हिंदुपदबादशाहीच्या सीमा झाल्या. हें एवढें काम करून बाजीराव बल्लाळानें आपला अवतार संपविला. बाजीरावाच्या पश्चात् राज्याची धुरा बाळाजी बाजीरावानें उचलली. १७४० पासून १७५० पर्यंत बाजीरावानें जिंकलेल्या प्रदेशांची व्यवस्था करण्यांत बाळाजीचा काळ गेला व अधून-मधून काशी, प्रयाग, कटक, गढेमंडळ, बहादुरखेंडा, इत्यादि प्रदेशांकडे त्यानें आपली दृष्टि फेंकिली. परंतु ही दृष्टि रघोजी भोंसल्याचा पाडाव करण्यापुरती व दक्षिणेंत पूर्वापार चालत आलेले हक्क प्रस्थापित करण्यापुरती होती. १७५० पर्यंत मराठ्यांचें आधिपत्य साताऱ्च्या छत्रपतींकडे होतें. त्यांच्या नांवानें हिंदुपदबादशाहीचा प्रसार व स्थापना करण्याची मेहनत बाजीराव बल्लाळानें व बाळाजी बाजीरावानें केली. शाहूराजापेक्षां मुत्सद्दिगिरीनें व पराक्रमानें बाजीराव बल्लाळ अतिच श्रेष्ठ होता. परंतु शाहूचें आधिपत्य कमी करण्याकडे त्याचा बिलकुल कल नव्हता." [ खंड १ प्रस्तावना पृ. ३८ ].

आचार्य राजवाडे यांनीं वरीलप्रमाणें स्वराज्यस्थापना व हिंदुपद-बादशाही यांचीं दोन निरनिराळीं शकलें पाडून स्वराज्यसंस्थापक श्री छत्रपति शिवाजीमहाराज व हिंदुपदबादशाहीचे संस्थापक बाजीराव बल्लाळ असें दाखवून इतिहासाच्या अभ्यासूंना विनाकारण भ्रमविभ्रमांत लोटून दिलें आहे. स्वराज्यस्थापना व हिंदुपदबादशाही हे शब्द जरी कालपरत्वें भिन्न दिसले तरी तत्वांत मूलतः कोठेंच भिन्नता नाहीं. राजवाड्यांच्या संशोधक बुद्धीप्रमाणें त्यांत भेदच उत्पन्न करावयाचा झाला तर एकाच इमारतीचा एक तळमजला व एक दुसरा मजला एवढाच फरक दाखवितां येईल; परंतु त्यामुळें मूळ तत्वांत [ह्मणजे पायापासून दुसरा मजला पुरा होईतोंपर्यंत] कोठेंच फरक झालेला दिसून येणार नाहीं. छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्वराज्यस्थपनेचा पाया एवढा जबरदस्त भक्कम करून ठेवला होता कीं त्यावर हिंदुपदबादशाहीचा दुसराच मजला काय पण चक्रवर्तीपदाचा सातवा मजलाही उभारतां आला असता. इमारतीचा पाया खोदतांना त्याला पक्का थर लागेल तितका खोल नेण्याची

मालकाची मनीषा दिसली ह्मणजे त्यावरील इमारत किती उंच नेण्याची त्यांची इच्छा आहे याचें जसें अनुमान बांधतां येतें तसेंच शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या पायावरून पुढें त्यांना कोठपर्यंत मजल गांठावयाची होती हें सहज अनुमान ठरवितां येतें. दिल्लीपति सार्वभौम बादशहाविरुद्ध शिवाजी महाराजांनीं स्वराज्यस्थापना करून श्री प्रभु रामचंद्राप्रमाणें वैदिक मंत्रांनीं स्वतःला ज्या अर्थीं राज्याभिषेक करून घेतला त्याअर्थीं त्या वेळीं त्यांची व त्यांच्या अष्टप्रधानादि अनुयायांची दृष्टि अश्वमेध यज्ञापर्यंत ह्मणजे चक्रवर्ती पदाच्या प्राप्तीपर्यंत गेलेली होती हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. शिवाजी महाराजांना राज्याभिषेकानंतर जर पंचवीस तीस वर्षांच्या जास्त आयुष्याचें भाग्य लाभलें असतें तर त्यांनीं आपली चक्रवर्ती पदाची इच्छाही कदाचित् फलद्रूप करून दाखविली असती. परंतु त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें आणि त्यांच्या पश्चात् त्यांच्या स्वराज्यावर झालेल्या शत्रूच्या आक्रमणामुळें स्वराज्याच्या अंतिम ध्येयाकडे त्यांच्या पश्चात् सुमारें चाळीस वर्षेपर्यंत लक्ष देतां आलें नाहीं. तशी संधि बाजीराव बल्लाळ यांना मिळाली ह्मणूनच त्यांना स्वराज्याच्या पुढील कार्याला प्रवृत्त होतां आलें. याकरितां बाजीराव बल्लाळ हे हिंदुपदबादशाहीचे संस्थापक होऊं शकत नाहींत. प्रचारक मात्र होऊं शकतात. 'सार्वभौम हिंदुपद-पादशाही स्थापन करण्याचा शिवाजीचा हेतु खास होता, याविषयीं संशय दिसत नाहीं.' असें रियासतकारांचेंही स्पष्ट विधान आहे. [ म. रि. भा. २ पृ. ३६७ ] 'शाहूराजापेक्षां मुत्सद्देगिरीनें व पराक्रमानें बाजीराव बल्लाळ अतिच श्रेष्ठ होता. परंतु शाहूचें आधिपत्य कमी करण्याकडे त्याचा बिलकुल कल नव्हता.' असें राजवाडेच आपल्या प्रस्तावनेंत ह्मणतात. याचा सरळ अर्थ ह्मणजे छत्रपति शिवाजी महाराजांपासून ज्या चाकोरींतून छत्रपति शाहू महाराजापर्यंत छत्रपतींची सत्ता व आधिपत्य आलें त्याच सेव्यसेवक भावनेच्या चाकोरींतून बाजीराव बल्लाळ गेले ह्मणूनच त्यांना स्वराज्यविस्तार करतां आला. यावरून स्वराज्यस्थापना आणि तिचें अंतिम ध्येय या दोन बिंदूंना जोडणाऱ्या सरळ रेषेंतून बाजीराव बल्लाळ हे आपल्या राजकारणाच्या उपक्रमाचे

खेळ खेळत होते असेंच ठरतें. त्यामुळें हिंदुपदबादशाही ही स्वराज्याची नवीन उपशाखा बाजीराव बल्लाळांनीं निर्माण केली असें विधान राजवाडे यांनीं जें केलें आहे तें साफ खोटें आहे. स्वराज्याच्या अगर हिंदुपदबादशाही-च्याच चाकोरींतून बाजीराव बल्लाळ एकादां अपवाद म्हणून सोडल्यास जात होते हें निश्चित होतें.

ब्राह्मणपदबादशाही याची उत्पत्ति आचार्य राजवाडे पुढीलप्रमाणें देतात. ‘बाळाजी बाजीरावाला (नानासाहेबांना) पेशवाई मिळाल्यापासून मात्र शाहूचें व त्याच्यानंतर येणाऱ्या छत्रपतींचें माहात्म्य कमी करण्याचा प्रयत्न झाला. शाहू असेतोंपर्यंत बाह्यात्कारें छत्रपतीची सेवा अनन्यभावें करण्याचा बाळाजीनें बहाणा केला व तो वारल्यानंतर रामराजा गादीवर आला असतां त्याची पायमल्ली बाळाजीनें मनःपूत परंतु मोठ्या युक्तीनें केली. बाळाजीच्या खऱ्या पराक्रमाला व त्याच्या मनांत घोळत असलेल्या अवाढव्य हेतूंना स्वरूप शाहूच्या मरणानंतर म्हणजे १७५० पासून येऊं लागलें. ह्या वर्षापासून बाळाजी मराठ्यांचा खरा पुढारी झाला व साताऱ्याच्या छत्रपतींचें आधिपत्य अस्तास गेलें. ह्या १७५० सालापासून तों १७६१ सालपर्यंत सर्व भरतखंड महाराष्ट्रमय करून टाकण्याचा बाळाजीनें उद्योग केला. सारांश ह्या १७५० सालापासून ब्राह्मणपदबादशाहीचा प्रारंभ झाला व हिंदुपद बादशाही हा शब्द मागें पडला.’ याचेपुढें राजवाड्यांनीं १७५० पासून १७६१ पर्यंत बाळाजीनें आपली सत्ता सर्व हिंदुस्थानभर कशी प्रस्थापित केली व खुद्द महाराष्ट्रांत साताऱ्या छत्रपतींचें व त्यांच्या राजमंडळाचें महत्व कमी करून आपलें महत्व कसें प्रस्थापित केलें याचें विवेचन केलें आहे. [खंड १ प्रस्तावना पृ. ३८] राजवाड्यांच्या वरील विवेचनांतून [१] शाहू असेतोंपर्यंत बाह्यात्कारें छत्रपतीची सेवा अनन्यभावें करण्याचा बाळाजीनें बहाणा केला. [२] रामराजा गादीवर आला असतां त्याची पायमल्ली बाळा-जीनें मनःपूत परंतु मोठ्या युक्तीनें केली. [३] १७५० सालापासून ब्राह्मण-पदबादशाहीचा प्रारंभ झाला व हिंदुपदबादशाही हा शब्द मागें पडला.

[४] खुद्द महाराष्ट्रांत सातारच्या छत्रपतींचें व त्यांच्या राजमंडळाचें महत्व कमी करून बाळाजीनें आपलें महत्व प्रस्थापित केलें; हीं चार विधानें बाहेर पडतात. राजवाड्यांच्या वरील चारी विधानांची गोळाबेरीज केली असतां असें दिसून येईल कीं, बाळाजी बाजीराव यांना पेशवेपद लाभल्यापासून त्यांचा उद्देश हिंदुपदबादशाही मोडून टाकून ब्राह्मणपदबादशाही स्थापन करावी असें होतें; आणि हा आपला उद्देश फलद्रूप करण्याकरतां त्यांनीं शाहू-महाराजांची सेवा आपण अनन्यभावें करीत आहोंत असा बहाणा केला; रामराजांची मनःपूत पायमल्ली केली; हिंदुपदबादशाही नामशेष करण्याकरतां छत्रपति व त्यांचें राजमंडळ यांचें महत्व कमी केलें; स्वतःचें महत्व वाढवून घेतलें; आणि ब्राह्मणपदबादशाहीची स्थापना केली, अशा क्रमवारीनें ते आपल्या भाग्योदयाच्या पायऱ्या चढत गेले अशी राजवाड्यांची इतिहासाच्या साधनांवरून स्पष्ट मांडणी आहे.

राजवाड्यांच्या वरील मांडणीप्रमाणें ताराबाई व बाळाजी बाजीराव यांच्यामध्यें जो कलह उत्पन्न झाला त्याच्या कारणपरंपरेचें मूळ कोणतें होतें याचा उलगडा झाला आहे. ताराबाई यांना हिंदुपदपादशाहीचें रक्षण करावयाचें होतें आणि बाळाजी बाजीराव यांना हिंदुपदबादशाही मोडून टाकून ब्राह्मणपदबादशाहीची संस्थापना करावयाची होती. ताराबाई व बाळाजी बाजीराव यांचे उद्देश भिन्न भिन्न असल्यामुळें त्या उभयतांत जो कलह उत्पन्न झाला त्याचें पर्यवसान दोन पक्ष निर्माण होण्यांत झालें. ताराबाईच्या पक्षानें आपल्या पक्षाच्या संवर्धनार्थ जे मनसुबे व जें राजकारण केलें त्याचा आढावा राजवाडे यांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे. ताराबाईचा 'नातू जो रामराजा त्याला गादी मिळावी असें शाहूनें ठरविलें. तेव्हां हिचें महत्व वाढून आपल्या नित्याच्या स्वभावाप्रमाणें हिनें बाळाजीशीं प्रतिस्पर्धा मांडली; दादोबा प्रतिनिधि व यमाजी शिवदेव ह्यांचें खूळ माजविलें; बाबूजी नाईकास भर दिली, सलाबतजंगाचा दिवाण जो रामदासपंत त्याच्याशीं राजकारण केलें; बाळाजीची पेशवाई रामदासपंताचे भाचास देण्याचा बेत केला; महादोबा पुरंदऱ्याला

देखील फितविलें. [ का. पत्रें, यादी वगैरे ३५९ ] व त्याच्या करवीं रामचंद्रबाबा शेणवई व सदाशिव चिमणाजी ह्यांचें व बाळाजीचें वांकडें आणिलें; दमाजीला सातार्‍यास बोलविलें; उमाबाई दाभाडिणीस चढीं लाविलें; खुद्द शिंदे होळकरांच्याही बुद्धीचा भेद करून पाहिला व रघोजीला मोंगलांकडे जाण्यास भर दिला. हा खेळ एकसारखा १७५० पासून १७५३ पर्यंत चालला होता व तो चालत असतां रामराजा ताराबाईच्या मुठींत राहून बाळाजीच्या धडपडीकडे उदासीनपणें पहात होता.' ( खंड १ प्रस्तावना पृ. ४४ )

राजवाडे यांनीं वरील हकीकत देतांना व आपले ऐतिहासिक आडाखे बसवितांना त्या वेळेच्या ऐतिहासिक साधनांचा आणि हिंदुपद्पादशाहीच्या राजकारणाचा काळजीपूर्वक अभ्यास केला नव्हता असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. बाळाजी बाजीराव यांच्या बाह्य बडेजावीकडे राजवाड्यांचें लक्ष वेधून गेल्यामुळें स्वराज्याच्या भरीव राजकारणाकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं; ह्मणून कित्येक घडून आलेल्या प्रसंगांची ऐतिहासिक संगती लावतांना त्यांची सर्व बाजूनें दिशाभूल झालेली आहे. ' रामराजा याला गादी मिळावी असें शाहूनें ठरविलें; ' हें राजवाड्यांचें विधान साफ खोटें आहे. हें विधान करतांना त्यांनीं पुढीलप्रमाणें माहिती दिलेली आहे. ' सातारच्या गादीला त्या वेळीं हक्क सांगणारे दोन पुरुष होते. पहिला हक्कदार ताराबाईचा नातू रामराजा व दुसरा, कोल्हापूरचा संभाजीराजा. पैकीं संभाजीराजाकडे बाळाजीचा १७४० पासून ओढा होता. परंतु तो शाहूमहाराजांना पसंत नव्हता. राजाराम महाराजांचा वडील पुत्र जो शिवाजी त्याचा मुलगा रामराजा हयात आहे असें शाहूला नुकतेंच कळलें होतें. तेव्हां त्याला दत्तक घेऊन राज्य चालवावें असें शाहूनें साग्रह व सशास्त्र ह्मणणें पडलें. ' [ खं. १ प्रस्तावना पृ. ४३ ] ' रामराजाला दत्तक घेऊन राज्य चालवावें असें शाहूचें साग्रह व सशास्त्र ह्मणणें पडलें ' या राजवाड्यांच्या विधानाला आधार कोणता ? राजवाडे ज्याला जो शाहूराजे यांच्या चिट्ठीचा पुरावा ह्मणात तो वरील त्यांच्या विधानाच्या

अगदीं उलट आहे. ' राज्यभार चालला पाहिजे. तरी पुढें वंस वसवने. कोल्हापूरचे न करने. ' एवढाच दत्तकासंबंधीं चिठ्ठींत मजकूर आहे. राजवाडे यांची समजूत अशी झालेली होती कीं, ' करवीरचे ' याचा अर्थ करवीरच्या गादीवर असलेले फक्त संभाजीराजे, त्यांना दत्तक न करणें. परंतु ही त्यांची समजूत मुळांतच चुकलेली आहे. त्या वेळीं संभाजीराजे यांच्याप्रमाणेंच रामराजे यांना ' करवीरच ' समजण्यांत येत होतें. रामराजे यांना पुढें आणलेली हकीकत जेव्हां सकवारबाईंना समजली ' तव्हां प्रतिनिधि व यमाजी शिवदेव यांस धनीणसाहेब ( सकवारबाई ) यांनीं नेऊन मसलत केली; आणि आईसाहेब यांचा नातू दत्तक घेऊं देऊं नये, करवीरकर यांचे घरीं राज्य जातें ' [ म. रि. म. वि. पृ. १४४ ] असा अमात्यांचे बखरींत स्पष्ट खुलासा आहे. संभाजीराजे व रामराजे या उभयतांना जर त्या वेळीं 'करवीरचे' मानण्यांत येत होतें व शाहूराजे यांची ' करवीरचे न करने ' अशी स्पष्ट आज्ञा होती तर ' रामराजाला दत्तक घेऊन राज्य चालवावें असें शाहूचें साग्रह व सशास्त्र ह्मणणें पडलें ' हें राजवाड्यांचें विधान कसें खरें ठरतें ? अर्थात् तें साफ चुकीचें आहे.

ताराबाईंनीं रामराजे यांना प्रकाशांत आणल्यावर त्यांची सशास्त्र व्यवस्था लावणें त्यांचें कर्तव्य होतें. त्याप्रमाणें त्यांनीं रामराजे यांना दत्तक घेण्याबद्दल शाहूराजे यांना निकड लाविली होती. परंतु शाहूराजे रामराजांना दत्तक घ्यावयास तयार नव्हते हें पुढील पत्रावरून लक्षांत येते. हें पत्र सातारा किल्ल्यावरून ताराबाईच्या प्रेरणेनें किल्ल्याखालीं सातारा शहरांत राहत असलेल्या नानासाहेब पेशव्यांना लिहिलिलें आहे. ' वि. वि. महाराजांनीं थोडासा संदेह धरिला आहे. याकरितां तुह्मीं आतांच वर यावें. दत्तविधान करून घेत नाहीं ह्मणतात. याजकरितांच वर यावें. भोजन येथेंच होईल. वरकड मागून येतील. येथून चिठी पावल्यावर त्यांनीं यावें. तुह्मीं आतांच यावें, वरकड मंडळी आधीं वर येऊं नयेत. हे वि. मराठ्यांच्या बायकाही आधीं वर न्याव्या. हे वि. [ इ. सं. पे. श. भा. ३ ] हें पत्र शाहूराजे यांच्या मृत्यूच्या पूर्वींचें

आहे. ताराबाई यांची खटपट रामराजे यांच्याबद्दल होती. त्याकरितां त्यांना पेशव्यांच्या सहाय्याची जरूरी होती. ह्मणून त्यांनीं नानासाहेबांना तांतडीनें किल्ल्यावर बोलाविलें होतें. अशा परिस्थितींत ज्याअर्थीं शाहूराजे दत्तविधान करून घेत नाहींत व 'करवीरचे न करने' अशी यादी लिहून पेशव्यांना देतात त्या अर्थीं रामराजांना दत्तक घेण्याचें त्यांचें मनांत नव्हतें हेंच सिद्ध होतें. रामराजे यांना दत्तक घ्यावयास शाहूराजे तयार नव्हते याचीं कारणें बरींच होतीं. (१) शाहूराजे यांचे पश्चात् एकछत्री राज्य व्हावयाचें होतें. (२) संभाजीराजे त्या एकछत्री राज्याच पेशव्यांनीं करार करून दिल्या-प्रमाणें धनी होणार होते. (३) करवीरचे छत्रपति हे हिंदुपदपादशाहीचे खरे वारसदार होते. शाहूराजाप्रमाणें ते मोंगलांचे ताबेदार झालेले नव्हते. शाहूराजे यांनीं करवीरचा दत्तक घेतला असतां तर छत्रपति शिवाजी महाराजांच्या वंशजांपैकीं आपल्याप्रमाणेंच दुसरा एक पुरुष मोंगलांचा मांडलिक झाला असता. हा दोष पुनः उत्पन्न करून ठेवण्यास शाहूराजे तयार नव्हते. (४) राज्यभार चालला पाहिजे व तो एकछत्री राज्य होऊन चालणें अशक्यप्राय झाल्यास सकवारबाईंच्या इच्छेप्रमाणें करवीरचा दत्तक न घेतां दुसरा दत्तक ह्मणजे रघोजी भोंसले यांचा मुलगा घेऊन राज्यभार चालावा. संभाजीराजांना एकछत्री राज्य करून साताराचें राजमंडळ व करवीरचें राजमंडळ एक करून तें चालविणें अशक्य प्राय झाल्यास रघोजी भोंसल्यासारख्या पराक्रमी सेनासाहेबसुभ्याचा मुलगा दत्तक घेण्यानें उत्तर हिंदुस्थानांतील राजकारणाला जोर वाढला असतां व त्यामुळें आपला वंशविस्तार चालून मराठी राज्याची वाढ व कीर्ति वृद्धिंगत झाली असती. अर्थात् हा शाहूराजे यांचा पर्याय करवीरचे छत्रपति संभाजी-राजे यांचे संमतीनें आणि शाहूराजे यांचा वंश त्या छत्रपतींच्या मुख्य गादीचा मांडलिक याच दृष्टीनें अस्तित्वांत आला असता. ताराबाई असेपर्यंत सकवार-बाईंना प्राधान्य येऊं शकत नव्हतें व सकवारबाईनीं घेतलेला दत्तक अस्सल छत्रपतींच्या वंशजांपुढें नमूनच राहूं शकला असता. (५) सकवारबाईंना

४२५ ९८०९६ मांव ६८३ १७१०८५

त्यामुळे समाधानानें राज्यकारभार करतां आला असता. (६) संभाजीराजे यांना संतान नाहीं. तेव्हां त्यांनीं रामराजे यांना दत्तक घेऊन मुख्य गादीचे धनी करावें व छत्रपतीची परंपरा चालवावी. त्यामुळे प्रकाशांत नवीन आलेल्या रामराजांची व्यवस्था होऊं शकते. रामराजे याना दत्तक न घेण्यांत शाहूराजे यांचा हाही हेतु दिसतो. एकंदरींत वरीलप्रमाणें राजकारणाची संगत लक्षांत घेतली ह्मणजे राजवाड्यांचें वरील विधान साफ चुकीचें होतें हें दिसून येईल.

शाहूराजे यांची स्पष्ट आज्ञा करवीरचे दत्तक न करणें अशी असतांना नानासाहेब पेशव्यांनीं रामराजांना ज्याअर्थी धनी ह्मणून गादीवर बसविलें त्याअर्थी त्यांनीं ताराबाईचें वर्चस्व मान्य केलें होतें हेंच स्पष्ट ठरतें. रामराजे साताऱ्याच्या गादीवर आले ह्मणून त्याला संभाजीराजांनींही विरोध केला नाहीं. त्यांना व ताराबाईंना बाटींत राहिलें काय किंवा ताटांत सांडलें काय सारखेंच असें वाटत होतें. पण नानासाहेब पेशव्यांचें तसें नव्हतें. सकवार-बाईनीं रघोजीचा मुलगा दत्तक घेऊन राज्यकारभार करूं नये ह्मणून त्यांना सती घालविलें. आपण करार लिहून दिल्याप्रमाणें संभाजीराजे एकछत्री छत्रपति होऊन आपणावर अधिकार चालवूं नयेत ह्मणून नानासाहेबांनीं रामराजांना गादीवर बसविलें. ते गादीवर आल्यानंतर त्यांना आपल्या हातचें बाहुलें करण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला तो ताराबाई सफल होऊं देईनात. ह्मणून नानासाहेबांनीं त्यांचेबरोबर विरोध सुरू केला. यांत राजवाडे यांच्या ह्मणण्याप्रमाणें ताराबाईनीं नानासाहेबांशीं प्रतिस्पर्धा सुरू केली कीं नानासाहेबांना ताराबाईशीं प्रतिस्पर्धा सुरू केली ? धन्यावर जर चाकर कुर्घोडी करूं लागला तर त्याला ठिकाणावर आणण्याकरितां मसलती करणें ही प्रतिस्पर्धा होऊं शकत नाहीं. उलट चाकरानें धन्याविरुद्ध मसलती करणें हीच प्रतिस्पर्धा ठरते. या बाबतींत ताराबाईनीं नानासाहेबांशीं प्रतिस्पर्धा केली हें राजवाडयांचें विधान साफ खोटें आहे.

राजवाडे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत 'बाळाजीला शाहूनें एक चिठ्ठी लिहिली' असें ह्मटलें आहे. [ पृ. ४३ ] हेंही राजवाडे यांचें विधान चुकीचें

आहे. शाहूराजे यांनीं नानासाहेबांना एक चिठ्ठी लिहिली नसून दोन चिठ्या लिहिलेल्या प्रसिद्ध आहेत. त्या मागें बाराव्या प्रकरणांत आल्याच आहेत. राजवाडे यांच्या वाचनांत शाहूराजे यांची जी पहिली चिठ्ठी आली त्यावरून त्यांनीं पुढील विधानें केलीं आहेत. ( १ ) कोल्हापूरची व सातारची गादी एक करावी व मराठ्यांचें राज्य एकछत्री करावें असा बाळाजीचा फार दिवसापासून हेतु होता. (२) शाहूच्या हट्टामुळें व अज्ञानामुळें बाळाजीला हा आपला फार दिवसांचा हेतु एकीकडे ठेवावा लागला. (३) बाळाजीला शाहूराजे यांच्या आज्ञा पाळाव्या लागल्या. ( ४ ) शाहूच्या आज्ञेप्रमाणें रामराजे यांना गादीवर आणावें लागलें. ( ५ ) बाळाजीचा ओढा संभाजीराजाकडे विशेष असूनही त्याला शाहूराजे यांच्या आज्ञेमुळें सातारच्या गादीवर आणून एकछत्री राज्य करतां आलें नाहीं. ( ६ ) राजमंडळ चालविणें अशी शाहूराजे यांची आज्ञा होती. परंतु ' तुह्मीं फौज धरणें ' या शाहूराजे यांच्या आज्ञेमुळें मनांतून नसतांही ती आज्ञा बाळाजीस मान्य करावी लागली. इतकीं विधानें शाहूराजे यांच्या पहिल्या चिठ्ठींतून राजवाडे यांनीं बाहेर काढलीं आहेत. ' करवीरचे न करणें,' या एका वाक्यावरून वरील पांच विधानांचा डोल्हारा राजवाड्यांनीं उभा केलेला आहे; व त्याला शोभा यावी ह्मणून शाहूराजे यांच्या आज्ञेचा मुलामा दिला आहे. परंतु सकवारबाईनीं शेवटचा प्रयत्न ह्मणून संभाजीराजे यांना सातारच्या गादीवर आणण्याचा जो मनसुबा केला त्याला बाळाजींनीं कां विरोध केला तर शाहूराजे यांची आज्ञा ह्मणून त्यांना पाळावी लागली असें राजवाडे यांचें ह्मणणें आहे. शाहूराजे यांच्या आज्ञा पाळण्यांत बाळाजी इतके दक्ष होते तर रामराजे यांना 'करवीरचे न करणें ' अशी शाहूराजे यांची स्पष्ट आज्ञा असतां त्याचें उल्लंघन त्यांनीं कां केलें ? ' राजमंडळ चालवणें ' अशी शाहूराजे यांची आज्ञा असतां त्या राजमंडळांतील प्रतिनिधि, सेनापति, सचिव यांच्यावर शस्त्र धरून शाहूराजे यांची आज्ञा पायाखालीं कां तुडविली ? ' वंश होईल त्याच्या आज्ञेंत चालणें ' अशी शाहूराजे यांची स्पष्ट आज्ञा असतां रामराजे यांचें महत्व कमी करण्याचा

प्रयत्न बाळाजीनें कां केला ? शाहूराजे यांचा विश्वास चिटणीसांवर होता. बाळाजीवर शाहूचा फारसा विश्वास होता असें दिसत नाहीं, ' असें राजवाडेच म्हणतात. शिवाय ' शाहूला बाळाजीचा राग अर्थात्च आला व १७४७ त बाळाजीचा अधिकार काढून घेण्याचा त्यानें विचार केला. भारतवर्षांतील नं. ४५ चे पत्रावरून बाळाजीला निरोप देण्याचा शाहूचा विचार होता हें स्पष्ट होतें.' असेंही ते म्हणतात. अशा स्थितींत ताराबाईच्या पक्षाला जेव्हां चिटणीस सामील झाले तेव्हां शाहूराजे यांच्या आज्ञेप्रमाणें बाळाजीनें चिटणीसांच्या सल्ल्यास अनुसरून कां वर्तन केलें नाहीं ? एकंदरींत शाहूराजे यांच्या आज्ञापालनाचें बाळाजीचें निव्वळ ढोंग होतें व त्याचा ते आपल्या केवळ स्वार्थाकरतां उपयोग करून घेत होते हेंच खरें ठरतें. शाहूराजे यांची एकही आज्ञा बाळाजीनें पाळली नाहीं, असें इतिहासावरून स्पष्ट दिसत असतां राजवाडे यांनीं स्वतःबरोबर आपल्या प्रस्तावनेच्या वाचकांचीही मति भ्रष्ट केली आहे. शाहूराजांची इच्छा म्हणून बाळाजीनें रामराजाला गादीवर आणलें व शाहूच्या हट्टामुळें मराठ्यांचें राज्य एकछत्री करण्याचा बाळाजीचा हेतु फसला हें राजवाडे यांचें विधान सपशेल चुकीचें आहे. ( प्रस्तावना पृ. ४५ )

मराठ्यांचें राज्य एकछत्री करण्याचा बाळाजीचा हेतु होता अशी राष्ट्रहिताची व मराठी राज्याच्या बळकटीची उठावणी देऊन बाळाजीचें विनाकारण स्तोम माजविण्याचा जो राजवाडे यांनीं प्रयत्न केला आहे तो किती अवास्तव आहे याचें पुढील इतिहासावरूनही प्रत्यंतर येतें. मागील १४ व्या प्रकरणांत उल्लेख केल्याप्रमाणें ताराबाईनीं संभाजीराजे यांना सातारच्या गादीचा कबजा घेण्याकरतां बोलाविलें त्यावेळीं एकछत्री राज्य व्हावें अशी बाळाजीची जर खरी इच्छा असती तर त्याला त्यांनीं त्या वेळीं विरोध केला नसता. तसेंच संभाजीराजे कालवश होतांच त्या गादीवर स्थापना करण्याकरतां मुंगीकर भोंसल्यापैकीं उमाजीची बाळाजीनें रवानगी केली. ही हकीकत मागील प्रकरणीं आली आहे. असें असतां राजवाड्यांनीं त्यासंबंधीं पुढील प्रमाणें माहिती दिली आहे. ' ज्या हट्टानें व अज्ञानानें १७४९ त शाहूला पछाडिलें

त्याच हट्टानें व अज्ञानानें १७६० त संभाजीला गांठिलें व त्यानें मरणापूर्वी खानवटकर भोंसल्यांच्या कुळांतील एक मुलगा दत्तक घ्यावा असें ठरविलें. पुढें १७६२ त जिजाबाईनें ह्या मुलाला दत्तकही घेतलें. संभाजीच्या ह्या कृत्यानें बाळाजीचा बेत ह्या वेळीं दुसऱ्यांदा फसला. परंतु एवढ्यानें नाउमेद होऊन बाळाजी स्वस्थ बसला नाहीं. खानवटकरांच्या घराण्यातील जो मुलगा जिजाबाई दत्तक घेणार होती त्यालाच रामराजाच्या मांडीवर देऊन रामराजास वनवासास जावयास सांगावें असा बाळाजीचा ह्या वेळीं मनोदय होता. [लेखांक २८९ व चिटणिसांची बखर] ह्या खानवटकरांच्या कुळांतील नवा राजा करण्यांत मतलब असा कीं, पुढें मागें कोणतीही एक गादी निपुत्रिक झाली असतां ज्या गादीवरील वंश हयात असेल त्याला निपुत्रिक गादीवर हक्क सांगतां यावा व हीं दोन्हीं राज्यें एक व्हावीं. पानिपतची लढाई झाल्यावर नवा राजा करण्याचा बाळाजीचा बेत होता [लेखांक २८९]. परंतु बाळाजीला पुढें मृत्यूनें लवकरच गांठिल्यामुळें तो बेत तसाच राहिला.' [प्रस्तावना पृ. ४६] याप्रमाणें विपर्यस्त माहिती राजवाड्यांनीं देऊन थोरपणाचा किरीट बाळाजीच्या मस्तकावर ठेवण्याचा प्रयत्न केलला आहे. बाळाजीनें आपल्या-तर्फेचा दत्तक जो जिजाबाईचे मांडीवर देण्याचा संकल्प केला तो खानवटकर घराण्यांतील नसून महादाजी भोंसले मुंगीकर यांचा धाकटा भाऊ उमाजी होता हें मागील प्रकरणीं [इ. सं. ऐ. टि. भा. २ पृ. २२] वरील पत्र देऊन स्पष्ट केलें आहे. त्याचप्रमाणें राजवाडे यांचे आधारही (खंड १ ले. २८९ व चिटणीसांची बखर पृ. २९) देऊन बाळाजीचे मनांत एकछत्री राज्य करण्याच्या मुळाशीं राष्ट्रहिताचा व मराठी राज्याच्या बळकटीचा थोर हेतु नसून तो केवळ स्वार्थाचा डाव होता हें सप्रमाण दाखविल्यामुळें राजवाड्यांनीं बाळाजीच्या थोरपणाचा उभारलेला डोल्हारा त्यांच्याच अंगावर कसा कोलमडून पडला हें लक्षांत येईल.

राजवाड्यांनीं नानासाहेब पेशव्यांची बाजू सावरून धरण्याचा जो प्रयत्न केला आहे त्यांतूनही कांहीं ठिकाणीं त्यांचे लेखणींतून नाइलाजास्तव सहजच

सत्याचे शब्द बाहेर पडलेले आहेत. पण त्यांवरही आपल्या बुद्धिचातुर्यानें पांघरूण घालण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. त्याच्या पडताळ्याकरितां त्यांच्या प्रस्तावनेंतील मजकूर पुढें दिल्याप्रमाणें आहे. ‘ सामान्य नीतीच्या दृष्टीनें पहातां ह्या दुर्बल छत्रपतींचें महत्व बाळाजीनें संपुष्टांत आणिलें हें बरेंच गर्हणीय आहे. परंतु बुद्धीनें व शक्तीनें बलिष्ठ अशा पुरुषाच्या किंवा पुरुषांच्या हातांत कोणत्याही राष्ट्राचीं सूत्रें असणें मोठें हितकर असतें ह्या राजनीतीच्या धोरणानें बाळाजीच्या प्रयत्नांचा विचार केल्यास झालें तें योग्यच झालें असें ह्मणणें प्राप्त होतें. इतकेंच कीं, जें झालें तें पानिपत येथील घोर संकटामुळें पूर्णपणें झालें नाहीं. एवढेंच नव्हे, तर तें अंशतः न झाल्यासारिखेंच झालें. हे पाहून मन किंचित् उद्विग्न होण्याचें कारण असें आहे कीं, ही पानिपत येथील विपत्ति पर्यायानें व परंपरेनें मराठ्यांच्या राष्ट्राच्या नाशास कारण झाली.’ [ पृ. ४७ ] याप्रमाणें राजवाड्यांच्या न्यायाचा कांटा त्यांच्या वरील लिखाणांत कसा झोले खात होता हें दिसून येतें. नीति-अनीति, योग्य-अयोग्य, भलें बुरें वगैरे न्यायाच्या दृष्टीनें जें ठरवावयाचें असतें तें केवळ एकाद्या विशिष्ट प्रसंगाच्या जयापजयावर अवलंबून नसतें. सदासर्वदा नीति ती नीतीच व अनीति ती अनीतीच खऱ्या न्यायानें ठरविली पाहिजे. हा सरळ व व्यवहार्य मार्ग सोडून राजवाडे वरीलप्रमाणें बाळाजीची अनीति डोळ्याला स्पष्ट दिसत असतां त्यावर उसनें नीतीचें पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतात हें पाहून त्यांची कींव आल्याशिवाय रहात नाहीं.

बाळाजींना पानिपतच्या लढाईत अपयश कां आलें याचीं कारणें ग्रंथोग्रंथीं जीं लिहिलेलीं आढळतात त्यांत [१] पेशव्यांनीं छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें स्वामिद्रोहाच्या पापानें पेशव्यांचा क्षय झाला. [२] छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें मराठा व ब्राह्मण सरदारांचीं मनें पेशव्यांविषयीं कलुषित झालीं. या दोन कारणांना राजवाड्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत आदिस्थान दिलेलें आहे. या कारणांचें विवेचन करतांना राजवाड्यांनीं जरी बाळाजीची कड घेतली असली तरी ती केवळ पक्षभेदानें आहे न्याय मार्गानें नाहीं हें विचारांतीं प्रत्ये-

काच्या मनाला पटल्याशिवाय राहणार नाहीं. वरील दोन्हींही कारणें त्रिकालाबाधित सत्य आहेत. तीं विद्वत्तेच्या बळावर किंवा तारेवरील नाचाप्रमाणें लेखणीच्या नर्तनावर खात्रीनें असत्य ठरणारीं नाहींत. कोणतेंही विधान ठाम असावें. पिंपळाच्या पानाप्रमाणें नसावें.


राजवाडे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत १७५० नंतर बाळाजीनें भटकुल-बादशाही किंवा ब्राह्मणपदबादशाही स्थापिली असें ह्मटलें आहे. हेंही राजवाडे यांचें विधान मागील विधानाइतकेंच खोटें आहे. राजवाड्यांच्या ह्मणण्या-प्रमाणें बाळाजींनीं स्थापन केलेली भटकुलबादशाही ह्मणावें तर त्यांत भट घराण्यांतील सर्व पुरुषांचा अंतर्भाव व्हावयास पाहिजे होता. परंतु बाळाजीनें स्थापन केलेल्या बादशाहींत त्यांचा चुलत भाऊ सदाशिवरावभाऊ यांची त्यांना ज्याअर्थीं अडचण वाटत होती त्याअर्थीं ती भटकुलबादशाही ठरूं शकत नाहीं. बाळाजीनंतर त्याच भटकुलबादशाहीच्या बादशहाला—माधवराव पेशव्याला सदाशिवरावभाऊ व राघोबादादा हे दोघेही शत्रुस्थानीं वाटूं लागले. एकंदरींत बाळाजींनीं स्थापन केलेली बादशाही भटकुलबादशाही निश्चित ठरूं शकत नाहीं. त्या बादशाहीला ब्राह्मणपदबादशाही ह्मणावें तर त्यांत सर्व ब्राह्मणांचाही अंतर्भाव नव्हता. प्रतिनिधि, सचीव, बाबूजी नाईक वगैरे ब्राह्मणच होते. त्यांचा नाश ज्याअर्थीं बाळाजीनें केला त्याअर्थीं ब्राह्मणपद-बादशाही हेंही नांव सार्थ ठरत नाहीं. बाळाजीच्या पश्चात् त्या ब्राह्मणपद-बादशाहीच्या तक्तावर जे बादशहा आरूढ झाले त्यांनीं तर देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत अशीं खंडेंच पाडिलीं. मग ब्राह्मणपदबादशाही कोठें शिल्लक राहिली? एकंदरींत राजवाडे यांनीं बाळाजीच्या राज्यस्थापनेला ब्राह्मणपदबाद-शाही हें नांव दिलें तेंही अप्रयोजक आहे. बाळाजीच्या राज्यस्थापनेला योग्य नाव द्यावयाचें असेल तर तें 'नानाशाही' हेंच सार्थ ठरेल. बाळाजी ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनीं केवळ 'नानाशाही' स्थापन केली. नानाशाहींत त्यांच्या भाऊबंदानांही मज्जाव होता. ह्मणूनच ती खरी 'नानाशाही' होती. या स्वार्थी 'नानाशाही'च्या स्थापनेमुळें हिंदुपदबादशाही नामशेष झाली.

ही नानाशाही हिंदुपदबादशाहीवर उपवृक्षाप्रमाणें वाढली होती. सातारच्या हिंदुपदबादशाहीच्या वृक्षावर ही नानाशाही उपवृक्षाप्रमाणें वाढल्यामुळें त्या मूळ वृक्षाचा सर्व रस उपवृक्षानें आढून घेऊन ता प्रबळ झाला. पुढें त्या उपवृक्षावर म्हणजे नानाशाहीवर नाना फडणीसांचा दुसरा उपवृक्ष निर्माण झाला. एका शाहीची वाढ दुसऱ्या शाहीचें भक्ष्य झाल्यामुळें मूळ वृक्ष बलहीन होतांच त्यावरील उपवृक्ष आपोआप वठून गेले. एकंदरींत शाहूमहाराजांच्या हिंदुपदबादशाहीला नानाशाहीच्या उपवृक्षाची कीड लागून त्याचा नाश झाला हेंच खरं ठरतें.


एकंदरींत बाळाजीला महत्व देण्याकरतां ताराबाईवर निरनिराळ्या इतिहासकारांनीं ‘ महत्वाकांक्षी, हट्टी, स्वार्थी, उपद्व्यापी, ’ वगैरे जे दोष दिले आहेत ते सर्व खोटे आहेत हें आतां निराळें सांगणेची जरूरी नाहीं. राजवाड्यांच्या वरील प्रस्तावनेच्या मुद्यावर रियासतकारांनीं पुढीलप्रमाणें आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ‘ रा. राजवाडयांच्या मनांत किंवा वाचनांत ज्या शंका उद्भवल्या त्यांचाच अनुवाद त्यांनीं करून आपलें मन गोंधळून घेतलें. ब्राह्मणपदबादशाही, भटकुलबादशाही वगैरे अप्रयोजक शब्द वापरून त्यांनीं वाचकांचा व थोडाबहुत स्वतःचा गोंधळ उडविला आहे. रा. राजवाडयांच्या अधिकारी लेखणींतून हें विवेचन उतरलें असल्यामुळें, त्यास पेशवाईच्या विवेचनांत एवढें महत्व देणें भाग पडलें. समग्र विवेचन वाचलें म्हणजे राजवाडयांनीं आपल्या आक्षेपांचें निरसन आपणच करून घेतलें आहे असें म्हणावें लागतें. [ म. रि. म. वि. २ पृ. २०४ ].

राजवाड्यांच्या प्रस्तावनेंत वर दर्शविल्याप्रमाणें ताराबाईसंबंधीं जीं ऐतिहासिक सत्याला बाध आणणारीं विधानें आलेलीं आहेत तीं सोडून दिलीं असतां त्यांनीं आपल्या पहिल्या खंडाच्या सुरवातीला आपलें ब्रीदवाक्य म्हणून राघोबादादांच्या एका सिद्धांतरूपानें लिहिलेल्या वाक्याचा उल्लेख केला आहे तो मात्र अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा आहे यांत संशय नाहीं. ‘आपल्यांत दुही पडते, तेव्हां शत्रूस बळ फावतें ’ हा राघोबादादांचा सिद्धांत राजवाडे यांना पूर्ण

पटला. परंतु आपल्यांत फूट कोणी पाडली हें ऐतिहासिक सत्य मात्र साग्र इतिहासाचें मंथन करून राजवाड्यांना काढतां आलें नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. ' चोराला सोडून संन्याशाला सुळीं ' देणाऱ्या न्यायदानाचाच त्यांनीं अवलंब केलेला आहे. हिंदुपदबादशाहीच्या अगदीं मूलभूत तत्वांच्या चाकोरींतून ताराबाई राज्यकारभार हांकण्याचा प्रयत्न करीत असतां नानासाहेब पेशव्यांनीं आपल्यांत हिंदुपदबादशाहीच्या राज्यव्यवस्थेंत पहिल्यानें दुहीं उत्पन्न केली व त्या दुहीच्या प्रवाहांतून आपल्या ' नानाशाहीच्या राजकारणाची नौका बळजबरीनें हांकण्याचा जो अट्टाहास धरला त्यामुळें ' शत्रूस बळ फावलें ' या ऐतिहासिक सत्याला राजवाडे यांनीं पलटणी दिल्यामुळें मागील सर्व ऐतिहासिक संगतीचा व राजकारणाचा खेळखंडोबा झालेला आहे. सिद्धांत निवडणें हें जितकें महत्वाचें आहे तितकेंच किंबहुना त्यापेक्षां जास्तच त्या सिद्धांताला पोषक अशी ऐतिहासिक सत्याची मांडणी करणें महत्वाचें आहे. एकंदरींत राजवाडे यांची ऐतिहासिक तत्वांत चूक झालेली नाहीं. परंतु तपशिलांत मात्र सर्वथैव झालेली आहे हें विचारवंत इतिहासभक्तांना दिसून येईल. त्या दृष्टीनें पहातां ताराबाईचें चरित्र किती ओजस्वी किती निःस्वार्थी आणि राष्ट्रहित व स्वराज्यहित याच्या मूर्तिमंत स्फूर्तीनें किती ओथंबलेलें आहे हें आतां निराळें सांगणेची जरूरी नाहीं. धन्य ती ताराबाई ! आणि धन्य तो त्यांचा स्वामिभक्त परिवार ! !




परिशिष्ट १.—श्रीअंबादेवघर, जुनाराजवाडा–कोल्हापूर.




परिशिष्ट १—शिवाजी महाराजांचे तख्त.



परिशिष्ट ३.—पन्हाळा किल्ल्यावरील ताराबाईंचे निवासस्थान.



परिशिष्ट ४.—पन्हाळा किल्ल्यावरील ‘ कलावंतिणीचा सज्जा. ’



परिशिष्ट ५.—सातारचा किल्ला.



परिशिष्ट ६ —' अजिंक्य तारा ' किल्ल्यावरील ताराबाईचें निवासस्थान.

# परिशिष्ट १.

## श्रीअंबादेवघर, जुना राजवाडा–कोल्हापूर.

कोल्हापूर येथील ' जुना राजवाडा ' ज्याला ह्मणतात तो संभाजी राजे [ ताराबाईचा सावत्र मुलगा ] यांचे कारकीर्दीत बांधला गेला. त्यावेळीं त्या वाड्यांत श्रीअंबा देवघर बांधलें जाऊन श्रीअंबाबाईची स्थापना करण्यांत आली. ही तुळजापूरनिवासिनीची प्रतिकृति समजली जाते. या देवीचें पुजारी-पण तेव्हांपासून भोंसले घराण्याच्या एका उपशाखेकडेच वंशपरंपरा चालू आहे. त्याबद्दल त्यांना त्या वेळेपासून इनाम जमिनी व गांव [ मौजे खिंडीचे व्हरवडे पेटा, राधानगरी ] मिळालेले आहे. या देवघरांत खंडोबा, मेसाई, नवलाई, जोगाई वगैरे भोंसले घराण्याच्या कुलधर्म देवदेवतांचे टांक मांडले असून त्यांत महाराणी ताराबाई यांचाहि सोन्याचा टांक ठेवण्यांत आलेला आहे. देवीच्या पूजेबरोबर नित्यशः या टाकांचीहि पुजा करण्यांत येत असते. त्याचप्रमाणें या देवीच्या सान्निध्यांत राज्याभिषिक्त शिवाजी राजे [ ताराबाईचे पुत्र ] यांचा पट्टा, तरवार व कट्यार हीं तीन हत्यारेंहि ठेवण्यांत आलेलीं असून त्यांचीहि नित्यशः पुजा होत असते. तसेंच श्रीभवानी शंकराचें लिंगहि तेथें पुजेंत ठेवण्यांत आलेलें आहे. तुळजापुरची भवानी व शिखर शिंगणापूर येथील महादेव हीं दोन भोंसल्यांचीं कुलदैवतें आहेत. श्रीभवानी शंकराचें लिंग हें शिखर–शिंगणापुर या महादेवाची प्रतिकृति समजली जाते. या शिवाय या देवघरांत शककर्ते श्रीशिवाजी महाराज यांच्या हाताचा पंजाहि पुजेंत ठेवण्यांत आलेला आहे. या पंजाची आख्यायिका अशी आहे कीं, मालवणचा जंजिरा किल्ला ' सिंधुदुर्ग ' शिवाजी महाराजांनीं जेव्हां बांधण्यास सुरवात केली तेव्हां त्या किल्ल्यावरील मुख्य मान्याच्या बुरुजाचें काम चालू असतां तें पहाण्याकरितां शिवाजी महाराज तेथें गेले. त्यावेळीं ते त्या बुरुजावर

हात टेकून चढले. त्या बुरुजाचा तो थर नुकताच पुरा झाला असल्यानें त्याचा चुना ओलाच होता. त्या चुन्याच्या कामावर शिवाजी महाराजांनीं चढण्याचे वेळीं हाताचा पंजा टेकल्यामुळें त्यावर जसाच्या तसा त्यांचा पंजा उमटला. पुढें तो चुना वाळल्यानंतर त्यांत शिसें ओतून त्याचा ठसा शिवाजी महाराजांची निशाणी ह्मणून संग्रह करण्यांत आला. पुढें तो ठसा श्रीअंबा देवघरांत पुजेंत ठेवण्यांत आला. कित्येक वर्षे लोटल्यानंतर तो शिश्याचा पंजा भंग पावला तेव्हां तो पुजेंत ठेवतां येत नाहीं ह्मणून कै. वा. शाहू छत्रपति यांनीं त्या ठशाबरहुकूम चांदीचा पंजा कोल्हापुरीं ओतून तयार करविला. तो सध्या पुजेंत ठेवण्यांत आलेला आहे. ×

---

# परिशिष्ट २.

## शिवाजी महाराजांचें तख्त.

इ. स. १७०१ मध्यें ताराबाईनीं आपला पुत्र शिवाजी राजे यांना पन्हाळगडावर जो राज्याभिषेक करविला तो या तख्तावरच आरूढ होऊन झाला. याच हिंदुपदपादशाहीच्या पवित्र तख्तावर शिवाजीराजांना बसवून ताराबाईनीं आपल्या प्रजाजनांना न्यायदान देवविलें. याच तख्ताच्या पुण्य-प्रभावावर त्यांनीं औरंगजेबास रख्या सार्वभौम बलाढ्य शत्रूला ' दे माय धरणी ठाय ' करून सोडलें. याच तख्ताच्या अधिष्ठानावर त्यानीं हिंदुधर्म, स्वराज्य, स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांचें रक्षण केलें. याच तख्ताच्या बळा-वर त्यांनीं सर्व महाराष्ट्राची एकी नांदविली व नेकी टिकविली. याच तख्ताच्या सामर्थ्यावर त्यांनीं महाराष्ट्रांत नवचैतन्य निर्माण केलें. याच

---

× **टीपः**—दिनकरराव दादाजीराव भोसले हवलदार दिमात अंबा-देवघर यांनीं ही माहिती स्वतःच्या परंपरागत माहितीप्रमाणें व अस्सल सनदा व पत्रावरून मोठ्या आस्थेनें पुरविलेली आहे.

तख्ताच्या पावित्र्यावर त्यांनीं हिंदुपदपादशाहीच्या कीर्तीचा आणि यशाचा भगवा झेंडा पन्हाळगडावर फडकत ठेवला आणि याच तख्ताच्या श्रेष्ठपणावर त्यांनीं महाराष्ट्रांतील सर्व हिंदूचें हिंदुत्व रक्षण केलें. हें तख्त म्हणजे महाराष्ट्राच्या उज्वल कीर्तीचें, स्वाभिमानाचें आणि पराक्रमाचें मूर्तिमंत प्रतीकच आहे. इ. स. १७१४ मध्यें ताराबाईनीं आपल्या सावत्र मुलाला संभाजी राजांना राज्याचे धनी केलें. राज्याभिषिक्त शिवाजी राजांकडून त्यांनीं राज्य-संन्यास करविला आणि आपण स्वतः राज्यकारभारांतून सेवानिवृत्ति घेतली. त्यावेळीं त्यांनीं आपल्याबरोबर या तख्ताचें स्वत्व व सत्व राखण्याकरितां त्यालाहि हिंदुपदपातशाहीच्या छत्रपतीच्या सेवेंतून सेवानिवृत्त करून देवकळा निर्माण करून दिली. तेव्हांपासून या तख्ताची पूजा—अर्चा, नंदादीप वगैरे आजतागाईतपर्यंत अखंड चालू आहे. ताराबाईनीं संभाजी राजांकरतां निराळें तख्त करून त्यांची राज्यावर स्थापना केली. त्यावेळेपासून पुढें जे छत्रपति अधिकारारूढ होत गेले ते आपल्या दरबारास जाण्यापूर्वी पहिल्यानें श्रीअंबाबाईचें दर्शन घेऊन व या तख्तास मुजरा करून नंतरच ते दरबारांत आपल्या तख्तावर जाऊन बसत आले. आजमितीपर्यंत हीच प्रथा चालत आलेली आहे. या तख्तास ‘ शिवाजी महाराजांचें तख्त ’ असें संबोधण्यांत येतें. हें तख्त श्रीअंबादेवघरांतच स्थापिलेलें आहे. ×

---

× **टीपः**—परिशिष्ट १ मधील ताराबाईच्या नांवाचा टाक भोंसल्यांच्या कुळधर्माच्या देवदेवतांबरोबर अखंड पूजिला जातो ही प्रथा व शिवाजी राजे यांचे तख्ताची पूजा अर्चा, नंदादीप वगैरे अखंड चालू ठेऊन त्या तख्ताला मुजरा करून नंतर दरबारांत प्रवेश करण्याची पुढील छत्रपतींची प्रथा विचारांत घेतली म्हणजे संभाजीराजांनीं ताराबाई व शिवाजी राजे यांना बंदींत टाकून आपण राज्याचे धनी झाले हें आजपर्यंतच्या इतिहासकारांचें विधान सपशेल खोटें ठरतें. ताराबाईनीं सातारा व कोल्हापूर या दोन छत्रपतींतील दुही नष्ट करण्याकरितां अपूर्व त्याग केला हेंच या ग्रंथांतील विधान योग्य व व्यवहार्य आहे असे दिसून येईल.

कोल्हापूरीं ' ताराबाईचा छबीना ' प्रतिवर्षीं निघत असतो. हा छबिना जुन्या राजवाड्यांतून ताराबाईचे श्राद्धतिथीचे आदले दिवशीं ह्मणजे मार्गशीर्ष शुद्ध ७ चे दिवशीं निघतो. पालखींत ताराबाईच्या पादुका ठेऊन त्याबरोबर हत्ती, घोडे, लष्कर, फड, रिसाला, हुजरे, शिकारखाना, बंदुक–बाणदार, मानकरी वगैरे असतात. नंतर हा छबिना ' संस्थानांत ' जातो. [ संस्थान ह्मणजे कोल्हापूरच्या राजघराण्याची स्मशानभूमी ] तेथून तो दुसरे दिवशीं परत राजवाड्यांत येतो. त्याचप्रमाणें कोल्हापुरांत प्रतिवर्षी ताराबाईचा रथ निघत असतो. या रथाची प्रथा कै. वा. श्रीशाहूमहाराज छत्रपति यांनीं सुरू केली. हा रथोत्सव चैत्र महिन्यांत तीन दिवस असतो. पौर्णिमेचे दिवशीं ग्रामदेवता श्रीकरवीर निवासिनी अंबाईचा रथ, वद्यप्रतिपदेस श्रीताराबाईचा रथ व वद्यद्वितीयेस श्रीगजेंद्रलक्ष्मीचा रथ. या तिन्हीं रथाचे वेळीं कै. वा. श्रीशाहूमहाराज छत्रपति हे रथाबरोबर पायीं जात असत. तीच प्रथा आजवर चालू आहे.

---

# परिशिष्ट ३ व ४.

पन्हाळा किल्ल्यावरील इतिहासप्रसिद्ध इमारतींचे हे दोन अवशेष आहेत. कोल्हापूरकरांच्या राज्यांत जे लहान मोठे किल्ले आहेत त्यांत अव्वल दर्जाचा 'पन्हाळा किल्ला' असें मानण्यांत येतें.या किल्ल्यानें हिंदुपदपादशाहीची व हिंदुधर्म संरक्षणाची फार मोठी कामगिरी केलेली आहे. हा किल्ला सह्याद्रीच्या एका शिखरावर बांधलेला आहे. तो कोल्हापूरच्या वायव्येस सुमारें १०।११ मैलांवर आहे. समुद्राच्या सपाटीपासून याची उंची २०४७ फूट आहे. या किल्ल्याचा परीघ सुमारें साडेचार मैलाचा असून त्याच्या अर्ध्या भागाला ३० पासून ५० फूट खोल तुटलेला कडा आहे. त्याला मधून मधून तटाचें जोडकाम करून हा किल्ल्याचा अर्धा परीघ पूर्ण संरक्षणक्षम केलेला आहे. बाकीच्या अर्ध्या भागाला १५ पासून ३७ फूट रुंदीचा भक्कम आणि

उंच तट बांधलेला असून इकडून तिकडे तोफा वगैरे नेण्याआणण्याकारितां मधून मधून बुरूज बांधलेले आहेत. किल्ल्याला तीन दुहेरी भक्कम दरवाजे होते. वर जाण्याला दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ल्याच्या तीन दरवाज्यापैकीं वाघ दरवाजा व चोर दरवाजा हे कोसळून पडलेले आहेत. तिसरा दरवाजा मात्र अद्यापी शाबूत आहे. हा दरवाजा भक्कम असून त्याच्यावर नक्षीचें सुंदर काम केलेलें आहे.

या किल्ल्यांत जिवंत पाण्याच्या दोन विहिरी असून दुसरे पुष्कळ झरेही आहेत. टेकडीच्या माथ्यावर कोठें खोल तुटलेले कडे, कोठें तळीं, कोठें वृक्षछायेखालीं असलेले पाण्याचे झरे इत्यादि निसर्ग निर्मित गोष्टींचा देखावा फारच रमणीय भासतो. पावसाळा खेरीज करून इतर दिवसांत येथील हवा फारच उत्तम असते. येथील पाणी उत्तम असून पाचक आहे. येथील सर्वांत उत्कृष्ट झऱ्याला नागझरी असें ह्मणतात. साधोबा व सोमाल अशीं दोन तळीं येथें आहेत. या तळ्याच्या पाण्याचा पुरवठा किल्ल्यांतील लोकांना होतो. साधोबाचे तळें २२१ फूट लांब १४८ फूट रुंद व ३५ फूट खोल आहे. सोमालाचें तळें २२० फूट लांब, १९० फूट रुंद व ३७ फूट खोल आहे. या दोन्हीं तळ्यांना खालीं उतरण्याकरतां दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ल्यांतील मुख्य विहिरीला श्रृंगारबाव किंवा अंधारबाव असें ह्मणतात. ही किल्ल्याच्या पश्चिमेस तटाला लागून आहे.

या किल्ल्यांत पडापड झालेल्या पुष्कळ जुन्या इमारती आहेत. सर्वांत जुनें काम बालेकिल्ल्याचें आहे. हा ‘ बालेकिल्ला ’ पन्हाळा किल्ल्याच्या मध्यभागीं असून त्याच्या सभोंवार उंच तट आहे. परंतु हल्लीं हाही तट जमीनदोस्त होऊं लागला आहे. या किल्ल्यांत फणस, आंबे, पेरूचीं वगैरे पुष्कळ झाडें आहेत. यांत पूर्वी एक राजवाडा होता. परंतु हल्लीं त्याचा फक्त चौथरा मात्र दृष्टीस पडतो. याशिवाय या किल्ल्यांत जुन्या तीन कोठ्या आहेत. सर्वांत मोठ्या कोठीला ‘ गंगा कोठी ’ असें ह्मणतात. या कोठीला तीन दरवाजे असून दोन्ही बाजूस दोन दगडी जिने आहेत. या कोठीच्या माथ्यावर

धान्य ओतण्याकरितां भोकें ठेवलेली आहेत. दुसरी ' धर्मकोठी ' व तिसरी ' सज्जे कोठी '. या कोठ्या दगड चुन्यानें अगदीं मजबूत बांधलेल्या आहेत.

या किल्ल्याच्या पूर्वेस तटाला लागून ' कलावंतिणीचा सज्जा ' या नांवाची इमारत आहे. या इमारतीला सुंदर नक्षीदार कडीपाट होता. याचा फारच थोडा अवशेष हल्लीं राहिलेला आहे. ही इमारत ६० फूट लांब ३५ फूट रुंद व ५८ फूट उंच होती. या इमारतीच्या सज्जावर बसलें असतां किल्ल्याच्या सभोंवारचा प्रदेश दूरवरपर्यंत दिसतो. त्यामुळें शत्रूच्या हाल-चालींवर नजर ठेवण्याकारितां या इमारतीचा उपयोग पूर्वी फार होत असे. परिशिष्ट ४ हें चित्र याच इमारतीचें आहे. किल्ल्याचे दक्षिण भागांत तटा-शेजारीं तालीमखान्याची जागा आहे. या इमारतीला घुमटाच्या तीन खोल्या आहेत. त्याचप्रमाणें ' रेडे महाल ' या नांवाची इमारत, हल्लीं मामलेदार कचेरी ज्या ठिकाणीं आहे त्याच्या दाक्षिणेस आहे. ही इमारत १०१ फूट लांब, ५३ फूट रुंद व ३६ फूट उंच आहे. मामलेदार कचेरीच्या शेजारींच संभाजी महाराज छत्रपति कोल्हापूरकर यांचें देवालय आहे व त्याच्यासमोरच त्यांच्या पत्नी महाराणी जिजाबाईसाहेब यांचें देवालय आहे.

परिशिष्ट ३ हें चित्र पन्हाळा किल्ल्यावरील कोल्हापूरच्या महाराजांच्या राजवाड्याचें आहे. हें पूर्वी ताराबाईचें निवासस्थान होतें. हा राजवाडा दुमजली असून त्यांत सुमारें दोनशें माणसें राहण्याची सोय आहे. हें स्थान ऐतिहासिक दृष्टीनें अत्यंत महत्वाचें आहे. इ. स. १६५९ मध्यें शिवाजी महाराजांनीं विजापूरकरांचा सरदार अफझूलखान याचा वध केल्यानंतर लौक-रच त्यांनीं विजापूरांपासून पन्हाळा जिंकून घेतला. पुढें शिवाजी महाराजांचें पारिपत्य करण्याकरितां विजापूरकरांनीं शिद्दी जोहार यास त्यांच्यावर पाठविलें. शिद्दी जोहारानें पन्हाळ्याला वेढा घातला. त्या वेळीं शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावरच होते. किल्ल्यास सुमारें चार महिने वेढा पडला होता.

या वेढ्याचें काम शिद्दीनें मोठ्या नेटानें चालविलें होतें. शेवटीं निरुपाय होऊन तेथून शिवाजी महाराज चोरवाटेनें रांगण्यास निघून गेले. या राजवाड्याच्या मागील बाजूला जो सयाद्री पर्वताचा तुटलेला कडा व दरी आहे त्यांमधून शिवाजी महाराज निघून गेले होते. अद्यपी पन्हाळा पहावयास गेलेल्या लोकांना ही चोरवाट दाखवण्यांत येते. शिवाजी महाराजांनीं याच पन्हाळा किल्ल्यावर संभाजीमहाराजांना नजरबंदींत ठेविलें होतें. मोंगल मर्दिनी ताराबाईनीं सन १७३० पर्यंत याच ठिकाणीं वास्तव्य केलें होते. औरंगझेब बादशहाबरोबर घडवून आणलेलीं सर्व राजकारणें याच किल्ल्यावर तयार झालीं. एकंदरींत हिंदुपदपादशाहीच्या लष्करी सामर्थ्याच्या व बुद्धिवैभवाच्या यशस्वी अशा सव्यसाची कामागिरींचा मोठा मान महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि किल्ल्यापेक्षां पन्हाळा किल्ल्याला लाभला आहे असें मोठ्या अभिमानानें ह्मणावें लागतें. इ. स. १७८२ मध्यें कोल्हापूरच्या महाराजांनीं आपली गादी पन्हाळ्यावरून हालवून कोल्हापूरास आणिली.

पन्हाळा येथें प्राचीन काळीं पराशर ऋषि रहात असत असें करवीर महात्म्य ग्रंथांत वर्णन केलें आहे.तसेंच किल्ल्याच्या दक्षिणेस खडकांत खोदलेली एक गुहा आहे. तिला पाराशर ऋषींची गुहा असें ह्मणतात.पन्हाळ्याचें पूर्वीचें नांव 'पन्नगालय' असें होतें. जुन्या शिलालेखांत त्याचें 'पद्मनाल' असें नांव आढळतें. सातान्यास एक ताम्रपट सांपडला त्यांत इ. स. ११९१–९२ मध्यें पन्हाळा हें शिलाहार राजा दुसरा भोज याच्या राजधानीचें शहर होतें असें लिहिलें आहे. हा राजा त्यापूर्वी कोल्हापूरच्या उत्तरेस वलवड येथें रहात असे. त्यालाच हल्लीं वलिवडें असें ह्मणतात व तें कोल्हापूरच्या उत्तरेस ४॥ मैलांवर आहे. भोजराजानें एकंदर पंधरा किल्ले बांधिले. त्यांत पन्हाळा, बावडा, भूदरगड, सातारा आणि विशालगड हे मुख्य होते. इ. स. १२०९-१० च्या सुमारास देवगिरीच्या यादवांनीं भोजराजाचा पराभव केल्यामुळें त्याच्या हातून पन्हाळा कि ा गेला. पुढें तो किल्ला कांहीं दिवस पुंड पाळेगार लोकांच्या ताब्यांत होता असें दिसतें. इ. स. १३९६ मध्यें किल्ल्याच्या आमे-

यीस ' नभापूर ' नांवाचें शहर स्थापन झालें असा शिलालेख सांपडतो. इ. स. १४८९ मध्यें हा किल्ला विजापूरच्या आदिलशाही घराण्याच्या ताब्यांत गेला. त्यावेळीं तेथील बादशहानें या किल्ल्याची उत्तमरीतीनें दुरुस्ती केली. किल्ल्याचे भक्कम तट व दरवाजे याच घराण्यांतील बादशहांनीं बांधले. हें बांधकाम सुमारें शंभर वर्षे चालू होतें. इब्राहीम आदिलशहाच्या सन १५३४-५७ च्या कारकीर्दींत खोदलेले पुष्कळ शिलालेख या किल्ल्यांत आहेत. सन १६५९ मध्यें शिवाजी महाराजांनीं अफझुलखानाचा वध करून पन्हाळा किल्ला जिंकून घेतला. तेव्हांपासून आजतागाईत पर्यंत मध्यंतरीचीं कांहीं गंडांतरें सोडून दिल्यास हा किल्ला भोंसले राजघराण्याच्या ताब्यांत असून व तो त्या घराण्याची कीर्ति, पराक्रम आणि वैभव याची साक्ष देत उभा आहे.

---

## परिशिष्ट ५.

## सातारचा किल्ला.

इ. स. १६९८ मध्यें राजाराम महाराजांनीं मराठी राज्याची राजधानी सातारा ही केली. राजाराम महाराज जिंजीहून परत महाराष्ट्रांत आल्यानंतर त्यांना मराठी राज्याच्या कारभाराला सोईस्कर बसेल अशीच राजधानीची निवड करणें प्राप्त होतें. त्या वेळीं मोंगलांचा उपसर्ग कोंकणप्रांतीं विशेष नव्हता. सातारा ही जागा कोंकणप्रांत व देश याला मध्यवर्ति असल्यानें व यापुढील मोंगलांबरोबर सामना देण्याचे प्रसंग प्रामुख्यानें देशावरच येणारे असल्यामुळें सातारा ही राजधानीची जागा राजाराम महाराजांना श्रेयस्कर वाटली. नंतर राजाराम महाराजांचा सामना

औरंगजेबाबरोबर सुरू होऊन शेवटीं औरंगजेबाच्या जबरदस्त रेट्यामुळें राजाराम महाराजांना सातारा सोडून निघून जावें लागलें. औरंगजेबानें सातारा किल्ला १७०० मध्यें काबीज केला. त्याचा मुलगा अजीमशहा यानें हा किल्ला हस्तगत केला म्हणून सातारा किल्ल्याचें नांव 'अजीमतारा' असें ठेवलें गेलें. सातारा किल्ला हस्तगत करण्याचें काम चालू असतांना 'मंगळाईच्या' बुरुजाखालीं औरंगजेबाचा सरदार तर्बियतखान यानें भला मोठा सुरुंग तयार केला. त्याला बत्ती दिल्यानंतर भयंकर स्फोट होऊन डोंगराचा एक मोठा खडपा त्यावरील मंगळाईच्या बुरुजासह एकदम जोरानें वर आकाशांत उसळून किल्ल्यांत जाऊन पडला. त्यामुळें मराठ्यांचे शेंकडों लोक प्राणाला मुकले. अशी भयंकर परिस्थिती प्राप्त झाली असतां सातारा किल्ल्यावरील प्रयागजी प्रभु किल्लेदार यानें ना उमेद न होतां किल्ल्याची व बुरुजाची लगेच दुरुस्ती करून घेतली व पुनः मोठ्या शौर्यानें किल्ला लढविला. (याचें वर्णन मागें पृष्ठ ८२ वर पहा.) परिशिष्ट ५ हें सातारा किल्ल्याचें इतिहास प्रसिद्ध 'मंगळाईच्या' बुरुजाकडील छायाचित्र आहे. औरंगजेबाकडून मोंगल मर्दिनी ताराबाई यानीं सन १७०६ मध्यें साताऱ्याचा किल्ला लढून परत घेतला. तेव्हांपासून सातारा किल्ल्याला 'अजिंक्य तारा' या नांवानें संबोधूं लागले. ताराबाईनीं औरंगजेबाची धूळधाण उडविल्यानंतर खरोखरीच त्या 'अजिंक्य तारा' होऊन बसल्या, ह्मणूनच त्या किल्ल्याला ताराबाईचें नांव 'अजिंक्य तारा' असें देण्यांत आलें.

---

## परिशिष्ट ६.

### 'अजिंक्य तारा' किल्ल्यावरील ताराबाईचें निवासस्थान.

इ. स. १७३० मध्यें अजिंक्य तारा किल्ल्यावरील राजवाडा दुरुस्त

करून त्या ठिकाणीं ताराबाईंची राहण्याची व्यवस्था शाहूराजे यांनीं केली. याच ठिकाणीं ताराबाईनीं आपल्या आयुष्याचीं सुमारें अडीच तपें घालविलीं. सध्या हा राजवाडा पूर्ण मोडकळीला आलेला आहे. वर्ष दोन वर्षे अशीच लोटल्यास सर्व राजवाडा अक्षरशः जमीनदोस्त होऊन राजवाड्याची साक्ष देणारा चौथरा मात्र कायम राहील. याच राजवाड्यांतून ताराबाईनीं अखेर अखेर अनंत राजकारणें केलीं. या ग्रंथांतील १४ वें प्रकरण 'ताराबाईपुढें पेशव्याची शरणागति' हें वाचावें म्हणजे ताराबाईच्या या निवासस्थानाची आणि त्यांची अजिंक्य बुद्धिमत्ता व पराक्रम यांची महती लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........
विभाग ..........
क्रमांक
नों. दि.

# सूचि.


अकबर बादशहा १३२.

अकबर महंमद २२, ३१, ३३ ते ४०, १११, ११२.

अजीमशहा ३७, ३८, ८०, ८१, ८३, १०३, १०५, १०७, ११४, ११५, १३० ते १३२, १३५, १४५, १४६, १५३, १७०, १८७.

अजीमउश्शान ११५.

अण्णाजीपंत १०७.

अनुबाई व्यंकटराव घोरपडे २१४ ४०१, ४०३.

अफझुलखान ७, १०, १२९.

अबदल्ली ४०१,

अमृतराव बांडे १९७.

अलीवर्दीखान २७३.

अंताजी मंगाजी वाकनीस ६७, ६८.

अंताजी त्रिमल २००, २०६, २२०.

अंबरखान ५५.

अंबाजीपंत पुरंदरे १६१, १९१, २२६, २५३.

अंबिकाबाई १९, ५३ ते ५५, ६५, ६९, ७५, ७६, १२९, ३७४.

अंबु पांड १३५.

आटाळे ६०, ६८, ७१.

आदिलशहा १०, १८.

आनंदराव जाधव ३६०

आनंदराव महादेव प्रभुदेशपांडे १६८.

आपाजी थोरात १८९, १९३.

आप्पासाहेब सामवंशी ३०३.

आबाजीपंत ९.

आबाजी निळो पारसनीस ६७, ६८.

आबासाहेब [संभाजीराजे कोल्हापूरचे] २८४.

आलफअली २४०, २४१.

आसदखान वजीर ६१ ते ६३, ७०, १०७, ११५, १३०, १५३, २३८.

इखलासखान २२, ४४.

इंद्रोजी कदम ३००.

उदाजी चव्हाण १८९, १९०, २१९, २२५, २२८, २५०, २५१, २५७, २५८.

उदाजी पवार २२०.
उदेपुरी राणी १०८.
उद्धव योगदेव ५२.
उमाबाई दाभाडे ३०४, ३४४, ते ३४६, ३५१, ३५३ ते ३५५, ३७४, ३८०, ४२२.
उमाबाई सदाशिवराव पेशवे ३०३.
उमाजी भोंसले ४०४ ते ४०८, ४२७
एसाजी कंक ५.
एवजखान २४९.
औरंगजेब ८, १०, २१, २२, २४, २७, ३१, ३३, ३५ ते ४८, ५०, ५२, ५३, ५७ ते ५९, ६१ ते ६३, ६५ ते ६७, ६९, ७०, ७६, ८१ ते ८६, ८८, ९१ ते ९६, ९८ ते १०४, १०६ ते ११५, ११७, ११९ ते १२९, १३३, १३४, १३६, १४१ १४३ ते १४७, १५०, १५१, १५५, १६०, १६२, १६६, १७०, १७२, १७५, १७८, १७९, १८७, २०७, २१८, २२१, २२५, २२८, २३१, २३३, २३८, २३९, २४३-२४४, ३०५, ३०७, ३११, ३७१, ३७९.
कमलाकरभट्ट १२.
कमरोद्दीन ऊर्फ चिंकिलीजखान २३८-२३९.
कर्णराज ५९.
कलुशा—कविकुलेश ३१ ते ४१ ४४ ते ४६.
काकासाहेब भोंसले जितीकर २८४
कान्होजी आंग्रे ५, ६८, १५९, १८०, १८९, २२२, २२३, २३४, २४८, ३११.
कान्होजी भोंसले १९७, २२१, २२२, २३४.
कामबक्ष ६१ ते ६३, ११४, ११५, १२५, १२६, १२८, १४६, १८७.
काशीबाई १९.
कुसाबाई ४०७.
कुंवरजी शिर्के २९१.
कृष्णराव अमात्य ४०३.
कृष्णाजी दाभाडे २५३.
कृष्णाबाई ऊर्फ दर्याबाई निंबाळकर २८५ ३००, ३०१.
कृष्णाजी पंडीत २०२.
कृष्णाजी महादेव जोशी १३५.
केशव पंडित १३.
कोकाटे १९६.
खंडेराव काशी ३२४.
खंडेराव गुजर १२४, १२५.
खंडेराव दाभाडे ४९, ५९, ७२, १८५,

१८९, १९३, १९५, २१९ ते २२२, २३९, २४०, २४२, २४७, ३४४.
खंडो बल्लाळ ४९, ५०, ५४, ५९, ६३, ६४, ६८, १५९, १६२, १६३, १६५, १६७ ते १६९, १८० ते १८२, १८९, १९१, २२२.
खाजा अबदुल रजाक २५.
खानखानान मुलीमखान वजीर १८८.
खाफीखान ८३.
ख्वाजा हमीद १०३.
खेमसावंत १८९, १९०.
गणेश बल्लाळ ३६४.
गणोजी मोहिते ३२२.
गणोजी शिर्के १९, ३०, ६३, ६४.
गदाधरभट नाशीककर १३५.
गदाधर प्रल्हाद १६८.
गंगोबा ३४०, ३४१.
गागाभट्ट १२, १३.
गाजीउद्दीन १०३, १०५.
गिरजोजी यादव १९९, २००, २०६, २२०.
गोपिकाबाई ३३१, ३३४, ३३७ ते ३३९, ४०६, ४०८.
गोपाळराव महादेव ३७४.
गोविंदराव चिटणीस २७४ ते २७६, २७८, २८१, २८३ ते २८७, २९५, ३०३, ३१२ ते ३१४, ३१६, ३१८, ३२१, ३२३, ३२८, ३३२, ३३५, ३४०, ३४१, ३५९, ३६६, ३७४, ३८०, ३९१ ते ३९३.
गोविंदपंत बुंदेले ४१६.
गोविंदभट्ट १२.
गोविंद मल्हार ३२४.
घनःशाम नारायण ३२४.
घाटगे—कागलकर १८, ५३.
घैरियतखान २२.
घोरपडे १८.
चंद्रसेन जाधव १८६, १९० ते १९८, २०७, २०८, २२६, २२८, २३७, २३९, २४१, २४२, २४५, २४८, २४९, २५५, ३०२.
चंद्रावती १७५ ते १७८.
चिटकोपंत ३१७.
चिमणाजी गणक लेखक १५.
चिमणाजी दामोदर १६४, १८९, १९७, २२९.
चिमणाजी नारायण ३१६, ३२४, ३९५.
चिमाजी बाळाजी २१०, २११, २१४, २२६, २५९, २६३, २३५, २६७, २६९, २७०, ३३१, ३४५.

चिकिलीजखान—कमरोद्दीन पहा.
चिंतो अनंत देवस्थळे ३९१.
चिंतो विनायक ३००.
जगनाईक १०५.
जगजीवन पंडीत—दादोबा प्रतिनिधी पहा.
जगदेवराव निंबाळकर १७.
जनार्दनपंत हणमंते १५, २५, २७ ते २९, ५५, ५६, ६८.
जनार्दन बाजीराव २६६.
जनार्दनबाबा फडणीस ३४७.
जयसिंग जाधवराव १३७, १८०.
जयाजी शिंदे ३२१, ३४०, ३६२, ३९०.
जसवंतसिंग १७५ ते १७८.
जहांदरशाहा २२८.
जानकीबाई—प्रतापराव गुजर यांची कन्या ५३, १२४.
जानकीबाई बुरबाडकर २०२.
जानबा निंबाळकर ३४७.
जानोजी ढमढेरे ३४९, ३५३.
जानोजी रघोजी भोंसले ३९०, ३९८.
जिजाबाई-छत्रपति शिवाजी महाराजांची मातोश्री १८ ते २०, ८०.
जिजाबाई—कोल्हापूरच्या संभाजी राजे यांची पत्नि २११, २६३, २६६, २६९, २८५, ३६१, ३६२, ३८२, ३९६ ते ३९८, ४०१ ते ४०८, ४१२, ४२८.
जिवाजी गणेश खासगीवाले ३१७.
जिवाजीराजे भोंसले वावीकर ७६.
जीवनराम सुमंत औरंगाबादकर १९६.
जोत्याजी केसरकर ५२, १२१, १२८, १३५, १५६, १६२, १६३.
झिबुन्निसा बेगम ४९, ५१, ११७, ११९ ते १२१, १२३ ते १२५, १२८, १२९, १५०, २२१.
झुल्पिकारखान ५१,६१, ते ६३, ६५, ९४, १०२, १०३, १०६, १०९, १२८, १३०, १३६, १४६, १५३, १८८, २३८, २४७.
झुल्पिकारबेग २३९.
तकरीबखान ४३, ४४.
तर्बियतखान ८१, ८२, ८५, ९४, १४६.
तानाजी मालुसरे ५, ७.
ताराबाई ४९, ५३, ५४, ६५, ६९, ७५, ७७ ते ८१, ८७ ते ९२, ९६, ९८ ते १०२, १०५ ते ११०, ११२, ११५, ११६, १२६, १२७, १२९, १३०, १३५ ते १४९,

१५३, १५५ ते १५९, १६१, १६२, १६४ ते १६६, १६८ ते १७५, १७८ ते १८०, १८२ ते १९०, १९२ ते १९४, १९६ ते २००, २०४, २०६, २०७, २०९, २१०, २१३, २१५, ते २२६, २२८, २३७, २४१, २४४, २५१, २५५ ते २५७, २५९ ते २६२, २६४, २७०. २८२ ते २८४, २८६, २९२ ते २९६, ३०१, ३०३, ते ३१८, ३२० ते ३२२, ३२४ ते ३२७, ३२९, ३३०, ३३२, ३३५, ३३९ ते ३४३, ३४७ ते ३४९, ३५२, ३५३, ३५५ ते ३५७, ३५९ ते ३६६, ३६८ ते ३७३, ३७५ ते ३९३, ३९७ ते ४०१, ४०३, ४०५ ते ४०८, ४१० ते ४१५, ४१७, ४२१ ते ४२५, ४२७, ४३१, ४३२.

तिमाजीपंत हणमंते ६५, ६८, ९१.

त्रिंबकराव दाभाडे ३२४, ३४४, ३५१.

त्रिंबकराव मामा विश्वनाथ पेठे ३८२, ३९१, ३९२.

त्रिंबक विनायक कोनेरपंत ३४०, ३४१.

त्रिंबक सदाशिव—नाना पुरंदरे पहा.

त्रिंबक सुंदर २०१.

तुळाजी आंग्रे ३२४.

तुळोजी शितोळे २००, २०६, २२०.

थोरात ६०.

दत्ताजी भापकर ३४७.

दत्ताजी शिवदेव १८४, २२७.

दत्ताजीपंत वाकनीस २१.

दमाजी गायकवाड २८२, ३२७, ३४४ ते ३५१, ३५३, ३५५ ते ३५७, ३५९, ३६४, ३७४, ३८०, ४२२.

दमाजी थोरात १८९, १९०, १९३, १९५, २१९, २२३, २२५ ते २२७.

दलपत बुंदेले ९४.

दाऊदखान पन्नी २३३.

दादाजी नरस प्रभु ३, ४, ५.

दादाजी माणकर ३४७.

दादोबा प्रतिनिधि ऊर्फ जगजीवनराव २९८, ३१९, ३२०, ३२२, ३६१, ३६२, ३८०, ३८२, ३८६, ३९०, ४२१.

दाभाडे ६८, १०२.

दारा १७५.

दावलजी सोमवंशी २५०.

दिनकरभट्ट १२, १३.

दिनकर महादेव ३६४, ३६५, ३६७, ३६८, ३७१, ३७३, ३८२, ४००.
दिलीरखान ७, २१ ते २४, ३५, ३६.
दिलावरअल्लीखान २४०, २४१.
दुर्गादास राठोड ३३, १०७.
देवराव ३५८.
देवराव लपाटे ३२३.
धनाजी जाधव ४९, ५०,५९ ते ६१, ६५, ६७, ६८, ७४, ७७, ९४, ९८, १०२, १०५, १२६,१२७, १५५, १५९ ते १६६, १६९, १७८, १८०, १८२, ते १८५, १८९ ते १९१, १९३, १९४, १९८, २१५, ३१०.
धोंडभट्ट उपाध्ये ३२४.
धोंडो गोविंद वकील ३८२.
नजरअल्लीखान १०३.
नरसप्रभु गुप्ते ५.
नस्रतजंग ६१.
नागोजीराव ३७४.
नाथाजी धुमाल १९१.
नानासाहेब पेशवे २१०, २११,२५३, २५९, २६३ ते २७६, २७८ ते २८३, २८६ ते २९०, २९२ ते ३००, ३०२, ३०५, ३०८ ते ३११, ३१३ ते ३२७, ३२९ ते ३३९, ३४१ ते ३५३, ३५५ ते ३५७, ३५९ ते ३७३, ३७५ ते ४१४, ४१८, ४२२ ते ४३२.
नाना पुरंदरे ३२१, ३४७ ते ३४९, ३५४, ३९१, ४११.
नाना फडणवीस ४३१.
नारायणभट्ट रामेश्वरभट्ट १२.
नारायणभट्ट ३८८.
नारायण व्यंकटेश घोरपडे ३९०, ४०१, ४०३.
नारो प्रल्हाद ६५.
नारोराम शेणवी १८४, १९६,२५३.
नारो शंकर १६८, २१४, २२६, २२७.
नारो महादेव घोरपडे १६९, १८४, २१३ ते २१५.
नारोबा नाईक वाखरे ४०२.
नासरजंग ३४०.
निजामअल्ली ३४७, ४०१.
निजामुल्मुल्क २३३, २३९ ते २४१, २४४, २४५, २४७ ते २४९, २५५, ३८२, ३८७, ३८८,

३९०, ४१७.
निंबाळकर १०२.
निंबाजी नाईक निंबाळकर ३२४.
निराजी रावजी ५६.
निळो बल्लाळ ५९, २२२.
नीळकंठ पंडित अमात्य १५.
नीळकंठ मोरेश्वर १३८, १५९, ३११.
नीळोजीपंत पिंगळे ५६.
नेताजी पालकर ५.
नेमाजी शिंदे ७१, ७२, १३६, १८८.
परशुराम त्रिंबक प्रतिनिधि ६०, ६७, ६८, ८२ ते ८४, ८७ ते ८९, ९५, ९८, १०६, १३७, १३८, १५६, १५९, १६०, १६२, १६६, १६७, १६९, १७८, १८० ते १८३, १९०, १९४, २०६, २७१, २८५, २८६, ३१०.
परसोजी भोंसले ५९, ७१, ७२, १३६, १५७, १५९, १६४, १६८, १८४, १८५, १८९, १९७, २२१, २६४.
प्रतापराव गुजर ५३, १२४.
प्रतापजी हैबतराव १००.
प्रतापराव मोरे १०१.
प्रयागजी प्रभु ८२, ८३, १६६, ३१२.
प्रल्हाद निराजी २७, ४९, ५६, ६३, ६५, ६८, १६८.
पवार ६०, ६८.
पाटणकर ६८.
पार्वतीबाई सदाशिवराव पेशवे ३१६.
पार्वतीबाई [ करवीरचे शिवाजीराजे यांच्या पत्नि ] १९९.
पिराजी घोरपडे ७४, १८४, २१३, २१४.
पिराजी राऊत १९०, १९१.
पिलाजीराव शिर्के ३१.
पिलाजीराव जाधव वाडीकर १९१, १९६, २२७ २५०, २७७, ३०३.
पिलाजी गायकवाड २४२.
पुतळाबाई १९.
पुनापा नाईक ९१, १०४ ते १०६.
पेम नाईक १०४, १०५.
फत्तुल्लाखान ८३, ९४, १४६.
फरीदखान ३४९.
फरुक्सेअर २३८ ते २४०.
फत्तेसिंग भोंसले १३५ ते १३७, १८५, २३४, २३५, २४७, २५४, २६२, ३४७, ३८२, ४०२.

फिरंगोजी नरसाला २३.
बजाजी निंबाळकर १७ ते १९, ५३.
बऱ्हाणजी मोहिते ३४९,
बळवंतराव गणपतराव ३५६.
बहिर्जी नाईक इंगळे २८.
बहिरोपंत उदो योगदेव २९.
बहादुरखान ३७.
बहिरोपंत पिंगळे १६८, १८९, २२२, २२३.
बहादूरशहा १७२, १८७, २३८, २४०.
बंडगर ६८.
बंकीगायकवाड ७७, १६२.
बाजी सर्जेराव देशमूख ५.
बाजी पासलकर ५.
बाजीप्रभु ७.
बाळाजी आवजी प्रभु १३, १५, २७, ३०, ३६.
बाळाजी पंडित न्यायाधिश १५.
बाजी मुरार देशपांडे २५.
बाळाजी विश्वनाथ १५५, १५९, १६२, १८४, १८६, १९०, १९६, २०८ ते २१०, २१३ ते २१५, २१७, २२० ते २२७, २२९ ते २३१, २३३, २३६, २३७, २४१, २५५, २५७, २६०, २६७, २७०, २७२.
बापूजी भोंसले हिंगणीकर १३६, १५६ ते १५८, २६४.
बाळकृष्ण वासुदेव हणमंते १६८.
बाजीराव बाळाजी २१०, २१४, २२६, २३७, २४८ ते २५०, २६३, २६५, २६८, २७३, ३४४, ३४५, ३५१, ३५२, ४१७, ४१९, ४२०.
बाळाजी बाजीराव. नानासाहेब पेशवे पहा.
बाळाजीपंत भानु २३०.
बाबूजी नाईक बारामतीकर २४७, २६५, २७३, २७८, ३१७, ३२३, ३२४, ३३०, ३३३, ३४३, ३५८, ३६०, ३६१, ३८०, ३९९, ४२१, ४३०.
बाबाजी महाराज २८१.
बाजीराव अमात्य. भगवंतराव रामचंद्र पहा.
बापूजी खंडेराव चिटणीस ३००, ३२३, ३२८, ३२९.
बापूभट टोकेकर ३१५.
बाळोजी बिन शिवाजी डुबल ३२४.

बापूजी बाजीराव ३५६.
बाबाजी जाधवराव शिंदखेडकर ३६०, ३९१.
बाबासाहेब सावनूरकर ३९६.
बिंबाजी रघोजी भोंसले ३९०.
बुसी ३४६.
बुवासाहेब ७६.
बुधकर घाटगे ८८, २०५.
बेदरबख्त ९४, ९५, १०२, १४६.
भक्ताजी हुजरे ७७.
भवानीबाई ८८, १९९, २०५, २२५, २८४.
भगवंतराव रामचंद्र २१८, २२५, २५०, २५१, २५३, २७१, २८४, २८५, ३१७, ३२४.
भवानीशंकर मोरेश्वर २५३, ३२४.
भवानराव प्रतिनिधि ३१९, ३२२ ते ३२४.
भालचंद्रभट्ट १३.
भिऊबाई २१४.
भोंसले १०२.
महादाजी भोंसले मुंगीकर ४०४ ते ४०६, ४२७, ४२८.
महादोबा पुरंदरे २७३, २८६, ३३१, ३३२, ३३४, ३३५, ३५९, ३६६, ३८०, ३९३, ४०७, ४२१.
महादाजी निंबाळकर १९, २४, ३७३, ३८२, ४००.
महादाजी अंबाजी ३१६.
मळेकर पिलाजीराव शिर्के २०.
मल्हारबा ऊर्फ मल्हारराव होळकर ३२१, ३४०, ३४१, ३४२, ३६३.
मसाउद्दीन २५.
मदनसिंग ५२, १३०, २२९.
महादाजी नाईक पानसंजळ ५६.
महादाजी गदाधर ५६, १६८.
महिपतराव त्रिंबक ४११.
मस्तानी ३४५.
मल्हार रामराव ७५.
महादाजी कृष्ण जोशी १६१.
महमदशाहा २३१.
माने १८.
मानाजीराव फाकडे ४०९.
मालोजीराव भोंसले २८१, ३०१.
मालसावंत २९.
मानाजी आंग्रे ३२४.
मानाजी पायगुडे ३४९, ३५४.
माधवराव पेशवे ४०५, ४०६, ४०८, ४१०, ४१३, ४३०.

मावळंकर देसाई सेतवडेकर १३८.
मानसिंग मोरे १८९, १९४. १९५.
मालोजी घोरपडे २२८.
मुरारबाजी ७, १६८.
मुधोजी भोंसले २८२, २८३, २८६, २९०, २९५, ३१६.
मुधोजीराव निंबाळकर १७, १८.
मुरारजी घोरपडे ३६३.
मुजफरजंग ३४६.
मुआज्झिम ३७, १३०, १७०.
मुद्गलभट्ट १६८.
मोरो शिवदेव ३७३, ३८६, ३९१.
मोरोपंत पेशवे २०, २६, २७, ५९, ५६, ६८.
मोहिते ६४.
मोरोपंत सबनीस १२८, १३५.
मोहनसिंग १३५.
मोकाबसिंग २३९, २४०.
यशवंतराव पोतनीस ३२१, ३२३, ३२४.
यशवंतराव प्रभु ३६९ ते ३७१, ३७४.
यशवंतराव दाभाडे ३४४ ते ३४६, ३४९, ३५०, ३५३, ३५४, ३५६, ३५९, ३८३, ३८४.
यमाजी शिवदेव मुतालिक २८२,२८६, २९४, २९८, ३१२, ३१९, ३२०, ३२२, ३२४, ३४६, ३७३, ३९८, ३९९, ४२१, ४२३.
यादव गोपाळ २५१.
यातिकादखान ४३.
येसूबाई [ नारोशंकरची आई ] २२७
येसूबाई २०, २२, २५, ३१, ४७, ४८, ५१, ५३, ५४, ७३, ७४, ८१, ११९, १२४, १२९, १४१, १६५.
रघुनाथपंत हणमंते १५, ४१, ५५.
रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा ३१७, ३३४, ३८२, ३९०, ४०१, ४०८ ते ४१३, ४१६, ४३०, ४३१.
रघोजी भोसले २६४ ते २६६, २६८ ते २७०, २७३, २७८, २८२, २८६, २९०, २९५, ३०१, ३१६, ३१९ ते ३२१, ३२३, ३३०, ३४४, ३४७, ३५२, ३८०, ३९०, ३९८, ४१८, ४२२, ४२४, ४२५.
रंभाजी पांढरे ३४७.
राजाराम महाराज १९, २७, २९, ३१, ३९, ४६ ते ५०, ५२ ते ६१, ६३ ते ६५ ६७ ते ७५, ७७, ७९, ८१, ८३ ते ८७,

८९, ९१, ९८, १०२. ११२, १२२ ते १२५, १४१ ते १४५, १४८ ते १५०, १५२, १५९, १६०, २२५, २२९, २४३, २४४, २५१, ३०५, ३०६, ३१०, ३१४, ३१७, ३१८, ३७८, ४१७.

रामाजी केशव ३७३, ३७४.

रामदासपंत ३४६. ३५३, ३८०, ३८८, ३९९, ४२१.

राजसबाई ५३, ५४, ५५, ७५, ९१, १६०, १९९, २००, २०४, २०५, २०७, २२०, २२५, २५१.

राणाप्रतापसिंह १, १७४.

रामेश्वरभट्ट १२.

राजा तोडरमल्ल १२.

रामकृष्णभट्ट १२.

रामदास स्वामी १३, २०, १३८, ४१७.

राजकुंवरबाई १९, ६४.

रामचंद्र नीलकंठ २७, १८९.

रामदेवराव जाधव २४४.

रामचंद्रपंत बावडेकर ४९, ५४, ५६, ६०, ६३, ६७ ते ७०, ७६, ७७, ८१, ८४, ८५, ८७ ते ८९, ९८, १०६, १४८, १५६, १५९, १६८, १६९, १७४, १८१, १८२, १९९, २००, २०२, २०५, २०७ ते २०९, २१४, २१७, २१८, २२०, २२५, २२८, २३६, २३७, ३०५, ३१०, ३१९, ४२२.

रामजी नलगे ५५.

राणोजी शिर्के ६३, ६४.

राणोजी घोरपडे ७४, २१३.

रामराव जिवाजी ३२३, ३२४, ३९१.

रामचंद्रपंत पुंडे १६८.

रायभानजी राजे भोंसले १७०, १७१.

रामाजी नारायण कोल्हटकर १८४.

राधाबाई अंबाजी २२६.

राणोजी चव्हाण २२८.

राणोजी भोंसले २३०.

रावरंभा निंबाळकर २४०, २४३.

रामराजे २६२, २८०, २८२, २८३, २८५, २८७, २९०, २९३ ते २९७, ३०० ते ३०२, ३०४, ३०६ ते ३१०, ३१२ ते ३१९, ३२१ ते ३२३, ३२५ ते ३३१, ३३४, ३३९, ३४१, ३४३, ३४५, ३५२, ३५६, ३५७, ३६०, ३६२, ३६३, ३६५, ३६७ ते ३६९, ३७१, ३७२, ३७५ ते ३७७, ३८०, ३८९, ३९२, ३९७, ३९९, ४०५ ते ४०८, ४१०, ४११, ४२० ते ४२८.

रामचंद्र मल्हार ऊर्फ रामचंद्रबाबा ३२१, ३२२, ३२४, ३२७, ३३०, ३३१, ३३४ ते ३३७, ३३९ ते ३४१, ३५४, ३५८, ३५९, ३६६, ३८०, ३९३, ४०७.
रांझेकर २२७.
रुस्तुमराव जाधव १३५, १६०.
रोशनअख्तार ऊर्फ महंमदशहा २४०.
रोशन बेगम १८.
लक्ष्मणराव गोविंद ३९१.
लक्ष्मीबाई विश्वासराव ३१६.
लाल कुवर ३३८.
लिंबाजी अनंत ३००.
लोदीखान फौजदार १३०.
व्यंकोजी राजे २१.
व्यंकटराव घोरपडे २१४, २५०, २५१.
वाडीकर सावंत १८०.
व्यासराव १९०, १९१.
वासुदेव दिक्षीत ३१५, ३८८.
वासुदेव मुतालिक ३२३.
विश्वेश्वरभट्ट १३.
विठ्ठल बयाजी ३८६.
विठ्ठल त्रिंबक २५.
विसाजी शंकर ५४.
विष्णु विश्वनाथ ३७३, ३७४.
विठ्ठल शिवदेव ५४, ३५३.
विष्णु नरहर ३९१.
विरुबाई १२९.
विसाजी नारायण २११, ४०२ ते ४०४.
विटोजी चव्हाण २२८.
विटोजी भोंसले २८०, २८१.
विश्वासराव २९९, ३१६, ४०९.
विठ्ठलराव आनंदराव ३२४.
श्री छत्रपती शिवाजी महाराज २ ते ११, १४ ते ३२, ३५, ३७, ३८, ४०, ४१, ४३, ४७, ४८, ५१ ते ५५, ५७, ६४, ६७ ते ६९, ७२, ७४, ७६, ते ८०. ८२, ८५, ९२, ९६, ९९, १००, १०८, ते ११०, १२०, १२१, १२९, १३२ ते १३४, १३८, १४२, १४७ ते १४९, १५१, १५३, १५७, १५८, १६२, १७३ ते १७५, १७९, १८२, २२९, २३१ ते २३३, २३६, २७१, २७२, ३०५, ३२६, ३४१, ३५९, ३६८, ३८०, ३८९, ४१७, ते ४१९.
श्रीकराचार्य कालगांवकर ५६, ६८, ३११.
श्रीनिवासराव प्रतिनिधि २५०.

श्रीपतराव प्रतिनिधि २५१, २५३, २६६.
श्रीनिवास गंगाधर ३२४.
शहाजीराजे १७, १८, २३१.
शहालम ११५.
शहाजी लोखंडे १३७.
शहाजहान १७५, २३३.
शहाजी निंबाळकर १८९,१९३,१९५.
शहाजादा अजीम उखान २३८.
शहाउद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन २३८, २३९.
शरीफजी २८०, २८१.
शहाजी भोंसले खानवटकर ४१२.
शंकराजी मल्हार नरगुंदकर ५६, ६८, २२८, २२९.
शंकराजी नारायण सचीव ६०, ६७, ६८, ८७ ते ८९, १०६, १५९, १६१, १६५, १८९, १९२, २१४, ३२१.
शंकराजी महाडीक १८४.
शंभुसिंग जाधव २५०, २५४, ३०२, ३०३.
शाहास्तेखान १०, २३.
शामजी आवजी ३०.
शामजीराव पिंडे ५६.
शिर्के सरदार ३६, ६४, ६५.
शिवाजी ऊर्फ शाहूराजे ३१, ४७, ४८, ५१ ते ५४, ७३, ७४, ७७, ८१, ८६ ते ८९, ११७, ११९, ते १२९, १३१ ते १४०, १४४, १४५, १४७ ते १६७, १६९ ते १७४, १७९, १८०, १८३ ते १९०, १९२, १९३,१९५ ते २००, २०३, २०५ ते २१०, २१२ ते २१७, २१९ ते २३५, २३७, २३९ ते २४२, २४४ ते २४८, २५० ते २५९, २६२ ते २६५, २७३ ते २७५, २७८ ते २९२, २९५ ते २९९, ३०१, ३०४, ३०९ ते ३१३, ३१८, ३१९, ३२१, ३३३, ३४४, ३४६, ३५२, ३५६, ३५७, ३५९, ३७७, ३७८, ३८९, ३९४, ३९८, ४०४, ४०८, ४१२, ४१७ ४१८, ४२० ते ४२२, ४२४ ते ४२७, ४३१.
शिवाजी [ ताराबाईचा पुत्र ] ४९, ५३, ६५, ६९, ८७ ते ९०, ९९, १३७ ते १४१, १४५, १४७, १४८, १५०, १५२, १५६, १६८, १६९,

१७२, १८० ते १८३, १८६, १८८ ते १९०, १९२, १९४, १९७ ते २०८, २१७ ते २१९, २२४, २२५, २६०, २७०, २८४, २९४, ३०३, ३०४, ३०६, ३०८, ३१०.

शिवाजी धनाजी जाधव १०५.

शिवाजी बल्लाळ जोशी ३२४.

शिवाजी हरी ३५८.

शिवाजी [ संभाजी राजे यांचा दत्तक पुत्र ] ४१२.

शिदोजी राऊत २५३.

शेखमीरा वाईकर जमादार १६६, १६७, ३२७.

सईबाई १७, १९.

सकवारबाई १९, २६२, २६४, २८० २८२, २८६, २८७, २९० ते २९९, ३१६, ३१९, ३२४, ३८९, ४०७, ४२३ ते ४२६.

सखुबाई १९.

सखाराम हरी गुप्ते ४०९.

सर्जेखान ४३, ८१, १४६.

सदाशिव अवधूत ४०४.

सदाशिव दीक्षित ठकार ३९९.

सदाशिवरावभाऊ पेशवे २६६, २६७, २९८, २९९, ३०१, ३०३, ३१४, ३१६, ३२१ ते ३२५, ३३० ते ३३५, ३३७ ते ३४१, ३४९, ३५३, ३५९, ३६५, ३६६, ३८०, ३९४, ३९५, ३९७, ४०१, ४०६, ४०७, ४०९, ४१०, ४१४, ४२२, ४३०.

सटवोजी जाधव ३४९, ३५३.

सरदार हरीराम २११, ४०२, ४०३.

सरदार दलपतराय ६१, ६२.

सरनोबत ७५.

सर बुलंदरखान २४९.

सवाई बापूराव ३४४, ३४५.

सवाई जयसिंग १३०.

सय्यद हुसेनअल्ली २३८.

सय्यद अबदुल्ला २३८.

सय्यद लष्करखान ३४६.

सलाबतजंग ३४६, ३४७, ३८०, ४२१.

संभाजी महाराज छत्रपति १७, १९, २०, २२ ते २९, ३१ ते ३३, ३६ ते ४१, ४३, ४५, ४६, ५१ ते ५३, ५७, ६४, ६५,

७३, ७४. ७९, ८०, ९१, ९६, ११०, १११, ११९, १२७, १३०, १३७, १४१ ते १४३, १४८, १४९, १५२, १५४, १५९, १७३, १७४, २३९, २४४, ४१७.

संभाजीराजे [ राजसबाईचा पुत्र ] ६५, ९१, १४७, १६९, २२५, २२९, २३०, २३६, २३७, २४०, २४२, २४५, २४६, २४८ ते २५६, २५८, २५९, २६१ ते २६४, २६६ ते २७२, २८० ते २८३, २८६, २८७, २९०, २९१, २९४ ते २९६, ३१२, ३३४, ३३५, ३३८, ३६१, ३६२, ३८१, ३९३, ३९४, ४०१ ते ४०४, ४१३, ४२२ ते ४२८.

संताजी घोरपडे ४९, ५०,५९ ते ६२, ६७, ६८, ७४, १४७, १८०, २१३, २२८, २७१.

संताजी संभाजी अहीरराव ३६९.

संताजी हैबतराव १०१.

संताजी पांढरे १०१, १८९, १९३, ९५.

संताजी भोंसले २३७.

साबाजी भोंसले २७.

साबाजीराव निंबाळकर १७.

सावित्रीबाई १२९.

सिधोजीराव निंबाळकर ५९, २५०.

शिभोजी गुजर ६८.

सिधोजीराव घोरपडे ७४,१८०,२७१.

सिलीमकर देशमुख १००, ३९८.

सुभेदार दाऊदखान २३९.

सुभेदार घोसाखान २४०.

सुभानजी लांबघरे ८४.

सुलतान हुसेन ऊर्फ मीरमलंग ११५.

सुजनसिंग रावळ १३६.

सुळाबाई २६४.

सुकानंद २७४.

सुंदर तुकदेव २०१.

सूर्याजी कंक १८०.

सूर्याजी पिसाळ ४७, ४८.

सेखोजी आंग्रे २५०.

सैद अबदुलखान बहादूर कुतुबुल मुलुख १७१.

सोमनाथ कात्रे १३.

सोमाजी नाईक बंकी २८.

सामनाईक देसाई १३७, १५८.

सोमशंकर नाईक १०६.

सोयराबाई १७, १९, २७ ते ३२, ४६, ४९, ८०, १४२, १५२.

हरजीराजे महाडिक १९, ५५.
हरभटजीबावा २१४.
हमीदखान १८४.
हरिश्चंद्र १७४.
हंबीरराव मोहिते १५, १७, २९, ३८, ४२, ४३, ५३, ६९, ७७ ते ७९ १३७, ३०५.
हिरोजी फर्जंद २५, २८, ३०.
हिंदुराव घोरपडे १०५, १८४.
हिदायत (मुजफरजंग) मोहदीनखान ३४०.
हुसेन अलीखान ७१.
हुसेन सय्यद २२८, २२९.
हेमाद्री १७.
हैवतराव निंबाळकर ७१, ७२, १३६, १६८, १८९, १९१ ते १९३, १९५, १९६, २४०.
होनाजी अनंत १६८.
होनोपंत वेरकर १९६.

अनुक्रम ९५०
विभाग
क्रमांक
नं. ६०३८

# ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति,
## बेळगांव.

१ श्री. आ. बा. लट्टे, M. A., LL. B., *अध्यक्ष*.
२ डॉ. गो. वा. हेरेकर, M. B. B. S., *उपाध्यक्ष*.
३ प्रा. एम्. आर. साखरे, M. A. T. D.
४ रा. सा. ना. ई. चिमडे, M. A. LL. B.
५ श्री. स. रं. सुंठणकर, B. A. LL. B.
६ ,, ल. व्यं. मांजरेकर, B. A. LL. B.
७ ,, श्री. ब. नगरकर, *वकील*.
८ ,, रा. स्वा. नाईक, B. A. B. T.
९ ,, कृ. रा. परांजपे, B. A., S. T. C.
१० ,, गो. भ. गडकरी, S. T. C.
११ श्रीमती ननुबाई अहो, G. A.
१२ वै. सौ. रंगुबाईसाहेब जाधव [ *केसर-ई-हिंद* ].
१३ डॉ. वा. म. बाके, } *चिटणीस*.
१४ श्री. पां. गो. रानडे }

पत्ताः—१२२७, कोनवाळगल्ली, बेळगांव.

REFBK-0006738